# परा आधुनिक युग

परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी



# परा आधुनिक युग

परमपूज्य माताजी श्री. निर्मलादेवी

मराठी अनुवाद : मकरंद ज्ञा. आडकर

लाईफ इटरनल ट्रस्ट

# प्रस्तावना

—

खरे तर मला अशा प्रकारचे पुस्तक लिहायचे नव्हते. दिव्यत्वाच्या पूर्णानंदात मी रमलेली आहे. ईश्वरी प्रेमाचे सुख सर्वव्यापी आहे हे सुख सर्वांनीच सानंद अनुभवावे असे मला वाटत असे. विशेषत: पाश्चात्य देशामध्ये अंतिम सत्याचा शोध घेणारे खूप आहेत. अनेक शास्त्रज्ञांनी जागृती आणि संवेदना यावर खंडप्राय पुस्तके लिहिली आहेत. त्यांची यादी सहज करता येईल. पण ही सर्व पुस्तके वाचताना माणूस खरोखर कंटाळून जातो कारण अंतिम सत्याचे थोडे ही ज्ञान होत नाही. मला त्यांच्यावर टीका करायची नाही कारण बोलून चालून त्यांच्याही लेखनाचे मूळ प्रामाणिक संशोधनात आहे. पण म्हणून काय या नवीन शोधाला अभिव्यक्तीची संधीच द्यायची नाही का ? सर्वांना बुद्धिमत्ता देणाऱ्या या मनाच्या पलिकडे नेमके काय आहे. त्याचा वेध घेण्याचा विनम्र प्रयत्न ही करायचा नाही काय ?

पाश्चात्य जीवनाच्या समस्यांविषयी लिहिणे माझ्यादृष्टीने अतिशय कठीण आहे. ते जीवन म्हणजे जणू एखाद्या अवाढव्य वृक्षाचा बाह्य विस्तार. मग ह्या वृक्षाच्या मूळापर्यंत पोचून त्यांची आंतरिक वाढ करणे कसे शक्य आहे हे पाहिले पाहीजे केवळ अंर्तमनात खोलवर डोकावूनच पाश्चात्य समाजाच्या अशा समस्या आपण शोधू शकतो की ज्यामुळे पाश्चात्य मन सत्यापासून दूर राहिले आहे.

ज्या पाश्चात्य लोकांना मी लिहावे असे वाटले. त्यांच्यासाठीच हे पुस्तक आहे. दुर्दैवाने यापूर्वी मी कोणत्याही पाश्चात्य भाषेचा अभ्यास केलेला नाही. इंग्रजी भाषा हे ब्रिटीशांनी भारतावर राज्य करताना आम्हांला दिलेले एक वरदान आहे. पण याही बाबतीत दुर्दैवाने मी शाळेत आणि नंतर वैद्यकीय महाविद्यालयात शिकल्यामुळे विशेषत: पश्चिमेत सर्वमान्य असलेली इंग्रजी भाषा शिकण्याचा प्रश्नच नव्हता.

हे पुस्तक म्हणजे अलंकारिक भाषेचा दिखावा नाही किंवा माझ्या साहित्यिक गुणवतेचे प्रदर्शनही नाही. या पुस्तकातून मला ठाऊक असलेली

तथ्ये पाश्चात्य जगतापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने सरळ मांडली आहेत.

मनुष्य प्राणी हा संपूर्ण विश्वात सर्वाधिक उत्क्रांत असून त्यामध्ये एक दैदिप्यमान व्यक्तीत्व असलेला सुंदर, शांतप्रिय देवदूत बनण्याची क्षमता आहे हे त्याला पटवून देणे अतिशय अवघड आहे. आधुनिक काळातील विषयांविषयी त्याला सांगणे हा त्याच्या खऱ्या रुपाची ओळख त्याला पटवून देण्याचा सर्वात योग्य मार्ग नव्हे. माणसांची एवढी अधोगती झाली आहे व त्यांची मूल्यव्यवस्था एवढी ढासळलेली आहे की जोपर्यंत मी समस्यांच्या मूळाशी जात नाही तोपर्यंत वर्तमानातील बेड्या तोडून उत्क्रांती व उन्नतीचा मार्ग स्विकारण्याची गरज त्यांना समजावून सांगणे सहजपणे जमणार नाही. त्यांच्या समस्या कोणत्या आणि त्याची खरी उत्तरे कोणती याविषयी मोकळेपणानी बोलणे भाग आहे.

आधुनिक माणसाच्या ना अंतरंगात शांती आहे ना बहिरंगात. गरीब व श्रीमंत दोघेही सारखेच दु:खी आहेत. सर्वत्र लोक प्रश्नांची उत्तरे अंधारात शोधत आहेत. एका मर्यादित मानसिक पातळीवर बुद्धीच्या सहाय्याने आपल्याभोवतीच्या आणि आपल्याला गोंधळात टाकणाऱ्या वस्तूविषयी काही प्रश्नांची उत्तरे सापडू शकतात. पण अशाप्रकारे काही पश्नांची उत्तरे सापडली तर इतर प्रश्न निर्माण होतात. खरी उत्तरे माणसाभोवतीच्या बाह्य भौतिक परिस्थितीत नसून माणसाच्या अंतरंगात असतात. खरी व कायम स्वरुपी उत्तरे शोधण्यासाठी व्यक्तींच अंतरंगात पूर्णपणे बदल घडणे आवश्यक असते. हे अशक्य नसते. किंबहुना हे अगोदरच घडलेले आहे. अनेक सहस्त्र व्यक्तींनी ही अवस्था खरोखर प्राप्त करुन घेतली आहे. अनेक व्यक्तींच्या सामूहिक आंतरिक बदलामधून त्यांना आत्मस्वरुपाचा साक्षात्कार होणे हा सध्याच्या काळातील सर्वाधिक क्रांतीकारी शोध आहे. परंतु अजूनपर्यंत विशेषत: अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली व जर्मनीतील खूपच, कमी राज्यकर्त्यांनी हा शोध मान्य केला आहे. पोप जे स्वत: धर्माचे अध्वर्यू मानले

जातात आणि सर्व भोंदू गुरुंना भेटतात ते मला मात्र कधीच भेटणार नाही किंवा माझ्याशी कधीच बोलणार नाहीत. मी मात्र त्यांच्या पोप पदासाठीच्या निवडणूकीपूर्वी त्यांना भेटलेली आहे. हे माझे काम नव्हे पण हे पूर्ण प्रकाशात आणले गेले पाहिले की जेणे करून व्यक्तीमात्रे जागृतावस्थेच्या अधिक वरच्या अवस्थेत पोहोचतील आणि स्वत:ला ओळखून त्यांच्यातील स्वत्व समजून घेणे व त्याचा अभिमान बाळगणे त्यांना जमेल अशी स्फुर्ती मला ईश्वरी-ईच्छेमुळे झाली आहे.

मला बहुतेक व्यक्तीमात्रे देवांच्या मुर्तीरुपात आहेत असे वाटते आणि कुंडलिनी जागृतीद्वारे त्यांच्यात बदल घडवून त्यांना देवदूताच्या अवस्थेस पोचवणे शक्य वाटते. मी अशी अपेक्षा करते की या पुस्तकामुळे लोक दुखावले जाणार नाहीत. किंबहुना मी अशी आशा करते की खूप अधिक लोक सहज योगाच्या महान कार्यास उपलब्ध होतील की ज्यातून ते त्यांच्या (सत्याच्या) शोधाचे अंतिम ध्येय गाठू शकतील. त्यासाठी मी विनोदी शैलीचा वापर करणार आहे कारण माझ्या स्वभावातच मिष्कीलपणा आहे. मला सर्व प्रकारच्या प्रसंगात विनोद दिसतो आणि लोक मात्र काही वेळा उगाचच खूप गंभीर होतात.

एखाद्या मातेस तिच्या मुलांच्या दोषांबद्दल बोलणे फार अवघड असते. पण त्या दोषांना सामोरे गेल्याशिवाय ती मुले त्यांची निरागसता परत मिळवून आत्मसाक्षात्काराच्या त्यांच्या अंतिम ध्येयापर्यंत पोचणे शक्य असते असे मला वाटत नाही. म्हणून मी तुम्हां सर्वांना सांगू इच्छिते की माझ्यावर रागावू नका उलट ज्या प्रचंड प्रेमामधून आणि सहिष्णुतेतून मला जे काय इंग्रजी येते ते वापरुन आणि मला जमल्या त्या शैली व साहित्याचा उपयोग करुन मी हे जे पुस्तक सर्व लोकांच्या कल्याणासाठी लिहिले आहे ते समजून घ्या.

# अनुक्रमणिका


१. नवविचारधारा आणि बुद्धिप्रामाण्य ..........................७
२. पर्याय ..................................................५०
३. लोकशाही ...............................................७८
४. जातीयवाद ..............................................९३
५. पाश्चिमात्य संस्कृती ..................................११९
६. धर्म ...................................................१२८
७. ‘शांती’ .................................................१५८
८. ‘विश्वशांती’ ...........................................१७१
९. ‘उत्क्रांती’ .............................................२०३
१०. तत्त्वज्ञानाचा संदेश ...................................२११
११. गूढरचना ..............................................२१९

# १

# नवविचारधारा आणि बुद्धिप्रामाण्य

—

पुराणमतानुसार सध्या कलियुग चालू आहे. कलियुग म्हणजे गोंधळाचे युग. संघर्षाचे युग. युग म्हणजे सहस्रावधी वर्षांचा कालावधी. ही युगे चक्रनेमिक्रमाने फिरत राहतात. द्वापार युग हे दुसरे युग, त्यात आधीच्या म्हणजे पहिल्या सुवर्ण युगात- सत्य युगात लोकांमध्ये असलेल्या सद्‌गुणांचा ऱ्हास होण्याची सुरुवात होते. प्रत्येक कालचक्रातील कलियुगांची खूण नीतिमत्ता आणि आध्यात्मिक जाणिवा नीचतम पातळीला जाणे ही असते. कलियुगाच्या नंतरचे त्रेतायुग हे परिवर्तनाचे किंवा आध्यात्मिक अनुभवांच्या प्रचीतीचे युग असते. याच युगातून अखेर सत्ययुग जन्मास येते. सत्ययुगात सत्य किंवा वास्तवाचा सुवर्णकाळ परत अवतरतो. आणि मानवाची आध्यात्मिकता पूर्णांशाने परत एकदा तळपताना दिसू लागते म्हणून पुराणात सांगितल्याप्रमाणे मानवतेला शांतता, सुसंवाद व परमेश्वरी प्रेमाचा लाभ देणारे सत्ययुग अनुभवण्याचा आनंद परत प्राप्त होणार आहे.

पुराणात केलेले कलियुगाचे वर्णन वाचले तर मला निश्चितपणे वाटते की कलियुगाचा सर्वात वाईट कालावधी किंवा अखेरचा कालावधी या शतकाच्या पहिल्या चतुर्थांशात सुरू झाला आहे. या एवढ्याशा कालावधीत झालेला विचारातला व संस्कृतीतला बदल अविश्वसनीय वाटावा असा आहे. हा बदल मुख्यत्वे पश्चिमेकडून झाला आहे आणि त्याचा प्रभाव अन्य सर्व संस्कृतींवर पडलेला आहे. कलियुगात सर्व पारंपारिक मूल्यांचा दर्जा खालावत जात पूर्णतः घसरला आहे व त्यामुळे नैतिक मूल्यांबाबत गोंधळाची परिस्थिती उद्‌भवली आहे. सामान्य लोकांचा वैचारिक गोंधळ झाला आहे. नव्या प्रकारची मूल्ये नवीन व्यवस्थांचा अस्वस्थ शोध घेण्याचा प्रयत्न चालू आहे. पुराणानुसार जेव्हा नीति मूल्यांची नीचतम पातळी गाठली जाते तेव्हा लोकांचा धर्माच्या आंतरिक जाणिवेचा व

आत्मसाक्षित्वाचा धागा तुटतो. योग्यायोग्यतेचा संभ्रम पडतो. वैचारिक गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. मुले पालकांचा आदर करेनाशी होतात. पुरुष स्त्रियांसारखे वागू व विचार करू लागतात व स्त्रिया पुरुषी बनतात. समाजातली नीचतम दर्जाची माणसे सत्तास्थाने पटकावतात आणि उच्च आध्यात्मिक पातळीवरील व्यक्ति दुर्लक्षित तरी होतात किंवा दूर सारल्या जातात.

सुमारे पंचवीस वर्षापूर्वीच नव्या सत्ययुगाचा पहिला चैतन्य किरण उद्भवला आहे. त्रेतायुग किंवा आपणहून अवतीर्ण होत आहे. सर्वव्यापी चैतन्य शक्ती- संस्कृतमध्ये ज्याला परम चैतन्य म्हणतात त्याचा प्रभाव सामान्य माणसाच्या जीवनातही आढळून येणारे, अध्यात्मिक जागृती दिसून येणारे युग म्हणजे एकमेव कृतयुग होय. अशी भविष्यवाणी आहे की ही दिव्यकृती वर्षानुवर्षे आपण ज्याची वाट पहात आहोत त्या अध्यात्मिक उन्नतीचा कालखंड असलेल्या सत्ययुगाची चाहूल ठरेल. आढळून येणाऱ्या सगळ्या पाऊलखुणा स्पष्टपणे दर्शवीत आहेत की सत्ययुग पुढे सरकू लागले आहे व ते आपल्याला स्वच्छ दिसू लागेल. सहज योगाच्या माध्यमातून स्वाभाविकपणे सर्वसामान्य लोक निखळ सत्य आणि वास्तवाची जाणीव याबाबत जागृत होणे हे याच सत्ययुगाच्या वाटचालीचे लक्षण आहे. सहजयोग म्हणजे ''मेरूदंडाच्या मुळाशी- मूलाधार चक्रांत सुप्तावस्थेत असलेल्या जगदंबा कुंडलिनी शक्तिच्या जागृतीद्वारे अंतर्जागृती करून परम चैतन्याचा साक्षात्कार घडवून व्यक्तिगत जागृतीची सर्वव्यापी दिव्य शक्तीशी सांगड घालणे होय.''

कृतयुगाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की त्याच्या अवतरणाबरोबर देशहित विरोधी व सत्तास्थानी असलेल्या लोकांचा खोटेपणा व धर्मबाह्य ढोंग आपोआप उजेडात येईल. ढोंगी साधू व वेगवेगळ्या पंथांचे अध्वर्यु, खोटेपणा जोपासणाऱ्या संस्था आणि परमेश्वराच्या नावांवर द्वेष पसरविणाऱ्या व्यक्ती लोकांसमोर उघड होतील. कारण त्रेतायुगात सत्य उत्स्फूर्तपणे लोकांसमोर प्रगट होते. सगळे भ्रष्टाचारी उद्योजक व खोटी शिकवण देणारे धुरीण समाजापुढे उघडे पडतात.

कृतयुगाचे दुसरे वैशिष्ट्य असे की, जेव्हा केव्हा सत्याचं पतन होते तेव्हा तेव्हा या विश्वाचे संचालन करणारी व मानव जातीच्या अस्तित्त्वाचे नियमन करणारी ईश्वरी शक्ती अवतीर्ण होते. यालाच 'ध्रुव सिद्धांत' किंवा संस्कृतमध्ये कर्मफल म्हणतात. म्हणजेच जशी कृति-कर्म-तसे त्याचे फल किंवा पेराल तसे उगवेल. सारांश या युगात प्रत्येकाने वर्तमानकाळात वा भूतकाळात जसे कर्म केले असेल तसे त्याचे फळ मिळेल. जर ते विश्वाशी सुसंगत व शाश्वत धर्म नियमानुसार वागतील ते सुसंगत व समृद्ध जीवनाचा आनंद उपभोगतील या उलट जे व्यक्तिगतरित्या वा सामूहिकरित्या सत्याच्या मध्यम मार्गापासून

दूर जातील. विपरीत वर्तन करतील त्यांना त्याची किंमत याच जन्मात मोजावी लागेल.

कृतयुगात खूप काही सोसावे लागू शकते हे अत्यंत दुर्दैवी आहे पण आपल्याच कलियुगातील कृतींचा तो परिणाम असल्यामुळे त्याला सामोरे जावेच लागते. अर्थात ! योगामध्ये आम्ही ज्याला तादात्म्यता म्हणतो त्या दैवीशक्तीशी एकरूपता साधता आली तर हे सोसणे टाळता येते. कृतयुगात जोपर्यंत आपण पूर्ण अध्यात्मिकतेचा मार्ग आहे की जो मनुष्यमात्रासाठी एकमेव सत्य आणि समाधानाचा मार्ग आहे तो स्विकारत नाही तोपर्यंत ध्रुवीकरणाच्या नियमानुसार शिक्षा आणि धोक्याचे प्रकटीकरण होत राहते. लोकांना सामूहिकरित्या आणि व्यक्तीशः जे सोसावे लागते ते दुसरे तिसरे काही नसून त्यांच्या स्वतःच्या कर्माचे फळ असते. त्यांनी सद्यःस्थितीत केलेल्या स्वतःच्या निवडींचा तो परिपाक असतो.

तथापि असे असूनही सच्या तन्मयतेने सत्याचा शोध घेणाऱ्यांसाठी कृतयुग हा अत्यंत सुखाचा कालखंड असतो. त्रेतायुगात उद्धाराच्या अनेक विशेष संधी मिळतात आणि त्या संधींचा उपयोग करून सत्याचे शोधक अत्युच्च आध्यात्मिक अवस्थेस पोहचू शकतात. तसेच या कृतयुगात दैवी करुणा व प्रेम म्हणजेच परम चैतन्याची सर्वव्यापी शक्ती एवढी असते की ज्यांनी चुका केल्या आहेत आणि त्या चुकांचा परिणाम जे भोगत आहेत त्यांच्याही दुःखाचा सर्वव्यापी दैवी शक्तीच्या सुखकर कृतींमुळे परिहार होतो. या व्यतिरिक्त पुराणात सांगितल्याप्रमाणे मार्कंडेय व इतर अनेकांमधील उर्वरित शक्ती (ती शक्ती की जी आपल्याला सतत अधिक उच्च कशाचा तरी शोध घेण्यास प्रवृत्त करते आणि आपली उन्नती करविते.) ही कुंडलिनी जागृत करविते आणि शोधकांसाठी आत्मविष्कार घडविते. या शक्तीतून साधकांना शारिरीक, भावनिक, मानसिक व अध्यात्मिक परमानंद प्राप्त होतो आणि त्यांच्या अंर्तमनात उत्पन्न होणाऱ्या सर्व समस्यांची कुंडलिनीच्या उत्स्फूर्त शुद्धीकरणाने निर्माण झालेल्या लय बद्ध कृतीमुळे सोडवणूक होते.

अशाप्रकारे सर्व व्यक्तीगत मानवी समस्या तसेच या विश्वातील मानव निर्मित सामूहिक किंवा सामाजिक समस्या सोडविल्या जातात. असे म्हणतात की ही अवस्था केवळ त्याच लोकांसाठी असते की ज्यांनी स्वतःच्या उन्नतीद्वारे स्वयंपूर्तीची अवस्था गाठली आहे. या पुरातन भाकिताचा ऊहापोह आता करुयात.

या क्षेत्राचा ज्याला प्रणेता म्हणता येईल तो भारतीय संत पहिला महान भविष्यवेत्ता भृगुमुनी हा होता. त्याच्या 'नाडीग्रंथ' या पुस्तकात सद्यःस्थितीविषयी स्पष्ट अनुमाने केली आहेत. त्याने असेही भाकित केले आहे की सहज योगाद्वारे म्हणजेच देवत्वात उत्स्फूर्तपणे एकात्म होण्याने कुंडलिनी जागृत होते आणि एखाद्या महान योग्याच्या अवतार घेण्यामुळे आणि शिकवणीमुळे मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक व सामूहिक सुधारणेचे माध्यम बनते. हा योगी

कुंडलिनीचा अतुलनीय स्वामी असतो आणि सर्व लोकांना आत्मसुधाराची पुरातन गुपिते शिकवू शकतो. या गुपितांचे वर्णन पवित्र बायबलमध्ये 'अखेरचा निवाडा.' कुराणात 'कियामा' पुनरूज्जीवनाचा काळ असे केले आहे. ज्योतिषात या काळाला 'पुर्नजन्माचा काळ' आणि 'पृथ्वीवरील महान अध्यात्मिक विकासाचा काळ असेही म्हटले आहे.

खचितच, ह्या युगात मानवाने अंधविश्वासाच्या कक्षा मागे टाकून विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती केली आहे. अशावेळी अंतिम निर्णयाच्या व पुनरुत्थानाच्या काळात उत्क्रांती वा मोक्षाच्या कल्पनेवर कोणी डोळे झाकून विश्वास ठेवावा असे नाही. तर ह्या कल्पनांना गृहीत प्रमेय समजून खुल्या मनाने व शास्त्रज्ञांच्या दृष्टीने वस्तुस्थितीचे निरीक्षण करावे. जर या गृहीत प्रमेयात सत्य आढळले तर कोणाही प्रामाणिक शास्त्रीय दृष्टीच्या व आधुनिक व्यक्तिस त्याचा स्वीकार करावाच लागेल. ईश्वरत्वाचे विशुद्ध ज्ञान प्रत्यक्ष साक्षात्कारातून प्रकट होते व त्यातूनच नव्या वंशाची व नव्या युगाची निर्मिती संभवते. हे ज्ञान भूतकाळाप्रमाणे थोड्या विशिष्ट लोकांपुरतेच मर्यादित रहात नाही तर विश्वाच्या कल्याणासाठी ते अखिल मानव जातीपुढे प्रगट होते. अशाप्रकारे मानवाच्या उन्नतीतले मागचे सारे अडसर बाजुला सारून ते अखिल मानव जातीसाठी खुले होईल. संपूर्ण मानव वंशात बदल होऊन त्याचे नूतनीकरण होईल. धर्माची, न्यायाची विश्वाच्या व्यासपीठावर परत एकदा नव्याने आदराने पुनर्स्थापना होईल व सारी मानवजात स्वतःशी, इतरांशी, निसर्गाशी सुसंवाद साधत शांत जीवन जगू शकेल.

कलियुगाचा प्रभाव संपूर्ण जगातील मानव जातीवर- विशेषतः पाश्चिमात्त्यावर खोलवर- पडलेला असल्याने त्रेतायुगाचे अवतरण हे बहुसंख्य मानवांना इतक्यात जाणवेलच असे नाही. मात्र भारत आणि तथाकथित विकसनशील देशात धर्माचा अजूनही आदर केला जात असूनही कलियुगाच्या प्रभावाने अशा तऱ्हेच्या जीवनपद्धतीचा अवलंब केला जातो की जिला पारंपारिक आणि धार्मिक म्हणणे कठिण आहे. विशेषतः शहरी जीवनात हे प्रामुख्याने आढळते. पाश्चिमात्य आधुनिक संस्कृती अत्यंत धोकादायकरित्या पौर्वात्य संस्कृतीवर हल्ला चढवित असून पूर्वेकडच्या तरुण पिढीला अत्यंत स्वस्त, क्षुद्र, उथळ व आत्मकेंद्रीत जीवन पद्धतीकडे ओढत नेत आहे.

नाडी ग्रंथातल्या भविष्यवाणीत या संबंधीचा अगदी सूक्ष्म तपशील स्पष्टपणे नोंदवला आहे. लोक लोखंडी थाळ्यांतून भोजन घेतील, मुले आपल्या पालकांना उलट उत्तरे देतील (दुरुत्तरे करतील) इ. त्यातल्या त्यात पाश्चिमात्य देशांसारखे भारतात परमेश्वराच्या अस्तित्वालाच उघड आव्हान दिले जात नाही. पश्चिमेकडे अवलंबल्या जाणाऱ्या विघातक पद्धती या निरीश्वरवादी आहेत. त्या जीवन पद्धती हीन, अनैतिक आणि आत्मघातकी आहेत.

भारतांतील बहुतेक लोकांच्या मनांत वैश्विक सुसंवादाच्या अस्तित्त्वावरचा विश्वास, परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीची श्रद्धा व परमेश्वराबद्दल नितांत आदर अजूनही आहे. निरागस बाल्यावस्थेत जवळजवळ सर्वच लोकांचा सर्व शक्तिमान परमेश्वराच्या अस्तित्त्वावर दृढ विश्वास असतो. पण वाढत्या वयाबरोबर तो ढळतो आणि लोक राजकीय, आर्थिक वा सामाजिक शक्तींवर विश्वास ठेवू लागतात. ईश्वराच्या कल्याणकारकतेवर असलेला विश्वास भ्रष्ट होऊन त्याचे धर्माच्या रूढी-परंपरा, कर्मकांड, मूलतत्त्ववाद, पंथवाद, हेकेखोरी, चुकीचे गुरु, जादूटोणा, चेटूक वगैरेत पर्यवसान होते. बदलत्या काळानुसार अनेक कारणांमुळे माणसाचा कशावरच विश्वास बसेनासा होतो. अगदी स्वत:चा स्वत:वरचा विश्वासही डळमळू लागतो. साधारणपणे अशी स्थिती पाश्चिमात्य देशात आढळून येते. भारतासारख्या देशात मात्र अजूनही प्रामुख्याने ग्रामीण भागांतील लोकांत परमेश्वरावरील विश्वास लोकांच्या जीवनात अजून टिकून आहे.

हे अर्थातच सत्य आहे की भारतातसुद्धा कलियुगाचा परिणाम काही प्रमाणात झाला. पण त्याने अजून परमेश्वरावरील विश्वास व आंतरिक सद्सद्विवेकाची मर्यादा ओलांडली नाही. त्यामुळे पाश्चिमात्य देशातील लोक ज्याला ख्रिस्त विरोधी जीवनपद्धती म्हणू शकतील ती सर्वसामान्य भारतीयांनी दैनंदिन जीवनात अंगिकारलेली नाही. सर्वच भारतीयांनी त्यांच्यातील अध्यात्मिक संपन्नतेची नैसर्गिक जाणीव जपलेली नाही. जरी भारतात जन्मलेले असले, पारंपारिक मूल्ये व प्राचीन विद्वत्तेचा आदर करीत असले तरीही अनेक शहरी लोकांनी पाश्चात्य जीवन शैलीचे अनुकरण केले आहे.

भारतीय मनावर पडणारा त्याचा दिखावू प्रभाव काहीसा उपरोधिक आहे. कारण एकेकाळी भारतातही विपुल समृद्धी नांदत होती. परंतु परकीय आक्रमणे व पारतंत्र्य यामुळे ही समृद्धी कमी होत गेली व स्वातंत्र्यानंतरही भारतातील गरीबी टिकून राहिली. इंग्रजांनी जाताना काही चांगल्या गोष्टींचा वारसा मागे ठेवला खरा पण दुर्दैवाने टाकावू किंवा नको त्या गोष्टींची ठेवच ते अधिक ठेवून गेले. मात्र स्वत:ला पाश्चिमात्य समजणाऱ्या तथाकथित बुद्धिवाद्यांखेरीज अन्य कोणी इंग्रजांच्या वाईट गोष्टींकडे बघितलेच नाही. तरीही तीनशे वर्ष तोडफोडीच्या राजकारणाने सत्ता भोगून परत जाताना इंग्रजांनी या देशाचे धर्माच्या आधारावर दोन तुकडे केले आणि देशाच्या काही भागात संताप व द्वेषाचे वातावरण निर्माण होऊन मूलतत्ववादाची व हिंसेची मुळे सहजपणे रुजली. तरीही या सगळ्या उलथापालथी नंतरही या देशातल्या लोकांच्या राहण्याच्या पारंपारिक पद्धतीत फारसा फरक पडला नाही. पारंपारिक मूल्यांचा आदर करणे तसेच चालू राहिले आणि परमेश्वरावरचा विश्वास व नैसर्गिक सद्सद्विवेकावरील श्रद्धा स्वातंत्र्यानंतरच्या काळातही पुष्कळ प्रमाणात टिकून राहिली.

मात्र स्वातंत्र्योत्तर काळात नोकरशाही, राजकारण, आर्थिक विनिमय या क्षेत्रात काम करणाऱ्या देशहित विरोधी व लबाड लोकांनी या देशातल्या सर्वसामान्य लोकांच्या निष्पापतेचा गैरफायदा घेतला. अशा थोड्या लोकांची जीवनपद्धती बहुसंख्य भारतीयांच्या जीवनपद्धतीत प्रतिबिंबित होत नाही. अभ्यासूंना असे आढळेल की भारतापुढे आज उभ्या राहिलेल्या समस्या या, या देशाचे कल्याण करण्याची बतावणी करणाऱ्या लबाड लोकांमुळेच निर्माण झाल्या आहेत.

सुदैवाने मानसिक प्रक्षेपणाद्वारे बदलासाठी बदलाचा पुरस्कार करीत राहणारे आणि पारंपारिक मूल्यांच्या विध्वंसाचे व पाश्चात्य देशातल्याप्रमाणे समाजाच्या विघटनाचे समर्थन करणारे फ्रॉईड, सेडा सारखे फारच थोडे बुद्धिमान भारतात निर्माण झाले. नशिबाने भारताला कोणत्याही मोठ्या युद्धाला तोंड ही द्यावे लागले नाही.

उलट सत्य व पारंपारिक शहाणपणाला उचलून धरणाऱ्या उदात्त आदर्शांच्या अनेक महान स्त्री-पुरुषांचा जन्म भारतात झाला. भारताचा इतिहास संत, महात्मे, महान राजे व खरोखरीचे समाजसुधारक यांनी अध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध केला आहे. या लोकांच्याबद्दल सामान्य लोकांच्या मनात अजूनही प्रचंड आदर व पूज्यभाव आहे. हे सर्व महान अध्ययन, चारित्र्य आणि आध्यात्मिक उंचीचे स्त्री-पुरुष होते. उदाहरणार्थ- महात्मा गांधींना स्वतःला तर आत्मजागृती झालेली होतीच शिवाय त्यांनी अतिशय महान देशभक्तांची एक संपूर्ण पिढीच निर्माण केली. गांधीप्रमाणेच या पिढीचा जगातील सर्व महान धर्मांमधील तत्त्वांचा समावेश होणाऱ्या विश्वव्यापी धर्मावर विश्वास होता. खरे तर हे सर्व धर्म अध्यात्माच्या एकाच वृक्षामधून निर्माण झाले असल्याची जाणीव आत्मजागृतीनंतर सुलभ होते. परंतु प्रत्येक धर्माचे अधिकारी धर्माच्या जिवंत स्त्रोतापासून तोडलेली फुले सुकून गेल्यानंतर केवळ अर्धसत्यांच्या आधारे एकमेकांशी भांडत बसले आहेत. दुदैवाने गांधीजींच्या पिढीतील बहुतेक देशभक्त थोडाच काळ जगले आणि भारताच्या राजकीय जीवनातील त्यांचे उचित स्थान भूषवू शकले नाहीत. मात्र भारतातील बहुतेक धर्म संघटीत नसल्यामुळे आणि प्रत्येकाला त्याच्या आवडीच्या धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य असल्यामुळे मुलतत्ववादसुद्धा बराचसा राष्ट्रवादाच्या स्वरूपाचा आहे. आणि एकमेव विश्वव्यापी धर्मावरील लोकांची पारंपारिक श्रद्धा अजूनही खूप प्रबळ आहे. अशाप्रकारे पारंपारिक समाजातील मूल्ये मुख्यतः टिकून राहिली आहेत.

ब्रिटिश शासनाच्या ३०० वर्षांनंतरही भारतापुढील मुख्य समस्या गरीबी आणि आर्थिक व औद्योगिक मागासलेपणा हीच आहे. इंग्लंडमध्ये जसे धर्माशी संबंधित सर्व अधिकार इंग्लंडच्या चर्चकडे आहेत तसे भारतात नाही. सगळ्यात वाईट परिस्थिती याच फ्रांसला

कॅथलिक चर्चची जेष्ठ कन्या म्हणून समजले जाते. सर्व बेकायदेशीर कारवाया आणि जगात सर्वत्र आढळणारे भीषण गुन्हे स्पष्ट दिसत असूनही युरोपातील बहुतेक देशांमधील न्यायव्यवस्थेवर प्रभाव पाडू शकेल अशी कॅथलिक चर्च नावाची एक संघटना आहे. असे असूनही फ्रांस हा एक धर्मनिरपेक्ष देश म्हणून ओळखला जातो. युरोपाप्रमाणे भारताने शासकीय असा कोणताही धर्म ठरविलेला नाही की जो जर धर्म व पंथामागील सत्याचा शोध न घेताच अवांछनीय आहेत असे घोषित करतो. लोकांना त्यांच्या आवडीच्या कोणत्याही धर्माचे अथवा विचारप्रणालीचे आचरण करण्याची मुभा आहे. पण या मनोविशालतेचा आणि धार्मिक सहिष्णुतेचा वाईट परिणाम म्हणजे त्यांना भुरळ घालणाऱ्या कोणत्याही वेडपट मार्गाचा अवलंब करतात किंवा कशाही प्रकारच्या माणसाला गुरू मानतात. हे सर्व दांभिक गुरू अतिशय लोभी, पैशाला हपापलेले असे लोक असतात आणि म्हणूनच ते पश्चिमेकडे आकर्षिले जातात. हेच आपले सद्भाग्यच म्हणायला हवे गरीब देश असण्याचा हा एक फायदा आहे. परंतु ज्या देशांमध्ये शासनाचा अधिकृत धर्म आहे त्या देशात मानवी निवडीचे स्वातंत्र्य पूर्णतः मर्यादित होते आणि शासकीय धर्मापेक्षा ज्यापासून आधिक फायदा होईल किंवा प्रगती पथावर जाण्यास ज्या पंथांमधील दृष्टांतांचा फायदा होईल अशा पंथांबद्दल विचार करण्याचे स्वातंत्र्यही लोकांना नसते. परिणामी ते लोक त्यांच्याच धर्माला चिकटून राहून अंधःश्रद्ध तरी होतात किंवा कोणत्या तरी चुकीचा मार्ग, पंथ किंवा समुदायाच्या मागे लागतात. सनातनी धर्मांनी अधिकृत धर्मविचार आणि वंशांची चाड न बाळगणाऱ्या प्रारंभिक अज्ञेय परंपरांवर विजय मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. या धर्मांनी दिव्य सत्याच्या प्रत्यक्ष ज्ञानाचीच कास धरून त्याचा शोध घेतला आहे. संस्कृतमधील 'ज्ञ' या उपपदाचा अर्थ 'जाणून घेणे' असा होतो. 'बोध' किंवा 'विद' असे अन्य शब्दही आहेत. ह्या सर्व शब्दांचा अर्थ स्वतःच्या मध्यवर्ती मज्जातंतू व्यवस्थेविषयी सत्य जाणून घेणे असा होतो. बोध शब्दामधून बुद्ध शब्दाचा उगम होतो. बुद्ध म्हणजे ज्ञानी. विद शब्दापासून वेद हा शब्द येतो. वेद हे दिव्य ज्ञानाचे प्राचीन ग्रंथ होत.

पश्चिमेमध्ये दुहेरी मानदंडांच्या आणि नैतिक दैन्यावस्थांमध्ये ध्रुवीकरणाचा नियम लागू पडताना दिसतो. निसर्गसंपदा ओरबाडून सहजपणे कमावलेली समृद्धी आणि वसाहतींमधील हक्काच्या बाजाराची निदर्यपणे लुटालुट आणि शोषण करणाऱ्या वसाहतवादी शक्ती पाश्चात्य राष्ट्रांमध्ये एकवटल्या आहेत पण त्यामुळे या देशांमध्ये अनेक मोठे बदलही घडले आहेत. प्रचंड भौतिक समृद्धीच्या जोडीला मनुष्यमात्राला धर्माच्या अजरामर मूल्यांचे ज्ञान मिळविणे सुलभ करणाऱ्या पारंपारिक संस्कृतीचे धागे हळूहळू सैल होत आहेत. या भरीव बदलांमुळे पश्चिमेतील पारंपारिक संस्कृतीवर घोर आघात तर झाले आहेतच पण अविकसित देशांमधील

अनेक शहरांवरही या बदलांचा ठसा पक्का उमटला आहे. याचे कारण भौतिकवादाचा एक अतिसूक्ष्म अंतःप्रवाह स्थूल पाश्चात्य संस्कृतीच्या पुढ्यात सध्या येत आहे.

दोन महायुद्धे आणि शीतयुद्धाच्या काळातील झगड्यांचा परिणाम म्हणून लोकांना आधार देणाऱ्या पारंपारिक मूल्यांवर प्रचंड आघात झाले आहेत. इतिहासाच्या अचूक अभ्यासांमधून आपल्याला समजते की हे आघात या देशांना भेट देणाऱ्या किंवा तेथे स्थायिक झालेल्या सैनिकांनी व खलाशांनी केले आहेत. उदाहरणार्थ व्हिएटनामी युद्धाच्या दरम्यान थायलंडमध्ये राहिलेले अमेरिकन सैन्य तेथील पारंपारिक संस्कृतीचा नाश करून तिच्याजागी वैश्या व्यवसाय, नशिल्या पदार्थांचा व्यापार आणि संघटित गुन्हेगारीची कुसंस्कृती वसविण्यास पुष्कळ अंशी जबाबदार आहे. दोन महायुद्धे पाश्चात्य जगतातील जुनी मूल्यव्यवस्था अंतिमतः उध्वस्त करण्यास कारणीभूत झाली असण्याची ही शक्यता आहे. त्या काळात पश्चिम जगतात प्रभावशाली असलेल्या अहंकाराने इतर देशांना तर गिळंकृत केलेच पण शिवाय जगभर गोऱ्या लोकांमध्ये युद्धे झाली.

युरोपियनांनी अमेरिकेवर अतिक्रमण करून तेथील मूळ लोकांच्या शांतीपूर्ण संस्कृतीचा नाश केला. त्यामुळे उत्तर अमेरिकेत समाजात उच्च पदावर कोणीही तद्देशीय भेटणे अशक्य आहे. अर्जेंटिनासारख्या दक्षिण अमेरिकन देशामध्ये अनेक जर्मन युद्धातील गुन्हेगार अतिशय आरामात स्थिरावले आहेत. फॉकलंड युद्धाचे नियोजन त्यांच्यामते त्यांनी केले होते. मी त्यांना विचारले, "तुम्ही दूरवर असलेल्या युरोपमधून निघून इथे कसे पोहोचलात ?" आणि त्यांनी मला अतिशय गर्वाने सांगितले– "कॅथॉलिक चर्चचा साधन रूपाने उपयोग करणाऱ्या ईश्वरीकृपेमुळे."

अर्थातच पश्चिमेत उत्क्रांत झालेल्या या नवीन समांतर संस्कृतीची इतरही अनेक सूक्ष्म कारणे आहेत. या कारणांचा ऊहापोह मी नंतर करेन.

ह्या पुस्तकात आपण संस्कृतीतील गूढ बदल आणि आधुनिक काळातील पाश्चात्य देशांची विचारसरणी यांचे चिंतन करणार आहोत हे चिंतन मनापासून आहे. विशेषतः पश्चिमेमध्ये हे बदल इतके स्पष्ट आणि परिणामकारक का झाले हे जाणून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. पाश्चीमात्य देशातील लोकांना लोकशाही हक्कांचे संरक्षक आणि स्वातंत्र्याचे विजेते असल्याचा अभिमान आहे. पण पाश्चात्य जगाला जर संपूर्ण जगाच्या कल्याणाची खरोखरची काळजी असेल तर त्यांनी आत्मपरिक्षण केले पाहिजे. त्यांच्या आशीर्वादाने येणारी भौतिक समृद्धी आणि ताळतंत्र सुटलेली तांत्रिक प्रगती ह्यांची जबाबदारी स्वीकारून पाश्चात्य लोकांना मनुष्यमात्राचे उच्च अवस्थेत स्थित्यंतर करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागेल. मात्र पाश्चात्य देश जर त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजसत्तावाद विरोधी पुनर्रचना

करण्यात गुंतून त्यांची काळजी प्रगत राष्ट्रांमधील सुस्तावस्थेपुरतीच मर्यादित ठेवणार असतील तर त्यांच्या नैतिक जबाबदारीला सामोरे जाण्याच्या कर्तव्य प्राप्तीत त्यांना पूर्ण अपयश येईल तसेच त्याचा स्वतःचा आतून व बाहेरून विनाश करणे ते कधी थांबवतील हेही सांगता येणार नाही. कोणत्याही नियंत्रणाखेरीजची भौतिकता आतून किंवा बाहेरून शांती प्रस्थापित करू शकत नाही.

माझ्या मते, प्रत्येक पाश्चात्याने स्थित्यंतराच्या आणि अंतिम निवाड्याच्या या महान युगातील त्याची महत्त्वाची भूमिका त्वरित समजावून घेतली पाहिजे.

पाश्चात्य मनाला त्यांच्यावर पडलेल्या प्रचंड जबाबदारीचा साक्षात्कार व्हायला हवा आणि पाश्चात्य लोकांनी त्यांच्या जबाबदारीवर नजर ठेवून फक्त पैशाचा मार्ग न वापरता जगातील समतोल कसा साधायचा हे त्वरित शोधले पाहिजे. संपूर्ण मानवतेच्या उत्कर्षासाठी ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा अंगभूत मानवी संस्कृतीचा गतीमान आधुनिकतेद्वारे नाश करण्यास कारणीभूत कोण ठरेल प्रगत की अप्रगत देश ?

सध्याच्या आधुनिक काळातील उत्क्रांतीच्या प्रक्रियेने आपण मानवी जागृतीच्या अवस्थेस पोहोचलो आहोत. ही मानवी जागृती तिच्या विचारप्रक्रियेने, बुद्धीप्रामाण्यतेने किंवा घडणीद्वारे काम करेल. अनेक आधुनिक कवींनी या जागृतीचे वर्णन "आत्मस्वातंत्र्याच्या भिंती" असे केले आहे. पण जर कोणी जागृतीच्या अधिक वरच्या पातळीपर्यंत उंच जाऊ शकला तर काय ? आपण या एकमेव शोधाद्वारे महत्त्वपूर्ण विकासाचे प्रत्यंतर होण्यासाठी आपली हृदये व मने का म्हणून उघडू नयेत ? "ज्या दैवी राज्याचे आम्ही वचन दिले होते ते प्रत्यक्षात आले आहे." ही एखाद्या भाषणातील किंवा प्रवचनातील म्हण नव्हे तर याक्षणी सामान्य माणसांमध्ये प्रकट होणाऱ्या सर्वोच्च व एकमेव सत्याच्या अनुभूतीचा ते साक्षात्कार आहे. आत्मपरिचयाने ज्या सर्वोच्च सत्याचा साक्षात्कार होतो ते प्रकट होण्याचा अनुभव याक्षणी सामान्य माणसांपुढेही प्रकट होत आहे. आत्मपरिचयानंतर साक्षात्कार होणारे सत्य सांगते की, आपण म्हणजे शरीर नव्हे, मन नव्हे, संस्कार नव्हे, अहंकार नव्हे, भावना नव्हे तर आपण म्हणजे शुद्धचेतना.

निर्मिलेल्या सर्व वस्तूंच्या सर्व पैलूंमध्ये झिरपणारी दैवी प्रेमाची सर्वव्यापी शक्ती हा अत्युच्च सत्याचा आणखी एक पैलू होय. ही दैवी शक्ती सर्व विश्वातील सारे सजीव कार्य करत असते. आपण सर्व काही गृहित धरत असतो. आपण छोट्याशा कळ्यांमधून उमलणारी सुंदर फुले बघतो तसेच पिटुकल्या बीजातून वाढणारी मोठी फळझाडेही बघतो. परंतु या जीवन प्रक्रियेचे शास्त्रज्ञांनी कितीही विश्लेषण आणि विच्छेदन केले तरीही त्यांच्यापैकी कोणालाही ही आश्चर्ये कशी प्रकटतात किंवा संपूर्ण जीवन प्रक्रियेला दिशा देणारे व तिचे

संगोपन करणारे हे नकी काय आहे हे मात्र सांगता येत नाही. जेव्हा ते आपल्या हृदयाच्या ठोक्यांमागचे रहस्य समजाविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते म्हणतात की स्वायत्त मज्जासंस्थेमुळे हृदय चालू राहाते. पण हे स्वत्व नेमके कोणते आहे ? अतिशय सुंदर कॅमेरासारखे असलेले मानवी डोळे किंवा एखाद्या महान संगणकासारखा मेंदू जरा नीट बघा. शास्त्रज्ञ त्यात काय चालू आहे याचे विश्लेषण करतात पण वरदानरूपाने हे सगळे आपणास का लाभले आहे याचा शोध घेण्यासाठी आपण त्यांना प्रश्न विचारत नाही. पण आता मात्र सर्व जगातील शहाण्या माणसांनी स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाद्वारे या पृथ्वीवरील आपल्या जीवनामागचा हेतू समजून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या सर्व उत्क्रांती आणि विकासामागील साधा सोपा हेतू या सर्वव्यापी शक्तीशी संधान जुळविणे आणि त्याद्वारे स्वतःला देवत्वास नेणे हा आहे. ही दिव्यत्वाची प्रक्रिया सहज घडत असते. सतत आव्हान दिल्या जाऊ शकणाऱ्या आणि बदलणाऱ्या शास्त्रीय शोध आणि नियमांपेक्षा कितीतरी अधिक सहजपणाने ही प्रक्रिया सिद्ध करता येते व प्रत्यक्ष बघता येते.

ही प्रक्रिया आता फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे आणि ''देवाचे सर्व लोक महात्मे असावेत.'' ह्या विल्यम ब्लेकला मनापासून भावणाऱ्या इच्छेची ती परिपूर्ती आहे. सध्याच्या कृतयुगामध्ये परम चैतन्यामुळे निर्माण होणाऱ्या करुणेतून अनेक माणसांमध्ये कुंडलिनी वर सरकते आणि ही प्रक्रिया प्रत्यक्ष सुरू होते. देवाचे लोक महात्मे झाले आहेत आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे इतरांनाही महात्मे करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे.

मात्र ह्या सगळ्यात एक छोटीशी समस्या आहे. आधुनिक मेंदूमध्ये खूप कल्पना ठासून भरल्या गेल्या आहेत. या कल्पना स्वतःच्या प्रतिभेतून उत्पन्न झालेल्या नसून वाचन, प्रसारमाध्यमे आणि सभोवतीचे मानसिक वातावरण यातून एकत्र केलेल्या आहेत. काहीही असले तरी मेंदूमध्ये दाटी झालेल्या बहुतेक कल्पना इतरांच्याच असतात. यामुळे लोकांना सत्याबाबतची वस्तुस्थिती मान्य करणे अवघड तरी होते किंवा खूप वेळ लागणारे तरी होते. मनाच्या पलीकडील अंतिम सत्याचे अस्तित्व लोकांना पटवून देणे सोपे तर नाहीच पण सर्व व्यक्ती साध्य करू शकतील अशी सत्याची प्रचिती लोकांना येणे ही खूप अवघड आहे. येशू ख्रिस्त म्हणाला होता, ''पृथ्वीवर विनम्र लोकांचा प्रादुर्भाव होईल.'' त्याला या विनम्रतेतून अशक्तता अपेक्षित नव्हती. उलट त्याला अपेक्षित होते असे की जे यांचा अहंकार आणि त्यांची जडणघडण बाजुला ठेवण्यास समर्थ आहेत. परंतु आधुनिक माणूस ना समर्थ आहे ना घाबरट आहे. किंबहुना तो अतिशय आढ्यतापूर्ण, अतिशय उद्धट, अतिशय स्वार्थी, अत्यंत ठाम असल्यामुळे त्याला सत्य आणि वस्तुस्थितीविषयी सांगू शकणारे आणि तो ते मिळवू शकेल असा विश्वास त्याच्यात निर्माण करू शकणारे कोणीतरी असू शकेल ही कल्पनाच

पटत नाही. सत्य एकमेवद्वितीय असते. परंतु त्याचाही सध्याच्या आधुनिक युगात अविष्कार करावा लागतो आणि जरी त्याचा स्वीकार केला नाही तरीही ते मरत नाही. उलट जर ते स्वीकारले नाही तर त्यातून सर्व मूर्खपणा स्पष्ट होऊन त्याचा नाश होईल.

जर अंतिम सत्य स्वीकारले नाही तर ते झिडकारणाऱ्या मेंदूचाच नाश होतो. कारण त्याचे इतर पर्याय निर्माण होतात आणि बहुतांशी ते आत्मविनाशी शैली अंगिकारतात. सत्याच्या नावावर चुकीची शिकवण देणाऱ्या अनेक व्यक्ती त्यांना सुचणाऱ्या चुकीच्या कल्पनांचाच स्वीकार करतात. अंतिम सत्याच्या विषयाला हात घालण्यासाठी दुर्दैवाने लोकांना लक्ष देण्यासाठी विनवावे लागते. सर्वांमध्ये देवत्व टिकून असते आणि कुंडलिनी जागृतीद्वारे त्याचा अविष्कारही होऊ शकतो व तो प्रगतीस कारणीभूत ठरू शकतो हे लोकांना समजावण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. गुंतागुंतीच्या पाश्चात्य मेंदूच्या लोकांना हे सगळे समजण्यासाठी अकारण खूप वेळ लागतो. जे नेते आणि शिक्षक फसवे आणि ईश्वरविरोधी असतात व मनुष्यमात्राच्या विनाशाचा पुरस्कार करून देवत्वाविरूद्ध वागतात ते प्रत्यक्षात अतिशय यशस्वी होतात आणि थोड्याच काळात जगभर अनुयायी मिळवतात. हा विरोधाभासच आहे. मात्र परम चैतन्याचे कार्य आणि ध्रुवीकरणाच्या नियमामुळे असे चुकीचे शिक्षक योग्यवेळी उघडे पडतात आणि त्यांच्या सर्व चुकीच्या कल्पना आणि कृत्ये जाहीर होऊन लवकरच नाश पावतात. ते सहजपणे स्वतःला प्रस्थापित करतात पण सध्याच्या कृतयुगाच्या काळात ते फारच थोडा वेळ टिकतात. मात्र असा एखादा गुरू उघडा पडल्यानंतर लोक इतके कमजोर होतात की ते लगेच दुसरा गुरू शोधू लागतात. अखेर जेव्हा त्यांना एखादा गुरू मिळतो तेव्हा साधारणपणे ते जुगारात हरल्या प्रमाणे पैसा गमावलेले असतात. अशाप्रकारचा गुरू शोधत बसणे हे पश्चिमेतील फॅशनेबल जीवन शैलीत आता रूढ झाले आहे. अन्यप्रकारच्या विचारसरणींमध्येही असेच होते आहे. रशियात साम्यवादाचा पराजय झाला आहे तर त्यामुळे निर्माण झालेली पोकळी वंशवाद आणि मूलतत्त्व वादाद्वारे भरली गेली आहे. आणि तथाकथित लोकशाहींची भरभराट सुरू झाली आहे.

जे लोक खरोखरच सत्याच्या शोधात आहेत. त्यांना विनम्रपणे, स्वीकारावे लागेल की त्यांना ते सत्य सापडलेले नाही आणि स्वतःचे स्वतःला सापडणे खरोखर शक्यही नाही. पूर्वेकडील देशांमध्ये हे ज्ञात आहे की जेव्हा तुम्ही अत्युच्च सत्याचा शोध घेत असता तेव्हा येशू ख्रिस्ताने सांगितल्याप्रमाणे तुम्हाला विनम्र आणि विनयशील व्हावे लागते. पाश्चात्य मनाला हे मान्य करणे अतिशय अवघड जाते कारण त्यासाठी अहंकाराचा त्याग करावा लागतो.

सहजयोग शिकण्यासाठी एक पाश्चात्य व्यक्ती जेव्हा प्रथम माझ्याकडे आली तेव्हा त्याच्या लक्षात आले की अजिबात पैसे खर्च न करता आणि काहीच प्रयत्न न करता

आत्मविष्कार होणे खूपच सोपे आहे. यामुळे त्याला इतका आनंद झाला की, तो बागेत जाऊन ओरडू लागला ''मला ते सापडले आहे.'' तो जेव्हा परत आला तेव्हा तो आनंदाने जवळपास नाचला आणि म्हणाला- ''आता मी माझ्यासारख्या सत्याचा शोध घेणाऱ्या सर्व मित्रांना सांगीन की सर्वव्यापी दैवीशक्ती पवित्र आत्म्याच्या शीतल वायुलहरीप्रमाणे माझ्या मुठीत आली आहे. मला आता सत्य म्हणजे काय ते समजले आहे आणि सर्वव्यापी देवाच्या प्रेमाची ताकद व आत्म्याचे अस्तित्व जाणवण्यासाठी आपल्या मध्यवर्ती मज्जासंस्थाद्वारे आपल्या सर्वांना उत्क्रांती मार्गाने ही जाणीव करून घ्यावी लागेल. मी त्यांना पूर्ण आत्मविश्वासाने सांगेन की ही एक जिवंत प्रक्रिया आहे आणि ती तुम्हांला पुस्तकात मिळणार नाही तसेच तुम्ही तुमची उत्क्रांती विकत घेऊ शकणार नाही.''

तो अतिशय उल्हसित झाला आणि त्याने त्याचे प्राध्यापक, मित्र आणि सहकाऱ्यांना अनेक पत्रे लिहिली. हे सगळे खूप वर्षे रात्रंदिवस चर्चा करून व पुस्तके वाचून सत्याचा शोध घेत होते. त्याला मिळालेल्या थंडशा प्रतिसादाने मात्र त्याला खूप आश्चर्य वाटले व त्याची निराशा झाली. काही जणांनी त्याला उत्तरेच दिली नाहीत. इतरांनी उत्तरात लिहिले ''ठीक आहे तुला सत्य सापडले याचा आम्हांला आनंद आहे पण आम्हांला मात्र आमचा शोध आमच्याच मार्गाने चालू ठेवायला हवा. आम्हांला अशी आशा आहे की आम्हांलाही सत्य सापडेल पण कोणत्या तरी अन्य मार्गाने.'' काहींचा हे इतके सोपे असेल यावर विश्वासच बसला नाही. उरलेले म्हणाले- ''सामान्य जीवन जगून तुला सत्य सापडूच शकणार नाही. कारण स्वतःच्या कुकर्मांमुळे आपल्याला समाज व सर्व मानवी बंधनांपासून मुक्त झाल्याशिवाय सत्याचा शोध सुरू सुद्धा करता येत नाही. कुंडलिनी जागृतीद्वारे त्याला सत्याचा शोध लागला होता या त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवायला कोणीच तयार नव्हते. आधुनिक प्रगत विचारपद्धतीच्या कोणत्याही निष्कर्षाप्रत येणे टाळणाऱ्या विशिष्ट धाटणीनुसार ते म्हणाले, ''हं, ही पद्धत तुला लागू पडली असेल ही पण हा एकमेव मार्ग असणे शक्य नाही. इतर मार्ग असलेच पाहिजेत.''

एकमेकांना भेटणारे, वाचन व पत्रव्यवहार करून अंतिम सत्याचा शोध कसा लावायचा याची चर्चा करणारे लोकही त्याला खरोखर सत्य गवसले आहे यावर विश्वास ठेवायला तयार नाहीत हे पाहून त्याला मोठा धक्का बसला. सत्याला सामोरे जाण्यासाठी प्रत्येकजण सामर्थ्यवान आणि विनम्र असणे पुरेसे नाही. ''हो, परंतु...'' अशी किंवा इतर स्पष्टीकरणे देऊन ते सर्व सत्यापासून सुटका करून घेण्यासाठी चुळबुळ करण्याचा प्रयत्न करीत होते. पण म्हणतात ना, ''सत्य आपोआपच प्रकट होते.''

आधुनिक काळात, सुदैवाने ज्याला परमेश्वराविषयीचे सत्य माहीत आहे आणि जो

त्याविषयी बोलतो त्याला गप्प बसविणे किंवा फाशी देणे शक्य नाही. अर्थातच, असा माणूस, भावनाशून्य लोकांच्या पुनर्जन्मापर्यंत थांबू शकत नाही कारण- ''वचन दिलेले दैवी राज्य आता प्रत्यक्षात आले आहे.'' आणि हाच तो क्षण की जेव्हा सत्याला सामोरे जावेच लागेल. दुसऱ्या बाजूस फ्रान्समध्ये ADFI सारखे अर्धवट ख्रिश्चन लोक फ्रेंच प्रसार माध्यमाद्वारे खरे काय हे अजिबात माहीत नसूनही सहजयोगाविषयी खोट्यानाट्या गोष्टी पसरवित आहेत.

दुर्दैवाने, सत्याचा शोध लागला असे ओरडून सांगावेसे वाटणाऱ्या पाश्चिमात्य पुरुषाच्या मित्रांप्रमाणे सत्याचा शोध लागून गेला तरीही शोधकार्य थांबवीत नाहीत. ''मॉडर्न टाइम्स'' या चित्रपटात चार्ली चॅपलिन फिरत्या पट्ट्यावर नट बोल्ट आवळण्याचे काम करीत असतो. या कामात तो इतका रममाण होतो की पट्टा थांबला तरी त्यांचे हात जे मिळेल ते आवळत राहतात. जे लोक शोधाच्या शर्यतीत पळत आहेत आणि ह्या सवयीतून बाहेर पडूच शकत नाहीत तेही असेच असतात. अशाप्रकारे सत्य शोधत असतानाची रममाणता व गती ब्रेक लावून आटोक्यात आणता येत नाही किंवा या रममाणतेत एखाद्या क्षणाचा विराम की ज्यात अंतिम सत्याचा शोध खरोखर कसा लागला हे कोणाकडून ऐकूही देत नाहीत. पण सत्य माहीत असलेले नेहमी कोऱ्या गहनतेला सामोरे जातात. कवी कबीराने म्हटले आहे- ''जेव्हा संपूर्ण जग आंधळे असते तेव्हा मला काय माहीत आहे आणि मी काय पाहिले याचे वर्णन मी कसे करू शकेन ?'' अर्थात कबीरच्या काळानंतर बऱ्याच गोष्टी बदलल्या आणि सध्याच्या काळात सर्व जग आंधळे आहे असे मी म्हणू शकत नाही कारण इथे सहस्त्रावधी लोक कुंडलिनी जागृतीद्वारे अंतिम सत्याची माहिती करून घेण्यासाठी मोकळ्या मनाने आले आहेत. आश्चर्यकारकरित्या यातील बऱ्याचजणांना २५ वर्षे सहज योगावर अपार मेहनत घेतल्याने आत्मजागृती झाली आहे.

ह्या पुस्तकात, कलियुगाच्या दरम्यान पश्चिमेत नकारात्मक आणि होकारात्मक जे काही घडले त्याप्रगाढ बदलांची चर्चा आपण करणार आहोत. आपण धर्माच्या पश्चिमेतील अध:पतनाविषयी बोललो आहोत. पण ही गोष्ट सुद्धा खरी आहे की, सत्याचा शोध घेणाऱ्या कितीतरी लोकांचा जन्म आधुनिक काळात पश्चिमेत झाला आहे. मुख्यतः दुसऱ्या जागतिक युद्धानंतर पाश्चिमात्य समाजात अगोदर अस्तित्त्वात असलेल्या सदाचार आणि स्वप्रतिष्ठेचा मान ढासळला. देवत्वावरील विश्वासालाच आव्हान दिले गेले व अत्यंत गोंधळलेल्या आणि अविश्वासी समाजास सत्यशोधकांना तोंड द्यावे लागले.

खरे तर पाश्चात्य संस्कृतीच्या नैसर्गिक पायावरच चार बाजूंनी हल्ला झाला. एक अर्थातच विज्ञान. दुसरे अज्ञान नष्ट करण्याचे तथाकथित कार्य करणाऱ्यांचा रूढ वारसा बाळगणारे बुद्धिवंत.

तिसरे संघटित धर्म, फसवे गुरू व संप्रदाय आणि चौथे व सर्वाधिक प्रभावी म्हणजे पैशामुळे आंधळी झालेली व उद्योजकांनी पुरेपूर फायदा घेतलेली प्रसारमाध्यमे.

पाश्चात्य शक्तींनी आक्रमणाद्वारे वसाहतींचे शोषण केल्याचे परिणाम अखेरीस ध्रुवीकरणाच्या सिद्धांतानुसार त्यांना भोगावे लागले. त्यांच्या पूर्वकाळातील सामुदायिक कृतींची फळे ही त्यांना प्राप्त झाली. 'कर्मफल' वरवर हानीकारक वाटणारे परंतु प्रत्यक्षात लाभदायक ठरणारे हे एक कृतयुगाचे वरदानच आहे. जे काही एका देशाचे दुसऱ्या देशाने वाईट केले असेल त्याची किंमत हल्लेखोरांना सामुदायिकपणे तर भोगावीच लागते. शिवाय स्वतःच्या कृतीच्या फळांना व्यक्तीशः सुद्धा तोंड द्यावे लागते. कित्येक राष्ट्रांना साम्राज्यशाहीबाबत व वसाहतींच्या शोषणाबाबत अपराधीपण वाटले आणि एक राष्ट्र म्हणून ही चूक त्याने मान्य केली परंतु त्यांनी ज्यांना दडपले होते ते मात्र सूडभावनेने पेटून उठले व हिंसेतून हिंसेचा जन्म झाला. अशाप्रकारे संपूर्ण जगात हल्लेखोरी व शोषणाची साखळी तयार झाली आणि विकासाची प्रक्रिया रूळावरून घसरून जगाची अनेक प्रकारे विभागणी झाली. उत्तर-दक्षिण, विकसित व विकसनशील, गरीब आणि श्रीमंत या मुख्य विभागण्या. पाश्चात्य राष्ट्रे खरोखर आत्मनिषेध विसरण्याची गोष्ट आपणहून कशी करू शकतील ? आक्रमकता, अपराधीपणा आणि आत्मनिषेधाचे हे घातचक्र अत्यंत विनाशकारी आहे. दिव्य प्रेमाच्या अंतिम सत्याची माहिती या राष्ट्रांना जेव्हा होईल तेव्हाच हे घातचक्र थांबू शकेल हे अतिशय स्पष्टपणे सांगावे लागेल. पाश्चात्य जगातील लोकांना त्यांचा आत्मोद्दारचअपराधीपण आणि आत्मनिषेधाच्याद्वारे होणाऱ्या आंतरिक विनाशापासून वाचवू शकेल.

अध्यात्मिक जीवन व त्या दिशेने त्यांची प्रगती याविषयी पाश्चात्य लोक बडेजावाने बोलतात परंतु त्यांच्यापैकी कोणालाच ते काय शोधत आहेत याची सुद्धा माहिती नसते. अशाप्रकारे १९१८ साली साम्राज्यवादाच्या 'महान' युगाच्या अखेरीस व आधुनिकतावादाच्या प्रारंभी अध्यात्मासाठी तहानलेल्या एका अज्ञानी समाजाने एकीकडे व्यक्तीशः आणि सामूहिकरित्या युद्धाचा प्रार्दुभाव भोगत विविध मार्गांनी सत्याचा शोध सुरू केला. याकाळात अनेक शोधक जन्माला आले पण मोठी आश्वासने देऊन प्रत्यक्षात आर्थिक दुरवस्था आणि मानसशास्त्रीय परावलंबन या व्यतिरिक्त इतर काहीच न देणाऱ्या चुकीच्या शिकवणुकींना स्वतःच्या अज्ञानामुळे बळी पडलेल्या त्यांचा नाश झाला. ध्रुवीकरणाचा सिद्धांत येथेही प्रत्यक्षात आला.

भारतातील काही धूर्त लोक पाश्चात्य जगातील समृद्धीला आकर्षित होऊन केवळ त्या समृद्धीची लूट करण्यासाठीच तेथे गेले कारण त्यांना असे समजले होते, की पाश्चात्य जगतात

सत्याच्या शोधाची बाजारपेठच आहे. पाश्चात्य जगात पाश्चात्य लोकांची नको तेवढी समृद्धी लुटायचे ठरवून अनेक खरे ''ख्रिस्त विरोधक'' विशेषत: श्रीमंत अमेरिकेत आले. त्यांनी स्वत:ला अत्यंत क्रियाशील गुरू म्हणून घोषित केले आणि चुकीच्या आध्यात्माची विक्री सुरू करून अस्वस्थ शोधकांच्या संपत्तीला हात घालून त्यांचा सौदेबाजीद्वारे नाश करायला सुरुवात केली. (दुरून बघणाऱ्या निरीक्षकांना ज्या सहजपणे उच्च शिक्षित आणि अत्यंत श्रीमंत अशा पाश्चात्य लोकांनी हा खोटेपणा स्विकारला ते आश्चर्यकारक होते.) जणू काही ह्या लोकांकडील पारंपारिक मूल्यांची जाणीव पूर्णपणे विसरली होती आणि त्यांची मने व संपत्ती गहाणपणाने गुंतवणे त्यांना जमेनासे झाले होते.

असे ही घडले आहे की श्रीमंत लोकांनी त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचे भवितव्य चुकींच्या गुरुंच्या बँकखात्यांमध्ये जमवले आहे. त्यांची अनभिज्ञता सहजपणे समजण्यासाठी त्यांचा झाकलेला अहंकार आणि स्वत:ला काहीही त्रास न होता स्वत:ची अनावश्यक समृद्धी गुरूंना दक्षिणारूपाने देऊन मोक्ष कदाचित विकत घेता येईल ही त्यांची वृत्ती ओळखली पाहिजे. परंतु ख्रिस्ताने म्हटल्याप्रमाणे ''एका सुईच्या छिद्रामधून उंट घुसविणे, हे श्रीमंत माणसाच्या दैवी राज्यात समावेश करण्यापेक्षा सोपे आहे.'' अर्थातच सहाव्या आणि सातव्या दशकात पश्चिमेतील सर्व लोक तिसऱ्या जगातील लोकांच्या तुलनेत श्रीमंत होते. भोंदू गुरूंना श्रीमंत पाश्चात्य शोधकांच्या अहंकाराला कसे गोंजारायचे किंवा पैशाच्याबाबतच्या त्यांच्या लोभामुळेचा कमकुवतपणा कसा वापरायचा हे नक्कीच माहीत होते मात्र त्यामुळे या शोधकांची आध्यात्म्यातील खऱ्या श्रीमंतीविषयीची संवेदनशीलता हरवून गेली.

त्या काळात मला भेटलेल्या बहुतेक शोधार्थींनी मला सांगितले की ते कशाच्या तरी शोधात आहेत हे त्यांना माहीत असले तरी ते नेमके काय शोधत आहेत याविषयी ते पूर्णपणे अज्ञानी होते आणि या चुकीच्या व नकारार्थी शिक्षकांच्या प्रभावामुळे संमोहित झाले होते. मी यांना सांगत असे की ज्या पद्धतींनी प्रामाणिक शोधकांचे भारतातून आलेल्या तथाकथित गुरूंनी शोषण केले ते खरोखर शोचनीय आहे कारण शोधक हे एका विशेष वर्गातले लोक असून ते दुर्मिळ आहेत. विल्यम ब्लेकने त्यांचे वर्णन 'देवाची माणसे' असे केले आहे. हे लोक अनेक जन्मांमध्ये दिव्यत्वाचा शोध घेत राहतात आणि चुकीच्या कल्पना व आदिशंकराचार्यांनी संस्कृतमध्ये वर्णन केलेल्या 'शब्दजाळा' म्हणजेच शब्द जंजाळात हरवून जातात.

गुरूंसाठी 'रोल्स राईस' खरेदी करण्यासाठी उपाशी राहिलेल्या अनेकांना मी विचारले की त्यांना कशामुळे असे करावेसे वाटले ? त्यांनी उत्तर दिले की केवळ धातूची वस्तु खरेदी करण्यासाठी देणगी देण्यास त्यांची अजिबात हरकत नव्हती कारण त्यांच्या गुरूंनी त्यांना

अशा गाडीच्या बदल्यात आत्मसाक्षात्कार घडविण्याचे वचन दिले होते. हे शोधक दुर्दैवी व बालीश होते कारण बहुतेक प्रसंगी त्यांचे पैसे घेतले आणि त्यांना ज्या आत्म्याचे दर्शन दिले तो बाळगता येणार नाही असा आणि त्यांना संमोहित करून विनाशाकडे घेऊन जाणारा होता. अशा चुकीच्या गुरूच्या दुर्दैवी शिष्यांचे थकलेले आणि अज्ञानी चेहरे बघताच त्यांच्या आत्म्याचा प्रकाश संपून गेला आहे आणि त्याची जागा भयंकर आणि विनाशकारी वृतीने घेतली आहे हे लक्षात येते.

अर्थातच असे मोंदू गुरू पश्चिमेत भरभराटीस येऊ शकण्याचे कारण विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य या उदात्त कल्पनांचा त्यांनी केलेला दुरुपयोग हे होते. अर्थात प्रश्न असा आहे की 'स्वातंत्र्य' ही कल्पना इतकी भ्रष्ट झाली आहे की त्याचा अर्थ लोक शहाणपण आणि हक्कांसाठी झगडण्यासाठीची वृत्ती, तसेच तर्क आणि सामान्यभाव या सगळ्याचा पूर्ण विसर पडणे असा होऊ लागला आहे. स्वातंत्र्याचा अर्थ जीवन शाश्वत ठेवणाऱ्या सर्व मूल्यव्यवस्थांचा त्याग करून पडणाऱ्या किंमतीचा विचार न करता आत्मविनाशाच्या दिशेने जाण्याची मोकळीक असा होऊ लागला आहे. या तथाकथित गुरूंना माहीत होते की आधुनिककाळातील सर्वात महाग वस्तू खरेखुरे स्वातंत्र्य नसून केवळ पैसा आहे. यामुळे या कावेबाज लोकांनी शोधकांपासून त्यांची संपत्ती आणि त्यांचे आरोग्य पळविले. एक गुरू निर्वाणाच्या शोधासाठी लोकांना गोबी वाळवंटात पाठवीत असे. शोधकाचा काटा काढून त्याची संपत्ती व त्याच्या सर्व वस्तू मिळविण्याचा हा खात्रीचा मार्ग होता.

आधुनिककाळात सर्वप्रकारच्या तथाकथित अध्यात्माला पैशाचा संसर्ग झाला आहे. असा दावा केला जातो की व्हॅटिकननेही नव्वद लक्ष डॉलरच्या बनावट नोटा छापल्या आणि व्हॅटिकन बँकेमधून म्हणजेच पवित्र आत्म्याच्या बँकेमधून त्यांचे वितरण केले. दुर्दैवाने या आधुनिक काळात बहुतेक धर्म पैसा किंवा सत्तेकडे दृष्टी ठेवूनच चालविले जातात. म्हणून आता आपण आधुनिककाळात नेमके कोणते बदल आपल्यात झाले आहेत आणि आपण ते का स्विकारले आहेत याचा विचार करूयात.

साधारणपणे सध्याच्या काळाला आधुनिक काळ म्हणतात. पण हे मात्र जरा विचित्रच आहे की आधुनिक काळात कोणतीही गोष्ट जुनी किंवा टाकावू बनते. अशाप्रकारे ''आधुनिक'' म्हणजे जे याक्षणी नवीन आहे ते. याचाच अर्थ असा की जे काही नवीन आहे त्याचे अस्तित्व अतिशय मर्यादित आहे आणि आधुनिकतेची अवस्था क्षणिक आहे. म्हणजेच आधुनिकता हा शब्द अतिशय दिशाभूल करणारी आहे. ह्या शब्दाचा अर्थ सध्या मान्य असलेले सिद्धांत किंवा वर्तमानातील जगाचे दृश्य असा ही होऊ शकेल. पण आधुनिक वादामध्ये सर्वच वस्तू अखंडपणे बदलत असतात. विविध प्रकारचे संप्रदाय थोडाकाळ

शिल्लक राहतात आणि जेव्हा हळूहळू नाहीसे होतात तेव्हा मानवी मनावर खोल ठसे उमटतात किंवा आघात करतात.

आधुनिकतेचा साहित्यिक किंवा तात्त्विक अर्थ नवीन कोणत्या तरी वस्तुचा शोध किंवा कमीत कमी जुन्या मार्गास काहीसे वळण देऊन प्रत्यक्षात भयावह आणि प्रामुख्याने तर्क विसंगत पण वरकरणी बुद्धीवादाचा आधार असलेले मानसिक प्रक्षेप असा होतो. जेव्हा पारंपारिक मूल्यांचे स्थिर विश्व केवळ काळ बदलला म्हणून पूर्णपणे सोडून दिले जाते तेव्हा स्वैरपणा, आणि प्रचंड गोंधळ अनुभवास येतो. जेव्हा अनेकदा कसोटी घेतले गेलेले सिद्धांत व विचार सोडून दिले जातात. तेव्हा मानवी मानसिक कृती (मग त्या तर्कशुद्ध असोत वा नसोत) हाच सत्याची वास्तविकता शोधण्याचा एकमेव मार्ग आहे असे गृहित धरले जाते.

आधुनिकतेने जीवनाचा अर्थ किंवा अस्तित्त्वाची कारणमीमांसा शोधताना तर्क विसंगतीची परिसीमा गाठल्याची काही अत्यंत विलक्षण उदाहरणे आहेत. मानसशास्त्र, अस्तित्त्ववाद, नाझीवाद हे सर्व मानवी मनाच्या अतार्किक बाजूच्या प्रक्षेपणातून जन्माला आले आहेत आणि लाक्षणिक तर्कवादाने आकर्षकरित्या वेढले आहेत. पण दुर्दैवाने कितीही लपवायचा प्रयत्न केला तरीही बुद्धीवाद हा अर्थशून्य मानसिक प्रक्षेपाचा आणखी एक प्रकार बनतो आणि त्यातून सत्याचा मार्ग सापडत नाही.

मानवी मन बुद्धीवादाचा उपयोग करून कोणतीही कल्पना (समजूतदारपणाची किंवा विवेकशून्य, विधायक किंवा विघातक, रानटी किंवा धर्मभ्रष्ट) समजावू शकते किंवा तिचे समर्थन करून कोणत्याही दिशेने त्यातून एखादी रचना किंवा एखादा सिद्धांत निर्माण करू शकते. मानवी जीवनातील गहन समस्यांना बुद्धीवादाने दिलेले प्रतिसाद अतिशय विचित्र आणि गोंधळात टाकणारे आहेतच पण शिवाय ते व्यक्तीपरत्वे भिन्न आहेत कारण बुद्धीवादामध्ये मूलभूत विचार न करता फक्त सापेक्ष विचारच केला जातो. उदाहरणार्थ, दिव्यत्व किंवा दैवी प्रेमाचे अस्तित्त्व बुद्धीवादाने सिद्ध करता येत नाही पण प्रत्यक्षात आपल्या बोटांच्या टोकांवर त्याचा अनुभव घेता येतो.

आश्चर्य म्हणजे आपण जेव्हा एकोणीसाव्या शतकात बुद्धीवाद किती महत्त्वाचा होता याचे मूल्यमापन करायचा प्रयत्न करतो तेव्हा आपल्या लक्षात येते की बुद्धीवादाचे परिणाम महाभयंकर ठरले आहेत. या प्रकारच्या बुद्धीवादाची छातीत धडकी भरविणारी उदाहरणे म्हणजे हिटलर, मुसोलिनी आणि स्टॅलिन यांना अभिप्रेत असलेल्या समाज रचना होत. अखेर आधुनिकते मागचा एकमेव शक्ती स्रोत जर बुद्धीवाद असेल तर त्यातून मानवी अहंकाराच्या अमर्याद निरर्थक व बावळटपणाच्या कल्पना तर निर्माण होतीलच पण शिवाय अनेकांना कष्ट आणि दुःखही भोगावे लागलेले दिसेल.

बुद्धीवाद हे एक समर्पक विश्लेषणाचे अतिशय उपयुक्त साधन आहे पण अहंकारी माणसाचा बुद्धीवाद जेव्हा दुसऱ्या आधुनिक विचारवंताच्या खासकरून त्याच्या अहंकाराला आव्हान देतो तेव्हा बुद्धीवादाचे अत्यंत कावेबाज आणि लबाड स्वरूप स्पष्ट होते. खरोखर प्रतिभावंत लेखक आणि विचारवंत टीकाकारांकडून नेहमीच त्रास सहन करत आले आहेत. या टीकाकारांना स्वत:ची अशी प्रतिभा नसते. आणि मत्सर आणि न्यूनगंडाच्या भावनेमधून ते त्यांचा वेळ इतरांच्या निर्मितीचे विश्लेषण करीत बसतात आणि त्या कृतीचा विनाश करण्याचा प्रयत्न करतात. अशा पद्धतीने टीकाकार इतरांच्या अहंकारावर हल्ले करताना स्वत:चा अहंकार मात्र गोंजारतात. मात्र एका माणसाच्या बुद्धीवादाचा उपयोग करून दुसऱ्या माणसाच्या बुद्धीवादाला जरी अचूक उत्तर तर देता आलेलेच नाही शिवाय कोण बरोबर व कोण चूक याचीही नेमकी कल्पना येत नाही. काही जणांना वाटते की एका विशिष्ट प्रकारचे प्रशासन किंवा एखाद्या प्रकारचा धर्म विचार चांगला आहे तर इतरांचा निष्कर्ष असा असतो की ज्याप्रकारचे शासन किंवा धर्म त्यांच्या आचरणात आहे तो ही तितकाच चांगला आहे म्हणून शासन किंवा धर्माबद्दल सुसंस्कृत लोकांमध्ये चर्चा करणे शिष्टाचाराला धरून ठरत नाही. अर्थात शास्त्राच्या क्षेत्रामध्ये टीका करणे हे चांगले समजले जाते आणि त्यामुळे शास्त्रज्ञांना त्यांचे सिद्धांत पुराव्यानिशी सिद्ध करणे भाग पडते. यामुळे अनेक नवीन आणि उपयुक्त शोध लागतात. पण शास्त्रसुद्धा 'सत्य म्हणजे काय ?' या विषयी खात्रीने काही सांगू शकत नाही. शिवाय जरी व्यवहारात उपयोगी असले तरीही शास्त्र मानवी समस्यांचा साकल्याने विचार करीत नाही. या समस्यांचे समाधान आत्मज्ञानानेच होऊ शकते. अर्थात गूढ वाटणाऱ्या कोणत्याही गोष्टीकडे शास्त्रज्ञ संशयाने बघतात. पण मी ज्या आत्मज्ञानाबद्दल बोलते आहे ते मात्र स्पष्ट, पडताळण्यासारखे आणि शास्त्राप्रमाणेच तर्कसंगतीने पूर्णतः समजण्यासारखे आहे.

जर नीट विचार केल्यास मूर्खपणात गुंतणे आणि वरवर तर्कसंगत निष्कर्षांचे परिणाम विचारात घेता असे म्हणावे लागेल की ज्या बुद्धीवादाचा आपण अभिमान बाळगतो आणि ज्याच्या बढाया मारतो तो बुद्धीवाद शहाणे होण्यासाठीचे पुरेसे चांगले साधन नाही. व्यावहारिक बुद्धीवादाचे निष्कर्ष खात्रीलायक नसतात हे बघता केवळ तर्कसिद्धांतांवर आधारित दृढ संकल्पना आणि विचार बाळगणे निश्चितपणे चुकीचे ठरेल. मूलभूत प्रश्नांचे अंतिम उत्तर केवळ तर्कशास्त्राच्या उपयोगातून मिळत नाही कारण चर्चेमधून लक्षात येते की सगळेच दृष्टीकोन थोडेफार बरोबर असतात. आपण शहाणपणाने विचार करून हे समजून घेतले पाहिजे की सत्य, परिणाम स्वरूपी अद्वितीय आहे आणि आपल्याला नेहमी वाटते तसे ते सापेक्ष किंवा बदलणारे नाही. जसे, सहा आंधळे लोक हत्तीचे सहा वेगळ्या कोनातून

वर्णन करताना म्हणतात : एकानी सोंड पकडलेली असते तो म्हणतो "हा सापासारखा लांब आहे." दुसरा पाय धरणारा म्हणतो, 'हा झाडासारखा अवाढव्य आहे." प्रत्येकजणच त्याला जे आढळले आहे तेच बरोबर आहे हे खात्रीने आणि योग्य समर्थनाच्या आधारावर सांगत असतो पण त्याचबरोबर प्रत्येकजण इतरांना खोडून काढत असतो कारण प्रत्येकाचा दृष्टिकोन सापेक्ष आणि अपूर्ण होता.

अर्थात तर्कशास्त्राची मुळे या आंधळ्या माणसांच्या समजे इतकीसुद्धा दृढपणे सत्यावर आधारलेली नाहीत. तर्कशास्त्राला तर हत्ती तर सोडाच पण कदाचित एखाद्या झाडाची फांदी, एखाद्या दोराचा टांगता तुकडा किंवा एखाद्या विषारी सापाचाही पुरेसा संपर्क नसू शकेल. जोपर्यंत तुम्ही संपूर्ण सत्यापर्यंत पोचत नाही, जोपर्यंत तुम्ही संपूर्ण हत्ती बघत नाही तोपर्यंत तुमचा दृष्टिकोन बरोबर आहे हे तुम्ही कसे ठरवू शकाल ?

तथाकथित धार्मिक मूलतत्त्ववाद्यांच्या वर्तनातून स्पष्ट होते की जे लोक अधिकारवाणीने आणि अत्यंत आत्मविश्वासाने असत्याचा पुरस्कार करतात ते इतरांनी आव्हान दिल्यावर आक्रमक, हिंसक आणि प्रसंगी खुनीसुद्धा बनतात. तसेच वरकरणी अत्यंत कल्याणकारी वाटणारे सर्वप्रकारचे पंथ शोधकांना शिकवतात की या विश्वाचा अंत जवळ आला आहे. अशा पंथांचे शिष्य हिंसाप्रिय बनून इतर पंथांच्या लोकांना मारत सुटण्याची शक्यता असते. कारण ते विनाश देवतेचे महान लढवय्ये बनतात. काही भोंदू गुरू तज्ञ चोर असलेल्या त्यांच्या शिष्यानी लुटलेला पैसा बळकावण्यासाठी स्वतःच्या शिष्यांनाच मारून टाकतात. त्यांच्यापैकी काही जे जगाच्या अंताविषयी बोलतात ते त्यांच्या शिष्यांना विवाह करू देत नाहीत; काहीजण त्यांच्या स्त्री-शिष्यांवर बलात्कार करतात आणि त्या गरोदर राहिल्यानंतर त्यांच्या न जन्मलेल्या किंवा नवजात अर्भकांना गुपचूप मारून टाकतात. अशा जगाच्या अंतावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व पंथांमध्ये 'गुप्तता' हा मुख्य शब्द असतो.

सध्याच्या अनिश्चितता, विरोधाभास आणि गोंधळाने भरलेल्या जगात केवळ संपूर्ण सत्याच्या भक्कम पायाच्या आधारेच पूर्ण आत्मविश्वासानेच शांतीपूर्ण अहिंसक भूमिका घेता येते. अशी व्यक्ती विल्यम ब्लेकप्रमाणे संत हा शब्द खऱ्या अर्थाने सार्थ करते. संत त्यांना म्हणायचे की जे सत्याचे वर्णन त्यांच्या उच्च दृष्टीला दिसेल तसे करतात आणि त्यांच्यावर होणाऱ्या हल्ल्यांची प्रतिक्रिया हिंसकपणाने किंवा संतापाने न होता ते त्यांच्या आक्रमकांना अज्ञानी समजून दया दाखवितात.

परंतु, आधुनिक काळात सत्याच्या साध्या व सोज्वळ मांडणी ऐवजी त्याचे वरवर दिखाऊ प्रदर्शन अधिक प्रभावी ठरते. मी एकदा अमेरिकेत व्याख्यानासाठी दौरा करीत असताना बोस्टन येथे टेलिव्हिजन साठी मुलाखत घेणाऱ्यांनी मला विचारले की माझ्याकडे

किती रोल्स राईस गाड्या आहेत. मी जेव्हा त्यांना सांगितले की माझ्याकडे अशी एकही गाडी नाही तेव्हा त्यांनी माझी मुलाखत घ्यायलाच नकार दिला कारण मी व्यावसायिक नव्हते. अर्थात मी बोस्टन टीव्हीच्या लोकांना दोष देत नाही कारण ते अशा समाजात काम करतात की जेथे पैसा हेच सर्वस्व आहे. आधुनिक गोंधळलेल्या समाजात जर तुम्हांला काही करून दाखवायचे असेल तर ते अशाच मार्गाने दाखवावे लागेल कारण या समाजात बुद्धीवाद आणि अहंकारही केवळ पैशाचे शरीर असलेल्या डोळ्यांची दोन ढापणे बनली आहेत.

तात्पर्य, बुद्धीवादाच्या क्षमता आणि व्यापाच्या नैसर्गिक मर्यादांमुळे योग्य काय किंवा अयोग्य काय हे जर एखाद्याला अधिकार वाणीने सांगायचे असेल तर त्याला बुद्धीवादाच्या पलिकडे जाऊन विचारांच्या पलिकडील सत्याच्या क्षेत्रातील प्रकाश दिसलेला असावा लागेल. सत्याविषयी ठामपणे काहीही सांगणे मानवी मनाच्या सामान्य मर्यादांच्या पलिकडचे आहे. जर कोणी अशा सत्याचा साक्षात्कार झाल्याचे सांगून त्याच्या जीवनात आणि व्यवहारात ते व्यक्त करीत असेल तर त्याच्याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे अशी व्यक्ती संत किंवा महात्मा असते आणि अत्यंत उत्क्रांत आत्म्यामुळे त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व अद्वितीय आणि सर्व प्रकारचे अहंकार किंवा घडणींपासून मुक्त असते. असे म्हणता येईल की अशी व्यक्ती अति आधुनिक असते आणि तार्किक समजावणीच्या मर्यादांची तिला पर्वा नसते. कारण आधुनिककाळात पैशाचे संप्रदाय आणि विविध फॅडे व फॅशनच्या क्षमतांच्या निकषांच्या मर्यादा त्यांना माहीत असतात. सर्व कल्पना म्हणजे फक्त विचार असतात असे मानणाऱ्या तर्कवादी व्यक्तींना अशाप्रकारचा माणूस अहंकारी वाटण्याची शक्यता आहे. परंतु खरी कसोटी पूर्ण जीवनभर अशा व्यक्तींने केलेल्या पापमुक्त तसेच परपीडारहित अशा कृत्यांमध्ये असते. असा माणूस इतरांच्या मनात विध्वंसक कल्पना निर्माण करत नाही उलट तो जे काही करतो ते दयार्त आणि संपूर्णपणे शांती निर्मितीचा प्रयत्न करणारे असते. अशा व्यक्तीचे कार्य एका परिपूर्ण आयुष्यासाठी झटणारे व मानवाच्या उत्कर्षासाठी प्रयत्न करणारे असल्यामुळे ते अखंड व मूलभूत स्वरूपाचे असते. त्यामुळे अशी व्यक्ती आदर्शवादी असून अव्यावहारिक आहे अशी टीका होण्याची शक्यता असते.

आधुनिक जगाचे मूळ व वाहन असलेला हा तर्कवाद म्हणजे नेमके काय हे तपासून बघितले पाहिजे. आपण जर अशा जीवनाच्या मर्यादा व अशी जीवनातील तत्त्वे समजू शकलो तर आपल्या मार्गात येणारे अडथळे टाळून आधुनिक जीवनाची मधुर फळे उपभोगू शकू. प्रथमतः तर्कवाद हा प्रायोगिक असतोच असे नाही. आणि जर एखाद्या विचाराची किंवा सिद्धांताची सुरुवात वस्तुस्थितीवर आधारलेली नसेल तर त्या विचार किंवा सिद्धांताचा अंत किंवा त्याचे अंतिम परिणाम प्रत्यक्षात अनर्थकारी असू शकतात. अशा सामूहिक

भासांमुळे एखादी व्यक्ती नव्हे तर अनेक व्यक्ती किंवा एखादे राष्ट्र किंवा अनेक राष्ट्रे दुखावली जाऊ शकतात किंवा नष्टही होऊ शकतात. तर्कवाद सहज शक्य वाटणाऱ्या पण प्रत्यक्षात खऱ्या नसणाऱ्या अशा व्यवस्था निर्माण करतो. अनेकदा तर्कवादाने सिद्ध केलेल्या एखाद्या विचाराच्या अगदी उलट प्रकारचा विचारही सत्य आहे असेही तर्कवादानेच सिद्ध करून आधी मांडलेला विचार चुकीचा किंवा कारस्थानी होता अशा प्रकारचा निष्कर्ष निघण्याचीही शक्यता असते. तर्कवादामुळे एखाद्या माणसाला कधी तो एखाद्या गांडूळासारखा क्षुद्र आहे असे वाटू शकते तर कधी तो नायक असल्यासारखेही भासवू शकतो.

अशाप्रकारच्या तर्कवादाच्या प्रकट होण्याशी निगडित असलेली मुख्य समस्या अशी आहे की हे सर्व उद्‌घोष अंतरातून मार्गदर्शन करणारी तत्त्वे किंवा शहाणपणा मधून आलेले नसतात. जेव्हा जेव्हा ते एखादा प्रकल्प तर्कवादाच्या आधारे प्रसारित करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते प्रत्यक्षात केवळ त्यांचा अहंकार किंवा त्यांच्या मनोधारणेचाच फक्त ते प्रसार करीत असतात. सत्य आणि महत्त्वपूर्ण असे काही तरी लोकांना देण्याऐवजी त्यांनी स्वतःच ठरविलेल्या काही उद्दीष्टांचा मात्र ते प्रसार करीत असतात.जंगली रेड्याप्रमाणे तर्कवाद एका सरळ रेषेत पुढे जात राहतो आणि एकदा निघाल्यानंतर मार्ग बदलणे तर्कवादाच्या अनुयायांना सहसा जमत नाही. जसा जंगली रेडा बऱ्याचदा त्याची शिकार त्याला हुलकावणी देऊन निघून गेल्यामुळे पूर्णपणे थकून जातो. अनेक बुद्धीवाद्यांचे हेच होते. आणि सध्याच्या प्रवाही व सतत बदलणाऱ्या युगांमधील अखंड घडणाऱ्या बदलांची जाणीव न झाल्यामुळे ते मुख्य मुद्दाच विसरून जातात आणि ध्येयापासून दूर जातात. आधुनिक असल्यामुळे आणि सतत लाटांवर आरुढ असल्यामुळे ते कायम स्वरूपी वेगामध्ये अडकतात आणि तो वेग त्यांना कमीही करता येत नाही किंवा त्यांचा प्रवास व इतरांची त्यांच्याकडून होणारी दिशाभूल त्यांना थांबविता येत नाही. अशाप्रकारे तर्कवाद्यांची सत्याची कल्पना ही सामान्यतः सरळ रेषेतली हालचाल असते. किंवा केवळ मानसिक प्रसाराचा भाग असते आणि त्यातूनच ती कल्पना तार्किक निष्कर्षाप्रत पोचते. अर्थात एका मर्यादेपर्यंत त्यात जागृतीची चमक असू शकते पण त्याच्या पायामध्ये मूलभूत दूरदृष्टी नसल्यामुळे त्यात सत्याचा फारसा अंश नसतो आणि त्यामुळे जे लोक अशा कल्पनांचा प्रसार करतात. किंवा जे लोक अशी व्यवस्था स्वीकारतात त्यांच्यावरच अखेरीस ती उलटू लागते. अशा संकल्पनेचा वारंवार उदय आणि अस्त होत राहतो. कारण तिच्यामागे सत्याचे सामर्थ्य नसते आणि म्हणून ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकत नाही. वरकरणी उदात्त वाटणारी, केवळ बुद्धीवादावर आधारित समस्यांची उत्तरे बऱ्याचदा विघातक तत्त्वांनी भरलेली निघण्याची कारणमीमांसा अशी आहे.

अशा संकल्पनांचे एक अतिशय चांगले उदाहरण म्हणजे फ्रॉईडचे सिद्धांत. आता इतक्या प्रदीर्घ काळानंतर लोकांना हळूहळू समजू लागले आहे की त्याचे सिद्धांत विक्षिप्त आणि खोडसाळ होते. त्याने मांडलेली मनोविश्लेषणात्मक उपचार पद्धती म्हणजे सावळा गोंधळ आणि पाशवी बुद्धीमोहिनीचे मिश्रण होते. फ्रॉईडला सुप्तावस्था म्हणजे काय हे माहीत नव्हते हे आता सिद्ध झाले आहे. त्याच्या पहिल्या काही शिष्यांपैकी सी. जी. जंग यांना याची जाणीव केव्हाच झाली होती. त्यांनीच नंतर सुप्तावस्थेचे सर्व प्रतिभायुक्त कल्पनांचा स्रोत असे वर्णन केले आहे आणि ही अवस्था फ्रॉईडने जशी मर्यादित व विघातकदृष्टीने बघितली आणि पुरातन विचारांनी भरलेली एक प्रकारची व्यक्तीगत कचराकुंडी म्हणून हेटाळली तशी ती नसून प्रत्यक्षात ही अवस्था म्हणजे सर्व सत्यतेचे मूळ आहे हे ही सिद्ध केले.

फ्रॉईडने दावा केल्याप्रमाणे मनोविश्लेषणात्मक सिद्धांतामुळे लोकांना अधिक सुखाचे आयुष्य जगण्यासाठी मदत तर झाली नाहीच पण अनभिज्ञपणे त्याचे सिद्धांत स्वीकारणाऱ्या पाश्चात्य लोकांच्या मनातून नैतिकतेच्या सर्व जाणिवा नष्ट होऊन त्यांचे फार मोठे नुकसान मात्र झाले आहे. फ्रॉईडच्या आवडत्या आणि मध्यवर्ती इडिपस कॉम्प्लेक्स या सिद्धांतामुळे सर्व प्रकारच्या आंतरिक विरोधांवर विजय मिळविल्याबद्दल हे लोक स्वतःचे अभिनंदन करीत असले तरी ही त्यांनी फ्रॉईडचा सगळा व्यक्तीगत हेकटपणा अजिबात कुरकुर न करता गिळून टाकला आहे. जर फ्रॉईडने भारतात येऊन त्याचे सिद्धांत मांडले असते तर लोकांचा राग आणि संतापापुढे त्याचा टिकाव लागला नसता कारण भारतीयांच्या मनात नैतिकतेची आणि पावित्र्याची एक महान व सखोल भावना असून त्यांना खरे व चांगले काय हे समजते. विशेषतः त्यांच्यामध्ये मातृत्वाविषयीचा आदरभाव सखोल रुजलेला आहे. अखेर येशू ख्रिस्ताने देखील मृत्युला सामोरे जाताना आईलाच साद घातली ना !

भारतातील पारंपारिक आणि सखोल ज्ञानामध्ये असलेली एक महत्त्वाची शिकवण की आदिमातेला सर्व वस्तूंचे मूळ मानते आणि सर्व काही तिलाच अर्पण करते. केवळ सहजयोगाच्या महान अनुभवातूनच मातेच्या शरीरात परत प्रवेश मिळविण्याचा अर्थ समजतो. आणि तिच्या शरीरात बिंदूचा सिंधू होऊन विशुद्ध करुणेच्या प्रकाशाने व्यापलेला शांततेचा महासागर अनुभवता येतो. फ्रॉईड हा एक अतिशय लहान व क्षुद्र वृत्तीचा माणूस होता की ज्याने महान सत्यासह सर्व गोष्टींचा त्याच्या विक्षिप्त स्वभावानुसार विचित्र अर्थ लावायचा प्रयत्न केला.

सुदैवाने भारतात केवळ उच्च शिक्षितांनाच नव्हे तर सामान्य व्यक्तीसही वास्तवता म्हणजे काय हे माहीत आहे. कोण खरे आणि कोण खोटे गुरू, योग्य शिकवण कोणती आणि अयोग्य शिकवण कोणती याचे स्पष्ट वर्णन प्राचीनकाळच्या पुराणात सुद्धा केले गेलेले आहे. ही मूलभूत

आणि शाश्वत सत्ये कधीही बदलू शकत नाहीत किंवा फ्रॉईडच्या भयानक सिद्धांताप्रमाणे त्याला नवीन विक्षेपक वळण देणारे फेरबदल ही त्यात होऊ शकत नाहीत.

वास्तवता आणि सत्य हे बुद्धिवादी किंवा सरळ रेषेतील विचाराचे फळ नव्हे. आत्म्याच्या प्रकाशातून उत्स्फूर्तपणे प्रकटणाऱ्या संपूर्ण सूज्ञतेतून त्यांची उत्पत्ती होते. साक्षात्कारापूर्वी कोणी मान्य करो अथवा न करो परंतु आपल्या हृदयातील आत्मा हे सर्व शक्तीमान परमेश्वराचेच प्रतिबिंब होय. आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव साक्षात्कारानंतरच (त्या आधी नव्हे) येतो. साक्षात्कारानंतर आत्म्याची शक्ती मानवी व्यक्तिमत्त्वात प्रकट होते आणि त्याच्या प्रकाशामुळे विवेकास एका नव्या जागृतीचे तेज प्राप्त होते. आत्म्याची दैवी बुद्धिमत्ता सर्वत्र फैलावते. बुद्धिवादी विचाराप्रमाणे यातील हालचाल सरळरेषेत नसते, तर स्वच्छ सूर्यप्रकाशासारखी असते. त्यामुळे सर्व क्षेत्रातील अंधार व अज्ञान दूर होते. आत्म्यामधून सर्व बाजूंना पसरणाऱ्या दैदीप्यमान सत्याची शक्ती सर्व सखोल प्रश्न आणि समस्यांच्या मुळाशी जाऊन पोहोचते. आत्म्याची शक्ती अमर्याद असते आणि ती अत्यंत कठीण व अंधुक अशा क्षेत्रांनाही अखंडपणे प्रकाशमान करीत राहते. ज्याप्रमाणे सरळ रेषेतील विचार अखेर मनाला गोंधळून टाकून चुकवितात तसे आत्म्याच्या शक्तीमुळे एका मर्यादेनंतर परतण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या उलट, जेथे-जेथे व्यक्तीचे लक्ष जाईल तेथे-तेथे त्याला पूर्ण स्पष्टतेने ही वास्तवता दिसू लागते आणि संतुलित व व्यवहार्य असा मार्ग दिसू लागतो. कारण वास्तवता जशी असते तशीच राहते. अंध:विश्वासामुळे निर्माण होणाऱ्या संकुचित अहंकाराप्रमाणे आत्मा कसलीच अपेक्षा करत नाही किंवा लबाडी करून तार्किक प्रक्षेपणाच्या आधारे कोणाच्या तरी मनाला बरे वाटावे म्हणून काही करण्याची ही त्याला गरज नसते. अडचण एवढीच आहे की सत्याशी तडजोड होऊ शकत नाही. ते विशुद्ध प्रेमाच्या खोल पायावर भक्कम उभे असते.

म्हणूनच ज्याला सत्य माहीत आहे तो काहीवेळा इतर व्यक्तींना टाळतो कारण त्यांच्या तथाकथित प्रसिद्ध, यशस्वी व रूढ कल्पनांच्या बौद्धिक प्रक्षेपणानुसार तो स्वत:च्या दिव्यदृष्टीचा मेळ घालू शकत नाही. तो मूलभूततेच्या पायवाटेवर उभा असतो आणि त्याला ठाऊक असते की या बौद्धिक आधुनिकतावाद्यांच्या गोंधळ आणि अनागोंदीच्या पलीकडे वास्तवतेचा, संपूर्ण सत्याचा प्रदेश सुरू होतो. त्याला माहीत असते की अहंकारांच्या मर्यादांमधून बुद्धिवादाने नव्हे तर केवळ स्वत:च्या उत्कर्षानेच वास्तवता साध्य करता येईल. यात काल्पनिक असे काहीही नाही. हे आपल्या आत्म्याच्या जागृतीचे अनुभव आहेत. आत्मा हा चाकाच्या स्थिर अक्षासारखा असतो. जर आपले सर्व लक्ष सतत फिरणाऱ्या जीवनचक्राच्या बरोबर मध्यभागी असलेल्या भक्कम आणि स्थिर आसावर केंद्रित झाले तर

आंतरिक शांतीचा स्रोत असणाऱ्या आत्म्याच्या प्रकाशाने आपण संपूर्ण निरामयता आणि आत्मज्ञानाच्या अवस्थेस पोहचू.

मात्र जेव्हा आपल्या जाणीवा अहंकाराला जखडल्या जातात आणि आपल्या नेहमीच्या जीवनातील सातत्याची हालचाल चालू राहते तेव्हा आपण आपल्या भोवतालच्या स्थित्यंतरांच्या केवळ सापेक्ष आकलनाच्या पातळीस जाऊन पोहोचतो. अहंकाराच्या आपल्यावर मर्यादा घालणाऱ्या या परिणामाशिवाय सर्व प्रकारच्या इच्छा, अपेक्षा आणि बांधिलकींमुळे आपला सद्सद्विवेक विचलित होतो आणि आपल्याला शारीरिक व मानसिक पातळीवर ताण, तणाव आणि पूर्ण थकवा जाणवतो. याउलट आत्म्याचा अंतर्यामी गुण असा आहे की तो आपल्याला सर्व कृत्रिम अवास्तव गोंधळातून वर काढून विशुद्ध सत्याच्या प्रांतात घेऊन जातो आणि या प्रक्रियेत उत्सर्जित होणारी शांतता आपल्या भोवतीच्या वातावरणातही पसरते. हे घडावे म्हणून आग्रह धरता येत नाही, सक्ती करता येत नाही किंवा हे खरेदी पण करता येत नाही. उत्क्रांतीच्या जिवंत प्रक्रियेतून हे उत्स्फूर्तपणे घडते. अस्थिर आणि सापेक्ष असणारा आपला विवेक उत्कर्षानंतर सर्वव्यापी परमेश्वरी जागृतीत सामावला जातो. आत्मजागृतीद्वारे आत्म्याला स्वतःचा परिचय होतो आणि तो पूर्णतः आत्मप्रचोदक, संपूर्ण आत्मविश्वासी आणि स्वयंपूर्ण बनतो. किंबहुना असे म्हणता येईल की आत्मा पूर्णतः जागृत होतो आणि त्याला त्याच्या सत्वाची सर्वोच्च जाणीव होते.

मी म्हटल्याप्रमाणे आत्म्याच्या बुद्धिमत्तेचे स्वरूप चहूबाजूंना आणि जेथपर्यंत पोचता येईल तेथपर्यंत उत्सर्ग करीत राहणाऱ्या अतुलनीय प्रकाशासारखे असते. तिला प्रतिसादरुपाने ही ध्रुवीकरणाचा परिणाम कधीच आड येत नाही. आत्म्याच्या प्रकाशातून येणारी जागृती संवेदनाक्षम, बदल घडविणारी आणि निर्मितीक्षम असते. आत्म्याची बुद्धिमत्ता ही अशाप्रकारे कसलेही स्पष्ट आणि निस्संदिग्ध कारण नसते किंवा कशाचा परिणाम नसते तर ती एकाच वेळी कारण आणि बुद्धिमत्ता दोन्ही असते. म्हणूनच तिला ना हस्तकौशल्य दाखविण्याची गरज असते ना आदेश घ्यायची गरज. तिच्यामध्ये एक अंगचाच गुण असतो की ज्यामुळे तिची कृती परिणामकारकच होते. आपण असे म्हणू शकू की 'आत्मा असतो म्हणून कृती करतो.'

सूर्याचे किरणच बघा ना ते एखाद्या वृक्षावर पडतात आणि हरितद्रव्य निर्माण करतात. या प्रक्रियेसाठी ना हेतू लागतो ना मनाचे प्रक्षेपण. सत्य जाणण्याची क्षमता आणि परिणामकारक होण्याची क्षमता आत्म्यामध्ये मुळातच असते. जे बीज धरती मातेत पेरले जाते त्याला अंकुर फुटतो कारण बीज आणि धरती माता या दोघांच्यातही असा परिणाम घडविण्याचा अंगभूत गुण असतो. जे जे काही खरोखर जिवंत असते ते ते अत्यंत उत्स्फूर्तपणे

काम करते हा त्या गोष्टीचा सहजभाव असतो. सर्व गोष्टी गाभ्यात 'ज्या आधीपासूनच असतात.' त्या होण्याची त्यांच्यामध्ये नैसर्गिक प्रवृत्ती असते.

दुसरीकडे मानसिक प्रक्रियेमध्ये अशाप्रकारचे उत्स्फूर्त कृतीचे उत्सर्जन नसते कारण मानसिक प्रक्रियेच्या मूळाशी सर्व वस्तुंचा प्रतिभावंत प्रेरणास्त्रोत असलेला आत्मा नसतो. या प्रक्रियेतून जे काही केले जाते ते ठरवून केलेले, अहंकार सदृश किंवा ठोकळ आणि जबरदस्तीने केलेले असते. या प्रक्रियेतील हालचाल सरळ रेषेत असते आणि मागे किंवा आजूबाजूस अजिबात बघितले जात नाही. अखेरीस ही प्रक्रिया टिकाव धरू शकत नाही कारण तिच्यामध्ये सत्याचे सामर्थ्य नसते. म्हणून ही प्रक्रिया उलटते आणि मूळ कल्पनेवरच सुरुवातीस अजिबात अपेक्षित नसलेला आघात करते.

हिटलरचेच उदाहरण टोकाचे म्हणून घेऊ यात. त्याची स्वतःच्या बुद्धिवादाच्या आधारे यहुदी लोक जर्मनीचा नाश करीत आहेत अशी एवढी खात्री झाली होती की त्याने असा सिद्धांत मांडला की जर्मन लोक हे सर्वोच्च अशा महान आर्य वंशाचे आहेत आणि यहूदी लोक वांशिकदृष्ट्या त्यांच्यापेक्षा कनिष्ठ आहेत. हा सिद्धांत बुद्धिनिष्ठ होता पण तो सत्याच्या जवळपासही पोहचणार नव्हता. गॅस चेंबरमध्ये माणसाना ठार मारणारे आणि या दृश्याचा आनंद लुटणारे जर्मन अत्युच्च वंशाचे असूच कसे शकतील? अशा पद्धतीने ठार मारलेल्यांमध्ये अत्यंत निरागस अशी लहान मुले सुद्धा होती. बुद्धिवादाने आंधळेपण न आलेल्या कोणत्याही माणसाच्या सहजपणे लक्षात येईल की अशाप्रकारची कृत्ये केवळ आदिकाळातील सर्वात कनिष्ठ वंशाचे लोकच करू शकतात. या अशा बुद्धिवादी मांडणीचे पर्यवसान अखेर हिटलरच्या स्वतःच्या विनाशात झाले कारण यहुदी लोकांना नष्ट करण्याची त्याची कल्पना हा एक मानसिक प्रक्षेप होता आणि सर्व मानसिक प्रक्षेप अखेर स्वतःवरच उलटतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या मानसिक प्रक्षेपणात त्याच्या व्यक्तित्वाची आणि अहंकाराच्या जाणिवेची मर्यादा जेव्हा ओलांडली जाते तेव्हा ध्रुवीकरणाचा परिणाम दिसतो. ज्याप्रमाणे एखादा धागा बांधून अनंतत्वाकडे सोडलेला बाण परत येऊन बाण सोडणाऱ्यालाच जखमी करतो त्याचप्रमाणे अशी प्रक्रिया सुरू करणाऱ्यावरच ती उलटते.

अगदी वरवरच्या नेहमीच्या पातळीवर आपले दैनंदिन अनुभव आपल्याला शिकवितात की आपण आपल्या बुद्धिनिष्ठतेला ती जिथे भरकटेल तिथे जाऊ देता कामा नये तर तिच्यावर लक्ष ठेऊन तिला तिच्या मर्यादांमध्ये बांधून घातले पाहिजे.

बुद्धिनिष्ठा उपयोगी असते पण तिचे परिणाम आणि अतिरेकी बुद्धिनिष्ठेमुळे होऊ शकणारे ध्रुवीकरण विचारात न घेता तिचा अतिरेक होऊ देता कामा नये. पण आश्चर्य म्हणजे अहंकाराच्या प्रचंड ताकदीमुळे हा साधा धडा कोणालाही शिकायला सोपा वाटत नाही.

स्वतःच्या मानसिक प्रक्षेपणांच्या परिणामामुळे प्रचंड यातना भोगणारे अनेक लोक माझ्याकडे आले आहेत आणि एकीकडे मी त्यांना बरे करण्याचा प्रयत्न करीत असतानाही ते मात्र त्यांच्या विनाशास कारणीभूत झालेल्या गोष्टींचेच समर्थन करीत राहतात. 'मी तसे केले म्हणून काय बिघडले ? त्यात चूक तरी काय आहे ?' हाच जणू आधुनिक मानवाचा मंत्र आहे. परंतु जर कोणी रोजच्या अनुभवातून शिकायला तयार असेल आणि 'त्यात काय चूक आहे ? त्यात काय चूक आहे ?' असा घोष आपोआपच करणार नसेल तर त्याला व्यावहारिक शहाणपण सुचून अतिरेक टाळणारा मध्यमार्ग साध्य करता येतो. सरावाने आपण बुद्धिवादाला काही स्पष्ट मर्यादांमध्ये बद्ध करून आपला समतोल साधू शकतो. अशा रीतीने माणसाला अधिक थोडे जागृत आणि अबाधित राहता येते आणि स्वतःचा किंवा इतरांचा नाश करणे खात्रीने टाळता येते.

'मला अजून सत्य समजलेले नाही पण मला ते शोधून काढायचेच आहे.' असे जर कोणी आत्मावलोकन करून अत्यंत विनम्र हृदयाने म्हणेल तर यथावकाश त्याच्या विनम्रतेस फळ मिळून त्याचा उत्कर्ष होण्याची शक्यता असते. जर असे झाले तर त्या व्यक्तीचे लक्ष डावी-उजवीकडे न जाता मध्यभागी केंद्रित होते. त्याच्यावर भूतकाळातील जडणघडणीचा किंवा महत्त्वाकांक्षी अहंकाराच्या दृष्टीकोनांचा प्रभाव पडत नाही. अशी समतोल व्यक्ती आत्मसाक्षात्काराद्वारे सत्याचे मूळ रूप जाणण्यास अतिशय योग्य ठरते.

बुद्धिवादाशी निगडीत समस्या आणि आधुनिकतेमुळे निर्माण होणारे गोंधळ आत्म्याच्या प्रकाशात सत्य जाणून घेऊन कसे टाळता येतात याचे एवढे विवेचन पुरे झाले. आधुनिककाळास (भांडण आणि विरोधाभासांचे युग किंवा कलियुग की ज्यातून संस्कृतमध्ये ज्याला 'भ्रांती' असे म्हणतात ते गोंधळ निर्माण होतात) असलेला आणखी एक अभिशाप म्हणजे लोक अतिशय सहजपणे पापमय किंवा विघातक कृत्ये करतील. असेही वर्तवायला हवे होते की सत्ताधारी अशा कृत्यांना अनुमती व प्रोत्साहन देतील कारण ते त्यांनाही उपयुक्तच आहे. आधुनिकतेचा गाभा असलेले आत्मविनाशाच्या वृत्तीमुळे निर्माण होणारे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी सत्ताधारी लोक त्या प्रश्नांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करणार नाहीत तर काहीतरी तात्पुरती व तुटक उपाययोजना करतील की ज्यामुळे अधिक प्रश्न निर्माण होतील की जे कधीच सुटणार नाहीत. उदाहरणार्थ एका सिम्पसन नावाच्या प्रख्यात फुटबॉलपटूवर त्याच्या बायकोला मारण्याचा आरोप केला गेला. परिणामी अमेरिकन मासिकांमध्ये अनेक लेख आले की ज्यात आपण विवाह करता कामा नयेत आणि कुटुंबे बाळगता कामा नयेत असे विचार व्यक्त केले होते. अमेरिकन संस्कृती फक्त दोनशे वर्षे जुनी आहे. या थोड्या वर्षांमध्येही त्यांच्या समाजाचा नाश करणाऱ्या सर्व गोष्टी त्यांनी

केल्या आहेत. मग समाजव्यवस्था किंवा वैवाहिक जीवनाविषयी बोलण्याचा अधिकार त्यांना कसा देता येईल ? तसेच जगातील प्राचीन परंपरा असलेले समाज नष्ट करण्याचा अधिकारही त्यांना कसा देता येईल ? पण असे करणे म्हणजेही समाजाची पाळेमुळे मारून टाकून केवळ वरवरच्या लक्षणांवर इलाज करण्यासारखे आहे. सरकारला आता खऱ्या लोक कल्याणाची कदर राहिलेली नसून सत्ता, कारस्थानी आणि मतलबी लोकांच्या हातात गेली आहे. त्यांच्या लबाड कारवायांनी ते लोकांच्या सर्वात खालच्या दर्जाच्या आणि स्थायी वृत्तीस खतपाणी घालून (विशेषतः वर्तमानपत्रे आणि टेलिव्हिजनसारख्या प्रभावी प्रसारमाध्यमांच्याद्वारे) त्यांची मते खरेदी करू शकतील. आपण आधुनिककाळात जे प्रत्यक्षात बघतो आहोत ते मात्र कोणत्याही भविष्यवाणीच्या किंवा कल्पनेच्या पलीकडचे आहे.

बुद्धिमत्तेच्या विनम्रतेचे सर्वात उत्तम उदाहरण दिसते ते बुद्धिवंतांच्या रचनांमध्ये नव्हे तर त्या गूढ कवी आणि साध्या चित्रकारांमध्ये की जे मनाने अतिशय सौम्य असतात आणि विधात्याने त्याच्या स्वतःच्या प्रतिकृतीत बनविलेले विश्व बघू शकतात. या विनम्र लोकांच्या उत्स्फूर्त निर्मिती या निसर्ग आणि दैवत्वाच्या चिरस्थायी प्रतिकृती असतात. त्यांच्या ब्रशने उमटणाऱ्या प्रत्येक रेषेत भरभरून वाहणारा आनंद आणि उत्साह त्यांच्या चित्रांच्या माध्यमातून सुगंधी कमळाप्रमाणे आपली हृदये उघडतो. त्यांच्या कृतींमधून एक अद्वितीय, शांत प्रेरणा प्रकट होत असते. काही तथाकथित 'भाबडी' किंवा 'ग्रामीण' चित्रे ही असू शकतील की जी अशाच प्रकारच्या चित्रशैलीचे प्रतिबिंब असतील.

दुर्दैवाने आधुनिक काळात आपण कोणतीच महान चित्रकारांची चित्रे निर्माण करीत नाही आहोत. अगदीच फारतर आपण जुन्या महान चित्रकारांच्या कृतींची नक्कल करतो आणि त्यांच्या चित्रांची खूप जास्त किंमतीस गुंतवणूक म्हणून खरेदी व विक्री करतो. आधुनिककाळात आपण शाश्वत कलेची संकल्पना सोडून दिली आहे आणि त्याऐवजी आधुनिक कला स्वीकारली आहे. ही आधुनिक कला इतकी व्यक्तीसापेक्ष आहे की ती फक्त कलाकारालाच समजते किंवा त्याच्या कलाकृतीचे महान मूल्य आपल्याला पटवून देण्यासाठी त्याला लांबलचक वर्णन करावे लागते. आणि नेहमीच असेही काही टीकाकार असतात की ज्यांना अमरत्वाचा किंवा आत्म्याचा अजिबात गंध नसतो पण कसेही करुन नवीन दिसणाऱ्या अर्थशून्य कृतींची की ज्या सर्व चांगल्या वृत्ती आणि सामान्य आकलनशक्तीच्या पलीकडे असतात व त्यांची वारेमाप स्तुती करतात.

अर्थात आत्ममार्गदर्शनातून उत्पन्न झाल्यास आधुनिक कलेमध्येही अतिशय उत्क्रांत प्रकटनाची क्षमता असू शकते. पारंपारिक रेषा आणि आकार तोडून टाकून अशी कला

एखादी निर्गुण, निराकार वस्तू बनवू शकते की जी तेजाने भरलेली असते आणि जिचा अर्थ पारदर्शी असतो. पण हे साधण्यासाठी चित्रकाराला आत्मसाक्षात्कार झालेला असावा लागतो. असा चित्रकार निराकार आनंदाचे अशा पद्धतीने रेखाटन करतो की त्यातून अमूर्त, उत्स्फूर्त आत्मानंद आत्म्याद्वारे व्यक्त होतो. अशा कलाकृतीस कोणत्याही वर्णन किंवा चर्चेची गरज नसते. त्याचे वर्णन केवळ कवीच करू शकतो. विल्यम ब्लेकसारखा कवी जो स्वतः एक महान उत्क्रांत मनाचा संत होता. तो कवितेत वर्णन केलेल्या दृश्यांचे चित्र रेखाटू आणि रंगवू शकत असे. अशा कवींची प्रतिभा जेथे फक्त स्वयंप्रकाशी आत्माच आनंद घेऊ शकेल आणि रसग्रहण करू शकेल अशा सर्व उदात्त उंचीपर्यंत पोहोचते. असे सर्व उत्क्रांत आत्मे मग ते एखाद्या छोट्याश्या गावात सहज बसून देवीसाठी शाल विणत असोत किंवा शाश्वत आणि अमर दैवी काव्याची स्तुती गात असोत किंवा दैवी संगीताची आराधना करीत असोत त्या सृष्टी निर्मात्याचीच साक्षात दैवी रूपे असतात. काहीवेळा अज्ञानी आंधळे लोक त्यांना समजू शकत नाहीत आणि त्यांच्यावर टीका करतात पण ते मात्र त्यांच्या स्वतःसाठी आणि देवत्वाचे ज्ञान झालेल्या इतरांसाठी आणि त्यांचे विश्व ज्यांना समजू शकेल अशा सर्वांसाठी गात आणि काम करीत राहतात.

ही दृष्टी इतरांपर्यंत पोचविण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या लैंगिक किंवा बीभत्स सूचनांचा उपयोग करण्याची गरज नसते. (अशा सूचना आधुनिक काळात कलात्मक ऊर्मींच्या अभिव्यक्तीसाठी पुरेपूर वापरल्या जातात.) जर कला शुद्ध असेल तर ती आपोआपच विलक्षण आणि अत्यंत आनंददायी असते. हा आनंद इतका असतो की जेव्हा तुम्ही एखादी विशुद्ध कलाकृती बघता किंवा ऐकता तेव्हा तुमच्या मनातील सर्व विचार थांबतात आणि त्या कलाकृतीच्या निर्मितीच्यावेळी कलाकाराच्या मनात असलेली अतिशय सुंदर आनंदाची भावना तुम्हांलाही जाणवू लागते. ही सत्य आणि वास्तवाची सूक्ष्म जाणीव ही आत्मसाक्षात्कारातून मिळणारी भेट असते आणि केवळ बुद्धीवादातून उत्पन्न होणाऱ्या सर्व वस्तूंपेक्षा तो फारच वेगळ्या प्रकारची असते.

या सूक्ष्म जाणीवेच्या अभावामुळे स्वतःला एकही ओळ रेखाटता न येणारे बुद्धिवादी टीकाकार त्यांच्या स्वार्थी दृष्टिकोनातून आणि मर्यादित बुद्धिवादाने कोणत्याही होतकरू कालकाराच्या जाणीवा बोथट करतात आणि त्याच्या कलाकृती नष्ट करतात. उदाहरणार्थ एके दिवशी मी टि.व्ही. वर एक उत्तम वाद्यवृंदाचा छोटासा कार्यक्रम ऐकला. त्यातील संगीत एका ऐंशी वर्षांच्या वृद्ध इंग्रज बाईनी रचले होते आणि ते अतिशय सुंदर व मंत्रमुग्ध करणारे होते. पण दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात त्यावर निंदानालस्ती करणारी अर्ध्या पानाची टीका छापून आली. त्यानंतर संगीतकार एकदम अदृश्यच झाली.

या तथाकथित उच्चभ्रू टीकेमागील नेमकी भूमिका तरी काय असते ? ह्या मागे शास्त्रशुद्ध टीका करण्याऐवजी, त्या व्यक्तीबद्दल मत्सर व्यक्त करणे तर नसते ना ? प्रश्न हा आहे की खऱ्या कलेचे रसग्रहण करणे शाळेत शिकता येत नाही. ही केवळ समजण्याची बाब नसून हा एक अंतर्यामीचा अध्यात्मिक अनुभव असतो. एखाद्या टीकाकाराने केवळ बुद्धीने रसग्रहण करणे प्रत्यक्षात अत्यंत धोकादायक असते कारण जे खरे आहे त्याची उपेक्षा किंवा विनाश होऊन कृत्रिम मूल्यांचा मुलामा देऊन प्रत्यक्षात निरर्थक व अंतिमतः विनाशकारी असे काहीतरी पुढे येण्याची शक्यता असते. पण अशा लोकांनी टीका केलीच पाहिजे का ? प्रत्येकाला त्याचा स्वतःचा मार्ग असताना शब्दांच्या जंजाळाने इतरांना चुकीचे मार्गदर्शन का करावे ? तसेच पत्रकार आपल्या जळजळीत शब्दांनी शहाण्या आणि विद्वान माणसाच्या मुलाखतीमधल्या नव्या कल्पना खोडून काढत असतात.

आपण जर आधुनिकतेच्या उत्पत्तींकडे पाहिले तर असे दिसते की त्यातून निर्माण झालेल्या कृती मुख्यतः उथळपणा आणि गोंधळ निर्माण करणाऱ्या आहेत. आणि मानसिक टीकेच्या कौशल्यास खतपाणी घालणाऱ्या आहेत. पण सुदैवाने या सगळ्यावर एक उपायही आहे. जर सर्व महान कलाकार अदृश्य झाले तर काय होईल ? (असे घडताना खरोखरच दिसते आहे कारण त्यांच्या कल्पकतेमुळे त्यांच्यावर टीका होऊन त्यांच्यातील आंतरिक जाणीवा वेगाने गप्प केल्या जात आहेत.) तर मग ध्रुवीकरणाचा सिद्धांत काम करेल आणि त्यांचे टीकाकार अदृश्य होतील कारण त्यांना टीका करण्यासाठी कोणीच उरणार नाही. मग ते एकमेकांवर टीका करू लागतील कारण पूर्व सूचित यंत्रांप्रमाणे त्यांना कुठे थांबायचे ते कळत नाही. ते अखंडपणे टीका करतच राहतात. अशी एकमेकांवर टीका करत राहून अखेरीस ते सगळेच स्वतःचे अस्तित्व गमावतील हे निःसंशय. सुगंधी असूनही पाकळ्यांमध्ये विखुरलेल्या फुलाचे सुप्त सौंदर्य नाकारणारी विश्लेषण ही विषारी वृत्ती आहे.

आधुनिकतेशी निगडित समस्या ही आहे की ती सदैव स्वतःच्या सर्जनांचा विनाश करीत राहते. ध्रुवीकरणाच्या परिणामांचे आणखी एक महत्वाचे उदाहरण बघुया – सोळाव्या ते एकोणिसाव्या शतकापर्यंत इतर देशांवर आक्रमण करणे आधुनिक समजले जायचे. उघड लुटालुट आणि वसाहतवाद त्याकाळात रूढ होता. विसाव्या शतकात इतर देशांमध्ये उदारदृष्टीने रस घेणे आधुनिक झाले. पण ध्रुवीकरणाच्या सिद्धांतामुळे कोणताही नवीन प्रवाह सुरू झाला तरी काही काळाने तो उलटून लंबक पुनःश्च उलटा झोका घेणार हे खात्रीने सांगता येईल. पाश्चात्य देशांना आंधळे करणाऱ्या भूतकाळातील काही चुकीच्या कल्पना व त्यामुळे पाश्चात्य लोकांना भोगायला लागलेल्या समस्या यांचा ध्रुवीकरणाच्या सिद्धांताच्या आधारे आपण या आधीच उल्लेख केला आहे.

या शतकांमध्ये बुद्धिवाद सर्वाधिक उंचीवर असताना गोऱ्या लोकांच्या वांशिक श्रेष्ठतेच्या कल्पनेच्या माध्यमातून कार्यरत होतो. या लोकांनी तर्कसंगत विचाराने असे ठरवले की गोरवणी खेरीज इतर रंगांच्या त्वचेचे लोक जणू देवाने बनविलेच नाहीत. सोईस्करित्या असे ही गृहित धरले गेले की देव निश्चितपणे गोऱ्या रंगाचा असणार आणि बहुदा अँग्लो सेक्सन असणार आणि इतर सर्व वंशांना दैवी शिक्षा म्हणून वेगळा रंग प्राप्त झाला आहे. अशा पद्धतीचे अज्ञान आपल्याला जरी गंमतशीर वाटले तरी या विशेष प्रकारच्या बुद्धिवादाच्या सहाय्याने किंवा खरे तर साम्राज्यवाद आणि वसाहतवादाच्या सिद्धांतीकरणाने त्यांनी हजारो-लाखो लोकांना मारून टाकले, त्यांची जमीन लुटली आणि अनेक लोकांना गुलाम केले. या सगळ्याचा परिणाम म्हणून उत्तर अमेरिकेत एखादाही रेड इंडियन पारंपारिक पद्धतीने, नैसर्गिक स्वातंत्र्याने राहताना दिसत नाही. त्यासर्वांना आक्रमकांनी 'उदारपणे' दिलेल्या आरक्षणांमध्ये कैद करून ठेवले आहे. संग्रहालयात गेल्यावरच चेहरे रेड इंडियन्सप्रमाणे रंगविलेली त्यांची चित्रे बघता येतात पण गंमत अशी की हे चेहरे ही अँग्लो सेक्सनच असतात.

कोणत्यातरी महान दैवयोगाने कोलंबस अमेरिकेत पोहोचला आणि आपण भारतात पोहोचलो असे समजून तेथेच राहिला. जर असे झाले नसते तर भारतातील मिश्र वर्णीय लोक की ज्यांच्यामध्ये हिंदुस्थानी, पाकिस्तानी, बांगलादेशी, श्रीलंकन्, नेपाळी, तिबेटी आणि इतर राज्यांमधील लोकांचा समावेश होतो; त्यांच्या प्राचीन आणि महान संस्कृतीसह पूर्णपणे उध्वस्त झाले असते आणि केवळ कॅथॉलिक चर्चमध्येच शांतता निर्माण करणे हे एकमेव योगदान मानवी सभ्यतेस देणाऱ्या स्पॅनिश योद्ध्यांच्या अहंगडाने आपला नाश झाला असता. कोलंबस जरी टळला तरी इंग्रजांच्या रूपाने अँग्लो सेक्सन भारतात आले आणि भारताचा महान सांस्कृतिक वारसा व प्रगाढ बुद्धिमत्ता पुसून टाकण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करून सुमारे ३०० वर्षांनी त्यांचे आदरातिथ्य ते परके असूनही करणाऱ्या लोकांना एकदाचे सोडून निघून गेले. त्यांनी भारत शांतपणाने सोडला पण जाता-जाता या महान देशाचे तीन भौगोलिक प्रदेशांमध्ये विखुरलेले दोन तुकडे करून हिंसा व विनाशाचे बीजारोपण केले.

आता लुटालुटीवर आधारलेले त्यांचे साम्राज्य पूर्णपणे असूनही मानवी हक्क आणि बौद्धिक सिद्धांत ह्यांच्या भक्कम पायावर उभे असलेल्या 'संयुक्त राज्य म्हणजेच युनायटेड किंगडम' (U.K) मध्ये अजूनही वसाहतवादाचे समर्थन अगदी टोकाला जाऊन चालूच आहे. U.K. मध्येच आता विविध घटकांमधील तणाव स्पष्ट होत असून हे घटक एकमेकांशी भांडत तर आहेतच पण हिंसक मार्ग अवलंबून एकमेकांचा नाश करण्याचाही प्रयत्न करीत

आहेत. नुकतीच सुरू झालेली शांती प्रक्रिया प्रत्यक्षात येईपर्यंत दररोज उत्तर आयर्लंडमध्ये वसाहतवादाचे रक्षण करणारे किंवा त्यांच्यावर हल्ले करणारे लोक मारले जात होते. लंडनसारख्या प्रसिद्ध व सर्वसामान्यपणे सुरक्षित शहरात नियमित कालांतराने दहशतवादी लोक बॉंबस्फोट करीत होते. सध्याची युद्धापूर्वीची शांतता ही किती काळ टिकणार आहे हे सांगणे अत्यंत अवघड आहे.

आता आपण या बौद्धिक आणि मानसिक रचनांच्या प्रकटीकरणामधील ध्रुवत्व कसे काम करते ते समजून घ्यायचा प्रयत्न करू या. जेव्हा अँग्लो सेक्सन लोक अमेरिकेतील वेगळ्या संस्कृतीच्या आणि मिश्र वंशाच्या लोकांना लुटत होते तेव्हा त्यांच्या अहंकारामुळे ते वास्तवतेविषयी पूर्णपणे अंध झाले होते आणि त्यांचे उद्धट, अमानुष आणि क्रूर वर्तन हेच त्यांना नैसर्गिक आणि योग्य वाटू लागले होते. बुद्धिवादाच्या सर्व नियमांना आणि तर्कांना धरून त्यांना अत्यंत समाधानाने असे आढळले की त्यांनी सर्व जणांना भरपूर लुटले आहे आणि सर्व वेगळ्या वंशांना दडपून टाकून त्यांच्या उद्धटपणाची फळे आता ते आरामात उपभोगू शकत होते. अर्थातच ध्रुवीकरण पुन्हा एकदा प्रत्यक्षात येऊ लागले. विशेषतः अमेरिका समृद्ध होऊ लागली आणि वसाहत वादाविरूद्धच्या अमेरिकन क्रांतीचे महान आदर्श बाजूला ठेवून अमेरिकन लोक हळूहळू ऐशारामाचे गुलाम होऊ लागले आणि स्वतःच्या अहंकाराला बळी पडू लागले. जसजसा काळ जाऊ लागला तसतसे ते अँग्लो सेक्सन नसलेले लोक, ज्यू, इटालियन, रशियन इ. लोकांना कनिष्ठ वंशाचे असल्यासारखे वागवू लागले आणि मुळात रेड इंडियन्सचा असलेला देश स्वतःचा समजून बाकीच्यांना परकीय ठरवून त्यांना पळवून लावू लागले. अनेकजण धार्मिक आवेशाने ठामपणे सांगू लागले की असे करणे हा त्यांचा जन्मसिद्ध अधिकार आहे व परमेश्वरी आशीर्वादानेच रेड इंडियन्सच्या विनाशाचे महान कार्य ते करीत होते कारण रेड इंडियन्सची कातडी सर्व शक्तीमान देवाप्रमाणे गोरी नव्हती.

आता गोऱ्या कातडीच्या लोकांजवळ सुंदर शहरात अत्यंत सुंदरतेने नटलेली घरे आणि बागा आहेत. सर्व टवटवीत जंगले आणि सुपीक जमिनी (ज्या एकेकाळी इतरांच्या होत्या) व त्यातून येणारे उत्पन्न आता कायद्यानुसार त्यांच्या मालकीचे झाले आहे. केवळ स्वतःच्या जमिनीच्या आधारे राहयचे म्हणून ज्या लोकांना त्यांनी मारून टाकले किंवा पळवून लावले ते आता कायमचे संपले आहेत. त्यांच्याविषयी विचार करण्याची किंवा त्यांच्याबद्दल चिंता करण्याची अजिबात गरज उरलेली नाही कारण त्यांच्या सर्व कृत्यांचे समर्थन त्यांनीच स्वार्थीपणाने रूजविलेल्या बुद्धिवादाचा कुशलतेने उपयोग करून करता येते.

पण दुर्दैवाने हे हल्ले प्रत्यक्षात संपले नव्हते. ध्रुवीकरणाच्या निसर्ग सिद्धांतानुसार जेव्हा तुम्ही इतरांवर आक्रमण करता तेव्हा तेच आक्रमण आक्रमकाचे रूप घेऊन तुमच्यावर

उलटते. एकेकाळी स्वतःला व्यक्तीवादी आणि अत्यंत हुशार बुद्धिवादी समजणारे हेच लोक अतिशय क्रूरतेची संस्कृती निर्माण करून तसेच अँग्लो सेक्सन व इतर उद्दट वसाहतवादी जातीचे लोक आता मात्र ध्रुवीकरणाच्या नियमानुसार सर्व प्रकारची सामूहिक व आत्मविनाशी साहसे करीत आहेत. हेच लोक सहजपणे व सामूहिकरित्या नशील्या पदार्थांना बळी पडत आहेत. हे पदार्थ कोलंबिया आणि बोलिव्हिया सारख्या देशांमधून अमेरिकेत येत आहेत. याच देशांमध्ये अमेरिकेतील जमिनीचे मालक आणि मूळ रहिवासी अजूनही प्रचंड गरिबीत रहात आहेत. गोऱ्या कातडीच्या लोकांच्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी हे लोक पर्वतांमध्ये पळून गेले होते. सर्वात वाईट प्रकारचे 'क्रॅक' सारखे नशीले पदार्थ या देशात बनतात आणि अमेरिकन लोकच आपण होऊन असे पदार्थ लपवून अमेरिकेत आणतात. स्थानिक लोक मात्र क्रॅक सारख्या धोकादायक पदार्थांच्या भानगडीत पडून स्वतःचा मृत्यू ओढवून घेत नाहीत. ते फक्त असे पदार्थ बनवितात आणि स्पॅनिश वगैरे गोऱ्या कातडीचे लोक ते अमेरिकेत निर्यात करतात. अशा नशील्या पदार्थांच्या आहारी जाण्याचे परिणाम अमेरिकेच्या कोणत्याही एका विशिष्ट शहरापुरते किंवा एका प्रकारच्या लोकांपुरते मर्यादित नाहीत. हे परिणाम इतके फैलावलेले आहेत की मियामी किंवा सॅनफ्रांसिस्कोमधील अत्यंत रहदारीच्या रस्त्यावरील अनिर्बंध खूनही जणू रेड इंडियन्सना कसलाही पाचपोच न बाळगता मारून टाकण्याची लागलेली सवय आटोक्यात न आणता आल्यामुळे अमेरिकन लोक आता एकमेकांनाच ठार करीत आहेत. असा भास होतो की या 'ठार मारण्याच्या खेळाचा' सराव टेनिसप्रमाणेच करीत राहून इतके दिवस रेड इंडियन्स विरूद्ध वापरलेले मारून टाकण्यातील कौशल्य उत्तमरितीने अद्यावत जपले जात आहे.

आता ते एकमेकांवर हल्ले करू लागले आहेत आणि आपल्या अधिक श्रीमंत असणाऱ्या लोकांना मारूनही टाकू लागले आहेत. थोडक्यात विकसित समाज जसजसे अधिकाधिक श्रीमंत होतात तसतसे ध्रुवीकरणाच्या नियमानुसार या समाजांमध्ये जास्त-जास्त संख्येने चोर, अधिकाधिक लबाड माफिया गट (हे लोक श्रीमंत लोकांना पळवून नेऊन पैसे लुबाडतात.) आणि भ्रष्टाचार व हालअपेष्टा निर्माण करतात. या समांतर माफिया साम्राज्यांवर नियंत्रण ठेवणे तर शक्यच नसते किंबहुना तेच सर्वांवर, अगदी सरकारे आणि राजकीय नेते यांच्यावरही नियंत्रण ठेवतात.

आधुनिक पाश्चात्य जगतात पैसा मिळविणे इतके महत्त्वाचे झाले आहे की आधुनिकतेच्या कमनशिबी छत्रछायेखाली जन्माला आलेल्या सर्वांच्याच गळ्याभोवती पैसा जणू फाशीचा दोर बनून सतत लटकत असतो. मात्र आपण हे समजून घेतले पाहिजे की ध्रुवीकरणाच्या नियमानुसार हे सर्व चोर किंवा माफिया केवळ कटाशह देण्यासाठी असतात.?

परंतु चोरी ही केवळ गुन्हेगारी वर्गापर्यंतच मर्यादित नाही. अमेरिकन समाजातील वरपासून खालपर्यंतचे सर्व प्रकारचे लोक एकतर सभ्यतेची अजिबात चाड न राखता चोरी, लुटालुट किंवा भ्रष्टाचार करीत आहेत किंवा या ठगांनी किंवा गुंडांनी केलेले अत्याचार शांतपणे सहन तरी करत आहेत. ते आपापल्या जमातीची छोटी-छोटी राज्ये निर्माण करून ती बळकट करीत आहेत. हिंसा एवढी वाढलेली आहे की अमेरिकेत प्रवास करताना घड्याळ किंवा दागिने, अगदी विवाहातील अंगठीसुद्धा घालून हिंडता येत नाही.

सर्वसामान्य मानवी मूल्यांचा (म्हणजेच लहानाचे मोठे होताना पारंपारिक मूल्यांच्या संपर्कात आलेले लोक ज्याचा उत्स्फूर्तपणे आदर करतात त्या शाश्वत धर्माचा) लय आणि विनाश अमेरिकेत इतका पराकोटीला पोचला आहे की लोकांनी अतिशय सहजपणे मद्यपान करणे किंवा नशिल्या पदार्थांचे सेवन करणे हा आता रूढ प्रघातच होऊ घातला आहे. अगदी अत्यंत सुसंस्कृत आणि उच्चभ्रू लोकांच्या मेळाव्यातही नशिल्या पदार्थांविषयींची चर्चा पुर्वीच्या काळच्या फ्रेंच दारूच्या विषयाप्रमाणे सहजपणे होते.

याहीपेक्षा अधिक गंभीर आहे ते लैंगिक गैरवर्तन. तथाकथित स्वातंत्र्याची नशा चढलेले लोक सभ्यता, नैसर्गिक विनय आणि मर्यादांच्या सर्व जाणीवा हरवून बसले आहेत. ते त्यांच्या स्वतःच्या मुलांशीसुद्धा गैरवर्तन करत असल्याच्या अधिकाधिक बातम्या येत आहेत. त्यांच्या मुलांचे ज्या अमानुष पद्धतीने ते संगोपन करतात त्यापेक्षा प्राणीसुद्धा अधिक चांगले संगोपन करतात. तथाकथित गंमतीच्या नावाखाली जी हिंसक संस्कृती तिकडे बळावली आहे त्यातून हे लोक सर्व सामान्य, नैतिक मूल्यांच्या बाबतीत सामूहिकपणे निर्ढावलेले आहेत. त्यांचे हे निर्ढावणे मानवी समजुतीच्या आणि निषेधाच्या पलिकडचे आहे. ही 'कोका-कोला' संस्कृती नशिल्या पदार्थांकडे नजरा लागलेले डिस्को आणि अतिरेकाची असभ्यता व बिभत्सता ठासून भरलेले संगीत यांच्या बिनधास्त प्रदर्शनाने एवढी उन्मत्त झालेली आहे की एखादा गरीब 'आदिम' भारतीय संत किंवा भविष्यवेत्ता आधुनिक युगातील या नीचतम अनैतिक राज्याचे भविष्य वर्तविण्यास धजू ही शकणार नाही.

एवढ्यातच आम्ही अशी बातमी ऐकली की ज्यांच्यावर लहान मुलांनी आपल्या संरक्षण आणि कल्याणासाठी विश्वास ठेवावा अशा पोलिसांनी २०० मुलांशी गैरवर्तन केले. सध्याच्या आधुनिक काळात मुलांचे खूप भयानक हाल होतात हे तर अशा गैरवर्तनास बळी पडलेल्या मुलांसाठी गॅस चेंबरमधील मृत्यूपेक्षाही भयानक आहे कारण लहानपणी झालेले हे क्रूर नुकसान त्यांना आयुष्यभर बाळगावे लागणार आहे. कॅनडामध्ये पुष्कळ कॅथॉलिक धर्मगुरूंनी निरागस बरबाद केले नुकतेच असे धक्कादायक वृत्त ऐकायला मिळाले की ऑस्ट्रियातील सगळ्यात मोठ्या धर्मगुरूवर लहान मुलांशी गैरवर्तणुकीचा आरोप दाखल करण्यात आला.

त्यांचा पोशाख रक्तबंबाळ झाला होता. माझ्या मते त्याने बैलांच्या झुंजींच्या आखाड्यात शिरून एखाद्या अत्यंत भयानक बैलाशी झुंज घ्यायला हवी. अशा मुलांनाही उध्वस्त आयुष्य जगण्यापेक्षा मरणच अधिक श्रेयस्कर वाटत असेल. नुकतेच असेही घडले आहे की पालकांच्या जबरदस्तीमुळे सैतानी साम्राज्याविषयीच्या एका भयपटात काम करणाऱ्या लहान मुलीने पौगंडावस्थेत पोहोचताच आत्महत्या केली.

पाश्चात्य लोकांचा कोणत्याही भारतीय भविष्यावर विश्वास नसण्याचे कारण कदाचित 'अशा निष्पाप मुलांशी निंद्य गैरवर्तन करणाऱ्या हृदयशून्य लोकांचे वर्णन भविष्यात नोंदलेले नाही' हेही असू शकेल. त्यांना असे ठामपणाने वाटते की प्राचीन भारतीय ज्योतिषांचे अंतर्ज्ञान स्पष्ट नव्हते. पण मग त्याचे कारण असे आहे की प्राचीन काळातील संत कलियुगात एवढे अध:पतन होऊ शकेल ह्याची कल्पनाच करू शकले नसतील.पण मग नॉस्ट्रॅडॅमसविषयी काय ?

मी जेव्हा वर्तमानपत्रात अमेरिकेत लहान मुलांशी गैरवर्तन झाल्याची बातमी वाचली तेव्हा मला खरोखर धक्का बसला. मात्र माझ्याच विमानात माझ्या शेजारी बसलेल्या अमेरिकन स्त्रीला मला का धक्का बसावा याचेच आश्चर्य वाटले. ती म्हणाली, ''मला अजिबात धक्का बसलेला नाही. कारण तुम्ही जर तर्कशुद्ध विचार केलात तर तुमच्या लक्षात येईल की असे प्रकार जगात सर्वत्रच होत असतात. पण अमेरिकन वर्तमानपत्रेच अशा बातम्या छापायला घाबरत नाहीत.'' अशा पद्धतीने व्यक्तीगत बुद्धिवादी समर्थन त्याच्या तर्कशुद्ध निष्कर्षाप्रत नेऊन सामुहिक आत्मपरीक्षण टाळण्याच्या विचाराचे हे उत्तम उदाहरण आहे. अशा पद्धतीने निष्काळजी, बेजबाबदार विचार करणे म्हणजेच मानवतेस हादरवणारे भूकंपासारखे धोकादायक व विध्वसंक विषय टाळणे होय. ह्याचाच अर्थ अत्यंत परिश्रमाने व आदराने जपलेल्या पारंपारिक संस्कृतीच्या मूल्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष करणे होय. आज जर अब्राहम लिंकन जिवंत असता तर त्याला अशाप्रकारच्या समाजाबद्दल काय वाटले असते ? सुदैवाने की हे सर्व महान लोक स्वर्गलोकात विश्रांती घेत आहेत. दुदैवाने केवळ आपल्या, आधुनिक लोकांच्याच नशिबी आधुनिक प्रकारच्या जगातील नेहमीच्या खळबळीमुळे सतत धक्के बसणे, प्रतिसादी अहंकारामुळे अत्यंत आधुनिक प्रसारमाध्यमामुळेही धक्के बसून रक्ताचा क्षयरोग होणे लिहिले आहे.

सध्याच्या दिवसात कोणत्याच विकसित देशात कोणालाच सुरक्षित वाटत नाही. ह्याचे कारण मी विमानात जिच्याशी बोलले त्या अमेरिकन स्त्री प्रमाणे सगळेच जण त्यांच्या बुद्धिवादाचा उपयोग हिंसाचाराचे स्पष्टीकरण देण्यासाठी किंवा समर्थन करण्यासाठी करीत असतात हे आहे. किंवा कदाचित प्रसार माध्यमांमध्ये मनोरंजनाच्या नावाखाली सतत होणाऱ्या हिंसेचे प्रदर्शन, सर्वप्रकारच्या दृक-श्राव्य केंद्रांना उत्तेजन देणाऱ्या चित्रपटांचा

परिणाम म्हणून घटनांविषयी लोक निर्दय व निर्लज्ज झाले असावेत. असे दिसते की, लोक उघडपणे त्यांची प्रतिभा सिद्ध करण्यासाठी सर्वप्रकारच्या वाईट गोष्टी करून पैसे मिळविण्यात स्वत:ला सुखी समजू लागले आहेत. इतर कोणत्याही गोष्टीविषयी विचार करायला त्यांच्याकडे अजिबात वेळ नाही. ज्यांच्याकडे पुरेसा पैसा आहे ते सुद्धा इतके लोभी बनले आहेत की ज्यांच्याकडे त्यांच्याहून जास्त पैसे आहेत त्यांच्याकडूनही काय वाट्टेल ते करून अधिक पैसे मिळविण्याची इच्छा करीत असतात.

मात्र भिन्न संस्कृतीतून आलेल्या एखाद्या व्यक्तीला नशिल्या पदार्थांच्या सार्वजनिक गैरवापराबद्दल तसेच मद्यपानाविषयी बोलणे हे सुद्धा एकप्रकारचे पापच वाटते. अँगलो सेक्सन आणि युरोपियन वंशाच्या लोकांनी तर मद्यपान हे धार्मिक संस्कार म्हणूनच स्वीकारले आहे. मग ते चांगले असो अथवा वाईट. मद्यपान ही ऐक संस्कृतीच बनत चाललेली आहे. आणी जे लोक हे करत नाहीत त्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जाते. समाजातील बुद्धीवान आणि तथाकथित नेतेही ह्या मद्यपानात गर्क असतात. किंबहूना हे कृत्य ते एकत्रीत बसून करत असतात, आणि बॅरलच्या बॅरल मद्य तेथे वापरले जाते. अर्थात त्यांच्या घ्या कृत्यासाठी त्यांच्या जवळ हजारो समर्थने हजर असतात. स्वत:च्या विनाशास कारणीभूत ठरणाऱ्या ह्या सवयीचे समर्थन करण्यातच ते अपली बुद्धीमत्ता खर्च करतात. दुदैवाने, एखादी प्लेगची साथ पसरावी इतक्या झपाट्याने मद्यपानाची ही साथ सर्व देशात पसरत आहे

एकदा मी एका मैत्रीणीकडे राहयला गेले होते. तिचा नवरा सरकारी उच्च अधिकारी होता. पण ते दोघेही व्यसनाधिन असत त्यांचे अस्ताव्यस्त घर पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला, ते घर फक्त मद्यपानाच्या पार्टीसाठी वापरले जात असे. माझ्यासाठी त्यांच्याकडे जास्तीचे पांघरुण देखील उपलब्ध नव्हते. बुद्धीमान आणि उच्चपदस्थ लोकांनी मद्यसंस्कृतीलाच बायबल मानले आणि यात व्यापारी व्यापारी वृत्ती विक्रेत्यांचा मोठा सहभाग आहे.

पण कुजलेल्या द्राक्षांचा रस आणि कुजलेले चीज यातून एक अत्यंत शालीन संस्कृती निर्माण करणाऱ्या फ्रेंच लोकांना आता हे समजत नाही आहे की त्यांची द्राक्षे न आंबता पांढरी का पडत आहेत आणि त्यांचा पूर्ण देश कमकुवत यकृतांच्या आणि पालींसारख्या (म्हणजेच खवल्यांच्या) त्वचानी का ग्रासला आहे. त्यांच्यावर ध्रुवीकरणाचा अंमल होत आहे काय ? ध्रुवीकरणामुळेच त्यांना आर्थिक मंदीचा मोठा धक्का तर बसत नाही ना ? आणखी एक टोकाची घटना नुकतीच घडली आहे. श्री. चिरॅक राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या सरकारमधील सहकाऱ्यांची एक लांबलचक यादी वर्तमानपत्रात झळकली होती. या लोकांना अटक होऊन तुरुंगात पाठविले गेले होते. पण प्रश्न असा आहे की त्यांना मिळणाऱ्या पगारातून ते व त्यांच्याभोवतीचे दारूबाज लोक दारूवर एवढा कसा खर्च करू

शकले ? त्यांच्यापैकी अनेकांना रखेल ठेवण्याचीही आवड आहे आणि अशा बायकांना त्यांनी सरकारमध्ये अतिशय उच्च पातळीवर नेमले आहे.

स्वतःच्या अर्थव्यवस्था आणि अर्थशास्त्राच्या बढाया मारणाऱ्या सर्व पाश्चात्य देशांमध्ये एखाद्या साथीच्या रोगाप्रमाणे मंदी का फैलावत आहे हे कोणालाच ठाऊक दिसत नाही. या मंदीचे कारण या देशांमधील बिअर, दारू व मद्याचे वाढते सेवन आहे. या सेवनामुळे खरे स्वातंत्र्य नष्ट होते आणि  काम करण्याची व विशुद्ध जीवनाचा आनंद घेण्याची शक्ती व इच्छा कमजोर होतात. जर ते मद्यगृहात जाऊन दारू प्यायले नाहीत किंवा वेळच्यावेळी सुट्टी घेऊ शकले नाहीत तर त्यांना आभाळ कोसळल्यासारखे वाटते येशू ख्रिस्ताने म्हटले आहे की दारू हे भ्रष्टतेचे कारण असते. मी म्हणते की आधुनिकतेच्या काळात त्यामुळे आर्थिक मंदीही येते.

चर्चमध्ये सुद्धा पावित्र्य राखण्याच्या नावाखाली पूजकांना कुजलेली व आंबलेली दारू त्यांच्या अध्यात्मिक कल्याणासाठी देतात. या मागील त्यांचे स्पष्टीकरण असे आहे की येशू ख्रिस्ताने कॅना येथील विवाहप्रीत्यर्थच्या मेजवानीत पाण्याचे रूपांतर दारूत केले होते. अर्थातच दैवी कंपनांच्या आधारे तुम्ही पाण्यातून द्राक्षासव बनवू शकाल हे कदाचित खरे असू शकेल पण हीच दैवी कंपने तुमच्या सद्सद्‌विवेकाचा नाश  करणाऱ्या आणि तुम्हांला मानवाच्याही खालील योनीत ढकलणारी कोणतीही वस्तू कशी निर्माण करू देतील ? तर्कदृष्ट्या क्षणात तयार होणारी दारू असूच कशी शकेल ? ती सगळ्यात चांगली होण्यासाठी वर्षानुवर्षे कुजावी लागते. परंतु आधुनिक काळातील खरोखरच्या मद्यपी लोकांना पवित्र सख्याचा अनुभव व्होडका घेतल्याशिवाय येणार नाही. कारण व्होडकासारख्या जहाल दारूची सवय झालेल्या माणसाला सामान्य दारूतून अध्यात्मिक परिणाम जाणवेलच असे नाही. इंग्रजी भाषेमध्ये 'स्पिरीट' या शब्दाचा अर्थ दारू म्हणजेच मृतात्मा असा होतो. तसेच सर्वशक्तिमान देवाचे प्रतिबिंब असलेला आत्मा असाही होतो.

मी हे समजू शकत नाही की येशू ख्रिस्ताचा उपयोग ते आंबलेल्या दारूच्या सेवनाचे समर्थन करण्यासाठी कसे करू शकतात ? प्रत्यक्षात येशू ख्रिस्ताचा जन्मच मुळी सामान्य माणसाच्या बुद्धिवादी जाणीवांच्या पलिकडील प्रगतीसाठी झाला होता. ख्रिस्ताने कॅना येथे क्षणार्धात दारू बनविली. त्याने काही द्राक्षाचा रस आंबू दिला नाही. सर्व प्रकारच्या दारू आणि मद्ये (अगदी फ्रांसमधील संतांनी अतिशय प्रेमाने बनविलेल्या बेनेडिक्टीन या 'आशीर्वादयुक्त' दारूसह) आंबविलेली असतात आणि सर्वात चांगली मद्ये वासाला सर्वात जास्त वाईट असतात कारण ती हजारो वर्षांच्या जुन्या खऱ्या अर्थाने कुजलेल्या द्राक्षांपासून बनविलेली असतात. हे खरे आहे की त्यांचा वास पृथ्वीवरच्या कशाही सारखा नसतो

आणि जे या मद्याचे सेवन करतात त्यांना येणारा वास डुकरापेक्षाही वाईट असतो म्हणुनच जे दारू पीत नाहीत ते अशा (दारू प्यायलेल्या) लोकांच्याजवळ जाऊ ही शकत नाहीत. तरीही विकसित देशांमध्ये प्रत्येकाला या अवस्थेत जायची उत्कट इच्छा असते. असे वाटते की जणू त्यांच्या गंधज्ञानकळ्या त्यांच्याच नाकात हरवून गेल्या आहेत. या लोकांच्या अंगाला एरवी ही वास येतोच कारण फ्रांसमध्ये आंघोळ करणे हे रूढीच्या (फॅशनच्या) बाहेरचे आहे. फ्रेंच स्नानाचा अर्थ दारूमध्ये अत्तराचा अर्क शिंपडणे आणि फ्रेंच संस्कृती सर्वोच्च असल्याचा वृथा अभिमान बाळगणे असा जाणवतो.

एखाद्या मोठ्या स्वागत समारंभात कित्येकदा एखाद्याला अशा पाचशेपेक्षाही अधिक लोकांबरोबर हस्तांदोलन करावे लागते. एकदा हे लोक दारू पिऊ लागले की जर समारंभ सहा वाजता सुरू झाला असला आणि आठ वाजता संपणे अपेक्षित असले तरीही लोकांचे मद्य पिणेच कित्येकदा रात्रीचे दहा किंवा अकरा वाजले तरीही चालूच असते. ही एकच वेळ अशी असते की जेव्हा हे लोक सतत घड्याळाकडे बघत नसतात. पण प्रश्न असा येतो की अखेर जेव्हा त्यांना निघावेच लागते तेव्हा त्यांच्या गरीब बिचाऱ्या तासन्तास उपाशी व तहानलेल्या स्थितीत उभ्या असणाऱ्या यजमानावर हळूहळू त्यांची शुद्ध हरपताना बघण्याची वेळ येते. हे लोक भोवळ येऊन पडेपर्यंत हस्तांदोलन तरी करतात किंवा इतरांचे हात हातात घेऊन ते दाबत किंवा पिरगाळत तरी बसतात. बिचाऱ्या यजमानाला मात्र सतत येत राहणाऱ्या लोकांचे हस्तांदोलन करून स्वागत करण्यात व्यग्र असताना येणारे लोक संपण्यापूर्वीच आणि आलेले जेमतेम बसून चहा किंवा साधे पाणी घेऊ शकण्यापूर्वीच आणखी दारू पिणे शक्य नसल्याने निघून जाणाऱ्यांना निरोप द्यावा लागतो. जेथे पुरुषांनी स्त्रियांशी हस्तांदोलन केलेले चालत नाही अशा काही मुस्लिम देशांव्यतिरिक्त इतर देशांमध्ये यजमान स्त्रीला (जी सहजपणे उपलब्ध असते) धक्के देण्याच्या विविध शैली रूढ आहेत. पाश्चात्य समाजाच्या मनोरंजनाच्या पैलूंपैकी हा एक पैलू आहे.

अर्थात अशाप्रकारच्या बावळट वर्तनाचेही लोक समर्थन करतात आणि म्हणतात की ही प्रथा आधुनिक तर नाहीच पण परंपरेने चालत आली आहे आणि म्हणून माझ्याच युक्तीवादानुसार ती चांगली असली पाहिजे. पण ज्याच्याकडे थोडासाही सारासार विचार आहे त्याच्या हे सहजपणे लक्षात येईल की हा पैसा आणि शक्तीचा पूर्ण अपव्यय आहे. अशा सर्व मेळाव्यांमध्ये तुम्हांला लोक त्यांच्या कामाविषयी किंवा कोणत्याही सूज्ञ विषयावर बोलताना क्वचितच आढळतील. ते मुख्यत: रिकामटेकड्या गप्पा आणि घोटाळ्यांविषयीच बोलत असतात. पण जर तुम्ही असा एखादा मेळावा आयोजित केला असेल तर विशेषत: फ्रेंच लोकांपासून सावध रहा. कारण ते यजमान स्त्रीचे (आणि कदाचित यजमान पुरुषाचेही)

दोन्ही गालावर चुंबन घेतीलच. सध्याच्या सर्वप्रकारच्या फैलावणाऱ्या साथींच्या दिवसात तरी माझ्या मते किमान ही 'भयंकर' परंपरा रद्द करता आली पाहिजे.

पण या सगळ्याला एक अधिक गंभीर बाजू आहे. मद्यपानामुळे होणारा खाजगी व राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय अत्यंत महत्त्वाचा आहे. शक्य असल्यास विविध मेळावे आणि स्वागतसमारंभ तसेच, रोजच्या सवयीमुळे केल्या जाणाऱ्या मद्यपानासाठीचा खर्च आणि त्याचे विघातक परिणाम याचे संख्याशास्त्रीय सर्वेक्षण करून त्याच्या निष्कर्षांची चर्चा प्रत्येक देशांच्या संसदेत व्हायला हवी. विकसित जगातील समाजांनी त्यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा एवढा मोठा भाग शक्य तेवढे जास्त बेशुद्धीत राहण्यासाठी खर्च करावा ही कोणत्या तरी गंभीर चुकीची खूण आहे. तिसऱ्या जगातील विकसनशील देशांनी अशाप्रकारे भारावून जाऊन या देशांचे अनुकरण करणे आणि अशा पद्धतीने खूप वेळ आणि पैसा आंतरराष्ट्रीय संबंधावर खर्च करावा हे अक्षम्य आहे. भारतीय दूतावासांना सुद्धा अशा दारूच्या मेळाव्यांचे उत्तम प्रशिक्षण मिळाले असावे असे वाटते. ब्रिटीशांच्या प्रशिक्षणामुळे भारताचे राजदूत किंवा त्यांचे स्वयंपाकघरातील सेवक (त्यांच्या टाय व कोटांच्या वेशामध्ये ते सगळे सारखेच दिसतात.) यांना सुद्धा स्कॉच व्हिस्की आणि याविषयी सारे काही माहीत असते.)

हे मान्यच करावे लागेल की दारूच्या 'परंपरांमध्ये' इंग्लंड खूप पुढे आहे. कोणत्याही खेड्यातील सर्वात सुंदर आणि अलिशान इमारत ही निःसंशय मद्यशाळेची असते. ते म्हणतात की 'ही इमारत हे त्या गावाचे सामाजिक केंद्र असते.' पण अशा मद्यशाळेत जाणारे लोक एकतर आधीच पूर्णपणे दारूच्या नशेत तरी असतात किंवा लवकरात लवकर नशा चढावी म्हणून तिथे गेलेले असतात. कोणालाही भेटण्यापुर्वी त्यांना त्यांचा मद्याचा पहिला प्याला घ्यावा लागतो कारण अन्यथा त्यांना एकमेकांमध्ये सामावण्याची प्रक्रिया सुरू करता येत नाही. त्यांच्या नातेवाईकांचे मृत्यूसुद्धा ते शॅम्पेनसारख्या उंची मद्याचे प्राशन करून पार पाडतात. त्यांच्यापैकी काहीजण असे म्हणतात की भावनांमधून बाहेर पडण्याचा हा एकमेव मार्ग आहे. प्रत्यक्षात जितके जास्त मद्यसेवन होईल तेवढ्या लोकांमधील परस्परांविषयीच्या भावना कमी होतात आणि नीतिमत्तेची नैसर्गिक जाणीव व परस्पर संबंधांची मूल्ये ते हरवू लागतात. नुकतीच अशी एक घटना घडली की 'मद्य संस्कृती' चा भाग असलेल्या समाजातील एका ८० वर्षांच्या आजीने तिच्या १८ वर्षाच्या नातवास प्रेमपत्रे लिहिली आणि जणूकाही एखादी महान घटना घडल्यासारखी ती वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर छापली गेली. अशाप्रकारचा नात्यासंबंधाविषयीचा गोंधळ हा मद्याचा प्रत्यक्ष परिणाम आहे. जे प्रत्यक्षात विष आहे त्याचे सतत सेवन केल्यामुळे परस्परांविषयीच्या मानवी भावनांमधील उदात्त नैतिकता बधीर होते आणि हळूहळू नाश पावते. अशाप्रकारे नैतिक

जाणीवांना पुसट करणारे मद्याचे स्वरूप स्पष्टपणे भयानकच आहे. आणि असे असूनही या देशांमध्ये मद्याचा इतका आदर केला जातो की मला कॅनडामध्ये भेटलेल्या एका विद्यावाचस्पतीने इंग्लंडमध्ये मद्यप्राशनाद्वारे अध्यात्मिक उन्नती कशी साधता येते यावर एक अत्यंत गुंतागुंतीचा वृत्तांत लिहून डॉक्टरेट (पदवी) मिळवली होती.

मानवी जागृती आणि वर्तनावर होणाऱ्या मद्याच्या परिणामांमुळे विवेकाची पातळी किंवा मानवी जीवनातील नैतिक गुणवत्ता अजिबात वाढत नाही. मला असे आढळले आहे की मद्यपी किंवा खूप दारू पिण्याची सवय असलेल्या लोकांना साक्षात्कार घडविणे खूप अवघड असते. त्यांच्यापैकी काहीजण सत्याच्या खरोखरीच्या शोधात यश न आल्यामुळे एवढे निराश होतात व शेवटी हताशहोऊन ते पक्के दारूबाज होतात. जर चुकून त्यांची ही सवय इतर कोणत्या तरी मार्गाने कमी झालीच तर ते ताबडतोब इतर कोणत्या तरी जुगार, स्त्रियांच्या किंवा पुरुषांच्या मागे लागणे किंवा नशिल्या पदार्थांच्या आहारी जाणे वगैरे व्यसनांना बळी पडतात. असे होते कारण मद्य, नैतिकक्षमता, इच्छा व महान जीवनाच्या कल्पना आणि उच्च जागृती तसेच अध्यात्मिक व नैतिक विकास यांचे संतुलन नष्ट करते.

पाश्चात्य समाजांमध्ये मद्य सेवन ह्या गोष्टीला लोक धार्मिक कार्यच समजतात. पण मी असे म्हणेन की हे लोक आणि एखादा धार्मिक विधी करत असल्यासारखे नशिल्या पदार्थांचे सेवन करणाऱ्या लोकांकडून वेगळे नसतात कारण क्वचितच त्यांना आजुबाजूच्या परिस्थीतीची जाणीव असते. सध्याच्या दिवसात घडणारे बहुतेक गुन्हे एकतर मद्याच्या नशेत तरी घडतात किंवा मद्य अथवा नशिल्या पदार्थांच्या व्यसनाचा परिणाम म्हणून तरी घडतात. पण नुकतीच सुरुवात होऊ घातलेल्या 'आधुनिक आध्यात्मिक युगात' असेच लोक जागृत होतील की जे सर्व प्रकारच्या आसक्त व विनाशकारी सवयींपासून मुक्त झालेले असतील. मला हे ठाऊक आहे की अनेकांना घरी एखाद्याला रात्री भोजनासाठी बोलावणे सुद्धा जी वस्तू (मद्य) नसल्यास बोलावणे शिष्टसंमत मानले जात नाही ते महाभयंकर व्यसन सोडणे आवडणार नाही. किंबहुना व्हिक्टोरिया राणीचा सेवक मित्र असलेला जॉर्न ब्राऊन असे मानत असे की जो माणूस मद्यपान करत नाही आणि ज्याला अशाप्रकारचे कोणतेच व्यसन नाही तो संपूर्ण माणूसच नाही.

मराठीत एक म्हण आहे 'जर दारूची बाटली एका दाराने आत आली तर लक्ष्मी (संपदा व समृद्धीची देवता) दुसऱ्या दाराने पळून जाते.' जेव्हा एखादा माणूस शुद्धीवरच नसतो तेव्हा त्याची पत्नी, मुले, समाज किंवा देश यांच्या प्रति कर्तव्याची जाणीव त्याच्याकडून कशी अपेक्षित धरता येईल ? त्याला धड काम ही करता येत नाही किंवा त्याला सर्व सामान्य मानवी नातेसंबंध व जबाबदाऱ्यांचा आनंद ही घेता येत नाही. त्याच्या वृत्ती इतक्या हताहत होतात आणि त्याचे यकृत इतके कामातून जाते की तो अत्यंत उन्मत्त तापसी व

रागीट माणूस बनतो.

जे एका दारू पिणाऱ्या माणसाला लागू पडते तेच आधुनिक काळातील पाश्चात्य देशांमधील संपूर्ण समाजांनाही लागू पडते. एका मोठ्या अपघाताप्रमाणे येऊन धडकलेल्या आर्थिक मंदी व्यतिरिक्त त्यांच्या मद्यपी संस्कृतीमुळे परंपरागतपणे त्यांच्या नैतिक व सामाजिक संबंधांचे रक्षण आणि संवर्धन करणारी संपूर्ण मूल्यव्यवस्थाच धोक्यात आली आहे. असे वाटते की मद्य मेळाव्यामध्ये सहभागी होणे आणि मद्यगृहांना भेटी देणे ही एक खूप जुनी प्रथा आहे. पण तरी ही हे सगळे मर्यादित असायला हवे होते. मौपासा, मोलिअर, एमिली झोला यासारख्या फ्रेंच लेखकांनी सुद्धा दारू पिण्याच्या सवयीची टिंगल टवाळी केली आहे. आधुनिक काळात कशालाच कसलीच मर्यादा उरलेली नाही. असे वाटते की नैतिकता, शिष्टाचार आणि जीवनाविषयीचा आदर यांच्या सर्व मर्यादा ओलांडणे हीच प्रगत आधुनिक लोकांची खरी जीवनसुत्री आहे.

अशाप्रकारच्या समाजात केवळ दारूमुळेच नव्हे तर विविध प्रकारच्या उघड प्रलोभनांनी बुद्धी आणि जाणीवांवर होणाऱ्या अखंड आक्रमणांमुळे लोक सतत मलीन होत राहतात. मानवी बुद्धिमत्ता आणि जबाबदारीच्या जाणीवेस आकर्षित करू शकेल अशा उथळ गप्पा आणि विविध घोटाळ्यांच्या सुरस कथांच्याद्वारे ढळढळीत असत्य आणि हिंसा, भय व लैंगिकतेचे अविश्वसनीय वर्णन करणाऱ्या ठळक बातम्यांनी भरलेली प्रसारमाध्यमांनी अशा प्रकारची प्रलोभने निर्माण करण्याची तसेच ती तीक्ष्ण करण्याची कौशल्ये पूरिपूर्णतेने आत्मसात केली आहेत. सहजपणे लक्षात न येता आणि त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे ती प्रलोभने सहज आणि उपलब्ध तथाकथित विश्वासु अशा टेलिव्हिजनच्या माध्यमातून लोकांच्या घरात शिरतात.

या समाजांमधील स्त्रियांनी स्वतःची प्रतिमा ज्या प्रकारे बनू दिली आहे ती कदाचित सर्वाधिक वाईट बाब आहे. संपुर्ण जगात मातृत्त्वाशी निगडित असणाऱ्या स्वाभिमान, विनयशीलता व सौम्यतेच्या जाणीवांना पाश्चात्य समाजांमध्ये निरूपयोगी आणि मूल्यरहित समजले जाते. अर्थात गळ्यात क्रॉस घालून ह्या स्त्रिया नियमितपणे चर्चमध्ये जातही असतील पण जर त्या अत्यंत उद्धट आणि उपमर्दकारकपणे विनयशून्य किंवा आक्रमक नसतील तर त्या कमकुवत आहेत आणि प्रगती करू शकणार नाहीत असे मानले जाते. बुद्धिवादाच्या विपर्यासाने पारंपारिक स्त्री ही कदाचित कमकुवत समजली जात असेलही पण परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करताना मात्र तिच्याकडे शहाणी म्हणूनच पाहिले जाईल.

पश्चिमेतील या सर्व गोष्टी बघितल्यावर मोहम्मद पैगंबराने स्त्रियांना डोक्यापासून पायापर्यंत बुरखा घालायला का सांगितले ते मी समजू शकते. तो भविष्यवेत्ता असल्यामुळे स्वतःकडे

लक्ष वेधून घेण्यासाठी काहीही करण्यापासून स्त्रियांना थांबविणारे सौजन्य व शालीनतेचे कोणतेच नियम नसलेल्या पश्चिमेतील स्त्रियांचे भवितव्य त्याला दिसले असले पाहिजे. ह्या समाजामध्ये तुटपुंज्या कपड्यांच्या फॅशनचे निर्माते आणि केशभूषाकार सर्वाधिक समृद्ध आहेत असे वाटते. ह्याच लोकांनी प्रणयातील सौंदर्याचा नाश केला आहे. कोणती तरी केशभूषा बघून किंवा कोणती तरी उत्तेजक फॅशन बघून लोक प्रेमात पडतात आणि दुसऱ्याच दिवशी त्यांच्या प्रेमिकेने केसांची शैली बदलली म्हणून किंवा नवीन कपडे खरेदी केले म्हणून तिला सोडून देतात.

अर्थात सध्या गबाळी शैली आणि विस्कळित अवतार की ज्याला उच्चभ्रू लोक 'कॅज्युअल' म्हणतात. ती रूढ असल्यामुळे बिच्चारे केशभूषाकार आणि वस्त्र निर्माते यांचे काही दिवस हाल चालू आहेत. अर्थात हे सगळे ते जोपर्यंत टक्कल राखण्याची किंवा बहुतेक शरीर उघडेच ठेवणारे फितींचे कपडे घालण्याची नवीन शैली विकसित करीत नाहीत तोपर्यंतच.

पश्चिमेतील स्त्रियांना विशेषतः त्या बुद्धिमान असतील आणि जर करिअर करणाऱ्या किंवा राजकारणी असतील तर तार्किकतेच्या बाबतीत अत्यंत आक्रमक असावे लागते. राजकारणात त्यांना सैतानी वृत्तीचे असावे लागते. सामाजिक जीवनात केवळ शक्तिशाली असणे पुरेसे नसते तर त्यांना अत्यंत आकर्षकही दिसावे लागते. म्हणजे थोडक्यात त्यांना न हसता टक लावून बघणाऱ्या मॉडेलशी किंवा जवळपास वेश्यांप्रमाणेच स्वतःचे करिअर करणाऱ्या चित्रपटातील तारकांशी त्यांना स्पर्धा करावी लागते.

त्यांचे चेहरे इतके भावशून्य असतात की आकर्षक वाटण्यासाठी त्यांना त्यांच्या शरीराचे जास्तीत जास्त प्रदर्शन करावे लागते आणि पाय इतके उघडे ठेवावे लागतात की ज्यातून बलात्कार ओढवले जातील. आणि पैशाच्या मागे लागलेल्या समाजातील या सगळ्या गोष्टींमागील विचार असा असावा की जर कोणाला त्यांच्यावर बलात्कारही करावा वाटला नाही (कोणत्याही येरागबाळ्याला आकर्षित करणे धोक्याचे ठरू शकते) तर आकर्षक स्त्री म्हणून त्यांना प्रसिद्धी कशी मिळेल किंवा त्यांच्या 'संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून' त्यांना फायदा कसा कमावता येईल. जेव्हा मोहम्मद पैगंबराने स्त्रियांनी विनय आणि शालीनतेची मर्यादा राखूनच कपडे घातले पाहिजेत असा आग्रह धरला तेव्हा पशूंसारख्या होऊ पाहणाऱ्या आणि स्वतःच्या पावित्र्य व सन्मानाची अजिबात चाड नसलेल्या अशाप्रकारच्या स्त्रियांबद्दल त्यांना खात्रीने माहिती असली पाहिजे. या स्त्रियांच्या हे लक्षात येत नाही की पशू त्यांच्या शरीराचे प्रदर्शन करताना दोन नव्हे तर चार पायांवर उभे राहतात.

पाश्चात्य समाजास असलेला आणखी एक अभिशाप म्हणजे त्यांना वाटणारे वृद्धापकाळाचे भय. तरुण दिसण्यासाठी स्त्री व पुरुष इतके आटोकाट प्रयत्न का करतात त्यांचा बुद्धिवाद किंवा कदाचित जाहिरात करणारी व्यक्ती त्यांना सांगते की जर तुम्ही म्हातारे असाल तर तुमच्याकडे कोणी बघणारही नाही आणि कोणी तुमची कदरही करणार नाही. म्हणून कोणत्या तरी परक्या माणसाच्या तिरक्या नजरेसाठी त्या स्वतःच्या पावित्र्याचे सौंदर्य सोडून द्यायला तयार असतात. अशा उथळ कल्पनांच्या अस्तित्वामुळे समाज प्रगल्भ होऊ शकत नाही.

स्वतःचे वय किंवा गुह्यभाग ह्याविषयी आस्था बाळगणारे अशा समाजाचे सदस्य अशा पद्धतीने वागतात की परक्या संस्कृतीतून आलेल्या एखाद्या सूज्ञ पाहुण्यास ते बावळट दिसतात आणि त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा परिचय कृत्रिमता आणि मूर्खपणाच्या रूपाने करून देतात.

सभ्यता, विनयशीलता, शालीनता व शहाणपणा हे धर्म किंवा शाश्वत मूल्यांवर आधारित पारंपारिक मानवी समाजाची नैसर्गिक फळे आहेत. परंतु अशा गुणांवर हल्ले होतात आणि त्यांचा तिरस्कारही केला जातो कारण जे साधे, सामान्य व नैसर्गिक आहे त्याची चाड लोकांना राहिलेली नाही. जे जन्मजात आणि नैसर्गिक आहे त्याच्या अधोगतीची आणि कृत्रिमता आणि कृत्रिमतेच्या विजयाची ही खूण आहे. यामुळेच पाश्चात्य समाजाच्या सर्व पैलूंमध्ये आणि सर्व वस्तूंमध्ये प्लॅस्टिकचा शिरकाव झाला आहे. प्लॅस्टिक हे अस्तित्वासाठी निरोगी जीवनाचे संगोपन करत नाही. ते सतत वापरल्याने सर्वप्रकारचे त्वचा रोग आणि श्वसन रोग होतात कारण ते नैसर्गिक नाही.

अँग्लो-सेक्सन मेंदूना (त्यांनी इटालियनांचा अमेरिकेत आदिवासी मानून छळ केला होता.) ज्यांचा एकेकाळी अभिमान वाटत असे ती त्यांची बुद्धिमत्तासुद्धा आता एवढी विक्षिप्त झाली आहे की सर्वप्रकारचे अश्लाघ्य मानसिक रोग आणि मज्जातंतूविषयक गोंधळ त्यांना का सहन करावे लागत आहेत हे ही त्यांना कळत नाही. आशियातील गरीब देशांना भेटी देऊन आणि सर्वप्रकारच्या शारीरिक उपभोगांसाठी भरपूर पैसे खर्च करून ते लोक हे रोग आशियातही पसरवित आहेत. लहान मुलांशी गैरव्यवहार हा त्यांच्या स्वतःच्या देशांमध्ये गुन्हा असल्यामुळे ते थायलंड आणि इतर पौर्वात्य देशांमध्ये जाऊन असे अत्यंत भयंकर प्रकारचे गुन्हे करतात. ते करीत असलेले काम जर शहाणपणाने करीत असते तर ते विनम्र झाले असते आणि इतर व्यक्तींविषयीचा आदर जागृत होऊन त्यांच्या जीवनात संतुलन निर्माण झाले असते. मग ते शारिरीक व मानसिक गोंधळांना इतक्या सहजपणे बळी पडले नसते.

लोकांच्या जीवनातील नैतिक गुणवत्ता आणि त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यामधील जवळच्या संबंधाची चर्चा मी एका पुढील प्रकरणात विस्ताराने करीन. तेव्हाच मोठ्या प्रमाणावर फैलावलेला भोगवाद, जो प्रथम यांत्रिकीकरण, नंतर स्वयंचालन व अखेरीस संगणकीकरणाच्याद्वारे पाश्चात्य समाजांमध्ये फोफावला आहे आणि औद्योगिक विकास टोकाला गेल्यामुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांची चर्चा मी तेव्हा करीन. आपण तेव्हा बघू की मूळ प्रश्न असा आहे की मानसिक प्रक्षेपणाला मर्यादा घालणारे शहाणपण उपजत नसते व त्यामुळे त्याची फळे संतुलित नसतात. असे प्रक्षेपण दुसऱ्या टोकास पोहोचेपर्यंत आणि तेथे पोहोचल्यामुळे कोलमडेपर्यंत स्वतःचे समर्थन करीत राहते. तथाकथित 'विकसित' जगात सध्या हेच चालले आहे. बुद्धिवाद हा आधुनिक युगाचा अभिशाप वाटू लागला आहे कारण अनिर्बंध बुद्धिवादामुळे समाजाची जी अधोगती सुरू झाली आहे तिचे कारण आणि समर्थन बुद्धिवादातच आहे.

# २

# पर्याय

तुम्ही जर एखाद्या ज्ञानी व्यक्तीस तिला तिच्यासाठी काय हवे असे विचारलेत तर ती विचार करू लागेल 'मला कसली बरे गरज असू शकेल ?' त्या व्यक्तीकडे मूळातच सारे काही असते. उलट ती विचार करते 'मला जर खरोखरच खरेदीस जावे लागणार असेल तर मी असे काही विकत घेतले पाहिजे की ज्यातून इतरांविषयीचे माझे प्रेम मी व्यक्त करु शकेन. ज्ञानी पुरुष अध्यात्मिक मूल्य असलेल्याच वस्तू खरेदी करेल कारण मानवाने निर्माण केलेल्या अशाही काही सुंदर वस्तू आहेत की ज्यायोगे प्रेम व्यक्त करता येईल.' देवत्वाची शीतल कंपने उमटत नाहीत आणि ज्ञानी पुरुषांना आराम वाटत नाही. अन्यथा तो कदाचित एखाद्या कलाकाराला किंवा कलेच्या आधारे जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या एखाद्या गरीब माणसाला मदत करेल. थोडक्यात त्याच्या खरेदी मागचे तत्त्व 'मला अमूक आवडते' हे नसून 'माझ्या आत्म्याला यातून आनंद मिळतो' हे असते.

पण 'मला हे आवडते' च्या या पर्यायामागे अनुपयोगी वस्तुंच्या मोठ्या साठ्यापेक्षा वेगळे असे फारसे काही आढळत नाही. अशा वस्तूंचा संग्रह तुम्हांला स्वतःविषयी निराश किंवा उद्वेगजनक बनवते. नको असलेली वस्तू खरेदी करण्यात आपण एवढे पैसे वाया घालवले आणि ती वस्तू कोणीतरी घेऊन जाऊन कचऱ्यात टाकावी म्हणून आणखी पैसे घालविणे ही भावना निराश करणारी व संताप आणणारी असते. माणसाच्या संग्रह करण्याच्या वृत्तीमुळे तो अनेक गोष्टी गोळा करीत जातो. पण जेव्हा टोकाचे पर्याय समोर दिसू लागलतात तेव्हा ज्या वस्तूंसाठी आपण खूप प्रयत्न केलेले असतात आणि खूपसे पैसे ही खर्च केलेले असतात त्या वस्तूच आपल्याला झपाटू लागतात. त्या वस्तूंचे काय करायचे हे कळेनासे होते. सर्व वस्तू इतक्या वेगळ्या वाटू लागतात की आपण विचार करू लागतो 'मला ते नको

होते. या वायफळ वस्तू मी का खरेदी केल्या ते माझे मलाच कळेनासे झाले आहे.' अशा वस्तू कोणाला द्याव्यात हे ही लक्षात येत नाही. कारण त्या वस्तुंची फॅशन संपल्यामुळे त्या कोणालाच नको असतात.

निवडीच्या स्वातंत्र्याबरोबरच फॅशनबेल वस्तुंची कल्पना अस्तित्वात येते आणि या कल्पनेमुळे आपण इतरांच्या स्वातंत्र्यावर कळत नकळत आघात करतो. उदाहरणार्थ– तुम्ही कोणाच्या तरी घरी जाऊन सुंदर चहाचा किंवा इतर कोणत्या तरी सुंदर पेयाचा आस्वाद घेतल्यानंतर स्वतःचे तोंड उघडून 'शी ! मला हा गालिचा आवडत नाही.' किंवा 'तुम्ही या चित्रात काय पाहिले तेच मला कळत नाही.' किंवा 'मला तुमचे पडदे खरोखर आवडले नाहीत.' किंवा 'मला हे घड्याळ आवडले नाही.' किंवा 'ही पुष्परचना माझ्याच्याने बघवत नाही.' किंवा 'तुमचा वॉल पेपर मला अजिबात पसंत नाही.' ही व अशी मते तुम्ही व्यक्त करू लागता.

अर्थात तुमची मते उद्धटपणे आणि इतरांना दुखावत व्यक्त करणे फॅशनेबल असले तरी पारंपारिक मूल्यांनुसार हे वर्तन खरोखर आक्रमक व अशिष्टपणाचे आहे. अशा पद्धतीने तुमची मते तुमच्या यजमानास ऐकवताना तुम्ही कदाचित काही उपरोधिक शेरे ही मारू शकाल की ज्यामुळे या सगळ्या वस्तू खरेदी करणारी व्यक्ती पूर्णपणे गोंधळून जाईल.

अशा पद्धतीचा अतिशय नीच पातळीवरचा आनंद घेताना तुम्ही स्वतःला असा प्रश्न विचारला पाहिजे की 'असे बोलून दुसऱ्या कोण्या व्यक्तीला दुखावणारे तुम्ही कोण?' इतर कोणी जर तुम्हाला असेच बोलले तर तुम्हाला कसे वाटेल ? वस्तुस्थिती अशी आहे की तुमच्या मनाच्या अशा पाश्चात्य अवस्थेस तुमच्या अहंकाराला स्पर्श झाल्याशिवाय तुम्हांला कशाचीच किंमत कळत नाही. अत्यंत उद्धट आणि दुःखकारक असलेली अशी प्रत्येक कृती तुम्हांला अहंकारीपणाची प्रचंड ताकद देते आणि तुम्ही तुमच्या अहंकाराचा पुरेपूर उपभोग घेता. अहंकाराचे वैशिष्ट्य असे असते की जो माणूस तो व्यक्त करतो त्याला तो कधीच जाणवत नाही. तो केवळ स्वतःचा उद्धटपणा आणि इतरांना दुखावण्याच्या क्षमतेचा आनंद घेत राहतो. पण अहंकार मात्र वाढत राहतो आणि वास्तवतेपासून दूर जात-जात हवेत उडणाऱ्या एखाद्या मोठ्या फुग्याप्रमाणे दूर जात-जात अचानक फुटतो. एकदम जाणवते की लहान मुलांच्या कवितेतील हम्पटी डम्पटी प्रमाणे धाड्कन पडायला होते. अहंकाराशी निगडित समस्या ही आहे की एकेक वस्तू मिळवताना माणसाला जास्त-जास्त पर्याय उपलब्ध असावे लागतात. की जेणेकरून आपण हुशार व एकमेव व्यक्ति असल्याचे 'अहंकार' दाखवून देऊ शकेल.

यातील आणखी वाईट भाग असा की प्रत्येकालाच वैयक्तिक, इतरांपासून वेगळ्या अशा आवडी हव्या असतात. जर तुम्ही एखाद्या अमेरिकन मोटारीतून जात असाल तर

प्रवासाला सुरुवात होण्यापूर्वी दरवाजा कसा उघडायचा हे तुम्ही समजून घेतले पाहिजे. कारण अनेक पर्याय उपलब्ध असल्याने प्रत्येक अमेरिकन गाडीला वेगळ्या प्रकारची दरवाजा बंद करायची किंवा हँडलची सोय असते की जी विशेष माहिती घेतल्याशिवाय लक्षातच येत नाही. जर तुम्ही एखाद्या अपघातात सापडलात तर गाडीचा मालक जिवंत असल्याशिवाय आणि तो सापडल्याशिवाय तुम्ही काय वाटेल ते केले तरी गाडीतून बाहेर पडूच शकणार नाही. अमेरिकेतील स्नानगृहांचेही असेच आहे. स्नानगृहाच्या आत जाण्यापूर्वी त्याची माहिती करून घ्यावी हे चांगले कारण प्रत्येक स्नानगृहाचे काही एक वैशिष्ट्य असते. कधीतरी तुम्ही निरागसपणे दारातून आत जाताच पोहण्याच्या तलावात पडण्याची शक्यता असते. कधीतरी तुम्हांला असेही वाटू शकेल की दिव्याचे बटण शोधताना जर चुकून तुम्ही शॉवरचे बटण दाबलेत तर प्रचंड पाण्याचे फवारे सुरू होऊन तुम्ही एखाद्या स्फोटाच्या मध्यभागी अडकला आहात.

फ्रेंच लोकांची स्वतःचे व्यक्तित्त्व जपण्याची एक वेगळीच शैली आहे. त्यांची सांडपाणी निचरा करण्याची व्यवस्था वेगळ्याच पद्धतीने काम करते. त्यामुळे फ्रेंच स्नानगृहे कशी वापरायची हे समजणे एक अतिशय अवघड काम आहे. स्नानगृहांच्या बांधणीमध्ये ज्यांच्याकडे खूप कौशल्य आहे असे म्हटले जाते त्या फ्रेंच लोकांची ही कथा. अर्थात फ्रेंच लोक भारतासारख्या अन्य देशात जेव्हा काम करतात तेव्हा त्यांचे काम अशा काही विलक्षणरितीने करतात की या विकसनशील देशांमधील कोणालाच त्यांनी निर्माण केलेले काहीच वापरता येत नाही. उदाहरणार्थ त्यांनी भारतात जी टेलिफोन व्यवस्था निर्माण केली ती अशी काही काम करते की ती चालविणे फक्त फ्रेंच लोकांनाच जमते. उदाहरणार्थ– घरे वेगळी असावीत पण ती वापरण्यासाठी काही एक नेमकी रचनाही हवी. जर तुम्ही पाहुण्यांची कदर करत असाल तर माझ्या मते स्नानगृहे तरी अगदी सहजपणे वापरता येतील अशीच असली पाहिजेत. जे लोक तुमचे घर विकत घेतील त्यांचा ही विचार तुम्ही करायला हवा. मला इंग्लंडमध्ये पाच बेडरूम्स व एक मोठे स्नानगृह असलेले घर खरेदी करायचे होते त्या घराचा मालक म्हणाला– 'जर तुम्हांला चार-पाच लोकांसाठी हे घर हवे असेल तर ते सहजपणे येथ एकत्र राहू शकतील.' मी एकदा ॲडॅमने बनवलेले एक जॉर्जियन घर बघायला गेले होते. मी तेथे विचारले 'स्नानगृहे कोठे आहेत ?' ते म्हणाले 'त्या काळात लोक खिडक्या वापरत असत.' कशा काय हे मात्र मला अजूनही कळलेले नाही. जे लोक एखाद्या घरात आयुष्यभर राहतात त्यांना तेथील विशिष्ट व्यवस्थांची अर्थातच सवय होते पण सतत प्रवास करणाऱ्या किंवा पाहुणे म्हणून येणाऱ्यांना मात्र अशा घराचा काहीच उपयोग नसतो.

अर्थात आपल्या कपड्यांच्या बाबतीत विविधता असू शकते आणि केवळ हाताने बनविलेल्या कपड्यांमध्येच अशी विविधता असते. पाश्चात्य देशांमध्ये एकदा एखादी फॅशन सुरू झाली की सगळेजण दाढी व मिश्या वाढवू लागतात आणि एकाच प्रकारचे कपडे घालू लागतात. अर्थात उच्चभ्रू पणाच्या जाणिवेतून काही लोक फक्त सॅव्हिल रो किंवा पिअर कार्डीनचेच कपडे घालतात. तर बाकीचे इतर दुकानांमधील महागडे, चालू लेबल्स असलेले कपडे घेतात. मी महागड्या वस्त्रनिर्मात्यांची लेबल्स स्वतःच्या कपड्यांवर लावणारे अनेकजण बघितले आहेत. पण एवढे सगळे लोक एकसारखेच दिसत असल्यामुळे एखादा गुन्हा केलेली व्यक्ति ओळखणेसुद्धा अवघड होऊन जाते. चेहरे लाल असल्यामुळे आणि त्वचा फिक्कट असल्यामुळे ते सगळे अगदी एकसारखेच दिसतात. विविध प्रकारचे कपडे, मैलोंमैल कापड आणि टनांनी कल्पकता खर्च करूनही माणसे कशी सारखीच दिसतात. हे एक न उलगडणारे कोडे आहे.

या सगळ्यावर ताण म्हणूनच की काय हे लोक आता स्त्री-पुरुष दोघांनाही वापरता येतील असे कपडे वापरू लागले आहेत की ज्यामुळे स्त्री-पुरुष वेगळे ओळखणे अतिशय अवघड होऊ लागले आहे. यावर एखादा म्हणू शकेल 'म्हणून काय झाले ? त्यात चूक तरी काय आहे ?' होय, चूक आहे. प्रथम डोळ्यांना सुखकारक असणारी नैसर्गिक विविधता राखली जात नाही. दुसरे म्हणजे बऱ्याचदा व्यावहारिक गरज असणारा लोकांमधील फरक कळू शकत नाही आणि तिसरे म्हणजे स्त्री-पुरुष सारखेच दिसत असल्यामुळे प्रचंड गैरसमज आणि गोंधळ होऊ शकतात. समलिंगी संभोगाची मूळ कल्पना योगायोगाने सुचली असावी. 'चार्लीची काकू' या सुखांतिकेत म्हटल्याप्रमाणे एखादा पुरुष दुसऱ्या कोणत्या तरी पुरुषाला स्त्री सारखा वाटला असावा. याविषयी एक विनोद आहे. एक पुरुष एकदा एका विमानतळावर थांबलेला होता तेथे त्याला मुलासारखी दिसणारी एक तरुण मुलगी दिसली. खरे काय ते पडताळून पाहण्यासाठी त्याने शेजारी उभ्या असलेल्या व्यक्तीस विचारले– ''तुम्हांला काय वाटते ही मुलगी आहे की मुलगा आहे ?'' त्या व्यक्तीने उत्तर दिले– ''ती माझी मुलगी आहे.'' तो पुरुष संकोचला आणि म्हणाला. ''क्षमस्व तुम्ही तिचे वडील आहात हे मला माहीत नव्हते.'' ती व्यक्ती म्हणाली. ''खरे म्हणजे मी तिची आई आहे.''

अशाप्रकारे सध्याच्या दिवसात गोंधळ होत आहेत. पूर्णपणे गोंधळल्यामुळे लोकांना स्त्रीत्व आणि पुरुषत्व म्हणजे काय हे कळेनासे झाले आहे. मला वाटते जशी रथाला दोन चाके असतात तसेच परमेश्वराने हेतूपूर्वक स्त्री व पुरुष वेगळे निर्माण केले आहेत. अर्थातच दोघांमध्ये निश्चित फरक आणि अंतर आहे व त्याना कितीही समान समजले तरी त्यांच्यात फरक आहेच. एक डाव्या बाजूला तर दुसरा उजव्या बाजूला आहे. जर तुम्ही डाव्या बाजूवर

उजवी बाजू किंवा उजव्या बाजूवर डावी बाजू ठेवायचा प्रयत्न केलात तर ते जमणार नाही. दुसरे असे की जर दोनपैकी एक चाक तुम्ही लहान आणि दुसऱ्यापेक्षा कमी महत्त्वाचे बनविलेत तर रथाच्या तत्पर हालचालीत अडथळा येईल आणि तो केवळ गोलगोल वर्तुळाकार फिरत राहील म्हणून लिंग व भूमिका यातील भेद परमेश्वराने निर्मिलेल्या महान विविधतेचा भाग आहे. पूर्ण जगात प्रत्येक पान हे दुसऱ्या पानापेक्षा निराळे आहे. परमेश्वराने हे बारीक बारीक फरक विविधतेत सौंदर्य निर्माण करण्यासाठी केले आहेत. आपण मात्र निवडीचे स्वातंत्र्य आणि निरर्थक बुद्धिवाद यांच्या सहाय्याने सर्व मनुष्यमात्रांना एकसारखेच दिसायला, चालायला व बोलायला शिकवित आहोत. लिंग संस्कृती आणि वयाचा विचार न करता सगळ्यांना अशा सैनिकी खात्यात वागायला लावल्यामुळे माणूस अखेर कंटाळून जातो.

उदाहरणार्थ भारतातील स्त्रिया हळूहळू पाश्चात्य कपडे वापरू लागल्या आहेत. अतिशय सुंदर कलाकृतीने नटलेल्या पारंपारिक साड्या वापरण्याऐवजी त्या फॅशनेबल शिंप्यांनी बनविलेल्या पॅन्टस् वापरू लागल्या आहेत. अतिशय सुंदर असे कलात्मक काम केलेल्या या साड्या खेडेगावात वर्षातील पाच-सहा महिने शेतीचे काम नसताना अतिशय साध्या ग्रामीण लोकांनी बनविलेल्या असतात. अशा पद्धतीने शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाला जोड मिळते आणि त्यांच्या जीवनात दोन वेगवेगळ्या प्रकारच्या कामांमुळे समतोल साधला जातो. तुम्ही जर त्यांचे विणणे पाहिलेत तर तुमच्या असे लक्षात येईल की ते तुमच्या आकलन शक्तीच्या पलिकडचे आहे. अशा वस्तू कोणत्याही पाश्चात्य देशात बनत नाहीत. अगदी ह्याच्या जवळपासचे सुद्धा काही बनत नाही. या तथाकथित प्रगत देशांमध्ये लोकांना कृत्रिम उत्पादनांचा कंटाळा आला आहे आणि हाताने बनविलेल्या वस्तूंची किंमत कळली आहे. पण दुर्दैवाने भारतातील तथाकथित आधुनिक लोक– जे प्रत्यक्षात इतरांची नक्कल करतात– या वस्तूंची किंमत ओळखू शकत नाहीत. कारण या सौंदर्यामागील मूलभूत तत्त्व समजण्याइतकी मानसिक खोली त्यांच्याकडे नसते. या वस्तू उदरनिर्वाहासाठी कलेवर अवलंबून असणाऱ्या साध्या शेतकऱ्यांनी बनविलेल्या असतात. उदरनिर्वाहासाठी कलेवर अवलंबून असल्यामुळे ते अशा वस्तू बनवताना स्वतःचे सारे कौशल्य पणाला लावतात आणि अत्यंत काळजीपूर्वक लक्ष देतात.

ग्रामीण लोकांनी हाताने बनविलेल्या वस्तू हे त्याच्या जीवनातील आनंदाचे प्रतिबिंब आहे. त्यांच्या एकात्मता आणि आनंदाच्या सखोल भावना जर आपण समजू शकलो तर त्यांच्या साध्या जीवनातील श्रीमंती आपल्याला कळेल. या साध्या कलाकारांना वाटते की परमेश्वराने त्यांच्या सभोवती निर्माण केलेल्या सौंदर्याने त्यांच्या मनाचे पोषण झाले आहे. या नैसर्गिक विश्वातील फुले, पाने आणि रंग त्यांना दिसतात व ते विणत असलेल्या कापडात

शिवून सुंदर स्त्रियांचे सौंदर्य वाढवतात. त्यांना ठाऊक असते की मानवी शरीर परमेश्वराने निर्माण केलेले आहे आणि त्याचे सौंदर्य वेष्टण्यासाठी व खुलविण्यासाठी मानवी निर्मिती आवश्यक असते. हे साधे लोक जेव्हा त्यांच्या कामाविषयी बोलतात तेव्हा त्यांच्या कामाचे ते कसे वर्णन करतात ते आश्चर्य वाटण्याइतके काव्यमय असते. हाताने बनवलेल्या या सुंदर कपड्यांची गुणवत्ता खूप चांगली असते आणि म्हणून ते खूप टिकतातही. आणि त्यांचे दृश रुप अतिशय मोहक आणि मानवी शरीरास अत्यंत साजेसे असते. उदाहरणार्थ ते उन्हाळ्यात आणि हिवाळ्यातही अधिक आरामदायक असतात. शरीराला चिकटून एक उष्ण रोगयुक्त जाणीव निर्माण करणाऱ्या पॉलिएस्टर व रेयॉनच्या कपड्यांपेक्षा सुती व जरीचे कपडे घालणे अधिक चांगले असते.

नैसर्गिक वस्तूंपासून बनलेले हातमागाचे कपडे देखभाल करायलाही अतिशय सोपे व कमी खर्चाचे असतात. ते खूप काळ टिकत असल्यामुळे ते अनेकदा बदलून त्यांच्या जागी दुसरे कपडे खरेदी करावे लागत नाहीत. खरे म्हणजे तुम्ही जर साडी नेसलीत तर तुम्हांला शिंप्यावर पैसे वाया घालवावे लागत नाहीत. तो एक पट्कन घालता येणारा आणि विविध प्रसंगी चालू शकणारा अत्यंत सुंदर व शालीन कपड्याचा प्रकार आहे. जेव्हा साडी जुनी होते तेव्हा मुलींच्या नृत्यासाठीच्या वेशभूषेत तिचा उपयोग करता येतो. भारत हा असा देश आहे की जेथे स्त्रीची शुद्धता ही तिची शक्ती मानली जाते. स्त्रिया साड्यांचा उपयोग नदीत किंवा उघड्यावर स्नान करतानाही करतात आणि तेव्हा साडीचा उपयोग टॉवेलप्रमाणे होतो. साडीचा उपयोग फर्निचर झाकण्यासाठी किंवा भिंतीवर टांगायची शोभिवंत वस्तू म्हणून किंवा खोलीमध्ये दुभाजक म्हणूनही करता येतो. भारतात सूर्यप्रकाशापासून संरक्षणासाठी खिडकीवरील छत म्हणूनही साड्या वापरल्या जातात. मानवी हातांनी बनविलेल्या कापडाची (जे सुंदर आणि व्यवहार्य आहे.) गुणवत्ता अशी असते की जणू त्यात काहीतरी देवत्वाचा अंश असावा. दुर्दैवाने ज्या देशांमध्ये या साड्या हाताने बनतात त्या देशातील लोकांवर प्रसार माध्यमांच्याद्वारे पाश्चात्य उद्योजकांच्या कल्पनांचा वर्षाव होत आहे व त्यांना असे वाटू लागले आहे की मोठ्या प्रमाणावर बनवल्या जाणाऱ्या नायलॉनच्या साड्या अधिक चांगल्या असतात कारण जरीच्या दोन किंवा सुती चार साड्यांच्याच किंमतीत नायलॉनच्या दहा साड्या मिळू शकतात. अशा पद्धतीने भारतासारखे विकसनशील देश सुद्धा दुर्दैवाने खूप उपयुक्त आणि सुंदर अशा थोड्या वस्तूंपेक्षा किरकोळ किंमतीच्या खूप वस्तू असणे अधिक चांगले या विनाशकारी कल्पनेने ग्रासले जाऊ लागले आहेत. याचा परिणाम असा होईल की जर आपण काळजी घेतली नाही आणि मोठ्या प्रमाणावर बनविल्या जाणाऱ्या लेबल असलेल्या वस्तूंपायी हाताने बनविलेल्या वस्तू वापरणे

सोडून देऊ लागलो तर या उत्कृष्ट साड्या बनविणाऱ्या शेतकरी कलाकारांचा अंत होईल आणि त्यांची प्रतिभा कायमची नष्ट होईल.

आधुनिक विचारसरणीनुसार आपण घरांच्या रचना आणि कपड्यांच्या फॅशनमध्ये सरळ रेषांचे व विरोधाभासानी भरलेले निष्क्रिय साचे बनविले आहेत आणि त्यांना ''व्यवस्थित'' किंवा ? अशी नावे दिली आहेत. पण प्रत्यक्षात यासर्व रचना इतक्या सौंदर्यहीन आहेत की अशा घरात राहिल्यानंतर लोकांमध्ये मानसिक समस्या वाढीस लागतात आणि त्यांना शेवटी वेड्यांच्या रुग्णालयात जावे लागते. हे जर झाले नाही तर ते असे फॅशनचे कपडे वापरून हळूहळू निस्तेज होत अखेर मंद आणि प्रतिभाशून्य होतात. अशा कपड्यांमध्ये केवळ लेबलच बघायचे असते आणि श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी हल्ली ही लेबले कपड्यांच्या बाहेरील बाजुस लावायची पद्धत आहे.

ज्या विविध प्रकारच्या साहित्यातून हस्तशिल्प आणि इतर सजावटीच्या वस्तुंची निर्मिती होऊ शकते त्याच्याशी कोणतेही यंत्र स्पर्धा करू शकत नाही. हस्तशिल्पांसाठी काच, माती, चंदनी लाकूड, हस्तिदंत, शंख, नारळ, लाकूड, लोकर, कापूस, पितळ, चांदी, सोने इ. सारख्या पुष्कळ वस्तू वापरता येतात. शिवाय यात पर्यावरणाशी निगडित एक ''अनुषंगिक फायदा'' सुद्धा आहे. या वस्तू हाताने बनलेल्या असल्यामुळे पृथ्वीमातेचे अवाजवी शोषण होत नाही. मानवी श्रम व्यक्तीशः गुंतल्यामुळे आतोनात कच्चा माल आणि मनुष्य शक्तीच्या उपयोगावर आपोआपच मर्यादा येते. शिवाय शिल्पकाराचे हात आपल्यासाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या ओझोन वायूच्या स्तरात भोके पाडणारे धूर निर्माण करीत नाहीत. त्यामुळे या महत्त्वाच्या ऊर्जेच्या स्त्रोताचे जतन आणि संरक्षण होते. या सगळ्यातील एकमेव अडचण अशी की अखेर तुम्हांला अनेक सुंदर वस्तू मिळतील. पण जर यासर्व सुंदर वस्तू तुम्ही सांभाळू शकलात आणि त्यांच्यासाठी तुमच्या घरात जागा बनवू शकलात तर फारच चांगले होईल यामुळे तुमचे स्वतःचे आयुष्य आणि तुम्हांला भेटायला येणाऱ्या सर्वांचे आयुष्य सुंदर व वैविध्याने नटलेले होईल. शिवाय जर तुम्ही एखादी हातांनी बनविलेली वस्तू विकत घेतलीत आणि ती तुम्हांला उपयोगी नाही असे वाटले तर तुम्ही ती कोणाला तरी भेट देऊ शकता कारण ती इतकी भरीव व नैसर्गिकरित्याच अतिशय सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण असते की तुम्ही ती ज्याला भेट द्याल त्याला प्लॅस्टिकच्या किंवा मोठ्या प्रमाणावर बनविलेल्या कोणत्या तरी वस्तूपेक्षा तुम्ही दिलेल्या भेटीतून खूप जास्त आनंद मिळेल.

सध्या आधुनिक वास्तुशास्त्रावर वाढत्या प्रमाणात टीका होत आहे. विशेषतः वास्तुशास्त्रज्ञ लोकांच्या खऱ्या गरजा जाणून घेत नसून त्यांना हवी तशी वाहत्या रेषांची व

सजीव आकार असलेली घरे न बनविता आधुनिक इमारतींच्या पक्क्या रेषांनी खऱ्या व नैसर्गिक जगापासून दूर तुरुंगात असल्यासारखे वाटणारी घरे बनवीत असून लोकांना ती नकोशी झाली आहेत. तुम्ही जर घरांच्या बाजारांकडे पाहिले तर सहजपणे तुमच्या लक्षात येईल की खूप काळापूर्वी जेव्हा निसर्गाच्या प्रतिकृतींसारखी सुंदर आकाराची घरे बांधण्याची प्रवृत्ती होती तेव्हा बांधली गेलेली घरे लोकांना आवडत आहेत. पारंपारिक संपत्तीचा प्रत्येक इंच आणि प्रत्येक लक्षण जतन केले जात आहे. अशा इमारती जरी अत्यंत दुरावस्थेत असल्या तरीही त्यांना मागणी असून सर्वात जास्त किंमत मिळत आहे.

उदाहरणार्थ मी एकदा माझ्या कुटुंबासह समृद्ध इतिहासाची परंपरा असलेल्या एका अतिशय प्रसिद्ध युरोपातील शहरात गेले असतानाची घटना. तेथे आम्ही एका अतिशय महागड्या व सुंदर हॉटेलमध्ये रहात होतो. आम्हांला अतिशय अभिमानाने सांगितले गेले की या हॉटेलची स्थापना १७६० साली झाली होती. त्रास एवढाच होता की तेथे इतक्या प्राथमिक स्वरुपाच्या अडचणी होत्या की आम्हांला दोनच दिवसात ते हॉटेल सोडावे लागले. आम्ही दार उघडताच दाराचे हँडल हातात येत असे. आम्ही शरमिंदे होऊन जायचो व आम्हांला वाटायचे की आम्हांला नवीन हँडलची किंमत द्यावी लागणार. परंतु तेथील व्यवस्थापक वर आला आणि त्याने सांगितले- ''काळजी करू नका ते सहजपणे दुरुस्त होऊ शकते.'' जणूकाही सगळीच हँडल्स, बिजागऱ्या आणि खिळे हजारो वेळा निघाले होते आणि परत बसविले होते. ते संपूर्ण हॉटेल म्हणजे एक जुन्या वस्तूंचे संग्रहालयच होते पण तरीही एक अत्यंत महागडे हॉटेल म्हणून त्याचा उपयोग यशस्वीपणे केला जात आहे. दरवाजाच्या हँडलच्या घटनेनंतर आम्ही स्नानगृहातील नळ उघडायचा प्रयत्न केला तर तो नळच आमच्या हातात निघून आला आणि स्नानगृह पाण्याने भरून गेले. कदाचित तेथे राहिलेल्या सर्वच पाहुण्यांच्या बाबतीत असे झाले असेल पण तरीही त्या हॉटेलची पद्धत तशीच कायम राहिली असून लोकही भरपूर पैसे देऊन अतिशय कष्टमय किंवा किमान फर्निचर व निस्तेज रंगहीन सजावट असूनही तेथे रहायला जातात कारण तेथे त्यांना अधिक शांती व सुख मिळते.

संग्रहालयात रहावे असे कोणालाच वाटत नाही. वास्तुशास्त्रज्ञांनी जर पारंपारिक वास्तुशास्त्रात आढळणारे चांगले मुद्दे लक्षात घेतले आणि त्यांचा उपयोग करून आधुनिक पण एकात्म नैसर्गिक घरे निर्माण केली तर त्यांना तर पुरेसे उत्पन्न मिळविता येईलच पण अत्याधुनिक सुखसोयींच्या आनंदाबरोबरच पारंपारिक गृहरचनेतील विविधता आणि सौंदर्य यांचाही आस्वाद घेता येऊन घरांच्या मालकांनाही सुख वाटेल. हे सर्वज्ञातच आहे की लोक कंटाळून जातात कारण सर्वत्र एकाच रंगाची आणि प्रकारची सजावट असते.

सगळीकडचे पडदे सारखेच असतात आणि रोजचे अन्न सुद्धा पुष्कळसे सारखेच असते. यासर्व पुनरावृत्तींमुळे दुर्दैवी प्रवासी लवकरच कंटाळून जातात. अर्थात एकदा तुम्ही बोटीवर अडकलात की तुमच्या प्रश्नांविषयी काहीच करणे शक्य नसते कारण काहीच उपाय नसतो. पण किनाऱ्यावर असलेल्या विश्रामदायी आणि पृथ्वी मातेच्या भक्कम आधारावर अवलंबून असणाऱ्या लोकांनी विश्रांती आणि जीवनाचा आनंद जेथे घेता येत नाही अशा मोठ्या प्रमाणावर बनविलेल्या घरांमध्ये राहून त्याचप्रकारचा कंटाळा का म्हणून सहन करायचा ?

म्हणजेच एकीकडे आपल्याला वाटते की निवडीचे स्वातंत्र्य आहे. टोस्टवर भाजलेल्या शेंगा किंवा मासे आणि वेफर्स यातून निवड करण्याचे किंवा कदाचित पिझ्झा व पासता यातून निवड करण्याचे. अर्थात ही निवड कदाचित विविध प्रकारच्या बिस्किटांमधून किंवा चॉकोलेट्स मधूनही करायची असू शकेल. आता आपण स्वतःला असा प्रश्न विचारला पाहिजे की जर आपण रोज जे काय बनविले असेल तेच निवडले आणि विविध प्रकारच्या बिस्किटांचा आस्वाद घेतला तर आपल्या जीवनाची गुणवत्ता कमी होईल काय. पण दुसरीकडे आयुष्यात अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मोठ्या वस्तूंचा विचार करताना (उदाहरणार्थ- आपण राहतो ती घरे, आपण घालतो ते कपडे, आपण नियोजन करतो ती शहरे) आपल्या लगेच लक्षात येईल की या सर्व वस्तुंमध्ये विविधता आवश्यक असते.

सतत प्रवास करणाऱ्या कोणाचे तरी उदाहरण घ्या. तो कदाचित कॅलिफोर्नियात सॅन जोसमध्ये असेल आणि दुसऱ्या दिवशी उठेल तेव्हा युरोपात कुठे तरी असेल. जेव्हा तो खिडकीतून बाहेर बघतो किंवा रस्त्यामधून चालतो तेव्हा त्याला हे सांगता येत नाही की तो सॅन जोसमध्ये आहे की युरोपात आहे. कारण ही दोन्ही ठिकाणे इतकी एकसारखी दिसतात की दोन्हीकडे तो कोणत्या ठिकाणी आहे हे समजण्यासाठी त्याला चौकशी करावी लागते. कदाचित काही काळाने वास्तुशास्त्रज्ञ आणि नियोजकांच्या श्रम वाचविणाऱ्या प्रमाणीकरणामुळे जगातील सर्व शहरे पूर्णतः एकसारखी दिसू लागतील आणि फरक करता न येणाऱ्या या शहरांच्या लांबचलांब साखळीत आपण नेमके कोठे जातो आहोत हे लक्षात ठेवण्यासाठी आपल्याला सतत एक डायरी बाळगावी लागेल. आधुनिक स्थापत्यशास्त्राने खरोखरीच्या निवडीवर प्रत्यक्षात लादलेल्या मर्यादांविषयी एवढी चर्चा पुरे.

या आधी उल्लेख केल्याप्रमाणे ज्या क्षेत्रात उद्योजकांनी लोकांची अत्यंत कौशल्यपूर्वक फसवणूक केली आहे ते क्षेत्र फॅशनचे आहे. उदाहरणार्थ- मी नुकतीच हेलसिंकीमध्ये एक स्त्री पाहिली. तिचे सर्व कपडे फाटलेले होते आणि ती अतिशय गंमतशीर व लज्जास्पद रुपात होती व तिचे सर्व अवयव कपड्यांमधून दिसत होते. तिची केशभूषा ही अनादी काळातल्या सारखी होती आणि तिचे निम्मे केस कापून टाकलेले होते तर उरलेले नेमके

विस्कटलेले होते. शिवाय तिला अत्यंत वाईट वासही येत होता. मला वाटले की, ती खूप गरीब असल्यामुळे तिला व्यवस्थित कपडे परवडत नसावेत आणि मी तिला एक स्वच्छ चांगला पोषाख देऊ केला मला वाटले की ती अज्ञानी असली पाहिजे आणि संतसमागमाला जाताना किमान शरीर तरी स्वच्छ असले पाहिजे हे तिला माहीत नसावे. पण मी जिला तेव्हा आंघोळ करायला सांगितले तेव्हा तिने नकार दिला आणि ती म्हणाली- ''सध्याच्या दिवसात आंघोळ करणे फॅशनला धरून नाही.'' मी तिला देऊ केलेले कपडे तिच्या मते अगदीच कालबाह्य झालेले होते तर तिने घातलेले कपडे एकदम अत्याधुनिक होते. अतिशय श्रीमंत कुटुंबामधील बहुतेक मुली सध्या अशा कपड्यात असतात आणि त्या नेहमीच सुतकातल्या सारख्या काळ्या कपड्यात त्यांचे निस्तेज गोरे चेहरे असे मिरवतात की रात्रीच्यावेळी त्यांचे चेहरे त्यांनी जर स्मितहास्य केले तरच त्यांच्या दातांमुळे ओळखता येतात पण दिवसा मात्र त्या रंगहीन चेटक्यांसारख्या दिसतात.

मला वाटले की येथे ध्रुवीकरणाच्या सिद्धांताचा परिणाम पुन्हा एकदा दिसू लागला आहे. मी असा विचार केला की या स्त्रीला तथाकथित निर्णयाच्या स्वातंत्र्याने फॅशनचे गुलाम होऊन अनुकरण करण्याच्या सापळ्यात अडकविले आहे. तिच्या आयुष्याच्या विविध अवस्थांमध्ये तिने सर्वप्रकारच्या फॅशनचे कपडे घातले असले पाहिजेत. आणि आता ती अशा परिस्थितीत जाऊन पोहोचली आहे की जेथे तिने खरेदी केलेले सर्व कपडे तिला उपयोगी राहिलेले नाहीत कारण इतक्या पट्कन फॅशन बदलली आहे आणि इतके विटलेले आणि जुने झालेले व ठिकठिकाणी फाटून विचित्र आकार झालेले कपडे वापरणे तिला अधिक चांगले वाटू लागले आहे. पण आश्चर्यकारकरीत्या मला आढळले की तिने घातलेले कपडे एका विशेष प्रकारच्या दुकानात खूप जास्त किंमतीस विकले जात होते आणि ते ''स्टोन-वॉश'' केलेले असून खास बनविलेले आणि ग्राहकांच्या इच्छेनुसार फाडलेले होते आणि काहीतरी वेगळे व विलक्षण म्हणून ते विकले जात होते. त्या कपड्यांप्रमाणेच या हेलसिंकीमधील स्त्रिला ठाम खात्री होती की ती तिची निवड शक्य तेवढ्या अधिक मुक्तपणाने करीत होती पण प्रत्यक्षात ही अशी निवड करणे म्हणजे एका प्रकारच्या गुलामगिरीतून दुसऱ्या प्रकारच्या गुलामगिरीत जाणे आहे. ही स्त्री एखादी तुरळक नव्हे आपण अशी प्रतिभेच्या (गैरवापराची) दृश्ये आपल्या सर्व बाजूंना बघतो आणि अशा लोकांच्या उद्दाम वर्तनामुळे आणि भिकाऱ्यासारख्या कपड्यांमुळे सज्जन लोकांना संकोचायला होते.

केसाला हिरवा रंग लावणे आणि विचित्र टक्कल करून केसांचे वेगवेगळे आकार करण्यासाठी कित्येकदा कर्ज काढूनही खूप खर्च करण्याची फॅशन संपल्याला फार दिवस

झाले नाहीत. पण आता या फॅशनविषयी बोलले तर तुम्हांला आधुनिक मानले जात नाही. तर मग अगदी नवीन फॅशन तरी कोणती आहे ? खरे तर हे सांगणे अशक्य आहे कारण उद्योजक प्रचंड वेगाने नवीन फॅशन्स निर्माण करीत आहेत. नवीन पिढीला शाळेपासूनच वेगात बदलणारे आयुष्य जगायला शिकविले जाते. जर त्यांना ते जमले नाही तर त्यांची जुन्या काळातले अशी वर्गवारी करून ज्या सामाजिक गटात ते रहात असतात त्यातून उचलबांगडी केली जाते. जे अगदी ताजे किंवा नवीन वाटते ते दुसरे-तिसरे काही नसून उद्योजकांचे चतुर शोध असतात की जेणे करून तुम्ही रोज नवीन काहीतरी खरेदी करता आणि त्यांची यंत्रे व तुमची आंधळी गुलामगिरी चालू राहते.

संपूर्ण फॅशन उद्योग हे एक पैसे कमावण्यासाठी पसरलेले जाळे आहे. तुमच्या अहंकाराला खतपाणी घालण्याचा तो एक सुंदर मार्ग आहे. जेव्हा तुम्हांला सांगितले जाते की अमूक एका स्टाईलला मिलान किंवा पॅरिस किंवा टिंबक्टुच्या फॅशन परेडमध्ये पहिले बक्षिस मिळाले आहे तेव्हा पुन्हा एकदा निवड करण्याच्या संधीने तुम्ही इतके भारावून जाता की तुमचे पूर्वी खरेदी केलेले सर्व महागडे कपडे कालबाह्य झालेले समजून तुम्ही टाकून देता. एकदा तुम्ही फॅशनच्या आहारी गेलात की तुम्हांला त्या उद्योजकाबरोबर किती जात रहायचे हे कळत नाही आणि तो तुमच्या मूर्खपणा आणि बळी पडण्याला सुखेनैव नवीन प्रलोभने देत राहतो. अशाप्रकारच्या बदलाच्या सक्तीमुळे आपण उथळपणाच्या टोकावर जगत राहतो आणि आपले चित्त सदैव नवीन असंबद्ध अशी-कोणती वस्तू बाळगायची, खरेदी करायची किंवा प्रदर्शित करायची हे ठरविण्यात अडकून राहते.

आपल्या अनावश्यक गरजांमुळे कच्चा माल गरजेपेक्षा खूप जास्त प्रमाणात आपण वापरू लागलो आहोत आणि पृथ्वीमातेच्या पोटातील त्या मालाचा साठा कमी होऊन वर्तमानकाळ व भविष्यकाळासाठी पर्यावरणाच्या प्रचंड समस्या निर्माण झाल्या आहेत. शरीर झाकण्यासाठी काही तरी पुरेसे आणि सूज्ञपणाचे लागते. अर्थात विविधतेतून सौंदर्य येते यात शंका नाही पण जर ही विविधता खऱ्या कलाकारांनी निर्माण केली असेल तरच, कारण उद्योजकांची नजर सदैव फक्त पैशावर असते.

जे लोक फॅशनचे गुलाम बनतात आणि त्यांचा नैसर्गिक सूज्ञपणा सोडून देतात त्यांचे काय होते याचे हे आणखी एक भयंकर उदाहरण आहे. मी पाहिले आहे की जेव्हा घट्ट कपड्यांची फॅशन सुरू झाली तेव्हा अतिशय घट्ट होणारे कपडे घालणाऱ्या स्त्रियांना त्या खूप सुंदर आहेत असे वाटू लागले. प्रत्यक्षात मात्र त्या चिलटासारख्या अशक्त किंवा टी.बी. च्या रोग्यांसारख्या दिसत असत. या त्रासदायक कपड्यांमुळे त्यांना नंतरच्या आयुष्यात दूषित रक्तामुळे फुगणाऱ्या शिरांचा प्रचंड त्रास मागे लागला. अर्थात अहंकारापोटी त्यांनी

त्याचा उल्लेख कधीच कोणापाशी केला नाही ते एक दडवून ठेवलेले गुपितच राहिले. त्यानंतर बनवतानाच भोके असलेले कपडे वापरायची फॅशन सुरू झाली. या फॅशनचे वर्णन मोठ्या दिमाखात ''जाळीदार'' पँटस् असे केले गेले. इंगलंडच्या दमट आणि हवेशीर वातावरणात बरेच लोक अभिमानाने अशा पँटस् घालून फिरताना दिसू लागले आणि अर्थातच त्यांनाही भावी आयुष्यात संधीरोग किंवा संधीवातासारखे विविध प्रकारचे त्रास भोगावे लागले.

सध्याच्या दिवसात आपण एवढे प्लॅस्टिक का वापरतो हे ही समजणे अशक्य आहे. आपले पूर्वज फक्त एक चांदीची किंवा पितळेची थाळी वापरत असत. तर हल्लीच्या दिवसात पश्चिमेमध्ये प्लॅस्टिकचा प्रादुर्भाव आणि पॉलिएस्टरच्या कपड्यांमुळे फुग्यासारख्या अस्तित्वाचा उदय झाला आहे. फुग्याच्या आत काही नसते फक्त तो हवेने भरलेला असतो आणि त्यामुळे जेथे वाटेल तिथे तरंगत जाऊ शकतो. प्लॅस्टिकच्या वस्तूंची निर्मिती आणि उत्पादन करण्यात जे व्यग्र आहेत ते दशलक्षाधीश म्हणून त्यांची आर्थिक प्रतिमा निर्माण करून तिचा विकास करीत आहेत. हे चालू असतानाच बेफाम चंगळवादामुळे प्लॅस्टिकचे पर्वतच्या पर्वत निर्माण होत असून हे कळेनासे झाले आहे की या मनुष्य निर्मित न बघवणाऱ्या आणि त्यांच्या अस्तित्त्वामुळे वातावरण बिघडवणाऱ्या पर्वतांचा विनाश करण्याची समस्या कशी सोडवता येईल. प्लॅस्टिक व कृत्रिम धाग्यांचे अति उत्पादन हे अर्थातच जबरी ग्राहकवादाच्या फॅशनच्या संकल्पनेने निर्माण केलेले गंभीर जोड उत्पादन आहे.

जर तुम्ही फॅशनचे अनुयायी असाल तर तुम्ही एक स्वतंत्र्य व्यक्ती कसे असू शकाल कारण प्रत्यक्षात तुम्ही फॅशनशी संबंधित मासिके वाचण्याच्या आणि अगदी नवीन व आधुनिक काय आहे ह्याच्या शोधाच्या व्यसनाच्या आहारी गेलेले असता. जणू तुम्ही एखाद्या शर्यतीत धावत आहात आणि तुमच्च्यापुढे कोण आहे हे जाणून घेणे तुम्हांला अत्यावश्यक असते.

पश्चिमेत जन्माला आलेली मुले कोणत्याही प्रेम किंवा आत्मियतेशिवाय दुर्लक्षलेली असतात व त्यामुळे त्यांना अत्यंत एकाकी व हरवून गेल्यासारखे वाटते. पालकांकडे पैसे असल्यामुळे ते मुलांना उद्योजकांच्या प्रलोभनांना बळी पडू देतात. गरीब बिचाऱ्या मुलांवर दूरदर्शनवरून सतत वाढत्या संख्येने नवनवीन पर्यायांचे आघात होत राहतात. आता विविध प्रकारच्या बाहुल्या निघाल्या आहेत की ज्यात त्यांचे स्वतःचे वाढदिवस, त्यांच्या वडिलांचे नाव, आजोबांचे नाव, काकांचे नाव त्यांच्या संपूर्ण घराण्याचा उल्लेख असतो. जाहिरातीच्या क्षेत्रातील लोकांच्या आकर्षक सूचनांनुसार या बाहुल्यांच्या किंवा अस्वलांच्या सर्व नातेवाईकांना एकत्र जेवायला बोलावणे अपेक्षित असते. हे नातेवाईक स्वाभाविकच एकीकडून दुसरीकडे प्रवास करीत असतात. जर एक पालक म्हणून हे तुम्ही मान्य केले नाही

तर ही आधुनिक काळातील मुले तुमच्या इतकी पाठिमागे लागतील की दर महिन्यात शहरात कोठेतरी अशाप्रकारच्या मेजवान्या आयोजित करण्यात तुमचा आणखीनच जास्त खर्च होईल. येथे उद्योजक जाहिरातीच्या माध्यमातून पूर्णतः अवास्तव अशा गरजा आणि चुकीची वस्तुस्थितीविषयीची कल्पना निर्माण करत असतात. तुमच्या कष्टाच्या कमाईतून ते आनंद उपभोगत असतात.

अशा मुलांचे त्यांच्या पालकांशी किंवा आजी-आजोबांशी कोणतेही नाते उरलेले नाही. त्यांना त्यांचे स्वतःचे काका-काकू कोण आहेत हे सुद्धा माहीत नसते पण या प्लॅस्टिकच्या बाहुल्या व अस्वलांचे सारे खोटे-खोटे नातेवाईक मात्र पूर्ण पाठ असतात. सध्याच्या दिवसात विकसित देशांमध्ये लोकांची घरे ह्या अशा वस्तुंनी भरलेली आहेत की ज्यामुळे मुलांना त्यांच्या स्वतःच्या पालकांपेक्षा अधिक लगाव या बाहुल्या व अस्वलांविषयी निर्माण होतो. एके दिवशी मी विमानतळावर पाहिले की सुरक्षा अधिकारी जेव्हा एका लहान मुलीची बाहुली एक्स-रे मशीनमधून तपासण्याचा आग्रह धरीत होते तेव्हा ती मुलगी त्या बाहुलीला एवढी बिलगली होती की तिला ही त्या बाहुलीबरोबर मशीनमधून जायचे होते. जेव्हा अधिकाऱ्यांनी तिला तसे करू दिले नाही तेव्हा ती मोठ्यांदा रडू लागली आणि आजुबाजूच्या सगळ्यांनाचं या एकंदरीत प्रसंगामुळे वाईट वाटले. या मुलांमध्ये त्यांच्या खेळण्यांविषी त्यांच्या आंतरिक स्वभावात नसूनही इतकी लगट कशी काय निर्माण होते ? साधारणपणे मुले त्यांच्या खेळण्यांबरोबर खेळतात आणि त्यांचा कंटाळा आला की ती खेळणी टाकून देतात. पण कितीतरी पालकांना ते स्वतःच्या फॅशन आणि निवडींमध्ये खूप व्यग्र असल्याने स्वतःच्या मुलांसाठी अजिबात वेळच नसतो. अशा परिस्थितीत मुले त्यांच्याजवळ सतत असणाऱ्या खेळण्यांवरच प्रेम करू लागतात कारण त्यातून त्यांना सुरक्षेची भावना व भरंवसा मिळतो. पालकांना मुलांविषयी अजिबात प्रेम नसल्यामुळे त्यांचे प्रेम बाजारात असलेल्या खेळण्यांकडे ओढले जाते आणि अशा पद्धतीने 'प्रेमही' विकत घेता येते.

उत्पादन, जाहिरात आणि उपभोग हे सर्व एक प्रकारच्या यांत्रिक अटळपणाने चालू असते पण आपण हे समजून घेतले पाहिजे की यंत्रे म्हणजे आपले मालक नाहीत. आपण यंत्रांचे निर्माते आहोत आणि म्हणून आपणच त्यांच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. पैसा सुद्धा मानवानेच निर्माण केला आहे आणि म्हणून पैशाला आपल्यावर एवढे वर्चस्व गाजवू देता कामा नये. जर तुम्हांला स्वातंत्र्य म्हणजे तुमची लहर आणि इच्छा यानुसार काय हवे ते करण्याची मोकळीक असा वाटत असेल तर माझ्या मते तुमच्या मनातील स्वातंत्र्याची कल्पना अगदीच अविकसीत आहे. खरे स्वातंत्र्य म्हणजे सक्तीपासूनची मुक्ती. पण याउलट, विकसित देशांमध्ये तुमच्यावर सक्ती होते. ज्या गोष्टींची तुम्हांला गरज किंवा इच्छा नसते

त्या विकत घेणे तुम्हांला भाग पाडले जाते. तुमच्याभोवती असलेल्या सर्व प्रकारच्या टाकाऊ वस्तुंमध्येच तुम्हांला जगावे लागते. अखेरीस या सगळ्यापासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी सुद्धा तुमचा वेळ आणि पैसा सक्तीनेच खर्च करावा लागतो.

त्या हजारो-लाखो कुटुंबांचा विचार करा की जे आधुनिकतेच्या उत्पादनांनी पूर्णतः घेरले गेले आहेत आणि त्यांच्याच वर्चस्वाखाली त्यांच्याकडे जे काही आहे ते देऊन बदल्यात काहीतरी नवीन घेण्यास अगदी उतावीळ झाले आहेत. अनेक पर्याय आणि आव्हाने पुढे ठेवणाऱ्या विपणेन तज्ञांच्या समाजात उत्पन्न होणारी ही एक समस्या आहे.

अनावश्यक वस्तुंचे विविध प्रकार बाजारात आणण्याचे उद्योजकांचे कौशल्य अमेरिकेत सगळ्यात जास्त उंचीवर पोहोचलेले आहे. एकाच प्रकारचे दोन नेकटाय तुम्ही खरेदी करूच शकत नाही कारण प्रत्येक टाय वेगळा असावा लागतो. प्रत्येक दरवाज्याची खुंटी आणि गाडीचे कुलूप वेगळे असते. प्रत्येक गालिचा वेगळ्या शैलीचा असतो. केवळ एवढेच नव्हे तर, निवडीसाठी मोठ्ठा पल्ला असतो. पण ही निवड फसवी असते कारण हे सर्वप्रकार एकाच मूळ वस्तुचे असतात. म्हणजे जी उत्पादने आपल्याला चक्रावून टाकतात आणि मोहात पाडतात ती मुख्यतः मानव निर्मित असतात आणि त्यांच्या निर्मितीसाठी केवळ कृत्रिम साहित्यच वापरलेले असते. कधीतरी जर तुम्ही त्या सुंदर कृत्रिम गालिचांवरून अनवाणी पायांनी चाललात तर तुम्हांला जाणवेल तुमच्या तळव्यांचा दाह होतो आहे आणि त्यांनी निर्माण केलेल्या काही कपड्यांमुळे तुमच्या संपूर्ण शरीरावर पुरळ उठेल. यातील विचित्रपणा असा की हे सगळे असण्याला लोकांची फारशी हरकत दिसत नाही. कदाचित सध्याच्या दिवसात पुरळ असणे ही ही फॅशन झाली असावी. सगळ्यात वाईट म्हणजे जेव्हा तुम्ही वेगाने गाडीतून जात असता आणि अचानक तुमच्या लक्षात येते की गाडीच्या दाराचे कुलूप कोणत्या तरी विशिष्ट गुणवत्तेचे किंवा प्रकारचे असल्यामुळे जर गाडीला कधी आग लागली किंवा अपघात झाला तर तुम्हांला ते उघडताही येणार नाही. यामुळे तुमच्यावर तुम्ही जर परदेशी असाल तर अशा विचित्र लहरी निवडींमुळे प्रचंड त्रास होऊ शकतो.

या कृत्रिमपणे निर्मिलेल्या आणि कुशलतेने जाहिरात केलेल्या विविधतेमुळे आपल्याला आपल्याच जगात अधिकाधिक गोंधळून जायला होते आणि परके वाटू लागते. अशा परिस्थितीत विनम्र असणे आणि मोटारीत किंवा आगगाडीत बसण्यापूर्वी त्याचे दार कसे उघडायचे हे न संकोचता विचारून घेणे अधिक चांगले असते. बहुतेक करून त्या मोटारीचे इंजिन अचानक आलेल्या फॅशनप्रमाणे एखाद्या विशिष्ट प्रकारचे असेल आणि त्यातील बाकीचे सगळेही वेगळेच असेल. या आधुनिक जगात तुमच्या अज्ञानाचा संकोच न बाळगणे सगळ्यात चांगले असते. उदाहरणार्थ सध्याच्या दिवसात विमानात खुर्चीजवळ नवीन

बनलेली अतिशय नाजूक छोटी बटणे असतात. विशेषत: पहिल्या श्रेणीतून पुष्कळ वृद्ध लोक प्रवास करतात. या नाजूक बटणांच्या उपयोगाबद्दल हवाईसुंदरीकडून मदत घेणे नेहमीच चांगले असते (जरी तिने तुमच्या अज्ञानाची चेष्टा केली तरीही.)

जेथे निवडीला अतोनात वाव असतो आणि अनावश्यक विविधता असते तेथे प्रमाणीकरण अजिबातच नसते आणि काय घडते हे कोणालाच माहीत नसते. किमान काही मर्यादेपर्यंतचे प्रमाणीकरण लोकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असते. पण जेव्हा ते प्रमाणीकरण करू लागतात तेव्हा त्यातही ते मूर्खपणाचे टोक गाठतात. उदाहरणार्थ भारतासारख्या देशात जेव्हा त्यांना बिजागऱ्यांचे उत्पादन करायचे होते तेव्हा लोहारांचे पारंपारिक कौशल्य वापरण्याऐवजी त्यांनी (अर्थातच अत्यंत महाग) यंत्रांचा उपयोग करायचे ठरविले. अशाप्रकारे बनविलेल्या बिजागऱ्यांची दारे उघडण्यासाठी आता एखाद्या पैलवानाची गरज पडते आणि ती परत बंद करण्यासाठी दोन पैलवान लागतात. इतक्या घट्ट बिजागऱ्या सामान्य माणसाच्या उपयोगासाठी का बनविल्या गेल्या हे समजणे अशक्य आहे. या प्रश्नाला असे उत्तर मिळाले की उत्पादन प्रक्रिया सामान्य करण्यासाठी आणि बिजागऱ्यांचा आकार यंत्राच्या उपयोगाने प्रमाणित करण्यासाठी असे करणे आवश्यक होते. भारतात पितेळाच्या बनलेल्या आणि सहजपणे दार उघडू शकणाऱ्या बिजागऱ्या खूपच कमी किंमतीत उपलब्ध आहेत. अर्थात त्याचा आकार कदाचित अचूक मोजमापानुसार नसतो. पण आता दारे कृत्रिम साहित्य वापरून मोठ्या प्रमाणावर बनविली जात असल्यामुळे नैसर्गिक तफावतीवर काही एक मर्यादा असणे आवश्यक आहे आणि आकारातील अचूकता मिळविण्यासाठी दारांमध्ये बिजागऱ्या बसविण्यासाठी सुद्धा तुम्हांला यंत्रांचा उपयोग करावा लागतो. त्यामुळे आपल्या इच्छेविरूद्ध आपल्याला या भयंकर यंत्र निर्मित बिजागऱ्या घ्याव्या लागतात की ज्यामुळे ना दारे उघडी राहतात ना बंद. (अर्थात एखादा पैलवान मदतीसाठी नेमणे जर तुम्हांला परवडत असेल तर गोष्ट वेगळी.)

उद्योजकांजवळ चुकीच्या ठिकाणी अचूकपणा आणि योग्य ठिकाणी प्रमाणीकरण न करणे अशा प्रतिसादी स्वरुपाच्या कल्पना असतात कारण त्यांना रोज नवीन वस्तुंचा विचार करावाच लागल्याने गोंधळून जायला होते. अशाप्रकारे अखेरीस महान कारखानदार, जाहिरातदार आणि ग्राहक इतके गोंधळून जातात की त्यांना दोन अधिक दोन म्हणजे किती हेही ठाऊक नसते. हळूहळू लोकांचे नैतिक अध:पतन आणि वस्तूंची खरी मजा घ्यायच्या कुवतीचा ऱ्हास ही तथाकथित स्वातंत्र्याची मूर्खपणाची निष्पत्ती आहे.

अमेरिकेत इतर अनावश्यक स्वातंत्र्याची पण प्रचंड विविधता आहे. शवपेटीत जाण्यापूर्वी कोणते कपडे घालायचे याची निवड करण्याचे स्वातंत्र्य त्यांच्यापैकी एक आहे. खरे पाहता

कोणत्याही सूज्ञ माणसाला हे अतिशय हास्यास्पद वाटेल परंतु उद्योजकांच्या स्वातंत्र्याचे हे आणखी एक उदाहरण अगदी मरणासन्न लोकांकडूनही हवा तेवढा पैसा बनविण्याच्या त्यांच्या वृत्तीचे.

तथापि स्वातंत्र्याचा सर्वात वाईट प्रकार म्हणजे आधुनिककाळात अनीतीच्या जीवनाचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य आपण सहन करीत आहोत. तुम्ही एका माणसाशी लग्न करू शकता, शरीरसंबध दुसऱ्याबरोबर, प्रेम करण्याचे ढोंग तिसऱ्याच कोणाबरोबर आणि मुलांची निर्मिती चौथ्याबरोबर. एक आश्चर्यकारक आकडेवारी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. सरासरीने पाश्चात्य देशामध्ये एका वर्षात एक पुरुष ६-९ स्त्रियांबरोबर शरीरसंबंध ठेवतो. ह्या पूर्णपणे वेडसर कल्पना सुद्धा नेहमी काही तरी नवीन अनुभवाण्याच्या खोडीतून आल्या असाव्यात. एखादी स्त्री जी एका पुरुषासाठी म्हातारी होते तीच दुसऱ्यासाठी तरुण ठरते ही मूर्खपणाची कल्पना आहे. असे कपडे बदलल्यासारखे बायका बदलायला लागले की माणूस आणखी एका जाळ्यात अडकतो. अंत नसलेल्या नाविन्याचा पाठलाग अत्यंत शारीरिक जवळीकीच्या संबंधातही करण्याने तुमची शक्ती संपुष्टात येते आहे. एवढेच नव्हे तर भयंकर शारिरीक, मानसिक आणि भावनिक समस्याही निर्माण होत आहेत. अनिर्बंध संकर ही जर अत्यंत नैसर्गिक, सामान्य आणि चांगली गोष्ट असेल तर मग अशाप्रकारच्या जीवनशैलीशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या आत्मविनाशी रोगांमुळे लोक पिडीत का आहेत ? लोकांमध्ये मत्सराची भावना का आहे ? दररोज जी वर्तमानपत्रे मुक्त स्त्री-पुरुष संबंधांचा पुरस्कार करतात त्याच वर्तमानपत्रांमध्ये हिंसेची वृत्ते भरलेली असतात. उदाहरणार्थ- स्वतःच्या नवऱ्यांना मारणाऱ्या स्त्रिया, बायकांना मारणारे पुरुष, प्रेमिकेच्या (अन्य) प्रियकराला मारणारे प्रेमिक. अशारितीने परस्पर विनाशाचे चक्र चालूच राहते. जर अनिर्बंध संकर निसर्गास धरून असेल तर एवढ्या हिंसकरितीने आपण त्याचा प्रतिकार का करतो ? हे कशाप्रकारचे स्वातंत्र्य आहे की तुम्ही विवाहित असा अथवा नसा, तुम्ही कोणत्याही पुरुषांबरोबर अथवा स्त्रीबरोबर ढोंगी प्रेमाने हिंडता आणि उन्मत्त तसेच वासनायुक्त दृष्टीचा विकास करता ? कालांतराने अशा डोळ्यांना केवळ वयस्क लोकांमुळे पुरेसा कैफ चढत नाही आणि त्यांची वाईट नजर लहान मुलांकडे वळते. आज परदेशांत लैंगिक गैरवर्तनास बळी पडलेल्या मुलांची संख्या विश्वास बसू नये इतकी जास्त आहे. काही ठिकाणी तर असे गैरवर्तन त्यांच्या पालकांनीच केलेले आहे. अशा पद्धतीने शेकडो वर्षांच्या अनुभवाने उपयोग सिद्ध झालेल्या सभ्य जीवनाच्या नैतकि प्रथा झिडकारणे हा आधुनिकतावादाचा आणखीन एक नीचतम पातळीचा पैलू असून त्यामुळे माणसे पशुंपेक्षाही वाईट बनतात.

अनिर्बंध संकरामुळे दुःख, रोग आणि मृत्यु ओढवतो हे स्पष्टच आहे आणि अशी वृत्ती

फैलावणे थांबविण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. पण प्रश्न असा आहे की कायदे आणि शिक्षणातून फारसे काही साधत नाही. लोकांना कुठे थांबायचे हे कळले पाहिजे. पण हे नियंत्रण, ही सक्ती उत्स्फूर्त असली पाहिजे. ह्याचाच अर्थ असा की तुमची अध्यात्मिक प्रगती झाली असली पाहिजे. आत्म्याचा प्रकाश तुमच्या ध्यानात आला असला पाहिजे. ज्या माणसाला आत्मसाक्षात्कार झालेला आहे तो कोणत्याच बाबतीत काही टोकाचे करत नाही. आत्मसाक्षात्कारी माणसाचे व्यक्तीमत्त्व समतोल असते. तो मध्यवर्ती असतो कारण त्याचा तोल जेव्हा-जेव्हा सुटतो तेव्हा-तेव्हा आत्म्याचा प्रकाश त्याला परत मधोमध आणतो. अशा व्यक्तीचे पाय धरती मातेवर असतात. अशा व्यक्तीचा स्वभाव व्यवहारी, पुरोगामी, शहाणपणाचा आणि अलिप्त असतो. अशा व्यक्तीस कोणत्याही वाईट सवयी लागूच शकत नाहीत आणि तो काहीतरी मूर्खपणाचे वेडगळ आणि विनाशकारी असे काही करूच शकत नाही. अशी व्यक्ती कोणतीही वस्तू पट्कन निवडू शकते आणि जे काही उपलब्ध असेल त्याचा आनंद कसा घ्यायचा हे तिला ठाऊक असते.

हा ''निवड'' प्रकार जेव्हा विवाहाच्या प्रांतात शिरतो तेव्हा तो विशेष भयंकर आणि नाशकारी बनतो. हल्लीचे विवाह केवळ मोकाट अहंकारानेच ठरविले जातात. ते ठरविताना परंपरेने उपलब्ध केलेला पालकांचा किंवा हितेष्टु समुदायाचा संयमित मार्गदर्शित प्रभावाचा उपयोग करून घेतला जात नाही. विवाहातील जोडीदाराची निवड हल्ली केवळ अहंकाराची लहर, वासना किंवा लोभ यावर आधारलेली असते अशा परिस्थितीत एखादा छोटासा मतभेदही वैवाहिक संबंधात मोठी समस्या निर्माण करू शकतो. कुटुंबे तुटतात, अठरा वर्षांची होताच मुले घरे सोडून जातात आणि स्वतःचे घर किंवा घरकुल तरी शोधू लागतात किंवा एखाद्या समूहात सामिल होऊन दुसऱ्या कोणाच्या तरी घरात शिरतात.

सद्यस्थितीत मुले त्यांच्या पालकांना आणि पालक त्यांच्या मुलांना सहन करू शकत नाहीत कारण त्यांचे विवाह सुखाचे नसतात. मुलांच्या व्यक्तित्त्वाचा आणि त्यांच्या पृथक् जाणीवेचा विकास करण्याच्या नावाखाली ते मुलांना खूप कष्ट करायला लावतात. एक नऊ वर्षांची लहान मुलगी रोज तिच्या सायकलवर येऊन आमच्या दाराशी वर्तमानपत्र टाकताना मी बघितली. एक दिवस मी तिला तिच्या पालकांविषयी विचारले आणि तिने तिच्या शेजारी राहणाऱ्यांची नावे सांगितली. ती म्हणाली- ''मला स्वतःसाठी पैसे मिळवावे लागतात. मला माझ्या दोन पायांवर कसे उभे रहायचे ते शिकायचे आहे.'' अजून ती एवढी मोठी झालेली ही नव्हती की ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकेल आणि इतक्या लहान मुलांवर जर बलात्कार झाला किंवा जर त्यांच्याशी गैरवर्तन केले गेले तर त्याला जबाबदार कोण असेल ? आणि त्यातून स्वतःच्या दोन पायांवर उभे राहण्यासाठी तिला मदत मिळेल काय ?

विवाहा मागचा हेतू सुरक्षित आणि संतुलित वातावरणात अपत्य निर्मिती करणे आणि मुलाची काळजी घेत ते आत्मविश्वासपूर्ण आणि शालीन प्रौढ बनतील अशा रीतीने त्यांचे संगोपन करणे हा असतो. तुम्हांला जर आयुष्यभर मधुचंद्रासाठी सदैव तयार असलेली नववधूच रहायचे असेल तर तुम्ही विवाह न करताच जेथे तुम्ही शरीराचा उपयोग करून कमावू शकाल आणि सर्वांना तुम्ही काय आहात हे कळेल अशा एखाद्या ठिकाणी जाणेच चांगले. असंयमित चंचलता आणि ''फिरती नजर'' घरात संसार थाटून होताच संपले पाहिजे. वैवाहिक संबंधात बाधा आणू शकतील अशा कितीतरी गोष्टी असतात. परंतु कोणी किंवा कशाने विवाहातील प्रणय मारून टाकला आहे कोणजाणे ? अनेक गोष्टी (प्रत्येक गोष्ट आधीच्यापेक्षा जास्त किरकोळ) एकमेकांवर आळ घेण्यासाठी वापरता येतात. जर मी तुम्हांला एवढ्यातच घडलेली एक घटना सांगितली तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. एक कलाकार मला म्हणाला मला असे कित्येक प्रियकर माहीत आहेत की ज्यांनी त्यांच्या स्त्रियांना केवळ त्यांची केशभूषा आवडली नाही म्हणून त्यांना सोडून दिले.

विवाहातून महत्वाच्या जबाबदाऱ्या उत्पन्न होतात आणि म्हणून तो केवळ समजदार आणि चारित्र्यवान लोकांच्या व्यक्तिमत्त्वासाठीच असतो. अन्यथा लहान मुलांशी गैरवर्तन आणि बालगुन्हेगारीशी संबंधित आकडेवारीतून स्पष्ट होते की बेजबाबदार, थिल्लर किंवा आक्रमक पालकांच्या हाती मुलांना सोपविणे सुरक्षित नाही. अशा लोकांच्या हे लक्षात येत नाही की पालकत्व हा अनेक जबाबदाऱ्यांच्या बरोबरीने येणारा सन्मान आहे आणि ज्यांना मुलांविषयी प्रेम नाही त्यांना मुले निर्माण करण्याचे स्वातंत्र्य मिळता कामा नये.

सद्यस्थितीत हा ''निवड'' व्यवसाय विवाहाच्या क्षेत्रात आल्यामुळे कुटुंबसंस्थेची विनाशाकडे वाटचाल चालू असून कित्येक मुले एक तर मारली जात आहेत किंवा पालकांना नकोशी झाल्यामुळे आणि परिणामी त्यांचे संगोपन कोण करणार हे न कळल्यामुळे आत्मविनाशी व्यसनांना बळी पडत आहेत. अशा पालकांपुढे एकच पर्याय असला पाहिजे. एक तर त्यांनी स्वतःचे अहंकारमय प्रणय जीवन जगावे किंवा त्यांच्या जबाबदाऱ्या मान्य करून त्यांच्या तथाकथित स्वातंत्र्यावर मर्यादा आणून नवीन आणि त्यांचे संगोपन करावे.

जेव्हा तुमच्या मनात स्वतःचा जीवनसाथी निवडून त्याच्याशी विवाह केल्यानंतरही साथीदार निवडण्याचा हक्क अबाधित राहतो अशी कल्पना असते तेव्हा समस्या आणखीनच गंभीर बनतात. कायद्यात घटस्फोटाचे समर्थन आहे आणि ज्या कोणाला त्याचा किंवा तिचा संसार थांबवायची इच्छा होईल तेव्हा त्यांना विभक्त होता येते किंवा घटस्फोट घेता येतो. पण विकसित देशांमध्ये वैवाहिक जीवन जगायचा निर्णय घेऊन ही कित्येक स्त्री-पुरुष परस्परांशी निष्ठावान रहात नाहीत. किंबहुना जे कोणी स्त्री-पुरुष निष्ठावान राहतात त्यांना

कालबाह्य समजले जाते. तुम्ही आकर्षक असण्यासाठी तुमच्या स्वतःच्या साथीदाराला नव्हे तर इतर स्त्री-पुरुषांना ''सेक्सी'' वाटला पाहिजेत. तुम्ही तसे नसाल तर या आधुनिक विश्वात तुम्हांला योग्य मानले जाणार नाही.

''औपचारिक आकर्षक'' सारखी कल्पना खूप नवीन आहे आणि पुन्हा एकदा त्याच दुष्ट बुद्धिमंतांकडून म्हणजेच उद्योजकांकडून आलेली आहे. ते लोक ''आकर्षक'' अशा स्त्रीची किंवा ''दिसायला चांगल्या असलेल्या'' पुरुषाची खळबळजनक प्रतिमा निर्माण करतात. पण सर्व स्त्री-पुरुषांनी वेश्यांप्रमाणे आकर्षक बनायला झटण्याची गरज तरी काय आहे ? त्या उद्योजकांनी म्हणजेच औपचारिक प्रतिमाकारांनी सांगितल्याप्रमाणे उंची, कंबर, पृष्ठभाग आणि पाय यांची मापे साधण्यात आपली शक्ती वाया का घालवावी आपल्याला मिळालेली बुद्धिमत्ता योग्य ती निवड करण्यास वापरणेच आवश्यक नाही का ? जर आपल्याला स्वातंत्र्य आणि बुद्धिमत्ता यांचा उपयोग करून आपण असा विचार करायला नको का की हे शरीर जे परमेश्वराने आपणास दिलेले आहे दिलेले आहे ते आपल्या गरजांसाठी पुरेसे आहे. आणि शिवाय आपल्या शरीरासाठी आपल्या मागे लागणारे लोक आपण टाळायला नकोत का ? अर्थात आपल्या अनेक कल्पना कोणत्याही रामा, शिवा, गोविंदाला आवडाव्यात आणि त्याचा पाठपुरावा करताना त्यांना त्या एकदम कालबाह्य वाटाव्यात यातून आपल्याला फारसा आनंद मिळत नाही पण त्यांना मात्र अशाप्रकारचा आनंदरहित पाठलाग चमत्कारिकपणे क्षणभंगूर आनंद देतो.

अमर्याद निवडीच्या स्वातंत्र्याची संकल्पना अश्लील साहित्याच्या वेगाने वाढणाऱ्या उपलब्धतेच्या बाबतीत अगदी स्पष्टपणे फारच ताणली गेलेली आहे. मी अशी पुस्तकेही पाहिली आहेत की ज्यात लोकांच्या बीभत्स वासना पुरविण्यासाठी लहान मुलांचाही अतोनात छळ केला गेला आहे. अशी पुस्तके वाचण्याचे धैर्य जरी माझ्यात नव्हते तरी मी असे ऐकले आहे की अशी पुस्तके खूप प्रसिद्ध असून त्यांच्या प्रकाशक आणि लेखकांना खूप पैसे मिळवून देतात. जेव्हा प्रत्यक्ष निरागसताच पाशवी आणि अत्यंत स्वार्थी वासनेच्या पूर्तीसाठी वापरली जाते तेव्हा त्या समाजाचा पारंपारिक मूल्यांशी सर्व संबंध संपला आहे हे स्पष्ट होते. या पारंपारिक मूल्यांमुळेच समाज किंवा संस्कृती टिकू शकतात. विवाह आणि लहान मुलांची निरागसता याबद्दल आदर असलाच पाहिजे. सगळ्यानीच जागरुक होऊन आणि दक्ष राहून विवाहामागचा हेतू 'जो लहान मुलांच्या निरागसतेचे रक्षण करणे आणि त्यांच्यावर बळजबरी किंवा शोषणासारखे प्रकार होऊ नयेत याची काळजी घेणे' समजून घेतला पाहिजे. पण आधुनिक समाजात पालक म्हणजे भीषण तर्कशून्य दादागिरी करून मुलांच्यावर प्रेम करण्याची आपली जबाबदारी टाळणारे होऊ लागले आहेत. स्थिर संसाराचे महत्त्व समजून

घेण्यातले नेमके हेच अपयश तथाकथित प्रगत समाजाचा नाश करीत आहे आणि त्यांच्यामध्ये पालक मुलांना पुरेसे प्रेम आणि मार्गदर्शन देऊ न शकल्यामुळे उद्योजकांनी बनविलेल्या कृत्रिम प्रतिमांच्या मागे लागण्यात ते अतिशय व्यग्र आहेत. अतिशय लहान वयाची मुले त्यांची प्रेम आणि जिव्हाळ्याची अपेक्षा पूर्ण न झाल्याने नाईलाजास्तव इतरांच्या सहवासाचा माग घेत आहेत. त्यांच्या प्रेमासाठीच्या अति तीव्र इच्छेमुळे अतिशय लहान वयात ते अनैतिकतेच्या चक्रव्यूहांत प्रवेश करतात. प्रसारमाध्क्षमे सुद्धा (विशेषतः टेलिव्हिजन) या मुलांच्या बुद्धीस लैंगिकतेच्या महत्त्वाविषयी सर्वप्रकारच्या मूर्ख कल्पना त्यांच्या मनाला पुरवित आहेत. ज्या समाजात प्रसार माध्यमांना लहान मुलांशी संबंधित लैंगिक विषय हाताळण्याची परवानगी नसते तेथे मुलांना शाळेत लैंगिक शिक्षण देण्याचीही गरज नसते. अशाप्रकारचे शिक्षण भारतात अद्यापी दिले गेलेले नाही आणि मी अशी आशा करते की त्याची गरजही वाटणार नाही. या निष्पाप मुलांना असल्या घृणास्पद कल्पनांना सामोरे पाठवून काय मिळणार बरे ? शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी त्यांना दिलेल्या अधिकाराचा हा भयंकर गैरवापर आहे की जेणे करून या मुलांनी जेव्हा त्यांची निरागसता आणि आयुष्याचा फक्त आनंद घ्यायला हवा त्या वयात त्यांना हे असले भयंकर काहीतरी बघावे लागते. सात किंवा आठ वर्षांचे हे कोमल वय इतक्या लवकर संपणे आणि निरागसतेची ही सुंदर वर्षे ही इतक्या लवकर संपवली जाणे हे अत्यंत क्रूरपणाचे आहे. स्वाभाविकपणेच मुलांची तथाकथित आयुष्यातील वस्तुस्थितीला सामोरे जाण्याची तयारी नसते आणि त्यांच्या विवेकामध्ये अशी तथ्ये घुसडली गेल्यामुळे त्यांच्या निष्पाप अस्तित्वातील खेळकर, आनंदी आणि सुंदर काळावर अतिक्रमण होते.

अशाप्रकारे आधुनिकतेने मानवाची एक संपूर्ण पिढीच अशी निर्मिली आहे की ज्यांनी त्यांच्या स्वतःच्या जीवनाची, त्यांच्या कुटुंबांच्या जीवनाची, तसेच त्यांच्या मुलांच्या आणि पालकांच्याही जीवनाचा खेळखंडोबा केलेला आहे. परंपरेने दिलेले प्रेम आणि शांतीची मशागत करणारे हे सर्व स्त्रोत पूर्णतः निकालात निघाले आहेत. सध्याच्या दिवसात आजीला तिच्या नातवाकडे बघण्यासाठी वेळ नसतो कारण तरुण दिसण्यासाठी तिला तिच्या केशभूषाकाराकडे जावे लागते कारण ती जर तरुण दिसली नाही तर ती संपल्यातच जमा समजली जाईल म्हणजेच जवळजवळ मानली जाईल.

तुम्हांला केशभूषाकाराच्या घाणेरड्या हातात तुमचे डोके दिल्याशिवाय कोणीही भलेपणाने जगू देणार नाही. उदाहरणार्थ- मी स्वतः कधीही केशभूषाकाराकडे जात नाही. त्यामुळे कित्येक लोकांना असे वाटते की मी म्हणजे एक ग्रामीण असंस्कृत कुटुंबातून आलेली स्त्री आहे. पण मी तेव्हा ज्यांना असे वाटायचे त्या माझ्याच वयाच्या लोकांकडे आता बघते

तेव्हा मला दिसते की त्यासर्वांना जवळजवळ टक्कल पडले आहे आणि त्यांची त्वचा अगदीच फिक्कट दिसत असून चेहरेही सुरकुतलेले आहेत. हळूहळू त्यांचे सर्व नैसर्गिक स्मितहास्य, त्यांचा गोडवा, त्यांचे मृदु हावभाव, पूर्णतः हरवले आहेत. ही त्या सर्व सौंदर्य तज्ज्ञांची त्यांना दिलेली भेटच नव्हे काय ?

तुम्हांला आणखीनही एक पर्याय आहे- तुमची केवळ त्वचा किंवा पूर्ण चेहराच सुंदर करून घेण्याचा. मी असे पाहिले आहे की एका देशाच्या राष्ट्राध्यक्षांची पत्नी सदैव हसतमुख दिसत असे. खूप प्रयत्न करूनही मला हे कळत नव्हते की ही बाई हसत असो किंवा रडत असो हिच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य कधीच कसे जात नाही. नंतर माझ्या लक्षात आले की तिने स्वित्झर्लंडमध्ये चेहरा सुंदर करण्याचा दीर्घ आणि कठोर उपचार करून घेतला होता आणि त्यामुळे तिच्या चेहऱ्यावरील तो भाव सदैव टिकून असे.

प्रगल्भ व्यक्तीच्या लक्षात येते की जसजसे वय वाढते तसतसे वृद्धापकाळ जवळ येणे टाळता येत नाही. पण असे होत असतानाही शालीन, रुबाबदार आणि भारदस्त राहणे शक्य असते. पण आधुनिक समाजात सारे काही इतके जडवादी झाले आहे की तुमचा एक पाय स्मशानात गेल्यावरही तुम्ही व्यवस्थित दिसण्यासाठी खटाटोप करता कारण तुम्ही या उद्योजकांच्या तालावर चालत असता. तुमच्या चेहऱ्यावरचे अंतिम भावही सगळे लोक उत्सुकतेने बघणार असतात आणि म्हणून तुम्ही अद्यावत आणि सगळ्यात नवीन फॅशनप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करता.

उपभोक्ता समाजातील सर्वात महान तत्त्व हे असते की तुमच्यासाठीचे पर्याय काळजीपूर्वक कित्येक पटीनी वाढविले जातात की जेणे करून तुमच्या पैशालाही वाट मिळते आणि तुमची बहुमोल शक्ती बघण्यात आणि बघितले जाण्यात खर्च होते. वागणुकीचे हे नियम तुम्ही निवड करायला सुरुवात करण्यापूर्वीच तुमच्यावर लादले जातात.

मला हे समजणे खूप अवघड जाते की इतक्या महत्त्वाचे आणि देशासाठी एवढ्या जबाबदारीचे काम ज्यांना करायचे असते असे एवढे सगळे लोक या भयंकर व्यसनाच्या एवढे आधीन का असतात. पाश्चात्य देशांच्या संस्कृतीचा हा भाग झाला आहे की जोपर्यंत तुम्ही तुमच्या पाहुण्यांना हे नशा आणणारे पेय देऊ करत नाही तोपर्यंत तुम्हांला त्यांच्याशी बोलता आणि जवळीक साधता येत नाही. एकदा का दारू आली की ती सगळी जवळीक मग अगदी ती कूटनितीच्या वर्तुळातील का असेना अगदीच असंबद्ध वेडगळपणाचे रूप घेते. मला वाटते की, सर्व देशांचे गुप्तहेर आणि फितूर लोक अत्यंत हुशारीने लोकांच्या मद्याच्या निवडीचा उपयोग त्यांना भुलविणे, त्यांच्या जाणिवा बोथट करणे आणि त्यांच्याकडील गुपिते काढून घेणे यासाठी वापरत असतील. अगदी साधी लाच देणे आणि

भ्रष्टाचारासाठी सुद्धा मद्य हे खूप चांगले साधन आहे. एखाद्या पदावरील व्यक्तीला कोणत्या विशिष्ट प्रकारची दारू आवडते हे जर तुम्हांला ठाऊक असेल तर त्याला जिंकून घेणे अगदीच सोपे असते.

एकदा आम्ही हा प्रयोग आमच्या स्थानिक रेल्वेच्या स्टेशन मास्तरवर केला होता. तो एक बहुउद्देशीय कामगार होता की जो तिकीटाच्या खिडकीवरही बसत असे. मी जेव्हा-जेव्हा तिकीट खरेदी करायला जाई तेव्हा काहीना काही कारण काढून तो अत्यंत उद्धटपणाने वागत असे. जर माझ्याकडे नेमके सुटे पैसे नसतील तर तो त्याच्या हावभाव किंवा शब्दांमधून त्याची नाराजी दाखवीत असे. कदाचित त्याला पारंपारिक कपडे घातलेल्या भारतीय स्त्रीचे दर्शन सहन होत नसेल. त्याला अधिक सौम्य कसे करायचे किंवा त्याला जिंकून कसे घ्यायचे हे आम्हांला कळत नव्हते. माझ्या यजमानांनी सुचविले की आम्हांला गरज नसलेल्या आणि उरलेल्या शिवाझ रिगलच्या बाटल्यांपैकी काही आम्ही त्याला आमच्या घरच्या कोणत्या तरी समारंभाच्या निमित्ताने भेट म्हणून पाठवाव्यात. त्या बाटल्या आमच्या घरगुती नोकराने त्या स्टेशन मास्तरला नेऊन पोहोचविल्या. त्याने विचारले- ''हे तुमच्याकडे कोणता धार्मिक कार्यक्रम होता म्हणून की काय ?'' ''हो असा असा कार्यक्रम होता,'' आमच्या माणसाने उत्तर दिले. तो स्टेशन मास्टर प्रचंड खूष झाला. त्याने व्हिस्कीच्या सर्व बाटल्या तर आनंदाने स्वीकारल्या आणि आम्हांला मनापासून धन्यवाद कळविले. दुसऱ्या दिवशी मी जेव्हा नेहमीप्रमाणे स्टेशनवर गेले तेव्हा मला विशेष सौजन्याची वागणूक तर मिळाली आणि इतका आदर मिळाला की जणू मी स्थानिक जहागिरदारीणच होते. हा संपूर्ण बदल पाहून मला आश्चर्य वाटले. आम्ही त्याचठिकाणी चार वर्षे राहिलो आणि त्यानंतर आम्हांला कोणतीच अडचण आली नाही. माझ्या यजमानांनी ज्या जास्तीच्या बाटल्या आणल्या होत्या त्यांचा अखेरीस खूप चांगला उपयोग झाला. या बाटल्या आम्ही दरवर्षी पाठविणे चालूच ठेवले. फक्त बाटल्या पाठविण्याच्या तारखा मात्र अधूनमधून बदलत राहिल्या कारण आम्ही त्यांची नोंद ठेवली नव्हती. त्याने मला विचारले की तुमचे सण वेगवेगळ्या तारखांना कसे असतात? मला त्याच्या प्रश्नाचे उत्तर ठाऊक नव्हते. मग त्यानेच मला सांगितले की त्याच्या एका भारतीय मित्राने त्याला सांगितले होते की भारतात सौर कालगणनेऐवजी चांद्र कालगणना प्रचलित आहे.

आधुनिककाळातील मुख्य कल्पना अशी की रोज काहीतरी नवीन मिळायला हवे. रोज काहीतरी बदल झाला पाहिजे. (कदाचित तुमच्या पत्नी किंवा मुलांमध्ये सुद्धा) कारण आधुनिक व्यक्तीला अगदी सहजपणे कंटाळा येतो. कदाचित इतके विविध पर्याय त्याला उपलब्ध असतात की त्यातून निवड करण्यातच त्याचा मेंदू थकून जातो आणि अखेर त्याला

जेव्हा हवे असे वाटत असते ते मिळते तेव्हा त्याच्या लक्षात येते की त्याला त्याही वस्तुंचा कंटाळा आलेला असतो. हे गुपित उद्योजकांस चांगले ठाऊक आहे. तो प्रथम खूप प्रकारचे पर्याय देऊन तुमचे लक्ष ओढून घेतो आणि नंतर जेव्हा तुम्ही पूर्ण कंटाळून जाता तेव्हा तुम्हांला निवडण्यासाठी जास्त-जास्त वस्तू निर्माण करतो. कारण एकाच पद्धतीने त्याला त्याच्या यंत्रांची रोजची भूक भागविता येते. तुमचा अहंकार कसा सुखावायचा आणि तुम्ही काहीतरी निवडू शकता हे सुचवून तुम्हांला काहीतरी स्वीकारायला कसे लावायचे हे त्याला माहीत आहे. उदाहरणार्थ तुम्हांला जर इंग्लंडमध्ये काही मालमत्ता विकायची किंवा विकत घ्यायची असेल तर अजिबात न सजवलेले आणि निगा न राखलेले व आहे तसेच सोडून दिलेले घर, एखाद्या चांगल्या सजविलेल्या आणि निगा राखलेल्या घरापेक्षा जास्त पैसे मिळवून देते. मुद्दा असा आहे की ज्या घराची निगा राखलेली नाही ते खरेदी करणाऱ्याच्या अहंकारास खतपाणी घालते कारण त्याला त्या घराची सजावट त्याच्या आवडीनुसार करायची असते. तर तुमच्यासाठी सर्वांत चांगले काय हे ठरविण्याचा निकष तुमची व्यक्तिगत आवडनिवड हाच असतो. पण ही निवड तुमच्या अहंकाराच्या भूमिकेवर अवलंबून असते आणि जर एखादा उद्योजक पुरेसा हुशार असेल तर प्रसारमाध्यमातून जाहिरातींच्याद्वारे किंवा खिडक्यांमधील सजावटीच्याद्वारे ग्राहकांना फसवून तो थोड्या वेळात खूप पैसे सहज कमावू शकतो.

एखादा जर उद्योजक राजकीय नेताही असेल तर अशी व्यक्ती व्यवहारात अत्यंत महत्त्वाची बनू शकते कारण त्या व्यक्तीची बुद्धी तीव्र असते आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिती त्या व्यक्तीस असते. मधल्या काळात ग्राहकाला मात्र वाटत राहते की त्याला निवडीचे महान स्वातंत्र्य आहे. तो विचार करतो, ''मी मला जे हवे ते निवडू शकतो. निवडीचा हक्क असणारा मी एक राजाच आहे.'' पण हळूहळू यासर्व निवडीमध्ये तो हरवून जातो आणि या सर्व निर्णयांच्या वरवरच्या पापुद्र्यावर राहिल्यामुळे अतिशय गोंधळून जातो. त्याला नेमके काय हवे आहे हे समजून घेण्यासाठी तो खोलात जाऊ शकत नाही. ''हे मला आवडते.'' हे जादूचे शब्द म्हणून तो असा समज करून घेतो की त्याला स्वतःचे असे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे की ज्यातून तो त्याची इच्छा ठामपणाने मांडू शकतो आणि जगात त्याचे स्वत्व टिकवू शकतो.

जेव्हा एखादी व्यक्ती या उद्योजकांच्या तालावर नाचू लागते तेव्हा त्याचे सर्व श्रम आणि शक्ती तो ग्राहकवादात वाया घालवतो. आपल्या धरतीमातेस अपवित्र करू लागतो आणि पर्यावरणविषयक समस्या निर्माण करू लागतो. दुर्दैवाने मनुष्यप्राणी स्वतःला कितीही महान समजत असला तरी ही तो भौतिकता निर्माण करू शकत नाही. तसेच, त्याला भौतिक

वस्तूंमधून जीवन निर्मिता येत नाही. जास्तीत-जास्त त्याला जे करता येते ते म्हणजे मृत भौतिक संपदेतून मृत भौतिक वस्तू बनविणे. अशा पद्धतीने त्यांच्या पिसाटलेल्या आणि अखंड नवीन फॅशन्स, नवीन वस्तू आणि नवीन अहंकार निर्माण करण्याच्या घाईतून धरती माता शिणून जाते. आपल्या गरजांपेक्षा जास्त खरेदी कोणीही करू नये. अगदी रोजच्या उपयोगासाठी सुद्धा आपण काही तरी भरीव, शहाणपणाचे आणि कलात्मक खरेदी केले पाहिजे.

फुशारकी मारण्याच्या नादात काही स्त्रिया आपली उंची सहा इंच अधिक वाढेल अशाप्रकारचे अणूकुचीदार टोक असलेले बूट खरेदी करणे पसंत करतात. अशा लहरीपणाने दिखाऊपणा करताना त्या क्षणभरही थांबून असा विचार करत नाहीत की त्यांच्या या लहरीपणामुळे अखेर त्यांचे घोटे किंवा कमरा लचकतील किंवा त्यांच्या पाठीच्या कण्यामध्ये फार गंभीर त्रास सुरू होईल आणि एक दिवस चालूही न शकल्यामुळे बिछान्यावर पडूनच त्यांना त्यांचे पर्याय निवडावे लागतील. जेव्हा तुम्ही बेदरकार उद्योजकांच्या डावांना बळी पडत असता आणि स्वतःया नाश करीत असता तेव्हा तुम्हांला जे आवडते ते करण्याचे आणि जे आवडते ते निवडण्याचे स्वातंत्र्य आहे असे मानण्याला फारसा अर्थ नसतो.

आधुनिक काळामध्ये उद्योजक आणखी एका मार्गाने ग्राहकांसाठी समस्या निर्माण करीत आहेत. पाश्चात्य देशांमध्ये फारच थोड्या लोकांना सोन्याच्या किंवा चांदीच्या वस्तू परवडतात. परंतु आश्चर्य म्हणजे विकसनशील देशांमध्ये प्रत्येक घरात चांदी किंवा सोन्याची काहीतरी वस्तू असते. याचे मला आढळलेले कारण असे की पाश्चात्य देशात प्रत्येक गोष्टीचे मोजमाप तिच्या रोख किंमतीतच केले जाते आणि म्हणून तुम्ही खरेदी केलेली प्रत्येक गोष्ट परत विकता येईल अशीच असावी लागते ती जर शुद्धतेचा छाप असलेली नसेल तर ती परत विकता येत नाही. तुम्हांला जर चांदीचा चमचा विकत घ्यायचा असेल तर तो शुद्धतेचा छाप असलेलाच हवा कारण तो चमचा वापरून नंतर परत विकला जाणार आहे. हा चमचा पुढे माझ्या मुलांकडे किंवा माझ्या नातवंडांकडेही जाऊ शकेल असा विचार कधीच केला जात नाही. हा शुद्धतेचा छाप असणे अतिशय महत्त्वाचे आहे आणि इतर कोणत्याही प्रकारची चांदीची वस्तू तुम्ही घेऊच शकत नाही. उदाहरणार्थ- तुम्ही थोडी स्वस्त चांदी घेऊन त्यात काहीतरी मिसळू शकता पण अशी वस्तू परत विकली जाणार नाही.

याउलट पाश्चात्य देशात वापरले जाणारे सोने हे सगळ्यात कमी प्रतीचे म्हणजेच नऊ कॅरटचे असते. हे ''सोने'' दागिन्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या खऱ्या सोन्यात खूपच कमी भरते. पण तुम्ही ते परत विकू शकता कारण त्याच्यावर छाप असतो. विकसनशील देशांमध्ये मात्र विशेषतः चीन आणि भारतात लोक २२ किंवा २४ कॅरटचे सोने वापरतात की ज्यामुळे त्यांच्या दागिन्यांमध्ये शुद्ध सोन्याचे प्रमाण भरपूर असते. जेव्हा वाईट दिवस येतात तेव्हा

दागिन्यांमधील कलाकुसरीला किंमत येत नाही पण निदान सोने विकता येते किंवा ते तारण ठेवून पैसे उभे करता येतात. तर तुम्ही जेव्हा काही खरेदी करता तेव्हा त्यातील विरोधाभास लक्षात घ्यावा लागतो. त्याविशिष्ट वस्तूमध्ये अधिक मूल्य कशाला आहे हे जाणून घ्यावे लागते. जर चांदी घ्यायची असेल तर त्यात काय मिसळले आहे हे तुम्हांला समजून घेतले पाहिजे आणि त्यातील शुद्ध चांदीच्या प्रमाणावरून त्याचे खरे मूल्य ओळखले पाहिजे. थोडक्यात जे काही खरेदी करायचे आहे ते भरीव असले पाहिजे आणि जेव्हा ते विकायचे असेल तेव्हा त्यातील मुख्य वस्तू काय आहे ते बघितले पाहिजे. पण परस्परविरोधी घटनांमुळे या वस्तू खरेदी करायच्या किंवा नाही हे समजत नाही कारण पारंपारिक सूज्ञपणा सांगतो त्यानुसार चांगल्या अरोग्यासाठी चांदी अतिशय महत्त्वाची आहे कारण ती हृदयाचे आरोग्य रक्षण करते आणि सोन्याचे महत्त्व त्याच्यावर डाग पडत नसल्याने आहे. रोज वापरायच्या दागिन्यामधून जर थोडेसे सोने वापरले तर काही अतिशय चांगले परिणाम साध्य होण्यात न कळत मदत कशी होते ते मी पुढे कधीतरी वर्णन करीन.

आधुनिकता आणि ग्राहकवादाच्या अनिष्ट परिणामांपासून बहुतांशी वाचलेल्या पारंपारिक संस्कृतींमध्ये भौतिक वस्तूंच्या सूक्ष्म गुणधर्मांचे ज्ञान आहे आणि त्यांच्याविषयी आदर ही आहे. हा विरोधाभास आहे की तथाकथित जडवादी समाजांमध्ये भौतिकतेविषयी अजिबात आदर नाही.

तुम्ही जर पश्चिमेतील एखाद्या आधुनिक घरात गेलात तर तुम्हांला प्लॅस्टिकच्या पुष्कळ वस्तू आढळतील. तुम्ही जर सोफ्यावर बसलात तर तो ही प्लॅस्टिकच्या बनलेल्या अनेक वस्तूंपैकी एक असू शकेल. जर तुम्ही टेबलावर जेवलात तर ते ही प्लॅस्टिकचे बनलेले असू शकेल. तुम्ही जर खिडकीला स्पर्श केलात तर तिची चौकट प्लॅस्टिकची बनलेली असू शकेल. प्लॅस्टिकपासून बनलेल्या वस्तूंमध्ये कापड किंवा काच किंवा इतर कोणत्याही दैवजात किंवा नैसर्गिक साहित्यात घुसण्याची क्षमता असते. हे प्लॅस्टिक इतके आत शिरते की नैसर्गिक साहित्य त्याचे मूळतत्त्व गमावते आणि त्याची विशिष्ट ऊर्जा नष्ट होते. स्वस्त असल्यामुळे प्लॅस्टिक मागून प्लॅस्टिक खरेदी करता येते आणि कोणत्याही घरात प्लॅस्टिकपासून बनलेल्या अनेक वापरून फेकून द्यायच्या वस्तू तसेच प्लॅस्टिकच्या मिश्रणापासून बनलेल्या टिकावू वस्तूही असतात. जेवणाच्या थाळ्यासुद्धा प्लॅस्टिकच्या बनलेल्या असतात. ते एखादी पितळाची छानशी थाळी पसंत करीत नाहीत ? प्लॅस्टिकच्या थाळ्यांच्या अनेक पर्यायांऐवजी हाताने बनविलेले काहीतरी ते का पसंत करीत नाहीत ? पृथ्वीमधील टाकावू वस्तूंपासून प्लॅस्टिक यंत्राने बनविलेले असते आणि म्हणून आपल्या विनाशाचे सर्व घटक त्यात असतात.

जर तुमच्याकडे हाताने बनविलेली कोणती वस्तू असेल आणि तिच्याविषयी अनावश्यक तक्रार न करता तुम्ही ती वापरत असाल तर तुम्हांला त्या वस्तूचा आनंद तर घेता येतोच पण त्याचबरोबर त्या वस्तूच्या उपयुक्ततेचाही आनंद घेता येतो. तुमच्याकडे जरी थोड्याच उत्तम बनविलेल्या आणि सुंदर थाळ्या असल्या तरीही तुम्हांला इतके समाधानी वाटते की आणखी थाळ्या विकत घेण्याची आणि तुमचा वेळ सतत दिखाऊ बाजारात वाया घालविण्याची इच्छा उरत नाही. मग तुम्ही खरोखर स्वतंत्र व्यक्ती बनता. पण तुम्ही जर फॅशनचे अनुकरण करत राहिलात तर पूर्ण दिवसभर तुमचा वेळ वाया घालविण्यात तुम्ही व्यग्र रहाल. तुम्ही कोणाच्या तरी घरी जाल आणि म्हणाल, "त्याला अमूक-अमूक वस्तू मिळाली आहे. ती खूप छान आहे." मग तुम्ही बाहेर जाल आणि तीच वस्तू खरेदी कराल कारण तुम्ही तिची निवड केलेली आहे. पण या सगळ्यात कोण कोणाशी खेळी खेळते आहे ? कोण नियंत्रण करते आहे ? अर्थातच उद्योजक आणि ते तुम्हांला आणि तुमच्या मुलांना बरबाद करीत आहेत. दूरचित्रवाणीवरील लहान मुलांच्या कार्यक्रमाच्या मुख्य वेळात त्यांच्या (उद्योजकांच्या) भुरळ घालणाऱ्या जाहिराती दाखविल्या जातात. "ही छान वस्तू खूपच कमी किंमतीत उपलब्ध आहे. वाढदिवसाच्या अस्वलांबरोबरच्या आणि वाढदिवसाच्या बाहुल्या." पण हे सगळे फक्त यंत्रे चालू ठेवण्यासाठी असते.

आपण आपल्या पर्यायांमधून निवड करण्याचा हक्क बजावून आणि ज्याची लहर लागेल त्या वस्तूवर आपले पैसे खर्च करून फक्त शोषण करणाऱ्या उद्योजकांच्या डावाला बळी पडत आहोत. कृपया हे लक्षात ठेवा की तुम्ही स्वतःला जेवढे ओळखता त्यापेक्षा उद्योजक तुम्हांला अधिक चांगला ओळखतो. हे ही लक्षात ठेवले पाहिजे की यंत्रे आपल्या सेवेसाठी आहेत आणि आपण यंत्रांच्या सेवेसाठी नाही. या यंत्रांच्याद्वारे होणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या अति उत्पादनास आपल्या खरोखरीच्या गरजा कारणीभूत नाहीत. पण अशा वस्तूंच्या अति उत्पादनामुळे जी पृथ्वीतील साधन संपदा कमी होते आणि कष्टपूर्वक मिळविलेल्या पैशांचा आपल्याला नको असलेल्या आणि आपल्यासाठी चांगल्या नसलेल्या वस्तू हट्टाने घेण्यासाठी सतत अपव्यय करून आपण स्वतःलाच त्रास करून घेत असतो. मी अनेक घरे अनेक प्रकारच्या भंगार वस्तूंनी भरलेली पाहिली आहेत आणि या भंगार वस्तू गोळा करण्यासाठी खूप परिश्रम करणाऱ्या या घरांच्या मालकांना हृदयविकाराचे झटके सहन करतानाही पाहिले आहे.

स्वातंत्र्य म्हणजे केवळ दिखावू आणि असंबद्ध निवडी करण्याची क्षमता ही फक्त अशाच लोकांची कल्पना असते की जे अनभिज्ञ आहेत किंवा रोज स्वातंत्र्याच्या बुरख्याखाली आपल्यासमोर उत्कट भावना आणि जबरदस्ती करणाऱ्याा सुप्त शक्ती

ओळखण्या इतके चाणाक्ष नाहीत. अर्थात प्रत्येकास कृतीचे आणि स्वतःच्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे पण हे स्वातंत्र्य कधीच अमर्याद असता कामा नये. काय करायचे आणि कोठे थांबायचे हे तुम्हांला ठाऊक असले पाहिजे. जर तुमच्याकडे अशी मोटार असेल की जिला गतिवर्धक (ॲक्सीलरेटर) आहे पण ब्रेकस् नाहीत तर वाहकाची अवस्था काय होईल ? त्याचप्रमाणे जर तुम्हांला स्वातंत्र्य हवे असेल तर तुम्हांला हे ही ठाऊक असले पाहिजे की तुमच्या लहरीपणाला एका मर्यादेत आवर घालावा लागतो.

साम्यवादी राजवटीत राहणाऱ्या काही लोकांचे स्वातंत्र्य अर्थातच आक्रसलेले असते पण हे आक्रसणे अर्थातच सक्तीचे असते. जेव्हा त्यांना मोकळे सोडले जाते तेव्हा तुम्ही बघाल की त्यांच्या इच्छा अतृप्त असतात आणि या इच्छा मुक्त देशातील लोकांच्या इच्छांपेक्षाही अधिक जोराने प्रकट होतात. म्हणून अशा मर्यादा अंतरमनातून आल्या पाहिजेत आणि त्यासाठी अध्यात्मिक् जागृती झालेली असली पाहिजे. म्हणजेच आत्म्याचे शहाणपण तुमच्या लक्षात यायला हवे. तुम्ही जर एखाद्या सहजयोग्याला विचारलेत- ''तुला काय आवडते ? तुला गरम वस्तू आवडतात का ?'' तर तो म्हणेल- ''मला आत्यंतिक टोकाची एखादी वस्तू वगळता आवडणारे किंवा नावडणारे असे काहीच नाही. जे काही आहे त्याचा मी आनंद घेत असतो. वस्तू निवडण्यात वेळ कोण वाया घालविणार ? जे काही उपलब्ध आहे त्याचा आनंद घ्या.'' पण अर्थातच जर ते अतिशय गरम किंवा अतिशय आंबट असेल तर त्यातील फक्त थोडेसेच खा. कारण ते आत्यंतिक टोकाचे आहे.

दुर्दैवाने, हा ''निर्णय'' प्रकार अधिकाधिक अतिरेकी स्वरुपाचा होतो आहे. (आपण पाहिले आहे तसे अगदी विवाहांच्या बाबतीत सुद्धा) पण अधिकाधिक पर्याय मिळविण्याची ही ईर्षा जरी अहंकारामुळे उत्पन्न होत असली तरी आत्मशक्तिने आटोक्यात आणता येते कारण जेव्हा ती तुमच्या लक्षात येते तेव्हा तुमच्या अनुभवाच्या आवश्यक सौंदर्याच्या परिसीमांच्या अनुभवाद्वारे तुम्हांला समजून घ्यायला ती मदत करते. म्हणून तुमच्या अहंकाराला भौतिक वस्तूंच्या लोभाचे प्रदर्शन करू देण्याऐवजी तुम्ही जडत्वातील दैवी सौंदर्याचा आस्वाद घेऊ लागता. किंवा आत्मसाक्षात्कार झालेल्या आत्म्याला ठाऊक असते की एखादी भौतिक वस्तू दुसऱ्या कोणाला तरी देण्याची जेव्हा तुम्हांला इच्छा होते तेव्हा त्यातील जडत्व तुमचे प्रेम व्यक्त करण्याचा एक सर्वात सुंदर मार्ग उपलब्ध करून देत असते. म्हणून तुमचे प्रेम असलेल्या अमूक-अमूक व्यक्तीसाठी हे चांगले असेल असा सुखद विचार तुम्ही काहीतरी सुंदर बघता तेव्हा तुम्हांला आतून स्फुरतो. उदाहरणार्थ- एकदा एक सभ्यपुरुष एका सहजयोग्यांबरोबर दुकानात गेला आणि त्याला एक कलेचा नमुना अतिशय आवडला पण तो नमुना त्याला खरेदी करता येत नव्हता कारण त्यावेळी

त्याच्याकडे पैसेच नव्हते. म्हणून त्याचा मित्र (की जो स्वत: सहजयोगी होता) नंतर परत त्या दुकानात गेला आणि तो विशिष्ट कलेचा नमुना त्याने खरेदी केला, काही काळ बाळगला आणि त्याच्या मित्राच्या वाढदिवसाला त्याच्याकडे पाठवून दिला. ही कळकळ आणि प्रेमाच्या प्रगाढ अभिव्यक्तीने तो दुसरा माणूस भारावून गेला आणि त्या कलाकृतीला किती सुंदर विचार जोडला गेला आहे हे पाहून तो दुप्पट सुखी झाला.

म्हणून आत्म्याच्या पवित्र दूरदर्शित्वाकडे लक्ष देण्याने एकीकडे तुमचा लोभ, स्वार्थीपणा गिळंकृत करण्याची ईर्षा आणि अतृप्त आत्म्यावर एकीकडे मर्यादा येतात तर दुसरीकडे कोणाला तरी खरोखर सुखी करण्यासाठी खरेदीस उपलब्ध असलेली कोणती तरी वस्तू अचानक तुमच्या आढळात येते आणि भौतिकत्वाचे खरे मूल्य तुम्हांला समजल्यामुळे तुम्ही तुमचे प्रेम व्यक्त करून दुसऱ्या कोणाच्या तरी जीवनाची गुणवत्ता उंचविण्यासाठी तुमच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा उपयोग करता.

# ३

# लोकशाही

—

अब्राहम लिंकनच्या महान उदयाने लोकशाहीची अद्वितीय व खरी संकल्पना अमेरिकेत प्रत्यक्षात आणली. त्याने स्पष्ट म्हटले होते की सरकार ''लोकांचे'' असले पाहिजे पण तरीही आज आपण बघतो की स्वत:ला लोकशाही म्हणवणाऱ्या बहुतेक देशांमध्ये प्रत्यक्षात ''राक्षसशाही'' आहे. या देशांमध्ये पैशाला हपापलेल्या किंवा सत्तेला हपापलेल्या लोकांचे राज्य आहे. लोकांच्या कल्याणाची तळमळ हे लोकशाहीचे खरे ध्येय असायला हवे पण आधुनिककाळात ते पूर्णत: विसरून गेले आहेत. जे लोक सत्तेचे धुरीण आहेत त्यांच्यासाठी लोकांचे कल्याण हा चिंतेचा विषय अजिबात उरलेला नाही. अनेकांनी असे मत मांडले आहे की अमेरिकेवर लोकांनी राज्य करणे संपले असून केवळ श्रीमंत, मोठे व्यावसायिक किंवा चित्रपटातील नट-नट्यांचे राज्य चालू आहे. हे त्यांचे मत पूर्णत: चुकीचे नाही. इतर विकसित देशांमध्येही हल्ली बँका, उद्योजक, प्रसारमाध्यमे आणि गुन्हेगारांचे राज्य आहे.

अशारितीने सर्व महान संत आणि महात्म्यांच्या कल्पनांप्रमाणे अब्राहम लिंकनची ही कल्पना पूर्णत: विकृत झाली असून लोकशाहीचे पर्यावसान पैशाच्या मागे लागलेल्या आधुनिक समाजात झाले आहे. जी काही उदात्त तत्त्वे सुरुवातीस घोषित केली होती ती सर्व जगभर लोकशाहीचे प्रश्न सोडविण्यासाठी भरविल्या जाणाऱ्या संमेलनांमधील हिंसक व वादावादीच्या चर्चांमध्ये नष्ट झाली आहेत. उच्च नैतिक मूल्यांची प्रस्थापना हे कोणत्याही लोकशाही देशात सर्वोच्च उद्दिष्ट परंतू दूर्देवाने आज तशी परिस्थिती नाही जोपर्यंत त्यांना पराभव स्वीकारणे भाग पडत नाही तोपर्यंत राजकारण्यांना ते चिकटलेल्या खुर्च्या सोडायची इच्छा नसते. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना सत्तेच्या नशेत रहायचे असते.

जेव्हा त्यांचा एक पाय स्मशानात पोहोचतो तेव्हाच ते राजीनामा देतात. अशा नीच पातळीचे लोक खरी लोकशाही चालवू शकत नाहीत. लोकशाहीसाठी तुम्हांला अतिशय उदात्त, माननीय, सुशिक्षित आणि सहृदय दूरदर्शी लोकांची गरज असते की ज्यांच्यामध्ये लोकांविषयी फक्त कल्याणकारी वृत्ती असते आणि ज्यांनी लोकशाहीच्या आदर्शांसाठी स्वत:ला पूर्णत: वाहून घेतलेले असते.

अब्राहम लिंकनने दर्शविलेली स्वच्छ आणि सदाचरणी लोकशाही चालवू शकणारे चारित्र्यवान लोक जेथे राज्य करतात असा अभिप्रेत लोकशाही देश कोठे आहे ? तिसऱ्या जगात की जेथे राजकारणी विकसित देशांचे अंधश्रद्धेने अनुकरण करतात तेथे ते लोकशाही मूल्यव्यवस्थेचे आणखीनच जास्त अवमूल्यन करतात. उदाहरणार्थ- भारतात सत्तेवरील लोकांना गरीबी समूळ नष्ट करायची इच्छा नाही कारण थोडेसे पैसे देऊन गरीब लोकांची मते ते विकत घेऊ शकतात किंवा ते अल्पसंख्यकांचे समर्थन करतात आणि त्यांचे लाड करून त्यांचा हुकमी मतपेटिका म्हणून उपयोग करतात. अशारितीने आपल्याला आढळते की या अविकसित देशांमध्ये गरिबीमुळे प्रत्यक्षात अशाप्रकारची "राक्षसशाही" चालवायला मदत होते.

जगात कुठेही लोकशाही सरकार खरोखर "लोकांचे प्राधान्याचे असणे सुरुवातीस अपेक्षित होते, पण आता मात्र ते कार्य-सूचीवरून पूर्णत: पसार झाले आहे.

उदाहरणार्थ स्वातंत्र्याचा पूरस्कर्ता असलेल्या अमेरिकेने विद्यमान अध्यक्षांच्या तत्कालिन धोरणास अनुरुप अशा कोणत्याही देशाच किंचित ही विचार न करता समर्थन केले आहे. असे करताना ज्याचे समर्थन केले आहे त्या देशाचे राज्य एखाद्या हुकूमशाही किंवा लोकशाहीबद्दल किंचित ही आदर नसलेल्या व्यक्तीच्या हातात आहे काय याचा अजिबात विचार केला जात नाही. उदाहरणार्थ, अमेरिका आणि स्वत:ला लोकशाही म्हणवणाऱ्या बहुतेक युरोपियन देशांनी सद्दाम हुसेनचे राज्य असलेल्या इराकला स्वत: निर्माण केलेली शस्त्रे विकली. अशारितीने अनेक लोकशाही देशांनी एकत्र येऊन त्याला खूप ताकदवान आणि युद्धास सुसज्ज बनविले कारण असे करणे त्यांच्या धोरणात बसत होते.

जेव्हा लोक खऱ्या अर्थाने लोकशाहीची तत्त्वे स्वीकारतात आणि नैतिक मूल्यांचा आदर करतात तेव्हाच खरी लोकशाही शक्य होते. जे लोक सत्तेला हपापलेले आहेत आणि काय वाटेल ते करून पैसे कमावू इच्छित आहेत त्यांना खरी लोकशाही समजली आहे असे म्हणता येणार नाही. जे लोक लोभी आहेत, चारित्र्यहीन आहेत आणि आत्मकेंद्री आहेत त्यांना लोकशाहीचे व्यवस्थापन करणे शक्य नाही. जे लोक राष्ट्रीय प्रश्नांना उत्तरे शोधताना दारू पितात, बायकांच्या आहारी जातात ते प्रत्यक्षात त्यांच्या देशासाठी आणि एकंदर जगासाठी प्रश्न निर्माण करतात.

राजकारणी लोक सर्वस्वी लोकांच्या कल्याणास समर्पित असले पाहिजेत पण ते कित्येकदा राजकारण हा बुद्धीबळाचा डाव बनतो. राज्य राहत नाही. जे प्रत्यक्षात दिसते ते असे की सत्तेवरील लोकांना नैतिक मूल्यांची अजिबात जाणीव नसते आणि ज्या लोकांची त्यांनी सेवा केली पाहिजे त्यांची अजिबात कदर नसते. व्यवसायातल्याप्रमाणे खूप पैसे मिळविण्यासाठी केलेली गुंतवणूक म्हणूनच राजकीय सत्तेकडे बघितले जाते. इतर कोणत्याही संतांप्रमाणे अब्राहम लिंकनची दृष्टी मूलभूत मूल्यांवर होती आणि त्याला हे माहीत नव्हते की लोकशाही इतक्या महान आदर्शासाठी लोक अजून तयार नाहीत आणि त्यांच्यापैकी बहुतेकांमध्ये सामूहिक कल्याणासाठीच्या सर्मपणाचा सरळ रस्ता सोडून स्वार्थाचा रुंद रस्ता पकडण्याची वृत्ती निर्माण होऊ शकेल. जे लोक सत्तेवर निवडून येतात त्यांच्यामध्ये सर्वांच्या कल्याणाची तळमळ आणि सेवाभावाने काम करण्याचे शहाणपण व वृत्ती असणे आवश्यक आहे.

तसेच पाहता सध्या जगात असे एकही सरकार नाही की जे खऱ्या अर्थाने लोकांचे, लोकांनी चालविलेले लोकांसाठी असलेले असे आहे प्रत्यक्ष चित्र असे दिसते की सत्तेवर असलेल्या लोकांना कुठेही नितीमत्तेची कदर आहे, आणि ते ज्यांच्यासाठी राज्यावर अहेत त्या लोका प्रति कुठलेही देणेघेणे त्यांच्या मनात नाही. राजकीय सत्ता सध्या केवळ पैसा मिळवण्यासाठी केलेली एक गुंतवणूक समजली जाते. इतर अनेक साधू सज्जनांप्रमाणेच अब्रह्म लिंकनच्या दृष्टीपथास केवळ आदर्श नितिमत्तेचाच विचार होता. त्याला हे लक्षातच आले नाही की सर्वसामान्य जनता अजूनही आदर्श लोकशाहीचा विचारही करु शकत नाहीत उलटपक्षी त्यांच्यामधल्या बहुसंख्य लोकांची प्रवृत्ती समर्पणाचा सरळ आणि अरुंद मार्ग स्वार्थ आणि स्वत:ची तुंबडी भरण्यातच मोठा रुंद कसा होईल ह्याचा विचार करण्यातच मग्न झाली आहे खरं म्हणजे ह्या निवडून दिलेल्या लोकांनी मुलत: सर्वांगीण प्रगतीचा विचार करणे आवश्यक आहे.

खरे पाहता साक्रेटिसने वर्णन केलेल्या प्रमाणे तत्त्वज्ञ राजा घ्या स्वरुपात असलेल्या लोकांचीच निवड जनहितेच्छू राजा म्हणून व्हायला हवी. सरकारच्या सर्वोच्चपदी अशाच माणसाची गरज आहे अशी व्यक्ती आत्यंतिक हुषार आणि उमदे व्यक्तिमत्व लाभलेली आणि पैसा, सत्ता, ह्या बाबत निर्मोही असावयास हवी. नजीकच्या भुतकाळातले महातमागांधी, केमाल पाशा, अन्वर अल सादात, लाल बहादुर शास्त्री, हो. ची. मिन्ह मार्टीन ल्युथर, किंग नेलसन मंडेला, मजबूर रहेमान इत्यादि लोक असेच होते.

सध्याच्या दिवसात राजकीय शहाणपणाच्या संदर्भात काही बोलणे विलक्षणच आहे. शहाणपणाच्या विचार करणे निरर्थकच आहे कारण त्या शहाणपणाची जागा खूप

दिवसापूर्वीच रुथ वास्तववादाने घेतली आहे. सध्या विश्वास ठेवला जातो तो मर्यादित एकेरी तर्क शास्त्रा वर आधारीत असलेल्या भ्रामक वास्तववादावर बुद्धीवादावर आणि हा बुध्दीवाद सत्तेवर असलेल्या अहमन्य लोकांचे वागणे योग्य कसे आहे हे दाखवायलाच मदत करतो अशा तऱ्हेने त्यांच्या विधानसभेवर, लोकसभेस सर्वत्र एकप्रकारचा नकारात्मक विचार सरणीचा बंधूभाव निर्माण होतो आणि ते सर्व एकमेकांना ह्या सर्व ठिकाणी मदतच करतात. अशा तऱ्हेने लोकांच्या विकासासाठी हे लोक काहीही करत नाही ह्या उलट ह्या लोकशाहीचा उपयोग सर्वत्र स्वार्थासाठीच केला जातो.

अशा तऱ्हेने ह्या लोकशाहीमध्ये स्वातंत्र्याचा अर्थ आपल्या सत्तेचा अमर्याद गैरवापर करणे ह्या अर्थानेच घेतला जातो. जणू कोणत्याही तऱ्हेच्या नैसर्गिक मर्यादा न पाळण्याचा, अमर्यादपणा करण्याचा त्यांना परवानाच मिळतो. आणि मग हे राजकारणी लोक पैसा मिळवण्याच्या आपल्या उद्योगात, सर्वसामान्य जनतेच्या हितापासून दूरवर पोहचतात आणि स्व:ताला असामान्य, श्रीमंत समजण्यातच धन्य समजात.

लोकशाही पद्धतीमध्ये अर्थातच लोकांच्या मताला खूपच महत्व येते. उदा जर स्त्रियांची गणना अधिक असली तर त्यांची विशिष्ट मते (विशिष्ट व्यक्तीला) राजकर्त्यांच्या, राजकारणी लोकांच्या दृष्टीने महत्त्वाची बनू शकतात हे राजकारणी जे फक्त सत्तेचाच विचार करीत असल्यामुळे अशा 'एक गठ्ठा' देणाऱ्या विभागातील मतदारांच्या कुठल्याही अवास्तव, अहंकारी मागण्या मान्य करण्याकडेच त्यांचा कल असतो. म्हणूनच स्विझर्लंड सारख्या अतीशीत देशातही स्त्रियांना अर्धनग्न (अपुरे, तोकडे कपडे) अवस्थेत रस्त्यांने हिंडण्यास कायदेशीर परवानगी मिळू शकते, प्रत्यक्षात सभ्यता आणि सारासार विचार त्यांनी आपल्या ला संपूर्णपणे झाकून घेण्याची आवश्यकता व्यक्त करतात. फ्रान्ससारख्या इतर काही देशात स्त्रिया आपला वेश्याव्यवसाय कायदेशीर पद्धतीने करु शकतात. त्या मतदानांतील मोठा हिस्सा असल्याने कोणीही त्यांना आडकाठी करत नाही, कारण त्याच कायदा बनवूशकतात म्हणून मतदानाचा अधिकार प्राप्त होताच तो किंवा ती राजकारण्याच्या दृष्टीने महत्वाचा घटक बनतात.

साक्रेटीसची जनतेची सेवा करण्याची, परोपकारी सदिच्छा आता कोठेही अस्तीत्वात नाही. उलट टीकाकार सक्रेटिसवर तो व्यवहारी माणूस नव्हता असाच आरोप करतात. अर्थात सर्वच संत व सज्जन लोक आदर्शवादीच असल्याने ते व्यवहारी नसताताच. सध्याच्या राजकारणातील बरेचसे राजकारणी हे जनतेच्याहातातील बाहुले बनतात जनतेमधील काही स्वार्थी लोकांना आपल्या मतदानाच्या ताकदीतील अर्थसत्ता फार लवकर लक्षात येते. त्यायोगे ते आपल्या सर्व काळ्या कृत्यावर सफेदी चढवू शकतात. दुर्देवाने ह्या चुकीच्या

समजुती लोकांच्या डोक्यात आता अगदी पक्या बसल्या आहेत आणि म्हणून कोणतीही भिती अथवा नितीमत्ता न बाळगता संपूर्ण लोकशाहीच्या मूळ तत्त्वालाच ते उध्वस्त करु पहात अहेत, आणि ही गोष्ट ते वर्षानुवर्ष सतत करू शकतात. जसे इटलीत घडले. जेव्हा दैवी शक्तीचा कायदा अस्तीत्त्वात येईल तेव्हाच त्यांचे कृष्णकृत्य उघडकीस येवू शकले. पण हे घडण्यापूर्वीच त्यांचे वागणे, ज्या लोकांवर ते सत्ता गाजवीत असतत त्यांच्यामते आदर्श ठरलेले असेल

मी मागेच म्हटले की जी प्रजासत्ताक राज्यकर्तांनी नमूद केल्याप्रमाणे जी त्यातील माणसे लोक कल्याणासाठी व देशासाठी झटतात निवडी बद्दल त्यांचे आत्मे प्रगत असतात. त्यांच्या कल्पना अब्राहम लिंकन सारख्या असतात किंवा त्यांच्या नितीमत्तेच्या कल्पना महात्मा गांधींप्रमाणे असतात. कदाचित आधुनिक नेत्यांचे तिरसट राजकीय धोरण असेच असावे की, खुशाल माणसांनी आपले अनैतिकेत आयुष्य बरबाद करावे, सरकारला कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करायचे काय कारण ? कदाचित म्हणूनच जो कोणी जनतेच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल प्रश्न निर्माण करतो त्याला जनमत मिळत नसावे. आधुनिक राजकारणी असे मानतात की जनतेला स्वत:चे आयुष्य बरबाद करायचे असेल तर त्यांना तसे करण्याचे स्वातंत्र्य आहे किंबहुना तो त्यांचा अधिकारच आहे मग राजकारणी लोकांनी त्यात का ढवळाढवळ करावी ? लोकसत्ताक पद्धती आणि कॅम्युनिझम, ह्यांच्या धोरणात ही गोष्ट समान आहे. जोपर्यंत मतदाते त्यांना सत्तेच्या सुखासिन आसनापासून हुसकावून लावत नाही (जिथे ते केवळ स्वत:च्या स्वार्थासाठीच चिटकून असतात.) तो पर्यंत त्यांना अत्यंत सुरक्षित वाटते.

परिणामी, ह्या आसुरी पैसालुटीच्या व्यवहाराबरोबरच इतर अनेक धोकेदायक व्यवहार सुरू होतात. उदाहरणच द्यायचे झाले तर, फ्रान्समधल्या सुरवातीच्या काळात एका अलिखित कायद्यानुसार घरातल्या स्त्रीला अर्धवेळ वेश्याव्यवसाय करण्यास परवानगी मिळे. कदाचित स्त्रियांनी कोणत्याही मार्गाने पैसे मिळविले तर चालतील ह्या विधानाशी ह्या विधानाची ही गोष्ट नाते सांगत असे.

असे म्हटले जाते की 'फ्रान्स' म्हणजे कॅथलिक चर्चची सगळ्यात मोठी मुलगी आहे. असे असताना अत्यंत वास्तववादी विचार करूनही ह्या अनैतिक गोष्टीचे समर्थन कसे करता येईल ? कदाचित मानसशास्त्रज्ञांनी लावलेल्या कायद्याच्या अर्थाचे आंधळेपणाने जशीच्या तशी स्वीकृती केली गेल्याचा हा परिणाम असावा. फ्राईडच्या तत्त्वज्ञानावर त्या काळात अविश्वास दाखविला जाऊ लागला होता व त्याचा फोलपणा उघडा पडला होता तरीदेखील मानसिक रुग्णांच्या हातून घडलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात विचार करताना सर्व

प्रजासत्ताक राज्ये फ्राईडच्या तत्त्वज्ञानाचाच आधार घेत होती पण फ्राईडच्या तत्त्वज्ञानाचा सूक्ष्म परिणाम सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीकोणावर, विशेषत: विकसित राष्ट्रातल्या लोकांवर अत्यंत विस्तृत प्रमाणात आणि भांबावून सोडणारा असाच होता. थोडक्यात फ्राईडच्या तत्त्वज्ञानाने पाश्चिमात्य संस्कृतीचे किती नुकसान केले हे एक समन्वये सांगणे तसे कठीणच असले तरी त्यात सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे फ्राईडच्या तत्त्वज्ञानाचा जनतेनी वेदवाक्यांप्रमाणे स्वीकार केल्याने सर्वसामान्य जनतेची स्वतची अस्मिता राखण्याची शक्तीच जणू नष्ट झाली. आणि आता तर सिनेमा, टेलिव्हिजन, व्हिडीओ ह्या सारख्या प्रसारमाध्यमांमुळे एकतर ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते, किंवा ती नाहीशी करण्याचा प्रयत्न केला जातो. ज्या सर्व सभ्यपणांच्या आणि अव्याभिचारीपणाच्या मूळ भावना पारंपारिक समाजात नैतिकता आणि वैयक्तिक कौटुंबिक सुखावर आधारित होत्या त्या सर्व विकसित देशात विध्वंसक पद्धतीत रूपांतरित झाल्या, कारण काही बुद्धीमंतांच्या मते आर्थिक प्रगतीसाठी असे घडणे आवश्यकच होते.

उदाहरणार्थ, मी नुकतीच वर्तमानपत्रात एका मुलीबद्दल बातमी वाचली. नुकत्याच तारुण्यात प्रवेश केलेल्या ह्या मुलीला नेहमी कॅब्रे आणि डिस्कोला जाण्याची सवय होती. एकाएकी मुलीच्या पालकांच्या असे लक्षात आले की तिला वेश्याव्यवसाय आवडू लागला आहे. सगळ्यात धक्कादायक गोष्ट अशी की त्यांचीही ह्या गोष्टीला हरकत नव्हती. जोपर्यंत ती गोष्ट कायदेशीर होती आणि ती मुलगी आपल्या चरितार्थासाठी वडिलांना भरपूर पैसे आणून देत होती. नंतर वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी ती मुलगी गुप्तरोगामुळे वारली. कदाचित अशा प्रकारचे वर्तन गरीब, अविकसित राष्ट्रात चालून जाऊ शकेल असे आपण म्हणू पण खरे पाहता गरीब आणि अविकसित राष्ट्रातले पालकच मुलांवर नैतिकतेचा दबाव जास्त आणत असतात. त्यांचा समाज पारंपारिक पद्धतीचा, नितिमूल्यांचा रक्षण करणारा असतो. म्हणूनच कदाचित दैवीशक्तीवर त्यांची नितांत श्रद्धा असते आणि पैशाच्या भ्रामक जाळ्यात ते सहसा सापडत नाहीत.

पण विकसित देशात, आपण रोजच्या वर्तमानपत्रात वाचतो की पालक स्वत:च आपल्या मुलांचा घात करण्याच्या योजना बनवित असतात. म्हणूनच ते त्यांना मद्यपानाला आणि धुम्रपानाला मज्जाव करीत नाहीत उलट मुलांच्या लैंगिक उत्सुकतेला खतपाणी घालतात, अत्यंत कोवळ्या वयातच त्यांना नको त्या प्रकारच्या सिनेमा, व्हिडीओ पाह्यला परवानगी दिली जाते. साहजिकच त्या कोवळ्या मुलांचा ....... सर्वसामान्य जनतेप्रती असलेला सन्मान आणि पवित्र गोष्टींबद्दलचा आदर ह्या गोष्टी विरून जातात. अशा समाजात परिपक्वतेची वाढ होणे अथवा परिपक्वतेबद्दल आदर असणे अशक्यच असते.

काही कुटुंबात तर आणखीनच वाईट गोष्टी घडताना दिसतात. तरुण मुलांना आपले स्वत:चे आयुष्य उध्वस्त करण्यासाठी का होईना पण आपले स्वातंत्र्य पूर्णपणे उपभोगायचे असते, अपरिपक्व वयातील मुलींना दिवस राहणे किंवा नकळत त्या गुप्तरोगाच्या शिकार बनणे ह्या सारख्या गोष्टींवर घरातील मोठी मंडळी किंवा समाज परिणामकारक रित्या बंधने लादू शकत नाहीत, साहजिकच एखाद्या तरुण सुंदर मुलीच्या स्वैराचाराच्या अध:पतनाला अप्रत्यक्षरित्या ते जबाबदार ठरतात. जणू मुलीच्या स्वैराचाराच्या स्वातंत्र्याला सुरवात ते करून देतात. ज्याचा शेवट अनाचारी वसाहतीतच होतो- एकाकडून दुसरीकडे-तिसरीकडे आणि शेवटी वेश्यागृहाच्या नरकात- !

आपण आपल्या भोवताली चाललेल्या सर्व गोष्टींचा स्वच्छ आणि ध्वनीत अर्थ लावण्याचे धाडस केले तर लक्षात येईल. ह्या लोकसत्ताक समाजात स्वनाशाच्या दिशेने सर्व गोष्टी घडत आहेत. केवळ स्वित्झर्लंड, नॉर्वे आणि डेन्मार्कमध्येच नव्हे तर सर्व विकसित देशातली तरुण पिढी आत्महत्येला प्रवृत्त होत आहे. ते सर्व मिळून घातक सवयींच्या दुष्टचक्रात सापडत आहेत. आपण हे समजूच शकत नाही की उच्च विकसित प्रजासत्ताक राज्यातली तरुण पिढी इतक्या सहजतेने चुकीच्या गोष्टींच्या, अमली पदार्थांच्या आहारी कशी जाऊ शकते. (शिवाय ह्या गोष्टी अगदी बरोबर आहेत असेच समजले जाते.) स्वत:च्या नाशास कारणीभूत होणाऱ्या अल्कोहल, समलिंगी संभोग ह्या वाईट सवयी त्यांना जडतातच कशा ? मद्यपान आणि आमली पदार्थांची नशा म्हणजे केवळ नरकाचे राज्य नव्हे काय ? तरी देखील जास्तीत जास्त माणसे त्यासाठी जणू रांगा लावून वाट पाहत आहेत. सर्व प्रकारच्या वर्णनाच्या पलिकडे असलेल्या लैंगिक विकृती शेवटी एड्स आणि तत्सम रोगाकडेच घेऊन जात असतात. सर्वांत खेदाची गोष्ट, तेव्हा हे लोक अत्यंत उद्धटपणे आपल्या समलिंगी संबंधाबद्दल प्रौढी मिरवतात तेव्हा त्यांना सन्मानाने वागवले जाते. एड्सने होणारा मृत्यू असाच धीरोदात्त समजला जातो. जणू एखाद्या महान सैनिकाला त्याच्या समाधीपर्यंत सैनिकी मानवंदना देत अखेरचा निरोप द्यावा. जागरूक माणसे असल्या विनाशकारी सवयींबद्दल, त्यांच्या योग्यतेबद्दल कोणताच प्रश्न कसा विचारत नाहीत ? खरं म्हणजे सर्व मनुष्यजात साध्या आणि सरळ सभ्यतेची काय निकड आहे हे जाणते आणि ती मिळावी ह्यासाठी प्रयत्न करीत असते. मग विकसित देशातला समाज इतका मलीन उध्वस्त झाला आहे की ही पायाभूत गरज ही त्याच्या हातून मारली जावी ?

त्यावेळी सुद्धा, जेव्हा हे लोक आनंद घेत असतात तेव्हाही ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते. उदाहरण, आधुनिक पॉप संगीताचेच घ्या ना, स्वानंदात मग्न होण्याच्या ह्या काळात सुद्धा ही तरुण मंडळी आपले नैराश्य आणि असुरक्षितपणाची भावनाच व्यक्त करतात.

आणि आपल्या स्वत:शीच असे घृणास्पद वर्तन करतात. जणू ते स्वत:चाच द्वेष करतात. स्वत:बद्दलच घृणा प्रगट करतात. काही करमणूककर्त्यांनी स्वत: पैसे मिळवण्याच्या हेतुने हे पॉप संगीत निर्माण केले. अत्यंत चातुर्याने माणसांच्या शबलस्थानांचे कौतुक करत त्यांनी सातत्याने तरुणपिढीला अशा उन्मादामध्ये ढकलले की जो उन्माद कधीच शांतता, सुसंगती आणि आनंद निर्माण करू शकत नाही. उलट अत्यंत अस्वस्थतेकडे घेऊन जातो आणि असामाधानाचे आणि निराशेचे एक असे वातावरण तयार होते की ते नाहीसे करण्यासाठी तरुण परत पॉप संगीताच्या दुसऱ्या गटाकडे वळतात, जे गट पैसा कमावण्यासाठी बनवलेलेच असतात. आणि अशा तऱ्हेने अपरिपक्व तरुण पिढी, जी स्वत:चा आंतरिक तोल आधीच विकृत विचारसरणीमुळे गमावून बसली आहे अशा तऱ्हेने एकीकडे त्यांना अशा भयाण एकांतात ढकलले जात आहे जिथे कोणतेच नातेसंबंध कुणी प्रस्थापित करू शकत नाही तर दुसरीकडे अत्यंत स्वच्छंदी, अस्ताव्यस्त हिंसाचाराने दुसऱ्याची शांतता ते नाहीशी करत आहेत. खरंच, भव्य, आदर्श प्रजासत्ताकाकडून आपण ज्या अपेक्षा करत आहोत, त्या ह्या आहेत ?

आधुनिक प्रजासत्ताकाचा उगम अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाला, पण जवळजवळ त्याच सुमारास शास्त्रीय प्रगतीमुळे औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. आपण असेच म्हणू शकतो की औद्योगिक आणि व्यावहारिक नितिमूल्येही औद्योगिक आणि तांत्रिक समाजाकडून प्रस्थापित केली गेली. तसेच पाहिले तर शास्त्र हे संपूर्ण वस्तुनिष्ठ आहे. त्याच्या आधारावर मानवी नीतीमूल्याचे नियम व कायदे कसे करता येणार ? शास्त्र म्हणजे स्वत:च्या नियमानुसार करून घेतलेले वस्तूज्ञान असामान्य व्यक्तींसारखे वस्तुला, त्याच्या प्रस्थापित गुणधर्माच्या विरूद्ध वागण्याचा अधिकार नाही. शुद्ध शास्त्रात जे शास्त्र अत्यंत वस्तुनिष्ठ समजले जाते, हा गुण अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. व्यावहारिक जीवनात तांत्रिक पद्धतीने त्याकडे दुर्लक्षच केले जाते. म्हणूनच औद्योगिकीकरण आणि व्यापार अत्यंत वस्तुनिष्ठ बनले आहे.

जेव्हा एखादे काम माणसाकडून त्याच्या स्वत:च्या कौशल्याच्या जोरावर केले जाते तेव्हा ते संपूर्ण मानवी उत्क्रांतीला धरून असते. काम आणि नैतिकता तेव्हा हातात हात घालून वावरत असतात पण जेव्हा तंत्रज्ञान आणि ज्याला आपण सध्या औद्योगिकता म्हणतो (जी खरे म्हणजे माणसाच्या फायद्यासाठी उत्पादक काम करण्यास वाहिलेली असते.) हे औद्योगिकीकरण कोणत्याही नैतिक मूल्यांच्या आधारे बांधले गेले नसल्याने कोणत्याही आंतरिक नैतिक मूल्यांची बांधिलकी पाळण्याची त्याला गरजच नसते. पण चुंबकीय ध्रुवशक्तीचा नियम येथेही कार्यरत होतो आणि म्हणूनच विकसित देशातल्या औद्योगिक

जगताचा कल आता दुसरीकडे झुकू लागला आहे. मानवी नैतिकता, धर्माची नितीमूल्ये आणि दैवीशक्ती ह्या सर्वांच्या पलिकडे जाऊन पोहचलेल्या अमर्याद अशा उद्योगनगरीच्या विकासामुळे सर्वत्र वाढत्या आर्थिकतेला एक प्रकारे खोलवर परतावा आला आहे. हे जणू काही असे आहे की ह्या सर्व उद्योगनगरीतल्या यंत्राची ती योग्य पद्धतीने चालावी म्हणून कुणीच काळजी न घेतल्याने सर्व यंत्रे कह्यात न रहाता स्वैरपणे चालू आहेत.

सरकार, व्याजदर वाढविणे वगैरे सारख्या कृत्रिम उपायांनी त्यांच्या आजारी उद्योगनगरीला ठिकाणावर आणण्याचा जरूर प्रयत्न करते. त्याचबरोबर पाश्चात्य राष्ट्रे जाहिरातींचा भरपूर मारा करून पूर्वेकडील अविकसित लोकांना, विशेषत: चीन व रशियामधील लोकांना आपल्याकडचा मंदीमुळे न विकलेला, जास्त झालेला माल विकत घेण्यास भाग पाडतात आणि पुन्हा एकदा ह्या तथाकथित विकसित राष्ट्र गरीब, अविकसित राष्ट्रांकडून स्वत:च्या स्वार्थासाठी अवाजवी फायदा उठवितात. सगळ्यात दुर्दैवाची गोष्ट ही दिसून येते की ह्या तथाकथित विकसित राष्ट्राच्या अध्यक्ष, राष्ट्रप्रमुखांकडूनही इंपोर्टेड वस्तूंच्या आकर्षणाखाली असलेल्या देशांना ह्या वस्तू विकण्याचा प्रयत्न करतात.

रशियामध्ये ज्या लोकांजवळ अगदी नगण्य अशी परकीय चलन असते अशा लोकांना कारण नसताना अमेरिकन, जर्मन वस्तू विकत घ्यायला भाग पाडले जाते. ही अनैतिकता आणि स्वार्थीपणाचा कडेलोटच नव्हे काय ? जागतिक मंदीमुळे स्वत:च्या राष्ट्रात खपला न गेलेला कचरा दुसऱ्या देशात, अगदी भारतातसुद्धा भरण्याचे कार्य हे लोक करत आहेत. पाश्चात्य राजकीय नेत्यांचे आणि मोठमोठ्या उद्योगपतींच्या भपकेदार दौऱ्यांद्वारे इतर देशांना आपल्या औद्योगिक मंदीच्या गोंधळी वातावरणात सहभागी करून घेण्याचे कार्य फार चांगल्याप्रकारे होत असते, हे असे किती दिवस चालणार ? ते सर्वच जण अशा मायावी गोष्टींचा पाठलाग करीत आहेत. तटस्थपणाने पाहणाऱ्या लोकांना आश्चर्य वाटेल की चुंबकीय ध्रुवाचा कायदा टाळून ही मंदी किती दिवस चालू शकणार आहे ? तुर्कस्थानचे उदाहरण बघा. त्यांच्याकडे उत्तम धान्य, उत्तम कपडे, उत्तमोत्तम दागिने, गालिचे आहेत की ज्या जर्मनीहून निर्यात केल्या गेल्या आहेत अशा तऱ्हेने जर्मन मुत्सद्यांनी तुर्की लोकांना आपल्या हस्तकौशल्यपूर्ण वस्तू आणि चवदार भोजनांपासून वंचित केले आहे. तुर्की माणसे जर्मन पाव आणि जर्मन सॉसेजेस खात आहेत. परिणामी तुर्की लोक आणखीन् गरीब होत आहेत आपल्या अत्यंत उष्ण हवामानाच्या देशात ते जिन्स् वापरत आहेत.

बहुतेक देशांनी आपल्या वाढत्या साम्राज्यवादाच्या योजनेतून अत्यंत निर्लज्जपणे आपल्या राज्यपद्धती सर्व देशात पसरवयाला सुरवात केली. अशा देशांत त्या लोकांच्या कत्तली करून, फसवून, नागवून हे देश श्रीमंत झाले, अशी कुमार्गाने मिळवलेली संपत्ती

त्यांनी अनेक दिवस उपभोगली. औद्योगिक क्रांतीनंतर ह्याच वसाहतींकडे त्यांनी कच्चा माल स्वस्तात मिळवून देणारा प्रदेश आणि मजुरांचा पुरवठा करणारा देश म्हणून तर पाहिलेच त्याचबरोबर ह्या वसाहती म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या मालासाठी आयती बाजारपेठ होतीच. पण आता औद्योगिकक्रांतीने चांगलेच मूळ धरले आणि भरपूर माल निर्माण होऊ लागला. हा अतिरिक्त माल, त्यांच्या स्वत:च्या देशातही खपू शकत नव्हता आणि त्यांनी निर्माण केलेल्या वसाहतीतही नव्हता. कारण त्या वसाहतींचे आता स्वतंत्र राष्ट्रात रुपांतर झाले होते. (ज्यांनी आपल्या देशात मिळणारा स्वत: कच्चा माल, आणि मजूर ह्यांच्या साह्याने स्वत:ची स्थानिक उद्योगनगरी निर्माण केली होती.) शिवाय त्यांच्याजवळ आधुनिक मशिनरीही असल्याने आपल्या तथाकथित जुन्या मालकांच्या तुलनेने स्वस्त माल ते निर्माण करू शकत होते. अशा तऱ्हेने ह्या अनैतिक आणि प्रतहीन उद्योगनगरीत निर्माण झालेल्या अतिरिक्त मालाला बाजारपेठ मिळणे दिवसेंदिवस कठीण होत गेले. आज बाजारात फारसे धुवायला न लागणारे, इस्त्री करायला न लागणारे भरपूर रोज वापरायचे कपडे दिसतात. हे कपडे श्रीलंका, तैवान, मलेशिया आणि इतर अनेक उष्णप्रदेशातील देशातली जनता मोठ्या उत्साहाने आणि आधुनिक फॅशन म्हणून वापरत असते, हे वास येणारे आणि रॅशन, पुरळ उठवणारे कपडे पाश्चिमात्य लोकांमध्येसुद्धा, फॅशन म्हणून वापरले जातात.

आणखी किती दिवस हे विकसित देश आपल्या विकसित उद्योगनगरीतल्या मालाच्या जोरावर अविकसनशील राज्यातल्या जनतेला मूर्ख बनवू शकतील ? वाढत्या उद्योधंद्यामुळे भांडवलदार व कम्युनिष्ट या दोन्ही देशातील लोक ऐहीकतेचे गुलाम बनलेले आहेत. या परिस्थितीचा गंभीर परिणाम म्हणजे मुख्यव्यवस्था सुद्धा वास्तववादीत नियंत्रीत केली.

(ह्या घटनांचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे मानवी स्तरांवरून विचार केल्या गेलेल्या मूल्यपद्धतीने ह्या अति वास्तववादाचा संकोच घडविण्यास सुरवात केली) तसाच विचार केला तर मानव हा उत्क्रांतीवादाचा अर्क आहे. आणि तोच ह्या सर्व अमानवी विश्वाचा मालक आहे. तरीदेखील वरवर पाहता असे दिसते की आधुनिक मानवाने अखिल मानवजातीचे एक नवे चित्र जगासमोर ठेवले आहे. ज्यामध्ये तो, त्याच्या स्वत:च्या देहाच्या, परिस्थितीच्या आणि त्याच्यात दडून बसलेल्या जनावरांच्या अंशाच्या अधिपत्याखाली गेलेला दिसून येतो. परिस्थिती इतकी बिकट बनली आहे की एखाद्याने नुसते मानवी मूल्ये, उच्च जीवन मूल्ये ह्या बद्दल बोलायला सुरवात केली तर त्याला वेडाच ठरवण्यात येते व त्याच्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. थोडक्यात माणूस किती मर्यादेपर्यंत परिस्थितीच्या आणि त्याच्या स्वत:मधल्या जनावराच्या विळख्यात सापडला आहे हे त्याला समजावून सांगणे कठीणच आहे. ह्या आधिपत्याचाच सखोल परिणाम म्हणजे मानवी

जीवनाचा लैंगिकता हा केंद्रबिंदु आणि त्यावर विचार करणाऱ्या फ्राईड सारख्या तत्त्ववेत्यांचा उदय होय !

खरंच ही परिस्थिती मानवावर काय म्हणून राज्य करते ? उत्क्रांतीच्या मार्गाने आपण अनेक पायऱ्या ओलांडून पुढे आलो आहोत तीला सत्य हे आहे की परिस्थिती आपल्या आयुष्याचा नैसर्गिक पाया आहे. आपण अचेतन परिस्थीत कधीच मागे टाकले आहे आणि सजीव जगात पाऊल टाकले आहे आणि हळूहळू प्रगती करत जनावरांचे जगही कधीच मागे टाकले आहे. भारतामध्ये तर हजारो वर्षांचे तत्त्वज्ञान वेद, उपनिषद आणि गीतेत मांडले आहे. हजारो वर्षांपूर्वीच मानव जीवनाचा उदात्त दृष्टिकोण अंगिकारून जगत होता. पण आधुनिक जगात मात्र ह्या सर्व गोष्टींचा ऱ्हास झालेला आणि अवनितीच झालेली दिसून येते. प्लनेट ऑफ द ॲपस ह्या सिनेमात दाखवलेच आहे की क्रांती उलट्या पावलाने चालू लागली की काय होते ? - अर्थातच अक्रांती !

आणखी महत्त्वाचे म्हणजे आधुनिक जगात झालेल्या दोन महायुद्धात शांततामय, सभ्य आणि चांगले जीवन जगणाऱ्या अनेक सर्वसामान्य लोकांची बेसुमार हत्या झाली. ह्या गोष्टींनी लोकांचा नैसर्गिक चांगुलपणा आणि नितिमूल्यांवरचा विश्वासच उडाला. ह्या आधुनिक युद्धांमधली सगळ्यात भयानक परिस्थिती म्हणजे लाखो स्त्रिया विधवा झाल्या आणि मुले अनाथ झाली आणि ही सर्व युद्धग्रस्त राष्ट्रे जणू लुळी पडली, केवळ औद्योगिकदृष्टीनेच नव्हे तर नैतिकतेच्या दृष्टीनेही ! ह्या भयानक संहारक अशा युद्धानंतर त्यांचे आयुष्य एखाद्या वांझ, नापिक जमिनीसारखे झाले- कुठल्याही तऱ्हेच्या विकासची आशा दृष्टीपथातही नसलेले भकास जीवन सर्वसामान्य माणसांना म्हणूनच नैतिक मूल्ये भिरकावून देऊन अंधश्रद्धायुक्त आणि अत्यंत कमी/नीच प्रतीचे जीवन जगणे सहज शक्य झाले. युद्धग्रस्त लोकांच्या बाबतीत आपण आजही ते पाहू शकतो. ह्या दिवसांत सांस्कृतिक जीवनावर जुन्या नितिमूल्यांची जागा तथाकथित आधुनिक ट्रेंडनी घेतलेली दिसते. गेल्या सत्तर वर्षापासून हळूहळू सर्वसामान्य लोकांची जाणीवेची पातळी खाली घसरली. एकूण परिस्थितीकडे अत्यंत शांतपणे व त्रयस्थपणे अवलोकन करणाऱ्यांच्या नक्कीच लक्षात येईल की जोपर्यंत आपण ह्या उच्चप्रतीच्या जागरूकतेकडे आणि नैतिकतेच्या मूल्यांकडे लक्ष देऊन त्या गोष्टी साधत नाही तोपर्यंत आपणच निर्माण केलेल्या ह्या परिस्थितीत आणि आपल्यामधल्या पाशवी जाणिवेत काहीच फरक पडणार नाही. त्याचबरोबर आपण स्वनाशही टाळू शकणार नाही.

आणि मग जरी प्रजासत्ताकचा अर्थ ह्या सर्व देशांमध्ये अत्यंत आनंदमयी, उत्साहवर्धक मानवी स्वातंत्र्य असा अभिप्रेत असला, तरी सध्या अत्यंत भयप्रद असा आंतर विसंवाद

निर्माण झाला आहे आणि ह्या सर्वांतून सहीसलामत बाहेर येणे खूपच कठीण आहे. ह्या सर्वांच्या पलिकडे प्रजासत्ताकचा 'स्वातंत्र्य म्हणजे फक्त मूलभूत अधिकार' असा चुकीचा अर्थ लावून इतरांची दिशाभूल केली जाते.

वास्तविक राज्य जे शहाणपणा आणि नेमस्तपणा ह्याच बरोबर जबाबदारीची आंतरिक जाणीव ह्या पायावर उभे असते ते जीवघेणी, द्वेषमूलक आणि अनैतिकता ह्याला परवानगी कशी बरे देईल ? खरे स्वातंत्र्य आपणास उच्चतम नैतिकता ओळखून ती विकसित करून, तिचा आपल्या स्वत:च्या विकासासाठी आणि संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी उपयोग करण्याची संधी देत असते.

पण, ह्या उलट आधुनिक प्रजासत्ताक राज्यात नैतिकता आणि सभ्यता ह्या संदर्भात कोणी साधे बोलायलाही तयार नसते कारण त्यांच्या मते हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असतो. वैयक्तिक सद्सद्विवेकबुद्धीचा असा विपरीत अर्थ लावला गेल्यामुळे प्रजासत्ताक देशातील सरकारची जनता आणि सरकार ह्यामध्ये नाते निर्माण करणाऱ्या स्वत:बद्दल आदर आणि हक्क ह्या दोन गोष्टींवरची जबाबदारी आपोआपच कमी झाली. म्हणूनच त्यांच्या लिखित कल्पना कितीही आदर्श असल्या तरी ते स्पष्टपणे अखिल मानवजात एकच जात आहे आणि हे सर्वजण एक आहे. ह्या गोष्टीवर विश्वास ठेवू शकत नाही आणि धर्मबाह्यतेकडे झुकणाऱ्या माणसाला नितिमत्तेच्या मार्गावरही आणू शकत नाहीत. जे खरे म्हणजे त्यांनी करण्याची नितांत गरज आहे.

ह्यासर्वात भर म्हणजे, जेव्हा राष्ट्राच्या जनतेविषयक नैतिकतेबद्दल प्रश्न निर्माण होतो तेव्हा दांभिकतेचा कळस गाठला जातो. जेव्हा एखाद्या उच्च श्रेणीचा मंत्री किंवा पंतप्रधान एखाद्या स्त्रीशी प्रेमसंबंध ठेवतो. जनतेसमोर सतत वावरणाऱ्या माणूस, म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. ह्या उलट भयावह पापाचरण सामान्य देशातील कुठलीही व्यक्ती कितीही स्त्रियांशी, कोणत्याही प्रकारच्या स्त्रियांशी अनैतिक संबंध ठेवू शकते. सामान्य लोकांचा ह्या बाबतचा दृष्टीकोण अगदी सरळ आहे. त्यांना सुधारण्याचे किंवा त्यांच्यावर टीका करण्याचे काहीच कारण नाही. त्यातून फ्राईडच्या बहुसंख्य मानवजातीला आपल्यापेक्षा नीच दर्जाच्या लोकांबद्दल सहानुभूती असते. ह्या 'जागतिक सत्याचा' हे लोक स्वसंरक्षणासाठी वापर करतात. तरीदेखील पंतप्रधान किंवा मंत्र्यांनी वेगळेच वागले पाहिजे. ते नैतिकतेच्या दृष्टीने परिपूर्ण असायलाच हवेत. हे स्पष्टीकरण आपण थोड्या फार प्रमाणात मान्य करूही. पण नितिमत्तेच्या दृष्टीकोणातून शिल्लक असलेला हा शेवटचा तथाकथित धागाही तसा कच्चाच आहे. कारण ह्या नितीमत्तेची मागणी एखाद्या व्यक्तीने समाजात कसेही वागू नये, एवढीच मर्यादित आहे. स्वातंत्र्याचा चुकीचा अर्थ घेतल्या गेल्याने काही

लोक इतरांना सल्ला देण्याच्या आपल्या इच्छेला आतल्या आत दाबून टाकतात, किंवा त्यांना लोकांच्या वैयक्तिक आयुष्यात लुडबूड करण्याची इच्छा नसते. अशा तऱ्हेने, लज्जा, शरम ह्या सर्व गोष्टी जणू आपण हरवून बसलो आहोत आणि लोकांचे वैयक्तिक जीवन सार्वजनिक होऊन, एकप्रकारे चुंबकीय शक्तीच्या कायद्यापासून त्रास सहन करीत आहेत.

सर्वसामान्य लोकांच्या मते प्रजासत्ताक देशात नितिमत्ता ही फक्त लोकांच्या नजरेसमोर असणाऱ्या नेत्यांनी जपण्याची गोष्ट आहे. इतरांनी सर्व आपण निवडलेल्या मार्गाने भले तो मार्ग त्यांना विनाशाकडेही नेऊन सोडत असो. जाण्यास स्वतंत्र आहेत. चुंबकीय शक्तीच्या कायद्याच्या वापराने, प्रजासत्ताक राज्यात वैयक्तिक स्वातंत्र्यामुळे सर्वांनी मिळून, थोड्या फार फरकांनी समजाचा नाश करण्याचेच योजिलेले दिसते आणि मुळावरच आघात करणाऱ्या ह्या गोष्टींसाठी काहीतरी मनापासून करावे असे कुणालाच वाटत नाही असे दिसते. फक्त पैशाच्या आणि शक्तीप्रधान धर्माच्या जोरावर थोड्या फार दयाळूपणाचा आव आणला जातो. इतकेच ! त्यांना कुणालाच समाजाच्या ह्या वेगाने होणाऱ्या ऱ्हासासाठी नितिमत्तेच्या व आर्थिक ऱ्हासासाठी, अध:पतनासाठी खरोखरच काही करावे असे वाटत नसते.

सध्या पश्चिमेकडे जे राज्यकर्ते निवडले गेले आहेत, ते कितीही स्वातंत्र्यवाद्याचा आव आणत असले तरी मुळात ते जातीयवादी किंवा मूलभूत सिद्धांतवादीच असल्या कारणाने ते सर्वजण कोणत्याही विकसनशील देशातल्या लोकांना किंवा त्यांनी निर्माण केलेल्या कोणत्याही उत्पादनाला आपल्या देशात येऊ देत नाही. भले तो माल कितीही चांगला व स्वस्त असू देत. इतकेच नव्हे तर ह्या गरीब देशाचा ह्या साम्राज्यवाद्यांनी स्वत:च्या फायद्याकरता बरीच वर्षे दुरूपयोग करून घेतला आहे. त्यांना खरोखरच अधोगतीला पोहचलेल्या लोकांच्या धोकादायक वळणदार आयुष्यावर कोणतेही नियंत्रण ठेवण्याची इच्छा नाही. इतकेच नव्हे तर जनतेद्वारे केलेल्या कुठल्याही सामाजिक चळवळीला अथवा उठावाला चेतावणी देण्यासही ते अजिबात उत्सुक नाहीत. फक्त जागतिक समाजापुढे आणि प्रसारमाध्यमांपुढे चुकीचे आदर्श ठेवण्याचे त्यांच्या मनात आहे. अशी माणसे स्वत:च्या शब्दशक्तीच्या जोरावर आणि इतरही अनेक आधुनिक युक्ताप्रयुक्त्यांनी प्रसिद्ध होत असतात, लोकांना गप्प करत असतात. पण जसे राजकारणी लोकांचे राजकारणातले स्थान सुरक्षित होते. तशी ही माणसे सर्वसामान्य लोकांची पर्वा करेनाशी होतात. उलटपक्षी कसेही वागण्याचे स्वातंत्र्य आपल्या मतदारांना देऊन ते जनतेची प्रौढी आणि शबलस्थान गोंजारण्याचाच प्रयत्न करत असतात. नितीमत्तेशी त्यांना काहीच देणे घेणे नसते. त्यांना आपल्याला सर्वसामान्य जनतेच्या रागाला आणि निराशपूर्ण वागणुकीला कधीच तोंड द्यावे लागणार नाही, ह्याची खात्री असते.

ह्या स्वहक्क निर्णयशक्तिचाच आणखीन एक भाग म्हणजे अत्यंत पशुतुल्य आणि वेडाचारयुक्त हिंसाचार होय. कारण लोकांना मुळी काय चुकीचे आहे ह्याची जाणीवच राहिलेली नाही. त्यांच्या मनात ह्या दुष्कृत्याबद्दल काही शिक्षा मिळू शकेल असा एक क्षणकाळही विचार येत नाही. देवदूतांची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉस एंजलीस शहरातली गोष्ट. मी गाडीने प्रवास करत होते. ड्रायव्हर मला खिडकी बंद करण्याची व डोके खाली करून बसण्याची सूचना करतच होता; मागल्या आठवड्यातच ११ लोक रस्त्यावरच्या गोळीबारात ठार झाल्याचे तो सांगत होता. मी त्याला गोळीबाराचे कारण विचारले. 'केवळ गंमत म्हणून' त्याने आपल्या अमेरिकन इंग्लिशमध्ये उत्तर दिले. जी माणसे दूषित दृष्टीकोणाचा स्वीकार आपल्या कुटुंबाकडून करतात आणि टेलिव्हिजन, व्हिडिओ, सिनेमा ह्या गोष्टी अत्यंत कमकुवत मनाने आणि खऱ्या समजू पाहतात. तीच माणसे केवळ गंमत म्हणून असला भयानक हिंसाचार करतात.

स्वातंत्र्याचा नावाखाली प्रजासत्ताक देशात कोणत्याही प्रकारचे भयानक बोलपट दाखविले जातात. जोपर्यंत असे चित्रपट नीट तपासले जात नाहीत. त्यावर योग्य ती टीका केली जात नाही. तोपर्यंत ते अत्यंत असभ्य अनैतिक आणि हिंसक कल्पनांचा प्रचार करतच राहणार. अशा प्रकारचे बोलपट हे लोकांना वर्तणुकीचे आदर्श म्हणून ठेवले जातात आणि अशा प्रकारचे हिंसाचार आणि क्रूर घटना आणि भयानक प्रसंग ह्याचे आपल्या समाजात प्रात्यक्षिक होऊ लागते. ही ह्या मागची खरी समस्या आहे. रात्रीची भयानक स्वप्ने आणि हिंसक दृश्ये ही आपल्या घरातून आणि शहरातून प्रत्यक्षात घडू लागतात. आणि जे तंतोतंत भयानकता निर्माण करू शकतात. त्यांना परीक्षकांकडून बक्षिसे दिली जातात. उदाहरणार्थ, मध्यंतरी एक चित्रपट खूपच प्रसिद्ध झाला होता. ह्या चित्रपटाची कहाणी एका नरमांसभक्षक वेड्यावर बेतलेली होती. फिल्मकडून जणू अशी मागणी केली गेली होती की नायक माणसांना कसे मारतो व कसे खातो हे दाखवून लोकांची करमणूक केली जावी. खरं म्हणजे कोणत्याही सुसंस्कृत समाजात असा चित्रपट निर्माण व्हायलाच नको आणि यदाकदाचित कोणत्या कारणाने तो निर्माण झालाच तर त्याच्यावर ताबडतोब बंदी यायला हवी पण असे तर झालेच नाही उलट टीकाकारांनी त्याची खूप प्रशंसा केली. त्यांनी फार तर ही एक वेगळी कहाणी आहे हे म्हटले असते तर चालले असते. फार तर एखाद्या माणसांच्या मेंदूतील काही अनाकलनीय गोष्टीमुळे, भुकेने मरत नसतानाही (जसे बोसनीयात घडले) मानवी देह खाण्याची इच्छा होतही असेल पण असा चित्रपट लोकप्रिय होऊ शकतो. त्याला भरपूर बक्षिसे मिळू शकतात ही खेदाची गोष्ट आहे. अर्थात ह्याचा अर्थ असाही नव्हे ही नकारात्मक घटना विध्वंसक दृष्टीकोण ह्याचा कलात्मक चित्रपटात विचारच करू नये. खरं म्हणजे

काही तरी समकालीन दाखविणे योग्य ठरेल. त्यातही आधुनिक काळातील देश. ऱ्हासाची कारणे एकोपा नष्ट होणे ह्या समस्यांचा विचार करणे ही उत्तम कल्पना होय. त्यातूनही निर्मात्याने समकालीन जगात ह्या समस्या कशा सोडविल्या जातात हे दाखविले पाहिजे. जर ते उत्तम कलाकार असतील तर ते जगातल्या उत्तम नितीमत्तेच्या संदर्भात कोणतीही गोष्ट दाखवू शकतील. अशी कोणती ही गोष्ट जी कोणत्याही वेळी कोणत्याही देशात मानवी कल्याणाचा आणि आनंदाचाच विचार करत असेल.

अर्थात असे करण्यात आणखी एक समस्या आहे. कलेचे प्रतिबिंब अगदी खालच्या स्तरावरही होऊ शकते आणि समकालीन समाजातील अत्यंत नीच तम अवस्थेचे प्रतिबिंबही कलेत पडू शकते जर तुम्ही समाजातील आत्यंतिक भ्रष्टाचाराचे एखाद्या घटनेचे चित्रीकरण केलेत तर माणसे विशेषत: पश्चिमेकडील माणसे फक्त खलनायकाने वापरलेली अत्यंत गलिच्छ भाषा आणि त्यांचा बेधडक दुष्टपणाच लक्षात ठेवतील आणि त्यांनी जे पाहिले त्याचेच अनुकरण करण्याचा प्रयत्न करतील. एकप्रकारे हा अटीबद्ध प्रतिसाद असतो आणि सगळ्यात दुर्दैवाची गोष्ट की ह्या बद्दल कुणालाच धक्का बसत नाही.

थोडक्यात औद्योगिक आणि स्वातंत्र्यांच्या क्रांतीनंतर, १८ व्या शतकानंतर पश्चिमेकडे जनतेची अशी धारणा बनली आहे की प्रत्येक चित्रपटातून पुस्तकातून, वर्तमानपत्रातून, जिथून जिथून, ज्या ज्या काही अधर्मी, अपवित्र, अमंगल, गलिच्छ कल्पना असतील. त्या त्या आपल्यात अंगिकृत करून घेण्यास आपण स्वतंत्र आहोत. आपले दुष्ट खलनायकांत रुपांतर करण्याचा जणू त्यांनी विडाच उचललेला आहे.

आता लोकांनीच स्वत:शी निश्चय करून ही स्वातंत्र्यांची घसरगुंडी थांबवायला हवी. काय करायचे हे त्यांचे त्यांनीच ठरवायला हवे. आपण स्वर्गात जायचे की नरकात जायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य त्यांना आहे. त्याचबरोबर त्यांच्यात वस्तुस्थिती ओळखण्याची आणि अखेरचा न्याय करण्याची प्रचंड ताकदही आहे.

कदाचित प्रथम वाचन करताना पाश्चिमात्य मूलतत्त्ववादींना ह्या गोष्टींचा प्रचंड धक्का बसेल काहींना जरूर धक्का बसेल पण बरेचसे दैवी-प्रेमाच्या जोरावर मिळवलेली दैवी ताकद आणि तिचा अर्थ नक्की समजू शकतील.

# ४

# जातीयवाद

—

मानवी आयुष्याला लाभलेला सर्वात दुर्दैवी शाप म्हणजे जातीयवाद होय. ह्या जाती माणसानेच निर्माण केल्या. सर्वसाक्षी परमेश्वराने जग निर्माण करताना अनेक प्रकार, अनेक रंग निर्माण केले ते फक्त जगात सौंदर्य निर्माण करण्यासाठी पण हे वैविध्य फक्त कातडी पुरतेच मर्यादित होते. असं म्हणतात की खूप वर्षापूर्वी ब्रिटनमधल्या काही सुपीक डोक्याच्या लेखकांनी आफ्रिकेतल्या काळ्या कातडीच्या लोकांबद्दल काहीतरी भयानक गोष्टी लिहिल्या . स्वतःला गोऱ्या कातडीचे म्हणवून घेणाऱ्या लोकांनी त्याला इतकी मान्यता दिली की गोऱ्या रंगाखेरीज इतर रंगाच्या माणसांचा संपूर्ण नाश करण्याचेच त्यांनी ठरविले. उदाहरणार्थ कोलंबस अमेरिकेत चुकीनेच गेला. पण स्पॅनीश राज्यकर्त्यांनी तिथल्या आदिवासी रेड इंडियन्सला हाकलून लावून आपले राज्य तिथे स्थापिले. अर्थात त्यातल्या काही आदीवासींनी उंच पर्वतराजीत स्वतःला लपवून प्राण वाचविला खरं म्हणजे जो देश दुसऱ्या कोणाच्या मालकीचा आहे, तेथे हे लोक आपला पाय कसा रोवतात हे समजण्याच्या पलिकडचेच आहे. खरोखरच नविन जमीन शोधून काढणे हे धाडसाचेच काम आहे पण ह्या शोधकांनी नंतर शोधून काढलेली जमीन आपल्याच मालकीची समजण्यास सुरवात केली. इतकेच नव्हे तर ज्यांची कातडी आपल्या सारखी गोरी नाही किंवा खूप काळी आहे अशा लोकांचा द्वेष करणे किंवा त्यांना ठार मारणे हा ते आपला जन्मसिध्द हक्क समजू लागले. त्यांची जमीन हिसकावून घेवू लागले.

शरीराचे, चेहऱ्याचे आणि रंगाचे वैविध्य ही गोष्ट निसर्गाने खूप जाणीवपूर्वक निर्माण केली आहे. नाहीतर सगळेजण सारखेच दिसले असते. एका छापाच्या माणसांच्या तुकडीला पाहणे किती कंटाळवाणे झाले असते? दुर्दैवाने काळ्या लोकांना प्रतिगामी समजले जाऊ

लागले आणि गोरे लोक सुधारणावादी! खरं म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी दुजाभावाने वागणे हा अेक असह्य उध्दटपणा आहे. खरं म्हणजे सर्वांनाच समान हृदय आहे. भावना आहेत, हावभावही सारखेच आहेत. प्रेम किंवा द्वेष व्यक्त करण्याच्या पध्दतीही अेकच आहेत. ते सर्व अेकाच प्रकारे हसतात व त्यांचे रडणेही सारखेच असते. ज्या देशात काळे लोक जन्माला आले तो खरं म्हणजे त्यांचा स्वतःचा देश हवा ते आदीवासी असतील, मागासलेलेही असतील, पण ते परके नाहीत. बंदुकीच्या जोरावर कोणत्याही गोऱ्या माणसाला त्यांच्या जमीनीवर ताबा मिळवण्याचा अधिकार नाही. विशेषतः ते जेव्हा निःशस्त्र असतात. काळ्या लोकांना जेव्हा गुलाम म्हणून वागविले जाते तेव्हा गोऱ्या लोकांच्या दुष्टपणाची हद्दच होते. कबूल की सध्या गुलामगिरीचा नाश झाला आहे. तरीही वसाहतवादी गोरे आपल्या ताकदीचा वापर करुन गरीब आणि साध्या जनतेचा न सांगता येण्यासारखा अपमान अजूनही करतात. त्यांचा अजूनही अनन्वीत छळ होत आहेच. जर आफ्रिका, आशिया आणि लॅटीन अमेरीकेतील वसाहतवाद्याच्या राज्याचा खराखुरा इतिहास लिहिला गेला. अत्यंत तटस्थपणे लिहिला गेला तर गोऱ्या राज्यकर्त्यांच्या काळ्याकुट्ट गुन्ह्याच्या कहाण्या वाचून सर्वसामान्य लोकांना धक्काच बसेल. भारतात जेव्हा ब्रिटीश राज्य करीत होते. तेव्हा मी स्वतः ह्यातील काही गोष्टी अनुभवल्या आहेत. ब्रिटीश भारतात कोणत्याही अेंट्रीपास किंव 'व्हिसा' खेरीज आले आणि सुमारे तिनशे वर्ष ते तिथे राहिले आणि आता योग्य ते कागदपत्र बरोबर घेऊन अेखादा भारतीय जेव्हा 'युनायटेड किंगडम' मध्ये प्रवास करतो तेव्हा विमानतळावर ज्या पध्दतीने इमिग्रेशन ऑफिसर त्याला प्रश्न विचारतो ती पद्धत केवळ भयानकच असते. माझा पासपोर्टमी अेका ज्येष्ठ राजकारणी व्यक्तीची पत्नी असल्याने 'राजदूत' श्रेणीतला आहे. तरीदेखील केवळ मी गोरी नाही, भारतीय आहे ह्या अेकमेव कारणाने मला अत्यंत उध्दट व अपमानकारक प्रश्न विचारले गेले. अेकदा तर कोणतेही कारण नसताना त्यांनी माझी अंगझडती देखील घेतली. हा केवळ निरर्थक वर्णद्विष नव्हे काय? गौर वर्णाचे लोक असेच समजून चालतात की त्यांच्यापेक्षा कमी गोरा वर्ण असलेल्या लोकांशी उध्दट वागण्याचा, त्यांचा अपमान करण्यांचा, त्यांना दैवी अधिकारच आहे.

अमेरिकेत तर सर्वात मोठी सामाजिक समस्या वर्णविद्वेषाची आहे. ज्या पध्दतीने राज्यकर्ते आणि सामान्य जनता काळ्या लोकांशी वागते ती केवळ चुकीचीच नव्हे तर अत्यंत पापी आहे. अब्राहम लिंकन सारख्या थोर व्यक्तीने ह्या पापी वर्तनाला कंटाळून कायद्याने वर्णविद्वेष नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण हा कायदा फक्त पुस्तकातच राहिला. आणि गोऱ्या व काळ्या लोकांचे दंगे वारंवार घडू लागले. संपूर्ण राज्य ह्या टोळीयुध्दाच्या भयग्रस्त वातावरणात जगू लागले. अगदी खेडोपाडीही त्याच टोळीयुध्दाचा भयावह परिणाम दिसू

लागला. ज्यांनी ह्या वर्णविद्वेषी हिंसाचाराची बीजे पेरली होती. त्यांनाच ह्या हिंसाचाराची फळे चाखायला लागली. ज्या हिंसाचारात अगदी तरुण कोवळ्या मुलांचाही सहज सहभाग असतो. अर्थात प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असतेच. पण वर्णविद्वेषाच्या ह्या हिंसाचाराने इतके पराकोटीचे टोक गाठले, अत्यंत अन्याय्य पध्दतीचा हा हिंसाचार पाहून गोऱ्या आणि काळ्या लोकांमध्ये काही सलोख्याचे नाते निर्माण होवू शकेल ही गोष्ट अशक्यप्रायच वाटू लागली खरं म्हणजे गोऱ्या लोकांमध्ये थोडाफार सूज्ञपणा असेल तर त्यांच्या लक्षात येईल की काळे लोक अनेक बाबतीत त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. उदाहरणार्थ काळ्या इतके चांगलेगाणे गोरे लोक गाऊच शकत नाहीत. त्यांना तालसुराची दैवदत्त देणगी मुळी नसतेच. मी पहिले आहे की काळ्या लोकांच्या प्रेतयात्रेसमोर बँड वाजविला जातो आणि यात्रेतले सहभागी दुःखी अत्यंत तालबध्द, नृत्यसदृश्य पावले टाकत रस्त्याने जात असतात. त्यांना समजून घेण्यास आणि त्यांचे कौतुक करण्यास तुम्हालाही तितकेच मनाचे लवचिक व्हायला हवे, म्हणजे तुमच्या लक्षात येईल की किती चांगल्या तऱ्हेने ह्या दैवी देणगीचा उपयोग करुन ते देवाची प्रार्थना करतात. काळ्या व्यक्तीमध्ये जे खेळाच्या संदर्भातले कौशल्य आहे. ते कुणीही मागे टाकू शकणार नाहीत. ज्या खेळात ताकदीची आणि शारिरिक क्षमतेची गरज असते अशा सर्व खेळात इतर कोणापेक्षाही काळे लोक जास्त कौशल्य दाखवितात. बास्केटबॉल व बेसबॉलमध्येही ह्या काळ्या लोकांनी आपले वर्चस्व सिध्द केल्याने गोऱ्या लोकांना आपल्या टीममध्ये त्यांना सामावून घ्यावे लागले. वर्णद्विषापासून मुक्त झालेल्या खेळातल्या ह्या दृष्टीकोणाचा सर्वत्र समाजात का प्रसार होवू नये? सर्वश्रेष्ठ गायक म्हणून जगात काळे लोक मान्य पावले आहेत. काही गोरे लोकही त्यात यशस्वी होत असतील पण ते भारतामधल्या वसंतागमनाचे गीत गाणाऱ्या कोकिळेची आठवण करुन देणाऱ्या मधुर आवाजाच्या आणि अत्यंत तालबध्द गाणाऱ्या काळ्या पाश्चिमात्य, कधीही हरवू शकत नाही. इतर सर्व पक्षांशी तुलना करता कोकिळही अत्यंत काळा असतो. वसंतामध्ये कोकिळ मधुर गीत गायला सुरवात करतो. बागेमध्ये वसंत फुलल्याची ती जणू घोषणा असते. पण पक्षामध्ये असा काळागोरा भेद असल्याचे तुम्हाला जाणवणार नाही. सर्व तऱ्हेचे रंगीबेरंगी पक्षी अत्यंत सुखाने बागेत रहात असतात.

जगातल्या सर्व लोकांना माहीत आहे की कोणत्याही स्त्रीला बाळंतपणाच्या वेदना सारख्याच येतात. मग भले ती गोरी असो काळी असो की भुरी. अत्यंत खालच्या दर्जाचा हेतू मनात धरुन रंग, वर्ण ह्याचा भेद लोकांनी निर्माण केला आहे हे अेक अैतिहासिक सत्य आहे. ही मानसिकता गोऱ्या वर्णाच्या लोकांच्याच मनात निर्माण झाली. स्वतःला अति शाहणे समजणाऱ्या गोऱ्या लोकांच्या! आणि ही अत्यंत मुर्खपणा मानसिक चळवळीने

अवघ्या जगात अेक गंभीर समस्या उभी केली. आपण जर कोणत्याही तऱ्हेच्या कृत्रीम मानसिकतेकडे लक्ष न देता पाहिले तर कोणतीही आई किती प्रेमाने मुलाला जन्म देते हे पाहण्यासारखे असते. त्यांच्यापैकी काही जणींना बाळंपणाचा तो काळ अत्यंत वेदनामय असतो. पण ज्या क्षणी मुलाचा जन्म हातो. त्याक्षणी सर्वसामान्य आया, मग त्या कोणत्याही रंगाच्या असू देत, आत्यंतिक प्रेमाने काठोकाठ भरुन येतात, बाळाच्या जन्मकालच्यावेदनेचा त्यांना विसर पडतो, बरे असेही नाही ना की गोऱ्या वर्णाची माता मुलाला आपल्या नाकाद्वारे अथवा मुखाद्वारे आपल्या मुलांना जन्म देते. सर्व आया अेकाच पध्दतीने मुलांना जन्म देतात. त्यांना सारख्याच प्रकारे गर्भधारणा होते, त्या बाळंतही अेकाच प्रकारे होतात उलट दुर्दैवाने काळ्या कुटुंबात आपल्या मुलांबद्दल जी प्रेमभावना दिसून येते ती गोऱ्या कुटुंबात दिसत नाही. विशेषतः भारतीय माता ज्या पध्दतीने आपल्या मुलांवर प्रेम करते त्याची तुलना गोऱ्या जगात कोठेही होवू शकणार नाही. भारतीय आपली मुले शिस्तीत वाढवितात ह्यात शंकाच नाही. पण त्यांचे आपल्या मुलांवरचे प्रेम ही महान गोष्ट आहे.

माझ्या दिल्लीतल्या घरी माझ्याकडे अेक धोबीण होती. तिला ९ मुले होती. त्यातली काही बऱ्यापैकी मोठी होऊन तिला धंद्यात मदतही करत हाती तर त्यांच्यापैकी काही खूपच लहान होती. शेवटचा फार तर दोन वर्षाचा असेल तो घरात रांगत असे. त्याची तिला कोणत्याही प्रकारे मदत होणे शक्यच नव्हते. उलट तिला आपला बराचसा वेळ आणि ताकद त्याच्यासाठी खर्च करावयास लागे. पाश्चिमात्य देशातली कोणतीही आई कंटाळलीच असती. अेके दिवशी हे लहान मूल तिने आणि तिच्या नवऱ्याने स्टार्चकरण्यासाठी गरम करुन ठेवलेल्या पाण्याच्या मोठ्या टिपात पडले. त्यावेळेस मी दिल्लीत नव्हते. मी परतल्यावर मला त्या स्त्रीची हृदयद्रावक कहाणी कळली. मी त्या धोबीणीला बोलावल्यावर ती आली तेव्हा ती सतत रडत होती आणि अेका महिन्यात ती खूपच बारीक झाली होती. अेरव्ही ती खूप हसतमुख आणि धट्टीकट्टी हाती. मी तिला बसायला सांगितले, तिचे सांत्वन केले व मुल आता गेलेआहे आता रडू नकोस म्हणूनही सांगून पाहिले. ह्या घटनेला खरं म्हणजे अेक महिना होऊनगेला होता पण ती काहीही न बोलता फक्त रडत होती. सुमारे ६ तास ती माझ्याकडे होती. पण तिचे रडणे थांबले नाही. सगळ्यात गंमत म्हणजे तिच्या सगळ्या मुलांमध्ये हे मूल तसे काळेंबेंद्रेच हाते. तिची मोठी मुले बऱ्यापैकी उजळ होती पण हे अगदीच काळे! जेव्हा मी तिला रडताना पाहिले तेव्हा मला आपल्या सर्व लेकरांवर सारखेच प्रेम करणाऱ्या आदिमायेचीच आठवण झाली.

मागे मी कोलंबियाला गेले होते तेव्हा माझ्या असे लक्षात आले की तिथले लोक अध्यात्मिक उद्धार ह्या गोष्टीकडे खूप चांगले लक्ष देतात. वेगवेगळ्या पध्दतीच्या मातीच्या

आकृत्या आणि आकाराद्वारे त्यांनी ह्याचा शोध लावला. ते ज्या सांकेतिक पध्दतीने त्यांची ही जागरुकता व्यक्त करतात ती खूपच नवलाची वाटते. जी दैवी ताकद मिळते त्याबद्दलही आश्चर्य वाटते हे ज्ञान त्यांना कसे मिळाले ह्याचे कुठलेही स्पष्टीकरण ते करु शकत नाहीत. हजारो वर्षापासून हे सूक्ष्मज्ञान त्यांच्याकडे आहे. भले गोरे लोक त्यांना प्रतिगामी आदिवासी समजोत.

गरुड पक्षी ही त्याच्या जहाज व्यवसायाचे चिन्ह. मी जेव्हा त्यांना गरुड पक्षी त्यांच्या जहाज व्यवसायाचे प्रतिक असल्याचे कारण विचारले तेव्हा त्यांनी मला जे सांगितले त्याने मला खूपच आश्चर्य वाटले. त्यांच्या पुर्वजांनी त्यांना विष्णु नावाच्या देवतेबद्दल सांगितले हाते. जी देवता त्यांच्या देशात भारतातून, माझ्या देशातून गरुडावर बसून आली होती. माझ्या पत्नींनाही ते अैकून आश्चर्य वाटले की आपल्या देशातल्या देवाबद्दल विष्णूबद्दल ते कसे काय बोलत आहेत. आपल्या पुराणात देखील विष्णूचे वाहन गरुडच सांगितले आहे. ज्यांने आम्हाला हे सांगितले तो फारसा शिकलेला नव्हता. पण त्याला आपल्या देशातल्या तत्वज्ञानाबद्दल आणि संस्कृतीबद्दल बरेच काही माहीत होते. माझ्या असे लक्षात आले हे सर्वच लोक खूप अतिशय दयाळू, सभ्य आणि सुसंस्कृत आहेत. ज्यापध्दतीने ते आपल्या सुसंस्कृतपणाचे दर्शन करतात. त्यागोष्टी त्यांच्याकडे गोरे लोक अमेरिकेत पोहचले. त्याच्या कितीतरी आधीपासून अस्तित्वात होत्या. उदाहरणार्थ ते तुम्हाला पाणी देताना ग्लास डाव्या/ उजव्या हातात दोन्ही हाताने पकडतात जसे आपण भारतात करतो. अेका हाताने ग्लास पकडणे हे उध्दटपणाचे लक्षण मानले जाते. मला अशा अनेक गोष्टी तेथे आढळल्याकी ज्या वागण्याच्या पध्दती भारतातही सुसंस्कृतपणाच्या मानल्या जातात. ते अत्यंत निरागस, साधे लोक आहेत. दऱ्याखोऱ्यात खूप दिवस लपून राहिल्याने त्यांचे चेहरे मंगोलियन झाले आहेत आणि त्यांचे चेहरे मोहरे कोणत्याही कृत्रीम उपायाखेरीज अतिशय सुंदर दिसतात. अत्यंत शुध्द आणि सरळ हृदयाची माणसे आहेत जी बोलीवयाच्या उंच डोंगरातून राहतात. सुदैवाने अध्यात्मातील काही सूक्ष्मपध्दती जाणून घेण्यासाठी त्यांच्यापैकी काहींना मी खूप जवळून अभ्यासले.

लॉस अेंजालिन्स मध्ये तेथे राहणाऱ्या काही अदीवासींना अतिशय त्रास देण्यात येत होता. कारण खूप दिवसांपासून त्याच्याकडे काही जमीन होती आणि ती आता परत हवी होती. मी त्यांना विचारले त्याजमीनीत असे काय विशेष आहे? आख्खी अमेरिका पडलेली असून तुम्हाला ह्या जमीनीचे काय पडलेआहे? ही एक पवित्र भूमी आहे. ज्या भूमीत साग ही पवित्र झाडे उगवली आहेत. आम्हाला हे खूप दिवसापासून माहित आहे की ही आमची पवित्र भूमी आहे जिच्यावर दर महिन्याच्या ठराविक तारखेला आम्ही प्रार्थनेसाठी जातो.

शिवाय सर्व अमेरिकेतून वर्षातून अेकदा त्या सर्वसाक्षी परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी सर्व रेड इंडियन्स येथे जमतात. दुर्दैवाने ही जमीन अेका अत्यंत श्रीमंत भारतीयाने ज्याची सर्व जगातच श्रीमंत जात असते अशा एकाने बळजबरीने हिसकावली होती. ते मला म्हणाले तुम्ही भारतीय आहात. अत्यंत सुसंस्कृत देशातल्या आहात तुम्हाला आमच्या भावना समजू शकतात, तुम्ही त्या भारतीय माणसाला समजावून सांगा की ही पवित्र भूमी लाखो लोकांच्या प्रार्थनेसाठी आहे. ती तशीच राहू द्या. अर्थातच त्या लोकांना हे माहीत नव्हते की परदेशात राहणारे काही भारतीय फक्त पैशाचे पुजारी बनले आहेत. ते त्यांचे पुरातन मूळ आणि संस्कृती पार विसरुन गेले आहेत, मूळापासून उखडले गेले आहेत. उदाहरणच सांगायचे तर इटलीमधील भारतीय आपापसात देखील कोणतीही भारतीय भाषा बोलत नाहीत. मी पुरते जाणूनहोतेकी हा भारतीय माणूस त्याने अमेरिकन सरकार कडून विकत घेतलेल्या जमीनीचा अेक इंचही तो देणार नाही. थोडक्यात अमेरिकेतल्या आदिवासी लोकांच्या लढ्याची कहाणी खूप दीर्घ आणि हृदयद्रावक आहे. ते अेका मोठ्या कंपाउंडच्या भिंतीमागे जमतात. आणि प्रार्थना करतात. तेथे बसतात आणि विचार करतात की आत्यंतिक दैवीशक्ती लाभलेली ही जमीन आपली प्रार्थना नक्की अैकेल. मी त्यांच्याशी नक्कीच सहमत आहे. कारण अेखाद्या जागेचे स्थानमहात्म्य मी जाणून आहे. ही गोष्ट नक्कीच खरी असली पाहीजे. कारण त्यांना दुसरी कुठलीही जमीन नको आहे. ज्या जमीनी खरे म्हणजे अेकेकाळी त्यांच्याकडूनच बळकावल्या किंवा लुटल्या गेल्या होत्या. त्यांना फक्त ती विशिष्ट जमीनच हवी होती. मला हे समजत नाही की अमेरिकन सरकारला हे सर्व कसे समजून सांगता येईल. पण हे कठीणच आहे. कारण त्या सरकारला दुसऱ्या देशांतल्या युध्दात आणि समस्यात वेळ कुठे आहे? हे आदिवासी काहीसे भुऱ्या रंगाचे आहेत. त्यांच्या अत्यंत सुंदर व भावपूर्ण डोळ्यात ती जमीन मिळवायचीच ही दुर्दम्यइच्छा दिसते. मी त्यांना स्पष्टीकरण दिले की मी ही जमीन त्यांना मिळवून देवू शकत नाही. तेव्हा ते म्हणाले, तुम्ही संत आहात, तुम्ही आमच्यासाठी प्रार्थना करा. आम्हाला नक्की जमीन मिळेल. पांढऱ्या कातडीने झाकून घेतलेल्याच्या कानावरही पडणार नाही अशी त्या सुंदर लोकांची अगदी साधी मागणी अैकून मी हेलावून गेले. माझ्या हृदयाने त्यांच्यासाठी रुदन केले. माझी मनापासून इच्छा आहे की त्यांची ती अभिमंत्रित जमीन त्यांना परत मिळावी. त्या दैवी देणगीचा त्यांना उपयोग व्हावा. जुन्या जमान्यातले अनेक लोक केवळ त्या जागेवर प्रार्थना केल्याने बरे झाल्याचा दाखला त्याच लोकांनी मला दिला होता.

मी जेव्हा अमेरिकेतील त्या लोकांना भेटले तेव्हा त्यांच्याबद्दल मला प्रचंड प्रेम व आदर वाटू लागला. ते मला भेटायला रोज येत. अत्यंत सभ्य, सुसंस्कृत पोषाख करुन येत. ते

अत्यंत सरळ मनाचे आणि दत्याची निष्कपट हाते. ते जमीनीवर अत्यंत शांतपणे हाताची घडी घालून बसत. त्यांच्या बायका मात्र बडबडत असत. ती जमीन मिळवण्याची त्यांची इच्छा खरे तर अवास्तव नव्हती. त्यांच्या जमीनीपासून त्यांना अनाथ बनविले गेले हाते. तरीदेखील ज्या दैवी शक्तीवर विश्वास ठेऊन ह्या जमीनीच्या कार्याला स्वतःला वाहून घेतले होते ती थक्क करणारी होती. त्यांना ती जमीन कोणत्याही आर्थिक फायद्यासाठी किंवा पैसा मिळवण्यासाठी नको होती. भारतीय लोकांच्या गंगामैयाबद्दल ज्या आंतरिक पवित्र भावना आहेत तश्याच त्यांच्या ह्या जमीनीबद्दल होत्या. त्यांची अशी भावना होती की ह्या पवित्र भूमीचे दर्शन वर्षातून अेकदा घेतले गेले तरच आपली गणना धार्मिक म्हणून केली जाईल. त्यांचे दैवी विचार अैकून मला खूप संतोष झाला. ते जे काही म्हणत होते ते खरेच हाते.

वर्णभेद अशा काही लोकांनी स्वीकारुन आपल्या अंगी भिनवला की जे स्वतःला दुसऱ्या मानवावंपासून श्रेष्ठ समजतात पण असा विचार करणे म्हणजे फक्त स्वतःच्या मानसिकतेचे लाड करणे होय. अशा कल्पनांनी फक्त त्यांच्या मनात जन्म घेतलेला असतो. वास्तवतेचा विचारच ते करु शकत नाहीत. अेकदा का समाजातल्या काही लोकांनी स्वतःला दुसऱ्यापेक्षा वरचढ समजायला सुरवात केली की कुठलेही पापाचरण त्यांनी केले तरी मनातल्या मनात ते आचरण ते न्याय्यच समजू लागतात. आपण करतो आहे ते नैतिक आहे की अेकदम चुकीचे आहे. ह्याचा विचारच ते कधी करत नाहीत. अश्या तऱ्हेने हा वर्णभेद वास्तवाकडे संपूर्ण दुर्लक्ष करतो. उदा.युरोपमध्ये तुम्ही गुडघ्याच्या खाली पोचणारा स्कर्ट परिधान केला तर तुमच्याकडे आपादमस्तक पाहत ते विचारतील 'तुम्ही तुर्की आहात?' जणू लज्जा ही फक्त तुर्की लोकांनीच बाळगायची वस्तू आहे. तोच तुम्ही जेमतेम ६ इंची असलेला तोकडा स्कर्ट परिधान केला तर ते अत्यंत आधुनिक, फॅशनेबल मानले जाते. मग भले थंडीने तुमच्या शिरा ताठ झाल्या किंवा तुम्हाला आर्थायटीस झाला तरी चालेल.

आफ्रिकेतील सर्वच लोक अत्यंत खोल व सूक्ष्म विचारसरणीचे आहेत. त्यांच्या खगोलशास्त्राच्या सखोल ज्ञानानुसार मंगळाभोवती फिरणाऱ्या ताऱ्यांविषयी त्यांना खूप दिवसापासून माहिती आहे. भारतामध्ये ज्योतीष्यशास्त्राचा पाया सुर्य नसून चंद्र आहे. हजारो वर्षापासून ठराविक तारा ठराविक काळात आपल्या जगात प्रवेशतो ह्याचे ज्ञान आपणास आहे. सूर्य/चंद्र ग्रहणाची वेळ व कालावधी आपण जाणून आहोत. अशा ग्रहणानंतर होणाऱ्या परिणामाचे अत्यंत सविस्तर वर्णनही केले गेले आहे. इतरही अनेक गोष्टींची अत्यंत अचूक भाकितेही सांगितली गेली आहेत. पाश्चीमात्यांची संपूर्ण खगोलशास्त्राची मांडणी ही ग्रहगोलांच्या सूक्ष्म हालचालींचा वेध घेणाऱ्या अत्याधुनिक

यंत्रांवर आधारीत आहे हे लक्षात घेतले तर त्यांच्याशी तुलना करताही अचूक ठरलेली ही भाकीते पाहीली की खरोखरच थक्क व्हायला होतं. पाश्चीमात्य शास्त्रज्ञांनी भारतीय खगोलशास्त्रात कधीच आपली रुची दाखवली नाही. अर्थात सध्या काही भोंदू माणसे आयुर्वेदिक औषधासाठी मार्केट मिळवत आहेत. खरं म्हणजे त्यांनी तसे करु नाही. कारण ह्या मूर्ख माणसांपासून निर्माण झालेल्या कंपनाने युरोपमधल्या अनेकांच्या तब्येतीवर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे. तरीदेखील काही लोक ह्या आयुर्वेदिक औषधाने वेडेच झाले आहेत. आणि ह्या विक्रेत्यांच्या हातातले जणू बाहुलेच बनले आहेत. मला असे अनेक आयुर्वेदिक डॉक्टर, वैद्य माहीत आहेत की जे औषधोपचारासाठी कोणतीही फी घेत नाहीत. त्यांनी अनेकांना बरे केले पण परदेशात त्याचा बाजार भरविला नाही. अमेरिकन कायद्यानुसार कुठल्याही पर्यायी औषधोपचार करणाऱ्यांना तेथे प्राक्टिस करता येत नाही. अगदी येशू ख्रिस्ताने जरी कुणा अमेरिकन माणसाला बरे केले तर तेथे त्याला अटक केली जाईल. त्यामुळेच औषधोपचाराच्या खर्चाखेरीज वैद्यराजांना कोणतीही फी मिळत नाही. भले तो कितीही विद्वान असो, कितीही विरक्त जीवन जगत असो. मला हरिद्वारमध्ये अेक संस्कृत पंडीत भेटले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते ॲलोपथी डॉक्टर होते. पण कधीतरी त्यांनी भारतीय औषध घेतले आणि त्यांनी आयुर्वेदाच्या जुन्या पध्दतीवर संशोधन करण्यास सुरवात केली. त्यांना आयुर्वेदातले इतके सखोल ज्ञान होते की केवळ नाडीपरिक्षेवरुन ते रोगनिदान करु शकत हाते.

जेव्हा गोरे लोक खूप आजारी पडतात आणि जगण्याची कोणतीही आशा शिल्लक राहत नाही तेव्हाच ते पर्यायी औषधोपचाराचा शोध घेऊ लागतात. मग अशा वेळी त्या डॉक्टरची कातडी कोणत्या रंगाची आहे हा विचार त्यांना शिवत नाही. इंग्लंडमध्ये, आणि अमेरिकेतही मी अनेक भारतीय डॉक्टर्स पाहिले आहेत की जे आपल्या विद्येत अत्यंत पारंगत आणि प्रसिध्द आहेत म्हणजे इथेही हेच दिसते ना की कातडी, गोरी, काळी, भुरी कोणतीही असली तरी विद्या मिळवण्याच्या माणसाच्या शक्तीत काहीच फरक पडत नाही. पाश्चीमात्य डॉक्टर्स, शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी रोग्याची कोणतीही जबाबदारी घेण्यास तयार नसतात. कारण रविवार म्हणजे त्यांचा पवित्र दिवस असतो जो त्यांना खाणे पिणे आणि धुंद होणे ह्या मध्येच घालवायचा असतो. पण भारतीय डॉक्टरांनी मात्र आपल्या व्यवसायाला अजूनही संपूर्ण वाहून घेतले असते. कारण भारतीय डॉक्टर्सची कणवपूर्ण प्रतीज्ञा त्यांना आपल्या व्यावसायिक जबाबदारी बाबत कायम जागरुक ठेविते. कदाचित इतर देशात कणवपूर्ण प्रतिज्ञा नसल्याने इतर देशातले डॉक्टर्स सुट्टीत फक्त त्यांच्या स्वतःच्या हौशींचा आणि आरामाचा विचार करतात.

मी स्वतः काळ्या लोकांचे दुःख अनभवू शकते. जाणू शकते. केवळ काळ्या कातडीमुळे ज्यांना अश्या भयानक अनुभवातून जावे लागल्याने ज्या वेदना त्यांनाच सहन कराव्या लागतात. केवळ रंगामुळे अेकमेकांशी दुजाभावाने वागणे हे इतके सर्वमान्य झाले आहे की आपल्या रंगाबद्दलच्याअेखाद्याच्या भावना अगदी वैयक्तिक पातळीवर देखील इतक्या तीव्र का असतात हे सहज समजू शकते. हे आहे म्हणजे सर्वसाक्षी परमेश्वराच्या दरबारात अेखाद्या व्यक्तीचा ती केवळ काळी आहे म्हणून अपमान करणे किंवा त्याची फजिती करणे हा अेक घोर गुन्हा ठरतो. खरं म्हणजे परमेश्वराने हे वैविध्य निर्माण केले असले तरी माणूस त्याचा उच्च/नीचतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी गैरवापर करत असतो त्यांना हेही माहीत नसते की ते असे महान पाप करत असतात की परमेश्वराकडे त्याला कधीच क्षमा नाही. कोणालाही केवळ तो वेगळ्या कातडीचा आहे म्हणून अेखाद्याचा अपमान करण्याचा काहीच अधिकार नाही. ह्या सततच्या छळवणूकीचा परिणाम म्हणजे काळे लोक आता अत्यंत हिंसक बनले आहेत. हिंसाचाराला न्याय्य म्हणता येईल कदाचित पण निश्चीतच ही उत्तम गोष्ट नाही.

उदाहरणार्थ, भारतीय लोक पाश्चीमात्य देशात वर्णभेदामुळे कधी अपमान झाल्याचे फारसे मनावर घेत नाहीत असे दिसते. ते ह्या गोष्टीकडे केवळ परदेशी असल्यामुळे होणारे वर्तन असेच पाहतात. गोरा ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लोकांपासून स्वतःला दूर ठेवण्यसाठी ते स्वतःचा अेकत्र समाज बनवून राहतात. जर अेखाद्याने भविष्यकालीन जगाचा विचार केला तर लक्षात येईल ही गोऱ्या काळ्यांची द्वेषमूलक वागणूक बदलायलाच हवी. ही दुष्ट रीत नष्ट करण्यासाठी ब्रिटनमध्ये राष्ट्रीय पातळीवर काय उपाययोजना होतात हे मला माहीत नाही. हे मात्र आपण जाणून घ्यायलाच हवे की वर्णभेदातून निर्माण झालेल्या ह्या द्वेषमूलक वर्तणुकींमुळे मानवाला फार मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. कदाचित असेही होईल की अेखादा मूलभूत विचारसरणीचा तत्ववेत्ता ह्या सर्वांचे सांत्वन करेल आणि कदाचित शांतीचा प्रकाश त्यांच्या हृदयात पडलेला आपण पाहूही! पण अश्याप्रकारे अंधश्रध्दायुक्त, नीच मानसिक दृष्टीकोण (इतरांप्रती असलेला) इतक्या सहज रितीने बदलू शकत नाहीत. अेकदाका ह्या गोऱ्या लोकांचे अज्ञान दूर होअून त्यांना बोध होईल आणि दैवी प्रसादामुळे त्यांच्या हे लक्षात येईल की सर्व मानवी जीवन परमेश्वरानेच निर्माण केले आहे आणि म्हणूनच कुणी कुणाचा द्वेष करणे ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. आपण भारतात दुसऱ्या व्यक्तीला कधीच म्हणत नाही की मी तुझा द्वेष करतो. हे वाक्य पहिल्यांदा जेव्हा मी इंग्रजीतून अेकले तेव्हा माझ्या पारंपारिक भारतीय मनाला धक्काच बसला. कातडीच्या रंगामुळे कुणाचा द्वेष करणे ही केवळ वाईट गोष्ट आहे असे नव्हे तर

अेखाद्याचा अहंपणा अतिशय वाढून त्याच्या हातून हिंसक गुन्हा घडण्यास कारणीभूत ठरु शकतो.

मला तर अेक असे सेक्रेटरी जनरल माहीत आहेत की केवळ रंगामुळे त्यांची छळवणूक केली गेली. आपल्या धूर्ततेच्या साह्याने त्यांच्यात काही दोष काढून त्यांची विकसित देशामधून हाकालपट्टी केली गेली. जे दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात आले ते इतके खालच्या व पोकळ पातळीवरचे होते की कुणाच्याही लक्षात येईल की संपुर्ण योजना केवळ त्या व्यक्तीची हाकालपट्टी करण्यासाठीच घडविली गेली आहे. ती व्यक्ती मोठ्या मनाची, मुस्लिम आणि विद्वान व्यक्ती होती. त्याने अनेक भारतीय धर्मग्रंथाचा अनुवाद केवळ भारतीय तत्वज्ञान सर्व जगासमोर आणण्यासाठी इतर अनेक भाषामधून आणले होते. ते मुस्लीम होते तरीही इतर धर्मातल्या धार्मिक ग्रंथाचा यथोचित आदर ठेवत होते. त्याच्यावर अेक असा आरोप ठेवला गेला की त्याची बायको बेल्जियमला सरकारी गाडीने गेली होती. ह्या संदर्भात मला असे कळले की बेल्जियममध्ये नेमणूक केल्या गेलेल्या राजदूताचा अेकाअेकी मृत्यु झाला. ह्या सेक्रेटरी जनरलच्या पत्नीला आपल्या मैत्रिणीच्या (त्या कै. राजदुताच्या पत्नीला) सांत्वनासाठी तावडतोब पॅरीसहून ब्रुसेलसला जाणे भाग होते. त्यावेळी अेखादे विमानही नव्हते. शेवटी तिने ऑफिसमधून अेक गाडी घेतली व ती बसेलसला गेली. तसे तिने ऑफिसला कळविलेही होते. ह्यात ऑब्जेक्शन घेण्यासारखी कोणती गोष्ट आहे हेच मला कळले नाही. अश्यावेळी काय तिने एखादी टॅक्सी करायला हवी होती?

वर्णभेदामुळे अनेक देशात गुलामगिरी आली. अनेक लोक आफ्रिकेतून आणून लोकांना त्यांच्यासेवेसाठी गुलाम म्हणून विकले गेले. अेका शतकापूर्वी ह्या गुलामगिरीची भरपूर भरभराट होती. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जहाजातून प्रवास करताना बर्म्युडा टयंगल हा भयानक जलप्रदेश लागतो. अनेक जहाजे त्यात बुडून नष्ट झाली आहेत. त्यांच्याकडून असेही सांगितले जाते की अमेरिकेत आणल्या जाणाऱ्या अनेक गुलामांनी इथे आत्महत्या केल्या. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या मृत जीवांची तेथून जाणाऱ्या अनेक जहाजांची आपल्या छळवणूक करण्याच्या आसूरी शक्तीने शिकार केली. कदाचित हे खरे नसेलही. पण अेक मात्र नक्की जर तुम्ही कुठल्याही व्यक्तींचा आत्यंतिक छळ केला तर तो छळच कोणत्याही मार्गाने अेक अघोरी वळण घेअून अेखादे भयानक कृत्य करुन जातो, की जे सर्वसाधारणतः कुणाच्या हातून होणारच नाही.

उदाहरणार्थ इंग्लंडमधल्या काही लोकांशी माझा संबध आला होता ही माणसे अशा भारतीय खाण्यासाठी बावचळली होती की सामान्यतः आपणही तशा प्रकारचे अन्न खात नाही अेकूणच माझ्या असे लक्षात आले की अमेरिकत जे चिंतनाचा, योगसमाधीचा मार्ग

अवलंबतात, त्यांना भारतीय जेवणाच रुची निर्माण होते. कमीत कमी आठवड्यातून अेकदा तरी ते भारतीय हॉटेलला भेट देतात. त्यांच्या बोलण्यात हळूहळू भारतीय शब्द येवू लागतात हे आश्चर्यजनक नव्हे काय? मला तर असेच वाटते ह्या गोऱ्या कातडीवाल्यांनी सर्वत्र आर्थिक आणि राजकीय राज्ये निर्माण केली आणि त्यावेळेस त्यांनी अेत्तद्दीशायांच्या कत्तली केल्या त्या कत्तलीत मरण पावलेल्या लोकांनीच ह्या गोऱ्या लोकांना पछाडले असावे. अेरव्ही ह्या गोऱ्या कातडीखालच्या लोकांना अश्याप्रकारचे मसालेदार, झणझणीत भारतीय अन्न का आवडावे ह्याची कोणतीच कारण मिमांसा सांगता येत नाही. नंतर अेकदा मी शिकागोत असताना हरे कृष्ण चळवळीचा प्रमुख नेता मला भेटायला आला. ते अगदी भयानक थंडीचे दिवस होते. आणि अशा थंडीच्या दिवसात त्याने अगदी पातळ असे धोतर नेसलेले पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. धोतर हे भारतीय पुरुष आपल्या कमरेखालचा भाग झाकण्यासाठी उपयोगात आणत असणारे वस्त्र आहे. तसेच त्याने आपल्या डोक्याचे संपूर्ण मुंडन केले होते. अेखाद्या डुकराच्या शेपटासारखी दिसणारी शेंडीही त्याने आपल्या मस्तकावर ठेवली होती. ते प्रचंड थंडीचे दिवस होते. सर्वजण अक्षरशः कुडकुडत असताना ह्या माणसाने मात्र फक्त धोतर नेसले होते. जे भारतातल्या हिवाळ्यातही योग्य नव्हते. त्याने मला सांगितले की त्याला त्याच्या गुरुने सांगितले होते की धोतर नेसल्यावर स्वर्गप्राप्ती सहजसाध्य असते आणि मस्तकाचे संपूर्ण मुंडनही आवश्यकच आहे. कारण निर्वाण नावाच्या स्वर्गात तुम्हाला घेअून जाण्यासाठी जेव्हा देवदूत येतील तेव्हा त्या मुंडनामुळेच शेंडीमुळेच त्याला तुमची ओळख पटेल. मी त्याला सांगितले आमच्या देशातले ८० टक्के लोक जे अतीउष्ण प्रदेशात राहतात ते धोतरच नेसतात. अत्यंत प्राचीन काळापासून आमच्याकडे धोतर प्रचलीत आहे आणि मग तुमच्या ह्या हरे कृष्ण सिध्दांताप्रमाणे सगळ्यांनाच त्यांचा 'मोक्ष' निर्वाण मिळायला हवा. मग तुमची वासलात कुठे होणार ?

मग मी मुक्तीसाठी संपूर्ण मुंडन ह्या मुद्याकडे वळले. थोर संत कबीर ह्याबाबत असे म्हणतो की जर तुम्हाला फक्त मस्तक मुंडन करुन स्वर्गप्राप्ती होत असेल तर मग ज्या मेंढ्याचे संपूर्ण शरीर वर्षातून दोनदा भादरले जाते त्याचे काय? माझे हे वक्तव्य अैकून तो नेता अत्यंत चिडला पण मी त्याला समजावले अरे माझ्यावर चिडू नकोस. मी तर तुझ्या आईसारखी आहे. मी फक्त तुला समजावते आहे की ह्या कुडकुडणाऱ्या थंडीत धोतर नेसू नकोस. त्याने तुझ्या पायांना दुखापत होण्याची शक्यता आहे. तो म्हणाला मी चिडलो, कारण तुम्ही माझ्या गुरुवर टीका केलीत, मी त्याला म्हटले मी त्यांच्यावर टीका करत नाहीये, मी फक्त तार्कीकतेला धरुन प्रश्न विचारत आहे. खरं म्हणजे हे अत्यंत आश्चर्यजनक

आहे की ह्या साध्या सरळ लोकांना त्यांच्या गुरुंनी असे कपडे घालायला सांगावेत की जे भारतातल्या उष्ण हवामानाला योग्य आहेत. पण अमेरिकेतल्या थंड हवेला अजिबात योग्य नाहीत. हे सद्गृहस्थ अत्यंत तल्लख बुध्दीचे होते. त्यांनी गीतेचा खूप खोल अभ्यास केला होता. तो गीतेवर खूप भरभरून बोलत होता. शेवटी मी त्याला सांगितले, 'बाबा रे गीतेत असे कुठेही लिहिलेले नाही की तुम्ही फक्त धोतर नेसा आणि मस्तकाचे मुंडन करा.

खरोखरच पाश्चीमात्य लोक एकाएकी भारतीय कपडे घेवू लागले आहेत ह्याचे मला खूप आश्चर्य वाटते. ही वर्णभेदावरील प्रतिक्रिया नसेल ना? खरचं ही वर्णभेदाच्या संदर्भातली प्रतिक्रियाच असावी की ह्या पिढीतल्या लोकांना त्या संदर्भात काहीतरी करावेसे वाटते. जे ह्या सर्वसामान्य गोऱ्या माणसाने कधीच केले नव्हते, ते ह्या तऱ्हेने व्यक्त होते, का ही केवळ संस्कृती विरुध्द निर्माण झालेली एक लाट आहे? अशा लाटा मधून मधून उसळत असतातच. हे ही सहज लक्षात येते की अत्यंत द्वेषमूलक व अशांतीच्या परिस्थतीमुळे पश्चीमेकडील लोक संभ्रमीत अवस्थेत आहेत. ह्या अवस्थेत त्यांना कुणीही मुर्ख बनवू शकतो म्हणूनच एखाद्या संधीसाधू व्यक्तीने मीलनमध्ये किंवा पॅरिसमध्ये एखादी फॅशन आणली तर अत्यंत भाविकतेने अमेरिकेत ती स्वीकारली जाते.

अगदी सुरवातीला मी इंग्लंडमधल्या सात हिप्पीच्या आयुष्याचे प्रयत्न पूर्वक निरीक्षण करत होते की त्यांनी जीवनाबद्दलचा हा दृष्टीकोण कसा आत्मसात केला असावा. चार वर्षे मी त्यांना जाणून घेण्यासाठी धडपडले. माझ्या असे लक्षात आले की आत्यंतिक अस्वस्थतेपोटी त्यांच्यात एकप्रकारची कुरापत काढण्याची त्रायदायक वृत्ती निर्माण झालेली आहे. हे सर्वजण अर्थातच गोरे होते आणि जरी पाश्चीमात्य सभ्यतेच्या कडक धोरणांच्या विरुध्द दंड थोपटून ते उभे होते. तरीही काळ्यालोकांवरचा त्यांचा द्वेष अजूनही रेंगाळतच होता.

उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये तुम्हाला जर राणीच्या एखाद्या पार्टीला हजर रहायचे असेल तर तुम्ही विशिष्ट प्रकारचा लाँग कोटच घालायला हवा असा संकेत आहे. राणीने आयोजित केलेली पार्टी हा अर्थातच एक दुर्मिळ समारंभच असणार. लोकांना साहजिकच ते खूपच प्रतिष्ठेचे वाटते. अगदी मला तर वाटते अशा पार्टीचे आमंत्रणपत्र, हे वारसांना दाखवायला आपल्याला मिळालेल्या एखाद्या शौर्यपदकासारखे हे लोक जपून ठेवत असावेत. बाहेरुन आलेल्या पाहुण्यांना मात्र ह्या विशिष्ट प्रकारच्या कोटाची सक्ती नसते, धन्यवाद परमेश्वरा, आम्ही जेव्हा अशा एका पार्टीला गेलो तेव्हा आम्हाला आमचा राष्ट्रीय पोषाख घालण्याची परवनगी मिळाली होती. अर्थातच सरदारदरकदारांखेरीज हे कोट शिवणे कोणाला परवडण्यासारखे नसल्याने बरेचसे लोक मॉस ब्रदर्स ह्या नावाच्या प्रसिध्द दुकानातून ते भाड्याने घेतात. असे शेकडो कोट दरवर्षी भाड्याने दिले जातात. फारच थोड्या लोकांना

हे भाड्याने घेतलेले कोट बेतशीर बसतात. अेरव्ही काहींना ते खूप घट्ट तर काहींना खूप ढगळ बसतात. जी माणसे हा कोट घालतात ती खूप अस्वस्थ, प्राचीन युगातली वाटतात. ज्यामाणसांना मी ओळखत होते. त्या माणसांचे स्वरुप बदलल्या गेल्याने मला अजिबात ओळखू आली नाहीत. चालताना ही माणसे अेक तर अत्यंत हास्यास्पद पध्दतीने कडक चालत होती किंवाचार्लीचॅप्लीन सारखी सैलावल्या अवस्थेत, तर काहींना ते पोषाख कांचत असल्याने ते रडकुंडीला आल्यासारखे दिसत हाते.

खरं म्हणजे हा टेलकोट म्हणजे साधारणतः सोळाव्या शतकातील अेका राजाच्या पाठीवरील पोक झाकण्यासाठी शिंप्याने योजलेली अेक युक्ती होती. ह्या दिवसात सुध्दा अश्या मुर्खपणाच्या प्रथा चालू आहेत हे पाहून मला माझे हसू आवरणे कठीण गेले. इतर देशातल्या लोकांना त्यांचा राष्ट्रीय पेहराव घालण्यास परवानगी देण्यात आली होती. ह्याबद्दल मी देवाचे आभारच मानते. मी खरोखरच कांगो,युथोपिया आणि आफ्रिकेतल्या लोकांचे चित्रविचित्र कपडे पाहून खूपच आनंदीत झाले. अत्यंत सुंदर, अनेकविध वैविध्याने नटलेले असे कपडे मी ह्यापूर्वी कधीच पहिले नव्हते. जे लोक आपल्या राष्ट्रीय पोषाखात आले हाते ते अत्यंत सहजतेने वावरत होते, संगीताचा आनंद घेत होते पण ज्यांनी मॉस ब्रदर्स मधून आणलेले अत्यंत तऱ्हेवा ईक युनीफार्म घातले होते ते मात्र अत्यंत कावऱ्याबावऱ्या अवस्थेत वावरत होते. त्यांच्याशी सामान्य पध्दतीने बोलणेही अशक्य होते. कदाचित ते सर्व स्वतःला पुराणकाळातील सरदारच समजत होते किंवा त्या विचित्र कपड्यात बायकांशी बोलण्यास कचरत होते.

आणखीनही अेक समस्या ह्या वर्णभेदाने निर्माण केली आहे व ती म्हणजे क्लास कॉन्शसनेस, पाश्चात्य देशातले बरेच अुच्चवर्णीय आपल्या दर्जाबद्दल खूपच जागरुक असतात. ते आपल्यापेक्षा खालच्या दर्जाच्या लोकांमध्ये मिसळत नाहीत. जर्मन लोकांचेही वागणे असेच आहे. ते स्वतःला उच्चवर्गीयांच्या जीवनशैलीचे राजे समजतात. सुवर्णजडीत रोसेन्याल किंवा कैसर ह्या प्रकारच्या काचसामानाखेरीज इतर कोणतेही क्रोकरी त्यांना चालत नाही. अर्थात उच्चवर्णीयांची ही जागरुकता समजण्यास कठीणच, कारण त्यांची मुले मात्र कित्येक वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर सुध्दा त्यांची प्राथमिक खर्चाची परिक्षा उत्तीर्ण होवू शकत नाहीत.

फ्रेन्च लोक मात्र, जे ह्या अगोदर स्वतःला खूप सभ्य चालीरीतीचे समजत होते ते हळू हळू समजून चुकले आहेत की आपली संस्कृती आपल्यासाठी राजकीय लोकांना अपेक्षीत असलेले संकट आणणारीच फक्त आहे. त्यांच्याकडे फ्रेंच मध्ये मद्यपानासंदर्भात पुस्तकामागून पुस्तके लिहीली गेली आहेत. मोपॅसो, मोलियेर, अेमील झोला, ह्यांच्या

सारखे चार, पाच सन्मानीय अपवाद वगळता स्वतःबद्दल विशेषतः स्त्रियाबद्दल आदर व्यक्त करणारे लेखन करणारा अेकही लेखक सापडू शकणार नाही. कोणे अेकेकाळी राजकीय व्यवहाराच्या संदर्भात फ्रेंच माणूस हा अत्यंत सभ्य मानला जायचा. मला अेक समजत नाही सभ्यपणाने वागणे म्हणजे वरवरचे उथळ, खोटे, अकार्यक्षम वागणे हा शोध कुणी लावला? सध्याची फ्रेंच लोकांची संस्कृती, आपण जाणूनच आहोत. अत्यंत विषयवासनायुक्त, निर्लज्ज आणि केवळ मद्यपीची अशी ही संस्कृती आहे. ज्यावर हल्ली स्वतः फ्रेंच लोकही टिका करु लागले आहेत. मी असे अैकले आहे की फ्रेंच लोकांच्या सर्व प्रसारमाध्यमावर हल्ली जे खेळ दाखवले जातात ते केवळ नग्न स्त्रियांवरचेच नव्हे तर नग्न पुरुषावरचेही असतात. प्रत्येक फ्रेन्च चित्रपटात बाथरुमसीनची हजेरी न चुकता लागतेच. आता मात्र फ्रेन्च माणसे. टी.व्ही. सिनेमा मधील अशक्त रोगट, शरीरे पाहून काहीशी अस्वस्थ होवू लागली आहेत.

फ्रान्समध्ये अनेक रंगाचे लोक राहतात. विशेषतः फ्रेन्च कॉलनीत मुस्लीम शेतकरी भरपूरआहेत. फार पूर्वी त्यांना सतत त्रास दिला गेला असल्याने ते आता वास्तववादी बनले आहेत आणि ते सतत फ्रेन्च संस्कृतीवर हल्ले करत आहेत. हाच वर्णभेदाचा अेकमेव परिणाम नव्हे का?

काही काळापूर्वी हिटलरने जर्मनीमध्ये आपल्या ताकतीचे प्रदर्शन केले होते. अर्थात त्यावेळेस जर्मन लोकही उघड उघड अनैतिकतेनेच व अनाचाराने वागत होते. हिटलर देखील वर्णभेदाचीच उत्पत्ती नव्हे काय? ज्या पध्दतीने त्याने आपल्या बीभत्स, अघोरीपणाला व दुष्टपणाला स्वैर, मोकाट सोडले होते ती पध्दत तो स्वतः कितीही न्याय्य म्हणत असो. पण त्याने त्या पध्दतीने मानवी जीवनांचा नाश केला ते योग्य होते का? तेथे तर तो सैतानापेक्षाही भयानकच वागला, सर्व जण त्याचे सैतान असेच वर्णन करतात पण लोकांना कळलेच पाहिजे की स्वतःच्या मोठेपणाच्या कल्पनेत काही लोक कसे आपले सर्वस्व हरवून बसतात. त्या अहंकारी माणसांना आपण सर्व जगाचे राजे आहोत हे जगाला दाखवून द्यायचे असते. आणि त्यांना असेही वाटत असते की न्याय्य वागण्याच्या भ्रामक कल्पनेखाली आपण लोकांशी कितीही क्रूरपणाने वागलो तरी ते योग्यच आहे. हिटलरने ज्यूविषयक आपल्या द्वेषाचे मूळ कारण काय आहे हे शोधण्याचा अजिबात प्रयत्न केला नाही. त्याच्या स्वतःच्या आयुष्यातला असा अेकही प्रसंग दाखविता येणार नाही की ज्यू लोकांनी त्याला त्रास दिला अथवा त्यांच्याकडून तो दुखावला गेला आहे.

त्याने स्वतः जर्मनमधल्या तत्कालीन वर्तणुकीचा पुरेपुर फायदाउचलला. त्याकाळात जर्मनीमधील लोक अत्यंत बलासपणे राहून देशाची उतरती कळा सहन करीत होते. ज्या

समाजात पुरुष स्त्रियांकडे केवळ करमणूकीचे साधन म्हणून पाहत होते त्यासमाजाबद्दलचा त्याचा तीव्र संताप कुणीही समजू शकतो. दुसरीकडे पैशाच्या जोरावर कुठल्याही स्त्रीला प्राप्त करुन घेणे ही त्या समाजात सहजशक्य होते. ज्यू लोक अत्यंत धार्मिक आणि नैतिक म्हणूनओळखले जात असले तरी ते अत्यंत लोभी होते. ते अत्यंत कठीण अटींवर पैसा कर्जाऊ देत आणि तो परत मिळवण्यासाठी काहीही करण्याची तयारी असते.

समाजाच्या अुतरत्या काळात अेखाद्याने साठविलेला पैसा असा अमर्यादपणे आयुष्यातल्या तथाकथित आनंदासाठी खर्च करणे हा देखील अेकप्रकारचा दुष्टपणाच नव्हे काय? ज्या समाजात दिखाअू झगमगाट हीच जीवनशैली बनून जाते. त्या समाजात दुसऱ्याच्या शळस्थानाचा पुरेपुर फायदा घेणारे काही लोभी लोक कुत्र्याच्या छत्रीसारखे निर्माण होतच असतात. परिणामतः कोणत्याही कारणाखेरीज, भावनेखेरीज, प्रेमाखेरीज लोक फक्त पैसा हाच परममेश्वर मानणारे होअून बसले. ज्या काळात हिटलरचा उदय झाला त्या काळात शारीरिक सुखासाठी वाटेल तेव्हढा पैसा खर्च करणाऱ्या लोकांना पैसे अुसने देअून ज्यू लोकांनी भरपूर पैंसा कमविला होता. हिटलरचे आपल्या देशावर आत्यंतिक प्रेम होते व त्यांचा देश त्यांच्या मते अत्यंत संकटात होता. त्यातूनच तो ह्या लोभी लोकांचा जे त्यांच्या मते त्यांच्या देशातील लोकांचे रक्त जळवेसारखे शोषून घेत होते समूळ नायनाट करणे हाच अेक योग्य मार्ग होता. त्याने हा विषय पक्केपणाने मनात ठसवला व अेका अत्यंत कुटील डावाची रचना केली ज्यायोगे ज्या परिणामकारी योजनेद्वारे तो ज्यू लोकांचा समूळ नायनाट करु शकत होता. त्यातच संपूर्ण जर्मनीतील नवी पिढी त्याच्या हातात होती. अश्या तऱ्हेची सर्व माणसे तरुण पिढीच्या मनात आदर्शवाद निर्माण करण्यात नेहमीच यशस्वी होत असतात. जर्मनमधील तरुण पिढी, जी अहंगंडाने पछाडली गेली होती, हिटलरचा हा कुटील डाव अजिबात ओळखू शकली नाहीत. ज्यांच्या मनात अगोदरच ज्यू लोकांबद्दल द्वेष काठोकाठ भरला होता अश्या तरुण पिढीला हवे तसे तयार करणे त्याला खूपच सोपे गेले. त्यांच्या हे कधीच लक्षात आले नाही की हिंसा फक्त हिंसेलाच जन्म देते. ज्यू लोकांचा नायनाट करण्यापेक्षा हिटलरने अत्यंत खालच्या पातळीवर गेलेल्या आपल्या अनैतिक समाजला सुधारण्याचे का मनावर घेतले नाही? दुर्देवाने अहंगडाने आत्यंतिक पछाडलेल्या कोणत्याच व्यक्तीच्या मनात अश्या तऱ्हेचे आदर्श विचार कधीच जन्माला येत नाहीत.

पहिल्यांदा अश्या लोकांच्या मनात सर्व जगाला वाचविण्याची किंवा समाजातील लोकांना वाचविण्याची, जे सर्वस्वी त्यांच्यावरच अवलंबून आहेत जबाबदारी आपणच घेतला पाहिजे अशी भ्रामक कल्पना घर करते आणि मग असे विचार आपल्या देशाला

किंवा इतरांना किती घातक ठरु शकतील असा विचार हे लोक करुच शकत नाहीत. आपल्या लोकांची नैतिकता परत मिळवण्यासाठी कुणालाही ठार मारण्याचा हिटलरला काय बरे अधिकार होता? असही म्हटलं जाते की त्याकाळात दैवी आत्मा समजल्या जाणाऱ्या तिबेटच्या दलाई लामाकडून त्याला मार्गदर्शन केले जात हाते.

दलाईलामाची निवड हा असाच एक गूढ प्रकार आहे. त्या काळात कोणत्याही दिवशी कोणत्याही देशातून पैसा मिळवण्याचे दलाईलामाचे एक विशिष्ट तंत्र हाते. हिटलरला कॅथलिक चर्चकडून लेखी स्वरुपात पाठिंबा मिळालेला होता. त्यांच्या हिशेबाप्रमाणे दोन हजार वर्षापूर्वी येशू ख्रिस्ताचा मृत्यु ज्यूकडून घडला होता. योगायोगाने. ह्याकाळात युरोप मधले सर्व देश मंदीच्या वेदना सहन करत होते. त्यामुळे त्यांना एकप्रकारचा सुन्नपणा आला होता. त्यामुळेच हिटलरच्या वागण्याचे जर्मनवर काय दूरगामी परिणाम होतील ह्याची यथार्थ जाणीव त्यांना होऊ शकली नाही. हिटलरला ह्या कल्पनेबरहुकुम चळवळ निर्माण करण्यास बरेच दिवस लागले. प्रेम करणे, समजून घेणे ह्यापेक्षा द्वेष करणे ही गोष्ट लोकांना सहज जमू शकते ही एक आश्चर्याची बाब नव्हे काय? त्याने जर्मनमधील मुलांना प्रथम शिस्त आणि नैतिकता ह्यांचे महात्म्य पटवून देऊन एकत्रीत केले. प्रथम त्याने सर्व मुलांचे केस व्यवस्ति कापायला लावले. अजुनही अमेरिकेत, युरोपमध्ये अशा प्रकारे केस कापलेले लोक दिसतात. कदाचित अशी कल्पना असेल की अशा तऱ्हने केस कापलेली व्यक्ती स्वतःला इतरांपेक्षा समजते. एक प्रकारे नैतिकतेचे चिन्ह बनून इतरांना, जे मुळातच बेगडी मुलाम्याच्या मागे लागून बरबाद झाले आहेत, जे अनैतिकतेच्या गर्तेत खोलवर बुडले आहेत. अशांना आपल्याकडे आकर्षित करुन घेवू शकतील. हे भारतातल्या तथाकथीत गुरुंबद्दलही खरे आहे मला तर एकजण असा भेटला होता की जो मुळात स्मगलर म्हणून तुरुंगात गेला होता. तुरुंगाच्या बाहेर आल्यावर तो झटपट संत बनला, त्याने फक्त मुंडन केले होते आणि भगवी वस्त्रे परिधान केली होती.

भारतामध्ये बहुतेक करुन जे साधक असतात आणि ज्यांना संत बनायचे असते ते असे मुंडन करुन हिमालयात जातात व निर्वाण प्राप्तीसाठी एका पायावर उभे राहून तपस्या करतात.

काही वेळेस असेही दिसते की ह्याप्रकारे मुंडन कर्तन शैलीचा काही लोक स्त्रियांना आकर्षित करणे किंवा अनाकर्सित करणे ह्या दोन्हीसाठी उपयोग करतात. त्यांचे हे कारण अत्यंत अनैतिक असते. स्त्री आणि पुरुष दोघेही आपल्या केसांचा उपयोग परस्पराकर्षणासाठी करत असतात. सध्याच्या दिवसातही आपल्या केसांवर भरपूर पैसा खर्च करुन आकर्षक केशरचना करुन घेणारे लोक दिसतात. आपण असेही म्हणू शकतो

जगात दोन टोकाची व्यक्तीमत्वे असू शकतात. अेक जे जगातल्या सर्व प्रकारच्यामानसिक व शारीरिकआनंदात स्वतःला झोकून देतात, तर दुसरे ह्या सर्व गोष्टी नाकारुन अत्यंत रुक्ष, रागीट व आक्रमक बनतात. पण हे जरुरी नाही की वरवर आक्रमक व रुक्ष वाटणारी माणसे आतूनही तशीच असतात किंवा मनाने उदात्त असतात. केसांचे मुंडन करुन, कर्मठपणा दाखवून वेगवेगळी प्रायश्चीत्ते घेअून अथवा तपस्या करुन काही लोक आपली अनैतिकता झाकून टाकू शकतील किंवा ह्या सर्व' गोष्टींचा उपयोग आपल्या भ्रष्टाचारी आणि अनैतिक गुप्त जीवनाचा इतर कोणाला पत्ताही लागू नये ह्यासाठीही करत असतील. आपल्याकडे असे अनेक भोंदू गुरु आहेत की ह्यासर्व गोष्टींचा उपयोग करुन सर्वसामान्य लोकांचा विश्वास संपादन करतात. पण प्रत्यक्षात मात्र ते अत्यंत दुष्ट आणि भ्रष्टाचारी असतात.

सध्या सर्व टीकाकाराच्या दृष्टीकोणातून हिटलर हा आदर्शवादी मूर्ख आणि वेडसर होता असे मानले जाते. पण प्रत्यक्षात जर तुम्ही अेखाद्या अहंकारी माणसास पाहिले तर तो हिटलरच्या व्याख्यानांची किंवा त्याच्या वागण्याची स्तुती करताना दिसेल. तुम्ही अहंकारी असलात तर नक्की त्याच्या संरक्षणार्थ असेच सांगाल की आपला अहंभाव जपण्यासाठीच तो असे वागत होता. अहंकारी माणसांनाच दुसऱ्यातला अहंकार पटकन जाणवतो ना? पण तुम्ही जर अहंकारी माणसांना घाबरत असाल, त्यांच्यापासून दूर राहत असाल तर अेकतर त्यांच्या जीवनमूल्यांचा स्वीकार कराल किंवा तुम्ही त्याची जुलमी राजवट, अेखाद्या जुलूमपीडित प्रजाजनांसारखी मान्य कराल. अेखादाच परिपक्व मात्र ह्या गोष्टीकडे अेखाद्या मुर्खाचे बहकणे म्हणून पाहील आणि त्यांच्या ह्या मूर्ख नाट्याचा उपहास करेल.

हिटलरच्या कल्पनांनी प्रभावित झालेल्या ह्या दोन प्रकारच्या लोकांखेरीज आणखीनही अेका प्रकारच्या माणसांनी हिटलरच्याकल्पना आत्मसात केल्या होत्या. वाढत्या वयाची अत्यंत निर्व्याज, अपरिपक्व, साधी आणि कच्च्या मनाची तरुण पिढी, त्या दृष्टीने कोणाला ठार मारणे त्यांच्या करिता अेक प्रकारची करमणूकच ठरली. जुन्या काळात लोक जंगलात जनावरांची विशेषतः वाघांची शिकार करायला जात. परिणामतः वाघ नरभक्षक बनले. सिंह माणसांवर हल्ला करु लागले आणि ही शिकार लोकमान्य झाली. जेव्हा अन्नधान्य पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नसते तेव्हा मांस खाणे योग्य, न्याय्य ठरु शकते पण बरीचशी माणसे केवळ गंमत म्हणून शिकार करतात. ह्या भयावह इच्छेचा शेवट तितकाच भयावह होवू शकेल. जर्मनमध्ये ज्यू विरुध्द भयानक युध्द निर्माण होवून त्यांची गॅस चेंबरमध्ये निर्दय कत्तल करण्यात आली. कारण ते अत्यंत लोभी, दुष्ट होते आणि हिटलरच्या मते मुख्य कारण म्हणजे त्यांनी येशूला ठार मारले होते. खरं म्हणजे त्या लोभी लोकांवर नियंत्रण ठेवण्यास इतरही अनेक मार्ग उपलब्ध हाते.

नाझी चळवळीने संपूर्ण पिढी आपल्या ताब्यात घेतल्यावर हिटलरने ज्यूंची कत्तल ही अेकमेव गोष्ट जाहीर केली. ही जर्मन माणसे इतकी कशी आंधळी झालीतेच समजत नाही. हिटलरसारख्या माणसाने आपल्या भाषणाद्वारे त्यांच्यात स्फुलींग निर्माण केले किंवा आधीच द्वेषाने भरलेल्या त्यांच्या मनाच्या आगीत आणखीनच तेल ओतले. अेखाद्या संसर्गजन्य रोगासारखी ही द्वेषाची आग भडकत गेली. अेकदा का लागण झाली की विचारशक्तीच्या पलीकडे त्याचा वेग असतो. मला वाटते शुध्द प्रेमाच्या वेगापेक्षा द्वेषाच्या प्रसाराचा वेग लक्षात येण्यासारखा जास्त असतो.

शिवाय लोकांचा असा समज असतो जगातली सर्व राज्ये आपल्या देशाच्या आधिपत्याखाली आणणे हे त्यांचे कर्तव्य आहे. आपल्या देशाचा ध्वज फडकत ठेवणे त्यासाठी काय वाट्टेल ते करणे हे जणू देशभक्तीचे, त्यागाचे प्रतिक बनले. हिटलरनंतर त्याच्या सैतानी कृत्याला देशभक्तीचा गडद रंग दिला गेला. ज्या जर्मनीमध्ये तो जन्माला आला होता तेथे त्याला कुणीच कसे ओळखले नाही. खरं म्हणजे आपले काम करण्यासाठी त्याला स्वतःचीच अवकळा प्राप्त झालेला समाज लाभला होता. त्यांचे, त्यांच्या तरुण पिढीचे तो भले करु शकला असता. सर्व अहंकारी माणसे आपली बौध्दिक पातळी खूप वेगाने वाढवत असतात. ते पूर्ण जाणून असतात की कश्याप्रकारे लोकांच्या मनाचा ताबा घेअून आपल्या योजना पूर्ण करावयाच्याआणि आपले वागणे किती योग्य आहे हे त्यांच्या गळी उतरावयाचे ते हेही पूर्ण जाणून असतात की आपले अहंकारी विचार भूमिती श्रेणीना लोकांपर्यंत पोहचवायचे! पण जेव्हा माणूस स्वतःचेच वागणे कसे योग्य आहे हे स्वतःलाच सांगतो आणि स्वतःलाच फसवतो तेव्हा अशी माणसे स्वतःच्याच हृदयाचा जळणाऱ्या आगीत होरपळून निघतात.

उदाहरणार्थ, ही गोष्ट तिबेटमधून आलेल्या आणि निर्वासित म्हणून धर्मशाळेत राहणाऱ्या लोकांमध्ये आढळून येते. ते दलाईलामाचे अनुयायी आहेत. जे दलाईलामा त्यांच्यासाठी जगभर मदतीची याचना करत फिरतात. त्यांचे चेहरे लाल भडक चमकताना दिसत. तसे पाहता स्वतःचा अहंकार कुरवाळणारी माणसे प्रचंड सुखी असतात. पण त्यांच्यापैकी काही जण आपल्या लबाडीच्या जोरावर ज्या पध्दतीने चिकित्सक पध्दतीने त्यांना जीवन जगावे लागते. त्यामुळे आपण किती प्रचंड दुःखी आहोत असा फसवा विचार करु शकतात. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी महाशोकांतिका किंवा विरहगीते वाचली असतात किंवा ज्या वाचल्यावर वाचकांना रडू येईल अश्या कहाण्यांचा आस्वादही त्यांनी घेतला असतो. पण त्यांचे रडणे खरे न वाटता दारुच्या नशेतले वाटते. ते असे दर्शवितात की ते खूप दयाळू आहेत व त्यांना दुःखी गाणी खूप आवडतात. संशयाचा फायदा त्यांना देअून असेही म्हणता

येईल की कधी कधी त्यांच्या अहंभावाचा लंबक दयाळूपणामूळे रडत आहे हे लक्षात न आल्याने त्यांचे हृदय रडतच असेल. खरं म्हणजे ते दुसऱ्यांना जास्तीत जास्त रडविणाऱ्यापैकी अेक असतात. दुसऱ्यांना संकटात टाकणाऱ्यांपैकी असतात. जर त्यांनी अेखाद्या चित्रपटात अेखादी दुष्टपणा करणारी तरीही दयाळू वाटणारी व्यक्ती पहिली तर दुसऱ्यांना दुःख देणाऱ्या आणि वेदनांचे कारण बनणाऱ्या त्या खलनायकांसारखे आपण आहोत असे त्यांना कधीच वाटत नाही. उलट त्यांना असे वाटत राहते की त्या खलनायकाची शिकार बनलेल्या व्यक्ती सारखेच आपण बदनशीबी आहोत. ती दुःखीपीडित माणसे आपण आहोत अशा भ्रामक समजुतीत राहून स्वतःची करमणूक करुन घेतात. उत्तर भारतात अनेक लोक गझल ह्या गीताचा आनंद घेतात. गझल हा अेक अुर्दु काव्यप्रकार असून त्यात भग्नहृदयी माणसांच्या दुःखाचे वर्णन केलेले असते. त्यात विरहवेदना असते आणि ही वेदना त्यांना कठोरहृदयी स्त्रियांनी दिलेली असते.

साधारणतः असे संगीत अैकणारी माणसे स्वतःच्याभ्रामक विश्वात जगणारी मद्यपान करणारी आणि आपल्या विवाहित पत्नीकडे दुर्लक्ष करणारी असतात. कोणे अेकेकाळी अवघ्या जगावर राज्य करु इच्छिणाऱ्या ग्रीक राजांच्या शोकांतिकांचे समर्थनही अश्याच प्रकारे करता येईल.

मनुष्यप्राणी हा अेक अत्यंत सूक्ष्म भावनांचे चमत्कारिक मिश्रण असतो. आपण किती दुष्ट आहोत ह्या वस्तुस्थितीची जाणीव जर मानवाला झाली तर ह्या पृथ्वीतळावर तो जीवंतच राहू शकणार नाही. सर्वसाधारणपणे अनेकांची जगण्याची ही अेक पध्दतीच आहे. अनेकजण आपण आयुष्यात काय केले, काय मिळवले हे न कळताच अगदी वयोवृध्द होतात. अलीकडे बुध्दिमत्ता मोजण्याची आय क्यू ही चाचणी बरीचशी चुकीची आहे हे सिध्द झाले आहे. आता लोक इ क्यू बद्दल बोलतात. इ.क्यू. म्हणजे इमोशनेल कोशंट हा असल्याखेरीज आय क्यू ला तोल राहत नाही आणि अशी बुध्दीमत्ता धोकेदायक ठरु शकते.

भारतामध्ये आपल्याला राजा अशोकाची कहाणी माहित आहे. युध्दात अनेकांना त्याने ठार केले होते. पण जेव्हा त्याने युध्दात मारल्या गेलेल्या लोकांच्या रक्ताची नदी वाहताना पाहिली. त्याला धक्काच बसला आणि ह्या प्रकारे आपण सर्वनाश केला ह्याचे त्याला आश्चर्य वाटले. परिणामतः त्याने बुध्द धर्माचा स्वीकार केला आणि नंतरचे आपले सर्व आयुष्य पुर्व आशियामध्ये बुद्ध धर्माचा प्रसार करण्यात घालविले. अशा तऱ्हेचे परिवर्तन हे जगात अत्यंत दुर्मिळ आहे. पण भविष्यकाळात ते अत्यंत अैतिहासिक आणि दैदिप्यमान ठरु शकते. अेखादी व्यक्ती अशी आशा करु शकते की अेक दिवस असा येईल की त्या दिवशी अत्यंत निर्दयपणे कत्तल करणाऱ्या सर्व लोकांच्या मनाचे परिवर्तन होअून मोठ्या

प्रमाणात देवदूतांमध्ये ते परिवर्तीत होतील. हिंसा ही हिटलरच्या काळात जरी अेखाद्या अग्निकांडासारखी थैमान घालत होती तरी सध्याच्या काळात हा अग्नी काहीसा शांत झालेला दिसतो. अर्थात तुमच्या असे लक्षात येईल की हा अग्नी पूर्णपणे शांत झालेला नाही तर राखेच्या ढिगाखाली तो अजूनही धुमसतो आहे. काहीवेळेस ह्या तथाकथित मृत अग्नीचा परिणाम जगात दिसून येतो. खरच ह्या धगधगीत स्वभावाचा स्वतंत्रपणे किंवा अेकत्रितपणे कधीच नायनाट करता येणार नाही का? सगळ्या जगातला ह्या पध्दतीचा भ्रष्टाचार कधी नष्ट होइल. हाच महत्वाचा प्रश्न आहे. हे तेव्हाच शक्य होइल जेव्हा सर्व लोकांच्या लक्षात येइल की वैश्विक प्रेमाच्या जोरावरच जगामध्ये क्रांतीकारक गोष्टी घडत असतात. जर लोकांचे लक्ष आत्म्याच्या दैवी प्रकाशाकडे वेधले गेले तरच दया आणि आत्म्याच्या उच्च मुल्यांचा आनंद ते उपभोगू शकतील हा असा अेक आंतरिक प्रकाश आहे जो हिंसेमधून मिळणाऱ्या आनंदापेक्षाही खूप उच्च आहे. कदाचित हे आज घडणार नाही पण शांतीच्या संदेशाने आपली महत्वाची भूमिका ह्या जगात बजावयाला सुरुवात नक्कीच केली आहे. अर्थात शांतता प्रतिष्ठानाची स्थापना करुन, किंवा शांततेसाठी भले थोरले पुरस्कार देअून ह्या हिंसेचा समूळ नायनाट होणार नाही. जे अशा प्रकारच्या संस्था चालवित किंवा ज्यांना असे पुरस्कार मिळतात. त्यांनी अंतर्मुख होवून आपल्या स्वतःमधल्या दिव्य प्रकाशाचा सतत शोध घ्यायला हवा. आज खरी गरज आहे ती लोकांच्या संपूर्ण परिवर्तनाची ज्यांना क्षमा म्हणजे काय हे माहीत असेल आणि दुसऱ्यांच्या समस्यांचा विचार करु शकतील. हजारो सत्यशोधकांमध्ये झालेले हे संपूर्ण परीवर्तन जेव्हा लोक पाहतील, तेव्हाच समाजातील प्रत्येक व्यक्ती ह्या उत्क्रांतीचा आनंद पाहू शकतील. ते अशा लोकांचे शिष्य बनतील की जे स्वतः उत्क्रांत झाले असतील आणि त्यांच्या मनातील हिटलरचा वध करण्यास मदत करतील अर्थात आपल्याला हेही माहीत नाही की आपली ही निर्मळ इच्छा पुरी होवू शकेल की नाही ?

हिंसाचार, लोकांना ठार मारणारा हिंसाचार ही अनेक प्रजासत्ताक राज्यात अेक महत्वाची समस्या बनली आहे. जर सरकार मवाळ आणि प्रजासत्ताक असेल आणि लोककल्याणासाठी जर त्याने वैयक्तिक स्वातंत्र्य हा पाया मानून कायदे केले असतील तर सर्व तऱ्हेचा गोंधळ प्रजासत्ताक देशात चालू आहे. स्वातंत्र्याने हे कोणते रुप घेतले हे पाहून कुणालाही आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाही पण दूर्दैवाने ह्या आंतरिक हिंसाचाराने कुणालाच आपल्या समस्या सोडविता येत नाहीत. ही अेक फार चांगली खूण आहे. जर आपल्याला आपल्या भविष्याची काळजी असेल जर आपली प्रगती ही दैवावर अवलंबून असेल असे आपणास वाटत असेल तर आपल्याला ह्या सर्वांवर योग्य रस्त्याने जाणारे योग्य मार्ग शोधून काढलेच पाहिजेत.

अमेरिकेत अेका अकरा वर्षाच्या मुलाने अनेक लोकांना ठारमारले होते. म्हणून त्याला महानायक समजण्यात येत होते. इतक्या लहान वयात त्यानं अनेक लोकांना ठार केले हे ठार मारणे सुध्दा अत्यंत सूक्ष्म भेद निर्माण करणारे असे आहे. उदाहरणार्थ, उत्तर हिन्दुस्थानाप्रमाणेच,इतर काही इस्लामी राष्ट्रात अशा अंहगंडाने पछाडलेल्या लोकांचा भरपूर परिणाम लोकांवर झालेला आढळतो. त्यांच्या मते स्त्रीवर सत्ता गाजविणे आणि तिला सर्व प्रकारे छळणे हाच खरा पुरुषार्थ आहे. विशेषतः उत्तर हिन्दुस्थानात तर आपल्या स्त्रियांना मारहाण करताना पुरुष अत्यंत क्रूर, हिंस्र होताना आढळतो. ते आपल्या पत्नीशी कसे वागतात ह्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करतात आणि आपले असे वागणेच योग्य आहे असे समजतात. विवाहित स्त्रियांना अत्यंत असुरक्षित असेच वातावरण येथे आहे. ही माणसे स्वतःला सर्वश्रेष्ठ समजतात व आपण श्रेष्ठ असल्याने आपल्या विवाहित स्त्रीच्या न्याय्य भावना आणि महत्वाकांक्षा दाबून टाकण्याचा आपणास पूर्ण अधिकार आहे असा गैरसमजही करुन घेतात. त्या बिचाऱ्या हा छळ, मूकपणे सोसत राहतात. कोणीही उच्चशिक्षित, पदाधिकारी असू दे किंवा अेखादा श्रेष्ठ राजकारणी असू दे, ते अश्याच प्रकारचे दुहेरी आयुष्यच जगत असतात. सार्वजनिक जीवनात सर्व जगाविषयी अत्यंत उदारमतवादी आहोत असे दाखवित असताना खाजगी जीवनात मात्र कोणतीही दयामाया न दाखविता आपल्या पत्नीला छळतच असतात. आपल्या पत्नीच्या सर्व भावभावनांचा आणि महत्वकांक्षांचा ते जणू खूनकरतात. ते स्वतःच आपल्यापत्नीला अत्यंत तुच्छ लेखत असल्याने दुष्परिणाम असा होतो की मुलेही आपल्या आईला योग्य आदराने वागवित नाहीत. वडिलांना, आपले अहंगड संभाळण्यातच मशगूल असल्याने मुलांकडे लक्ष देण्यास अजिबात वेळ नसतो. त्यांना आपल्या मुलांकडून यथोचित मान मिळत राहतो. पण मुले मात्र वडिलांसारखीच किंवा त्यांहूनही वाईट उग्रवादी बनतात. समाजासाठी चांगले नागरिक घडविणाऱ्या आईलाच आदर्श माता मानले आहे. स्त्रियांच्या हक्क संरक्षणासाठी पश्चीमेकडे काही रस्त आहेत पण विकसनशील देशात मात्र स्त्रियांनासंरक्षणाचा कोणताही मार्ग नाही. पश्चिमेत स्त्रियांना स्त्री म्हणून समाजात किंवा कुटुंबात वेगळे वागविले जात नाही. त्यांचे संरक्षक कायदे देखील मूलभूत तत्वावरआधारित आहेत.

ह्यातील अनेक गोष्टी वैयक्तिक पातळीवर तर, सुधारणेच्या पलीकडे गेल्या आहेत. पण उत्तर हिन्दुस्थानात जीवनशैली म्हणूनच ह्याचा स्वीकार केला गेला आहे जपानमध्ये तर ह्याही पेक्षा भयानकतेने ह्या गोष्टी घडत होत्या, पण सध्याच्या काही वर्षात जपानमधील स्त्रियांची परिस्थिती खूपच वेगाने सुधारली आहे. अमेरिकेत तर कौटुंबिक संस्कृतीने दुसरे टोक गाठले आहे. तिथे बायका पुरुषांवर हुकुमत चालवितात, त्यांना वेडे करुन सोडतात.

भारतामध्ये अनेक समाजसुधारक होवून गेले की ज्यांनी स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पण तरीही ही अत्यंत हृदयद्रावक आणि करुणामय गोष्ट आहे की ज्या स्त्रिया आपल्या नवऱ्याच्या कुटुंबासाठी, नावासाठी, मुलांच्या कल्याणासाठी झटतात पण त्यांनी स्वाभिमानाचा प्रश्न काढला की त्या अहंभावी पुरुषांच्या दुष्टपणाच्या शिकार झाल्याच म्हणून समजा. संपूर्ण जगात पुरुष स्त्रियांशी अत्यंत पाशवी वागण्याची अनेक उदाहरणे आहेत. मला अशाअनेक स्त्रिया माहीत आहेत की ज्यांनी मला सांगितले आहे त्यांचे नवरे त्यांच्याशी अक्षरशः हिटलरसारखे वागतात. पण उघडपणे बोलले तर अधिक छळ होइल ह्या भीतीने त्या हा तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करतात.

हे अेका तऱ्हेने अेका घावात मारुन न टाकता स्त्रियांच्या व्यक्तीमत्वाला हळूहळू नष्ट करणेच चालू आहे. अशा कुटुंबात मुले अेक तर आईची बाजू घेतात अथवा वडिलांची, ते वडिलांवर गेले तर भविष्यात अधिपत्य गाजविणारे होतात. अर्थात अमेरिकन समाजात अधिपत्य गाजविणाऱ्या पुरुषांबरोबरच स्त्रियांचीही संख्या काही कमी नाही. तेव्हा आता समाजामध्ये अत्यंत समतोल विचारसरणीचे स्त्रीपुरुष निर्माण होणे हे गरजेचे बनले आहे. हे तेव्हाच शक्य होइल जेव्हा आपले नेते, राजकारणी आणि मुत्सदी स्वतः समतोल असतील. आणि हेही तेव्हाच शक्य होइल जेव्हा हे सर्वजण सामाजिक प्रगतीचा प्रश्न हा आपला स्वतःचा समजतील आणि अेकमेकांचा आदर करतील. जर सर्वसाक्षी परमेश्वर हा आत्मा स्वरुप प्रत्येक व्यक्तीत असतो असे आपण मानतो तर त्याचा प्रकाश प्रत्येकात दिसेलच आणि प्रेमाच्या जोरावर हा आत्मिक प्रकाश दुसऱ्या व्यक्तीतही निर्माण करता येइल. जर अेखाद्या वरचढ माणसाला, आपल्यात झालेल्या प्रगती नंतर कळले की ह्या अगोदरचे आपले वर्तन किती पाशवी होते तर तसे पशुतुल्य वागणे तो निश्चितच सोडून देईल आणि त्याचे आपोआपच सुंदर,दैवी व्यक्तीमत्वात रुपांतर होवू शकेल जॅकील व हाईडची कथा सर्वविदित आहे. दुष्ट माणूस श्री.हाईडच्या रुपात तर चांगला माणूस डॉ. जॅकीलच्या या रुपात पहायला मिळतो. डॉ जॅकील माघार होतो आणि संपूर्ण कथेत हाईड वावरत असतो. ज्या व्यक्तीत वाईट गुण असतात ते अधिकाधिक वाईट बनत जातात आणि म्हातारपणी तर असा दुष्ट माणूस भुतासारखा भयावह वाटतो.

म्हणूनच माणसाचे हे परिवर्तन लहान वयातच घडायला हवे. साधारणतः मोठ्या वयात माणसे सहजासहजी बदलण्यास तयार नसतात. शिजायला कठीण जाणाऱ्या कोंबडीसारखे ते निब्बर बनलेले असतात. अशी माणसे साधूसज्जनांना शिव्या देतात. त्यांना टवाळखोर नावांनी हाका मारतात अशादुष्ट प्रवृत्तीची माणसे अेखाद्या माफिया टोळीची मुख्य बनतात. अेखाद्या वैश्विक संस्थेचे अध्यक्ष असतात किंवा देशाचे प्रमुखही बनू

शकतात. अशा लोकांना नेहमीच आपण आधुनिक विचारसरणीचे आहोत असे वाटते. पण त्यांना हे माहीत नसते की विरुध्द चुंबकीय धृवाच्या जाळ्यात ते अगदी अलगद सापडू शकतात.

रामायण ह्या महाकाव्याचे लेखक महान संत वाल्मिकी ह्यांचे उदाहरण आपणास देता येइल. पुर्वायुष्यात तो वाटमारी करणारा आणि हिंसक पुरुष होता. रस्त्याने अेकट्या दुकट्या जाणाऱ्या माणसाला लुटणे हाच त्याचा धंदा होता तसे करुनच तो आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करीत असे. अेके दिवशी नारदमुनी त्याला भेटले. त्यांना पकडून तो जवळ जवळ ठार करणारच होता. पण नारदाने त्याला विचारले, असे दुष्ट कृत्य तू का करतोस? वाल्मिकींनी उत्तर दिले, माझे कुटुंब खूप मोठे आहे आणि त्याचे संगोपन करण्याचा इतर कोणताही मार्ग मजजवळ नाही. नारदांनी विचारले, ते तुजसाठी काय करतात? वाल्मिकी म्हणाले, मी सांगेन ते काहीही' नारदाने विचारले. तुझ्यासाठी ते प्राण देतील? वाल्मिकीनी अत्यंत विश्वासपूर्ण शब्दात उत्तर दिले, 'अर्थातच, त्यांच्यापैकी सर्व माझ्यासाठी प्राणार्पण करतील.' नारद म्हणाले, हा तुझा भ्रम आहे मी तुला सिध्द करुन दाखवेन की ते सर्व स्वार्थी आहेत ते तुझ्यासाठी मरावयास तयार होणार नाहीत त्यांना फक्त तू वाईट मार्गाने का होइना मिळवलेला पैसा हवा आहे. त्या लुटारुने हे मान्य केले. नारदाने वाल्मीकीस खोटेच मरावयास सांगून त्याचे शव नारदाने वाल्मिकीच्या घरी नेले. नारदाने घरातल्यासर्व लोकांना बोलाविले आणि म्हटले, वाल्मिकीसाठी कोणी मरावयास तयार असले तर त्यानेपुढे यावे त्या मृत माणसाचे आयुष्य मी वाल्मिकीस देवू शकतो.वाल्मिकीला को णीही तयार होईल ह्याची खात्री होती. त्याने लुंटमारीचे जे पाप केले ते केवळ तुमची पोटे भरण्यासाठी' कुणीही वाल्मिकीसाठी अशा तऱ्हेने मरण्यास तयार झाले नाही. कुणालाच नारदाचे हे म्हणणे मान्य नव्हते. मरणाचे सोंग घेअून तेथेच पडलेले वाल्मिकी हे सर्व अैकत हाते. ते सर्व अैकून त्यांनी आपल्या कुटुंबाचा सर्वसंगपरीत्याग केला आणि अत्यंत दैवीआयुष्य जगू लागले.

हे जर अेका व्यक्तीबाबत घडू शकते तर ते हजारो बाबतही सहजशक्यआहे. अर्थात वाल्मिकीजवळ अेक चांगले मन सुप्तावस्थेत होते. दुर्दैवाने सध्याच्या काळात नारदही नाहीत आणि वाल्मिकीही नाहीत पण सहजयोगाचा फायदा घेतला तर हजारो लोकांचे परिवर्तन घडविता येइल. जगाच्या लोकसंख्येच्या अेक टक्का लोकांच्या बाबतीत जरी घडले तरी मला खात्री आहे जुलूम सहन करणाऱ्या लोकांवर त्याचा खूप चांगला परिणाम होइल आणि शेवटी जुलूमी लोकांमध्येही ह्यापरिवर्तनाचा प्रसार होइल आणि मग आपोआपच जुलमी लोकांना कळून चुकेल. दुसऱ्यांवर जुलूम करणे ही काही आनंददायक घटना नाही. किंबहुना सध्याच्या आधुनिक युगात विरुध्द चुंबकीय शक्तीचा परिणाम म्हणून हा जुलुम बुमरँग सारखा केव्हा आपल्यावरच उलटेल हे सांगता येत नाही.

साठा करुन ठेवण्याची वृत्ती, अनेक वस्तू आपल्या मालकीच्या असाव्यात अशी हाव सुध्दा माणसाला हिंसक गुन्हा घडविण्यास भाग पाडतात. ही हाव मग जमीनीची मालकी अमाप संपत्ती ह्या अनेक प्रकारे असू शकतो. स्वतंत्र समाज, राज्ये आणि राष्ट्रे आपापसात ह्याच हावीपायी भांडताना दिसतात, असे म्हटले जाते. जगात येता तेव्हा आपल्या मुठी घट्ट बंद असतात पण आपण ह्या जगातून जातो तेव्हा आपले हात उघडे असतात. ह्याचा कदाचित असाही अर्थ असेल की तुम्ही ह्या जगात येताना जमेल तेव्हढे ओरबडून घ्यावे ह्या कल्पनेसह येता, पण जाताना मात्र जे तुम्हाला शक्य असेल ते मिळवलेले सारे तुम्हाला येथेच सोडून जावे लागते. दुसऱ्या जगात जाताना तुम्हाला रिकाम्या हातानेच जावे लागते. मला हे माहीत नाही की किती जण स्वर्गात जातात आणि किती नरकात. स्वर्ग आणि नरक दोन्हीही शेवटी पृथ्वीवरच आहेत. जेव्हा लोक दुसऱ्यांचा छळ करून त्यांना नरकयातना देतात. खरं म्हणजे त्या लोकांनी दिलेल्या तळतळाटामुळे ते स्वतःच नरकात जातात असे म्हटले जाते की सर्व आपण केलेल्या कर्माचेच फळ असते, करावे तसे भरावे!

उदाहरणार्थ अेखाद्या मुक्त विचारसरणीच्या माणसाने आपले खूप नुकसान होइल ह्याची पर्वा न करता पक्षांना मुक्त विहार करु दिला किंवा आपल्या जमीनीवर गुरांना चरवयास सोडले. पण समजा तो अेकदम त्या जमीनीच्या मालकी हक्काची कमालीची काळजी करु लागला आणि जनावरांना आणि इतर व्यक्तीना दूर ठेवण्यासाठी त्याने जमिनीभोवती भले मोठे कुंपण घातले तर? असा माणूस अर्थातच अत्यंत संकुचित आणि स्वार्थीच असणार. कदाचित तो स्वतःच्या वडिलांना, भावाला, बहिणीला, मुलांना, मित्रांना आपल्या ह्या जमीनीवर पायही ठेवू देणार नाही. अर्थातच येणाऱ्या प्रत्येकाचा, अगदी अेखाद्या मुलाचाही तो द्वेषच करणार असा टोकाचा संकुचीतपणा व्यक्तीठायी आणि राष्ट्राच्या ठायी दिसून येतो आणि मग हिंसा ही राष्ट्रभावना बनते अशा ठिकाणी! आता तर पाश्चिमात्य राष्ट्रात कुणीही, अगदी कोणे अेकेकाळी त्यांनी लुटून घेतलेल्या वसाहतींमधील कुणीही आपल्या देशात येऊम नये ह्यासाठी काळजी घेतात. आता तर परदेशी माणसावर कायम परदेशी हाच शिक्का राहावा असे प्रयत्न ते करत आहेत. खरं म्हणजे हे परदेशी त्यांच्याच बोलविण्यावरून तिकडे गेले असतात. गेल्या कित्येक दिवसांपासून ते तिकडेच स्थायिक झालेले आहेत. पण आता पाश्चीमात्य लोकांना शुध्द व पवित्र होण्याची जणू तहान लागली आहे. त्यांच्या स्वच्छ कपड्यांवर परदेशी लोकांचे रक्त त्यांना नको आहे. आपले अनेक भारतीय पश्चीमेकडे स्थायिक होण्यासाठी का येवढे धडपडतात. अत्यंत वेगळ्या संस्कृतीत अत्यंत नीच स्तरावर जगणे का पसंत करतात? कारण तेथे तुम्ही खूप वरच्या स्तरावर असल्याखेरीज किंवा

येनकेन प्रकारेण भरपूर पैसा मिळविल्याखेरीज तुम्हाला मान मिळणे शक्यच नसते.

दुसरीकडे भारतामध्ये चित्र दिसते, की इथला समाज अनेकविध बहुमुखीआहे. भारतामधील लोक अत्यंत धार्मिक आणि भूमातेला पूज्य समजणारे आहेत. तरीही असे अनेक भारतीय आहेत की जे जगात सर्वत्र परदेशी होण्याचा त्रास सहन करीत आहेत. भारतामधले स्वतंत्र आयुष्य उपभोगण्यापेक्षा पैसे मिळविणे ह्या गुंतागुंतीच्या जाळ्यात अडकत चालले आहेत, आणि भारतामधल्या लोकांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असे भासवत आहेत. फारच थोडे भारतीय अमेरिका, इंग्लंडमध्ये खऱ्या अर्थाने श्रीमंत आहेत. बँकेकडून घेतलेले कर्ज आणि त्याचे व्याज इतके वाढते की ते फेडणे शक्य होत नाही आणि बँका त्यांची स्थावर मालमत्ता जप्त करतात.

इटलीमधले भारतीय आधुनिक इटालियन्स सारखेच राहतात, त्यांचीच भाषा बोलतात. पाश्चिमात्य लोकांची अस्वस्थ जीवनशैली त्यांनी कधीच आत्मसात केलेली आहे. व इटालियन लोकांसारखे सुट्टी उपभोगायला गेले नाहीत तर त्यांच्यावर टीका होते तरी देखील मला असेच म्हणावे लागेल की परदेशांत गेललेल्या बहुतांशी भारतीयांनी पाश्चीमात्य लोकांचे बेताल जगणे त्यांनी फारसे स्वीकारलेले नाही. उत्तर भारतीय तिथेही अत्यंत पारंपारिक पध्दतीने राहतात आणि भारतात जसा पत्नीचा छळ केला जातो तसाच तिथेही करतात. कॅनडामधल्या अनेक गुजराथी पुरुषांनी समसंभोगी लोकांची अेक संस्थाच स्थापन केली आहे. कॅनडामधल्या तथाकथित सुधारणावादी भारतीयांनी ह्या गोष्टीची मोठ्या प्रमाणात जाहिरातही केली आहे. इतर भारतीयांना लज्जेने झुकावे लागावे असेच त्यांचे वर्तन आहे. त्यांना सभ्यपणा आणि प्रतिष्ठा ह्याचे कुठलेही भान नाही. जेव्हा हे अनिवासी भारतीय भारतात परत येतात ते त्यांच्या आईवडिलांकडे आणि देशाकडेही, तुच्छतेने पाहतात. कारण पाश्चीमात्य देशात त्यांच्याकडे उत्तम स्नानगृहे, भव्य प्रासादतुल्य घरे आणि स्वच्छ रस्ते ह्या सुखसोयी असतात, त्या इकडे नाहीत. आपल्या चुकीच्या कल्पनांनी भारतीयांना अपमानित करण्या अेवजी, त्यांनी भारतामधल्या आपल्या कुटुंबातच स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला तर? मला अेका माणसाने सांगितले होते , भारतात विशेषतः पंजाबमध्ये भ्रष्टाचार सर्वत्र पसरलाआहे व हिंसाचारही भरपूर आहे. त्यांमुळे त्याला त्याच्या जन्मभूमीत परत जायची इच्छाच होत नाही. जर सर्वांनीच आपल्या देशातल्या समस्यांपासून पळ काढला आणि देशाकडेच पाठ फिरवली, तर दुसऱ्या देशातही त्याला नक्कीच मान मिळणार नाही.

आपल्या सरकारने, हाती घेतलेल्या विश्वशांतीच्या कार्यक्रमाचा जर आपण विचार करत असू नक्कीच ह्या विश्वशांतीचा नव्या दैवीचक्रात समावेश झाला पाहिजे. असे काही प्रतिनिधीही निवडले गेले आहेत. दैवीसाधन त्यांची निवड करण्याचे अेकमेव कारण

मुळातच त्यांची चांगली वागणूक असलेले म्हणून ख्याती आहे ते शुध्द चारित्र्याचे आहेत. त्यांचे हे शुध्द चारित्र दैवी प्रकाशाने जणू चकाकत आहेत. अर्थातच ते दैवी विचारसरणीचे आहेत. पैसा किंवा शक्ती त्यांना कःपदार्थ वाटते. आधीच ह्यासारखे अनेकजण आहेत, त्यात अजूनही भर पडतच आहे. सर्व नकारात्मक गोष्टींचा त्याग करण्या इतकी शक्ती त्यांच्यात ह्या दैवी ताकदी मुळे आलेली आहे. सर्वच मानवजातीचा शांततेचा आनंद उपभोगणे हा मूलभूत हक्क आहे. सर्वच शांतताप्रिय लोकांनी त्यांच्या अहंकाराचा त्याग करावा आणि दैवी इच्छेच्या स्वागतास तयार व्हावे.

# ५

# पाश्चिमात्य संस्कृती

—

कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या समाजाच्या इतिहासाचे फलीत स्वरुप असते. त्यांचा विश्वास, त्यांची विचारधारा, त्यांच्या भावना, त्यांच्या प्रेरणा, त्यांचे आदर्शवाद हे सारे इतिहासातूनच आलेले असते आणि त्यांच्या अेकमेकांच्या वागण्यातून आणि परसंस्कृतीतल्या लोकांशी वागण्यातून देखील हे प्रगट होत असते. संस्कृती, समाजाच्या शांततेची, सभ्यतेची आणि नितीमत्तेची उंची दाखवित असते. सुसंस्कृत समाजातील माणसे साधी सरळ आणि दैवी शक्ती लाभलेली, आंतरिक सुसंस्कृतपणा, शांतता, प्रामाणिकपणा आणि सद्सद्विवेक बुध्दी निर्माण करणारी असतात. सगळीकडे, सुसंस्कृतपणामुळे गोड आणि चांगल्या भाषेचा वापर केला जाअून अेक प्रकारचे शांततामय कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण निर्माण होवू शकते.

पण ह्या आधुनिक युगात, हे सर्व जे आपणास वारसा हक्काने मिळाले होते, त्याचा आपण त्याग केला आहे. आणि आणखीनही धक्का दायक असो की जणू हे सर्व असेच घडावे म्हणून आपण उत्सुकतेने अपेक्षा करीत होतो. अशा प्रकारचा समाज माणसाला नेहमीच, कसेही, असमतोल वागण्याची परवानगी देत असतो, आधुनिक युगात घरगुती जीवनाच्या अंतस्थ गाभ्यातच आंतरिक स्वाभिमान, किंवा प्रगती करणे ह्याला काहीच महत्व उरले नाही. त्यामुळे खाजगी जीवनावर अशा काही लोकांचाच प्रभाव आला की, ज्यांनी स्वातंत्र्याच्या नावाखाली समाजाच्या रचनात्मक संगोपनात्मक आणि धोरणात्मक ताकदीला आणि शिस्तीलाच उध्वस्त केले आणि म्हणूनच पश्चिमेकडील लोक अेकमेकांचा आदर करायचा असतो ही गोष्टच विसरुन गेले. मानवी आयुष्यातल्या खाजगी जीवनाला, अगदी खाजगी अवयवांना देखील मग त्यांच्या लेखी काहीच किंमत उरली नाही आणि मग

नग्नतेचा पुरस्कार करणारे लोक, अनेक प्रकारच्या चित्रविचित्र फॅशनच्या नावाखाली, पुराणयुगातील आदिवासींसारखे नाचत, वेड्यावाकड्या हालचाली करीत आपल्या शरीराचे प्रदर्शन करु लागले.

थोडक्यात, हे लक्षात येते की आधुनिक युगाचे सौंदर्यशास्त्र हे कुठल्याही प्रकारच्या सभ्यतेविरहित असेच आहे. त्यात स्वाभिमानशून्यताच आढळते आणि अर्थातच हे असे का हे समजण्यासही वेळ लागत नाही. खरोखर ज्यावेळेस आपण आपल्या स्वतःला अत्यंत निर्लज्ज आणि अविचारी संस्थेचा अेक नगण्य हिस्सा समजतो, ज्या संस्था साधारणतः अेखाद्या भोंदूबाबानेच चालविल्या असतात, किंवा कार्नेविल, हॅलोविन सारख्या मुर्ख सणामध्ये भाग घेत चित्रविचित्र चाळे करत असतात किंवा कोणतेही अर्थशून्य मंत्र बडबडत असतात. त्यावेळेस त्यांच्या समाजात आपण आपल्या स्वतःशीच कसे वागत असतो हे पाहणेही भयानक आहे. आधुनिक लोक मानवी व्यक्तीत्वाचा आदर ठेवणे ही मूळभुत भावना जपताना दिसत नाहीत, ज्या पध्दतीने ते आपल्या नीच दर्जाच्या ,किंबहुना पशुतुल्य वागणूकीचे प्रदर्शन समाजात(ज्याचे स्पष्टीकरण शास्त्रीय दृष्ट्या केलेले आपण नेहमीच पाहतो) लोक करतात त्याचा पायाच मुळी फ्राईड किंवा सादे ह्याच्या विचारसरणीचा आहे; जी विचारसरणीच मुळी असे सांगते की माणसाने आपल्या स्वतःमधल्या हीन वागणुकीला, भोंदूपणाने न वागता तोंड देणे आवश्यक आहे.

पण ह्या सर्व गदारोळात मानवी जीवनाचे ध्येय काय आहे? ह्या अत्यंत महत्वाच्या गोष्टीकडेच सध्या कुणाचे लक्ष जाताना दिसत नाही. समाजातल्या ह्या अतिरिक्त गुणनिधान घडामोडी इतक्या पराकोटीला गेल्या आहेत की कुटुंबातल्या अेखाद्या तरुण मुलाला, जो अगोदरच ह्या विनाशकारी व्यवस्थेत आकंठ बुडाला आहे, वठणीवर आणणे ही अशक्य कोटीतली गोष्ट होअून बसली आहे.

दहा वर्षापुर्वीची गोष्ट, रोममध्ये, विकसित आणि विकसनशील देशातील प्रदर्शन तेव्हा भरले होते, ते पाहण्यास मी गेले होते. जेव्हा मी ब्रिटीश मंडपात पोहचले तेव्हा असे दिसले की ते अत्यंत भिकार गबाळ्या रंगाच्या हॅटस, कपडे, रुमाल तेथे विकत होते. मंडपासमोर काही इटालियन्स उभे होते व ते कुचेष्टेने जोरजोरात हसत होते. माझ्याबरोबर असलेल्या तरुणीला मी विचारले ते का हसत आहेत? ती म्हणाली, इटालियन लोकांची उपहासाची जाणीव अजून खूपच जागृत आहे. गबाळ्या रंगाची ही आधुनिक लाट नक्कीच हास्यास्पद होती इतकेच नव्हे तर तसे गबाळे रंगाचे वस्त्र परिधान केलेले काही लोक माझ्या कार्यक्रमाला आले होते ते तक्रार करीत होते की त्यांच्या दृष्टीच्या शक्तीत काहीसा बदल झाला आहे. मी त्यांना सल्ला दिला हे टुकार, रंगवलेले रंग तुमच्या डोक्यावर वापरु नका, त्याचाच परिणाम तुमच्या डोळ्यावर झाला

असेल. त्यांनी उत्तर दिले, मग काय बिघडले? आमच्यापैकी बरेच जण त्यावेळेपर्यंत आंधळे झाले असतील, सब चलता है,'त्यांचे हे उत्तर अैकून आणि आपली तथाकथित ओळख समाजात प्रस्थापित करण्यासाठी वाटेल ते गमावण्याची त्यांची तयारी पाहून मी थक्कच झाले. मला त्यांना कळकळून सांगावेसे वाटले, बाबारे प्रत्येक व्यक्तीमत्वाची स्वतंत्र ओळख ही त्याच्या स्वतःत दडून बसली असते, बाह्यात्कारी कपड्यात अथवा केशरचनेत नव्हे.'

जोपर्यंत तुम्ही स्वतःला ओळखत नाही तोपर्यंत तुमचे स्वतःचे अस्तित्व कसे तयार होईल? तुम्हाला स्वतःला ओळखल्याखेरीज तुमची जी ओळख असेल अर्थातच ती कृत्रिम असेल, आणि जेव्हा तुम्ही दुसरी जीवनशैली स्वीकाराल ती आपोआपच विरघळून जाईल. महमदसाहेबांनी कुराणात तर असे म्हटले आहे की तुम्ही स्वतःला ओळखले तरच अल्लाला ओळखाल.

हे तर नक्कीच आपण समजू शकतो की प्रजासत्ताक राज्यांनी प्रत्येकाला जे स्वातंत्र्य दिले आहे ते स्वतःचा आणि पर्यायाने समाजाचा नाश करण्यासाठी नव्हे. असे विनाशकारी लोक समाजात अश्या काही कल्पनांचा प्रसार करतात की ज्यायोगे समाजात काही खळबळ निर्माण होईल म्हणजे ह्या प्रजासत्ताक देशात समाजाचा नाश बाहेरुन नाही तर आंतस्थ शक्तीनेच कला जातो. अशा देशात लोकांना स्वाभिमान नसतो, नातेसंबंध ते जाणत नाहीत. स्वतःच्या अस्तीत्वाचा अत्यंत दैदिप्यमान अर्थही त्यांच्या लक्षात येत नाही. सर्वप्रथम ह्या सर्व गोष्टींमुळे समाजात अेक गंभीर समस्या निर्माण झालेली दिसते. वैवाहिक जीवनातला साथीदार निवडण्याचे पुर्ण स्वातंत्र्य येथे सर्वांना आहे. इतकेच नव्हे तर विवाहित व्यक्ती देखील साथीदार निवडते. हव्या तितक्या वेळा, फारसे कोणतेच महत्वाचे कारण नसताना घटस्फोट घेते. नअु वेळा/ दहा वेळा लग्न केलेले महाभागही येथे आढळतात जणू जास्तीत जास्त वेळा घटस्फोट घेतल्याचा विक्रम त्यांना करायचा असतो.

मी अमेरिकेतल्या वर्तमानपत्रात आठव्यांदा लग्न करुन आपल्यापेक्षा वयाने बऱ्याच लहान असलेल्या पतीबरोबर मधुचंद्राला निघालेल्या अेका स्त्रीची कथा वाचली होती. तिचे मधुचंद्राला जाणे पाहण्यासाठी सुमारे चार हजार लोक तिच्या बागेत जमले होते म्हणे. इतकेच नव्हे तर दहा हेलिकॉप्टर्सनी, बागेत जमलेल्या लोकांवर वर्षाव करण्यासाठी पॅराशुटसही ठेवले होते, ह्या धावपळीत काही जण चक्क झाडावर पडले. जी माणसे आता काही वयाने लहान नाहीत असा पोरकटपणा, मुर्खपणा कसा करु शकतात? आणि त्यांना पोक्त तरी कसे म्हणायचे, जर जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण इतका बालीश आणि बावळट असेल ? जेव्हा ते असा काहीतरी मुर्खपणा पाहण्यात आपला वेळ वाया घालवितात तेव्हा त्यांना आपल्या वेळाची काहीच किंमत कळत नाही असेच म्हणावे लागते.

असाच एक भयानक तमाशा जेव्हा ८०/९० वर्षाचे वृध्द तरुणासारखे वागताना टी.व्ही.वर पाहिला, जेव्हा काही नट आणि नट्या एका कार्यक्रमासाठी जमून शेकडान्स करत होते. पार्टी संपल्यावर जेव्हा ते आपल्या गाडीकडे जाऊ लागले तेव्हा काठीचा आधार घेतला असूनही ते थरथरत हाते. खरं म्हणजे वार्धक्याने झुकलेल्या ह्या लोकांसाठी अशा तऱ्हेचा कार्यक्रम ठेवण्याचीच काय गरज होती? आधुनिक पोशाखाद्वारे त्यांनी शरीर झाकले असले तरी त्यांचे थरथरणे आणि सुरकुत्या थोड्याच लपू शकत होत्या?

जास्तीत जास्त तरुण दिसण्याची ही शर्यत लोकांना कुठवर नेणार आहे? केवळ तरुण वागतात तसे वागून तरुण दिसण्यात काय मतलब? खरं म्हणजे वृधत्व हे शहाणपणाचे आणि परिपक्वतेचे लक्षण नव्हे काय? शहाणपणाने आणि अनुभवाने परिपुर्ण असलेले प्रौढत्व हा अेखाद्याचा अभिमानाचा विषय बनावयास हवा. वृध्दांचा आदर करणे, त्यांना योग्य मान देणे हे नक्कीच तरुणांचे कर्तव्य आहे. पण प्रौढच जर आधुनिक युगातल्या ह्या वेडेपणाच्या लाटेवर स्वार होवू लागले तर? आपण एवढेच म्हणू शकतो. पर्वतावरुन पायथ्याशी प्रचंड वेगाने घसरत यावे तशी परिपक्वतेची ही घसरण चालू आहे. आजच्या उदारमतवादी समाजानेच हे स्वातंत्र्य त्यांना बहाल केले आहे.

वृध्दांमध्ये आज कोणत्याच प्रकारचे शहाणपण, चातुर्य दिसत नाही अगदी जबाबदारीच्या, राजकारण्यांमध्येही हे शहाणपण आढळत नाही. वास्तववादाचाच हा परिणाम येव्हढेच आपणास म्हणता येईल.

मी तर अेका मासिकात(फोटोग्राफर्स जर्नल, जुलै १९९४) असे वाचले की स्त्रियांनी असे कपडे घालावेत की ज्यायोगे त्या आकर्षक व मादक दिसतील. त्यासाठी त्यांनी आपले पाय, आपले खांदे किंबहूना शरीराचा जास्तीत जास्त भाग उघडे टाकणारे कपडे घालावेत. ह्यामुळे त्या पार्टीमध्ये किंवा रस्त्यातही पुरुषांना आपल्याकडे आकर्षित करु शकतील. आपल्या स्वाभिमानाला ठेच पोहचविणारे असले विधान पाश्चिमात्य स्त्रियांनी अैकून तरी कसे घेतले? पुरुषांचे गुलाम होवून वेश्या व्यवसायासारखे व्यवसाय त्या कशा स्वीकारतात. त्यांचे चारित्र्य जपून ठेवण्याइतका आदर त्यांच्या स्वत:जवळ शिल्लक नाही? अशी संस्कृती स्त्रियांना नक्कीच वेश्या व्यवसायाच्या पातळीला पोहचवत असेल. काही प्रसिध्दी माध्यमे अक्षरश: दलालाचे काम करुन त्या स्त्रियांना आपल्या स्वदेहाकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याचे सांगतात खरे पाहता देह म्हणजे देवाचे मंदीर.! मग ह्या पवित्र देहाचा उपयोग पुरुषाच्या दुर्बलतेचा फायदा करुन घेऊन त्यांना आपल्याकडे आकर्षित करुन घेण्यासाठी का करावा? देहविक्रय हा पाश्चिमात्य देशातला सगळ्यात मोठा व्यापार बनला आहे. वेश्यांना कदाचित हा व्यवसाय पैसे मिळविण्यासाठी नाईलाजाने करावे लागत असेल. पण प्रतिष्ठित स्त्रियांचे काय?

विवाहित स्त्रिया, आया, मुली, आज्या यांनी आपले स्थान तर गमावलेच आहे पण लतेसारखी आधार देणारी ही प्रतिमाही नष्ट केली आहे. अत्यंत धूर्तपणे स्त्रियांना समाजाच्या ह्या सगळ्यात खालच्या पातळीवर आणून ठेवले आहे. आणि मग अशा स्त्रियांना आपला देह आकर्षित ठेवण्यासाठी मरेपर्यंत मेहनत घ्यावी लागते. पुरुषांशी लढण्यासाठीच नव्हे, तर स्वतःशी लढण्यासाठीही शक्ती अेकत्रित करावी लागते. कुटुंबातील त्यांनी निपुण अेक नैतिक व्यक्ती म्हणून स्वतःचे स्थान निर्माण करायला हवे. त्यांनी स्वतःला कुटुंबप्रमुख म्हणून सिध्द करायला हवे. अेक चांगला समाज घडविणे आणि त्यांचे लालनपोषण करण्याची जबाबदारी त्यांची आहे. पण स्वतःला समाजात नग्न वा अर्धनग्न करुन त्या आपली ही पवित्र ताकद नाहीशी करत आहेत.

ह्या उलट, इस्लाम समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोणही दुसऱ्या टोकाचा धोकादायक आहे. हजरत मोहमंदने स्त्रियांना संरक्षण देणे आणि त्यांना सुखद जीवन भोगायला मिळावे, ह्यासाठी सांगितलेल्या नियमांचे इतक्या कर्मठ काटेकोरपणे पालन केले जाते की त्याचा उलट परिणामच होतो. धार्मिक नेते हजरत पैगंबरांच्या संदेशाचा अगदी चुकीचा अर्थ लावताना दिसतात. सगळा चांगुलपणा, सज्जनपणा हा फक्त स्त्रियांकडून अपेक्षित आहे. पुरुषांकडून नाही. आई, अथवा बहिण कुणीही कुटुंबातील स्त्रीशक्ती असो, ती भिंतीच्या छायेतच कायम वावरत असते. खरं म्हणजे पुरुषवर्ग आपल्या कामातच व्यस्त असल्याने स्त्रियांच्या, आईच्या हातातच कुटुंबाची सत्ता असते तरी देखील ही परीस्थिती दिसते. मुलांकडे पहायला किंवा त्यांना शिकवायला त्या पुरुषांना वेळच नसतो. तरीदेखील मुस्लीम समाजात अनैतिक वर्तनाचा दाखला देअून अनेक स्त्रियांना दगड मारुन ठार केल्याच्या अनेक घटना सापडतात.

ज्या समाजात स्त्रीचा आदर केला जातो. असाच समाज स्त्रियांमुळेच अेक आदर्श समाज बनू शकतो. अशा आदरणीय स्त्रियांच समाजाला वाचवू शकतात, समाजातल्या चमत्कारिक गोष्टी बाजूला काढू शकतात आणि कुटुंबाला चांगले वळणही देतात. त्यांच्याजवळ स्वाभाविक अत्यंत संयम असल्याने आपल्या मृदू वागण्याने त्या आपल्या मुलांना आदर्श नागरिक बनवू शकतात. ह्याउलट पश्चिमेकडील स्त्रिया आपल्या अनैतिकतेचा ढिंडोरा पिटवतात. त्यांना त्यांच्या बेबंद, व्यभिचारी वागण्याचा दुराभिमान असतो. आपण किती पुरुषांना घायाळ केले हे सांगण्यातच त्यांना कृतकृत्यता वाटते. त्या स्वतःबरोबरच पुरुषांचाही नाश करतात.

मला, लंडनमध्ये आलेल्या अेका अमेरिकन स्त्रीने विचारले, ''तुम्ही कधी पब मध्ये गेला आहात?'' मी उत्तरले, ''मी कधी मद्यपान करीत नाही,'' त्यामुळे मी पबमध्ये गेलेले

नाही. ती म्हणाली, ''तुम्हाला माहीत आहे,'' माझ्याजवळ लंडनमधल्या अत्युत्तम पबची यादी आहे. मी म्हटले, ''मला नाही माहीत.'' ती म्हणाली ''येथे अेक हॅरोविच पब नावाचा पब आहे. तेथला अेक माणूस मृत्यु पावला आहे. तरीही तो तेथे वावरत असतो. त्याच्या वापरातल्या सर्व वस्तू तेथे राखून ठेवण्यात आल्या आहेत. फक्त त्याचे शरीर तेथे नाही. मी तेथे गेले आणि पिण्यातली बेहोष मजा उपभोगली.'' नंतर ती म्हणाली की ती अत्यंत मुक्त, उदार विचारसरणी असून ती आपल्या मुलालाही मद्यपान करु देते.' तुम्ही मद्यपान का करत नाही, तुम्ही ते करायला हवे. मला दोन मुलेआहेत अेक १४ वर्षाचा व दुसरा बारा.! ते दोघेही मद्यपान करतात. विशेषतः त्यांच्या वाढदिवशी तर मी स्वतः त्यांना मद्य देते. नंतर काही दिवसानी मला कळले तिच्या धाकट्या मुलाने आपल्या समवयस्क मित्रांबरोबर आपला वाढदिवस साजरा केला. तिने स्वतः आपल्या हाताने त्या सर्वांना अल्कोहोल दिले असणार. आई, वडील आपल्या शयनगृहांत होते. मुलांच्या हातून दारु सांडली, तिने पेट घेतला आणि संपूर्ण घर आगीच्या भक्षस्थानी पडले. संपूर्ण कुटुंब तर मृत्युमुखी पडलेच, पण काही अतिशय वाईट तऱ्हने भाजले. आपण काय करत आहोत ह्याचे हे किवी दुःखद उदाहरण आहे? का वागतो आपण असे?

अत्यंत सुसंस्कृत आणि प्रगत समाज अनेक मार्गाने आपली नैतिकता, परिपक्वता आणि शहाणपण प्रगट करत असतो. सध्याच्या दिवसात लोकांजवळ वागण्याच्या कुठल्याही चांगल्या पध्दती नाहीत. ते वापरतात ती भाषा अत्यंत गलीच्छ आणि असभ्य असते, वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या पार्टीत सांगितले जाणारे विनोद इतके नीच पातळीवरचे असतात की अेखाद्याला वाटेल ह्या लोकांनी ते शब्द नक्कीच वेश्यागृहात अैकले असणार. सिनेमातील बिमिच्छ भाषा ऐकून तर अेखाद्या सज्जन माणसाला आश्चर्याचा धक्काच बसेल. असे शब्द आदिवासी लोकांकडून किंवा अडाणीकडून उच्चारले जात नाहीत. तर हे शब्द सामाजिक जीवनात ज्यांना अगदी वरचे स्थान लाभले असते,अशा राजकारणी नेत्यांकडून, मुत्सद्यांकडून किंवा खास नेमणूक झालेल्या राजदूतांकडून वापरले जातात, अगदी न्यायालयात देखील अेखाद्याला असभ्य शिव्या अैकायला मिळतील. लहान मुलेही लैंगिक शिक्षण मिळवण्यासाठी पोनोग्राफिची पुस्तके वाचताना दिसतात. हा शाळेत उघडपणे लैंगिक शिक्षण दिले जाण्याचा परिणाम नव्हे काय?

अेकदा अेकाने मला कुमारवयातल्या मुलांसाठी कादंबरी देण्यास सांगितले होते. म्हणून मी दुकानात गेले होते. पुस्तके चाळताना मला लहान मुलांची खूप छान छान चित्र असलेले अेक पुस्तक दिसले. अत्यंत उत्सुकतेने ते पुस्तक हातात घेतल्यावर मात्र मला धक्काच बसला. कारण त्या पुस्तकात लहान मुलीने की होल मधून बघितलेल्या

दोन स्त्रियांमधल्या विकृत लैंगिक चाळ्याचे अत्यंत भडक वर्णन केले होते.

नरकातून वेगवेगळ्या विकृत कल्पना आणून त्या पांढऱ्यावर काळे करुन छापण्यात हे लेखक जरा जास्तच हुषार असतात. साहजिकच त्यांच्यापैकी बहुतेकांना पारितोषिके मिळतात. पैसाही भरपूर मिळतो. जर अेखाद्या लेखकाने अेखाद्या माफिया किंगवर पुस्तक लिहिले व त्यांत त्याचे वागणे किती न्याय्य होते हे सांगून कुटुंबासाठी काहीही करावयास तयार असलेला अेक धीरोदात्त नायक म्हणून त्याचे उदात्तीकरण केले, तर तो लेखक नक्कीच करोडपती होवू शकेल.

अेकदा मी सहज चौकशी केली की वैवाहिक जीवनातल्या प्रेमाबद्दल हे लेखक लोक काय म्हणतात? तर पुस्तकांवर अभ्यास करणाऱ्या काही लोकांनी तश्या प्रकारचे पुस्तक इंग्लीश, इटालियन, स्पॅनीश किंवा अमेरिकन भाषेत नसल्याचे सांगितले. अगदी चांगल्या पुस्तकातही हे वर्णन नसते. बार्बरा कार्टलॅंडचे अेखादे प्रणयरम्य पुस्तक तुम्ही वाचायला घेतलेत तर नायक, नायिकेच्या लग्नापर्यंतच ते संपलेले तुम्हाला दिसेल.

कोणत्याही मार्गाने मिळवलेला पैसा हाच ह्या संस्कृतीचा अेकमेव निकष मानला जातो. इंग्लंडमध्ये अेक मुलगी,कॅबेरे करीत, अर्धनग्न नृत्य करीत असताना पोलीसांनी तिला पकडले. त्याबद्दल तिच्या आईवडिलांना ना खेद ना खंत ! उलट सगळे कुटंबीय तिचा कार्यक्रम टी.व्ही.वर बघत असत. 'जोपर्यंत ती पैसा मिळवत आहे; तोपर्यंत तिच्या वागण्याला हरकत घ्यायचे कारणच काय? हाच उलट त्यांचा प्रश्न होता. त्यांनी हे सर्व सहजतेने स्वीकारले होते. मुख्यत्वे अमेरिकेत तरुण मुले आपल्यापेक्षा वयाने कितीतरी जास्त असलेल्या स्त्रियांशी लग्न करतांना दिसतात. अगदी ज्यांच्या गोवऱ्या स्मशानात पोहचले आहेत अशा स्त्रियांशी देखील,! जर अशा स्त्रियांनी जाहीर केले की त्यांना मृत्युच्या दारात पोहचवणारा पण संसर्गजन्य नसलेला काही रोग झाला आहे तर त्यांच्या आत्म्याला संतोष देण्यासाठी अनेक मुले लग्नाला तयार होतात. ती स्त्री लवकर मेली नाही तर ते घटस्फोट घेतात. पोटगी मिळवून श्रीमंत होतात. ह्याअुलट अनेक तरुणी वृध्दांशी लग्न करताना दिसतात की जे लवकर मरतील व त्यांच्या अफाट संपत्तीची ती कायदेशीर मालकीण बनेल.

पैसा हे आनंद मिळवण्याचे अेकच साधन आहे ह्या भ्रामक समजुतीपायी हे सारे घडत आहे. पैसा खर्च करताना तात्पुरता आनंद कदाचित मिळू शकत असेल पण आंतरिक शांती मिळाल्याखेरीज अेखाद्याला रात्रीची झोप येणेही कठीण होवून बसते. रात्रभर बॅंकेत असलेला पैसा दरोडेखोरांकडून किंवा सभ्य दरोडेखोरांकडून कसा वाचवायचा हाच विचार मनात असतो.

खरं म्हणजे पैसा तेव्हाच अेखाद्याला आनंद देवू शकतो जेव्हा अेखाद्याने तो दानधर्मात खर्च केला असतो, कलानंदासाठी खर्च केला असतो. निर्मितीक्षम कलाकारांसाठी, सूज्ञ

लेखकांसाठी आणि कवीसाठी, त्यांच्या कलेसाठी खर्च केला जातो. अशा प्रकारे केलेला खर्च आनंदाचे विश्व मिळवून देणारा ठरु शकतो. अुलट लोभी, श्रीमंत लोकांचा पुढे इतिहासात समाजाचे शिकारी म्हणूनच उल्लेख केला जातो. आयुष्यभर ते पापाचरणी असतात. भारतामधील राजकारणी तर इतके स्वार्थी आहेत की त्यांना आपल्या घराच्या भिंती नोटांनी मढव्यावाश्या वाटतात.

खरंच आधुनिक युगातली ही आजारी आणि रोगिष्ट माणसांचीच संस्कृती नव्हे काय? तर आपल्यापैकी काही माणसे ह्या आंधळ्या 'रॅटरेस' मधून बाहेर पडले तरच समाज किती अधोगतीला, नरकाच्या दिशेने चालला आहे हे ते पाहू शकतील. त्यांनी हाही विचार करावयास हवा की, आपल्या संस्कृतीकडे उत्सुकतेने, अपेक्षेने पाहणाऱ्या आपल्या भावी पिढीसाठी भविष्यात काय वाढून ठेवले आहे ? अर्थात बहुतेक गौरवर्णीयाची वंशवृध्दी अगदी कमी होत असल्याने, त्यांना मुले नाहीत. मग येवढ्या प्रचंड पैशाचे ते काय करणार आहेत आणि मग आपोआपच त्यांच्यापैकी बरेचसे आपल्याला अश्या काही घातक सवयी लावून घेतात की ज्यायोगे ते स्वतः बरोबरच देशाचाही नाश ओढवून घेतात.

मला नेहमी वाटते की बहुतेक पाश्चिमात्य देशातल्या स्त्रीपुरुषांच्या मेंदूत अेक मोठा दोष असा आहे की त्यांना वाटते दैवी शक्ती नावाचा काही प्रकार अस्तीत्वातच नाही. त्यामुळे चालू बाजारात जे घडते त्या गोष्टी ते स्वीकारतात. सुमारे २५ वर्षापूर्वी समुद्रकिनाऱ्यावर सुट्टी घालवणे हे कुणाला माहीतही नव्हते. पण सध्याच्या दिवसात ते समुद्रावर सूर्यस्नान करावयास जाण्यासाठी सर्व पैसा साठवितात. ग्रीनहाउस इफेक्टने खरे तर त्यांच्या स्वतःच्या देशातही ते उकडहंडीत उकडले जात असतात आणि आपण जे करत आहोत ते अगदी बरोबर करत आहोत असे समजणाऱ्या लोकांना शोधावयास अेखाद्याला फार दूर जायला नको. अर्थात असे लोक झुंडीनी सापडत असले तरी त्यांच्याशी तुम्ही काही दैवी जाणीवेबद्दल बोलायला गेलात तर ते लवकरच कंटाळतात. आधुनिक लोकांचा हा अेक आणखीन् विषेश सद्गुण !

ह्या उलट मोठमोठी प्रसिध्द वर्तमानपत्र देखील सनसनाटी बातम्यांनी बरबरटलेली दिसतात. त्याचबरोबर नरकातल्या सैतानासारख्या काही लोकांकडून ह्या प्रकारची अनेक विकृत पुस्तकेही लिहिली गेली आहेत. अशा पुस्तकात नैतिकता नाही, काय चांगले काय वाईट ह्याचे तारतम्य नाही अशा गोष्टी, घातक गोष्टी लोक कश्या स्वीकारतात हे समजणेच कठीण आहे. सॉमरसेट मॉम आणि क्रोनिनच्या पिढीतल्या अनेकांनी कितीतरी सुंदर आणि सभ्य पुस्तके लिहीली आहे. त्याही अगोदर बर्नाड शॉ, रसेल आणि इतरही अनेकांनी जीवनाचे अंतिम सत्य उलगडून दाखविणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या होत्याच. त्याद्वारे त्यांनी प्रत्यक्षात

अनैतिक असलेल्यापण चांगल्या गुणांचे आहोत असे भासविणाऱ्या नायकांपेक्षा आदर्श नायक कसे असावेत हे वाचकांना दाखविले. पण सध्या मात्र लेखक वाईट दुर्गुणी नायकांचे वर्णन करताना दिसतात, त्यांचे यश दाखवून त्यांचे उदात्तीकरण करतात.

आधुनिक युगातल्या शाळांनी तर मुलांच्या निरागसपणावर हल्ला करण्यास सुरुवात केली आहे. वयाच्या अवघ्या सातव्या आठव्या वर्षी मुलांना लैंगिक शिक्षण देणे ही किती अयोग्य गोष्ट आहे. अशा मुलांना लैंगीक शिक्षण देणे काय उपयोगाचे की ज्यांवर शारिरीक अत्याचार झालेले आहेत. लैंगिक शिक्षण आणि हिंसा दाखविणाऱ्या टेलीव्हिजन सारख्या प्रसारमाध्यमांकडून विकृत पध्दतीने उद्दीपित झालेल्या भावनांना आवर घालता येणे अशक्य आहे. खरी गरज आहे ती संस्कृतीमध्ये अंतर्बाह्य बदल होण्याची आणि खऱ्या अर्थाने आधुनिक समाज निर्माण होण्याची.! खरं म्हणजे मुलांना लैंगिक जीवनाची ओळख त्यांच्या पालकांनी त्यांच्याशी हळूवारपणे बोलून, करुन घ्यायला हवी. अगदी त्यांच्या वयात येण्याच्या वेळेलाच ही गोष्ट व्हायला हवी. अेका स्त्रीला आपल्या वयात येणाऱ्या मुलीसाठी काही गर्भ निरोधक गोळ्या हव्या होत्या. मी त्या स्त्रीला मुलीला माझ्याकडे पाठविण्यास सांगितले.मी त्या मुलीस लैंगिकतेमधील धोके समजावून सांगितले. भारतामध्ये अनेक तरुणी लग्नाच्या अगोदर निसर्गतःच कुमारी असतात. कारण त्यांचे पालक त्यांच्याशी व्यवस्थितपणे बोलतात. थोडक्यात लैंगिक शिक्षण उघडपणे दिले गेले तर मुलेही आपापसात त्याच विषयावर बोलत राहतील आणि त्यांचा निरागसपणा कधीच नष्ट होअून जाईल.

# ६

# धर्म

जुन्या जमान्यात सर्वच धर्मात असे सांगितले गेले होते की स्त्रीने अथवा पुरुषाने धार्मिक विचारांच्या द्वारे आपल्या मनाचे क्षालन करावे आणि आयुष्य धार्मिक पध्दतीने व्यतीत् करावे. साधकाच्या आयुष्यातले चढअुतार सुलभ जावेत असे वेगवेगळे मार्ग शोधून काढणे आणि आयुष्याचा समतोल राखणे हे प्रत्येक धर्माचेच ध्येय होते. जुन्या काळी चांगल्या गोष्टीत प्रगती करणे, प्रामाणिक असणे ह्याच गोष्टी महत्त्वाच्या समजल्या जात. संत, प्रेषीत, किंवा अवतारी पुरुषांनी जे काही सांगितले असेल त्याबरहुकूमच त्याकाळी वागले जात असे.

१६ व्या शतकात किंवा अगोदर भारतामध्ये खुप महान संत होअून गेले ते सर्वजण बहुतांशी कवी होते. त्याआधी बाराव्या शतकात देखील दैवी जीवनाबद्दल लिहिणारे महान लेखक होते. सर्वसामान्यांच्या दैवी उध्दारासाठी आत्मशुध्दीची प्रथम गरज आहे हाच मुख्यतः त्यांच्या लिखाणाचा गाभा होता. आपण स्वतःला अतरंगातून शुध्द करुन घेतल्यावर जी गोष्ट आपणास प्राप्त हेते तीच मानवाचा दुसरा जन्म होय. हाच उध्दार, हीच मुक्ती! मानवी जीवनाचे हेच ध्येय असावयास हवे.

मी अेकदा 'जीझस भारतात काश्मीरमध्ये आला व शालीवाहन नावाच्या राजास भेटला' ह्या विषयावरले अेक पुस्तक वाचले होते. ह्या भेटीचा तपशील लेखकाला जुन्या संस्कृत पुराणात मिळाला. कदाचित त्या लेखकाला संस्कृत फारसे येत नसावे. त्यात असे लिहिले हाते. राजा शालिवाहनाने येशूस त्याचे नाव विचारले. त्याने 'इसा मसिहा' असे सांगितले. राजाने विचारले तू इथे का आला आहेस? येशू म्हणाला मी ज्या देशातून आलो आहे तिथले लोक 'म्लेंच्छ' आहेत. ह्या म्लेछ लोकांना फक्त अनैतिक असभ्य असावयास हवे

आहे. त्या काळात भारताबाहेरुन येणाऱ्या लोकांना म्लेंछ संबोधले जाई आणि भारतामधल्या लोकांची अशी धारणा होती की ह्या म्लेंच्छांना आत्मोद्धराची काहीच कल्पना नाही. काय असेल ते असो लॉर्ड येशू आणि शालिवाहन राजाशी असे बोलणे झाले. शालीवाहनाने येशूस म्हटले. 'तू परत जाऊन, त्यांना शुध्दीकरणाचे आणि निर्मळ तत्वाचे (स्वच्छतेचे तत्व) धडे का देत नाहीस? मला वाटते येशू परत गेला, नंतर सव्वातीन साडेतीन वर्षांनी रोमन लोकांनी त्याला सूळावर चढविले कारण त्यांना स्वमुक्तीची फारशी पर्वा नव्हती, सध्याच्या काळात ज्या पध्दतीने चर्च, लोकांच्या अनैतिक जगण्याला पाठींबा देते, विवाहबाह्य संबंधांचा पुरस्कार करते, तेथेले पुजारी जेने ची विचारसरणी योग्य असल्याचे बोलतात. त्यावरुन खात्री पटते की जुने भारतीय पाश्चीमात्य लोकांना म्लेंच्छ म्हणत होते ते अगदी योग्यच आहे. मी ह्या जेनेच्या विचारसरणीचा उहापोह केलाच आहे.

फ्रेंच लोकांना भारतात फिरंगी म्हणून ओळखले जाई ज्याचा अर्थ होतो सरड्यासारखा रंग बदलणारा, किंवा बेताल, व्यभिचारी सुखासाठी कृत्रीमतेने वागणारा. नंतर आलेल्या ब्रिटीशांना ते संबोधू लागले'साहेब' म्हणजे स्वतःच्या कपड्यालत्याचा अभिमान बाळगणारा, कुठलेही दैवी आत्मबल न लाभलेला अहंकारी, स्वतःला प्रत्यक्ष परमेश्वर समजणारा.

बायबलच्या म्हणण्यानुसार शरियतची शिकवणूक हे जेरीमेहच्या प्रकरणातच लिहिली गेली आहे हे कायदे मोझेसने ज्यू लोकांना दिले. आपल्या 'दहा आज्ञा' घेऊन मोझेस जेव्हा परतला, तेव्हा अेका अत्यंत मागासलेल्या लोकांचे दर्शन त्याला झाले. त्याने असा विचार केला की ह्या लोकांना कडक शिस्तीचा बडगा दाखविला तरच ते नैतिक शिस्त आणि स्वच्छतेच्या जवळपास पोहचू शकतील. अेरव्ही इतक्या अनैतिक लोकांना अध्यात्माचा शोध कसा लागायचा? शरियतचा स्वीकार ज्यू लोकांनी केला नाही पण कालांतराने तो मुस्लिमांनी स्वीकारला. त्यांना असे जाणवले की ज्यू लोकांची हा कायदा स्वीकारण्याची पात्रता नाही. पण ज्या लोकांना इस्लाम धर्मानुसार आचरण करायचे आहे. अशा लोकांसमोर हा कायदा ठेवावयास हरकत नाही. इस्लामचा अर्थच मुळी दैवी ताकदीला शरण जाणारा असा आहे ! मला असे जाणवते की हजरत महमद साहेबांच्या शिकवणीचा चुकीचा अर्थ लावला जातो. मोहमद साहेब असे वागणे अशक्यच. आपल्या संपूर्ण आयुष्यात दयेवर प्रवचन करणाऱ्या महमद साहेबांनी स्त्री पुरुषांवर इतकी कडक बंधने घातली असतील हे काहीसे असंभव वाटते.

काय असेल ते असो. पण हे सर्वच धर्म पालन करणे अत्यंत कठीण काम आहे. येशुचे म्हणणे होते तुम्ही आत्मशुध्दी करा. तुमच्या जाणीवेवर तुमचा अधिकार असू द्या. आणि तुमच्या अंतर्चक्षूंनी जे दिसेल तेच पाहा. तुमचे काय चुकले आहे ते जाणून घ्या आणि तुम्ही

स्वतःच ती चूक सुधारण्याचा प्रयत्न करा, नाहीतर, त्याचे म्हणणे असे (बायबलमधील मॅथ्यूचे प्रकरण) की जर तुमच्या अेका डोळ्याने पाप केले (अेखाद्या स्त्रीकडे दुसऱ्यांदा नजर उचलून पाहिले तरी) तर तुम्ही तुमचे डोळे काढणेच योग्य ठरेल. जर तुमच्या हाताने काहीही चुकीचे, पापाचरण केले. तो हात कापून टाकणेच योग्य तो म्हणे तुमच्या अेका गालावर कुणी प्रहार केला तर त्या व्यक्तीपुढे तुम्ही तुमचा दुसरा गाल करा. कल्पना करा. ख्रिश्चन लोक आपल्या अेका गालावरची चपराक तरी सहन करतील?

ख्रिश्चनांच्या स्वतःच्या देशात ते लोक ज्या पध्दतीने लोकांची कत्तल करतात आणि तरीही स्वतःला 'आंधळ्याची काठी' म्हणवून घेतात हे पाहून आश्चर्यच वाटते. आपण हे खूप चांगल्या तऱ्हेने समजू शकतो की सध्याच्या प्रगत आधुनिक व्यक्तीला हे अशा प्रकारचे कायदेकानून पाळणे ही सर्वस्वी अशक्य गोष्ट आहे. हे कठीण कायदे ख्रिश्चनांचे नाहीत, नसतील पण बायबलमध्ये पॉलने ते सर्वप्रथम सांगितले सहजयोगाच्या दृष्टीकोणातून तो टीकाकार होता. त्याने पीटर ह्या सर्वात अविश्वासू ख्रिश्चनाने लिहिलेले खोटे नाटे शोधून काढले होते. मग अश्या माणसाला सात टेकड्यावर चर्च बांधायला येशू परवानगी कशी देतील. उलट, येशूने म्हटले होते की सैतान तुमच्यावर राज्य करेल, सैतान म्हणजे कोण तर जे ख्रिस्त विरोधी होते ते!

ख्रिश्चन धर्मानुसार कोणा अेखाद्याला धार्मिकदृष्ट्या लायक बनणे हे अत्यंत अवघड कार्य आहे. कारण पापाचरणाच्या संदर्भात ते अेखाद्या साधू किंवा देवदूताप्रमाणे हळूवार असतात. तरीही संपूर्ण ख्रिस्ती राज्यात मी तरी कोणी हात कापलेला किंवा डोळे काढलेला पाहिलेला नाही. ह्याचाच अर्थ, चर्चमध्ये जाणे, अशा अेखाद्या माणसाचे प्रवचन अैकणे की आत्मशुध्दीच्या जवळपासही तो पोहचलेला नसतो किंवा दैवी बाप्तीस्मा ही त्याने घेतलेला नसतो, इथपर्यंतच ते ख्रिश्चन धर्माचे पालन करतात हेच सिध्द होते.

मला अेकदा खूप आश्चर्य वाटले, जेव्हा इटलीमधल्या आमच्या यजमानांनी मला विचारले, तुमचा कार्यक्रम शेकडो लोक तासन्तास बसून अैकतात हे कसे? त्यांना कधीच कंटाळा येत नाही? कारण चर्चमध्ये तर १५/१५ मिनिटांनी आम्ही घड्याळाकडे पहातो आणि अर्धा तासाच्या वर अेक मिनिटही चर्चमध्ये थांबू शकत नाही. चर्चमध्ये जाणे ही सामजिक घटना असू दे पण ती इतकी कंटाळवाणी असते की तिथून उठून आम्ही पबमध्ये गेलो नाही तर परस्परांशी भांडायलाच लागू. सर्वसाक्षी परमेश्वराचे आशिर्वाद घेतल्यावर सुध्दा ते मद्यपान करावयास इतके उत्सुक कसे होतात?

ह्यावरुनच असे म्हणता येईल की ह्या ख्रिश्चन देशातील लोक येशून जे जे काही करायला सांगितले आहे त्याच्या अगदी विरुध्द पध्दतीने वागतात. शुचितेच्या संदर्भात

त्याने तर अगदी सूक्ष्म विचार केलेला दिसतो कारण तो म्हणतो की टेन कमाडमेंटस् अैकत असताना तुम्ही डोळ्याची पापणीही हलवू नका. पण तुम्ही हलता कामा नये असे नुसते म्हटले जाते. तुम्हाला धक्का बसेल पण पाश्चिमात्य देशात स्थिर डोळ्यांचे स्त्रीपुरुष शोधून काढणे ही महाकठीण गोष्ट आहे. अगदी कुणी आंधळे असले तर गोष्ट वेगळी! त्यांची नजर सतत अेका व्यक्तीवरुन दुसऱ्या व्यक्तीकडे भिरभिरत असते आणि ती नजर अर्थातच लोभ आणि वासना ह्यांनीच बरबटलेली असते. अेका व्यक्तीवरुन दुसऱ्या व्यक्तीकडे इतक्या प्रचंड वेगाने त्यांचे लक्ष कसे जाते हेच महान आश्चर्य आहे. कदाचित त्यांच्या मेंदूमधील डोळे नियंत्रित करणारा खिळा थोडासा ढिला असावा. अेका गोष्टीवरुन दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष पुरवता पुरवता ते कदाचित वेडे होतील.अशा फळशून्य गोष्टीसाठीही माणसाचे मन, नजर इतकी चंचल कशी?

येशूनंतर महंमदसाहेब होअून गेले आणि कदाचित त्यांच्या लक्षात आले हे सर्व कायदेकानून तर फक्त पुरुषांसाठीचे आहेत. बायकांचे काय? तेव्हा त्याने ठरविले ह्या स्त्रियांसाठीही काहीतरी करायला हवे. अर्थात मुस्लीम लोकांनाही स्त्रियांना तुच्छ लेखावे किंवा त्यांचा छळ व्हावा असे वाटत नाहीच. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे स्त्रीने जीवनात योग्य आणि नैतिकतेच्या वाटेवरुन वाटचाल केली. तर आपोआपच पुरुषही नितिमान बनू शकतील, कारण स्त्रियाच पुरुषांना घडवितात. त्यांनी पवित्र स्त्रियांचा कायम आदरच राखला, महमदसाहेबांना अेकूणच स्त्रियांविषयी प्रचंड आदर होता. येशूच्या मातेचा तर ते विशेष आदर करीत. पॉलने कदाचित तो स्त्रीद्वेष्टा असल्याने, बायबलमध्ये ती अेक सामान्य स्त्री होती असे म्हटले आहे. महमद साहेबांना जे आदी परमेश्वराचे प्रेषीत होते, अवतार होते. येशूची आई कोण होती, ह्याची पूर्ण जाणीव होती. सहजयोगात तर मदरमेरीला महालक्ष्मी संबोधून तिची पूजा केली जाते. असो. महमदसाहेबांना स्त्रीने अनैतिक वागणे किंवा तिने वेश्याव्यवसाय करणे आजिबात मान्य नव्हते. इस्लाम धर्मात विवाहित स्त्रीससाठी खूप कठोर आचरण सांगितले आहे. कुराणमध्ये तर ते असे म्हणतात जर पापी व्याभिचारी स्त्री आढळली तर तिला वाळूत कमरेपर्यंत पुरुन दगडांनी मारावे(ज्यायोगे ती मरेल.) कुराण ज्याने संपादित केले. त्यांनी, मुव्वय्यानी हे सांगितले की प्रत्यक्ष महमदसाहेबांनी, ह्याबद्दल मी साशंक आहे. पण अेक मात्र नक्की इस्लाम राष्ट्रात ह्या कायद्याचे अत्यंत काटेकोरपणे पालन होते. आणि ते भयानकच आहे. अशा तऱ्हेच्या अघोरी शिक्षा तथाकथित पापी स्त्रीला ठोठावणे हेच केव्हढे पाप आहे? काय असेल ते असो, एक मात्र नक्की की आजच्या आधुनिक युगात महमदसाहेबांनी सांगितल्या बरहुकूम नितिमान व्यक्ती सापडणे ही महाकठीण गोष्ट आहे. बहुतेक करुन मुस्लीम फक्त भितीपोटी आपण नितीमान असल्याचा आव आणतात.

महमद साहेबांनी पुरुषांच्या बहुपत्नीत्वाला मान्यता दिली कारण त्यांना विवाहबाह्य संबंध मान्य नव्हते. त्याकाळी अनेक स्त्रिया पतीनिधनानंतर जगण्याची धडपड करणाऱ्या होत्या. टोळीयुध्दात पुरुष मारले गेल्याने हे प्रमाण अधिकच होते. मोहमदसाहेबांच्या विरुध्द पुकारलेल्या टोळीयुध्दातही अनेक तरुण मारले गेले होते. साहजिकच अनेक तरुणींना लग्नांची संधी मिळत नव्हती. म्हणूनच त्याकाळी त्याने जे काही केले ते काळाची गरज म्हणून आवश्यकच होते. महमद साहेब आणि येशू ख्रिस्त केवळ दैवी पुरुष होते असं नव्हे तर ते अवतारी पुरुष होते. लोकांनी आपला अहंकार, आणि आढ्यता ह्यांचा त्याग करुन पृथ्वीवर अेकप्रकारचे शुचीपूर्ण वातावरण निर्माण करण्याच्या महत्वाच्या कामगिरीवरच ते ह्या पृथ्वीतळावर अवतरले होते. ह्या अगोदरचे पुरोगामी प्रचंड अहंकारी आणि आंधळे आढ्यताखोर होते. ते स्वतःला सर्वोत्तम धर्माचे सर्वेसर्वा समजत. ते असा दावा करत असले तरी प्रत्याक्षात धर्म ह्या शब्दाच्या जवळपास पोहचण्याचीही त्यांची लायकी नव्हती.

पृथ्वीतळावर आलेल्या, ह्या अतिशय पवित्र आत्म्यांना कदाचित हे समजूच शकत नव्हते की ही बहुमूल्य सूचना आपण कोणत्या प्रकारच्या लोकांना द्यावी. ह्यानंतर स्वतःला इस्लाम धर्मीय किंवा ख्रिश्चन धर्मीय समजणाऱ्याची प्रतिक्रिया खूपच वेगळ्यातऱ्हेची होती. खरं म्हणजे सध्याच्या आधुनिक युगात अेखाद्याने अंतर्मुख होअून स्वशोधासाठी प्रार्थना केली आणि नमाज पढला तर त्यात चुकीचे काय आहे? वय वाढत गेले की त्यामध्ये अेक प्रकारची यांत्रिकता येत जाते. हे का म्हटले जात आहे, हे असे का केले जात आहे ह्याचे कारण त्यांचे त्यांनाही माहित नसते. पण हे सर्व सर्वसाक्षी परमेश्वराला जाणून घेण्यासाठी, त्याच्या दयाळूपणाचे परिवर्तन आपल्यात होण्यासाठी, त्याच्या महानपणाचा, त्याच्या दैवीपणाचा साक्षात्कार व्हावा म्हणून हे करायचे. जाणीवेशिवाय प्रार्थना म्हणजे कोणत्याही कनेक्शनखेरीज टेलीफोन करणे होय. नमाज म्हणजे कुंडलिनी जागृत करण्यासाठी चक्रांच्या शुध्दीकरणाचा अेक मार्ग होय.

आता आपण आधुनिक युगात निर्माण झालेल्या अेका अत्यंत वेगळ्या प्रकारच्या मानवाकडे बघूयात. ही माणसे तथाकथित पुरोगामी लोकांच्या, आज्ञा अत्यंत आंधळेपणाने पाळतात. त्यांना धर्माची मूलतत्वेही माहीत नसतात. खरं म्हणजे त्यांनी स्वतःचा शोध घ्यायला हवा. ते स्वतः काय आहेत आणि ह्या धर्माच्या सहाय्याने त्यांना नक्की काय बनायचे आहे. नक्की कोणत्या प्रकारचे समजाजीवन त्यांना अभिप्रेत आहे. जर त्यांनी हे सर्व उतावळ्या आंधळेपणाने केल तर ते स्वतःसाठी आणि अवघ्या जगासाठीही फार मोठी समस्या निर्माण करतील.

उदाहरणार्थ, जर तुम्ही तुमच्या चित्तवृत्तीवर नियंत्रण ठेवले, जर तुम्ही तुमच्या मनाला चांगले जाणून घेतले आणि तुम्ही जर अंतर्मुख झालात तर तुम्हाला आत्मशुध्दीसाठी आणि

स्वनियंत्रणासाठी खूप मोठी ताकद देइल. पण सध्याच्या आधुनिक युगात प्रत्येक जण स्वतःचा अहंभाव आणि स्वतःच्या अटीतटी कुरवाळण्यातच अत्यंत व्यस्त असतो. त्यांचा अहंभाव खूपच बलवान असतो आणि अेकदा का त्यांनी धार्मिक कर्मकांडाचे ( ज्याला ते धर्म समजतात.)कठोरपणे पालन करुन मनावर नियंत्रण ठेवण्यास सुरवात केली की ते आणखीनच अहंकारी बनतात. कारण ह्या सर्व गोष्टी त्यांनी अहंकारापोटीच केलेल्या असतात. म्हणूनच मूलतत्ववादी फक्त स्वकेंद्रीत आणि कमालीचे कर्मठ असतात. त्यांच्याकरता मन म्हणजे केवळ कल्पना आहे, अहंभाव निर्माण होतो आणि मग तो मनाला विरुध्द दिशेने खेचू लागतो. अहंभाव त्यांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो. परिणामतः मनात मोठ्यात मोठा अहंभाव निर्माण होण्याखेरीज दुसरे काहीच होत नाही आणि मग हा महानअहंभाव माणसाला आंधळे बनवितो. कर्मठपणाही हेच घडविते. त्यांना हे दिसत नाही की त्यांच्या कर्मठपणापायी अथवा अहंकारापायी ते स्वनाश ओढवून घेतात आणि तरीही आपण सर्वश्रेष्ठ आहोत असे समजू लागतात. अहंकार हा दिसू शकत नाही तो फक्त इतरेजनांना दुखवू शकतो. अहंकारी माणसाला मात्र त्याचे काहीच नसते. त्यांचे अहंभाव कुरवाळणे तेव्हाच सुरु होते, जेव्हा ह्या अहंभावाला यश मिळते, असा सामुदायिक अहंकार दैवी तत्वाला फारच धोकेदायक ठरु शकतो. देवाच्या किंवा धर्माच्या नावाखाली हे लोक प्रत्यक्ष ब्रह्मज्ञानालाही विरोध करु शकतात.

इस्लाम धर्मातल्या मूलतत्ववादीच्या मते ते पाश्चिमात्य संस्कृतीला आम्ही विरोध करतो असे म्हणतात. अर्थात त्यासाठी आपण अगोदर, सध्याच्या दिवसात येशूने सांगितलेल्या वचनांच्या खूप दूर गेलेल्या ह्या पाश्चिमात्य संस्कृतीला नीट समजून घेतले पाहिजे. अनैतिकता ही पाश्चिमात्य लोकांची जीवनशैली बनली आहे. पण स्वतः मुस्लीम संस्कृती तर अनैतिकतेत आकंठ बुडाली असताना हा शोध घेणे त्यांना शक्यच नाही. ते स्वतः ख्रिश्चनांच्या पेक्षाही खालच्या पातळीवरच आहेत.

स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणाऱ्या कुठल्याही ख्रिश्चन राष्ट्रात तुम्ही गेलात तर तुम्हाला आश्चर्य वाटेल ते सर्वजण ख्रिश्चन धर्माच्या कोणत्या ना कोणत्या पंथाचे अनुयायी असतात. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये चर्च ऑफ इंग्लंडने सांगितलेला धर्म त्यांना मान्य आहे, फ्रान्सला कॅथेलीक चर्चची थोरली मुलगी मानली जाते. इटलीचे आपण समजू शकतो. जर्मनीचे काही भाग, स्पेन, ऑस्ट्रिया, पोर्तुगाल बेल्जियम आणि इंग्लंड ह्या सर्व देशात देखील कॅथेलिक चर्चचेच राजकीय वर्चस्व आहे. हे चर्च कोणत्याही प्रकारचे ब्रह्मज्ञान कुणालाही देवू शकत नाही. त्यांची ब्रह्मज्ञानाची कल्पनादेखील शेवटी पैशाशी निगडित आहे.(इन गॉडस नेम हे पुस्तक वाचा) ज्या पध्दतीने पॅसिफिक महासागराच्या पट्ट्यात

फ्रान्स विनाशाचे प्रयोग करत आहे ते पाहिले की हे सर्व कॅथालिझमचा कसा दुरुपयोग करत आहेत हे लक्षात येते. ह्यादेशाला मी वारंवार गेले आहे, माझे असे स्पष्ट मत आहे की पॅरीस हे शहर नरकाचे द्वार आहे आणि तेथूनच अनैतिकता पसरवली जाते.

ह्या देशांमधून अशी अेखादी तरी व्यक्ती सापडेल का की तिने वैयक्तिक जीवनात अथवा सामाजिक जीवनात येशूने सांगितलेल्या महान शिकवणींचे तंतोतंत पालन कले आहे. ते फक्त नावाला ख्रिस्ती अनुयायी आहेत ह्या महान धर्माच्या मूलतत्वाखेरीज फक्त राजकीय नियंत्रणासाठी ते धर्माचा उपयोग करुन घेतात. ब्रह्मज्ञानाद्वारे नैतिकता समजून घेण्याची त्यांची ज्ञानपातळी पाहिली की आपल्याला धक्काच बसतो. उदहरणार्थ ते लोक भरपूर मद्यपान करतात, कारण त्यांच्या मते ख्रिश्चन धर्मात मद्यपानाला परवनगी आहे. कारण येशू स्वत: अेकदा अेका लग्नाला गेले असताना त्याने पाण्यापासूमन दारु निर्माण केली. हिब्रू भाषेत वाईन ह्या शब्दाचा अर्थ द्राक्षरस असा आहे. मग ह्या वाईन शब्दाचा ते बेनेडेक्टीन, फ्रेंच वाइन किंवा स्कॉच व्हिस्की असा चुकीचा अर्थ कसा लावतात. खरं म्हणजे अगदी अचानक, थोड्या कालावधीत कुणीही अल्कोहलीक वाईन बनवू शकणार नाही. हे अगदी सरळ आहे. कारण ती आधी खूप आंबवावी लागते तेव्हाच कुठे खर्चिक, बेहोष नशा आणणारी दारु बनू शकते, जर ती खूप खूप जुनाट वास येणारी अनेक वर्षांपासून कुजवून ठेवलेली अशी असली तर खूप महाग, किंमतीला ती विकली जाते. म्हणजेच येशून बनविलेल्या वाईनपेक्षा ही वाईन अगदी अलग आहे. असे समजणे अगदी सोपे आहे की येशू नेहमीच सतर्क सावधपणा बद्दल प्रवचन द्यायचा मग अल्कोहोलिक नशा येणाऱ्या दारुबद्दल जी निसर्गाच्या अगदी विरुध्द आहे आणि जिच्यामुळे मानवाच्या सावधपणाचे, अर्थशून्य वागण्यात परिवर्तन होते. तिच्याबद्दल, तिचा प्रसार करण्याचा प्रयत्न तो कसा करेल?

कॅनडामध्ये मला अेकजण भेटला, तो अत्यंत हुषार होता. कुठल्याशा इंग्लिश विद्यापीठातून त्यानं डॉक्टरेट केली होते. मला आश्चर्य वाटले ते असे की त्याच्या प्रबंधाचा विषय होता 'ब्रह्मज्ञान मिळवण्यासाठी लागणारा सावधपणा मिळवून देण्यास अल्कोहोल कसे उपयोगी पडते ? आणखीनही गंमत म्हणजे युरोपमधल्या अनेक लोकांचा विश्वास आहे की ड्रग घेतल्यावर अेक प्रकारचा अत्यंत उच्च प्रतीचा सावधपणा येवू शकतो ज्यायोगे ते आपला दैवी उध्दार घडवून आणू शकतात. खरं म्हणजे हा विवेकशुन्यतेचा उच्चांक आहे. पण हे त्यांना कोण सांगणार? विशेषत: फ्रान्समधे ते लवकर पिण्यास सुरवात करतात, त्यामुळे संध्याकाळचे सहा वाजल्यानंतर ते तुमच्याशी बोलूही शकत नाहीत. मला हे समजतच नाही की ही सर्व माणसे धर्माच्या नावाखाली मद्यपान कसे करु शकतात? अगदी 'येशूच्या भोजनोत्सवाच्या वेळेलाही ते येशूसमोर

वाईन आणि कडक पावच ठेवतात आणि ह्या भोजनाला त्यांच्या भाषेत ते पवित्र भोजन असेच संबोधतात. जी दारु माणसाला आजारी बनविते, अनेक रोगराईचे कारण बनू शकते आणि लहान मुलांना ती देणे तर अत्यंत धोकादायक ठरु शकते ती दारु कोणाच्या दैवी उध्दाराला हातभार लावते ह्यावर कोणी व कसा विश्वास ठेवायचा? आणि का तर म्हणे आपल्या परमेश्वराचे, येशूचे ते रक्त आहे. खरच येशू ख्रिस्ताच्या महान जीवनाचा हा केव्हढा अपमानआहे. जो येशू निरागसतेचा साकार पुतळा मानला जातो.

जेव्हा मी लंडनला होते तेव्हा माझ्या नशीबाने मला माझे घर एका चर्चच्या आणि दारुगुत्याचा अगदी जवळ मिळाले हाते. मी नेहमी पहायचे की लोक दारु गुत्यात जायचे आणि झुलत झुलत कसेबसे बाहेर यायचे. तोवर दुसऱ्या लोकांची आत जाण्याची रांगच लागलेली असायची. तेही आत जायचे आणि त्याच पध्दतीने आतून बाहेर यायचे, ज्या पध्दतीने अगोदरच्या माणसाने आपला खिसा रिकामा केला असतो, अगदी त्याच पध्दतीने इतकेच नव्हे तर अेका कॅथेलिक चर्चच्या मागच्या आवारात ही बीअरची मोठमोठाली टिपे ठेवलेली होती, रविवारखेरीज अेरव्ही तिथे अव्याहत लोकांचे येणे जाणे चालू असायचे. रविवारी अनेक मद्यपी स्त्रीपुरुष ठराविक चर्चच्या विस्तीर्ण पायऱ्यावर दारुच्या बाटल्या घेअून बसलेले असत. ह्या बाटल्या त्यांनी तथाकथित धार्मिक ख्रिश्चनांकडून भिक्षेच्या स्वरुपात मिळालेल्या असत. हे सर्व देवाच्या नावाखाली चालते. काही मद्यपीं असे म्हणत की त्याच चर्चमध्ये दफन केलेल्या काही संतांना भोजन देण्याचे पवित्र कार्य ते करत आहेत आणि म्हणून ते अश्यातऱ्हेने त्या विशिष्ट चर्चमध्ये बसून असत, आणि येणाऱ्या जाणाऱ्याकडून मगभर दारु हिसकावून घेत त्यांचे म्हणणे असे होते की इथे दफन केलेले संत त्यांच्या स्वप्नात येतात आणि ते स्वतःही आमच्या सारखेच भरपूर दारु पिणारे होते. म्हणून ते आम्हाला क्षमा करतात आणि त्या बिशपच्या परवानगीनेच आम्ही दुसऱ्यांनाही दारु पिण्यास भाग पाडतो. इथे अत्यंत खेदाने असे म्हणावेसे वाटते. अनेक संतमहात्मे होअून गेले पण असे चर्चमध्ये भटकणारे, दुसऱ्याचा छळ करणारे आणि चर्चच्या नावाने ओळखले जाणारे कुणी पाहिले नसतील. जणू चर्च आणि बिशपच्या दैदिप्यमान प्रकाशात तेही चमकू लागतात.

इस्लाम धर्मात मद्यपान निषिध्द मानले जाते पण एकदाका एखाद्या मुसलमानास मद्य पिण्याची संधी मिळाली तर तो अेखाद्या आयरीश, स्कॉटीश, रशीयन ह्याच्यापेक्षाही कितीतरी जास्त पितो. ही माणसे ज्यावेळेस फुकट दारु पाजल्या जाणाऱ्या अेखाद्या पार्टीतून बाहेर पडताना जेव्हा दारु न प्यायलेल्या यजमानीण बाईचा हात हलवून निरोप घेतात तेव्हा ती बिच्चारी चक्रावून, सून्न होअून जाते. परमश्वरांचे काही वेळेस आभारच मानयला

हवेत, जेव्हा खूप प्यायल्यामुळे काही मुस्लीमांच्या त्या स्त्रीचा निरोप घेण्याचे लक्षातच रहात नाहीत. अनेक पार्टीत तर माझ्या असे लक्षात आले की अेका अर्थाने मी आणि माझे पती आम्ही दोघेच मुस्लीम असू, कारण इतर खरे मुस्लीम दारु पिण्यात मग्न असत. मला गंमत वाटते इतक्या गुप्तपणे हे सर्वजण कसे काय दारु पिअू शकतात. त्यांच्यापैकी बहुतेकांचा बहुदा असा समज असावा की दारु पिणे आणि स्त्रियांच्या आपल्या जाळ्यात अडकविण्यात खरा पुरुषार्थ आहे. पण तेच अेखाद्या स्त्रीने पिण्यास सुरवात केली तर त्यांना चक्क रच येते. तिला बोल बोलून, छळून ते तिला नष्टच करुन टाकतील. मला माहीत नाही की स्त्रियांसाठी अशा प्रकारचा फतवा काढलेला आहे. भारतामध्ये अगदी ८/८ मुले झालेल्या मुस्लीम स्त्रीला , पुरुष कोणतेही कारण नसताना देखील तलाक देवू शकतो. अुलट नियंत्रण ठेवले असेल तरच ते काहीतरी वेगळे समजले जाते. त्यांना सगळ्यांना नेहमी असेच वाटते की आपणच सच्चे मुसलमान आहोत, आणि कुणालाही ठार मारण्याचा आपणास पूर्ण अधिकारआहे. धर्माच्या नावाखाली ते द्वेषमूलक आणि हिंसक बोलतात, असली नसली नैतिकता दाबूनटाकतात. ह्याचा कुणालाच काहीच उपयोग होत नाही, कारण दाबून टाकलेली नीतीमत्ता स्वतःला सच्चा आणि कर्मठ समजणाऱ्याला विषसमान होवून जाते. अशी माणसे संतापी आणि दुष्ट बनतात आणि सज्जनासारखेआयुष्य जगणाऱ्यांना जीणे नकोसे करुन टाकतात, त्यांना संकटात टाकतात.

'सुफी' ह्या शब्दाचा खरा अर्थ आहे मुक्तात्मा! तुर्कस्थानात मला सत्याच्या शोधात असलेले अनेक जण भेटले. युनुस अैनरेची कविता तर केवळ स्वर्गीय आहे. वैश्विक धर्म आणि दैवी प्रेमाबद्दल तो बोलतो? त्याने आपल्या कवितेत मानवाला परमेश्वराची सर्वात उत्तम निर्मीती मानले आहे. भारतातदेखील निझामुद्दिन औलिया, अमीर खुस्त्रो मोईनिद्दीन खिस्ती, कबीर दास, शिरडीचे साईनाथ, कानिफनाथ ह्या सर्वांनी विश्वअैक्याचा वारंवार उच्चार केलेला आहे.

अेकदा मी अेका मुस्लीम सुदानी सद्गृहस्थाचे भाषण अैकले. तो मक्कामदिनेहून बोलत होता. हजला गेलेल्या हाजींची तेथेखूप मोठी सभा भरलेली होती. मला त्याचे संभाषण अैकून भितीच वाटली. कारण आपल्या त्या प्रवचनात तो असे दाखवत होता की संपूर्णजग हे बळजबरीने मुस्लीम बनवायला हवे. त्याचा चेहरारागाने अगदी लाल झालेला होता आणि तो अत्यंत हास्यास्पद शारीरिक हालचाली करत होता. माझा अेक खूपचांगला अरबी मित्र आहे, माझ्या सुदैवाने तो माझ्या पुढेच बसला होता. तोच मला त्यांचे संभाषण अनुवादित करुन सांगत होता. सुदानी आपण सर्वज्ञ असल्याचा आणि काय बरोबर आहे हे केवळ त्यालाचा माहीत असल्याचा आव आणत होता त्याला जणू वाटत होते ह्या मोक्ष

साधकाच्या कार्यक्रमाचे आपणच सर्वेसर्वा आहोत आणि ह्या संपूर्ण जगाच्या तारणहाराला आपल्या विखारी कल्पनेच्या साह्याने जगावर राज्य करण्याचा पूर्ण हक्क होता. दोन दिवसनंतरच अैकण्यात आले की त्यांच्या ह्या भाषणानंतर झालेल्या भीषण धावपळीत त्या पवित्र भूमीवर हजारो लोक मारले गेले. मला अशी आशा वाटते तो स्वघोषीत तारणहार लोकांच्या मनात कानात नव्या नव्या जहरी कल्पना भरवून देण्यास सुरक्षीत असेल.

मी जेव्हा तुर्कस्थानात गेले होते तेव्हाच मी तुनिसियालाही भेट दिली. मला तेथे दोन प्रकारचे लोक सापडले. तुर्कस्थानात केमाल पाशा ह्यामहात्म्याने स्त्रियांसाठी संपूर्ण स्वातंत्र्य आणि जीवनाची नवी दृष्टी दिली. पण परिणाम असा झाला की अुच्चविद्याविभूषीत आणि श्रीमंत स्त्रीपुरुष जर्मन संस्कृतीचे आचरण करू लागले. ते जर्मनांकडून खूपच प्रभावित झाले होते. ह्याला त्यांच्या मते कारण असे की जर्मनीमध्ये गेलेल्या तुर्की लोकांनी जर्मन लोकांकडून चांगली यंत्रे कशी बनवायची याचे शिक्षण घेतले. त्यायोगेच त्यांना नवी जीवनशैली आपल्या देशात आयात करता आली. खर म्हणजे माझ्या मते मुळचेच तुर्की लोक सर्वच बाजूंनी अत्यंत परीपूर्ण आहेत.

अनेक वर्षापूर्वी जेव्हा व्यापार आणि शोधसफरी म्हणजे महान गोष्ट समजली जाई तेव्हा अर्ध्या युरोपवर तुर्की लोकांचे राज्य होते. कलाकुसरीचा त्यांचा अभ्यास सखोल होता. आजही जुन्या मोगल कलाशैलीवर संपूर्ण त्यांचीच हुकुमत आहे. ते उत्तम स्वयंपाककला आणि शिलाई जाणत होते. किंबहूना त्याच्याजवळ सर्वप्रकारची बुद्धीमत्ता होती. त्यामुळेच आश्चर्य वाटते की ज्या जर्मन लोकांजवळ कोणतीही कलाकुसर नव्हती, अगदी सौंदर्यदृष्टीही नव्हती, अशा अरसिक लोकांकडून तुर्की लोक कसे काय प्रभावीत झाले असतील? कपडयाच्या क्षेत्रातला हरेक नावाचा गालीचा ते बनवितात. कलाकुसरीचा अत्यंतम नमुना मानल्या गेलेल्या त्यांनी बनविलेल्या चांदीच्या भांड्याची आणि हिऱ्यामोत्याने लगडलेल्या सोन्याच्या दागिन्यांची सुंदर नक्कल त्याकाळचे जुने राजेरजवाडे, रशियातील झार कुटुंबीय देखील करत असत. मी काही स्त्रियांना लग्नासाठी माझ्या हॉटेलमध्ये आलेल्या पाहिले. त्या सगळ्याजणी अत्याधुनिक जर्मन स्त्रियांचे अनुकरण करणारे कपडे घालून तेथे आल्या होत्या. अर्थातच ते कपडे जास्तीत जास्त अंग उघडे टाकणारे असेच होते. पाश्चिमात्य देशाचे तर हे लाडके तत्वच आहे, की तेथल्या स्त्रियांनी शक्यतो जास्तीत जास्त अंग उघडे टाकणारे कपडे घालून जास्तीत जास्त पुरुषांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केलाच पाहीजे. दुसऱ्या भाषेत, जरा स्पष्ट बोलायचे तर असे वागून आपल्या मनाजोग्या गोष्टी पुरुषांकडून करुन घेणारा तो अेकप्रकारचा वेश्या व्यवसाय नव्हे काय? खरं म्हणजे पुरुषांना आकर्षित करुन त्यांना

आपल्याभोवती गोंडा घोळवत ठेवण्याची गरजच काय? कुराणमध्ये किंवा बायबलमध्ये अश्या प्रकारची कोणतीच आज्ञा नाही. गोंडा घोळणे हे पापाचरणच आहे आणि त्यामुळे दुभंग व्यक्तिमत्वाची माणसेच तयार होतात.

परिणामतः जे जुने, पुराणमतवादी जाणते लोक आहेत. त्यांचा आपल्या देशातल्या ह्या पाश्चीमात्य संस्कृतीच्या लुडबुडीला विरोधच आहे, मी त्या स्त्रियांशी बोलले आणि त्यांना विचारले, तुम्ही तुमच्या देशातले कपडे का घालत नाही? तुर्कस्थानात पडदापध्दत नाही पण ह्या जुन्या स्त्रिया अेक प्रकारचा जाळीदार बुरखा, किंवा चद्दर परिधान करतात. पाश्चीमात्य संस्कृतीने बरबटलेल्या नव्या स्त्रियांना त्यांची म्हणे भिती वाटते. त्यांच्या कपड्यात लपवून त्यांनी अेखादा हातोडा किंवा बंदूक तर आणली नसेल? ह्या धार्मिक, कर्मठ स्त्रिया काहीश्या रक्तपिपासूच वाटतात. त्यांच्या चेहऱ्यावर शांती म्हणून नसते. तुम्ही तुमच्या संस्कृतीचा स्वीकार का करत नाही? जर तसे केले नाही तर अेक दिवस हे कर्मठ लोक तुम्हाला संपवून टाकतील. मला आश्चर्य वाटले ते असे की मला असा शोध लागला की हे लोक केवळ त्यांचे कपडेलत्तेच जर्मनहून मागवितात. इतकेच नव्हे तर केक आणि अन्नाचीही तिकडून आयात होते. खरं म्हणजे तुर्कस्थानात जगातले सर्वात चांगले अन्न आणि सर्वात चांगले कपडे बनत असताना, हे असे का? ही अेकप्रकारे गुलामगिरीची भावनाच नव्हे काय? हे तुर्की स्त्रीपुरुष न्यूनगंडाच्या भावनेने पछाडलेले आहेत आणि जर्मन लोकांचे अनुकरण करुन ही भावना काही प्रमाणात नष्ट करण्याचा ते प्रयत्न करतात. कोणत्याही प्रकारे भावनिक बुध्यांक विचारात न घेता ही तथाकथित उच्चतेची घौडदौड कश्यासाठी? तुर्की लोक केव्हाही श्रेष्ठच आहेत, दुसऱ्या कुणा संस्कृतीचे अनुकरण करण्याची त्यांना गरज आहे, असे निदान मला तरी वाटत नाही.

मी अेकदा म्युनीचला गेले असताना, अेक बाग पहायला गेले होते. तिथल्या लोकांजवळ ती बाग पाहण्याची इच्छा मी व्यक्त करताच ते मला म्हणाले, माताजी तुम्ही तेथे जावू शकणार नाही.मला आश्चर्यच वाटले का म्हणून ती बाग पहायला मी जायचे नाही. त्यावर ते उत्तरले, ती बाग म्हणजे खूप लोकांसाठी असलेले अेक खुले शयनगृह आहे. दिवसारात्री अनेक लोक तेथे येतात. तेथे जे काही सार्वजनिक रित्या चालेत ते पहायल्यावर तुम्ही तेथे थांबूच शकणार नाही, अगदी कळमळायला लागेल तुम्हाला, खरच ती सूचना देणाऱ्याचे आभारच मानायला हवे. त्यांचे अैकून मी ती बाग पाहयली नाही, नाहीतर कदाचित मी अनेक दिवस आजारीच पडले असते.

पाश्चीमात्य संस्कृती ही प्रामुख्याने लैंगिकप्रधान संस्कृती आहे. उदाहरणार्थ मी स्वीर्झलंडला गेले असताना लेक ल्युझानीला सहलीसाठी गेले होते. तेव्हा पळत पळत अेक

मुलगा माझ्याजवळ आला आणि म्हणाला, माताजी कृपा करुन तिकडे जावू नका मला आश्चर्य वाटले की तिकडे असे काय चालले आहे की जे मी पाहू नये म्हणून हा मुलगा मला तिकडे जावू देत नसावा? तो मुलगा म्हणाला, तिथे सर्व स्त्रिया अर्धनग्न वावरत आहेत! कल्पना करा स्विर्झलंड सारख्या अघोरी थंडीत ह्या बायका फॅशनच्या नावाखाली अर्धनग्न वावरत होत्या. इंग्लंडमध्ये तर त्यांनी नग्न चळवळ सुरु केली आहे. त्या ठिकाणी स्त्रिया कोणतेही कपडे न घालता अत्यंत थंडगार पाण्यात प्रवेश करत असत. टेलीव्हिजनच्या अेका कार्यक्रमात अेका माणसाने त्यांना विचारले. तुम्हाला कसे वाटत आहे? त्या म्हणाल्या, आम्हाला अत्यंत उबदार वाटत आहे. मला आश्चर्य वाटले की ह्या नग्न स्त्रिया पाणी खूप उबदार आहे असे खोटे कसे काय बोलू शकतात. त्यांची नग्नतेची ही लाट केवळ मुक्तीच्या खोट्या कल्पनेपायी आली असावी असे वाटते.

तुम्ही सर्वार्थाने विचार केलात तर लक्षात येईल ज्या येशूने आपले संपूर्ण आयुष्य लोकांच्या पापक्षालनासाठी खर्च केले त्या येशूलाच खोटे पाडण्याचे काम आजची पाश्चीमात्य संस्कृती करत आहे. जे स्वतःला ख्रिश्चन म्हणवून घेतात ते स्वतःच ख्रिश्चन विरोधी कारवायात आकंठ बुडालेले असतात. येशू ह्या जगात पवित्र हेतुने आला होता की लोकांनी तपस्येद्वारे आपला उध्दार करवून घ्यावा. बुध्द आणि महावीराने त्या काळात हेच कार्य केले आणि त्याच ख्रिस्ती लोकांना तपस्या म्हणजे काय हे माहीत देखील नाही आणि दुसऱ्यासाठी ते अेखाद्या सुईचाही त्याग करणार नाहीत. उलट त्यांना दुसऱ्यांना लुबाडणे चांगले जमते. विकसनशील देशात मोठमोठ्या बैठका घेतल्या जातात. निमित्य असते त्या देशांना आर्थिक मदत करण्याचे विकसित देश त्यासाठी नवेनवे मार्ग शोधून काढतात. पण ह्या बैठकांचा भला थोरला खर्च कोण करते? आणि त्या बैठकामधून काय साधले जाते. हाताशी काय येते? ह्या गरीब देशांचे आदरातिथ्य अनुभवण्यसाठी पाश्चीमात्य राष्ट्रपैसा खर्च करतात का?

जगाचा संधीसाधूपणा लोकांच्या तेव्हाच लक्षात येवू शकेल जेव्हा त्यांना वास्तवाचे दर्शन होइल. अन्यथा पैसा हाच सर्वत्र पूजनीय मानला गेलेला धर्म आहे. पैसा हाच अेकमेव स्वतःच परीपूर्ण आहे, थरारक आहे आणि तो ज्याच्या जवळ असतो त्यांचाच वरचष्मा असतो. अुदाहरणार्थ, सुमारे २५ वर्षापूर्वी कुणीही फारसे सुट्टीला जात नसत, पण सध्या मात्र ते वर्षभर पैसा मिळवतात, त्यातला बराचसा सडपातळ होअून आपले शरीर आकर्षक बनविण्यासाठी घालवितात. आणि समुद्र किनाऱ्यावर जातात, लोकांना स्वतःचे डोके नसल्याचेच हे लक्षण आहे. इंग्लंडमधील उत्तरेकडील लोक दक्षिणेकडे जातात. दक्षिणेकडील लोक उत्तरेकडे जातात. फ्रान्स मध्येही असेच, किंबहूना ह्याहूनही वाईट परिस्थिती असते.

कुणी कितीही निर्लज्जपणाने वावरले तरी तेथे लोक त्यांना मारत नाहीत. दक्षिण फ्रान्समध्ये तर आणखीन विशेष गोष्टी घडतात. तेथील लोक खरोखरच उन्मत्त माथेफिरुच बनतात. त्यांनी आपल्या बरोबर अेखाद्या शाळेतून अथवा कॉलेजातून भाड्याने अेखादी मैत्रणी आणली असते. मोकळ्या आकाशाखाली ते उन्मत्तपणे भटकतात, सागराचा अपमान करतात. तेलाच्या तवंगाने तो सागर आधीच प्रदुषित झाला असतो. ही अेक वेगळी कहाणीच आहे. तेलवाहू जहाजांची इतकी भयानक येजा चालू असते, त्यातून विम्याचे पैसे मिळावेत म्हणून त्या तेलवाहू जहाजांचे अपघात घडविले जातात.

शुक्रवारी आणि रविवारी तुम्हाला प्रवास करणे अशक्य व्हावे ही अेक नेहमीचीच गोष्ट झाली आहे कारण घराबाहेर पडून समुद्रकिनारी जाअून सूर्यस्नान घेण्यासाठी धावतपळत निघालेल्या वेड्या लोकांची रस्त्यावर प्रचंड गर्दी झालेली असते, ह्या सूर्यस्नानाने ते त्वचेच्या कर्करोगाला आमंत्रण देत असतात हे त्यांना कळतही नाही. त्यातून प्रत्येक ख्रिश्चन माणसाने रविवारी चर्चमध्ये जाअून, वा घरीही, सर्व मानव जातीच्या, किमान ख्रिश्चनांच्या कल्याणासाठी प्रार्थना करायलाच हवी हा संकेत आहे. पण सध्या ते दिवसभर दारुच्या बाटल्या बरोबर घेअून समुद्रकिनारी ठिय्या मारुन बसलेले असतात. सध्याच्या दिवसात जर्मन लोक ह्या सूर्यापाठोपाठ धावायला आफ्रिकेतही प्रवास करतात. माझी खात्री आहे. अेक दिवस सूर्यस्नान घ्यायला आणि त्वचेचा कर्करोग वाढवून घ्यायला ते भारतातही येतील.(भारतीय डॉक्टरांना आणि टुरीझमला चांगलाच फायदा) पश्चिमेकडे हे अगदी सर्रास चालते आणि त्यांच्या ह्या निर्लज्जपणाला,असभ्यपणाला आणि वेश्यावृत्तीला कुठलीही मर्यादा नाही हेच खरे.

अविकसित देशामधून जे कोणी लोक प्रथम परदेशात जातात त्यांना प्रथम पाश्चिमात्य लोकांच्या ह्या चित्रविचित्र जीवनशैलीचे खूप आकर्षण वाटते. अगदी भारतात सुध्दा आधुनिक जीवनाचा हा शाप अनेक शहरातून पोहचला आहे. नग्नता आणि अनैतिकता विरुध्द दैवी, सभ्य संस्कृती असा तो झगडा आहे. अत्यंत सुनियोजित केला गेलेला तो अेक शापच आहे म्हणा ना. सध्या भारतीयांमध्ये बाथरुम संस्कृती, बोकाळली आहे, फक्त सुगंधीद्रव्याने स्नान करणाऱ्या पाश्चात्यांकडून ती उचललेली आहे.

खरं पाहता भारतीय लोकांना वैयक्तिक स्वच्छतेची जाणीव फार मोठ्या प्रमाणात आहे. जे लोक स्वतःचे शरीर स्वच्छ राखू शकत नाहीत. त्यांनी मनशुध्दीचा किंवा हृदयशुध्दीचा विचारसुध्दा करणे ही किती लांबची गोष्ट ठरते. आता सध्या लोकांचा कल जास्तीत जास्त घाणेरडेपणाने वागणे, असभ्य आणि निर्लज्जपणाचा कळस गाठणे, आणि दैवी ताकदीच्य विरुध्द वागणे ह्याकडेच जास्त आहे. परिणामतः हे लोक विचित्र आणि असाध्य रोगाने

पछाडले जातात तरीही त्यांची संस्कृती ही निसर्गाविरुध्द जाणारी आहे ही मूलभूत गोष्ट ते स्वीकारत नाहीत.

अहंकार हा देखील ख्रिश्चन विरोधी आहे. जर तुम्ही स्वतःचाच आदर करु शकत नसाल तर दुसऱ्या कुणाचा कसा करु शकणार? पश्चिमेकडील लोक हे अत्यंत अहंकारी व उध्दट असतात. त्यांना असे वाटते की नम्रतेने वागणारी व्यक्ती ही अशक्त असते. अुलट येशू असे म्हणत असे की कोकरासारखे गरीब, लीन लोकच पृथ्वीचे खरे वारस आहेत. हे लोक आपल्या अहंकाराची सतत जाहिरात करत असतात, मग इतर जाहिरातीही त्यांच्या अहंकाराला सुखाविणाऱ्या अशाच बनविल्या जातात. मी अेका सिगरेटच्या जाहिरातीत असे वाचले की, ह्या सिगार ओढतांना तुम्ही गर्विष्ट दिसाल सुंदर दिसाल, मुलांना देखील अहंकाराने वागण्याचे शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर आणखीन् अेक आश्चर्य म्हणजे मुलांना दुसऱ्यात वाटेकरु होण्यापेक्षा अेखादी वस्तू हिसकावून घेण्यास शिकवले जाते. मी अशाच प्रजासत्ताक देशाबद्दल हे बोलते आहे की जिथे मानवतेची अथवा दयाळूपणाची कोणतीही समज लोकांमध्ये दिसून येत नाही आणि जरी ते ख्रिश्चन असले तरी आपल्या तारणहार येशून शिकवलेल्या धर्माबद्दल त्यांना काहीही माहीत नाही.

म्हणूनच ख्रिस्ती धर्माचे पुराणे कर्मठ लोक आता काहीसे नव्या प्रकाराचे झाले आहेत. ज्यांचा ह्या नव्या लोकांवर विश्वास आहे. ते फक्त शरीराने चर्चमध्ये जात आणि येताना अेखाद्या हिन्दू स्त्रीला तिने तिच्या सौभाग्याची निशाणी कुंकू लावले आहे म्हणून ठार करतात. ते ख्रिस्ताला पुजतात. स्वतःला त्याच हुबेहूब प्रतिमा म्हणवून घेतात. प्रत्यक्षात मात्र ते अेखाद्या मवाल्यासारखे दिसत असतात. ते कुठेच सूट वगैरे घालत नाहीत. ते अेकाच प्रकारचे गलीच्छ कपडे वर्षभर घालतात आणि तरीही समाजात किंवा अेखाद्या संस्थेत अत्यंत उच्च पदावर वावरत असतात. अेखादा माणूस जर असा गबाळा, गलीच्छ किंवा किळसवाणा पेहराव न केलेला असला तर लोक त्याच्याकडे पाहून हसतात. अेखाद्याने अगदी खेडवळ आणि निरागसच दिसायला हवे, आदिवासींसारखे भले त्यांचा मेंदू कितही आधुनिक असू दे. इस्लामी कर्मठ लोकांचा तर असा विश्वास आहे की ह्या सर्व तऱ्हेच्या आधुनिकतेला शोषून घेतलेल्या आधुनिक कर्मठ, पाश्चिमात्यांविरुध्द आपणास लढायलाच हवे आहे.

अगदी कलेमध्ये आणि निरनिराळ्या प्रकारच्या साहित्यात देखील आपणास असे दिसून येते की असेच अेखादे पुस्तक खूप प्रसिध्दी मिळवते जे मुळात बरेचसे असंबध्द, कमालीचे असभ्य आणि अश्लीलतेने भरलेले असते. कुणी ते पुस्तक फारसे काळजीपूर्वक वाचायची गरज नसते. अन्यथा पुस्तकाच्या शेवटास येइपर्यंत तो नक्कीच नर्व्हस ब्रेकडाअूनचा रोगी बनू शकेल.

फ्रान्समध्ये अशा प्रकारच्या सर्व कल्पना ओतप्रत आहेत. किंबहुना अशा प्रकारच्या कल्पना फ्रान्समधून जगभर पसरतात. त्याठिकाणी लोकांनी ज्यांचे अनुकरण करावे असे आदर्श नाहीत. आदर्शवादाचा जणू मेरी अँटोनेटच्या मृत्यूनंतर शेवटच झाला अर्थात तिला लोकांनीच ठार मारले होते आणि स्वतः बुझ्र्वा बनले होते. त्यांचे संपूर्ण आयुष्यच बदलले त्यांच्या चालीरिती बुझ्वी लोकांसारख्या बनल्या आणि म्हणूनच मग ते स्वतःच दंडधारी बनले व आपल्या राजाला व राणीला फासावर टांगले. नंतर तर सर्व समाज व्यभिचारी व असभ्य बनला. येशू ख्रिस्ताने पाश्चिमात्य लोकांसाठी आवश्यक मानलेल्या कुठल्याच गुणाची ते पर्वा करेनासे झाले. काही घावरलेल्या फ्रेन्च सहजयोगींना ह्या सर्व गदारोळापासून आणि फ्रान्समधल्या अनैतिक समाजापासून आपल्या मुलांना वाचवावेसे वाटले. म्हणून काही फार थोड्यांनी आमच्या सहजयोगाच्या शाळेत मुलांना घातले, आमच्या ह्या शाळेत सर्व जगातले लोक येतात. पण कॅथेलिक चर्चची अेक झापडे लावलेली संस्था आहे. त्यांनी आमच्या ह्या शाळेला अेवु अेका मुलासाठी खूप त्रास दिला. परिणामतः आमच्या ह्या शाळेत फ्रेंच मुले येत नाहीत. त्यांना कदाचित भिती वाटत असावी की ही फ्रेंचमुले नितीमान वगैरे झाली तर कॅथलीक परंपरावादी समाजात ती अयोग्य ठरतील.

जगातल्या सर्व प्रजासत्ताक ख्रिस्ती राष्ट्रातल्या समाजात अनाचार बोकाळलेला आहे. तुनिसिया ह्या देशात तर ह्या अनाचारी संस्कृतीचा टोकाचा परिणाम झाला आहे. तुनसिया देशातल्या जवळ जवळ सर्वच स्त्रिया अत्यंत तुटपुंज्या आणि झिरझिरीत कपड्यामध्ये वावरताना मी पहिल्या आहेत, आणि त्यांनी मला सांगितले की हे असे फ्रेंच बायकांचे अनुकरण करणारे कपडे घालण्या बद्दल मुस्लीम कर्मठ लोक त्यांना नेहमी धमकावत असतात. मी त्यांना विचारले, पण तुम्ही त्या शापित फ्रेन्च बायकांचे अनुकरण का करता? त्या संस्कृतीत असे काय मोठे आहे? असे म्हटले जाते की फ्रान्समधल्या विवाहित स्त्रीला अर्धवेळ वेश्या व्यवसाय करायला समाजानेच मुभा दिली आहे. असे जर आहे तर तुमच्या धर्माच्या आणि देशाच्या संस्कृतीविरुध्द वागणाऱ्या ह्या फ्रेन्च संस्कृतीचे तुम्ही का अनुकरण करता? त्या स्त्रियांना ही गोष्ट थोडी फार पटल्यासारखी वाटली. मी पुढे त्यांना म्हटले तुम्ही जर तुमच्या पध्दतीचे कपडे घातलेत आणि तुमच्या संस्कृतीत सांगितल्याबरहुकूम वागलात तर त्या कर्मठ लोकांना मतभेदासाठी काही विषय रहाणार नाही. तरीदेखील त्यांनीही हे लक्षात घ्यायला हवे की कुणालाही नैतिकतेसाठी असे बळजबरीने घोड्यावर बसविणे अगदी चुकीचे आहे. अशा पध्दतीने वागून ते आपल्या संस्कृतीवर पडलेली पाश्चीमात्य संस्कृतीची छाया नाहीशी करु शकणार नाहीत. मूळात ते स्वतःच अत्यंत गुप्तपणे अत्यंत व्यभिचारी व विकृत जीवन जगत असतात. त्यांतून नैतिकतेचा मक्ता फक्त स्त्रियांनी घ्यावा.

पुरुषांना त्याचे काही नाही. मला त्या तस्लीमा नसरीचीही गंमत वाटते. ती स्वतः जीन्स घालते व सिगारेट ओढते. काय स्त्रियांच्या स्वातंत्र्याविषयी ह्याच कल्पना आहेत तिच्या? तिच्यामधील हा बदल उथळ व वरवरचा असल्यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अघोरी अत्याचाराला ती कधीच न्याय मिळवून देऊ शकणार नाही.

सर्वांना फार चांगल्या तऱ्हेने माहीत आहे की मुस्लीम स्त्रिया ह्या आर्थिक चणचणीने ग्रासलेल्या असतात. अेकदा मी औरंगाबादला जात असताना माझी गाडी दौलताबादजवळ बंद पडली. दौलताबाद ह्या नावाचा अर्थच मुळी श्रीमंत गाव असा आहे. त्या ठिकाणी मी काही मुस्लीम स्त्रियांचा घोळका पाहिला. अेका उध्वस्त विहिरीतून त्या पाणी काढत होत्या. मी गाडीतून खाली उतरले आणि त्यांच्याशी बोलावयास सुरवात केली. त्या सर्व मुस्लीम स्त्रिया तलाकपिडीत होत्या. त्यांच्यापैकी प्रत्येकीला सात सात/आठ आठ मुले होती आणि त्यांना मिळालेली देन मेहेरची रक्कम अत्यंत तुटपुंजी होती. त्यांची अक्षरशः उपासमार होत होकती, त्या पाणी काढत होत्या आणि त्यांच्या बोलण्यात असे आले की रस्ता दुरुस्तीचे किंवा नवा रस्ता बनविण्याचे काही तरी काम चालू होते आणि त्यावर त्यांना कधीतरी काम मिळाले होते. त्या सर्व जणी मोडक्या तोडक्या पत्र्याच्या आणि वाळलेल्या पालापाचोळ्याचे छप्पर बनविलेल्या घरात रहात होत्या. काही घरे तर केवळ चिखल गऱ्याची बनवलेली होती. किती खराब हे जीवन. त्यांनी सांगितले की पावसाळ्यात त्या रेल्वे पुलाखाली झोपतात. अत्यंत गरीब आणि हलाखीच्या परिस्थितीत अर्धनग्न आणि भुकेल्या अवस्थेत आपल्या मुलांना जगविण्याचा कसा बसा प्रयत्न त्या करीत होत्या. काही जणी तर म्हणाल्या, त्यांची काही मुले आजारपणाने मरण पावली तरी औषधोपचारासाठी त्यांना नवऱ्याकडून पैसे मिळू शकले नाहीत. त्रिवार तलाक तलाक तलाक म्हणून त्यांच्या नवऱ्यांनी त्यांना रस्त्यावर सोडून दिले होते. आणि मरेपर्यंत त्यांना असेच ऐकाकी झुंझत रहावे लागणार होते. तिथल्या अनेक स्त्रियांच्या ह्या दुःखभऱ्या कहाण्या ऐकून माझ्या डोळ्यात पाणीच आले. ते सारे मी सहनच करु शकले नाही. अजुनही त्या गोष्टीची आठवण आली की मला वाटते रहीम आणि रहमत ह्या महमद साहेबांनी सांगितलेल्या तत्वाचे काय? दया, प्रेम हे शब्द कुठे गेले? मरेपर्यंत सतत भिती आणि छळवणूकीच्या दडपणाखाली वावरणाऱ्या ह्या स्त्रियांचे कोण व कसे रक्षण करणार?

ह्या मुसलमानांची बरचशी मुले लहानपणीच मृत्युमुखी पडतात, कारण त्यांच्या आईवडिलांचा घटस्फोट झालेला असतो व मुलांना कुठे जावे, काय करावे हा प्रश्न पडतो. पण ह्या चमत्कारी परिस्थितीतून बाहेर पडण्यासही काही मार्ग नाही. आपल्या देशात गाजलेली महत्वाची शाहबानोची केस आठवत असेलच तुम्हाला तिचे म्हणणे असे होते

की तिच्या नवऱ्याने उदरनिर्वाहासाठी काही रक्कम द्यायला हवी. आपल्या देशात अेक महत्वाची समस्या आहे की अल्पसंख्यांक म्हणून ह्या लोकांना कायम संरक्षण दिले गेले आणि हे म्हणे निधर्मी राज्य! अल्पसंख्यांकांना ते म्हणतील त्या अटी मान्य करुन आपल्या बाजूने करुन घ्यायचे आणि बहुमतातला पक्ष म्हणून देशावर राज्य करायचे. आपल्याकडे सार्वत्रिक कायद्यापेक्षा वेगळा असा मुस्लीम कायदा आहे, ख्रिश्चन कायदा आहे. कॅथेलिक नियमांप्रमाणे घटस्फोट घेवू शकत नाही शाहबानो केस मध्ये प्रत्यक्ष सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला होता की बानोला तिच्या पतीकडून उदर निर्वाहासाठी ठराविक रक्कम मिळावी. परंतु त्यावेळच्या पंतप्रधानानी श्री. राजीव गांधींनी हा निकाल स्वीकारण्यास नकार दिला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे किमान अेका तरी मुस्लीम व्यक्तीने ह्या निकालास मान्यता द्यायला हवी. दुर्दैवाने अेकही मुस्लीम अेकही मुसलमान ह्या निकालास मान्यता देण्यास पुढे आला नाही. फतवा मुळे इराणपासून भारतापर्यंत सर्व मुस्लीमांना इतके घाबरायला होते? हे लोक असा विचार का करत नाहीत की ह्या समस्येला त्यांच्या आयांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या बहीणी व मुलीही ह्या कहाणीत सुटू शकणार नाहीत. हे सर्व देशांतून सर्रास घडत असते म्हणजे कमाल आहे ना? बहुदा असे दिसते की मुस्लीम कर्मठ आपल्या बायकांना कुराणाचा चुकीचा, सोयीस्कर अर्थ लावून कायम छळत असतात. ते स्वतः अत्यंत व्यभिचारी असतात, मद्यपी असतात. हे सारे अविश्वसनीय आहे की ते स्वतः काय करीत आहेत ह्याची जाणीव त्यांना नसताना संपूर्ण स्त्रीत्वाचा ते सतत अपमान करीत असतात आणि मग योग्य न्याय न मिळाल्याने साहजिकच ह्या स्त्रिया पाश्चिमात्य पध्दतीने वागू लागतात. त्यांना आपल्या सुटकेचा तो अेकमेव मार्ग वाटतो.

मला अेक रशियन भेटला तो विचारत होता की युनो बोस्नीयात मुस्लीमांना मदत का करते व त्याचे म्हणणे असे होते की रशियाला अजर्बीयन्सकडून धोका निर्माण झाला होता पण रशियाने तो नष्ट केला. त्याचप्रमाणे चेचेनिसयच्या परिस्थितीचेही नियंत्रण केले युनोला मुस्लीमांबद्दल काहीच माहीती नव्हती. अेकदा का सर्बियावर त्यांनी ताबा मिळवला तर बाकी सर्व देशांचे रुपांतर त्यांना सहजतेने इस्लामिक मूळतत्ववादींमध्ये करता येइल, असा त्यांचा दावा होता, कारण त्यांच्या मते ही वेळ जिहादचीच होती. राज्यात मुस्लीमांची संख्या वाढावी म्हणून ते स्वतःला अनेक मुले होअू देत. खरे तर रशिया हे प्रजासत्ताक राज्य आहे. त्याचा निधर्मीपणा हा मूलभूत पाया आहे. मग प्रजासत्ताक राज्याचे धार्मिक राज्यात रुपांतर करण्याची मुस्लीमांची ही कल्पना अैकून मला धक्काच बसला. मला अनेक रशियन लोकांबद्दल आत्यंतिक आदर आहे. माझी अशी आशा आहे त्यांनी ही जिहादची वेळ आहे ह्या संकल्पनेवर आजिबात विश्वास ठेवू नये हाच नव्हे तर ह्या पुढे कधीच नाही, उलट ही

कयामतची वेळ आहे. आपल्या सुवर्णयुगाच्या पुनरुध्दाराची वेळ आहे हे लक्षात घ्यावे.

दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. खरं म्हणजे सर्वांनी समजून घ्यायला हवे की सर्व धर्म हे अेकाच दैवी वृक्षाला लगडलेले आहेत. ह्या अगोदरच लोकांनी ह्या झाडाची फुले हवी तशी तोडून घेतली आहेत आणि आता सुकलेल्या फुलांसाठी अेकमेकात भांडत आहेत. अर्थात काही चुकीच्या गोष्टी आहेतच ज्या पापी लोकांच्य ढवळाढवळीमुळे व चुकीचे अर्थ' लावले गेल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. उदाहरणार्थ ज्यू, ख्रिश्चन आणि मुस्लीम ह्या तीनही धर्मात असे मानले जाते की मृत्युनंतरही न्यायनिवाड्याच्या दिवशी त्यांच्या थडग्यातून बाहेर त्यांची शरीरे येतील, आणि प्रत्येकाला योग्य न्याय मिळेल. हे शेवटच्या निवाड्याच्यावेळी कयामतच्या वेळी होइल. खरं म्हणजे, कित्येक वर्षांनंतर थडग्यातली शरीरे जशीच्या तशीच राहीली असतील हे मानणे किती अशास्त्रीय, अतार्किक आहे. कोणी हे समजमून घ्यायलाच तयार नाही की जे पुन्हा जन्माला येते, ते मानवाचे शरीर नसते तर तो त्याचा आत्मा असतो, हे खरे कयामत हा खरा शेवटचा न्याय असतो, पण त्यांना हे सांगायचे कुणी? त्यांना हे कुणीच सांगू शकत नाही. कारण कुणी सांगण्याचा थोडा देखील प्रयत्न केला तर त्याला ठार मारणे हीच त्यांची अेकमेव प्रतिक्रिया असते. अेखादी अप्रिय गोष्ट थांबवण्यासाठी कुणाला ठार मारणे ही अेकमेव गोष्ट त्यांना माहीत आहे. पण अशाने सत्याचे आकलन कसे होणार? अेकतर त्यांच्यातले बरेचसे अशिक्षित असतात जे थोडे फार शिकलेले असतात ते त्यांना प्रभावित करुन सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. मूलतत्ववादी कर्मठ लोकांच्या बाबतीत महत्वाची समस्य अशी की त्यांच्याजवळ दयाळूपणा नावालाही नसतो. कारण ते महमदसाहेबांना समजूनही घेत नाहीत व त्यांच्यावर प्रेमही करत नाहीत. ते कोण आहेत, ह्या पृथ्वीतलावर त्यांनी का अवतार घेतला आहे. ह्याबाबत त्यांना कधीच देणंघेणं नसते. सत्य काय आहे हे त्यांना माहीतीच नसते. त्यांना वाटत असते जगात आपणच फक्त योग्य माणसे आहोत, आपल्याला ज्याला वाटेल त्याला, विशेषतः काफीरांना मारण्याचा आपल्याला अधिकार आहे. त्यांना वाटेल तसे ते वागतात. आपल्या वागण्यातले अनेक समस्या निर्माण करतात आणि जे त्यांच्या मूलतत्वाचे अनुसरण करत नाहीत त्यांचा ते नायनाट करु इच्छितात. खरं म्हणजे आपल्या असेही लक्षात येते की ह्या कर्मठ मूलतत्ववादींना धर्माची मूलतत्वे आजिबात माहीत नसतात आणि दुसरीकडे जे स्वतःला आधुनिक विचारसरणीचे समजतात त्यांना ह्याची जाणीव नसते की हे तथाकथित आधुनिक मन त्यांना कोणत्या रसातळाला घेवून जाईल. सगळ्यात धक्कादायक गोष्ट अशी की ही आधुनिक माणसे देवावरचा अपला विश्वास हरवून बसली आहेत. गोष्टी समजून घेण्याच्या ह्या दोन्हीही पध्दती विश्वशांतीसाठी अथवा मानव कल्याणांसाठी अत्यंत

कुचकामी आहेत.त्यांचे मन शांत असेल तरेच हे घडू शकेल. महत्वाचे कारण असे की मनावर भासांचे राज्य असते तर मेंदूवर बुध्दीचे! मन अहंभाव आणि ताठा निर्माण करते व ह्या दोन्ही गोष्टीच शेवटी मनावर ताबा मिळवून राज्य करतात.

खरे पाहता कुराणामध्ये हजरत महमद ह्यांनी इस्लाम हा केवळ विशिष्ट वर्गापुरता मर्यादित धर्म आहे असे कधीच म्हटलेले नाही. मोझेस, अब्राहम, ख्रिस्त आणि मदरमेरी ह्या सर्वांबद्दल अत्यंत आदरयुक्त उद्गार काढलेले आहेत. तरीदेखील मुस्लीम स्वतःला काहीतरी विशेष, सर्वापेक्षा वेगळे, उच्च दर्जाचे समजतात. त्यात आणखीनही अेक समस्या आहे. मुस्लीम महमद साहेबांना परमेश्वरांचा विशेष प्रेषित समजतात, तर ख्रिश्चनांचा असा गाढ विश्वास आहे की येशू ख्रिस्ताचा शब्द हा शेवटचा! तर ज्यूंना असे वाटते की त्यांचा उद्धारकर्ता अजून यायचा आहे. हे लोक समजतात, त्याप्रमाणे तर महमदसाहेब असे का म्हणाले असतील की मी तुला १२ वा महाडी म्हणून पाठवेन? आणि येशूने तरी मी पवित्र भूत पाठवीन असे कसे आश्वासन दिले? ज्यू लोकांना किती दिवस आपल्या उद्धारकर्त्याची वाट पहावी लागणार हे कुणालाच माहित नाहीत तेआपले मंतरलेले टोराट घालून आक्रोश भिंतीसमोर रडत भेकत आक्रोश करत राहतात. अर्थात तरीही त्यांच्या दृष्टीने सर्वात महत्वाची गोष्ट त्यांनी उसने दिलेले पैसे गोळा करणे आणि कुठल्याही किंमतींत हिरे खरेदी करणे हीच असते.

कुराणाचा खराअर्थ समजून घेण्याइतके जे मुसलमान शिकलेले नसतात ते की स्वतः जिहादचे खंदे सैनिक आहेत. ही जिहादची कल्पना देखील कुणी अहंकारी माणसानेच निर्माण केली असावी. महंमदसाहेबांच्या मृत्युंनंतर ४० वर्षांनी संपादित केले गेलेले कु राण त्यांनी धड वाचलेले देखील नसेल. त्यातून हे संपादक स्वतः अत्यंत दुष्टबुध्दीचे होते, त्यांनी हजरत अली, त्यांची दोन मुले व दोन खलीफांना ठार मारले होते असे म्हटले जाते. ह्या ५ व्या खलीफाच्या आईने त्या तथाकथित जिहादमध्ये ४ थ्या खलीफाला ठार मारल्यावर त्याचे कच्चे यकृत खाल्ले होते. किती घृणास्पद क्रौर्य हे ? असे किती मुस्लीम ह्या जिहादमधून मारले गेले असतील तर दुसरीकडे त्यांची संतती बेसुमार वाढतच आहे. अेकीकडे मुस्लीम जमात वाढवायची म्हणून ही निर्मिती, तर दुसरीकडे हजारोंनी हत्या करायची. हे जिहाद आता मुस्लीम जिथल्या जिथल्या राष्ट्रात आहेत तिथे अगदी नेहमीचे झाले आहे. म्हणूनच हे मुसलमानच ते ज्या देशात राहतात त्या देशाच्या शांतीचे आणि सुधारणेचे फार मोठे दुश्मन बनलेले आहेत. महमद साहेबांनी तर म्हणून ठेवले आहे. जर तुम्ही स्वतःलाच ओळखले नाहीत तर देवाला काय ओळखणार?

आपल्या ह्या पशुतुल्य प्रतिमेपासूनपासून सुटका करुन घेण्याचा अेकमेव मार्ग म्हणजे वली किंवा सच्च्या सुफी होणे हा होय. स्वतःच्या मुक्तीमधून शांतता मिळविणे ही मुस्लीमांची

सध्या गरज आहे. ज्यू आणि ख्रिश्चनांचीही तीच अवस्था आहे. शांततापुर्ण जीवन हवे हे बायबलमध्ये, कुराणामध्ये आणि ज्यूंच्या जुन्या करारामध्ये म्हटले आहे. पण ते दुसऱ्यांना मारणे कधीच सोडत नाहीत. ही गोष्ट अतीव दुःखाची आणि हृदयद्रावक आहे की ज्यावेळेस परमेश्वराने वचन दिल्याप्रमाणे सगळ्या जगातले इतर लोक परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करण्याच्या योग्यतेचे झाले असतील त्यावेळेस सर्व धर्मातले हे मुलतत्ववादी कर्मठ अेकमेकांना ठार मारण्यात मग्न असतील. परमेश्वर त्यांना सद्बुध्दी देवो, किमान स्वतःच्या उध्दारासाठी आणि स्वतःला ओळखण्यसाठी तरी त्यांना दुसरा जन्म लाभो.

तसाच विचार केलातर आपण समजू शकतो की ज्यू, इस्लाम आणि ख्रिश्चन हे धर्म इतके लढावू वृत्तीचे का असतील. जेव्हा ह्या धर्माची सुरवात झाली तेव्हा सर्वत्र अत्यंत गोंधळाचे, अडथळ्याचे असेच काहीसे वातावरण होते. परिणामतः स्वतःला वाचविण्यासाठी, स्वतःला सुरक्षीत ठेवण्यासाठी, स्वतःचे अस्तीत्व टिकविण्यासाठी धर्माच्या नावाखाली त्यांनी युध्द आरंभले. ते प्रेमाविषयक बोलत असले तरी त्यांच्या धर्मात सूड हा सगळ्यात मोठा पण सुप्त, लपविलेला प्रवाह राहिला. त्यातूनच त्यांनी प्रत्येकाने स्वतःलाच शब्दाच्या जाळ्यात अडकवून घेतले.

भारतामधील घडामोडीही साधारणतः ह्याच समानरेषेवर चालू होत्या. जेव्हा हिन्दू लोक मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळे छळले जाऊ लागले तेव्हा ह्या महान संकटाविरुध्द लढण्यासाठी त्यांना नव्या बळाची गरज होती. प्रत्येक पंजाबी कुटुंबातील हिन्दूनी आपला अेकतरी, विशेषतः मोठा मुलगा. शिख धर्मीय व्हावा, आणि त्याने मुस्लीमांशी लढावे, ह्याच जाणीवेतून शीख धर्माचा उदय झाला. बाकीचा हिन्दू समाज ह्या सर्वांच्या आश्रयाखाली राहू लागली. भारतात जैन व बुध्द धर्माचाही उदय झालेला होता. ह्याधर्माचा संयम आणि त्याग ह्या गोष्टींवर विश्वास होता. त्यांचा करुणेवरही अतीव विश्वास होता. परिणामतः त्यांच्यापैकीच काही अनुयायी अभ्यासाने व वाचनाने अत्यंत सिध्द झाले व त्यांचे रुपांतर अनेक पंथ निर्माण होण्यात झाले. काही हिन्दूनी जुनाट कर्मठ हिन्दू धर्माच्या विरोधात आर्य समाज नावाचा नवाधर्म स्थापन केला. त्यांचा जगातल्या निराकरी शक्तीवर विश्वास होता. हे लोक आपली विधाने अत्यंत ठामपणे करीत. देवाधर्माचे आपल्यालाच सर्व माहीत आहे, अशा थाटात ते वावरत असते. त्यांच्याशी बोलणे, त्यांना तुम्ही आम्ही अेकाच मानसिक पातळीवर आहेत हे पटवून सांगणे अत्यंत दुरापास्त होते. हिन्दुंचा संयमावर विश्वास आहे पण कालांतराने हे लोकसुध्दा मुस्लीम व ख्रिश्चनांच्या दबावाखाली दडपले जाऊ लागले व त्यांनी लढण्यासाठी अेक बचावात्मक असे धोरण स्वीकारले.

त्यांनंतर चिनी लोकांचा अेक धर्म अस्तित्वात होताच मानवी जीवनापेक्षाही

प्राणीमात्रांबाबतच्या अहिंसेवर ह्या धर्माचा भर होता. खरे पाहता हे सर्वच धर्म अतिशय महान, अतिशय उदात्त होते. ह्या सर्वांनीच समाजाला काहीतरी नवीन, काहीतरी ठोस देण्याचा प्रयत्न केला पण ह्या अटी घालणाऱ्या धर्माच्या स्वरुपामुळे अखिल मानवी जगाला अलग अलग केले. ही समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सर्व धर्मातील मूलभूत गोष्टी सारख्या आहेत हे लक्षात घेऊन सर्व धर्मांचा योग्य तो आदर ठेवणे. अेक व्यक्ती अेक धर्म हे समीकरण मनात न बाळगता अेक व्यक्ती सर्व धर्मांची असू शकते किंवा त्यांच्या स्वतःच्या मनात जो धर्म अंतर्भूत असेल, ज्या धर्माच्या स्वयंभू प्रकाशाने त्याचे मन अुजळून निघेल अश्याधर्माचा तो असेल. हाच खरा वैश्विक शुध्द सहज धर्म होय. महात्मा गांधीनी सांगितलेल्या निधर्मी शब्दाचा हा खरा अर्थ आहे. भारतात सध्या ज्या पध्दतीने ते मिळविण्यासाठी तो वापरला जातो तसा तो जाअू नये तर आंतरिक सहज अैक्य निर्माण होणे महत्वाचेः

प्रत्येक मानवाच्या ह्दयात परमेश्वराचे प्रती रुप वसेलेले असते. तोच आत्मा होय. असा हिन्दू धर्माचा विश्वास आहे. असे जर आहे तर हिन्दू समाज वेगवेगळ्या जातीत कसा काय विभागला आहे? हजारो वर्षापुर्वी समाजाच्या जडणघडणीच्या प्राथमिक अवस्थेत लोकांनी मानवी वृत्तीवर आधारित असे समाजाचे काही विभाग तयार केले त्यालाच जात म्हटले जाते. जाती ह्या शब्दाचा तत्कालीन अर्थच मुळी व्यक्तीची योग्यता असा होता. ज्या व्यक्तीत ज्ञान प्राप्त करण्याची योग्यता असा होता. त्याला ब्राह्मण संबोधले गेले. शक्ती, ताकद मिळवू शकणाऱ्या समाजातल्या दुसऱ्या अेका घटकाला क्षत्रिय हे दिले गेले. त्यांच्यावर आपोआपच निरागस, साध्या लोकंच्या धार्मिक प्रवृत्तीच्या आणि इतरेजनांकडून छळल्या जाणाऱ्या लोकांच्यासंरक्षणाची जबाबदारी टाकली गेली. व्यापार करणाऱ्या आणि पैश्याच्या देवघेवीत तज्ञ असलेल्या लोकांना वैश्य म्हटले गेले. चवथ्या वर्गाला क्षुद्र म्हटले जाई. ह्या शब्दाचा अर्थ खालच्या दर्जाचा असा असून समाजातल्या इतर लोकांना त्यांच्या सेवेची, वैयक्तिक सेवेची पैसे देअून, गरज असे. पण ही व्यवस्था त्या काळात फक्त माणसाची आंतरिक योग्यता व त्याची आवड ह्यावरच अवलंबून होती जन्मावर नव्हे.

नंतर श्रीराम ह्या पृथ्वीतलावर होअून गेलेल्या अवतारी पुरुषाने आपल्या स्वतःच्या आयुष्यात प्रत्येक वेगवेगळ्या लायकीच्या लोकांचा योग्य तो आदर दाखवावा. हे स्वतः वागून समाजाला शिकविले. उदा. राम जेव्हा वनवासासाठी अरण्यात जायला निघाला तेव्हा वाटेत त्याला अेक खूप गरीब, वृध्द शबरी नावाची स्त्री भेटली. ती आदिवासी जमातीतील होती. अत्यंत भक्तीभावाने आणि अतीव प्रेमाने तिने रामाला काही बोरे दिली आणि ती म्हणाली, कृपा करुन ही बोरे भक्षण करा, ती आजिबात आंबट नाहीत कारण

त्यातल्या प्रत्येकाची मी चव घेवून पाहिली आहे. खरे पाहता, दुसऱ्या कुणी उष्टावलेले अन्न, फळ आपण खात नाही. अेखाद्याने अगदी लहानसा तुकडा जरी फळाचा खाल्ला असला तर अर्थातच ते फळ नंतर शुध्द राहत नाही आणि ते दुसऱ्याला देणे हे अत्यंत वाईट समजतात, रामासारख्या अवतारी पुरुषाला तर असे उष्टे फळ देणे कदापिही योग्य नव्हते. पण रामाने त्या मागची उत्कट भावना ओळखली, त्याचे मन हेलावले. त्यानं अत्यंत आनंदाने ती उष्टी बोरे खाल्ली त्याच्या अवीट गोडीची स्तुती केली. त्यापैकी काही अपल्या पत्नीला, सीतेला दिली. लक्ष्मणाला कहीशी असूया वाटली असावी, त्यानेही मग काही बोरे मागितली. आपल्यापेक्षा खालच्या पातळीवरच्या लोकांशी अत्यंत मित्रत्वाने खेळीमेळीने वागणाऱ्या श्रीरामप्रभूंचे अनेक दाखले आढळतात, त्याचं चरित्र रामायण हे देखील अेका कोळ्याने तो वाटमारी करत होता त्याने लिहिलेले आहे. ह्या वाल्याकोळ्याचे दुसऱ्या अेका स्वर्गीय संत नारदाच्या सहवासाने संतामध्ये रुपांतर झाले होते. अर्थातच अेका साध्या कोळ्याचा, जो डाकू होता, त्याच्या मनातही श्रीरामाबद्दल अतीव आदर होता. म्हणूनच त्याने रामायणासारखे सुंदर महाकाव्य लिहिले.

नंतर श्रीकृष्णाचा अवतार, त्यानेदेखील ब्राह्मणाच्या घरात नाही. क्षत्रियाच्या घरात नाही तर, गवळ्याच्या जे उच्च जमातीचे नाहीत, घरात जन्म घेतला श्रीकृष्णाने लहानपणापासूनच अनेक चमत्कार घडवायला सुरुवात केली. त्याचे स्वतःचे आयुष्यच सांगते की मुलाचा जन्म कोणत्या जातीत झाला ह्याला फारसे महत्व नाही. तो नेहमी हस्तीनापुरला जात असे तेथे देखील उच्च जातीच्या लोकांकडे राहण्यापेक्षा तो विदूर ह्या मुक्तात्म्याकडे, जो मुळात नोकराचा मुलगा होता, त्यांच्याकडे राहणे पसंत करी. विदूर नीच जातीचा होता तरी श्रीकृष्ण नेहमी त्याच्याकडे जाई. त्याच्याकडचे जेवण घेइ. हस्तीनापुरातल्या राजघराण्यातले नाही.

त्यानंतर मात्र जाती व्यवस्थेचा जन्म हा पाया बनला कारण स्वार्थी लोकांना लायकी नसलेल्या आपल्या मुलांना उच्च जातीचा फायदा मिळावा असे वाटू लागले. हळू हळू व्यक्तीची जात, ती व्यक्ती ज्या कुटुंबात जन्माला आली असेल त्या कुटुंबाच्या जातीवरुन ठरु लागली. जातीची अुच्च वा नीच प्रकारची वर्गवारी, जन्मावरुन ठरावी, ही मूळ कल्पना कधीच नव्हती. दुर्गा ही देवता देखील राक्षस अणि भक्त ह्या दोघांचे दैवत म्हणून ओळखले जाते. हिंदू समाजाने ही जन्मावरुन निर्माण झालेली जातिव्यवस्था केव्हा स्वीकारली हे सांगणे मात्र अवघड आहे. कदाचित काही भोंदू साधूंनी ह्या शापाची ओळख त्यांनी लिहीलेल्या पुस्तकातून केली असेल. ही सर्वधर्मातील अेक अगदी सामान्य घटना आहे की काही हुषार स्त्रीपुरुष आपल्या स्वतःच्या काही कल्पना धर्माच्या नावाखाली समाजात

लोकप्रिय करत. ह्या अशा कल्पना आपण शुध्द आणि मूळ स्वरुपी मानून त्याचे तंतोतंत अनुसरण करणे हे कसे शक्य आहे. ते काही सच्च्या धार्मिक लोकांनी लिहिले अथवा संपादित केलेले नसतात.

भारतामध्ये असे अनेक संतकवी, महात्मे होऊन गेले की ज्यांचा जन्म अत्यंत नीच जातीत झाला होता. तसेच आपल्याकडे असेही काही संत कवी होऊन गेले ज्यांचा जन्म उच्च जातीत झाला होता ह्यावरून ही गोष्ट नक्कीच सिध्द होते की ठराविक जातीत जन्माला आले तरच त्या व्यक्तीत काही दैवी सिद्धी असते असे नाही हे सर्व संतकवी अेकमेकांचा आदर करीत आणि मानवी उध्दाराची काळजी करीत. ह्या संतांना आपण खूप उच्च जातीत जन्माला आलो, अथवा नीच जातीत ह्याचे काहीच देणेघेणे नसायचे. हिन्दू धर्म हा कोण्या विशिष्टांची मक्तेदारी नाही हे आपल्याला फार मोठे दैवाचे देणे आहे. ह्याधर्माचा अेकमेव असा ग्रंथ नाही हिन्दुधर्माच्या स्वतःच्या संस्था नाहीत. तसे शंकराचार्य असतात, पण मुल्ला किंवा फादरना जे अधिकार आहेत तसे अधिकार त्यांना नाहीत. म्हणूनच हिन्दू समाज कोणत्याही दैंवताची पुजा करताना अथवा कोणत्याही हिन्दू वा मुस्लीम संतांच्या धर्मवचानांचे अनुसरण करताना दिसतो.

आज ब्राह्मण शक्तीप्रधान झाले आहेत. क्षत्रिय तर तसे पहिल्यापासूनचआहेत. साहजिकच सत्तेसाठी त्यांच्यात सतत झगडा चालू आहे. मुख्य म्हणजे ते सर्व पैसा मिळवणे ह्या अेकमेव ध्येयाने प्रेरीत झालेले आहेत. ते कोणत्याही जागेवर असोत, कोणत्याही पध्दतीने काही पैसा मिळवायचाच हे त्यांचे ध्येय बनले आहे.

अलेक्झांडर द ग्रेटने, जो भारतात आला होता आणि महानदी सिंधू पार करुन आत आला होता. त्याने हा हिन्दू शब्द तयार केला. सिंधू म्हणजे सागर पण त्याला तो शब्द नीट उच्चारता आल्याने इन्दू हिन्दू असे करता करता भारतीय लोकांच्याधर्माला हिन्दू हे नाव पडले. जेव्हा इंग्लिश आपल्यावर राज्य करत होते तेव्हा हा देश हिन्दूस्थान म्हणून ओळखला जाई. स्वातंत्र्य मिळाल्यावर मात्र भारत हे नाव भारतीय भाषेत आणि इंडिया हे इंग्लिशमध्ये रुढ झाले. पोर्तुगाल आणि आफ्रिकेतील काही देश मात्र अजून हिन्दू शब्द वापरतात.

धर्माच्याअेकूण कायदेकानून ह्याच्यामुळे आपला समाज जातीप्रिय बनत बनत शेवटी जातीव्यवस्थेचा मूळ पायाच हरवून बसला म्हणूनच भारतामधील निवडणूकीत सध्या जात महत्वाची बनली आहे. ही जातीव्यवस्था सगळीकडे अत्यंत बलवान बनली आहे. भारतीय घटना जेव्हा तयार झाली तेव्हा मागासलेल्या लोकांमध्ये सुधारणा होवून तो मुख्यजनप्रवाहात मिसळले जावेत. म्हणून ४० वर्षापर्यंत त्या विशिष्ट जमातींना काही खास सोयी सवलती बहाल केल्या होत्या. पण ४० वर्षे उलटून गेली तरी ह्या सवलती चालूच आहेत. उलट

त्यांच्याबद्दल ते लोक अधिक जागरुक झाले आहेत. इतकेच नव्हे तर ह्या सवलतींच्या आधारे हे लोक इतर जमातीतल्या लोकांना दाबून टाकण्याचा, त्यांचा कोंडमारा करण्याचा प्रयत्न करतात आणि अश्यातऱ्हेने समाज अत्यंत हास्यास्पद पध्दतीने वागत आहे. दूरदृष्टी नसलेले राजकारणी धूर्तपणे ह्या जातीव्यवस्थेचा पूर्णपणे फायदा घेत आहेत. हे लोक सामान्य पातळीवर कसे येतील हे पाहणे ही अवघड गोष्ट आहे तसेच त्यांची लायकी, पात्रता त्यांच्या जन्मजात जातीवर अवलंबून नाही हेही त्यांना पटवून सांगणे अवघड आहे. पण आम्ही सहजयोगाद्वारे ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला व त्यात यशस्वीही झालो. सहजयोगामध्ये माणूस आपण कोणत्या जातीत जन्माला आलो आहोत हेच विसरुन जातो. सहजयोगी हा अेखाद्या संतासारखा मुक्त आत्मा बनुन जातो. आणि सुर्योदयानंतर अंधकार नाहीसा व्हावा तसा विकृत जातीव्यवस्थेचा मनावरचा पगडा आपोआप नाहीसा होतो. त्यांचे अेकमेकात जातीचा विचार न करता विवाह होतात. हे इतके आपोआप की सांगता सोय नाही आणि त्यातले ९५ टक्के विवाह यशस्वी झाले आहेत. आनंदी विवाह कसे कसावे ह्याचे ते आदर्शच बनले आहेत.

आता थोडे फार बुध्दधर्माबद्दल. बुध्द फक्त करुणेबद्दल, करुणा आणि करुणेबद्दलच बोलले. त्याने त्या दिवसात भयंकर कष्ट सहन केले. आयुष्याच्या शेवटीशेवटी तो आत्यंतिक आर्थिक अडचणीने ग्रासलेला होता आणि सरते शेवटी देशाच्या कुटल्यातरी कोपऱ्यात त्यांचा अत्यंत दुःखद अंत झाला. बुध्दाचे जीवन हे खरे म्हणजे अत्यंत आदर्श होते पण लोकांचा असा विश्वास असतो की तुमचा तोपर्यंत दैवी उध्दार होवू शकत नाही. जोपर्यंत तुम्ही त्याने ज्या ज्यागोष्टीचा त्याग केला त्या त्यागत नाही आणि त्याला जो त्रास सहन करावा लागला तो सहन करत नाहीत. लोकांची कल्पना अशी की जर अेखाद्याला दैवी मार्गावरुन चालायचे असेल तर त्याने प्रथमतः आपल्या कुटुंबाचा त्याग केलाच पाहिजे. अेखाद्याने आपला सर्व पैसाअडका, मालमत्ता इतकेच नव्हे तर सर्वसामान्य जीवनाचा त्याग केला तरच जणू त्याला ह्यामार्गावर प्रवेश मिळतो. पण तेथे अनेक बुध्दस्त आहेत पण त्यांच्यातले बहुतेक वेगवेगळे पर्याय अेक तर आचार विचारात किंवा मानसिक योगासामर्थ्यात हरवून बसले आहेत. जपानी लोक झेन पध्दती जाणून न घेता तिचे अनुसरण करतात. त्यांनी ज्या ठिकाणी बुध्दाचे महानिर्वाण झाले त्या बोधीगयेला त्याचे अतिशय सुदंर मंदीर बांधले आहे जेव्हा चंगीझखानाने बिहारवर स्वारी केली तेव्हा बुध्द साधूंनी त्याच्या अत्याचाराला कोणताही विरोध केला नाही ते तसेच मरण पावले. रिशिमाला सहन कराव्या लागलेल्या टोकाच्या त्रासामुळे दुसऱ्या प्रकारच्याबुध्द लोकांना जपानमध्ये अहिंसेचा धडा मिळाला.

दलाई लामा आपल्या प्रवचनात अहिंसेवर भर देतात पण ते पैसा सोनेनाणे हेच महत्वाचे मानणारे लोक आहेत. बीजींगमध्ये मोठ्या तळघरात हजारो, सोन्याचे पाणी दिलेले आणि शुध्द सोन्याचे बहअरचे मग आहेत ज्या पाली भाषेत काही लिहिले आहे असे म्हटले जाते की काही सैनिक दलाईलामाच्या मागोमाग भारतात त्यांचा पाठलाग करत गेले. ह्या लोकांनी आपले सोनेनाणे तिथेच नदीकिनारी लपवून ठेवले होते. ते ह्याचिनी सैनिकांना सापडले. ते सर्व त्यांनी संग्रहालयात ठेवले. लामा आपण संन्यासी आहोत हे दाखविण्यासाठी भगवी वस्त्र परिधान करतात. पण त्यांची राहणी मात्र धर्मशाळेत असूनही राजाच्या वरताण असते. मला कॅनडामध्ये अेक कॅनेडियन संन्यासी भेटला. तो म्हणाला की माझ्याजवळ अंगावरच्या वस्त्राखेरीज काही नाही. तो म्हणाला दलाईलामाच्या लोकांकडून त्याची सर्व संपत्ती हिसकावली गेली. धर्मशाळेतील अनेक लोकांनी दलाईलामाच्या लोकांच्या ह्या पुंडशाही विरुध्द निशेध व्यक्त केला आहे. पण सरकारला मात्र ह्या पैसाप्रिय लामाबददल ह्या धर्मप्रमूखाबद्दल कमालीची सहानभूती आहे. तेव्हा सत्य आणि दांभिकतेमधला फरक लक्षात न घेणाऱ्या त्या अज्ञानीसरकारचे सांत्वन करायचे असेल तर निषेधकर्त्यांनी त्यांना क्षमाच करायला हवी. सध्या तरी बुध्द धर्म हा दलाई लामांचा खाजगी व्यवसाय बनला आहे.

भारतामध्ये अनेक निर्वासितांचा लोंढा सतत येत आहे. चीन आणि भारतात राजकीय दुरावा निर्माण करणाऱ्या ह्या श्रीमंत संन्याशांचे प्रभूत्व ह्या निर्वासितांना परवडेना. नेपाळमधले बुध्दधर्मीय काळ्या जादूटोण्यावर विश्वस ठेवणारे होते. खूप साधक नेपाळमध्ये गेले आणि बरबाद झाले. बुध्द लामांमध्येही अनेक प्रकार आहेत. काही लोकांचे स्वतःचे मठ आहेत. तिथे साधकांची कुंडलिनी जागृत व्हावी यासाठी त्यांचा पाठीचा कणा मोडेस्तवर त्यांना मारहाण करण्यात येते. चायनामध्ये मदर मेरी क्वान यीन ह्या चीनी अवतारांची पूजा केली जाते. बुध्दाने स्मरणासाठी तीन मंत्र सांगितले. सहजयोगी पण हे मंत्र म्हणतात, बुध्द सरणं गच्छामि, धर्मसरणं गच्छामि, संघसरणं गच्छामि हे ते तीन मंत्र हे मंत्र ते अत्यंत गोधंळात आक्रोश करीत म्हणतात.

इतर अनेक धर्माप्रमाणे इथेही पुढील अवताराबद्दल सांगितले आहे. मैत्रे हा भविष्यकालीन मुक्ती देणारा बुध्द असेल. मैत्रेय म्हणजे तीन मातांनी मिळून दिलेले निर्वाण होय.

ह्या प्रकारचा आदर्शवाद ख्रिश्चन धर्मात विशेषतः कॅथलिक पंथात सांगितला आहे. तिथे अगदी तरुण मुली नन्स बनतात आणि तरुण मुले फादर बनता. हे सर्व आत्यंतिक अनैसर्गिक नाही का? कारण माणसे ही शेवटी माणसेच असतात आणि त्यांच्या भावभावना जर अश्या कृत्रिम, विचित्र पध्दतीने दडपल्या गेल्या. तर ह्या सर्वातून सुटेकचा मार्ग ते शोधतात. गुप्तपणे दुहेरी जीवन जगतात. काही नन्स आणि प्रिस्ट लैंगिक आयुष्याकडे

इतके कसे भारले जातात ह्याचे इथे काहीसे स्पष्टीकरण मिळू शकेल. त्यांच्यापैकी काही जण प्रचंड रागीट बनतात, त्यांना कोणाबद्दलच प्रेम भावना वाटत नाही. ते अेखाद्या यंत्रासारखे बनतात. ह्यांच्यापैकीच काही जणांनी काही युध्दकैद्यांना जर्मनीतून अर्जेंटीनात जाण्यास मदत केली होती.

अेक आश्चर्याची गोष्ट म्हणजे व्हटकीनमध्ये करोडो डॉलर्सच्या खोट्या नोटा छापल्या गेल्या. आणि अम्बेसिया द्वारा त्यांनी त्या लोकांत वाटल्या. त्यांचा माफियाशी संबंध होता आणि इकडे ख्रिश्चन डेमाक्रेटीक पार्टी रोज जाहीर करत होती की इटालीत अनेक मुलांचे चर्चमध्ये विकृत लैंगिक शोषण केली जाते तर ऑस्ट्रीयामध्ये अनेक प्रिस्टस काही विवाहित स्त्रियांना आपली रखेल म्हणून ठेवतात. त्यांच्या पैकी काही गुप्तपणे विवाह करतात व त्यांना मुलेही होतात. ते खऱ्या अर्थाने जगात बाप बनतात आणि ह्यावर असाही खुलासा केला जातो की चर्चला त्यांच्या विधवांना पेन्शन देणे मान्य नाही. म्हणून आपल्याला बायका आहेत असे ते उघडपणे सांगत नाहीत.

जर तुम्ही त्यांना पाहिलेत आणि ते कश्याप्रकारचे लोक आहेत हे तुम्ही ओळखलेत तर त्यांच्यासारख्यांना शांततेच पुरस्कार कसे मिळू शकतात ह्याबद्दल तुम्हाला सखेद आश्चर्य वाटेल. मी शांतता पुरस्कार मिळालेल्या अेका स्त्रीला ओळखते. माझ्या आयुष्यात मला भेटलेल्या लोकांपैकी सगळ्यात रागीट अशी ती स्त्री आहे. अेकदा आम्ही कलकत्याला जायला निघालो होतो. ही स्त्री हातात अेक विचित्र, बोजड वस्तू घेअून विमानात आली. तिला अगदी पहिल्या सीटवर बसायचे होते. पण पर्सरने तिलासांगितले की ते अगोदरच आरक्षित झाले असून त्यांना दुसरी सीट देअून चालणार नाही. ते आधीच आरक्षित केलेल्या पुढील सीटवरच बसतील. ह्यावर त्यास्त्रीने अत्यंत उध्दटपणे आपण फार महत्वाची व्यक्ती आहोत असे जाहीर केले आणि तिला पहिले आसन मिळावयास हवे असा दुराग्रह धरला आणि तिने शब्दशः विमान कर्मचाऱ्यांशी मारामारी सुरु केली. विमानाच्या दारासमोरच्या चिंचोळ्या जागेत तिने प्रचंड थयथयाट सुरु केला. तिचे हे तांडवनृत्य सुमारे अर्धा तास चालू होते. शेवटी त्या स्त्रीला विमानाबाहेर काढण्यात आले. मला हे सर्व सहन होणे शक्यच नव्हते. मी डोळे मिटून झोपी गेले. अर्थात हे सर्व तिला शांतता पुरस्कार मिळण्याआधी घडले आहे हा पुरस्कार मिळाल्यानंतर हे घडले असते तर विमानातले किती लोक तिने तुरुंगात धाडले असते ह्याची मला कल्पनाही करवत नाही. दुर्दैवाने ह्या लोकांचा उध्दटपणा ही अेक सर्वसामान्य गोष्ट बनली आहे. आपल्याला वाटते की देवासाठी अथवा देशकार्यासाठी ह्या लोकांनी महान त्याग केला आहे. अेखाद्या वैश्विक कल्पनेने झपाटले जाअून ते कार्य करत आहेत. पण प्रत्यक्षात ते इतके संतापी असतात की त्यांना भेटायला

जाताना तुम्हाला अेखाद्या चिलखताचाच वापर करावा लागेल. ते कुठेही देवाच्या जवळ नसतात किंवा कोणत्याही धर्माच्या करुणेच्या जवळपासही ते नसतात.

भारतामध्ये धर्मांतर झालेले ख्रिश्चन आहेत ते साधारणतः अत्यंत गरीब कुटुंबातून आलेले आहेत. बहुदा खूपश्या भारतीय ख्रिश्चनांना वाटते की येशू हा अेक इंग्लीश माणूस असून त्याचा जन्म बंकीहॅम पॅलेस मध्ये झाला आहे. अेक विनोद ह्या संदर्भात सांगितला जातो. अलाहाबाद जवळच्या अेको खेड्यातील अेका माणसाने धर्मांतर केल्यावर त्यांचे अेलेक्झांडर ठेवण्यात आले आणि तो बनला अलेक्झांडर भुरा. कारण भुरा हे त्याचे नाव होते. तो जेव्हा अलहाबादला येइ तेव्हा नित्यनेमाने पवित्र गंगा नदीत डुबकी घेई. ज्यामिशिनऱ्याने त्याला धर्मांतरीत केले होते. त्याने त्यास सांगितले की तो आता ख्रिश्चन बनला आहे. त्याने आता गंगेची पूजा करण्याची आवश्यकता नाही. त्यावर तो आपल्या देहाती बोलीत उत्तरला भले मी साहेब बनलो असेन पण मी माझ धर्म कसा सोडू?

भारतीय राजतंत्राचा अेक शापअसा आहे की बहुमत मिळविण्यसाठी मताला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. साहजिकच मुस्लीम आणि ख्रिश्चन ह्यांनी आपले मतदार वाढविण्यासाठी दोन मार्ग अवलंबले. अेक तर धर्मांतर करणे किंवा संतती वाढविणे. म्हणूनच मुस्लीम स्त्रियांना मुले निर्माण करणारा कारखानाच मानले जाते.

पोपदेखील राजकारणात आकंठ बुडलेले आहेत म्हणून गर्भपाताला विरोध करणाऱ्या पोपला पोलंडमध्ये चोरुन लपून शस्त्रास्त्र पाठविताना काहीच वाटत नाही. ज्या शस्त्राचा उपयोग ते कम्युनिस्ट लोकांच्याविरुध्द लढण्यात करतात.

आता आपण जैन धर्माचाविचार करू. जो मुळातच खूप अहिंसावादी आहे. हे जैन लोक कोणत्याही परिस्थितीत सर्व जीव अगदी डास, ढेकूण आळ्यादेखील वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात असे म्हणतात की ते अेखाद्या झोपडीत ब्राह्मणाला ठेवतात आणि त्याच झोपडीत खेड्यातले सर्व ढेकूण गोळा करुन सोडतात म्हणजे त्या ब्राह्मणाचे रक्त शोषून ते आपला जीव वाचवू शकतील. जेव्हा हे ढेकूण ब्राह्मणांचे रक्त पिअून संपृक्त होअून जमीनीवर पडतात तेव्हाच तो गरीब बिचारा ब्राह्मण त्या झोपडीबाहेर येवू शकतो आणि मग ह्या महान त्यागाबद्दल त्याला भरपूर पैसे दिले जातात. मला नेहमी गंमत वाटते इथे ते ब्राह्मणाचाच का उपयोग करतात? ब्राह्मणाच्या गरीब रक्ताने त्या ढेकणांचा उध्दार तर होत नसेल? किती हास्यास्पद गोष्टी ह्या? महावीराचे संपूर्ण नग्न दर्शन ते कसे काय करतात? खरी गोष्ट अशी आहे की महावीर हे योगसाधनेला बसले होते. ते जेव्हा ह्या साधनेतून उठले तेव्हा काटेरी झुडूपांमुळे त्यांचे वस्त्र चिरफाळले गेले होते तरीही त्यांच्या अंगावर त्याचे अर्धे वस्त्र होते. मग श्रीकृष्णाला त्याची परिक्षा घेण्याची लहर आली , अेका

सर्वसामान्या भिकाऱ्याचे रुप घेऊन तो त्यांच्यापुढे प्रगट झाला आणि विचारु लागाला, तुम्ही हे असे फाटके तुटके वस्त्र का परिधान केले आहे? तुम्ही तर राजकुमार आहात मला गरीबाला हे देऊन टाका. अेका तिरमिरीत श्री महावीराने ते उरले सुरले वस्त्र देऊन टाकले आणि जवळच असलेल्या आपल्या राजवाड्यात तो आपला नग्न देह पाचोळ्यामध्ये झाकून घेऊन गेला असे जवळ जवळ थोडेच सेकंद असतील की त्यावेळेस त्यांच्या अंगावर वस्त्र नव्हते पण तरीही आपले गुप्तांग पालापाचोळ्याने झाकून घेतेले होते. मगच तो राजवाड्यात गेला.) आता आपण महावीरांचे नग्न पुतळे पहातो ज्यात त्यांच्या गुप्तांगाचे अत्यंत उघडपणे प्रदर्शन केले जाते. अत्यंत भावनाशील माणसाला हे किती त्रासदायक होत काय म्हणून ते महावीरांचा असा खेदजनक अपमान करत असतील? तुम्ही सिस्टीन चॅपेल मध्ये यर्काढलेली मायकेल अेंजलोची महान चित्रे पाहिलीत तर तुमच्यालक्षात येइल की त्याने मदर मेरी येशू किंवा त्याचे वडील ह्यांना कुठेही कपड्यावाचून दाखविलेले नाही. क्वचित प्रसंगी इतर काही लोकांना त्याचे नग्न दाखविले असेल. सर्व भारतात भगवान महावीरासारख्याअवतारी पुरुषाचे ज्यापध्दतीने नग्न प्रदर्शन केले जाते किती अपमानास्पद आहे ते पहाणे?

दोन वर्षापूर्वीची गोष्ट, मुंबईच्या महापौरांनी, कुठल्याशा गंभीर समस्येवर चर्चा करण्यासठी माझ्याकडे अेकाला पाठविले. समस्या अशी होती की जैन लोक कुठल्याही प्रकारचे जंत अगदी विष्ठेमधले सुध्दा मारायला तयार नसत. त्यामुळे ते ते सर्व जंत अेखाद्या मोठ्याखुजात गोळा करत आणि अेका टेकाडवर टाकून देत. साहजिकच तो परिसर, पावसाळ्यानंतर अत्यंत घाण, दुर्गंधीमय बने आणि ही समस्या कशी सोडवावी हे महापौरांना कळत नव्हते. मला मुख्यतः हेच कळत नाही की हे जैन लोक ढेकूण व जंत ह्यांचीच रक्षा का करु इच्छितात? कोंबड्यांची पिल्ले अथवा बकरी, डास ह्यांच्याबद्दल त्यांची ही रक्षणाची भावना कुठे जाते? मुळात त्यांच्या आदर्श अहिंसावादी तत्वानुसार ते ज्यांना वाचवायला जातात ते प्राणी तरी आहेत का? प्रथम तुम्ही मानवजातीच्या प्रती आपली अहिंसादाखवायला हवी. ती तर दाखवली जात नाही. भारतातला जैन समाज अत्यंत श्रीमंत आहे आणि मुख्यतः अनैतिक आहे. माझ्याकडे अेक अत्यंत श्रीमंत जैन स्त्री आली होती. तिच्याबरोबर तितकाच श्रीमंत पण आजारी असा अेक पुरुष होता. तो तिचा प्रियकर हो ता तिचा पती म्हणजे प्रसार माध्यमातले अेक बडे प्रस्थ होते आणि त्याचे त्या आजारी माणसाच्या पत्नीबरोबर प्रेमप्रकरण हाते. जैन समाजातले हे परस्पर सांमजस्य म्हणायचे का? काही जैन डॉक्टर कुठल्याही पध्दतीची नीतीमत्ता नसलेले फक्त पैसा कमवू इच्छिणारे असतात त्या धर्माच्या विरुध्द अत्यंत दुष्टपणे वागतात. इतकेच नव्हे तर सर्वच जैन समाज पैसाप्रिय असाच असतो ते भगवान महावीराला नेहमी नग्न दाखवितात. हे कुठल्या

तार्किकतेच्या पलीकडे आहे की नग्नता तुम्हाला देवद्वारापर्यंत घेऊन जाते. भारतात सर्वत्र जैन नग्न साधू सभ्य स्त्रियांना धक्कादायक वाटेल अशा पध्दतीने रस्त्यावरुन हिंडत असतात.

अेकदा मी मोठ्या विचित्र परिस्थीतीत सापडले. तेव्हा मी हस्तिनापूरला माझ्या पतींसमवेत जात होते. ते तेव्हा मीरत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. जैन समाजाच्या दोनपंथात त्यावेळेस काही आनबान चालू होती. अेका पंथाचे नांव दिगंबर असे आहे. त्यांना स्वतःला अंगावर वस्त्र घालण्याची गरज वाटत नाही किंवा कुठल्याही तऱ्हेचे कपडे घालणाऱ्या साधूंवर त्याचा विश्वास नसतो. कारण त्यांच्या मते दाही दिशा ह्याच त्यांचे वस्त्र बनत असते. दुसऱ्या पंथाचे नाव श्वेतांबर, ते पांढरे वस्त्र घालतात आणि तोंडावर अेक वस्त्र लावतात. कुठल्याही तऱ्हेचे जीवजंतू तोंडात जाअू नये म्हणून खबरदारी म्हणजे तोंडावाटे ते जंतू शरीरात जाअून मरुन जाणार आणि अेक प्रकारची हिंसा घडणार. आमच्या दुर्दैवाने आम्ही पहिल्यांदा दिगंबराच्या देवळात गेलो आणि जिल्हाधिकाऱ्याच्या सर्व लवाजम्यासह अगदी पहिल्या रांगेत बसलो. सुमारे ४० संपूर्ण नग्न साधू समोर व्यासपीटावर बसले होते. मला ते पाहून जबरदस्त धक्काच बसला मी शरमेने मान खाली घातली आणि माझे पती हे सर्व पाहून अतिशय संतापले. ही माणसे डोक्यावरचे आणि शक्य असतील तिथले केस हातांनी उपटून काढत होते ह्यागोष्टीबाबत संत कवी कबीराने असे म्हटले आहे की डोक्यावरचे किंवा अंगावरचे केस काढून जर मुक्ती मिळत असेल तर वर्षातून दोनदा केस काढणाऱ्या मेंढीला तुमच्या अगोदर स्वर्गात प्रवेश मिळाला असेल. मग अश्या प्रकारच्या युक्त्या, प्रयुक्त्या कश्यासाठी उपयोगात आणायच्या? त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही अश्यातऱ्हेन केस उपटत गेलात तर जैन धर्म तुम्हाला संपूर्ण कळू शकेल. हे सर्व नाटक पाहून माझे पती प्रचंड अस्वस्थ झाले. ते स्वतःच्या जागेवरुन उठले व माझा हात धरुन ते हॉलच्या बाहेर चालू लागले. आमचा सर्व लवाजमाही आमच्यापाठोपाठ बाहेर पडला. ह्यांनी मला गाडीत ढकलले. व स्वतःही गाडीत बसले. आमच्या पाठोपाठ अेक जण धावत आला व विचारु लागला, काय झाले? आपण का रागावलात सर? माझे पती म्हणाले अशा असभ्य ठिकाणी मी थांबूच शकत नाही. हा आमचा अपमान आहे. आमच्या ड्रायव्हरने आधीच गाडी सुरु केली होती. थोड्या वेळाने शांत झाल्यावर ह्यांनी विचारले ते आपल्याशी असं का वागले? शरमेने तर मला काहीच बोलता येत नव्हते. मी म्हटले भगवान महावीराच्या अनुयायांनी असे वागावे म्हणजे आश्चर्यच आहे. म्हणूनच तिथून लवकरात लवकर बाहेर पडणे मला अत्यावश्यक वाटले. हे म्हणाले तू बहुतेक धर्माबद्दल जाणतेस. मग या भयानक, धक्कादायक गोष्टीबद्दल तुला जाणीव नव्हती ? मी कबुली दिली मी धर्माबद्दल जाणते.

पण त्यांच्या, धर्मप्रमुखांच्या सांगण्याच्या अगदी विरुध्द वर्तन करणाऱ्या त्यांच्या अनुयायाबद्दल मला खरच काही माहिती नव्हती.

जैनामध्ये सुध्दा साध्वी बनण्याची पध्दत आहे. बहुदा फक्त स्त्रियाच नव्हे तर पुरुष देखील साधू असतात. ते नग्नतेची भलावण करतात. पण त्यांच्या मालकीची बहुदा कापडाची, पाश्चिमात्य कपड्याची दुकाने असतात. त्यांच्या सुती कापडाच्या गिरण्या असतात इतरही अनेक औद्यौगिक समस्या निर्माण करणारे उद्योग असतात. जैंन साधू आणि साध्वींना पोसण्याइतके ते भक्कम असतात. त्यांच्यात माकाच्या शेपटीपासून बनविलेल्या चवऱ्या महावीरांच्या फोटोसमोर मिरवणूकीत कोणी ढाळायच्या ह्या साठी तिकिटांचा लिलाव काढला जातो. ह्यासाठी कित्येक हजारो, लाखो रुपये खर्च केले जातात.

त्यांच्या धर्माच्याही ख्रिश्चन धर्माच्या टेन कमांडमेंटस सारख्या दहा शिकवणी आहेत. त्या सर्व मानवाच्या कल्याणासाठी आहेत. पण ही मूल्यव्यवस्था जेव्हा बिघडते तेव्हा समाज गोधळून जातो. आदि परमेश्वराचे अनेक अवतार ह्या भूतलावर अवतीर्ण झाले त्यांचा मुख्य हेतू मानवी जीवनांचा गेलेला तोल सावरणे आणि प्रेम व नैतिक शिस्त सर्वांच्याआयुष्याला लावणे हाच होता. पण त्यांच्या अनुयांयांनी मात्र त्यांच्या शिकवणुकींच्या जणू खानावळी चालू केल्या. सहजयोगाच्या साह्याने मात्र दैवी प्रेमाच्या विश्वधर्माचा प्रकाश सर्वत्र पडू शकेल आणि साधकाला खऱ्या धार्मिक शांततापूर्ण, नीतीवान करुणाकर शक्तिवान आणि प्रकाशपूर्ण व्यक्तीमत्वाची प्राप्ती होवू शकेल.

# ७

# 'शांती'

—

अहंभाव आणि अटीतटी ह्या अेखाद्या मनगंठत कहाणीसारख्या मनानेच निर्माण केलेल्या गोष्टी आहेत. प्रथम आपण अटीतटी आपल्या मनात निर्माण करतो आणि नंतर त्या अटीतटीच आपल्या मनावर राज्य करु लागतात. अहंकारही ह्याच पध्दतीने मनाचा ताबा घेतो. अहंकार हा अत्यंत भयावह रोग आहे. जेव्हा हा अहंकार उन्मत्त होतो, माणसाला जणू आपण सर्व जगाचे राजे आहोत असा भास व्हायला सुरवात होते. अेकदा का अेखाद्याने ह्या उन्मत्त अहंकारावर तरंगायला सुरवात केली की त्यांला खोट्या अस्तित्वाच्या वेदना समजेनाशा होतात. दुसऱ्यांना जगणे अशक्य करुन सोडण्यात ह्या अहंकाराला अत्यंत आनंद होत असतो. हा अहंकार तुम्हाला अतिशय अमानुष अशा गोष्टी करावयास भाग पाडतो. जो पर्यंत माणूस स्वतःचा शोध घेण्याचा, स्वतःला तपासून पाहण्याचा प्रयत्न करत नाही तो पर्यंत अहंकाराच्या ह्या दुष्ट बाजूचा शोध त्याला लागत नाही. अेखादा अचानक श्रीमंत झाला तर मग ह्या अहंकाराच्या उन्मत्तपणाबद्दल विचारायलाच नको. कुठल्या प्रकारची कमाई किंवा प्रतिष्ठां ह्या फुग्याला फुगवीतच असते.

अेका प्रख्यात टेनीसपटू स्त्रीची गोष्ट. पुढे खेळल्या जाणाऱ्या सर्व मॅचेस् आपण जिंकू ह्या बद्दल तिला आत्मविश्वास वाटत नव्हता. तिच्या अेका मित्राने तिला प्रोत्साहन दिले तो स्वतः तिच्या बरोबर इंग्लंडमध्ये गेला. तिच्याबरोबर असायला, तिला मदत करायला म्हणून! आणि ह्यासाठी त्याने काही पैसे उधार घेतले होते. संपूर्ण मॅचभर तो तिला टाळ्या वाजवून आरडाओरडा करुन प्रोत्साहीत करत असे. शेवटी ती जिंकली आणि तिला भरपूर पैसाही मिळाला. पण आनंदाच्या त्या उत्कृट क्षणाला तिने त्याच्याकडे चक्क दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर त्याचा अपमान केला, जेव्हा तो तिच्याशी काहीतरी बोलायला गेला.

जर अेखादयाजवळ काही संपत्ती असली तर त्याला जणू आकाश ठेंगणे वाटते. मला असे अनेक जमीनदार माहीत आहेत की ते त्यांच्या आक्रासले पणा बद्दल प्रसिध्द होते. ते आपला आवाज चढवून इतका आरडाओरडा करतात की कोणाला वाटावे की जगाचा शेवटच जवळ आला आहे. आता जमीनदार नुसते नावाचे राहिले आहेत. कारण ४० वर्षापूर्वी निर्माण झालेल्या नव्या कुळकायद्यामुळे त्यांच्या जमीनी त्यांच्या मालकीच्या राहिल्या नाहीत. पण अजूनही आरडाओरडा करण्याची त्यांची जीवनशैली अजूनही तशीच आहे. त्यातून त्यांना जर अेखादी सुंदर स्त्री मिळाली—लग्नाची बिनलग्नाची कशीही त्यात त्यांना फरक पडत नाही. त्यांचा अहंकार फुलतो. विद्वान, शास्त्रज्ञ, राजकारणी, राजदूत ह्या सर्वांना ही हांजी हांजी पध्दत खाली पहायला लावते. त्यांना बाकी सर्व जग मूर्ख वाटते. ह्या अहंकारी माणसांनी स्वतःची अशी अेक संस्कृती निर्माण केली आहे. कदाचित अशा स्त्रीपुरुषांना आपण किती विचित्र वागत आहोत ह्याची कल्पनाही नसेल. आणि उरलेले सारे जग मात्र त्यांना हसत राहतो. त्यांना कल्पनाही येत नाही की त्यांच्या अहंकाराच्या आड दडलेला मूर्खपणा मानवी शहाणपणाच्या पलीकडे असतो.

ते आपल्या शहाणपणाचा, सद्‌सद्‌विवेकबुध्दीचा तोल गमावून बसतात. ते वारंवार आपल्या अहंकाराच्यासाठी मूर्खपणाच्या, भ्रमिष्टपणाच्या नव्यानव्या कल्पना शोधत असतात. मी अेकदा अेका ज्येष्ठ राजकारण्याशी बोलत होते. बोलता बोलता फ्राइडचा विषय निघाला. त्याने मला विचारले 'तुम्हाला फ्राईडचा एवढा राग का म्हणून येतो? मी म्हटले की तो अगदी चुकीचे बोलतो व लोकांना अनैतिकतचे धडे देतो. त्यापेक्षा मला जुंग आवडतो. त्याने अत्यंत पध्दतशीरपणे फ्राईडचे म्हणणे खोडून काढले आहे आणि त्यांचे मुद्देही बरेचसे योग्य आहेत. समजुतदारपणा त्याच्या विवेचनात जरुर आहे. ते उत्तरले. पारंपारिक पध्दतीने तीच ती गोष्ट जुंगने सांगितली आहे. त्यात त्याचा कसला मोठेपणा? जुंगने नवीन कोणती गोष्ट सांगितली आहे? ह्या उलट फ्राईडने काहीतरी नवे लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून तो महानच आहे. मी फारशी राजकारणी धूर्त नाही तरी मी त्यांना म्हटले सर तुम्ही जगातले सर्व प्रकारचे अन्न खाल्लेले आहे. पण आजवर तुम्ही हे टेबल खाल्लेले नाही. मग हे नवे अन्न, जेवणाचे टेबल खाण्याचा प्रयत्न तुम्ही का करत नाही. मी हळूवारपणे दिलेल्या माझ्या उत्तरावर अर्थातच ते चकीतच झाले. हे गृहस्थ अत्यंत हुषार आणि त्यांच्या लिखाणाविषयी अगदी प्रसिध्द होते. त्यांनी जेव्हा अशा तऱ्हेने अत्यंत बेजबाबदार पध्दतीने विधान करुन अेका मूलतत्ववादींच्या जीवनाबद्दल त्यांनी आपले अज्ञान प्रकट केले. अर्थात त्यांच्याच पध्दतीने विचार करणाऱ्या इतरांना मात्र ते सहनशील, समतोल बुद्धिमत्तेचे, कल्पना करु शकणारे आणि सरळ गृहस्थ वाटतात.

पश्चिमेत मी माझी पहिली सहज योगावरची सभा सात हिप्पींबरोबर घेतली. ते त्या काळात काहीही मिळवत नव्हते. पण जमीनीपर्यंत लोंबणारे केस घेऊन ते वावरत होते. मला अत्यंत खेद वाटतो की त्यांच्या केसाशी तुलना करायला मला कोणताच प्राणी आढळला नाही किंवा अशा पध्दतीने केस बांधलेला अेखादा पक्षीही! त्यांचे केस उवांनी बरबरटलेले होते व त्या त्यांच्या बुचड्यावर सैरावरा पळत असत. मी त्यांना विचारले की 'तुम्ही ही आदिवासी सारखी केशरचना का करता?' तर त्यांचे म्हणणे होते की त्यांना अत्यंत शांतताप्रिय असा आदिवासी बनायचे होते.मी त्यांना म्हटले की तुमच्या ह्या केसांखाली आधुनिक मेंदू आहे.त्या तुमच्या खट्याळ मेंदूला कसे बदलणार?

अहंकाराला इतरांपेक्षा जलद हालचाली आवडतात. संपूर्ण आधुनिक साहित्याचा प्रवाह देखील सध्या अत्यंत जलद झाला आहे. जितका वेग अधिक तितकी प्रसिध्दी जास्त!

साहित्याला आजकाल अत्यंत वेगवान राहण्याचे आकर्षण वाटत आहे. चित्रपट देखील अत्यंत वेगवान कथानकावर बनविले जातात. इतके वेगवान की अेखादा त्या वेगात कथेचे सातत्य हरवून बसेल. हा वेग प्रेक्षकांना कथेच्या कुठल्याच खोलवर गाभ्याला स्पर्श करु देत नाही. हे वेगवान चित्रपट कोणाच्या भावनेला हात घालू शकत नाहीत. किंवा शांततेच्या परीघालाही स्पर्श करत नाहीत किंवा कोणताही शुध्द आनंद देत नाहीत.

वेग हा लोकांचा मोठ्यात मोठा अहंकार वाढविणारा मार्ग आहे. अगदी ग्रँड प्रिक्स इतका मोठा अहंकार! त्यांना असे वाटते की ग्रँड प्रिक्स हा खूप मोठा खेळ आहे आणि खूप लोक त्याचा आनंद उपभोगू शकतात. पण अगदी स्पष्ट सांगायचे म्हणजे हा खेळ अहंकाराच्या दृष्टीने अत्यंत वाईट आहे. जो माणूस जिंकतो तो अहंकारी बनतो. त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांचीही तीच गत होते. जेव्हा त्यातले सहभागी चिरडले जातात तेव्हा पाहणाऱ्याला आयुष्यभरचा आनंद अनुभवायला मिळतो. अेखाद्याला दिसत असते की ग्रँड प्रिक्स मध्ये जळालेला माणूस खास दैवाने देखील अशा पध्दतीने जळण्यास निवडला नसता. मला आश्चर्य वाटते ते ह्या ग्रँड प्रिक्सच्या खेळात आनंद मिळवणाऱ्या लोकांचे! दुसरे उदाहरण अशाच प्रकारच्या स्पेनमध्ये घेतल्या जाणाऱ्या बैलांच्या झुंजीचे होय. वर्षातून सहा वेळा ह्या लढतींचे आयोजन केले जाते. स्पॅनीश लोकांना ह्या बैलांच्या झुंजीची इतकी आवड आहे की प्रत्येक वेळी ह्या खेळाचे मैदान ओसंडून वहात असते. हा खेळ तुर्की लोकांनी स्पेनमध्ये आणला.जेव्हा तुर्की इथे राज्य करत होते तेव्हा इथल्या स्थानिक लोकांशी ते अत्यंत दुष्टपणाने वागत. नंतर फ्रँको आला. तो तर अत्यंत दुष्ट राज्यकर्ता होता. परिणामतः लोकांनी बंड पुकारले. साहजिकच हे बंड अत्यंत अमानुष पध्दतीने घडले. अशा अमानुष अहंकारी लोकांना आसुरी आनंद मिळवण्यातच धन्य वाटे, जेव्हा बैलालाठार

कारले जाई. जेव्हा मला काही स्पॅनीश स्त्रिया भेटल्या तेव्हा माझ्या असे लक्षात आले की त्या अत्यंत अहंकारी होत्या. मी त्यांना विचारले की तुम्ही काय करता, कोठे काम करता? त्या म्हणाल्या आम्हाला मेटॅडोअर म्हणून प्रशिक्षित केले गेले आहे. हे अैकून मी गप्पच बसले कारण अशा महत्वाकांक्षी स्त्रियांबद्दल मी काय बोलणार? स्त्रियांनीच रेस वगैरे गोष्टी केल्या तर शेवटी काय घडणार? त्या तर धड स्त्रिया नाहीत आणि धड पुरुष नाहीत अशाच बनून राहणार ना?

मी अेकदा अमेरिकेत लॉस अेंजलिसला होते. तेथे मी अनेक स्त्रिया पाहिल्या त्यांनी स्लीव्हलेस ब्लाऊज घातली होती, आणि सर्वात आश्चर्य म्हणजे त्यांचे दंड पिळदार होते. प्रथम मला हे विचित्र दृष्य लक्षातच येईना. ह्या व्यक्ती दिसत तर बायकांसारख्या होत्या पण त्यांचे दंड मात्र सर्वसामान्य पुरुषांपेक्षाही जास्त पिळदार होते. नंतर मला कळले की पुरुषांपेक्षाही आपले दंड पिळदार करण्याची ती बायकांची अेक चळवळच होती. थोडक्यात अत्यंत सूक्ष्म पातळीवर स्त्री व पुरुषांचा हा लढा चालूच आहे म्हणायचा. खरं म्हणजे स्त्री व पुरुष हे संपूर्ण भिन्न असताना, इतकेच नव्हे तर ते परस्पर पूरक असतांना अेकमेकांशी लढण्याची गरज काय? मला हे कळतच नाही की हे सर्व अत्यंत निरुपयोगी आहे. ह्याचा साक्षात्कार ह्या लोकांना कधी होईल? जर स्त्री आणि पुरुष फक्त अेकमेकांच्या शारीरिक गोष्टींसाठीच अेकमेकांना मानत असतील, आणि नितीमत्ता ही त्यांच्या लेखी महत्वाची गोष्ट नसेल, त्यांची मुलेही मग ह्याच विचारसरणीची होणार, ह्यात काय शंका? स्त्री स्वतःच्या शरीराचा इतका काळजीपूर्वक विचार, निगराणी तेव्हाच करते जेव्हा शरीराचा बाजार मांडून तिला काही पैसे कमवायचे असतात. त्याच प्रमाणे पुरुष तेव्हाच आपले शरीर कसरत करुन तेव्हाच बळकट करतात जेव्हा त्यांना रग्बीसारखा खेळ खेळायचा असतो. आता तर ह्या शरीर बळकट करणाऱ्यांच्या अगदी विरुध्द स्वतःला सडपातळ करण्याचीही टूम आली आहे. ते त्या साठी जवळजवळ अर्धपोटी राहतात आणि मग अनेक रोगांचे शिकार बनतात. सगळ्यात गंमत म्हणजे तुम्ही सडपातळ बनलात की अधिक अहंकारी बनता. बारीक माणूस हा जाड माणसापेक्षा जास्त रागीट असतो. यकृत चांगले नसल्याने हे असे घडते. अेकीकडे ते बारीक बनत जातात तर दुसरीकडे रागीट. मी अशी अनेक माणसे पाहिली आहेत की ती इतकी अशक्त होती की त्यांना त्यांच्या रागावर नियंत्रण ठेवणे कठीण जाते. आपला राग व्यक्त करताना चवळीच्या शेंगेसारखे कापत असतात. ते कुणालाही घाबरवू शकतात कारण ते इतके पांढरट पडतात की कुणाला भूतेच वाटतात.

असे अनेक आंतरिक गैरसमज असतात की माणसाच्या अहंकाराला खतपाणी घालून फुगवतात. अेखादा माणूस कोणत्या देशाचा आहे ह्यावरुन ओळखला जातो. पण काही

गैरसमजुतीच्या घेऱ्यात येणे ही माणसाची जुनी सवय आहे. अहंकार स्वतः अत्यंत वाईट पध्दतीने व्यक्त होत असतो. जेव्हा लोक म्हणतात मला हे आवडत नाही ते आवडत नाही, तेव्हा ते आपले अत्यंत खालच्या दर्जाचे संस्कार दाखवतात. काही राजकारणी लोकांना माझा असा विश्वास आहे असे म्हणण्याची स्वतःला सवय लावली आहे. आता तुम्ही मला हे आवडत नाही म्हणणारे कोण? आणि तुम्ही कोण की जे ऐखादया गोष्टीवर विश्वास ठेवता आणि तो विश्वास सर्वत्र पसरवता? तुम्हाला जे आवडते ते अत्यंत दुर्मिळ आहे किंवा तुम्हाला ज्या गोष्टी विश्वासार्ह वाटतात त्याच सत्य आहेत ह्याला काय पुरावा देणार तुम्ही?

मी अशी अनेक माणसे पाहिली आहेत की सत्य स्वीकारण्यासाठी त्यांचा अहंकार आडवा येतो. ऐकदा ऐक अत्यंत उध्दट व उर्मट मुलाखतकार, माझी टी.व्ही.साठी मुलाखत घ्यायला आला. अर्थात त्यांच्यापैकी बहुतेक तसेच आहेत, त्यामुळे कोणा ऐकाला नावे ठेवायला नकोत. त्याने मला विचारले, तुम्ही इंग्लंडमध्ये, लंडनमध्ये काय करता? त्याचे म्हणणे होते की मी गरीब बिच्चाऱ्या भारताला काहीतरी मदत केली पाहिजे. मी त्याला म्हटले मी स्वतःच्या निवडीने इथे आलेली नाही. माझे पती इथे दुतावासात मध्ये उच्चाधिकारी म्हणून आले आहेत. आणि त्यांना इथे घरही मिळाले आहे, त्यामुळे मला इथे त्यांच्याजवळ राहणे आवश्यक आहे. पण वर्षातून सहा महिने तरी मी भारतात असते.मी त्याला तीव्रपणे विचारले, भारताच्या गरीबीला नक्की कोण जबाबदार आहे? ज्या देशात तीन/तीनशे वर्षे कोणत्याही परिपत्राखेरीज असंख्य पाहुणे राहू शकतात, तो देश श्रीमंत राहीलच कसा? जे राष्ट्र म्हणून ओळखले जावे ह्या तथाकथित अुदात्त हेतूने कोणत्याही प्रकारची दयामाया न दाखविता तिथली अफाट संपत्ती दुसऱ्या देशांकडून लुटली जाते. ज्याच्या दमावर अनेक लोक ह्या लुटारू देशात अळशी बनून आयुष्यभर भिक्षौवह लोक आयुष्यभर भिक्षेवर आपला चरितार्थ चालवितात, तो लुटलेला, लुबाडलेला देश गरीब होणार नाही तर आणखीन् काय होणार? ऐक चिरंजीव मला पहिल्या भेटीत मोठ्या गर्वाने म्हणाले होते मी बेकार आहे म्हणून मी देवाचे आभार मानतो. इतकेच नव्हे तर आपल्या बेकारीचा जयघोष, अत्यंत आनंदाने करणारे अनेक जण त्याला सामील झाले होते. कल्पना करा आयुष्यभर भिकाऱ्यासारखे कुणाच्या मेहरबानीवर जगावे लागणार म्हणून खजील होणारे भारतात हजारो आहेत आणि हे मेहेरबान आपल्या ऑक्सफर्ड केंब्रीज पदवीप्राप्तीनंतर मोठ्या दिमाखाने आपल्या बेकारीचे धिंडोरे पिटवत आहेत. मी त्याला म्हटले ''शेवटी कोण गरीब आहे, आणि श्रीमंत तरी कोण आहे? ऐका सर्वसामान्य घरेलू भारतीय स्त्रीने दिलेले हे उत्तर अैकून तो काहीसा ओशाळा झाला. नंतर त्याने मला दुसरा प्रश्न विचारला 'भारतामध्ये इतकी

प्रचंड लोकसंख्या कशी?' त्यावर मी अत्यंत शांतपणे उतरले ''महाशय, ह्या गोष्टीलाही कदाचित आपणच जबाबदार आहात असे उत्तरही मी देवू शकते.'' त्या इंग्लिश मुलाखतकाराच्या अहंकाराचा चांगलाच भडका उडाला आणि त्याला शांत बसणे अशक्यच झाले, काहीसे उसळूनच त्याने मला विचारले तुमच्या वेड्यासारख्या वाढणाऱ्या लोकसंख्येला, आम्ही जबाबदार असू हे विधान कसे करु शकता तुम्ही? त्यावरही मी अतिशय शांतपणे त्याला उत्तर दिले.'' महाशय नुकतेच वर्तमानपत्रात माझ्या असे वाचनात आले की इंग्लंडमध्ये, नव्हे नव्हे, लंडनमध्ये प्रत्येक आठवड्याला सरासरी दोन मुले, त्यांच्या सख्या आई वडिलांकडून मारली जातात. मग मला सांगा, ज्या देशात अत्यंत निष्प्रेम असे वातावरण मुलांना अनुभवायला लागते. त्या देशात जन्म घ्यायला कोणत्या शहाण्या मुलाला आवडेल? ह्या देशात शेजाऱ्यांना सुध्दा मुले आवडत नाहीत, म्हणूनच ज्याला अेखादे मूल असेल त्याला भाड्याने जागा मिळणे देखील मुश्कील होवून जाते. म्हणूनच ज्या देशात आईवडिल आणि शेजारीपाजारी सुध्दा मुलांवर खूप प्रेम करतात, त्यांचे लाडाने संगोपन करतात त्या भारतात जन्माला यायला मुलांना कदाचित खूप आवडत असेल. मुलांच्या दृष्टीने अेखाद्याचा बँकेत असलेला पैसा महत्वाचा नसतो तर त्याला मिळणारे प्रेम महत्वाचे असते. तीच त्याच्या दृष्टीने जगातली सगळ्यात मौल्यवान गोष्ट असते. माझ्या ह्या सगळ्या उत्तरांनी तो तर रागाने वेडापिसाच झाला. त्याने माझ्यावर अेकदम हल्लाच चढविला ''मी तुम्हाला सांगून ठेवतों स्वमुक्तीच्या नावाखाली कोणाकडूनही पैसा घेवू नका. इथल्या अँग्लो सॅकसन लोकांच्या मेंदूत त्या गोष्टींनी काहीच प्रकाश पडणार नाही. मी अत्यंत मृदूपणे त्याला विचारले''महाशय, ह्या दैवी प्रेमाखातर तुम्ही किती पैसे दिलेत? बर ते सर्व असू दे मी आता तुम्हाला अेक प्रश्न विचारते, तो म्हणाला, ''हो हो, बेशक विचारा.'' कोणत्या देवाने हा खास अँग्लो सॅकसन लोकांचा मेंदू बनविला सांगू शकाल मला? माझ्या ह्या प्रश्नाने त्याला अनुत्तरितच केले आणि तो स्वतः आपल्याबरोबर आणलेल्या कॅमेरामनसह चालता झाला, गंमत म्हणजे अेव्हाना त्या फोटोग्राफरने अेकही फोटो घेतलेला नव्हता. नंतर अनेकांनी मला त्या मुलाखतकाराबद्दल सांगितले. ह्या प्रसार माध्यमात त्याला बुलडॉग म्हणूनच ओळखले जाई. मला तर माझ्यावर अेकदाही भुंकलेल्या बिच्चाऱ्या बुलडॉगचा तो अपमानच वाटला.

अेखाद्याची सत्य स्वीकारायची तयारी नसते हे मी समजू शकते. जोपर्यंत ही गोष्ट माझ्यापुरती मर्यादित होती तोपर्यंत ठीक आहे. पण खरं पाहता जो माणूस सत्याला नाकारतो तो अपरिहार्यपणे दुभंग व्यक्तीमत्वाच्या कचाट्यात सापडतो. मी लोकांच्या मद्यपानाला कायम विरोध करते, कारण अल्कोहोल ही गोष्ट काही चांगली गोष्ट नाही. अल्कोहोलमुळे

व्यथापिडीत झालेले अनेक लोक आजवर मला भेटले आहेत. अेक ८० वर्षाचे वयोवृध्द अुद्योजक माझ्याकडे नेहमी येत असत, तेव्हा बहुदा त्यांनी मद्यपान केलेले असे तो माझ्याकडे आल्यावर कळवळून म्हणत असे. अहो, मी आता ८० वर्षाचा आहे. पण ह्यापुढे मी माणूस म्हणवून घेण्याच्या लायकीचा उरलेलो नाही. मी म्हटले ''का हो? असे का म्हणता? काय झाले? तो उत्तरला ''मी धडपणे झोपू शकत नाही, झोप येत नाही म्हणहून मी मद्य घेतो. त्या नशेत मी थोडा फार चांगला झोपू शकतो. पण दुसऱ्या दिवशी मला त्याचा प्रचंड हँगओव्हर येतो. मग मी माझ्या नोकरमाणसांवर पत्नीवर, मुलाबाळांवर आरडा ओरडा करायला सुरवात करतो. आणि त्या ओरड्याला घाबरुन ते सर्व दूर पळतात, आता गोष्ट अशी झाली आहे की मी जेव्हा झोपेतून उठतो तेव्हा घरात कुणीच नसतो सर्वजण आधीच घराबाहेर निघून गेले असतात. अशा तऱ्हेने, दरुने बुद्धीचे दिवाळे तर मी वाजवून घेतलेच आहे. शिवाय ह्या मद्यपानाच्या सवयीने विवेकशुन्यतेखेरीज माझ्यात काही बदल होणे देखील अशक्यच आहे. तुम्ही तरी, माझ्यापुढील आयुष्यात ह्या अल्कोहोल सारखी भयानक गोष्ट मी घेअू नये, ह्यासाठी देवाजवळ प्रार्थना करा. ते म्हातारे गृहस्थ खूपच निराश झाले होते. पण मी असे अनेक तरुण उद्योगपती पाहिले आहेत की ते ह्या वृध्द गृहस्थाला महानतेचा साकार पुतळा म्हणून पूजा करत होते. का तर त्या मद्यपानाच्या अत्यंत व्यसनातून सुध्दा तो त्याच्या व्यवसायात अत्यंत यशस्वी झाला होता. त्यांना सर्वांना वाटत होते. वयाच्या ८० व्या वर्षी सुध्दा त्याला भरपूर यश मिळू शकते आणि त्याचे अेकमेव कारण म्हणजे त्याचे मद्यपान होय. जेव्हा तुम्ही अेखादी चुकीची गोष्ट करता तेव्हा आपोआपच तुम्ही प्रचंड अहंकारी बनता. अेरव्ही तुम्ही करत असलेल्या चुकीच्या गोष्टीचा, न्याय्य, योग्य म्हणून तुम्ही विचार करुच शकणार नाही. थोडक्यात जेव्हा तुम्ही चुकीची गोष्ट करता तेव्हा सतत तुमच्या अहंकाराला खतपाणी घालत राहता, कारण तुम्हाला तुम्ही करत आहात ते योग्य करत आहात ह्यावर विश्वास ठेवायचा असतो, तसे सिध्द करायचे असते. अेकदा अेका मद्यपी माणसाने स्वतः मद्याच्या अगदी नशेत असताना आपण चहाखेरीज कुठलेही पेय पीत नसल्याचे शपथेवर सांगितले, मी त्याच्या त्या विधानाला हरकत घेण्याचे आजिबात धाडस केले नाही.

सध्याच्या दिवसात, आणखी अेक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की पश्चिमेकडील अगदी लहानात लहान मूल देखील अत्यंत उध्दट आणि हिंसाचारी बनले आहे. तुम्ही त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवू शकत नाही. अेकदा मी सरेमधल्या माझ्या घरापासून लंडनला जायला निघाले होते. प्रथमवर्गाच्या त्या छोटेखानी डब्यात मी एकटीच होते. रस्त्यातल्या कुठल्यातरी स्टेशनात ८ ते १२ वयोगटातील खूप मोठ्या, चांगल्या शाळेत

शिकणारी २०/२२ मुले डब्यात शिरली. त्या चांगल्या शाळेचा शिक्का आपल्या युनीफॉर्मवर दिमाखाने मिरवणाऱ्या मुलांनी डब्यात शिरताच ब्लेडच्या किंवा छोट्या चाकूच्या साह्याने डब्यामधील कुशन्स फाडायला सुरवात केली. त्यांनी सगळ्यांनी अेकत्रितपणे मला सांगितले, ' कृपा करुन तुम्ही घाबरु नका, आम्ही तुम्हाला काही करणार नाही, पण आम्हाला हे करु द्या, आम्हाला त्यात मजा वाटते. मी त्यांना विचारले, पण तुम्ही असे का करता? ते म्हणाले आम्हाला आवडते म्हणून, तुमची काही हरकत? मी गप्प बसून हताशपणे तो विध्वंस पहात राहिले कारण मी विचार केला मी काही बोलण्याचा प्रयत्न केला तर नक्की हातातल्या चाकूने ते मला इजा करतील. मी पुढल्या स्टेशनवर खाली उतरले. आणि स्टेशनमास्तरला हे सर्व सांगितले. त्यांच्यातल्याच काही मोठ्या दिसणाऱ्या आणि कदाचित त्या छोट्या मुलांवर देखरेख करणाऱ्या काही मुले परिस्थितीचा ताबा घेतील असे वाटत होते. पण त्या मोठ्या मुलांनी मद्यपान केले होते व नशेतच ते झोपी गेले होते आणि ह्या छोट्या मुलांनी माझ्या डब्याचा ताबा घेतला होता. ती मुले उठली तरीही ती नशेतच होती. मला त्या मुलांना सांगावेसे वाटत होते की ज्या पध्दतीने तुम्ही ह्या छोट्या मुलांकडे पाहत आहात ती योग्य पध्दत नव्हे. पण स्टेशनमास्टरनी मला सल्ला दिला की त्या अत्यंत उध्दट मुलांच्या नादी मुळीच लागू नये. त्या मुलांना नंतर त्या स्टेशनमास्तरांनी त्यांच्या पिण्याबद्दल विचारताच त्यांनी मास्टरनाच मारायला सुरवात केली व प्रचंड दम देवून शाळेत ह्याबद्दल काहीही न कळविण्यास धमकावले.

इंग्लंडमधील ही परिस्थिती पाहून मला धक्काच बसला. अेकटी स्त्री अशा स्थितीत कसा प्रवास करु शकेल? ह्या अत्यंत सुप्रगत देशात कुणा अेकाला सुरक्षित कसे वाटेल? पण ह्याहून वाईट स्थिती अमेरिकेत आहे. अमेरिकेतल्या रस्त्यावर रात्री आठनंतर तुम्ही तुमच्या गाडीतून साधा केक घ्यायला जरी खाली उतरलात तरी ४/५ अत्यंत दणकट लोक येवून तुमच्या हातात जे काही पैसे वगैरे असेल ते हिसकावून घेणार. तुम्ही कदाचित थोडाफार विरोध केला तर ते तुम्हाला ठारही मारतील. हा हिंसाचार पैसा, स्त्रिया किंवा जमीनींसाठी असतो असेही नाही. तर हा हिंसाचार फक्त हिंसाचारासाठीच असतो. लोंकांनाच हिंस्त्र बनायची इच्छा आहे. अेखादी व्यक्ती हिंस्त्र नाही ह्याचा अर्थ ती व्यक्ती दुर्बल आहे असा घेतला जातो. आणि त्या व्यक्तीकडे अत्यंत तुच्छतेच्या नजरेने पाहिले जाते. जे लोक अशक्त आहेत त्यांच्यावर हिंसाचार, जे शिकलेले नाहीत त्यांच्यावर हिंसाचार, जे तुमच्या वर्णाचे नाहीत त्यांच्यावर अत्याचार, जे त्यांच्या देशात कायदेशीररित्या आले आहेत त्यांच्यावरही अत्याच्यार, स्त्रियांवर, बायकामुलांवर अत्याचार ह्या अगदी सर्रास घडणाऱ्या गोष्टी आहेत. आपल्या सशक्त असण्याचा

गैरफायदा उठवून समाजातल्या सर्व तऱ्हेच्या दुर्बल लोकांवर सत्ता गाजविण्याचाच हा प्रयत्न आहे.आपले स्वतःचेच घोडे पुढे दामटवित ते हे अत्याचार, जणू जगातील सर्वात सुंदर गोष्ट असल्यासारखा आनंद लुटतात. जुन्या काळात अत्यंत सोशिक, सत्यप्रिय लोक असत. त्याचबरोबर ते परखडही असत, साहजिकच दुष्ट लोकांना त्यांचे हे स्पष्ट बोलणे आवडत नसे, आज ही दुष्टमाणसे आहेतच उलट त्यांनी धार्मिक संस्थाचाच ताबा सध्या घेतला आहे. साहजिकच ह्या संस्था अत्यंत अप्रामाणिक, हिंसाचारी, खोटेपणा शिकवणाऱ्या आणि साध्या सरळ लोकांकडून पैसा उकळणाऱ्या झाल्या आहेत. संत नामदेवाने अेके ठिकाणी म्हटले आहे की, दुष्ट माणूस हा कुठेही गेला तरी आपला दुष्टपणा सोडत नाही. अेखाद्या माशीसारखा तो सदैव दुष्टपणा करण्यासच उत्सुक असतो, माशी नाही का, अेखाद्याच्या पोटात गेली तर स्वतः मरते. पण ती त्यालाही तो उलट्यानी बेजार होवून मरणपंथाला कसा लागेल हे पहात असते.

दुसऱ्या बाजूला, अशीही काही हुषार माणसे आहेत की ज्यांना परिस्थितीचे, नीट आकलन होत नाही. ते अशी अेखादी संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करतात की जी अेखाद्या राजकीय पक्षाला सहाय्य भूत ठरु शकेल. आपल्या महाराष्ट्रातच असा अेक जथा आहे. ते स्वतःला अंधश्रध्दा निर्मुलनवादी म्हणवून घेतात. पण ते स्वतःही सत्याचा नीट विचार करताना दिसत नाहीत. संतासारखी दैवी ताकद त्याच्यात नाही. काही थोडे लोक अेकत्र येवून त्यांनी स्वतःलाच अेक 'अंधश्रध्दा निर्मुलन' संस्था काढून, लोकांचा अंधविश्वास नाहीसा करण्यासाठी स्वतःच स्वतःची नेमणूक करुन घेतली आहे.

खरं म्हणजे जे स्वतःच आंधळे आहेत, जे अत्यंत आंधळेपणाने आपल्या कल्पनाविश्वावर विश्वास ठेवतात. ते दुसऱ्यांची अंधश्रध्दा कशी नाहीशी करु शकणार. जे खरे संत आहेत की जे वारंवार भोंदूगिरीब्दल आणि अंधविश्वासाविरुध्द बोलत असतात. १९७२ पासून मी स्वतः ह्या भोंदू संस्कृतीबद्दल आणि अंधविश्वासाविरुध्द उघड उघडपणे बोलत आहे. अनेकांनी मला सावधगिरीच्या सूचनाही दिल्या आहेत. मी अत्यंत परखडपणे बोलते तेव्हा ह्या दुष्टलोकांपासून मी सावध रहावे कारण ते मला ठारही करतील. पण आजवर तसा मला कोणी मारण्याचाही प्रयत्न केलेला नाही, आणि कुणी अेक गुरु विकत घेऊ शकत नाही, अर्थात हे सांगणेही मी थांबविलेले नाही.

जे लोक सहज योगासाठी येतात ते आपोआपच अंधश्रध्देच्या टोकाच्या कल्पनेचा त्याग करतात. गैरसमजुतीवर आधारलेल्या चालीरिती ज्यांचे ते अंकीत झालेले असतात, ह्यांचाही ते सहजपणे त्याग करतात. जेव्हा तुमच्यामध्ये आत्म्याचा दिव्य प्रकाश दैदीप्यमान होतो तेव्हा अचानकपणे हे घडून जाते. आणि मगच अत्यंत आनंददायी, जीवनदायी अशा

सत्याचे दर्शन मानवाला घडू शकते. माझ्या विरुध्द अनेक प्रकारचे आरोप नेहमीच लावले जातात. पण त्यांच्यापैकी कुणीही मला पर्याय देवू शकत नाहीत. कारण माझ्यासारख्या प्रामाणिक व्यक्तीला हव्यासी, ठरवून ते स्वतःच्या करोडो डॉलर्स मिळवण्याच्या उद्योगाला न्याय्य ठरविण्याचा प्रयत्न करत असतात. जे स्वतःला धर्माचे सर्वेसर्वा समजत असतात. त्यांनीही आपले डोळे उघडे ठेवून जे त्यांच्या धर्माचे अनुयायी आहेत, त्या लोकांसाठी कल्याणदायक कोणती गोष्ट आहे, सत्य म्हणजे काय ह्या गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर ते सत्याकडून वाढवले गेले नाहीत तर आपोआपच हिंसेमध्ये सर्व गोष्टी विलीन होवू शकतील. लोकच तसे करावयास प्रवृत्त होतील. सहज योग तुम्हाला हमखास मुक्ती देवू शकतो ही गोष्ट सिध्द करायला अगदी सोपी आहे. अनेक देशात ते ह्यापूर्वीच सिध्द झाले आहे. महाराष्ट्र, ज्याला संताची भूमी म्हटले जाते, तेथे देखील काही विघ्नसंतोषी लोकांनी सहजयोगावर हल्ले करण्याचा, आणि संमेलने उधळून लावण्याचा आसूरी आनंद लुटला आहे. अत्यंत वाईट घटना अत्यंत सुदूर असलेल्या अेका खेड्यात घडली. तिथे प्राथमिक शाळेतल्या मुलांना, माझे भाषण ऐकायला आलेल्या लोकांवर दगडाचा वर्षाव करावयास सांगण्यात आले. त्यामुळे आमचे अनेक लोक जखमी, रक्तबंबाळ झाले. अर्थात आता ते सर्व बरे आहेत. हे सर्व अतिशय योजनाबध्दरीतीने घडविण्यात आले होते. ह्या लोकांनी पोलीसांना लाच देवून आपल्या बाजूने वळवून घेतले होते व आम्हीच त्यांना मारहाण केल्याची खोटी फिर्यादही दाखल करण्यात आली. अर्थात ते जखमी असल्याचे डॉक्टरी प्रमाणपत्रही त्यांच्यापैकी कुणाजवळ नव्हते. गेल्या ५ वर्षापासून दावा, कोणताही निर्णय न देता कोर्टात रखडला आहे. अनेक सत्यप्रिय लोकांच्यी ह्या २० व्या शतकात देखील अशी दैना घडू शकते.

सत्याने सर्व जगासाठी कल्याणकारी गोष्ट प्रकाशात आणायलाच हवी. ज्या भारतात अनेक संतानी जन्म घेतला आहे. त्या संतभूमीतच खरे म्हणजे ही गोष्ट घडू शकते पण दुर्दैवाने भारतातही अनेक संताचा अप्रामाणिक लोकांकडून छळ केला जात आहे, रजनीशांसारखे ते अत्यंत चांगले वक्ते असल्याने लोकांमध्ये ते पटकन खूप प्रसिध्दी मिळवतात.मला आश्चर्य वाटते की लोक आपल्या वंशाचा विचार कसा करत नाहीत, आपल्या स्वतःच्या मुलांना सत्य समजलेच पाहिजे ह्याचा विचार ते का करत नाहीत.

ह्या पुढील प्रकरणात, मी तुम्हाला सहजयोग लोकांचे काय व कसे भले करु शकतो. हे विस्ताराने सांगणार आहे. तो माझा दावा नाही तर ती अेकच सत्य गोष्ट आहे. मी तर एवढ्यावर सुध्दा खूष आहे की जे लोक सहज योगाकडे वळतात ते अत्यंत मवाळ, प्रेमळ, दयाळू बनतात देवाच्या कृपेने त्यांना हात लावायचीही कुणाची ताकद होत नाही. हे मी

ठामपणे सांगू शकते. त्यांनी असा थोडासा जरी प्रयत्न केला तरी सहजयोगी अत्यंत सुलभतेने ह्या दुष्टशक्तीने निर्माण केलेल्या समस्यांचे निराकरण करु शकतात. ही गोष्ट नक्कीच स्पृहणीय आहे की जेव्हापासून मेंदूतले ७ वे केंद्र उघडले गेले तेव्हापासून सर्व गोष्टी इतक्या शांतपणे घडत आहेत आणि लोकांच्या हृदयात शांतता निर्माण करण्याचे हे कार्य घडत आहेत की सांगता सोय नाही.

मी स्वतःला अत्यंत भाग्यवान समजते म्हणूनच मी माझ्या आयुष्यात ६५ देशातले हजारो लोक संमेलनांमध्ये अेकत्र झालेले माझ्या डोळ्यांनी पाहू शकते. इतके लोक एकत्र जमतात पण कुठे भांडण तंटा नाही मारामाऱ्या नाहीत. हे संमेलन समुद्रकिनाऱ्यावरच्या एका खेड्यात भरवले जाते. सुमारे आठवडाभर ते चालते. अर्थात तिथेही काही दुष्टबुध्दीचे लोक होतेच. त्यांनी पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत घाण टाकून पाणी खराब करण्याचा प्रयत्न चालविला होता. पण जेमतेम ५ वर्षाचा अेक मुलगा अेखाद्या देवदूतासारखा माझ्याजवळ आला आणि त्या विहिरीतले पाणी आम्ही पिवू नये म्हणून सांगू लागला. खरच मोठे प्रसन्न दिवस आहेत हे आणि प्रसादयुक्त पण–! ज्यांना ह्याचा फायदा घ्यायचा असेल ते सहजपणे आयुष्याचा खरा अर्थ शोधू शकतात.

अध्यात्मिक प्रकाशाच्या दैवी उजेडातच आपण आपला आल्या आत्मप्रकशात आपल्याला हे समजू शकते की आपण आदिशक्तिचाच हिस्सा आहे. आपले शरीर अनेक सूक्ष्मपेशींनी अेकत्रित बांधलेले असते. जर शरीरातल्या अेखाद्या भागाला अपघात झाला अथवा तो दुखावला गेला तर सारे शरीर त्या भागाकडे लक्ष घालायला सज्ज होते. संपूर्ण शरीर स्वतःतच अेकमेकाच्या सहकार्याने बांधलेले असते आणि आत्यंतिक सहकार्यानेच ते वागत असते. आपल्याला त्या मागचे शास्त्रीय कारण शोधत बसण्याची काही गरज नाही. अेक मात्र नक्की की आपल्या शरीरातला प्रत्येक भाग मध्य मज्जातंतूच्याद्वारे एकत्रित बांधला गेला असतो. सहज योगात भाग घेतलेल्यांच्या शरीरातल्या प्रतिक्षिप्त क्रिया देखील अशा उत्स्फूर्तपणे सारख्या होतात. जर एखादा आजारी पडला तर सगळेजण त्याच्या मदतीसाठी धावतात. जर अेखाद्याच्या बाबतीत काही गंभीर समस्या निर्माण झाली तर सगळी संस्था, उत्स्फूर्तपणे त्या एकट्या व्यक्तीची समस्या सोडविण्याच्या मागे लागते. अध्यात्माच्या उजेडात प्रत्येक व्यक्ती प्रगत बनते. अत्यंत जागृत आणि शहाणी बनते. सहजयोगाची सगळ्यात मोठी कमाई म्हणजे ती व्यक्ती अत्यंत आनंदी बनते आणि दुसऱ्यांमधले दोष शोधत बसण्यापेक्षा दुसऱ्यांचे व्यक्तिमत्वाचे गुण गाण्याइतकी भावनाशील बनते. ह्या पृथ्वीतळावर शांती प्रस्थापित करण्याचा अेकमेव मार्ग आहे आणि तो म्हणजे केवळ भाषणे देणे अथवा संस्था स्थापन करण्याचा नसून ज्या चवथ्या मितीपाशी लोक

अध्यात्मिक बनू शकतात. त्या चवथ्या मितीबद्दल लोकांचा कल नव्या जागृतीकडे नेण्यातच आहे. पण हिंसाचारी लोकांबद्दल आपण नक्की काय करणार आहोत? आपण त्याच्यापासून आपले संरक्षण कसे करणार आहोत हा अेक प्रश्न माझ्यापुढे सतत ठेवला जातो. आपण आता सर्वसाक्षी परमेश्वराच्या राज्यात आहोत, हे ह्या प्रश्नाचे अेकमेव उत्तर आहे.

आता आपण देवाच्या राज्यातले नागरिक आहोत आणि आपले संगोपन करणे आपले संरक्षण करणे, ह्या गोष्टींची सोय करण्यास तो समर्थ आहे. अर्थात त्याच्या राज्यात आपण प्रथम माणूसकी आणि अुत्सुकता ह्यांच्यासह प्रथम प्रवेश तर करायला हवा. जर अेखाद्याला स्वमुक्ती नकोच असेल तर त्याला कोण बळजबरी करणार. अंकुर येण्यासाठी पृथ्वीला बळजरबरी करता येणे शक्य नसते ना? जो पर्यंत तुम्ही पृथ्वीमातेच्या पोटातच बिया ठेवत नाही. जोपर्यंत त्याला अत्यंत प्रेमाने पाणी खतपाणी घालत नाही तोपर्यंत अंकुर फुटणे शक्यच नसते. तव्दतच आपण जर अध्यात्माच्या दिव्य प्रकाशात उभे असलो तर आपल्याला अस्वस्थ होण्याचे काळजी करण्याचे, तणावाखाली रहायचे काही कारणच पडणार नाही. जर लोकांनी खोटेपणाच्या नादी न लागता सत्य जाणून घ्यायची शुध्द कामना मनात बाळगली तर सत्याचा शोध घेण्याचे त्यांचे स्वप्न नक्कीच प्रत्यक्षात उतरु शकेल.

विश्वशांति तेव्हाच संभवते जेव्हा जागतिक नेत्यांच्या आत्मोद्धार होईल. जे लोक वेगवेगळ्या देशाचे पुढारी आहेत ते सहजयोगाच्या द्वारे अेकमेकांचा आदर करु शकतील, अेकमेकांवर प्रेम करु लागतील आणि ते साक्रेटिसने वर्णन केल्याप्रमाणे विश्वशांतीचा विचार करणारे परोपकारी राजे बनू शकतील. आजतरी सगळ्या विश्वात युध्दाचा, अथवा युध्दजन्य परिस्थितीचा भडका उडालेला दिसत आहे.

उदाहरणार्थ बोस्नीयाचे युध्द क्रोटस, मुस्लीम व सर्ब यांनी निर्माण केलेले युध्द आहे. ते ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्माचे अनुयायी आहेत. क्रोटस कॅथलिक आहेत. पण त्यांच्यापैकी कुणीही येशूचे अनुसरण करते? जे मुसलमान परमेश्वराच्या निराकारतेवर विश्वास ठेवतात ते जमीनीसाठी भांडतात? मुळात महमदाने हा धर्म काही विशेष असल्याचे कधीच म्हटले नव्हते. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अब्राहम, मोसेस, आणि ख्रिस्त ह्यांच्या मालिकेतलाच तो चवथा होता. ख्रिस्तानेदेखील अब्राहम व मोझेस बद्दल विवेचन केलेले आहेच. मग ह्या चौघांचे अनुयायी असलेले लोक आपापसात का भांडतात? त्या सर्वाचे मूळ अेकच आहेना? कमीत कमी ह्या तीनही धर्मांनी असे लोक तयार केले पाहिजेत की ते ह्या तीनही मधील अेकरुपता समजू शकतील. अर्थात हिन्दू धर्म देखील विशेषत्वाचे पोवाडे गाणारा नाही. त्यानेही सर्व धर्मांना मान्यता दिलेली आहेच. पण राज्यकर्ते मात्र वेगळ्या धर्मासाठी वेगळ्या

कायद्याची निर्मिती करतात आणि ह्या अल्पसंख्याकांचा गैरफायदा घेऊन मतांचे राजकारण खेळतात.

माणसाचे मन हे विचारांनी कायम ठासून भरलेले असते. त्यामध्ये कायम अंहभाव निर्माण होत असतो, परंतु आपल्याला वर्तमानात शांति मिळवण्याची असते. हे विचार एकतर भुतकाळातून आलेले असतात किंवा भविष्यकाळातून !

थोडक्यात माणसाचे हे मनच स्वतंत्ररित्या अथवा सामुहिकरित्या समस्या निर्माण करत असते म्हणूनच प्रत्येकाने ह्या मनाच्या पलीकडे जायला हवे जिथे निर्विचार समाधी असते. शांती असते ह्या शांततामय सौनिकांची जरी पिढी आता निर्माण झाली आहे. आता मी एकच आशा करते ही आता इतकी पसरली पाहीजे की असंख्य माणसे शांततामय जीवन जगायला हवीत, आणि आपल्या संतत्त्वाच्या आचरणाने ही शांतता सर्वत्र पसरायला हवी.

# ८

# 'विश्वशांती'

—

चालू दशकात अेकूणच मानवी नितीमत्तेला मोठी हानी पोहचलेली आहे आणि त्या जीवनमूल्यांच्या प्रचंड हानीमुळे, सर्वच कुटुंबे अेकप्रकारच्या गोंधळाच्या अंमलाखाली आजच्या आधुनिक जगात जगत आहेत.

सामाजिक व राजकीय शांतता सुरक्षित ठेवायची असेल तर अपला प्रत्येक प्रयत्न हा नितीमूल्यांचे पुर्नजीवन होण्याच्या दिशेनेच असायला हवा हे अत्यंत गरजेचे आहे. आणि ह्या गोष्टीसाठी आपली सुरवातच मुळापासून व्हायला हवी. आपल्या मुलांची वाढ योग्य दिशेने होत आहे ना हे पाहण्यासाठी आपण मुलांकडे जास्तीत जास्त लक्ष घालायला हवे. कारण आजची मुले ही उद्याचे नागरिक बनणार आहेत. आजच्या मुलांना उद्याचा भविष्यकाळ तुम्हाला खऱ्या अर्थाने शांततामय, निरामय हवा असेल तर त्याच्या संरक्षणार्थ शस्त्रावर पैसा खर्च करुन काहीच फायदा होणार नाही. तेच तुम्ही मुलांसाठी हा पैसा योग्य पध्दतीने खर्च केलात तर त्याचा अमूल्य असा फायदा नजिकच्या भविष्यातल्या शांततामय व नैतिक समाजाच्या रुपाने तुम्हाला नक्कीच मिळू शकेल. सर्वात प्रथम आपण आपल्या मुलांकडे बारीक लक्ष पुरवायला हवे आणि आपण हे तेव्हाच खूप चांगल्या तऱ्हेने करु शकतो जेव्हा पालकांच्या लक्षात येईल की मुलांमध्ये आध्यत्मिकतेची आवड निर्माण करणे हे आजच्या दृष्टीने निर्णायक महत्वाचे आहे.

आपल्या कुटुंबातील लहान मुलांच्या प्रगतिपथावरील वाटचालीकडे विशेष लक्ष देण्याची आणि पर्यायाने मुलांची त्यांच्या समाजाची, किंबहुना देशाची प्रगती साधायची अशी शपथच खरे म्हणजे आजच्या पालकाने घ्यायला हवी. आजच्या दृष्टीने विचार केला तर पालकांनाच त्यांच्या जबाबदाऱ्या आणि ह्या संदर्भातली अध्यात्मिक कर्तव्ये स्वतःची स्वतःसमजून

घेण्याची प्रथम गरज आहे आणि त्यासाठी फ्राईडचे विध्वंसक तत्वज्ञान, अेकदा कायमचे समुद्रात फेकून देवून सुरवात करायला हवी. कॉलेज व शाळेमधून जे फ्राईडप्रणीत मानसशास्त्रात शिकविले जाते त्याचे अभ्यासक्रमातून उच्चाटण करुन हे सहज जमू शकेल. पालकांनी आपला सुट्टीचा मोकळा वेळ पोहण्याचा पोषाख घेअून बाहेर कुठेतरी व्यतीत करण्यापेक्षा आपल्या मुलांबरोबर घालवायला हवा. आयुष्यात गंमत तर हवीच. पण अध्यात्मिक शिस्त हवीच हवी. मुले कुठे जातात, काय करतात, केव्हा परत येतात, त्यांचे मित्र कोण ह्यावर आईवडिलांचे संपूर्ण नियंत्रण हवे. अर्थात हे कठोरपणे न करता, अत्यंत हळूवारपणे व कुणाला कळू न देता करता येईल. मुलांशी आईवडिलांनी अत्यंत खेळीमेळीने मित्रत्वाच्या नात्याने वागायला हवे. हे घडले तर मुले ही आपला वेळ रस्त्यावर मटरगस्ती करण्याअैवजी प्रिय आईवडिलांबरोबर घालवतील. मुलांचा कल ओळखून त्यासाठी त्यांना प्रोत्साहित करायला हवे. मुलांचे साहचर्य अत्यंत निरागस आनंद मिळवून देणारे ठरते. त्यांच्याशी बोलण्यासारखी दुसरी आनंददायी गोष्ट नाही.

अक्षय नावाचा अेक छोटा मुलगा होता. अपघाती पडण्यामुळे त्याचा कणा मोडला होता. सहजयोगाच्या साह्याने तो बरा झाला होता. अेक दिवस मी त्याला हाक मारली आणि तो माझ्याशी गप्पा मारु लागला. त्याने मला विचारले,‘माताजी बिस्कीटे कशी करतात, माहीत आहे तुम्हाला?’ मी म्हटले,‘नाही रे, मला नाही माहीत’, मग त्याने मला शिकवायला सुरवात केली, तुम्ही प्रथम तुमच्या आईला ट्रे स्वच्छ करायला सांगा. नंतर तुमच्या आईला कणकेचा गोळा बनवायला सांगा, मग तुमच्या आईला त्याचे छोटे गोळे बनवायला सांगा, मग तुम्ही ते गोळे चपटे करु शकता, मग तुमच्या आईला तो ट्रे ओव्हनमध्ये ठेवायला सांगा, तिने हातमोजे घातले असतात. मग बिस्कीटे भाजल्यावर तुम्ही आईला तो ट्रे बाहेर काढायला सांगा, आणि ती बिस्कीटे जेव्हा गार होतील, तेव्हा तुम्ही अेका प्लेटमध्ये ती काढा आणि मित्रांसोबत खा. मी त्याला म्हटले, ‘अक्षय मला आई नाही.’ त्याने विचारले, ‘ती कुठे गेली आहे. तिला तुम्ही बोलवा ना.’ मी म्हटले, ‘नाही रे, ती देवाकडे गेली आहे, ती नाही येवू शकणार’ त्याला हे अैकून खूप वाईट वाटले. तो म्हणाला, ‘अरेरे! म्हणजे तुम्हाला बिस्कीटे बनवता नाही येणार, ठीक आहे. मी तुमच्यासाठी बनवीन कारण मला आई आहे ना?’ दोन मित्रांमधला किती सुखद संवाद होता हा! माझ्याजवळ अशा असंख्य सुंदर कहाण्यांचा प्रचंड साठा आहे. ह्या आठवणींवर मी खूप मोठे पुस्तक लिहू शकेन.

मुलांची निरागसता नष्ट करण्याचे सर्व प्रयत्न मुलांच्या आईवडिलांचे, मोठ्या निकराने, अेकत्रितपणे चालूच असतात. खरं म्हणजे मुलांच्या मनात, त्यांच्या निरागस मनात नाही नाही त्या अनैतिक आणि असभ्य कल्पनांचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या चित्रपट आणि

कॅसेटवर सर्वप्रथम बंदी आणायला हवी. आईवडिलांनी अशा फिल्मस आणि कॅसेट विरुध्द अेक मोर्चाबांधणी करायला हवी. समाजाप्रति, अेकमेकांविषयी, शिक्षकांविषयी, आणि प्रत्येक मोठ्या व्यक्तीविषयी मुलांच्या मनात आदर निर्माण होईल असे शिक्षण घ्यायला हवे. त्यातूनच देशाबद्दल व अखिल विश्वाबद्दल आदर निर्माण होईल. त्यातूनच आपल्याला अपेक्षित असलेली विश्व अेकात्मता निर्माण होईल. त्यांनी विश्वकुटुंब, विश्वशांती, विश्वधर्म ह्या कल्पनांचा अगदी लहान वयातच अभ्यास करुन त्या समजावून घेतल्या पाहिजेत. त्यांनी शुध्द आणि निस्वार्थी प्रेम ह्याच आयुष्यात महत्वाच्या गोष्टी असतात आणि नितीमत्ता हेच सर्वात महत्वाचे जीवन मूल्य असते, पैशापेक्षाही कितीतरी महत्वाचे, ही गोष्ट आपल्या आईवडिलांच्या संस्कारातून शिकायला हवी. चांगली आणि वेचक पुस्तके वाचून मुलांना आयुष्यातली योग्य गोष्ट कळू शकेल. त्यांची भाषा रसाळ, आदरयुक्त व मार्दवपूर्ण असायला हवी. मानवजातीमधला अेक सदस्य म्हणून त्यांना आपण उत्क्रांतीमधील अेक महत्वाचे घटक आहोत आणि प्रगतीपथावरील पाउलवाटेवर उच्च स्तरावर जाण्यासाठीच आपण ह्या पृथ्वीतळावर जन्म घेतला आहे, ह्याची स्पष्ट जाणीव असायलाच हवी.

मुलांचा अभ्यासक्रम हा अत्यंत काळजीपूर्वक ठरविणे अत्यंत गरजेचे आहे. मुलांना स्वार्थीपणा शिकवण्याअैवजी 'वाटून घेणे' ह्यातला आनंद कळायलाच हवा. त्यांना जगातल्या इतर लोकांबद्दल सत्य माहिती मिळायला हवी. म्हणजेच मनात वर्णभेदाचे अथवा इतरही कुठले किल्मिष न बाळगता ते त्यांचा आदर करु शकतील. त्यांना ते ज्या समाजात रहातात, त्या समाजाचा अेक चांगला भाग म्हणून ओळखले जाण्यासाठी जागृत केले पाहिजे. ह्या गोंधळलेल्या समाजात मुलांच, निरागस मुलांचे स्थान पक्के करण्यासाठी तरुण लोकांनी वारंवार चर्चासत्र आयोजित करुन चर्चा घडवून आणायला हव्यात. धर्माच्या, देवाच्या नावाखाली आपापसात भांडण करणाऱ्या कुठल्याही तथाकथित विशेष धर्मावर त्यांनी विश्वास ठेवावा ह्यासाठी त्यांना बळजबरी करण्यात येवू नये. द्वेष आणि स्वामित्व ह्या दोन गोष्टी टाळण्याकडे त्यांचा कल कसा झुकेल ह्याबाबत प्रयत्नशील रहायला हवे. जर लहानपणापासून त्यांना असे सांगण्यात आले की तुमच्या अवतीभवतीच्या सर्व गोष्टीवर तुम्ही मालकी हक्क मिळवू शकता तर आपोआपच त्यांच्यात भयंकर अहंभाव निर्माण होईल. अगदी त्यांच्याजवळ असलेल्या निरुपयोगी खेळण्यांच्या बाबतीतही हे घडू शकते. मुलांना जी खेळणी घ्यायची तीही अत्यंत काटेकोरपणे निवडायला हवीत. त्यांनी हिंसेला उत्तेजन द्यावे अथवा हिंसेचे उदात्तीकरण होईल असे खेळणे नसावे किंवा हिंसा हा त्यांच्यासाठी कथाविषय म्हणून पण देवू नये. मुलांना फक्त खूप सुंदर आणि रचनात्मक

खेळणी हाताळू द्यावीत. ज्यायोगे रचनेतला, निर्मितीतला आनंद ते समजू शकतील. भूतकाळातल्या किंवा वर्तमानकाळातल्या भयानक प्राण्यांची अत्यंत कुरुपपध्दतीने बनवलेली खेळणी मुलांना कधीच देवू नयेत, मी तर म्हणेन, ती विकूही नाहीत, खरोखर, अशा खेळण्यांवर बंदीच आणायला हवी. जर काही चांगली खेळणी बनवली गेली, आणि त्या घाणेरड्या, कुरुप खेळण्यांवर बंदी आणली तर मला खात्री आहे. मुलांमध्ये सुंदर आणि रचनात्मक खेळण्याची आवड नक्कीच वाढीस लागेल. जेव्हा माझ्या मुली लहान होत्या, तेव्हा रामयण, महाभारत, गीता किंवा बायबलवर बनविले गेलेले चित्रपट पहाण्यास मी त्यांच्यावर सक्ती करत असे. आपोआपच अशा तऱ्हेचे चित्रपटच पाहण्यात त्यांना आश्चर्यकारकरित्या गोडी वाटू लागली. इतकी की मी एकदा मुलींना माहेरी आईकडे पाठविले असताना माझ्या बहिणीने मला पत्रात लिहिले की तुझ्या मुली ज्याची कथा पुराणांवर आधारित नाही, किंवा, पारंपारिक नाही असे चित्रपट पहायला यायला तयारच होत नाहीत. आता माझ्या मुली मोठ्या झाल्या आहेत, इतरांपेक्षा त्या खूप वेगळ्या आहेत. हा चांगले चित्रपट पाहण्याची आवड निर्माण करण्याचा एकमेव मार्ग आहे.

मुलांना, कुरुप, बिभत्स चित्रपट पहायला मूळात आवडत नाही. माझ्या अनुभवाप्रमाणे, माझ्या असे लक्षात आले आहे की मुले मुळातच शुध्द आणि निरागसच असतात. अर्थात मुलाच्या वेळेस आईस दिवस असताना जर आईवडिल सतत भांडत राहिले तर त्याचा दूरगामी परिणार मुलांवर होतो. पालकांचा मुलांशी संपूर्ण सहयोग असायला हवा, त्यांनी मुलांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवायला हवा. आणि त्यांच्याशी अत्यंत प्रेमाने, हळूवारपणे बोलायला हवे. मुलांच्या देखत एकमेकांशी भांडून वेळ घालविण्यापेक्षा आपला वेळ मुलांबरोबर घरात बोलून घालविला पाहिजे. त्यांना आपला सहवास द्यायला हवा केले तर ती खूप चांगली मुले होतील, समाजाची संपत्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाईल.

जेव्हा पालक मुलांना घेऊन कुठे बाहेर जातील तेव्हा त्यांना कुठल्याही असभ्य जागेवर नेवू नये. मुले आपल्यामध्ये चांगली अथवा वाईट फार पटकन टिपून घेतात. ते मग पटकन जुगार खेळायला शिकतात. मला अशी काही मुले ठाउक आहेत की ती कोणत्याही गोष्टीवर पटकन पैज लावतात व आपापसात मारामारी करतात. दुसऱ्या बाजूला जी मुले आईवडिलांनी खूप प्रेमाने आणि काळजीपूर्वक वाढवली असतात ती मुले खूप गोड, अगदी चॉकलेटसारखी मिठ्ठास बनतात. आपोआपच अशी मुले आपली मालकी हक्काची भावना, सारं काही फक्त आपल्यालाच मिळावे असा हावरेपणा हळूहळू विसरु लागतात. अमेरिकेत आमच्या शाळेत दोन मुले होती. ती दिवसेंदिवस क्षीण होत आहेत असे माझ्या लक्षात आले त्याचे कारण मी शाळेतल्या शिक्षकांना विचारताच, त्यांना मॅकेडोनाल्ड बर्गर सारख्याच गोष्टी

खायला हव्या असतात आणि आपल्या शाळेकडे असल्या गोष्टी पुरवण्याची व्यवस्था नाही. अर्थात नंतर हळूहळू त्या मुलांची आवड बदलली आणि त्यांना घरी केलेले पौष्टिक पदार्थ आवडू लागले. पुढच्या वर्षी ते परत आपल्या घरी गेले तेव्हा हे सर्व पाहून त्यांच्या पालकांना आश्चर्यच वाटले, ते तेव्हा म्हणत, 'चला, आपण मॅकडोनाल्डसाला जावू यात' मुले म्हणत, ' नको आम्हाला आवडत नाही. आम्हाला कुठल्याच फास्टफुडच्या दुकानात जायचे नाही. जे काही घरात बनवले असेल तेच आम्ही खाउ. ' मुलांमध्ये झालेला हा बदल पाहून आईवडिल खूपच सुखावले. आपला आनंद आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी ते मुलांना म्हणाले, 'जेव्हा तुम्ही परत शाळेत जाल तेव्हा तुमच्या आवडीची काहीतरी वस्तू आम्ही तुम्हाला देवू इच्छितो.' मुलांनी थोडासा विचार केला आणि म्हणाले, 'शाळेतल्या आमच्या मित्रांना दाखविण्यासाठी तुमचे फोटो आम्हाला हवेत.' ही मुले खूपच गोड आहेत. आता ती वर्गात अभ्यासही चांगला करतात. त्यांचे वजनही आता व्यवस्थित झाले आहे.

माझ्या असे ध्यानात आले आहे की घर जर स्वच्छ, आणि नीटनेटके असेल व घरसजावटीकडे अत्यंत आपुलकीने पाहिले गेले असेल तर मुले ते अस्ताव्यस्त करत नाहीत. त्यांनाही तसेच स्वच्छ घर ठेवायला आवडते.

मला आठवते, माझी नात माझ्याकडे आली होती. तिने कारपेटवरचा अेक डाग स्वच्छ करायला सुरुवात केली. साधारणतः इंग्लंडमध्ये लोक कारपेटच्या स्वच्छतेचेबद्दल खूप काळजी घेतात. त्यांना ते सहजपणे नंतर विकून टाकता येते. तर मी सांगत होते की माझी ही छोटीशी नात सुमारे तासभर तरी त्या कारपेटची स्वच्छता करत होती. शेवेटी मी म्हटले, ' अग! तु कशाला करत बसली आहेस हे, नंतर ते स्वच्छ करवून घेता येईल ना, त्यावर ती म्हणाली, नाही ग, आजी, तुझे घर इतके सुंदर आणि स्वच्छ आहे की या डागाने मला ते कुरुप बघवत नाही. मला तिच्या समजूतदारपणाचे, आणि जबाबदारीने वागण्याचे मला आश्चर्यच वाटले. जर मुलांना सुंदर स्वच्छ व नीटनेटके घर ठेवण्याची जबाबदारी टाकली तर ती जबाबदारी ते नक्कीच पार पाडतात. भारतामध्ये ही गोष्ट खूप चांगल्या तऱ्हेने केली जाते. आणि मुले आपोआप खूप लवकर रचनात्मक, कलात्मक, सुंदर आणि त्यांना जीवनांचा संदेश देणाऱ्या गोष्टी करायला शिकतात. ह्याच पध्दतीने आपण त्यांच्या भावभावनांचा खोलवर विकास घडवून आणू शकतो. मुलांनी आईवडिलांकडे जन्म घेतला असतो ते काही झाडावरुन पडलेले नसतात. मग त्यांच्या आयुष्याला आकार देण्याचे काम कोण करणार? शिक्षक देखील खूप चांगल्या तऱ्हेने हे काम करु शकतात.

ह्या उलट काही वेळेस आपल्या आईवडिलांचे अथवा शिक्षकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यसाठी ही मुले आपल्या काही कल्पनांचा विकृत वापर करुन हिंसक बनतात

पाश्चिमात्य देशातल्या शाळेत लैंगिक शिक्षणावर जरा जास्तच, अवाजवी भर दिला जातो. अगदी लहान मुलांनाही हे शिक्षण दिले जाते. ह्यामुळे होते काय की अर्धपक्व मनात ह्या लैंगिकतेबद्दल उत्सुकता निर्माण होते व परिणामतः लैंगिकतेवर सर्व प्रकारच्या आधारलेल्या सर्व प्रकारच्या समस्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होवू शकतात. मुलांची मने ओल्या मातीसारखी असतात. त्यांना खूप चांगल्या तऱ्हेने सुंदर आकार देता येतो. पण तेच ह्या मुलांना निष्काळजीपणाने हाताळले तर आकारच बिघडला जातो. त्यांच्या निरागस मनात कुठल्याही प्रकारच्या लैंगिक आकृत्या नसतात. पण जर का त्यांच्यावर शाळांमधून, पुस्तकातून, प्रसार माध्यमाद्वारे सतत ह्या लैंगिक जीवनाचा आणि हिंसाचाराचा मारा करत राहिले तर आपोआपच त्यांचे मन अेखाद्या फक्त लैंगिक फोटो घेणाऱ्या कॅमेऱ्यासारखे होण्यास वेळ लागत नाही आणि मग त्या मनात हे फोटो घेतले जातात, आणि फावल्या वेळात त्यांच्यासमोर त्या आकृत्या सतत वेड्यावाकड्या नाचत राहतात. खरं म्हणजे ह्या वयात त्यांच्याशी लैंगिकतेबद्दल उघडउघड बोलायचे काही कारण नसते. आपल्या भारतात देशात लोक लैंगिकतेबद्दल बोलत नाहीत. जोपर्यंत मुले पुरेशी मोठी होत नाहीत तोपर्यंत त्यांना ह्या गोष्टीबद्दल काहीही माहिती नसते आणि तारुण्यात पदार्पण करेपर्यंत त्यांना तिच्यापासून दूरच ठेवले जाते. कोणत्याही परिस्थितीत वडिलांनी मुलाला व आईने मुलीला, ह्याच पध्दतीने हे लैंगिक शिक्षण द्यायला हवे. वर्गात हे शिक्षण देणे म्हणजे खूप लहान वयात त्यांना लैगिक अनुभव घेण्यास भाग पाडणे होय आणि लहान वयातच, अतिरिक्त लैंगिकता व त्याच अनुभवात आकंठ डुबून जाणे ह्यामुळे काही गंभीर आजार निर्माण होअून अेकूणच समाजाला ते घातक ठरु शकते. मुले लैंगिकतेबद्दलची आपली नैसर्गिक शरम, लज्जा हरवून बसतात. खरं म्हणजे माणसाचे लैंगिक जीवन हे त्याच्या आयुष्यतला अत्यंत खाजगी भाग असतो. भारतात जर अेखाद्या शाळेने अशा प्रकारचे लैंगिक शिक्षण देण्यास सुरवात केली तर पालक मुलांना ताबडतोब त्या शाळेतून काढून घेतील. जे पालक मुलांना पाश्चिमात्य धर्तीच्या शाळेत पाठवितात ते स्वतःच पाश्चिमात्य जीवनशैलीने, जीवनमूल्यांशी भारले गेलेले असतात. बऱ्याचश्या पाश्चिमात्य पध्दतीच्या ह्या शाळेतून विपर्यस्त लैंगिकतेचा जणू महापूर आलेला असतो. कारण अल्पवयातच मुलांना त्याबद्दल सारे काही कळलेले असते आणि त्या तथाकथित आनंदात त्यांना डूबून जायचे असते. शिक्षकांनी मुलांना प्रेम ह्या शब्दाचा खरा अर्थ जाणून घेण्यास शिकविले पाहिजे. समाजाला कसे उपयोगी पडले पाहिजे, हे शिकविले पाहिजे. त्यांनी कसे दयाळू व्हायला हवे आणि बरबटलेल्या वासनेपासून कसे मुक्त व्हायचे हे शिकवले पाहिजे. मुलांनी आयुष्यात सर्व प्रथम हा धडा गिरवायला हवा.

गणित आणि व्याकरणासारखे विषय सहजतेने समजून घेतात येतात. पण शिक्षकांनी आपल्या उच्च विचरसरणींनी आणि दुसरे म्हणजे विद्वान लेखकांनी लिहिलेल्या चांगल्या पुस्तकाच्या साह्याने मुलांमध्ये ह्या गोष्टी कशा निर्माण होतील ह्याचा विचार प्रथम करावयास हवा. त्याचबरोबर अेखाद्या व्यक्तीत हे गुण नसतील तर त्याला आयुष्यात किती त्रास होतो हे देखील ह्या पुस्तकांच्या द्वारे त्यांना कळू शकेल.

भारतामध्ये जेव्हा लोक जेवायला अेकत्र बसतात, तेव्हा टेबलवर मीठ, अथवा मीठाचे भांडे अेकमेकांच्या हातात देत नाहीत, कारण तसे केल्याने भांडण होते असा अेक समज आहे. ह्या गोष्टींपासून अेकच धडा घ्यायचा की अशी कोणतीही गोष्ट करायची नाही जी भांडणाला प्रवृत्त करेल. ह्यात आपण कुणाशी भांडू नाही ही भावना मनात येणे हे सर्वात महत्वाचे कारण कुणी कुणाशी भांडणे हे मानवी प्रतिष्ठेला मुळीच शोभेसे नाही. मुलांना ही गोष्ट स्पष्ट समजायला हवी की जगाच्या उत्क्रांतीमध्ये मानव हा त्या उत्क्रांतीचा अर्क आहे. त्यांनी हेही लक्षात घ्यायला हवे की अेकमेकांना खूष करत अेकमेकांशी शांततेने आणि मित्रत्वाच्या नात्याने रहायला हवे. आपण जनावरांसारखे नाही आहोत, तसे वागूच शकत नाही. अेकमेकांना आनंद देणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे आणि सर्व शक्य पध्दतीनी मुलांना हे शिकवायला हवे. भांडण टाळणे ही आपल्या व्यक्तीमत्वातली कमजोरी नाही ह्याची स्पष्ट जाणीव मुलांना होणे गरजेचे आहे. अेकमेकांशी आनंदाने आणि शांततेने वागणे ही केवढी दैदिप्यमान गोष्ट आहे. विसरणे, क्षमा करणे हाच खरा पुरुषार्थ आहे ह्या पुरुषार्थाचा आनंद अेकदा का मुलांना कळला की इतर फालतू गोष्टींपासून ते दूरच राहतील.

काही वर्षापूर्वी भारतात, काही आंग्लालेल्या लोकांनी खास युवा पिढीसाठी अेक वर्तमान पत्र काढले होते. आपण आपले आयुष्य याच पध्दतीने, तारुण्य, प्रौढत्व असे कधीच विभागत नसू. ही संपूर्ण आधुनिक संकल्पना आहे. तर ते लोग माझ्या मोठ्या मुलीला भेटण्यास आले. त्या वेळेस ती फक्त १३ वर्षाची होती. त्यांना तिला अेकटीला भेटायचे होते. त्यांनी तिला खूपच चमत्कारिक प्रश्न विचारले. त्यांच्यापैकी एकाने विचारले तुला बॉयफ्रेंड आहे? तिने उत्तर दिले मला खूप मैत्रिणी आहेत आणि खूप भाऊ (कझीन्स) आहेत. भारतामध्ये 'कझीन्स' हा शब्द खूपच व्यापक अर्थाने वापरला जातो. त्यांचा पुढचा प्रश्न होता, 'अेखाद्या पक्षासारखे तुला आकाशात स्वैर संचार करावयास आवडेल? तिने उत्तर दिले, 'प्रथम माझ्या पंखाची वाढ तर नीटपणे होवू देत.' मग आईवर हल्ला चढवित ते म्हणाले,ती तुझ्यावर कडक नियंत्रण ठेवते? मुलीने उत्तर दिले, माझी आई माझ्यावर प्रेम करते. माझ्यासाठी काय चांगले, वाईट आहे ते तिला खूप चांगले माहीत आहे. मी तिला नाखूष करणारी कोणतीही गोष्ट कधी करणार नाही.

मुलांमध्ये इतक्या सबळ प्रमाणात स्वाभिमान अेकत्र झाला पाहिजे की त्यांनी अेखादया गोष्टीची मागणी करणे, अथवा ती गोष्ट मिळवण्यासाठी भांडणे ही गोष्ट आजिबात करता कामा नये, त्यांना स्वाभिमानी लोकांच्या गोष्टी सांगून, त्यांच्याशी वारंवार बोलून ही गोष्ट करता येईल. अेकदा आम्ही ब्रिटनमध्ये गेलो होतो. माझ्या दोन नाती आमच्याबरोबर होत्या. त्या दोघी चिमुकल्या रेल्वेतून विहार करीत होत्या. त्या परत आल्या, पण छोटीला परत तिथेच जायचे होते. ती रडू लागली. अेकाअेकी तिला जाणवले आपण हे काय करत आहोत. तिचा स्वत:बद्दलचा अभिमान अेकदम जागा झाला. तिने आपला चेहरा झाकला आणि ती सारखी 'मला माफ कर आजी, माफ कर, असे म्हणू लागली. मी तिला म्हटले, 'तू तुझा चेहरा का लपवित आहेस? ती उत्तरली 'मी ज्या पध्दतीने वागले त्याची मला खूप लाज वाटते. मूळ आपल्या निरागसतेचे, परिपक्वतेत खूप चांगले परिवर्तन करु शकतात. अर्थात त्यासाठी आपण त्यांच्यात योग्य दृष्टीकोन आणि स्वाभिमान ह्याचा विकास होइल अशी संधी त्यांना दिली पाहिजे. त्यांच्या पुरुषार्थाला,स पराक्रमाला सकारात्मक जादा कुमक देअुन त्यांच्या छोट्या छोट्या ध्येयाला खतपाणी घालून, आपण त्यांना चांगल्याचे नेहमी कौतुक केले पाहिजे ही गोष्ट शिकवायलाच हवी.

माझ्या दुसऱ्या मुलीच्यासंदर्भात माझ्याजवळ अेक खूप चांगली आठवण आहे. ती मुंबई विद्यापीठात अेम.अे. च्या पहिल्या वर्षात शिकत होती. ती अेका पाश्चिमात्य पध्दतीच्या कॉलेजमध्ये जात होती. अेक दिवस तिने मला विचारले, 'कॉलेजमधल्या अनेक मुली घालतात तसे स्लीव्हलेस ब्लाउज मी घालू? मी तिला म्हटले, 'तू आता पुरेशी मोठी झाली आहेस. तुझा निर्णय तू घेवू शकतेस. नंतर तिने विचारले, 'आई तू स्लीव्हलेस ब्लाउज का घालत नाहीस?' मी म्हटले, 'अेकतर मी माझे खांदे उघडे टाकले तर मला वेदना होतील, शिवाय मी बरीच जुन्या विचारांची, पारंपारिक आहे.' तिनेक्षणभर विचार केला, तिच्या लक्षात आले की ह्यामागे काहीतरी महत्वाचे कारण असावे. मग मला तिला सांगावेच लागले की आपल्या शरीरातली दोन महत्वाची चक्रे ह्या खांद्यापासच्या सांधेजोडीत असतात. त्याला श्रीचक्र आणि श्रीललिता चक्र असे म्हणतात आणि ही चक्रे झाकून ठेवणेच योग्य असते. तिला हे ऐकून काहीसा धक्का बसला. मग ती मला म्हणाली, 'आई जे चुकीचे आहे ते करावयास तू मला का परवानगी दिलीस. तू माझी आई आहेस. माझ्यापेक्षा जास्त हुषार आहेस . तू मला फक्त 'नाही' म्हणायला हवे होतेस आणि माझ्या त्या चक्रांचे संरक्षण करावयास हवे होते.

मुलांसाठी तयार करण्यात येणारे चित्रपट अेकतर पालकांनी स्वतः बनविले पाहिजेत. स्वतः अेक पालक कमेटी नेमून ते बघून त्यावर निर्णय दिले पाहिजेत. आणि जे चित्रपट

मुलांनी पाहू नये असे असतात ते टी.व्ही. वर रात्री ९ नंतर दाखविण्यात यावेत. जेव्हा मुलांनी गाढ झोपेत असावे, अशी अपेक्षा आहे. भयंकर प्राणी, दुराचारी, मृतशरीरे, भुतपिशाच्च ह्या प्रकारच्या मुलांना भिववणाऱ्या गोष्टी ज्या चित्रपटात असतील ते मुळीच दाखविण्यात येवू नयेत. अशा नाजूक वयात अेकदा का ते घाबरले की आयुष्यभर ही धास्तीनी भावना ते मनात बाळगतात. अनेकदा मुलांना आपण झाडाची, चंद्राची, कुत्र्याची भीती दाखवतो. मुलांना भितीदायक गोष्टी सांगणाऱ्या लोकांकडून अशा प्रकारची भीती मनात प्रस्थापित केली जाते. ही भिती मनात खोलवर दडून बसते आणि अत्यंत चिवट असते. अथक आणि सतत प्रयत्नांनतरच मुलांच्यामनावरचा हा भितीचा पगडा दूर करता येतो व त्यांना सांगितल्या गेलेल्या भितीदायक गोष्टी काल्पनिक असतात हे त्यांच्या मनावर ठसविता येते.

माझ्या असे लक्षात आले आहे की कॅन्सरसारख्या रोगांच्या अनेक कारणांपैंकी, लहान वयातच मुलांच्या मनात निर्माण झालेली भीती हे अेक महत्वाचे कारण ठरु शकते. काही वेळेस ही भीती त्यांना खूप वेगळ्या तऱ्हेचे वर्तन करण्यास भाग पाडते. ज्यांना ते घाबरतात त्यांना नष्ट करण्यासाठी बरबाद करण्यासाठी ती अनेक युक्त्या वापरताना दिसतात.

जे लोक विवाहित असतात. त्यांना आपण विवाहबंधन का स्वीकारले आहे, ह्याची पूर्ण जाणीव असावी. जर त्यांना मुले हवी असतील, तर त्यांना आपल्याला ती का हवी आहेत ह्याची पूर्ण कल्पना असावी. विवाहितांसाठी निर्माण केलेला कायदाच असा असावा की खूप चांगल्या गोष्टीत ते वाकबगार होतील आणि सुखी वैवाहिक आयुष्याची त्यांची स्वप्ने पुरी होतील. अशी अनेक जोडपी आहेत की जी लग्न न करता अेकत्र राहतात अर्थात हे जास्त करून पश्चिमेकडेच घडते. आणि असे लोक जेव्हा लग्न करतात तेव्हा मात्र ते अेकमेकांपासून काहीसे दुरावतात. कारण महत्वाचे असे की जर त्यांनी घटस्फोट घेतला तर त्यांची संपत्ती अर्ध्यात वाटावी लागेल. तसेच घराचेही दोन भाग करावे लागतील. ह्याच गोष्टीला घाबरतात. मी अमेरिकेसारख्या देशात अशा अनेक स्त्रिया पाहिल्या आहेत की ज्या अेखाद्या राणीसारख्या राहतात. कारण १०–१० घटस्फोट घेअून प्रत्येक नवऱ्यांकडून त्यांनी अफाट संपत्ती मिळवली असते आणि बहुतेकींचे माजी पती कंगाल होऊन भिकेला लागलेले असतात. संरक्षणाच्या नावाखाली स्त्रियांना जास्त हक्क मिळणे हा अशा देशातून अेक रोगच झाला आहे. साहजिकच ह्या स्त्रिया लग्नाकडे धंदा म्हणून पाहतात. पुरुषांनी ह्या स्त्रियांपासून आम्हाला वाचवा अशी हाकाटी करण्याची आता वेळ आली आहे. हा कायदा काही वर्षापूर्वीपर्यंत ठीक होता. पण आता तो अत्यंत धोकादायक झाला आहे. आणि घटस्फोटाकडे केवळ पैसे मिळवण्याचे धन मानणारा हा कायदा आता बदलायची वेळ आली आहे.

आजकाल जे चित्रपट बनवले जातात. ते सध्याच्या काळात जसे बनविले पाहिजेत त्याच्या जवळपासही न पोहचणारे आहेत. पहिली गोष्ट, जर ते अमेरिकन चित्रपट असतील तर अमेरिकन लोकांखेरीज इतर कुणालाही त्यांची भाषा समजत नाही. जर ते इंग्लिश असतील तर ब्रिटनमधल्या लोकांखेरीज ते कुणाला कळत नाहीत. जुन्या काळात इंग्लीश चित्रपटातील उच्चार अतिशय स्पष्ट असत. पण आता चित्र पालटलं आहे. आता इंग्रजीचा उच्चार अमेरिकन पध्दतीने केला जातो. दूरदर्शनवरचे वृत्तनिवेदकदेखील ते वापरत असलेल्या शब्दांच्या उच्चाराबाबत बेफिकीर असतात. त्यांना फक्त घाई आणि वेग ह्याचीच जणू काळजी असते. उलट दुसरीकडे जे लोक ब्रिटन किंवा अमेरिका सोडून भारतात अथवा जपानमध्ये, हाँगकाँग मध्य वास्तव्यास गेले आहेत. त्यांची भाषा जे लोक इंग्लंड, अमेरिकत राहतात, त्यांच्यापेक्षा चांगली आहे असे म्हणावे लागते.

सध्याचे चित्रपट हे किळसवाण्या लैंगिकतेने आणि भयानक हिंसाचाराने भरलेले असतात. ही त्यांच्याबद्दलची सर्वात अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. त्या चित्रपटांना कथा नसते, त्यात काही घटना घडत नाहीत. जणू काही प्रत्येक चित्रपटातही आंतरिक मुल्य असलेलाच चित्रपट बनेल ऐव्हढी निर्मितीक्षमता असलेले चांगले लेखक आता शिल्लकच नाही आहेत. अर्थातच ह्या चित्रपटांचा अत्यंत वाईट परिणाम समाजावर होतो. विशेषतः समाजातल्या युवा पिढीवर! खरं म्हणजे ह्या चित्रपटांवर खूप आदर्शवादी लोकांचे नियंत्रण हवे. प्रत्येक चित्रपटाचे तोलून मापून परीक्षण होणे गरजेचे आहे. आणि अर्थातच त्यसाठी काही कडक कायदेकानून आणि मानदंड असणे आवश्यक आहे. आजचे बरेचसे चित्रपट कलात्मक नसतात. उलट, त्यापैकी बरेचसे हास्यास्पद आणि असभ्य असतात. जर ते संपूर्ण कलात्मक असतील तर लोकांना आकर्षित करुन घेण्यासाठी यात अश्लीलता आणि हिंसाचाराची पेरणी करण्याची खरोखरच गरज नाही. कला मूळतःच आकर्षक असते. पण सध्याच्या काळात 'मागणी तसा पुरवठा' ह्या न्यायाने अत्यंत हीन दर्जाचे चित्रपट बनविले जातात.भले चित्रपट उद्योगात तांत्रिकदृष्ट्या कितीही सुधारणा झालेली असो. पण निर्माण होणारे चित्रपट मात्र अत्यंत कलाहीन असतात. त्यांच्यावर कोणत्याही नियंत्रणाचा परिणाम न होता त्यांचा प्रवास वाईटाकडून अधिक वाईटाकडे चालूच आहे. खरं म्हणजे परीनिरीक्षण मंडळावर चांगल्या, आदर्श नितीमत्तेची जाण असलेले आणि त्यानुसार चित्रपटात सुधारणा करु शकणारे लोक असणे आवश्यक आहे. विशेषतः बाल चित्रपट खूपच काळजीपूर्वक पाहून ते पास केले पाहिजेत. असे चित्रपट मुलांना नितीमत्ता आणि दयाळूपणा शिकवण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊनच निर्माण व्हायला हवेत. शिक्षणविषयक धोरणही असेच हवे. चित्रपटात पैशापेक्षा

संस्कृतीचा विचार जास्त व्हावा. तसेच मुलांना चांगली पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. ही पुस्तके जगातल्या चांगल्या लेखकांकडून लिहिलेली असावीत. त्यांचे वाचन फक्त देशापुरते सीमित राहू नये. त्यातही केवळ कवीकल्पनेवर आधारलेल्या विज्ञान काल्पनिका किंवा कामुक कहाण्यांपेक्षा लोकोत्तर पुरुषांची चरित्रे, आत्मचरित्रे ह्यासारखी पुस्तके वाचण्याकडे कल त्यांचा असावा. जर तुम्ही त्यांच्यापुढे भयानक नायकांचे वर्णन करणारी पुस्तके ठेवलीत तर त्या दुष्ट लोकांचे अवगुण ही मुले चटकन आत्मसात करतील. थोड्या मोठ्या मुलांसाठी भ्रष्ट, अनैतिकता, किती भयावह असते आणि तिच्यामुळे जीवन कसे उध्वस्त होते हे दाखवून देणाऱ्या कथा, कादंबऱ्याची निर्मिती व्हावी.

मुलांना मुक्त स्वातंत्र्य देण्याची संकल्पना देखील अतिशय भयावरह, धोकादायक आहे. पूर्ण स्वातंत्र्याची कल्पना तेव्हाच उपकारक ठरेल जेव्हा स्वातंत्र्य ह्या शब्दाचा पुरा आणि खरा अर्थ समजण्याइतके हुषार आणि परिपक्व झाले असतील.

मुळात मोठया लोकांनीच आपल्या वयाचा नीट विचार करुन आपल्यापेक्षा लहान असलेल्यांसारखे हट्टी आणि मूर्ख बनू नये. अेकदा मी अमेरिकेत, सँटा मोनिकाला गेले होते. बरोबर अेक भारतीय स्त्री होती. अेकदा भल्या पहाटे तिने माझे दार ठोठावत 'लवकर उठा' 'लवकर उठा' चा धोशा सुरु केला. मला कळेचना की काय झाले असावे. मी उठले आणि दार उघडून तिला विचारले, 'काय झाले?' ती म्हणाली, 'अहो भूकंप होणार आहे.' मी म्हटले, 'कशावरुन तुम्हाला असे वाटते?' ती म्हणाली अहो रस्त्यावर लोक धावताहेत. कुठे ? असे विचारत मी काय झाले हे पाहू लागले. रस्त्यावर लोक धावत होते शंकाच नाही पण ते सर्व जॉगींग करत होते. मी तिला म्हटले , 'अहो हा सकाळी करायचा एक व्यायाम प्रकार आहे. त्याला जॉगींग म्हणतात. त्यावर ती म्हणाली, ' नाही नाही, रस्त्यावर अनेक म्हातारे आणि म्हाताऱ्यासुध्दा पळताना दिसत आहेत हे कसे काय? तरण्याताठ्या मुलांसारखे ते कसे काय पळतील? शिवाय ते इतके सडपातळ आणि म्हातारे आहेत की त्यांना केव्हाही हृदयविकाराचा झटका येवू शकेल. मी तिला म्हटले, बाई ग! तुला माहीत नाही, ही अमेरिका आहे. इथे वृध्द लोक एवढे परिपक्व नसतात. त्यामुळे आपण तरुणांसारखे पळू नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही. अमेरिकेत प्रौढ व्यक्तीला अजूनही ते सर्व काही करावेसे वाटते जे तरुण पिढी करते. त्यांच्यात हुषारी शहाणपण नाही, साहजिकच तरुण पिढी त्यांचा यथायोग्य आदर करीत नाही.

आता आपण कुटुंबाकडून समाजाकडे जावू या. पाश्चिमात्य देशातला समाज, तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण अजिबात व्यक्तिवादी अथवा परंपराप्रिय नाही, जी कोणती फॅशन त्या

काळात आहे त्याचे अनुकरण ते करणारच, काही काही वेळेस हे समजणेही अशक्यप्राय होऊन जाते की हरदिवशी येणाऱ्या ह्या फॅशनचे अनुकरण ते का करतात? प्रत्येक वर्षी जुने कपडे फेकून देणे आणि फॅशन डिझाईन्सच्या नावाखाली तयार केलेले वाटेल ते नवे कपडे विकत घेऊन त्यांना काय मिळते? हे वयोवृध्द वयानुरुप सभ्य आणि प्रतिष्ठित राहण्याचा का प्रयत्न करत नाहीत? आपण लहान वयातच मुलांना स्वाभिमानी बनण्याचा, आणि स्वप्रतिष्ठा जपण्याचा धडा दिला तर आपोआपच ते पाश्चिमात्य लोकांच्या खर्चिक मार्गांचे अनुकरण न करता स्वतःला सभ्य आणि प्रतिष्ठित बनविण्याचा प्रयत्न करतील आणि समाजातील सुजाण व जबाबदार नागरिक बनतील.

माझा नातू जेव्हा लहान होता, तेव्हा मला म्हणाला जसे आजोबा बूट घालतात तसेच बूट मला हवेत आणि माझे कपडेही त्यांच्यासारखेच शिव. मी म्हटले, 'अरे, ते खूप म्हातारे आहेत. तो म्हणाला, काही हरकत नाही पण मला अत्याधुनिक माणसे जसे कपडे घालतात तसे नकोत. तो कोणतेही परंपरेला सोडून शिवलेले कपडे घालत नसे. ह्याचे मला खूप आश्चर्य वाटे. अर्थात काही काळानंतर इतर मुलांच्या संगतीने त्याने पाश्चिमात्य धाटणीचे कपडे परिधान करायला सुरवात केली. पण त्याला ते लवकरच खूप ,खराब वाटू लागले आणि त्या कपड्यात कोणतीही प्रतिष्ठा नाही हे त्याच्या लक्षात आले. सध्याच्या काळात मात्र अगदी लहान वयातच, मुले कोणतेही व्यक्तिमत्व न साकारणारे, कुठलीही प्रतिष्ठा नसलेले कपडे, आधुनिकतेच्या नावाखाली घालत असतात.

आधुनिक समाजाची कल्पना म्हणजे दुसरे तिसरे काही नसून अेकत्रीतपणे केलेले आपल्या अशक्तपणांचे, आपल्या अुणीवांचे केलेले निर्लज्ज प्रदर्शन होय. रियोमध्ये दरवर्षी अेक कार्निविल (जत्रा) भरवले जाते. ह्या अत्यंत असभ्य, मूर्खपणाच्या प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी वर्षभर पैसे वाचविण्याचा लोक आटापिटा करतात. इथे हॅलोजीनचा सणही सर्वत्र मानला जातो. मला न्यूयॉर्कमध्ये घर खरेदी करायचे होते. मी जेव्हा घर बांधायला गेले तेव्हा माझ्या लक्षात आले की दारावरच बांबूपासून बनविलेला अेक भयानक चेहरा लावला होता. तो म्हणे हॅलोविनचे प्रतीक होते. कदाचित तो हॅलोविनचाच महिना होता. ते पाहून माझी नात म्हणाली,' आपण हे घर नको घ्यायला, कारण दारातच हडळीचे दर्शन होते मग घरात जावून काय उपयोग?' खरच सध्याच्या दिवसात, सभ्य स्त्रिया, वेश्या, नट्या आणि हडळी ह्यांच्यात काहीच फरक राहिलेला नाही. सध्या समाजात इतकी कालवाकालव झाली आहे की कोणाला काय म्हणावे हे कळतच नाही.

अगदी उदाहरण देवूनच बोलायचे झाले तर मी अशा अनेक पार्ट्या पाहिल्या आहेत की तिथे स्त्रिया असे काही हास्यास्पद कपडे घालून येतात की पाहणाऱ्याला त्यांनी काहीच

घातलेले नाही असे वाटावे. इतके त्यांचे ते कपडे अंगासरशी शिवलेले आणि झिरझिरीत असतात. अशा ठिकाणी येवून त्या पुरुषांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. धुम्रपान तर अतिशय उन्मत्तपणे करतात आणि लोकांकडे आपले मादक नयनबाण फेकत त्यांना घायाळ करण्यचा प्रयत्न करतात. पुरुषांचेही तसेच. दोघेही जण अेकमेकांना आकर्षित करण्यसाठीच ह्या पार्ट्यांना येत असतात. खरोखरच काही वेळेस आश्चर्य वाटते की अशा तऱ्हेच्या चळवळीत लोक इतक्या निर्लज्जपणे कसे बुडून गेलेले असतात? सुंदर प्रौढ माणसांना सुंदर तरुण मुलीबरोबर अेकामागून अेक अशी अनेक लग्न करताना कोणतीही शरम वाटत नाही. सुदैवाने मी अजून अगदी वयोवृध्द माणसाला बागेत उघडपणे कोण्या तरुणी बरोबर प्रणयाराधन करताना पाहिले नाही. ह्याचा अर्थ त्याबाबतीत अजून शरम शिल्लक असावी. पण ह्या समाजात आपल्यापेक्षा तीस वर्षांनी लहान असलेल्या मुलींशी लग्न करण्यात काहीच गैर वाटत नाही. काही दिवसापूर्वी माझ्या लक्षात अेक गोष्ट आली होती अेक माणूस सभेला येताना दरवेळी बरोबर नविन बायकोला घेअून येत असे. अेकदा त्याने बरोबर सुमारे अठरा वर्षांच्या मुलीला आणले होते. माझे पती माझ्या कानात कुजबुजले, 'ती मुलगी त्या व्यक्तीची नविन बायको आहे. तिला त्याची नात म्हणून हाक मारु नकोस,' मला धक्काच बसला कारण ते गृहस्थ सुमारे ६५ वर्षांचे होते आणि त्यांची पत्नी अठरा वर्षांची. मला कुणीसे असेही सांगितले होते तरुणी आपल्या वृध्द नवऱ्याला शुगरडॅडी किंवा तसलेच काहीरी हाक मारतात. अर्थातच त्या मुलीना स्वतःचे प्रियकर असतात. केवळ पैशाचा उपभोग घेण्यासाठी त्या पापाचरणात डूबून गेलेल्या अश्या म्हाताऱ्यां लोकांबरोबर लग्न करतात. लग्न म्हाताऱ्याबरोबर आणि राहतात मात्र तरुणांबरोबर! काही माणसे आपल्या बरोबर वेश्या किंवा मॉडेल्स बरोबर रखेल म्हणून आणतात. ज्या पध्दतीने लोक हा प्रकार स्वीकारतात तो प्रकार अगदीच हीन अभिरुचीचा वाटतो, हास्यास्पद वाटतो. अगदी उघडपणे ह्या स्त्रियांना आमंत्रण दिले जाते. त्यांना जाण्यायेण्याचा व हॉटेलमध्ये राहण्याचा खर्चही दिला जातो. मला समजत नाही, हा इंग्लिशमधला स्पाउस शब्दच बदलला जाअून त्यांना कायदेशीर पती, पत्नीच का म्हटले जात नाही. असे केल्याने अनेक अडचणीचे प्रसंग टाळले जातील.

ह्या आधुनिक काळाचा अेक शाप असा आहे की ह्या समाजातले लोक जे जे काही विध्वंसक आहे ते सर्व स्वीकारतात. त्याचप्रमाणे जे जे काही असभ्य आहे, निर्लज्जपणाचे आहे त्या सर्वाचाही अेकामागून स्वीकार करतात. त्यांना कोणत्याही प्रकारची आडकाठी चालत नाही तसा अटकाव करण्याचा कोणी प्रयत्न केलाच तर हे लोक त्याला वेडे ठरवून मोकळे होतात. आता जर वृध्द लोकच नितीभ्रष्ट जीवनाचे सुकाणू स्वतःच्या हाती घेत असले तर तरुण पिढीला दोष देण्यात काय अर्थ आहे?

सध्याच्या दिवसात पेपर्स आणि प्रसारमाध्यमे देखील दुष्ट, दुराचारी माणसांचे काम करतात. ते समाजातले जे जे काही चांगले, सुंदर आहे ते ते नष्ट करण्याचे, मोठ्या इमानेइतबारे करत असतात. त्यांचा सनसनाटीपणावर विश्वास असतो.

त्यांच्यापैकी काहीच विश्वासघाताने केल्या गेलेल्या किंवा तपास न लागलेल्या गुन्ह्यांचा थांगपत्ता लावण्याचा प्रयत्न करतात. अेरव्ही कुणीही कुणाबरही कोणताही आरोप ठेवतो. ते सत्य शोधून काढण्यासाठी फारच थोडा प्रयत्न करतात. आणि कोणाकडूनही, काही अैकलेले प्रसिध्द करतात, भले त्यांनी ते अत्यंत अविश्वासार्ह व्यक्तीकडून अैकलेले असो. हे सर्व थांबवण्यासाठी आपण काही करुही शकत नाही. कारण त्या अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य असते. बरोबर की चूक ह्याचा प्रश्नच उद्भवत नाही, त्यातून फार थोडे लोक कायद्याच्या वाटेचा उपयोग करतात. कारण पश्चिम देशात तरी हा कायदेशीर मार्ग खूपच खर्चिक आहे. सुदैवाने भारतात मात्र तशी परिस्थीती नाही. कमी खर्चिक, कायदेशीर मार्ग अजूनही इथे शक्य आहे.

उदाहरणार्थ, अेकदा तीन पाश्चिमात्य पत्रकार भारतात आले आणि आमच्या शाळेत गेले आणि आमच्या शाळेत अतिक्रमण करतच गेले. त्यांनी तेथे खूपशी चुकीची विधाने केली. त्यांच्या विरुध्द तक्रार केल्यावर कोर्टाने असा निकाल दिला की हे पत्रकार परत भारतात आले तर त्यांना अटक करण्यात यावी. कोर्टाच्या ह्या निर्णयावर राजदूत फारसे खूष नव्हते. तरीही पत्रकारांनी ह्या बातमीचा उपयोग परदेशात, विशेषतः बेल्जियममध्ये आमच्या विरुध्द म्हणून केला. कारण संपूर्ण युरोपमध्ये, बेल्जीयम, फ्रान्स आणि इतरही अनेक देशातल्या कॅथलिक चर्चच्या लोकांना आमच्या यशाचा प्रचंड हेवा वाटतच होता. त्या ADFI नावाची एक संस्था स्थापन केली होती. हे लोक इतर धार्मिक व दैविक संस्थांविरुध्द सतत प्रार्थना करत असत व संस्थांच्याविरुध्द त्यांना व्यक्तिनिष्ठ असे म्हणत मोठे कुभांड रचत असत. मला स्वतःला समजत नाही की कॅथेलिक चर्च व्यक्तीनिष्ठ नाही? जर व्यक्तिप्रधानता ह्या शब्दाची व्याख्या जी संस्था सतत हिंसाचारात आकंठ बुडालेली असते, किंवा जी बेकायदेशीर शस्त्रास्त्रे बाळगीत किंवा नेहमी खूप पैसा गोळा करते, अशी करण्यात येत असेल तर कॅथेलिक चर्चलाच व्यक्तीनिष्ठ म्हणावयाला हवे. कारण ह्या सर्व गोष्टी चर्चमध्ये सर्रास चालतात. जरी ते आम्हाला व्यक्तीनिष्ठ म्हणून संबोधित असले तरी हे सर्वत्र प्रस्थापित झालेले आहे की सहजयोगात कुठल्याही प्रकारचे गुप्तता नसते. तेथे कुठल्याही प्रकारे तळघरातल्या रहस्यमय कारवाया चालत नाहीत आणि सहजयोग ही अगदी शुध्द स्वरुपातील धार्मिक चळवळ आहे जी फक्त अखिल विश्वातील मानव कल्याणासाठीच फक्त कार्यरत असते.

त्यातूनही, पश्चिमेकडील कुठले राष्ट्र निधर्मी समजले जाते? मला सांगायला अत्यंत खेद वाटतो की इंग्लंडमध्ये फक्त चर्च ऑफ इग्लंडचाच धर्म राष्ट्राचा धर्म म्हणून समजला जातो, इतर नाहीत, स्पेन, इटली, जर्मन फ्रान्स आणि ऑस्ट्रीया मध्ये कॅथलिक चर्च हाच सर्वमान्य धर्म आहे आणि जे कॅथलिक नाहीत त्यांना नेहमीच धर्मभ्रष्ट, व्यक्तीनिष्ठ म्हणून वागणूक मिळते.

लोकांवर खोटे कुभांड रचणे, अथवा त्यांचे चारित्र्य हनन करणे ह्या गोष्टी व्यतीरिक्त काही वर्तमानपत्रे आणि मासिके, लोकांसंबंधी खोट्या अफवांचे पीक पिकवून खूप धोकादायक भूमिका बजावत असतात. असल्या वर्तमानपत्रांची लायकी इतकी निचतम असते की ते स्त्रियांचे अर्धनग्न फोटो छापून लोकांना आपल्या पेपरकडे आकृष्ठ करतात. त्यांची सर्व बुध्दीमत्ता असे उघडे वाघडे फोटो छापण्यातच खर्च होत असते. त्यांचा मुख्य आवडीचा विषय लोकांच्या चटकदार कहाण्या छापून मानवी स्वभावातल्या अत्यंत हीन अभिरुचीला खाद्य पुरविणे हाच असतो, किंवा काही वेळेस ते महत्वाच्या जागेवर असलेल्या अेखाद्या! व्यक्तीबाबत काहीतरी खोडकर अथवा गैरसमजुतीवर आधारलेल्या कहाण्या रचून, गैरप्रचार करण्यास सुरवात करतात. अशा वर्तमानपत्रांना जागतिक समस्या, किंवा देशात काय घडते आहे ह्याबाबत काहीच देणेघेणे नसते. अगदी युनेस्कोच्या संस्थापक सेक्रेटरी जनते बाबतही त्यांनी अफवा पसरवल्या आहेत. खरं म्हणजे, अेखादी व्यक्ती अश्या तऱ्हेच्या संपूर्ण मानहानी करणाऱ्या गोष्टीमध्ये कसा काय रस घेवू शकते हे समजणे अवघडच आहे. पण त्या सेक्रेटरी जनरलवर अत्यंत पोरकट आरोप त्यांनी केले होते, त्यापैकी अेक असा होता की ह्या सेक्रेटरी जनरलच्या बायकोने पॅरीसहून ब्रुसेलला जाण्यासाठी ब्रुसेलच्या राजदुतांच्या पत्नीच्या अंत्यविधीला हजर राहण्यासाठी सरकारी गाडीचा वापर करण्याआधी तिने तसे ऑफिसला कळविले होते. कारण ब्रुसेलसला जायला त्यावेळी विमान नव्हते. इतरही अनेक आरोप, बिनबुडाचे आरोप केवळ त्या सेक्रेटरी जनरलला बदनाम करण्याच्या हेतूनेच करण्यात आले होते. खरे म्हणजे हे गृहस्थ आपले राजदूताचे काम अत्यंत प्रामाणिकपणे करत असत, त्यांनी अनेक पुस्तकांचे अनेक भाषेत अनुवाद प्रसिध्द केले होते. त्यांनी अनेक देशांना आपल्या संस्कृतीचे प्राचीन अवशेषाचे जतन करण्यासाठीही खूप मदत केली होती, खरं म्हणजे मुळात युनेस्कोही काही पैसे मिळवणारी संस्था नव्हती. पण काही पाश्चिमात्य गोरे, कातडे असलेले लोक त्या संस्थेचे सर्वेसर्वा बनले आणि ती संस्था अेकदम पाश्चिमात्य धाटणीची बनून गेली.

पाश्चिमात्य लोकांची अशी धारणा आता वाईटाकडून अधिक वाईटाकडे प्रवास करू लागली आहे. उदाहरणार्थ हे लोक इतके अफवाप्रिय असतात की ते अत्यंत चविष्टपणे

जॉन केनडीच्या बायकोने विकत घेतलेल्या आंतरवस्त्राच्या किंमतीबद्दल चर्चा करु शकतात. खरच अश्या प्रकारच्या गोष्टी जाहीरपणे वर्तमानपत्रात जे लिहू शकतात त्यांचे मन किती घाणेरडे आणि वासनेने बरबटलेले असेल ना? सर्वात आश्चर्य म्हणजे ही पध्दत आता धर्माच्या राज्यात राहणाऱ्या धार्मिक लोकांनाही आवडू लागली आहे. उदाहरणार्थ, इंग्लंडमधल्या प्रोटेस्टंट चर्चच्या काही नेत्यांनी समजुतदारपणाचा आणि सहनशक्तीचा एक नवाच दृष्टीकाण, जो लग्नावाचून अेकत्र राहणाऱ्या स्त्रीपुरुषांचा आदर करतो, दत्तक घेतला आहे. पूर्वी हे पाप समजले जाई, पण आता मात्र तसे नाही.

आतापर्यंत अनेक छापखान्यांनी आणि इतर प्रसार माध्यमांनी आपल्याला मिळालेल्या अफाट स्वातंत्र्याचा दुरुपयोग करुन, मुलांना, कुटुंबाला आणि अर्थातच समाजाला खूप भिववले, धमकवले आहे. आता त्यांना योग्य नियंत्रणाखाली आणण्याची नितांत गरज आहे. अर्थात संपूर्णपणे, मानवाला पर्यायाने प्रेससारख्या प्रसारमाध्यमांना स्वतःची जबाबदारी ओळखण्याची कुवत असायला नको का? बातम्या ह्या नेहमीच लोककल्याणासाठी आणि सुरक्षेसाठी घ्यायला हव्यात. लोकांची मानसिक शक्ती त्यामुळे वाढायला हवी. आपल्याकडे मानवावर नियंत्रण ठेवणारे किंवा त्यांचे खून, बलात्कार, दरोडे ह्यापासून संरक्षण करण्याचे कायदे आहेत. मग उन्मत्त, माथेफिरुपणे चालविल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमावर आपण का नियंत्रण ठेवू शकत नाही? सध्याच्या दिवसात कुणीही उठावे आणि वर्तमानपत्र काढावे अशी परिस्थिति आहे. खरं म्हणजे अश्याच लोकांना वर्तमानपत्र काढण्याची परवानगी देण्यात यावी की ज्यांची जबाबदारी, नितिमत्ता आणि प्रतिष्ठा ह्याबाबतचा दृष्टीकाण कसोटीस उतरला आहे आणि अर्थातच दुसऱ्या देशांबाबतचा त्यांचा दृष्टिकोण हा समजूतदारपणाचा आहे. सर्व संपादक मंडळीची अगोदर जबाबदार व्यक्तींच्या मंडळाकडून ते प्रामाणिक, उदार आणि समतोल विचारसरणीचे आहेत ह्याची तपासणी करुन घ्यायला हवी. कोण्या माथेफिरुच्या हातात कधीही वर्तमानपत्राची मालकी असू नये. अेकदा का पेपर चुकीच्या हातात गेला की मग सर्व प्रकारच्या भयानक, सनसनाटी, सपक मुर्खपणाच्या बातम्या आणि तसेच संपादकीय ह्यावर नियंत्रण ठेवणे महाकठीण होवून यजाते. अर्थात हेही मान्य करायलाच हवे की काही पेपर्स मानवी बळाच्या, शौर्याच्या कहाण्या शोधून काढून आणि त्या छापण्याचे चांगले काम करत असतात पण अशा प्रकारची उदाहणे अगदी अपवादात्मकच म्हणावी लागतील. अेरव्ही अश्या प्रकारच्या गोष्टींचा तिरस्कार करण्याचेच काम खूप प्रामाणिकपणे आणि ताकदीने केले जाते. इतकेच नव्हे तर ह्या वर्तमानपत्राद्वारे व्यक्त होण्याच्या आपल्या ताकदीचा इतका प्रचंड गैरवापर केला जातो की कुणी ह्याबद्दल काहीच करु शकत नाही. म्हणूनच हे स्पष्ट आहे की जी वर्तमानपत्रे घडधडीत चुकीच्या

आणि अफवाच असलेल्या कहाण्या छापण्यात सतत व्यग्र आहेत त्यांना शिक्षा करणारे किंवा हस्तक्षेप करणारे अेखादे उच्चस्तरीय मंडळ अस्तीत्वात येणे अत्यंत गरजेचे झाले आहे. कोणत्याही तऱ्हेची अफवा वर्तमानपत्रात छापली जाता कामा नये. तरच अेखाद्याला चांगले समाजकार्य करता येईल.

वर्तमानपत्र मुलांच्या हाती देण्याच्या लायकीची असायला हवीत म्हणजे मुले मोकळेपणे ती वाचू शकतील. उघडपणे नरकाची घाण वर्तमानपत्रात उपसण्याचा काय बरे उपयोग आहे? अश्या प्रकारच्या खोट्या पणं सनसनाटी बातम्या देण्याचा अेकच फायदा आहे आणि तो म्हणजे भरपूर पैसे मिळवण्याचाच. पण मला खात्री आहे, अेकदा का ह्या वर्तमानपत्रांनी खऱ्या आणि जबाबदारीपूर्ण बातम्या द्यायला सुरवात केली की त्यांना अधिक पैसा मिळू शकेल, कारण ज्या लोकांनी केवळ वर्तमानपत्रातल्या घाणेरड्या बातम्यामुळे ती वाचणे सोडून दिले असेल ते आपोआप परत पेपर वाचायला लागतील.

ह्यापेक्षाही आणखी अेक म्हणजे ही वर्तमानपत्रे नेहमीच दुर्दशेच्या आणि धक्कादायक बातम्या छापत असतात. पहिले पान हे नेहमीच युध्द आणि हत्या, खून, मारामाऱ्या, भूकबळी, रोगराई, ह्यांच्याबद्दल थोडक्यात अस्मानी, सुलतानी दुर्दशेबद्दल असलेल्या बातम्या आणि फोटो यांनी भरलेले असते. अेखाद्याला दिवसाची सुरवात असल्या भयानक, अस्वस्थ करणाऱ्या बातम्या वाचून करायला लागावी हे म्हणजे फारच अती होते, नाही का? खरं म्हणजे असल्या भयानक, घटनांना जास्त महत्व देण्यापेक्षा हे गरजेचे आहे. चांगल्या घटनांना महत्व देणे कुणी कुणाला मदत केली असली तर ते कथित करणे, लोकांना स्फूर्ती देणाऱ्या आणि त्यांचे चांगल्या व्यक्तीत परिवर्तन करु शकणाऱ्या घटनांचा उल्लेख करणे, प्रामाणिक लोकांचे वर्णन करणे. ह्या गोष्टी खरं म्हणजे वर्तमानपत्रात प्रामुख्याने यायला पाहिजेत. पण सध्या अशा गोष्टी प्रसारमाध्यमातून व्यक्त करण्याचे मार्गच जणू खुंटले आहेत. त्यांना फक्त किती लोक मेले, किती मारले गेले, किती बेपत्ता झाले, ह्याचेच हिशोब ठेवायचे असतात.

वर्तमानपत्रे आणि प्रसारमाध्यमाप्रमाणेच, चित्रपटातूनही सध्या अत्यंत भडक, असभ्य प्रणय, प्रेमकथा दाखविण्यांचा पायंडा पडला आहे. ह्या कथेतले नायक अथवा नायिका कायम भयानक हिंसाचार, खून, मारामाऱ्या यातच व्यस्त असतात. चित्रपट निर्माते, प्रसार माध्यमे, आणि सर्व वर्तमानपत्रे ह्याच्या अजूनही हे लक्षात येत नाही की समाजातले जे जे काही चांगले, भव्य अुदात्त आहे त्या सर्वांचा नायनाट होण्यास आपणच सर्वस्वी जबाबदार आहोत. ते चांगल्याकडे, महानतेकडे वाटचाल करण्याचा थोडादेखील प्रयत्न करत नाहीत. फक्त पैसा कमावणे हा अेकमेव हेतू असतो. पोनोग्राफी सारख्या हीन गोष्टीला ते

वर्तमानपत्राद्वारे वैधानिक ठरवू इच्छितात. किंवा दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांशी हातमिळवणी करुन त्यांनाच धिरोदत्त नायक बनवितात.

उदाहरणार्थ, त्यांच्यापैकी काही जण विकसनशील देशात धार्मिक कार्य करत असल्याचा आव आणत, येशूचा दयाळूपणा वगैरे सांगत पैसा गोळा करण्याचे काम करत असतात. भरपूर देणग्या गोळा केल्या जातात. आणि बहुदा त्यात प्रसारमाध्यमाचा वाटा ठरलेला असतो. माझ्या मते, संगनमताने केलेला तो अेक किफायतशीर धंदाच आहे म्हणा ना, हे प्रसारमाध्यमावाले लोक अेखाद्याला तो शांती–पुरस्कार मिळवू शकेल अशी प्रतिमाही निर्माण करु शकतात. देवच जाणे हा सर्व पैसा कुठे जातो, आणि त्याचे पुढे काय होते? त्या संपत्तीचा कुठल्याही प्रकारे हिशोब ठेवला जात नाही. भावनाशील माणसे, विशेषतः पाश्चिमात्य लोक अशा प्रकारच्या लोकांकडून खूपच प्रभावित होत असतात. अेकदा अेक मिशनरी आमच्या कॉन्फरन्समध्ये आला आणि म्हणू लागला, 'तुम्ही गरीबातल्या गरीब माणसाचा विचार करायला हवा. तुमच्या जेवणातला काही हिस्सा तुम्ही अशा गरीब लोकांना द्यायला हवा आणि असेच काही, प्रेक्षकांमधल्या पाश्चिमात्य लोकांनी त्याची ही जेमतेम तीन:चार वाक्यच अैकली असतील, नसतील. आम्हाला आश्चर्यच वाटले. त्या लोकांनी रडायलाच सुरवात केली आणि त्यांनी त्या माणसाला बऱ्याच देणग्या दिल्या मला कुणीतरी असेही सांगितले की तो माणूस अश्याच प्रकारे रस्त्यात, चर्चमध्ये अश्याच देणग्या घेत हिंडत असतो. इतकेच नव्हे तर तो लोकांना रस्त्यातच बाप्तीस्मा देअून ख्रिश्चन बनवतो. जे लोक आजारी पडतात आणि मरतात त्यांचे दफनविधीही केले जातात आणि प्रसारमाध्यमे अशा प्रकारच्या मिशनरींची प्रतिमा विकसनशील देशात उदात्त करुन, जनमानसापुढे उभी करत असतात.

खरे पाहता प्रसारमाध्यमातल्या लोकांचे कार्य कायम अेककही असते आणि लोकांच्या मानसिकतेचा विचार करुन प्रवास करणारे असायला हवे. पण सध्या ते फक्त पैशाचा विचार करणारे बनले आहेत. आणखीनही अेक गंभीर समस्या ह्या प्रसारमाध्यमाशी निगडीत आहे. जुन्या जमान्यात बातम्या ह्या केवळ वस्तुनिष्ठ असत. त्यावर शेरे, टीकाटिपणी मुक्तपणे केलीजाई पण तिथे देखील वस्तूनिष्ठता हीच चाचणी असे. नि:पक्षपाती हे निक्षपातीपणाचे तत्व सध्याच्या काळात मात्र कुठेच दिसत नाही. अेकच घटना अेका वर्तमानपत्रात अेका पध्दतीने सांगितली जाते तर दुसऱ्यात ती अगदी विरुध्द पध्दतीने सांगितली जाते. आणि शेरे व टिकाटिप्पणी तर वस्तुनिष्ठतेपासून कोसो दूर असतात. बहुतेकदा ते अगदी कोडगेपणाने पक्षपाती असतात. जर तुम्ही रुपट मरडोकचे पेपर्स वाचले तर तुमच्या तात्काळ लक्षात येईल की मला काय म्हणायचे आहे. वाचक संपूर्णपणे गोंधळात

पडला नाही तर आश्चर्य! अश्याच पध्दतीने ह्या बातम्या आपल्यावर हल्ले करत राहिल्या, त्या भयानक पेपरला आपल्याला तोंड द्यावे लागेल तर सहजयोगाच्या म्हणण्यानुसार आपणास नक्की ब्लड कॅन्सर सारखा दुर्धर रोग होईल मी तर, वाचकांच्या जीवनमूल्यांमध्ये उलथापालथ करण्यास आणि संपूर्ण जगात अनर्थ घडवून आणण्यास ह्या प्रसार माध्यमांनाच जास्तीत जास्त जबाबदार धरते. ह्या संपूर्ण दुर्दशेला तेच कारणीभूत आहेत.

धार्मिक, मूळ तत्ववादी आणि धर्मांधतेने अगोदरच सर्व जगातल्या शांततेला धोका पोहचवलाच आहे. आम्ही इटलीमधल्या काही धार्मिक लोकांशी चर्चा केली, पण विश्वधर्म, वैश्विक धर्म स्वीकारण्यांस त्यांनी ठामपणे नकार दिला. अश्या तऱ्हेने दोन धर्माच्या अनुयायांमध्ये ते भांडण, कलागत लावून देतात. धर्माच्या नावाखाली दुसऱ्याला ठार मारणे हे त्यांचे परमकर्तव्य आहे. असा त्यांचा ठाम विश्वास आहे. दुसरीकडे, सर्व महान तत्ववेत्ते, अवतारी पुरुष, साधूसंत आणि सुफी हे लोक मात्र कधीही, अेकांगी, कट्ट धर्माबद्दल बोलत नाहीत. कफ्युसिज सर्व प्रथम भूतदयेबद्दल बोलत असे. पण नंतर लाओत्से आले. त्यांनी भूतदयेतील आणखी सूक्ष्मता दाखविण्यास सुरवात केली त्याबद्दल तो बोलत असे. त्याचे ताओ तत्त्व म्हणजे सहजयोगातील कुंडलिनीसारखे असावे. अेकदा मी यांगझी नदीतून प्रवास करत होते. हा बोटीतील जलप्रवास माझ्य दृष्टीन अेक अवर्णनीय अनुभव ठरला, तसेच लाओत्सेचे तत्वज्ञान समजून घेण्यासही मला हा प्रवास खूप उपयोगी ठराला. ही नदी बोटीतून प्रवास करणाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे. अनेक वेगवेगळे प्रवाह तिच्यात वेगवेगळ्य दिशेने वहातात. पण ह्या नदीच्या काठावर मात्र निसर्गाचे देखणे चमत्कार पहायला मिळतात. अत्यंत अुतुंग असे डोंगराकडे आपण चीनी पेंटीगमधे पाहतो ते बहुदा इथलेच असावेत. यांगझी नदीचे किनारे खरोखरच खूप सुंदर आहेत. ह्या बाबत लाओ त्से म्हणतात 'वरवर पाहता हे खूप सुंदर आणि आकर्षक आहेत. पण तुम्ही तुमचे मन अंतर्मुख करा आणि यांगझी नदी पार करा' हे खरं म्हणजे अत्यंत मार्मिक विधान आहे, पण किती जण लाओत्से चे हे म्हणणे समजून घेअू शकतात?

किती जणांनी त्याचे अनुसरण करण्याचा प्रयत्न केला? चीनमध्ये लाओत्सेने सांगितलेल्या ताओबद्दल फारसा विचार लोक करताना दिसत नाहीत. पण अेक वेळ अशी येईल की भूतदयेची ही सूक्ष्म बाजू लोकांच्या लक्षात नक्कीच येवू शकेल.

जपानमध्येही विदितामा नावाचा अेक महातमा होवून गेला. तो भगवान बुध्दाचा अनुयायी होता आणि झेन पध्दतीचा प्रसार करण्यासाठी तो जपानमध्ये गेला. झेन म्हणजे 'ध्यान'. त्याला लोकांची विचारहीन जागृती हवी होती. त्याने विचारहीन जागृतीसाठी अनेक मार्ग शोधून काढले होते. जपानमधला 'चहा समारंभ आणि त्यांची देवळे ही विचारहीन

जागृतीचीच प्रतिके आहेत. मला आश्चर्य वाटते की जपानमधल्या अेकाही इतक्या बागा का आहेत, आणि ह्याबद्दलचे ज्ञान नाही. अेका बागेमध्ये अेका छोट्याशा टेकडवर अगदी लहान प्रमाणात शेवाळ राखलेले होते आणि ते खूपच आकर्षक दिसत होते. त्यावरची फुले आणि झुबके अगदी भिंगातून पाहिली तरच दिसत होती. हे सर्व माणसाला थक्क करते आणि त्याच्यात विचाररहीन जागृती निर्माण करते. झेनची मूळ कल्पना हीच आहे. पण आश्चर्य म्हणजे फारच थोडे लोक 'झेन' ही संकल्पना समजू शकतात. नंतर झोरेस्टर नावाचे अवतारी पुरुष होअून गेले. पर्शियामध्ये त्यांनी पाच वेळा अवतार घेतला. महंमद साहेबांनीही धर्माबद्दल लोकांना काही स्पष्ट कल्पना दिल्या. पण महमद साहेबांचे अनुयायी मात्र त्यांच्या झोरेस्टरच्या शिकवणीमधले साम्य ओळखू शकत नाही आणि म्हणून पर्शियन लोकांना दुसऱ्या देशात पिटाळून लावले. त्यापैकी काही भारतात आले. महमंदसाहेबांनी अब्राहम, मोसेस, येशू ह्यांच्या बद्दल अेकामागून अेक विधाने केली आहेत. त्यांनी मदरमेरी बद्दलही खूप आदरयुक्त उद्गार काढले आहेत. अगदी बायबल मध्येही तिला इतका आदर दिला गेलेला नाही. बायबलच्या संपादक असलेल्या पॉलने तर तिचा उल्लेख प्रत्येक ठिकाणी 'ती बाई' असा तुच्छतायुक्त केला आहे. पण महमदसाहेबांनी मात्र असे म्हटले आहे की ह्या पवित्र स्त्रीच्या विरुध्द जो कोणी बोलेल त्याला शिक्षा केली जाईल. अेक गोष्ट जरुर लक्षात घेतली पाहिजे की महमद साहेबांनी कधीही इस्लाम हा अेकांतिक, अथवा कट्टर धर्म आहे असे कधीच म्हटले नाही (इस्लामचा अर्थच मुळी सर्वसाक्षी परमेश्वराला शरण जाणे, असा आहे) पण इस्लामधर्माचे अनेक अनुयायी इतर धर्मांच्या अनुयायांनी आणि आपापसातही नेहमी झगडत असतात.

धर्मांतर हा देखील अेक अत्यंत हीन प्रकार आहे. लोक अेका धर्मातून दुसऱ्या धर्मात जातात, आणि मुख्य म्हणजे त्याचे कारण त्या धर्मावर बसलेली श्रध्दा हे नसून इतरच विवाहासंबधी अथवा आर्थिक अश्या धर्मबाह्य प्रकारचे असते. सर्वसाक्षी परमेश्वराच्या नावाखाली. जगातल्या निरनिराळ्या भागात, निरनिराळ्या धर्मातल्या लोकांमध्ये कडव्या लढाया सतत चालू असतात. ह्या दुष्कृट चमत्काराची कारणमिंमासा कुठल्याही लोकोत्तर व्यक्तीच्या कधी लक्षात येणार नाही. काही लोकांच्या मते इस्लाम धर्माची शिकवण ही ह्या लढायांची प्रमुख कारण बनून राहिली आहे. इस्लाम धर्मातील काही सूफी पंथीय साधूजन महंमदसाहेबांच्या अनुयायांना त्यांनी असे वागू नये अशी शिकवण देत असतात. ते म्हणतात, तुम्ही जर महमद साहेबांचे खरे अनुयायी असाल तर त्यांच्या नावाला धब्बा लागेल असे काहीही करु नका. पण काही लोक मात्र फक्त धर्मयुध्दाद्वारेच इस्लाम धर्माचा प्रसार व्हायला हवा असा विश्वास बाळगतात. महमद साहेबांना ही कल्पना कधीच अभिप्रेत

नव्हती. ते ज्यावेळेस पृथ्वीतळावर होते तेव्हा लोक अत्यंत बिकट परिस्थितीला तोंड देत होते. त्यावेळेस अनेक वेगवेगळ्या जातीच्या टोळ्या अस्तीत्वात होत्या आणि त्या टोळ्या अेकमेकांशी भांडत होत्या अेकमेकांना मारत होत्या विशेषतः मुस्लीम लोकांवर त्यांचा रोष होता. त्यावेळेस धर्मयुध्द जिहादबद्दल बोलणे योग्य होते पण सध्यातर काही अश्या प्रकारची समस्या नाही त्यातूनच अनावश्यक जिहादबद्दल बोलून हे लोक आणखीनच वाईट प्रसिध्दीस पावत आहेत. ह्याखेरीज ते खरोखरच काहीही मिळवत नाहीत. असे वागून का ते स्वतःचा अभिमान परत मिळवत असतील? त्यांना असे वाटते का की कयामतच्या वेळेस ते दाहक सत्याला सामोरे जावू शकतील? ते लोकांचे लक्ष चुकीच्या गोष्टींकडे खेचतात आणि विश्वशांतीच्या दृष्टीने जे कल्याणकारी आहे ते न करता दुसऱ्याच गोष्टी करण्याचा प्रयत्न करतात. ह्याचाच परिणाम जगात सध्या सर्वत्र शीतयुध्द चालू असण्यात झाला आहे. चेचेण्यात युध्द चालू आहे. जगात आणखीनही अनेक ठिकाणी युध्दसदृश्य परिस्थिती आहे. विशेषतः अश्या देशात युध्दे चालू आहेत की जी सार्वभौम आहेत आणि सर्व जगात इस्लाम धर्म यायला हवे असे तिथले इस्लाम लोक समजतात

अेकदा मला रशियातली अेक अति महत्वाची व्यक्ती भेटली व म्हणाली हे युनायटेडनेशन मधले लोक मुस्लीमांना का मदत करतात, हे ठाउक आहे तुम्हाला? मी म्हटले त्यांनी का करु नाही? त्यांनी उत्तर दिले, अेके काळी मुस्लीम लोक आमच्या देशाचा अेक हिस्सा म्हणून रहात होते. आता मात्र त्यांना आमच्या देशाची एकात्मता नष्ट करायची आहे, त्यांना आता त्यांचा हिस्सा स्वतंत्र हवा आहे, त्यांचा असा विश्वास आहे की आपला धर्म हा जगातला सर्वश्रेष्ठ धर्म आहे आणि आपल्या हातातल्या तलवारीच्या जोरावर त्यांना इस्लाम धर्माचा प्रसार करयचा आहे. इतकेच नव्हे तर त्यांना जास्तीत जास्त जेव्हढी शक्य असतील तेव्हढी मुले जन्माला घालयची आहेत, म्हणूनच आपल्या बायकांना ते मुले उत्पन्न करायचे यंत्र म्हणून वागणूक देतात. जास्तीत जास्त संख्येने लवकारात लवकर मुसलमान जमातीची संख्या वाढवायची म्हणजे प्रजासत्ताक राज्यात देशाची जडणघडण इस्लामच्या बाजूने होईल अशी त्यांची योजना आहे म्हणजे मग देशांवर ते निरंकुश अधिकार गाजवू शकतील

खरं म्हणजे आपण हे समजून घ्यायला हवे, की कोणत्याही प्रजासत्ताक राज्यपध्दतीमध्ये केवळ धर्म हा पाया धरुन अेखाद्या राज्याची निर्मिती करता येणार नाही. धर्म ही अेक वैयक्तिक, खाजगी गोष्ट आहे आणि प्रत्येक देशातल्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आवडीच्या धर्माचे अनुसरण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. 'अेकधर्मीय राज्य' ही संकल्पना सध्याच्या काळात संपूर्ण विपर्यस्त आहे. जेव्हा अेखादे राष्ट्र स्वतःला ख्रिश्चन, इस्लाम, ज्यू धर्माचे म्हणून जाहीर करते तेव्हा आपोआपच त्या धर्माचे अनुयायी हे त्या देशाचे

काहीतरी विशेष अधिकार असलेले, श्रेष्ठ नागरिक बनतात आणि अर्थातच इतर धर्माचे कनिष्ठ! मुळातच ही गोष्ट लोकशाही राज्याच्या मूळ संकल्पनेच्या अगदी विरुध्द आहे. कारण ही मूळ संकल्पना समानतेवरच आधारित आहे. हे असे ऐकांतिक धर्म हे अंधश्रध्देवरच जगणारे असतात. आणि ह्या धर्मावर विश्वास ठेवणारे लोक अंधपणानेच त्या धर्माच्या आज्ञा पाळतात, आणि स्वतःला विरोधी संघात झोकून देतात.

इंग्लंडमध्ये सध्या काही चर्चच्या नेत्यांनी असे जाहीर केले आहे की जे लोक ख्रिश्चन धर्माच्यानुसार पापी जीवन जगत आहेत त्यांनाही आता चर्चमध्ये हजर राहण्याची परवानगी देण्यात येईल. त्यांना असे जाहीर करणे भाग पडले कारण दिवसेंदिवस चर्चमधील उपस्थिती रोडावत चालली होती. आणि ती वाढावी ह्यासाठी असे काही तरी करणे भागच होते कारण धार्मिक नितीमुल्ये मवाळ करुन ही फारसा उपयोग झालेला नव्हता. हळूहळू पण निश्चितपणे ख्रिश्चन लोकांची संख्या कमीच होत होती. ते त्यांच्या चर्चमधे जात आणि पाद्रीमंडळींना ते योग्य वेतनही देवू शकत नव्हते आणि म्हणूनच लोकांसमोर त्यांनी इतका मुक्त पर्याय ठेवला त्यांचे म्हणणे असे की लोकांनी चुकीचे वागायला कारणीभूत जर त्यांच्या शरीरातील मूलभूत जीन्सच असतील तर लोक तरी त्याला काय करु शकणार? आणि आता तर अनैकतेचे धडे गिरवायला, ऐखाद्याच्या जीन्सवर आरोप ढकलून घायला हे उघड आमंत्रणच आहे, नव्हे काय? अर्थातच हा देखील एक चुकीचा सिध्दांत आहे. कारण तो असे सांगतो की वंशपरंपरेने आलेली गुणसूत्रे ऐखादया माणसाचा स्वभाव घडविण्यास कारणीभूत ठरतो. आणि तो धार्मिक किंवा दैवी शिक्षणाच्या साह्याने देखील बदलू शकत नाही. सत्य असे आहे की वंशपरंपरेने आलेल्या गुणसूत्रांमुळे घडला गेलेला स्वभाव देखील. आपण बदलू शकतो खरेतर आपल्या जिन्संचे प्रकार आपण कधीही बदलू शकतो.

उदाहरणार्थ, सहज योगाच्या सहाय्याने रुपांतर केल्यानंतर माणसांची गुणसूत्रे परत वेगळी रचना धारण करुन, योग्य वागणाऱ्या व्यक्तीत, त्यांचे रुपांतर होवू शकते. माणसाची गुणसूत्रे दररोज घडणाऱ्या घटनांची नोंद घेतात हेच ह्या गोष्टीवरुन दाखविले जाते. आपण हेही पाहतो की ऐकाच आईवडिलांची दोन मुले सारख्या स्वभावाची कधीच नसतात. ऐकाच आईवडिलांचा ऐक मुलगा खूप हुषार आणि देवदुतासारखा गुणी तर दुसरा मूर्ख आणि सैतानांसारखा दुष्ट असू शकतो. आणि माणसाचा स्वभाव जर गुणसूत्रे कायमस्वरुपी निश्चित करत असतील तर चर्चमध्ये जाण्याची गरजच काय? आणि गुणसुत्रे प्रार्थना सभा तरी कश्यासाठी घ्यायच्या? पण हे माहित असायलाच हवे जर आपल्या चर्चनी गांभिर्याने कामे केली तर ख्रिश्चन लोकांच्या गुणसूत्र रचनेत नक्कीच बदल होईल जसा सहजयोगाद्वारे हा बदल घडलेला आहे. कारण ह्या सहजयोगात ज्यू येशूची पूजा करतात आणि मुस्लीम शंकराला भजतात.

म्हणजे, लोक देवाच्या नावाने आपापसात भांडतात म्हणूनच जगात शांतता नाही. अर्थात ह्या सर्व चळवळींमागे पैसा मिळवणे ही गोष्टही महत्वाची असले आणि जेथे जेथे हे अर्थशास्त्र येते तेथे लोक मोठ्या संख्येने उपस्थित होतात, अगदी ती गोष्ट कितीही अनैतिक असली तरीही! आणि मग धड ह्या लोकांना स्वतःचे चारित्र्य रहात नाही किंवा कोणतेही धाडस शिल्लक राहत नाही. आणि पैसे मिळवण्याच्याच दृष्टीने निर्माण केल्या गेलेल्या फॅशन्सला विरोध करण्यावरही त्यांचा विरोध उरत नाही. थोडक्यात हे नेते आपल्या अनुयायांना वाईट घटनांच्या प्रवाहात पोहायला परवानगी देतात आणि पर्यायाने परतीचा मार्गच नसलेल्या नरकाकडे त्यांना ढकलतात. हे धर्म लोकांच्यामेंदूत धर्माबद्दलच्या काही ठाम कल्पना घुसवितात. ह्या ठाम कल्पना लोकांच्या मनात जेव्हा अेकत्रितपणे वाढू लागतात आणि ह्यातूनच राक्षसी समाज निर्माण होअू शकतो जो फक्त लोकांना ठार मारण्यावर विश्वास ठेवतो.

हिटलरजवळही अशाच काही ठाम कल्पना होत्या. त्याचा गाढा विश्वास होता की जगात श्रेष्ठ जर्मन लोक आहेत. जर्मन लोक सगळ्यात अुच्च जातीचे आहेत हे मानणे म्हणजे मूर्खपणाचा उच्चांकच नव्हे काय? जर्मन लोकांनी अत्यंत निघृणपणे लहान मुलांना गॅसचेंबरमध्ये ठार केले. मोठ्या प्रमाणावर लोकांना ठार मारण्याच्या नव्या नव्या कल्पना शोधून काढल्या, हे लोक उच्च जातीचे कसे? उच्च जात तर साधूसज्जनांची असते. त्यांच्या आयुष्यात ते प्रेम आणि करुणेचे सुधापान करुन अतीव आनंद मिळवतात. जर्मन लोकांना उच्च जातीचे समजणे म्हणजे बाकीच्या लोकांचा घोर अपमानच नव्हे काय? किंवा अखिल विश्वाला आदिवासी म्हणण्यासारखेच होईल. मी असे अैकले आहे की जर्मनमध्य १३व्या शतकात अेक महान साधूसंत होअून गेला. ज्याचा आजही सर्व जगात आदर केला जातो. सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे जर्मन लोकांचा दावा आहे की वेदांचे लिखाण करणाराही त्यांच्यापैकीच होता. स्वतःला चुकीचे काहीतरी समजण्याचा हाही आणखीन अेक उच्चांक नव्हे काय? जे लोक नेहमीच आपल्याला उच्च दर्जाचे समजतात आणि दुसऱ्यांना ठार मारण्याचा आपला हक्क जन्मसिध्द मानतात. त्यांच्यापैकी कुणी इतके प्रगत विचार आणि तत्वज्ञानयुक्त शोध निबंध लिहिणे शक्य तरी आहे का? हिटलरला जावून आणि दुसरे महायुध्द संपून पन्नास वर्षे होअून गेली असली तरी नव्या नव्या वेडाचाराच्या लहरी उत्पन्न होतच आहेत. फ्रान्स किंबहूना सर्व युरोपमध्ये त्या उत्पन्न होतात. ह्या प्रकारचे नवे नवे वेडेचार संपूर्ण युरोपियन देशात तुम्हाला सापडतील. राजकारणातली अती उजवी आगावू विचारधारा हा देखील अेक प्रकारचा वेडाचारच आहे आणि हा वेडाचार अत्यंत मुलायमपणे लोकांच्या मनात प्रवेश करत आहे. सर्व युरोपात विशेषतः फ्रान्समध्ये लोकांनी

ह्या उजव्या आगाऊ विचारसरणीला मान्यता दिली आहे. सर्वात आश्चर्य म्हणजे तीन वर्षे जर्मनीच्या ताब्यात राहून आणि त्यांचे अधिपत्य सहन करुन देखील फ्रेन्च लोकांच्या मनात अजूनही ही आदर्शवादी कल्पना घर करुन राहिली आहे. कदाचित जे जर्मन लोक फ्रान्समधे राहत होते त्यांनी ह्या विचारधारणेद्वारा फ्रेंच लोकांची मने अगोदरच कलुषित केली असावी.

अेका स्त्रीने जी फ्रान्समधून पळून आली होती आणि तिने स्वित्सर्लंच्या जवळ आपले घर बांधले होते.(तिचा नवरा रशियन होता) मला सांगितले की फ्रान्समधील लोक जर्मन उच्चवर्णीयच आहेत आणि त्यांचा देश महान आहे ह्या गोष्टीवर त्यांचा प्रचंड विश्वास आहे. फ्रेन्च लोकांचा इतक्या खुळ्या गोष्टींवर विश्वास आहे हे अैकून मला तर आश्चर्यच वाटले. ह्या सर्व गोष्टीचा परिणाम असा झाला की १९९५ च्या निडणूकीत फ्रेन्च लोकांनी पुराणमतवादींना मते देअून असा माणूस निडून आणला की जो नोकरशाहीचाकट्टर पुरस्कर्ता आहे. तो जसा निवडून आला तसे त्याने पॅसिफिक महासागरावर आण्विक चाचणी घेण्याला आपला मनोदय जाहीर केला. ज्यावेळेस सर्व जग आण्विक शस्त्रास्त्रे नष्ट करण्याबद्दल बोलत होते त्यावेळेस पॅसिफिक महासागरावर असा स्फोट घडवून आणण्याची काय गरज होती? 'रशिया'ची ताकद आता कुणाला भिववू शकत नसल्याने त्याला दुसरे अेखादे महायुध्द दुसऱ्या कुठल्या देशाशी तर करावयाचे नव्हते ना? रशिया तर नाहीच पण आता युरोपला कोणत्या देशापासून भिती आहे? मग फ्रान्सला अशी अण्वस्त्र चाचणी घेण्याची गरज केवळ ऑस्ट्रीया न्यूझीलंडला घाबरवण्यासाठीच होती? मला तर वाटते की ही त्यांची अेखादी राजकीय खेळी असावी, कारण फ्रेन्च लोक आपली राजकीय ताकद, प्रतिष्ठा त्यांच्या मद्य प्राशनामुळे घालवून बसले आहेत. म्हणूनच त्यांना अमेरिकेला चकीत करण्यासाठी असल्या प्रकारच्या छळतंत्राची गरज भासली असावी.

काही काही वेळेस माझ्या मनात विचार येतो की हिटलर वारंवार जन्माला येतो आणि आपले तथाकथित कर्तृत्व जगाला दाखवितो. अेरव्ही लोक जातीयवादी दूराचाऱ्यांच्या कल्पनांना कसे बळी पडतात? आणि ह्या दूराचाऱ्यांना आपली बहुमोल मते देअून बसतात? हिटलरने महायुध्द सुरु करण्यास नअु वर्षे घेतली. तो स्वतः ज्यु लोकांचा कट्टर विरोधक होता आणि त्या काळात जर्मनीमधले वातावरण आत्यंतिक दुराचारी आणि अनैतिक होते. त्याने ह्या नअु वर्षात युरोपमधले बाकीचे देश काय करत होते? ते काय झोपले होते की सुट्या मनविण्यात इतके व्यस्त होते की जर्मनमधल्या नाझीचा किंवा इटालीतल्या फॅसीस्ट चा उदयही त्यांच्या लक्षात येवू नये? अर्थात हा चितविभ्रम अगोदरच ज्यांचा उचत्तम आहे अशा काही लोकांनी मानसिक कल्पनेच्या द्वारे घडवून आणला होता. आता एकही नवीन

संकल्पना मांडली जीत. जर भावना आणि बुध्दी यांच्यात समतोल नसेल तर माणसाचे वर्तन पशूवत राक्षसी होण्यास वेळ लागणार नाही.

अर्थात आजही असे अनेक लोक आहेत की ज्यांना भावनिकतेवर आधारित असलेलीएकही संकल्पना माहीत नाही. त्यांचा अजूनही उच्चवर्णीयांना उरलेल्या लोकांना ठार माण्याचा अधिकार आहे, ह्या गोष्टीवर विश्वास आहे. अश्याच प्रकारच्या काही ठाम कल्पनांमुळेच काही देशातील आणि पर्यायाने जगातील शांतता नष्ट होत आहे.

उदाहरणार्थ, मुस्लीमांचा निराकार ईश्वरावर विश्वास आहे. हा धर्म भूतलावरील पार्थिव गोष्टींसाठी संपूर्ण वैराग्य शिकवतो. पण प्रत्यक्षात ते काय करतात? ते अेखाद्या जमिनीच्या तुकड्यासाठी भांडतात, प्रत्येकाचा छळ करतात प्रत्येकांना त्रास देतात. ते अगदी स्वतःचा देखील छळ करतात. ते जिहादवर, धर्मयुध्दावर कमालीची श्रध्दा बाळगतात आणि त्यांचा असा मूर्ख विश्वास आहे की जिहादमध्ये ज्याला मृत्यु येतो त्याला जन्नत प्राप्त होतो. ह्या सर्व कल्पना तेव्हाच निष्फळ होतील जेव्हा लोकांच्या मनात स्वमुक्तीचा विचार येईल. कारण स्वमुक्तीमुळेच सत्याची जाणीव होवू शकते आणि सत्य हे आहे की हे सर्व जग अेक आणि ते अर्थातच कोणा अेकाच्या मालकीचे नाही, आणि म्हणूनच अेखाद्या देशासाठी लढणे, आपापसात भांडणे अगदी व्यर्थ आहे. अर्थात आंधळेपणाने क्रूर होअून दुसऱ्यांवर हल्ला करणाऱ्या देशांपासून स्वतःचे रक्षण करण्याचा प्रयत्न त्यांनी कराय लाच हवा, त्यासाठी देशाच्यासीमारेषाही नक्की करुन त्यांचे संरक्षण करायला हवे. जागतिक शांती नष्ट करायलाच टपून बसलेल्या अनेक विघ्नसंतोषी लोकांकडे दुर्लक्ष करणे नक्कीच शहाणपणाचे ठरणार नाही. आपण त्यांच्यावर लक्ष ठेवून असायलाच हवे. पण हे काही भांडाभांडीचे आणि लढायांचे मूळ कारण होवू शकत नाही.

आणखीही अेक महत्वाची अडचण आहे, आजच्या घडीला युनायटेड नेशन्स वेगवेगळ्या शक्ती गट ह्यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न करत आहेत. ह्या कार्यप्रणालीत त्यांच्याकडून अनेक चुका झाल्या आहेत. काही वेळेस अत्यंत जंगली, अतिरेकी आणि हिंसक लोकांना त्यांनी पाठिंबा दाखविला. इतर देशांनी कोणताही निर्णय घेण्याच्या अगोदरच युनायटेड नेशनला ह्या घातपाती देशातल्या लोकांच्या हेतूची पूर्ण कल्पना असायला हवी होती. काही वेळेस हे देश अत्यंत तार्किक आणि संयुक्तिक वागत की इतर देशांची त्यांची नकारात्मक म्हणून जी कल्पना साकारली आहे ती चुकीची वाटावी. म्हणूनच ह्या लोकांच्या वागण्याची कारण मिमांसा शोधून काढायला हवी. त्यांचा इतिहास जाणून घ्यायला हवा आणि कोणत्या प्रकारच्या कल्पना त्यांच्या मनात आहेत हे जाणून घ्यायला हवे. म्हणजेच सद्दाम हुसेन सारख्या अतिरेकी माणसाच्या कुठल्याही भूलथापांना ते बळी पडणार नाहीत.

सध्या काही देशात अर्थव्यवस्थेचा ऱ्हास किंवा सामाजिक स्तरावर गडबड निर्माण झाली आहे आणि ह्याला अेकमेव कारण आहे वाढती बेकारी! ह्या गोष्टींवरुन लोकांचे लक्ष विचलीत व्हावे. ह्यासाठी सरकार दुसऱ्या देशाशी युध्द सुरु करते. सध्या जगात अनेक ठिकाणी म्हणूनच युध्दे चालू आहेत. अेखादा देश अेकदा का बलवान बनला की भ्रष्टाचारी लोकांची तिकडे नजर वळलीच म्हणून समजा आणि त्यातूनच तो देश महत्वाकांक्षी बनतो. अशा देशाला दुसऱ्या देशाच्या भानगडीत लक्ष घालावेसे वाटत नाही, किंवा कोणतेही सबळ कारण नसताना त्यावर हल्लाही चढवावासा वाटत नाही. दुसऱ्यांनी जर त्यावर हल्ला केला तर स्वतःचे रक्षण करण्यास तो देश समर्थ असतो. अशा तऱ्हेने हे दुष्टचक्र चालूच राहून मोठ्याप्रमाणात झगडे चालूच राहतात. इराक व इराण आणि तुर्की व ग्रीस ह्यांच्यातल्या परिस्थितीचे बघा ना! सर्वांना खूप चांगले माहीत आहे की युध्द लष्करी आणि राजकारणी लोकांच्या मनात आधी सुरु होते. कारण पैसा आणि ताकद हेच लक्ष असते. युध्द थांबविण्याचा आणि विश्वशांती निर्माण करण्याचा अेकमेव मार्ग म्हणजे लोकांच्या मनात शिरुन त्यांना योग्य मार्गावर आणणे. त्यांच्यातल्या ताकदीचे परिवर्तन करणे हाच होय. नाहीतर त्या ताकदीची अवास्तव,फाजील वाढ होण्यास वेळ लागणार नाही. माणसाचे मन ही कल्पना आहे. त्यांचा मेंदू हेच सत्य आहे.

ह्या अगोदर मी अगोदरच्या काळातल्या वर्णविद्वेष, जातीव्यवस्था ह्याबद्दल बरेच काही लिहिले आहे. त्यामुळे तुम्ही ह्या जातीयवाद्यांचे मूळ रुप नक्कीच पाहू शकता आणि तुम्ही हे ही जाणून आहात की इतर लोकांना ते कसे अेखाद्या जनावरासारखे ठार मारतात. महात्मा गांधीच्या मते अहिंसा हा अेकमेव मार्ग आहे जो तुम्हाला युध्दापासून दूर ठेवतो. हेही सत्य आहे की भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा ब्रिटीशांविरुध्द अहिसेच्या मार्गानेच लढला गेला आहे. पण जेव्हा सत्ताधारी अत्यंत पशुतुल्य वर्तन करत असतात तेव्हा फारच थोड्या वेळा अहिंसेच्या मार्गाने हे स्वातंत्र्य मिळू शकते आणि अर्थातच अनेक देशभक्ताच्या त्यागाचे ते फळ असते. भारतामध्ये हे घडले ते अपवादात्मकच म्हणावे लागेल. सुदैवाने परमेश्वराच्या कृपेने, दुसऱ्या युध्दाचा शेवट झाल्यावर लगेचच यु.के. च्या सत्तेवर लेबर गव्हर्मेंट आले. ह्या सरकारच्या धोरणामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाले. दुर्दैवाने इतर देशांचे नशीब इतके बलवत्तर नव्हते. परतंत्र्य देशात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी महान त्याग केल्याची सर्वत्र अनेक उदाहरणे आहेतच.

काही वेळेस, ज्यांच्या पूर्वजांचा जुन्या जमान्यात अत्यंत अघोरी छळ झाला आहे अशी माणसे सूडाचा विचार करु लागतात. उदाहरणार्थ जर्मनीतल्या हिटलरच्या नाझींकडून ज्यांच्या पूर्वजांचा छळ झाला अथवा त्या छळाने मारले गेले, ते लोक सतत जर्मनमधल्या

आत्ताच्या लोकांवर सूड उगवण्याची भाषा करीत असतात. ही गोष्ट सर्वार्थाने चूक आहे. सध्याच्या काळातल्या जर्मन लोकांचा नाझींशी दुरान्वयाने देखील संबंध नाही. त्यामुळे अपराधीपणाची कुठलीही ओशाळवाणी भावना त्यांच्या मनात असण्याचे काही कारणच नाही. ते सर्व नव्या पिढीतील शांतताप्रिय आणि सज्जन लोक आहेत. उदाहरण देऊन बोलायचे झाले तर आमचे बरेचसे सहजयोगी जर्मनमध्ये आहेत ह्यावर कुणाचा विश्वास बसणे शक्यच नाही, ऑस्ट्रियातले सहजयोगी देखील असेच महान साधक आहेत. आणि त्यांच्यात मानवता आणि चांगुलपण ह्यांचे फार चांगले दर्शन होते. ते देखील जर्मनभाषा बोलणारे लोक आहेत. पण नाही उलटपक्षी दयाळूपणा आणि चांगले वर्तन ह्याबाबात ते इतर सहजयोग्यांपुढे आदर्श आहेत. अगदी पहिल्यांदा मी जेव्हा रशियात गेले होते तेव्हा हेच जर्मन सहजयोगी धावत पळत येवून मला मदत करीत मी त्यांना विचारले तुम्ही संपूर्ण रशियात माझ्याबरोबर का आलात? त्यांनी उत्तर दिले,माताजी ह्या देशातल्या लोकांचा जर्मनीकडून अतोनात छळ झाला आहे. आमच्या वागण्याने पुर्वजांच्या पापांची भरपाई व्हावी असे वाटते. अत्यंत प्रेमाने आणि अतीव दयाळूपणाने ह्या लोकांनी रशियात माझ्यासाठी अपार कष्ट घेतले. त्यायोगे रशियात सहजयोगाला जे काही यश मिळाले त्याचे संपूर्ण श्रेय मी त्यांना आणि ब्रिटीश लोकांना देते. ब्रिटिशांचा देश अगदी लहानसा असला तरी मागच्या शतकात त्यांनी सर्व जगभरात अनेक देश जिंकून आपले साम्राज्य निर्माण केले होते असे भव्य साम्राज्य की अेकेकाळी असे म्हटले जाई की ब्रिटीश सत्तेवरचा सूर्य कधीच मावळत नाही. ह्या प्रक्रियेत ब्रिटिशांनी अनेकांचा छळ केला अनेकांना ठार मारले. हे जरी खरे असले तरी हा भूतकाळ झाला आणि भूतकाळात जे घडले त्याचा ठपका वर्तमानकालीन पिढीवर ठेवण्याचे काही कारण नाही. जर्मन आणि ब्रिटन ह्या दोन देशांनी रशीयात काम करण्यासाठी अनेक सहजयोगी दिले. आणि आता माझ्या असे लक्षात आले आहे की ऑस्टीयातले सहजयोगी इस्त्राइलच्या प्रगतीसाठी धडपडत आहेत. सहजयोगाखेरीज हे घडणे शक्य तरी होते का? ज्या जर्मनीतल्या लोकांनी अनेक ज्यूंचा अनन्वित छळ केला. त्यांना ठार मारुन त्यांचा संपूर्ण नायनाट करण्याचे ठरविले होते. त्याच जर्मनमधले लोक आज इस्त्राईलमध्ये जात आहेत. कशासाठी तर त्यांना सहजयोगाबद्दल माहिती देवून इस्त्राइली लोकांच्या उध्दारांच्या आणि नैतिक परिवर्तनाच्या, समाजकल्याणाच्या रस्त्यावर त्यांना मदत करण्यासाठी.

जेव्हा माझ्या लक्षात येते की ह्या आधुनिक युगात असे सुंदर लोक जन्माला आले आहेत की हे लोक आपल्या पूर्वजांच्या छळाच्या शिकार बनलेल्या लोकांच्या वंशजाकडे सतत लक्ष देतात, त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करतात, तेव्हा माझे हृदय खरोखरच भरुन येते.

त्याउलट इतर देशातल्या तथाकथित सुधारणावादींना ह्या देशातल्या लोकांकडे पहायला वेळही नसतो आणि ते कुठल्याही तऱ्हेचे प्रोत्साहन ह्या देशातल्या लोकांच्या उध्दारासाठी देत नाहीत. उलटपक्षी ते अत्यंत लालची झालेले असून पैसा मिळवण्यासाठी मरमर कष्ट करणे येव्हढेच ते करतात. जर ही सुधारणा अेखाद्या व्यक्तीला आंतरिक शांती आणि समाधान न देता फक्त अमर्याद हावरटपणाच देत असेल तर मग ह्या सुधारणेचा उपयोग तरी काय?

आणखीही अेक मोठी समस्या निर्माण झाली आहे. ती आहे रे आणि नाही रे (haves & tevevots) ह्या दोन गटात, म्हणजे श्रीमंत आणि गरीबांत जे प्रचंड अंतर पडत आहे. आणि ही समस्या विश्वशांतीला सगळ्यात मोठा धक्का पोहचवत आहे. माझ्या मते श्रीमंत देशांनी ह्या सर्वांवर अेकदा फेरविचार करण्याची फार गरज आहे, त्यांनी हे लक्षात घ्यायलाच हवे की गरीबी, मग ती कुठेही असो. शांततेला आणि प्रगतीला फार मोठा अडसर ठरु शकते. श्रीमंत देशांनी 'आणखी हवे, आणखी हवे' ही हाव आता थांबवायला हवी आणि विश्वकुटुंब, ह्या कल्पनेवर त्यांनी अधिक गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. नाहीतरी अेका विशिष्ठ अर्थाने राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या आपण एक विश्व ह्या संकल्पनेचा विचार करावयास सुरवात केलीच आहे. व्यापारी दृष्टीकोणांचा थोडा संकोच आणि आता इतकेच पुरे, अधिक नको ही तीव्र इच्छा मनात बाळगली तर श्रीमंत राष्ट्रे गरीब राष्ट्राला, त्याच्या दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यास आणि योग्य पध्दतीने जीवन जगण्यास नक्कीच मदत करु शकतील आणि अशा अतीव करुणामय दृष्टीकोणाने निश्चितच आंतरिक आनंद आणि समाधान लाभू शकते. त्याचबरोबर विश्वशांती आणि सामाजिक शिस्त ह्या दिशेनेही पावले टाकली जातील.

अर्थात सहजयोगात विश्वशांतीला धोका पोहचवणाऱ्या प्रत्येक समस्येवर उत्तरे आहेत. सर्व प्रथम आपण काहीतरी भरीव कार्य ठरवायला हवे की ज्या ठाम कल्पना आहेत त्या सोडून द्यायला हव्यात ह्या ठाम कल्पना हे पूर्वग्रह अर्थातच अडाणीपणातून, दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीतून निर्माण होतात. जेव्हा तुम्ही सत्य आरपार पाहू शकणारे, आणि सर्व जग हे अेक आहे हे समजू शकणारे होवू शकाल तेव्हा आपोआपच हे पूर्वग्रह नाहीसे होतील. जे लोक कोणत्याही कारणासाठी दुसऱ्यांकडून जमीन बळकावण्यावर विश्वास ठेवतात. त्यांनी हे समजून घ्यायलाच हवे की ही जमीन सर्वशक्तिमान अशा परमेश्वराच्या मालकीची आहे आणि सर्वजण तिचा उपभोग घेण्यासाठी, आनंद लुटण्यासाठीच फक्त ह्या पृथ्वीतळावर आहेत, दुसऱ्याकडून ती हिसकावून घेण्यात अथवा तिच्यासाठी भांडणे, मारामाऱ्या करण्यात आपला वेळ घालविण्यासाठी नाही. जमीनीचा अगदी लहानसा तुकडा

देखील सहजयोग्याला अपरिमित असा आनंद देवू शकतो. कारण तो स्वतः निसर्गाशी इतका अेकरुप झालेला असतो की जमीनीच्या लहानश्या तुकड्याचाही वापर अत्यंत योग्य पध्दतीने करुन भूमातेला योग्य न्याय देवू शकतो.

खरं म्हणजे आत्मसाक्षात्काराचे राज्य हे अेखाद्या राजाच्या राज्याहून कोणत्याही प्रकारे कमी नसते. तो त्याची अध्यात्मिक सत्ता गाजवू शकतो, त्याला शब्दशः मालकी हक्काबाबत काहीच देणे घेणे नसते. त्याचे स्वतःचे जे काही असते ते दुसऱ्यांना देवून टाकण्यातच त्याला कमालीचा आनंद मिळत असतो त्याला सर्व प्रणिमात्रांवर प्रेम करायचे असते आणि त्याच्या निर्माण कर्त्या परमेश्वरावर तर तो बेहद्द प्रेम करत असतो. अनेक साधुंनी आपल्या जीवनकहाणी द्वारे ते प्रेमाला, करुणेला किती अपरंपार महत्व देत असत हे जगाला दाखवून दिले आहे. अेकदा अेका भारतीय संताने अेक ओंजळभर पाणी गडव्यात घेतले. हे पाणी त्याला अेका विशिष्ट देवळातल्या देवाच्या पूजेसाठी हवे होते. तेथे पोहचण्यासाठी त्याला हा गडवा हातात ठेवून महिनोगणती चालावे लागत असे. जेव्हा हे पाणी घेअून तो त्या देवळाच्या आवारात पोहचला तेव्हा त्याने तहानेने अत्यंत व्याकूळ झालेल्या अेका गाढवाला पाहिले. जेव्हा त्यामहान संताने ज्या मरणासन्न गाढवाला पाहिले तेव्हा क्षणाचाही विचार न करता तो ओंजळभर पाण्याचा गडवा त्याने गाढवाच्या तोंडात रिता केला. देवळात जावून देवाची पूजा करण्याचा विचार त्याने मनातून तात्काळ दूर केला आणि त्या पाण्याने गाढवाचे प्राण वाचविले. इतर अनेकांनी अशा तऱ्हेची कावड आणली होती. त्या सर्वांना हे दृश्य पाहून आश्चर्यच वाटले. देवासाठी इतक्यादुरुन आणलेले पाणी तू गाढवाला कसे काय पाजले त्याच्या मित्राने विचारले. संतानी उत्तर दिले, देवाची पूजा करायला मला देवळाच्या सर्व पायऱ्या चढायची गरज भासली नाही करण देव स्वतःच माझी पूजा घ्यायला पायऱ्या उतरुन माझ्यापर्यंत आले होते. त्या सर्वांना त्याच्या ह्या समजूतीने आश्चर्यच वाटते.पण तो म्हणत होता हेच खरे होते. अध्यात्मिक लोकांच्या दृष्टीने सर्वात महत्वाची गोष्ट असते सर्व गोष्टींचा अध्यात्मिक आनंद मिळवण्यासाठी तात्काळ त्याग करणे त्यांच्या दृष्टीने सर्वात बहुमोल गोष्ट असते.

काही लोक दुसऱ्यांची जमीन मिळवण्यासाठी आततायी प्रयत्न करतात. त्यासाठी कोणत्याही तऱ्हेचे पापाचरण करण्याची त्यांची तयारी असते. कारण ते अत्यंत लोभी, हावरट असतात. पण ते जर क्षणभर थांबले आणि त्यांनी जर विचार केला की आयुष्याचे अंतिम ध्येय काय आहे तर त्यांच्यात नक्कीच बदल होईल. कारण आयुष्याचे अंतिम ध्येय परमोच्च आनंद मिळवणे हे आहे. पण अशा तऱ्हेच्या लौकिक गोष्टीत असा आनंद असे समाधान मिळू शकत नाही. दैवी शक्तीबरोबर राहणे हाच परमोच्च आनंद होय.

बरेचसे लोक, युध्दामुळे आपली जीवनमूल्ये हरवून बसले आहेत. सर्वशक्तिमान परमेश्वरावरचा त्यांचा विश्वास उडाला आहे. परमेश्वराने माणसाला जे नको असेल त्याचा त्याग करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे. ह्या स्वातंत्र्यामुळेच आपण सर्व गोष्टी शिकू शकतो. शाळेमध्ये शिक्षक मुलांना दोन+दोन बरोबर चार हे शिकवतात. पण जेव्हा तोच विद्यार्थी महाविद्यालयात जातो तेव्हा त्याला समीकरणे वेगवेगळ्या पध्दतीने सोडविण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. ह्याच पध्दतीने अशा वळणावर आजची मानव जात अुभी आहे जिथून केवळ ह्या स्वातंत्र्याच्या जोरावरच त्याला हे कळू शकेल की आत्मउध्दार मिळवणे हीच जगातली महान मिळकत आहे.

प्रत्येक युध्दानंतर अेकप्रकारचा तथाकथित कृत्रिम शांततेचा काळ येत असतो. पण त्यच शांततेच्या काळात लोक पुढील युध्दाची तयारी करत असतात. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे ज्या लोकांनी त्यांच्याशी युध्द करुन त्यांचे सगे संबधी, सोयरेधायरे ठार मारले असतात, त्यांचा गुन्हा विसरण्याची आणि त्यांना क्षमा करण्याची ताकद सर्व सामान्या लोकांमध्ये असत नाही. विश्वशांती रहावी म्हणून विश्वाच्या पातळीवर अेक संस्था निर्माण करणे गरजेचे आहे. हे लोकांना आता पटू लागले आहे. आपण यु.अेन ही संस्था स्थापन केलेली आहे. पण ही संस्था शांततेचे हे कार्य परिणामकारकरित्या करु शकत नाही कारण त्या संस्थेला स्वतःचे असे भक्कम अधिकार नाहीत, निर्णयासाठी त्यांना सभासद राष्ट्रांवर अवलंबून रहावे लागते. आणि ही सभासद राष्ट्रे कधीच अेक मताने वागत नहीत. त्यांच्यात कुठलाही ताळमेळ नसतो. ते फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी काही मागण्या यु.अेन कडे करत असतात ही यु.अेन संस्था कायम अमेरिकेच्या अधिपत्याखाली असते आणि अमेरिकन लोक हे अत्यंत अपरिपक्व व केवळ लैंगिकजीवनात आनंद मानणारे असल्याने ते सर्व जगावर अधिपत्य गाजवायला योग्य माणसे आहेत असे मला कधीच वाटत नाही.

म्हणून आपल्याकडे यु.अेन.पेक्षाही वरच्या दर्जाची संस्था हवी. हेग येथे असलेल्या जागतिक कोर्टातून आपणास उत्तम दर्जाचे प्रख्यात न्यायाधिश मिळू शकतील. हे लोक सर्व जगाततून निवडले जावेत. कुठल्या अेका विशिष्ट देशातून नव्हे. त्यांच्यात आवश्यक तो तटस्थपणा आणि मुत्सदीपणा तर हवाच. पण त्याचबरोबर जागतिक शांततेला बाधक ठरणाऱ्या समस्यांचे त्यांना चांगले परिपूर्ण ज्ञान असणे जरुरीचे आहे आणि ही नवी अत्यंत गुणवान लोकांची कार्यकारीणी यु.अेन.च्या ही वरची शिखर परिषद असावी. म्हणजे मग यु.अेनपेक्षाही जास्त भरीव कार्य हे लोक करु शकतील. कारण यु.अेन.च्या बाबतीत जास्त प्रमाणावर पैसा गोळा करण्यात त्या त्या देशाचे सरकार फारसे राजी नसतात. म्हणूनच यु.अेन.मधल्या नोकरी करणाऱ्या लोकांची संख्या कमी करणे व त्यांच्या पगारातही बरीच

कपात करणे आवश्यक आहे. सध्या युनो मध्ये जेव्हढा भरपूर पगार मिळतो त्यात कपात केली की आपोआपच केवळ पैशासाठी हपापलेल्या लोकांचे लक्ष यु.अेन.कडून दूर होईल आणि फक्त सामाजिक बांधिलकीचा विचार करणारे खरे कार्यकर्तेच ह्या कार्यकारिणीत येतील आणि काम करतील.आणि त्यांचे प्रत्येक प्रयत्न जागतिक प्रतिष्ठेसाठी काम करणाऱ्या लोकांचे संरक्षण करण्यासाठीच केले गेले पाहिजे. म्हणजे मग उच्च कल्पना आणि आदर्शवाद ह्यांचा शिरकाव आपोआपच त्या खरी सेवा करणाऱ्या लोकांमुळे होवू शकेल. ते सर्वजण अत्यंत बुध्दिमान आणि उच्च दर्जाचे प्रख्यात चारित्र्यवान असायला हवेत. तपशीलात सांगायचे म्हणजे ते अतिशय परिपक्व विचारसरणीचे आणि अनुभवीच असायला हवेत म्हणजे ते जागतिक शांततेचा भंग करणाऱ्या, जागतिक समस्येचा अत्यंत सखोल आणि योग्य पध्दतीने विचार करु शकतील.

जर अत्यंत उच्च, प्रतिष्ठित, चाणाक्ष, हुषार आणि चारित्र्यवान अशी माणसे, जर ह्या युनायटेड नेशन्सच्या धोरणांना दिशा दाखवणाऱ्या आणि मार्गदर्शन करणाऱ्या कार्यकारिणीवर नेमली गेली तर जगातल्या सर्व लोकांना, धर्माने वागणारे, योग्य दिशेने वाटचाल करणारे फक्त स्वतःच्या संकुचित स्वार्थाचा विचार न करता विशाल दृष्टीकोण ठेवणारे जागतिक सरकार पाहण्याची संधी लाभू शकेल आणि अत्यंत चांगली अशी सामाजिक व राजकीय परिस्थिती निर्माण होवू शकेल. ह्या व श्रेष्ठ कार्यकारिणीला आपण सुप्रीम कौन्सिल म्हणू शकू, ही कार्यकारिणी कुणाच्याही,अगदी अमेरिकेच्याही अधिपत्याखाली आपले काम करणार नाही, काही काही वेळेस मला वाटते की सगळे अमेरिकन अजूनही खूप पोरकट, अपरिपक्व आहेत. अर्थात अब्राहम लिंकन आणि जॉर्ज वॉशिंग्टन सारखे महान नेते त्यांच्याकडे होवून गेले. तरीसुध्दा आता अमेरिकन लोकांनी आपला पोरकटपण सोडायला हवा आणि कुठल्याही भोंदू साधूच्या नादी न लागता त्यांनी जर सहजयोग अंगिकारला तर ते नक्कीच परिपक्व बनू शकतील.

अर्थात आपणास निश्चितपणे नक्कीच म्हणता येणार नाही की हे सुप्रीम कौन्सिल जे यु.अेन.च्या हालचालींवर ताबा ठेवण्यासाठी निर्माण केले जाईल. ते सर्वार्थाने परिपूर्ण असेल. सर्वात प्रथम म्हणजे त्यांना पगार देण्यात येवू नये तर मानधन देण्यात येईल पण अशा ठिकाणी पैशाचे लोभी लोक नेमले गेले तर ते पैश्यासाठी काही अप्रामाणिक गोष्टी करण्याचा प्रयत्न करतील म्हणून प्रामाणिक नसेल आणि मग अेक असा पर्याय निवडण्यात यावा की जे उत्तम सहजयोगी असतील तेच इथे निवडावेत. कारण त्यांच्यातच हवे असलेले सर्व गुण असतील, ते निस्वार्थी असतील, दयाळू असतील, त्यांनी स्वतःला जनहितार्थ वाहून घेतले असेल आणि हे करताना ते धर्म, जात, देश ह्यांचा यत्किंचित सुध्दा विचार करणार नाहीत.

म्हणूनच ते नेहमी योग्य निर्णय घेतील. थोडक्यात सहजयोगीची घडलेली ही सुप्रीम कौन्सिल सहजयोगाचा सर्वजगात केवळ शाब्दिक नव्हे तर आपल्या कृतीद्वारे प्रसार करतील. आणि त्यांचे हे कृत्य जगातील सर्व लोकांना स्फूर्ती देईल व अश्या तऱ्हेने जगात एक प्रकारची शांती नांदू शकेल. थोडक्यात जगाची ही समस्या सोडविण्यास सहजयोग हा एकमेव मार्ग आहे. सहजयोगाद्वारेच लोकांमध्ये परिवर्तन घडून एक उच्च दर्जाची उत्क्रांतीला धरुन असणारी मानवजात निर्माण होईल.

## ९

# 'उत्क्रांती'

—

सापेक्षदृष्ट्या अत्यंत थोड्या काळात मानवाची निर्मीती कशी झाली हे पाहणे अत्यंत महत्वाचे ठरते, हा सर्व उत्क्रांतीचाच परिणाम मानला जातो. मानवजातीने निर्माण होण्यासाठी जो वेळ घेतला तो खरोखर खूपच थोडा मानायला हवा. काही लोक त्याला अेक अकस्मात असेही म्हणू शकतील. पण शक्यतेच्या कायद्याचा सर्व बांजूनी विचार करुन सुध्दा आपण ही निर्मिती करु शकलो नसतो.

आपली ही उत्क्रांती प्रक्रिया संपूर्णपणे अवकाशयानाच्या निर्मितीच्या पध्दतीला पायाभूत मानून समजून घेता येईल. अंतराळात जाणाऱ्या अवकाशयानात काही निरनिराळे विभाग असतात. जेव्हा हे अवकाशयान पृथ्वीतळावरुन उड्डाण करते तेव्हा थोड्याच वेळा सगळ्यात खालचा किंवा सगळ्यात बाहेरच्या भागात स्फोट घडवून आणला जातो. ज्यायोगे उरलेल्या अवकाशयानाला हवा तो जलद वेग प्राप्त होतो म्हणजे जर त्या अवकाशयानाचा मूळ वेग क्ष मैल तासाला होता असे म्हटले तर पहिल्या स्फोटानंतर त्याचा वेग क्ष मिनिटाला इतका होईल. अश्या क्रमवार पध्दतीने स्फोट घडवून आणत शेवटी अवकाशयान पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या बाहेर जाऊन आपल्या ध्येयाकडे, कधी चंद्रावर, तर कधी मंगळावर जाण्यासाठी प्रस्थान ठेवते. अशा पध्दतीनेच आमची उत्क्रांती देखील वेग धारण करत असते. सर्वप्रथम आयुष्य अेकपेशीय अमिबापासून सुरु झाले, आणखी अेका स्फोटानंतर असे म्हणू यात – आयुष्य दुसऱ्या पातळीवर पोहचले–ती माकडे, किंवा दुसरी कुठली तरी पातळी असू शकेल. अश्या अनेक स्फोटानंतर शेवटी आजची ही मानवजात तयार झाली. असेच काहीसे आपणास चित्र दिसते.

मानवजातीच्या ह्या सुरवातीच्या काळात आपले सर्व लक्ष, अन्न मिळवणे, किंवा

घरासारखे, झोपडीसारखे काहीसे शोधून निसर्गापासून आपले संरक्षण करणे एवढ्याच गोष्टीवर केंद्रीत होते. अेकदा ह्या गोष्टी मिळवल्यानंतर सुधारणेच्या दुसऱ्या टप्प्यावर मानव जात येवून थबकली. नंतर अचानक काहीसे स्फोटासारखेच घडून आपण मानसिकदृष्ट्या खूप चपळ आणि हुषार बनलो. इतके प्रगत झालो की शास्त्र आणि तंत्र ह्याच्या साह्याने आता आपण चंद्रावर किंवा मंगळावर देखील जायला लागलो. अश्याच प्रकारच्या मानसिक पातळीवरच्या दुसऱ्या स्फोटाने आपण आपल्या भावनिकतेमध्येही खूप सुधारणा घडवून आणली. जेव्हा आपण पाहिले की सगळे जग द्वेष आणि स्पर्धा ह्यांनी होरपळत आहे. अेक नवीनच पायरी निर्माण झाली आणि ह्या पायरीवर बहुतेक सर्वांनाच जणू करुणेची, प्रेमाची व शांततेची तहान लागली आहे. ह्या ठिकाणी पोहचल्यावर किंबहुना त्याच्याही कितीतरी आधी मानवी आकलनाच्या पलीकडचे, असे काही शोधण्याचा आपला प्रयत्न चालू झाला. नंतर जणू आतल्या आत अेक स्फोट झाला. ह्या स्फोटानंतर आपणास देव व धर्म सापडले. पण ही देखील उत्क्रांतीची शेवटची पायरी नव्हे, कारण लवकरच लोकांच्या असे लक्षात आले की धार्मिक पध्दतीने वागणे म्हणजे फक्त कर्मकांडानुसार वागणे आणि कर्मठ वागणे नव्हे तर कोणत्याही पध्दतीने, कमी अधिक प्रमाणात देखील बदल घडवू शकत नाही आणि मग परत अेकदा मानवी मनाच्याही पार पलीकडे हे जे काही आहे. त्याचा तातडीने शोध घेण्याची नितांत गरज भासू लागली.

जेव्हा सत्यशोधकांनी शोध घेण्याचा, अगदी प्रामाणिकपणे शोध घेण्याचा प्रयत्न सुरु केला, तेव्हा हा शोध कितीही विचारपूर्वक केलेला असला तरी तो डोळस नव्हता आणि ह्या आंधळ्या शोधाच्या नादात ते अल्लादपणे, अतिशय वाईट पध्दतीने भोंदू गुरुंच्या जाळ्यात सापडले, स्वतःला हरवून बसले. हे भोंदू गुरु म्हणजे राजाचा वेश धारण करणारे चोरच होते. आपल्या धर्मग्रंथातून असे वर्णन केले आहे की मानव आता शोधाच्या अशा अंतीम टोकावर पोचायला हवे की तेथून त्याला जागृत अवस्थेची चवथी मिती (तुर्या) प्राप्त होवू शकेल. फ्रँकीज क्रीक सारखे काही शास्त्रज्ञ मानवाच्या जागृतअवस्थेवर काम करत आहेत. त्यांना प्रामुख्याने दृष्टीच्या जागृतीबद्दलचे सखोल ज्ञान प्राप्त करुन घ्यायचे आहे. तुर्या ही पायरी अेकूणच जागृत अवस्थेतील अत्यंत सूक्ष्मतेने पाहणारी अवस्था आहे. शास्त्रज्ञांनी प्रथम ह्या तुर्या ह्या अवस्थेपर्यंत पोचायला हवे. त्यांना जागतिक मानवी जागृतीचा विचार जास्त सखोलतेने करता येईल. काही वेळेस, माझ्या असे लक्षात आले आहे की अनेक शास्त्रज्ञ आपणच निर्माण केलेल्या अंधाऱ्या रस्त्यावर कुठेतरी हरवून बसतात पण वस्तुस्थितीचे संपूर्ण दर्शन घडवणाऱ्या दैवगतीचा स्वीकार करण्यास ते कधीच तयार होत नाहीत. सर्वसाधारणपणे आपण आपले आयुष्य त्रिमितीत घालवत असतो. जे संत

असतात त्यांना चवथी मिती प्राप्त होऊ शकते. ह्या उध्दाराच्या साह्यानेच संपूर्ण शांती, समाधान आणि सत्याची अेकूण सम्मुचयता ते अनुभवू शकतात. त्यांच्या उध्दाराच्या ह्या प्रयत्नांना वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळी नावे आहेत, वेगवेगळ्या प्रकारे त्याचे वर्णन केले जाते. तीन मितींचे अस्तित्व शारिरिक, मानसिक व भावनिक पातळीवर अनुभवू शकतो. पण ही चवथी मिती मात्र अध्यात्मिक पातळीवरच अनुभवावी लागते. सध्या ह्या पहिल्या तीन मितींच्या सततच्या वापरण्यामुळे आपणास आपल्या आयुष्याची वैय्यर्थता, आयुष्याचा क्षुल्लकपणा आपल्या लक्षात आला आहे. आणि म्हणूनच आपण आता पूर्ण सत्याच्या, अंतिम सत्याच्या शोधात निघालो आहोत. जे काही आपणास ज्ञात आहे ते आपणास कोणत्याही प्रकारचे समाधान देत नसल्याने ते मनाला संथावण्यासाठी शोधण्याची गरज आहे.

आपल्याकडे मार्कंडेय नावाचे अेक साधू होऊन गेले. ते चौदा हजार वर्षापूर्वी होते असे त्यांच्या बाबतीत म्हटले जाते. त्यांनी ह्या चौथ्या मितीबद्दल बरेच लिहिले आहे. 'आदिमायेचा कृपाप्रसाद असे त्यांनी ह्या चौथ्या मितीबद्दल लिहून ठेवले आहे. आदि शंकराचार्य ही चौथ्या मितीबद्दल खूप काही जाणणारे दुसरी व्यक्ती होय. त्यांनी खूप पुस्तके लिहीली आहेत. त्यांनी लिहिलेल्या पहिल्या पुस्तकाचे नाव आहे 'विवेक चुडामणी'! त्यांनी ह्या पुस्तकात ह्या चौथ्या मितीबद्दल बरेच सविस्तर वर्णन केले आहे आणि ती प्राप्त करून घेणे का आवश्यक आहे ह्याचेही स्पष्टीकरण केले आहे. श्री शर्मा नावाच्या अेका विद्वानाने त्यांना आव्हान दिले आणि सांगितले की साधू, बैरागी ह्यांच्यासारखे काहीही न करता त्यांनी (शंकराचार्यांनी) फक्त आपल्या बुध्दीमत्तेला जिंकून दाखवावे. श्री शर्मांच्या ह्या बोलण्याने शंकराचार्यांने असे जाणवून गेले की अश्या प्रकारची तात्विक क्लिष्ट चर्चा ही सर्वसामान्य माणसांना फक्त डोंबाऱ्याच्या कसरतीसारखी, मानसिक दृष्ट्या केलेली कसरत वाटू शकेल. म्हणून मग त्यांनी फक्त 'आदी मातेची स्तुती', प्रार्थना करणारी पुस्तके लिहीली. 'सौंदर्यलहरी' ह्यात त्यांनी वर्णन केले आहे की सर्व दैवी लहरी, ह्या आदिमायेच्या सौंदर्यलहरीच आहेत. त्या काळात त्यांनी हे सर्व संस्कृत भाषेत लिहिले होते. पण फार थोडे सन्माननीय अपवाद सोडले तर सर्वसामान्यांना ती भाषा समजत नसे. हे सुसंस्कृत लोकही फारसे तपशीलात शिरण्याचा प्रयत्न करत नसत.

नंतर महाराष्ट्रात १२ व्या शतकात ज्ञानेश्वर ह्या महान संताचा उदय झाला. त्यावेळेस नाथपंथीय लोकांमध्ये अशी प्रथा होती की अेक गुरु फक्त अेकाच शिष्याला साक्षात्कार घडवून आणू शकत असे. ह्या गुरुने व सर्वसामान्य लोकांशी ह्या तुर्येबद्दल, चौथ्या मितीबद्दल साधे बोलणेही पाप समजले जाई. सर्वसामान्यांना फक्त तुम्ही परमेश्वराचे स्मरण करा, त्याची प्रार्थना करा येव्हढेच सांगितले जाई. पण संत ज्ञानेश्वर ह्या महान

तत्ववेत्याला असे जाणवले की सर्वसामान्य लोकांची अध्यात्मिक उध्दाराची जाणीव आधिक स्पष्ट करण्याची हीच वेळ आहे.

गीतेमध्ये श्रीकृष्णाने कुं डलिनी किंवा तिच्या जागृतीबद्दल कुठलेही वर्णन केले नाही. भगवान कृष्णाने गीतेच्या अगदी सुरवातीलाच असे सांगितले आहे की प्रत्येक व्यक्तीने 'स्थितप्रज्ञ' म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाच्या दिव्य प्रकाशात जो स्वतःला समतोल राखण्याचा प्रयत्न करतो तो! हे सर्व वर्णन त्याने केले असले तरी हा समतोल कसा साधावा, हे स्थितप्रज्ञत्व कसे मिळवावे ह्याबद्दल तो काहीही सांगत नाही.

पण ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ह्या नावाच्या गीतेवर ग्रंथात सखोल विश्लेषण केले आहे. ह्या ग्रंथाच्या ६ व्या अध्यायात त्यांनी अत्यंत मधुरपणे ह्या चवथ्या मितीचे, तुर्येचे वर्णन केले आहे. ह्या चवथ्या मितीस गाठणारी जिला कुंडलिनी म्हटले जात असून ती त्रिकोणी हाडावर स्थित आहे. हे सांगून ज्ञानदेवांनी कोणत्या मार्गानी काही महात्म्यांनी त्यांची कुंडलीनी जागृत करण्याचा प्रयत्न केला हेही सांगितले आहे. त्यांनी दुसऱ्या लोकांना साक्षात्कार घडवून आणण्यासाठी आपल्या गुरुंची परवानगी विचारली नव्हती. पण त्यांनी फक्त ह्यासंबंधी काही लिहू देण्यास परवानगी घेतली होती. नंतर काही दिवसांनी हा ६ वा अध्याय धर्ममार्तडींना सारख्या लोकांनाही समजण्यास कठीण जावू लागला, त्यामुळे त्यांनी असा फतवा काढला की, ६ वा अध्याय लोकांकडून संपूर्णपणे दुर्लक्षित करावा आणि ते फक्त भक्तीमार्गाचाच अवलंब करु लागले. हा भक्तीमार्ग म्हणजे देवाचे सतत स्मरण करणे, सर्वशक्तीमान देवाची प्रार्थना करुन त्याला आपले जीवन समर्पित करणे येव्हढाच मर्यादित राहिला.

आपल्या देशात तीन प्रकारच्या घटना घडत असतात. किंवा तीन प्रकारे चळवळी चालतात असे म्हणू यात. पहिल्या प्रकारात लोक वस्तुस्थिती काय आहे हे जाणण्याचा प्रयत्न करतात. वस्तुस्थितीचे मूळ, जगाचे मूळ जाणून घ्यायचा प्रयत्न करतात. ह्या शोधात फार तर आपल्या शरीराची उजवी कशी आहे किंवा कोणत्या मूळ गोष्टींनी आपले शरीर बनले आहे हे त्यांना कळू शकते. ह्या प्रकारातले प्रगत ज्ञान हे आपणास शास्त्राकडे वळवते. अभ्यासाचे अेक नवे दालन जणू आपणास खुले होते. दुसऱ्या प्रकारातले लोकांना आपल्या स्वतःला परमेश्वराच्या चरणी वाहून घेतले असते ते भूमातेने घडवलेल्या प्रत्येक अवताराची प्रार्थना करण्यात स्वतःला धन्य समजतात. ते परमेश्वराची प्रार्थना गातात. सर्वशक्तिमान परमेश्वराच्या मार्गावर नेणाऱ्या गुरुंनी सांगितलेल्या प्रार्थना गातात. नाथपंथी नावाचा आणखीन अेक सुवर्णमध्य साधणारा अेक मध्यममार्गही, महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. हे मुक्तात्मे असतात. त्यांना ही मुक्ती 'अेक गुरु अेक शिष्य' ह्या पध्दतीने मिळाली असते. संत ज्ञानेश्वर हेही नाथ संप्रदायाचेच होते. त्यांनी आपल्या ग्रंथात कुंडलिनी जागृतीबद्दल खूप सविस्तर लिहिलेले आहे.

नंतरच्या काळात म्हणजे १६ व्या शतकात अनेक संत होवून गेले. त्यांनी कुंडलिनीबद्दल बोलण्यास आणि तिचे गोडवे गाण्यास सुरवात केली. तिच्या सूक्ष्मतेबद्दलही ते बोलू लागले. संपूर्ण भारतात हे सर्व संत आत्मज्ञान आणि आत्मसाक्षात्कार ह्याबद्दल बोलत होते. त्यातल्या काहींनी आपल्या शिष्यांना साक्षात्कार घडविण्यास सुरवात केली. पण फारच थोड्या लोकांना ते हा साक्षात्कार घडवू शकले. कारण त्यांच्या मते हे संपूर्ण जग अजूनही हा आत्मसाक्षात्कार घडवून घेण्यास तयार नव्हते. ह्याबद्दल संत कबीर म्हणतात जे आंधळे आहेत. अगदी संपूर्ण आंधळे आहेत, त्यांना मी उजेड ह्या शब्दाचे स्पष्टीकरण कोणत्या शब्दात व कसे करु?

त्यातल्या बहुतेक संतांचा, त्या काळातील समाजातील तथाकथित विद्वान्नांकडून छळ केला गेला, विद्वानांच्या मते हे सर्व संत भोंदू असून लोकांना गैरमार्गावर नेण्याचा ते प्रयत्न करतात. माझ्या मते त्या सर्व तथाकथित सज्जनांचे ह्या नव्या जमान्यातही पुनरागमन झाले आहे. आणि कोणत्याही प्रकारच्या सत्य/असत्याचा मुलाहिजा न करता त्यांनी पवित्र साधुसंत, आणि खऱ्या सत्यशोधका विरुध्द टीका करण्यासाठी जणू व्यासपीठ उभारले आहे. अर्थात त्याच बरोबर हेही खरे आहे, की सध्याच्या काळातही अनेक भोंदू साधूंचे आणि साध्वींचे जणू पेवच फुटले आहे. त्यामुळे कोण खरे आणि कोण नाही, हे शोधणे तसे काहीसे कठीणच होऊन बसले आहे. सर्वात पहिल्यांदा जी व्यक्ती तुम्हाला आत्मसाक्षात्कार घडविण्याच्या बदल्यात किंवा देवाच्या संदर्भात ज्ञान देण्याच्या बदल्यात किंवा कुठल्याही उच्च जागृतीच्या बदल्यात, तुमच्याकडून पैशाची अपेक्षा करत असेल, तुम्ही स्वच्छेने देवू केलेले पैसे स्वीकारत असेल आणि ते सर्व गिळंकृत करून कोणते ही देव कार्य करत नसेल तर ती व्यक्ती अगदी नीच दर्जाची चोर समजायला हवी. अशी व्यक्ती नक्कीच स्वार्थासाठी, केवळ पैसा मिळवण्यासाठी तुमचा उपयोग करुन घेत असते. अर्थात हे सर्व घडायच्या अगोदर लोक, देवळांना, चर्चेसना, मशिदींना मोठमोठ्या देणग्या देताना दिसतच होते की, म्हणूनच लोकांना ह्या बाबतीतले तारतम्य ठेवणे कठीण जाते. लोकांचे असे मत आहे की देवाला पैसा ठेवावाच लागतो. खरं म्हणजे देव पैसा म्हणजे काय जाणत नाही. तो कोणतेही अर्थव्यवहार ओळखत नाही. मुळात त्याने पैशाची निर्मिती केलेलीच नाही. ही सर्व मानवी डोकेदुखी आहे. असो तर कुंडलिनी जागृत करणे हे फार थोड्या लोकांना साधते. कारण फारच थोडे सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करतात.

माझ्या जन्माच्या वेळची गोष्ट, लोकांमध्ये, सर्व जगातल्या लोकांमध्ये परमेश्वर किंवा कुठलीही दैवी शक्ती न मानण्याची अेक जबरदस्त लाट आलेली होती. त्याचा फक्त पैसा आणि सत्ता ह्या दोनच गोष्टींवर विश्वास होता, ह्या अश्या गोंधळलेल्या अवस्थेत माझे

वडिल जे खरोखरच सर्वार्थाने अेक महान मुक्तात्मा होते. माझ्या मदतीला आले, आणि मला सांगू लागले, की अस बघ मुली, तू अेका मोठ्या बिल्डींगच्या सातव्या मजल्यावर अुभी आहेस. तिथून तू तळमजल्यावर असलेल्या अनेक लोकांना बघत आहेस. पण ते तू सातव्या मजल्यावर आहेस ह्यावर कसा विश्वास ठेवतील? तू त्यांना अगदी, पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यापर्यंत जरी आणू शकलीस तरच मग ते विचार करु लागतील की ह्यापेक्षाही वर असे काही आहे की जे आपणास मिळवायला हवेच आहे. म्हणजे पहिला मजला हा शारीरिक पातळीवरील कमाई, तो आता संपला, दुसरा भावनिक पातळीवरचा तोही ओलांडला आणि तिसरा मानसिक पातळीवरचा, तो आपण पार केला. आणि आता त्यांना मानसिकतेच्याही पलीकडे पोहचायला हवे आहे, ते देखील अेकट्याला नाही, तर सर्वांना अेकत्रितपणे समूहाने.! मी चांगले जाणून आहे की माझे कार्य हे असेच अेकत्रित समूह जागृतीचे आहे. पण मी जन्माला मात्र ह्या आंधळ्या जगात आले आहे.

माझे वडिल मला पुढे सांगत, 'कोणताही वैयक्तिक पातळीवरचा शोध हा सामुहिक पातळीवर परावर्तित होणे अत्यंत गरजेचे आहे. अेरव्ही त्या शोधाला कोणताही अर्थ उरत नाही, कोणत्याही कारणासाठी तो उपयोगी ठरु शककत नाही. मी त्यांना म्हटले, 'मी पूर्ण जाणून आहे की माझे मुख्य कार्य हे सामुहिक साक्षात्काराचा मार्ग शोधून काढणे हेच आहे.' माझे हे उत्तर अैकताच त्यांना अत्यानंद झाला आणि म्हणूनच मी अनेकविध लोकांबरोबर काम करावयास सुरवात केली. माझे माझ्या वडिलांबरोबरचे जीवन हे सामाजिक पातळीवर अत्यंत परिपूर्ण होते. कारण माझे वडील महान स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचा अनेक लोकांशी संबंध येई. त्यानंतर ते केंद्रीय असेंबलीत पण होते. मला त्यांचे खूप मित्र, त्यांच्या बायका, मुले नेहमी भेटत आणि माझ्या सूक्ष्म, सखोल पध्दतीने. त्याच्यात कोणत्या समस्या कोणत्या अडचणी येतात ह्याचे मी निरीक्षण करी. आणि नंतर हळूहळू मी मानवजातींच्याच समस्या, त्यांची कारणे, निराकरण ह्या गोष्टींचा अभ्यास सुरु केला.

१९४६ च्या सुमारास मी अशा निष्कर्षावर येवून पोहचले की ह्या सर्व गोष्टी मला अत्यंत सखोल व हळूवार पध्दतीने करणे आवश्यक आहे आणि माझ्या मनातल्या आतल्या हालचालींच्या साह्याने मी मानवी केंद्र आणि त्यांच्या तीन पातळीवर काय काय अडचणीचे होवू शकते हे शोधून काढू शकले.

१९७० मध्ये मी अगदी अपरिहार्यपणे अेका सेमिनारला गेले. ते अेका तथाकथित गुरुने भरविले होते व मी हजर रहावे अशी त्याने माझ्या पतींना विनंती केली होती. कारण एक माझ्या पतीराजांचे स्नेही होते. त्यांनी माझी तेथे राहण्याची वगैरे सर्व व्यवस्था केली. मी त्या गुरुना पाहून आश्चर्य चकितच झाले, ते गृहस्थ माझ्यापेक्षा १० वर्षांनी लहान असूनही

माझ्यापेक्षा सुमारे २० वर्षांनी मोठे दिसत होते. पण त्यांच्यात लोकांना संमोहित करण्याची चांगली कला होती. त्यासंमोहित अवस्थेत लोक जोरात ओरडत होते, खदाखदा हसत होते, किंचाळ्या मारत होते, काहीतर कुत्र्यासारखे भुंकत होते. जणू ते गुरु त्या लोकांना त्यांच्या भूतकाळात नेत होते.

ही गोष्ट मला खूपच धक्कादायक वाटली. मी अेका झाडाखाली बसून तो काय करत आहे ह्याचे निरीक्षण करत होते. त्या दिवशी रात्री मी अेकटीच तिथल्या समुद्र किनाऱ्यावर गेले आणि अेकटीच ध्यान लावून बसले त्याक्षणी  जागृत झाली, लखकन् चमकली. मला आश्चर्यच वाटले पण अधिक सखोल आणि सूक्ष्म पद्धतीने मी तिचा शोध लावू शकले. तो अनुभव काहीसा असा होतो. मी माझी कुंडलिनी अत्यंत जलद गतीने अेखाद्या दुर्बिणीसारखी वाढत जाअून उघडली जाताना पाहिली. लोखंड खूप तापल्यावर दिसणाऱ्या लाल गुलाबी रंगासारखी ती तळपत होती. तरीही कमालीची शीतल शांत जाणवत होती. माझी ही कुंडलिनी ब्रम्हरंध्राद्वारे बाहेर पडलेलीही मला जाणवली, माझे हे ब्रह्मरंध्र माझ्या लहानपणापासूनच जागृत असून पूर्णब्रह्माच्या लाटा ते बाहेर टाकत असते. पण ह्या नव्या अनुभवाने मला माझ्या दैवीशक्तीची ताकद जाणून घ्यायची अेक नविनच मिती बहाल केली. अत्यंत प्रखर सत्यासारखे मला ते अचानक जाणवले. त्याच बरोबर मी हेही समजून चुकले की माझ्या सामुहिक कार्याला सुरवात करायची वेळ आता येवून ठेपली आहे. त्याक्षणी मला जाणवले की माझे संपूर्ण अस्तित्व अतीव सुखाने आणि अत्युच्च आनंदाने ओसंडत आहे.मी माझे डोळे उघडले तशीच त्या भोंदू साधूकडे गेले आणि त्याला सांगितले की, आता हा शेवटचा केंद्रबिंदू सर्वासाठी जागृत करता येणे शक्य आहे. त्याला केंद्रबिन्दू आणि त्याच्या तीन वाहिन्या ह्याबद्दल अक्षरशः काहीही कल्पना नव्हती हे पाहून मला आश्चर्यच वाटले. कारण ह्या गोष्टी मला अगदी लहानपणापासूनच अवगत होत्या. माझ्या असे लक्षात आले की हे भोंदू साधू सध्या भरपूर निर्माण झालेले असून त्यांचा फक्त पैसा कमावणे हा अेकमेव उद्योग असतो. संमोविद्येच्या गैर वापराने ते अनैतिक आणि ख्रिस्तविरोधी चळवळींना जगाचा शेवट जवळ आला आहे ह्यासरखी चुकीची विधाने करुन, प्रोत्साहन देत असतात.

मी माझ्या कार्याला अेका व्यक्तीपासून सुरुवात केली. मला आश्चर्य वाटावे इतक्या जलद गतीने ती व्यक्ती ह्या चवथ्या मितीपर्यंत पोहचली. ती अेक अत्यंत म्हातारी, पण फार चांगली व धार्मिक स्त्री होती. दुसरी स्त्री तरुण होती. अत्यंत थोड्या कालावधीतच ती तिच्या मोक्षाप्रत गेली. त्या दिवसापासून तिला तीची स्वतःची कंपने अवगत झाली होती. नंतर त्याच समुद्रतीरावरुन मी पंचवीस पैकी १२ जणाना आत्मसाक्षात्कार घडवण्याच्या बाबतीत यशस्वी ठरले. त्या दिवसापासून माझे हे कार्य सामूहिक पातळीवर सुरु झाले.

आणि आता तर अेका ठिकाणी १८/२० हजार लोकांचा समुदाय असला तरी मी त्यांना आत्मसाक्षात्कार घडवू शकते. विशेषत: रशियात हे नेहमी घडते. अशा संमेलनातून हजारो माणसे बरी झाली आहेत. मी खूप भाग्यवान आहे हे मला कबूल केलेच पाहिजे की त्या सर्वशक्तिमान परमेश्वराच्या इच्छेनुसार माझा उपयोग मी अत्यंत पवित्र अश्या ह्या कंपनांच्या सह्यायामुळे हजारो, लाखो लोकांच्या उध्दारासाठी अत्यंत आनंदाने करु शकते. जणू माझ्या आयुष्याचा आता वसंतोत्सवाचा काळ चालू झाला आहे.आणि पृथ्वीतलावरची हजारो फुले सत्यशोधासाठी उत्सुक बनली आहेत आणि सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे अत्यंत सहजतेने त्या सर्व फुलांची फळे बनली आहेत.

इंटरनॅशनल मेरीटाइम ऑर्गनायझेशन ह्या संस्थेचे माझे पती सेक्रेटरी जनरल म्हणून निवडले गेले होते. त्यामुळे मी लंडनला गेले होते आणि तिथे मी अत्यंत विचित्र अश्या ७ हिप्पी लोकांवर माझे कार्य सुरु केले. माझ्या असे लक्षात आले पाश्चिमात्य संस्कृतीच्या विळख्यातून स्वत:ची सुटका करुन घेण्याच्या नादात ते अत्यंत असंस्कृत, उध्दट, बेधडक आणि मगरूर झाले होते. मी त्यांच्यावर काम करावयास सुरवात केल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की आपण चवथ्या मितीत अजून प्रवेश केलेला नाही(आपण तसे आहोत असे त्यांना नेहमी वाटत असे)आणि म्हणूनच आपण इतरांपेक्षा वेगळे, उच्च आहोत असे समजण्याचा आपणास काहीच अधिकार नाही. चार वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर मी ह्या सातजणांना पुर्वस्थितीवर आणू शकले. मधल्या काळात मी भारतात येतच होते. माझ्या स्वत:च्या राज्यात, महाराष्ट्रात मला खूप चांगला प्रतिसाद मिळत होता. हजारो लोकांनी मुक्ती मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते.

# १०

# तत्वज्ञानाचा संदेश

—

असे अनेक प्रश्न आहेत की ज्याला शास्त्रात उत्तरे नाहीत, वैद्यकीय शास्त्र सध्या गुणसूत्र नावाच्या अत्यंत सूक्ष्म अशा गोष्टीच्या मूळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहे. पण ह्याबाबतीत शास्त्रज्ञ अत्यंत निराश झाले आहेत. कारण ह्या गुणसूत्राच्या मदतीने पुढे कुठलीच शोधात प्रगति होत नाही. आणि आधुनिक युगातल्या जीवनशैलीने जो गुंता करुन ठेवला आहे तो सुटता सुटत नाही.

गुणसूत्रे ही अनुवांशिक आहेत. ह्या भ्रमापर्यंत ते पोहचले आहेत आणि तो अगदी चुकीचा आहे. खरे पाहता गुणसूत्राचे प्रतिबिंब आमच्या व्यक्तिमत्वात अगदी रोजच्या जीवनात देखील पडलेले आपल्याला जाणवते. आपल्या सर्व भावनिक वागण्यावर ह्या गुणसूत्रांचाच प्रभाव असतो.

वैद्यकीय शास्त्रामध्ये आपल्याला हे कधीही स्पष्ट करता येत नाही की आम्लपित्त आणि मूत्राशयाजवळ निर्माण होणारा स्त्राव ही दोन रसायने आपल्या शरीरात वेगवेगळ्या पध्दतीने कार्य कसे करतात. त्यांचा केमीकल फार्म्युला तर पक्का असतो. त्याचप्रमाणे आईच्या उदरात ज्यावेळेस अेखादे बालक गर्भ म्हणून प्रवेश करते त्यावेळेस शरीरात कुठलीही बाहेरची गोष्ट शिरली तर ती बाहेर फेकून द्यायची हा शरीराचा निसर्गधर्म असुनही शरीर तो गर्भ बाहेर फेकत नाही, उलट ह्यागर्भाचे ते अत्यंत निगराणीने विकसीत जीव तयार होईपर्यंत संरक्षण करते. ते बाळ जेव्हा संपूर्ण तयार होते तेव्हाच स्त्रीला बाळंतवेदना सुरु होतात. आणि मग ते आईच्या उदरातून बाहेर येते. हे कसे? हे वेळापत्रक कोण बनवते? आणखीनही असे अनेक प्रश्न आहेत की ज्यांची उत्तरे शास्त्राच्या आधारे मिळू शकत नाहीत. शास्त्राचे देणे घेणे हे फक्त वस्तुस्थितीशी अथवा मानवी शरीराशी असते. आधुनिक जीवनातल्या

इतर अनेक अडचणींचे निराकारण ते करु शकत नाही. मानवी जीवनातल्या सूक्ष्म किंवा गुंतागुती समस्यांचा शोधही ते लावू शकत नाही. मुळात मानवी उत्क्रांतीच, आणि अेकूणच मानवी आयुष्याच हेतू काय? आधुनिक युगाच्या गुंत्यातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता? जे आधुनिक युग अत्यंत गोंधळलेल्या अवस्थेत आणि हिंसक बनले आहे! विश्वात संपूर्ण शांती निर्माण करण्याचा मार्ग कोणता? असे अनेक प्रश्न विचारले जावू शकतात. पण ह्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नांनादेखील शास्त्राकडे उत्तर नाही.

अर्थात आता आपणास हे माहीत झाले आहे की ही सर्व उत्तरे भौतिक जगतात नाही तर आपल्यातच सापडणार आहेत. काही वेळेस तर हे शास्त्रज्ञ अत्यंत चुकीच्या निष्कर्षापर्यंत जाऊन पोहचतात. उदा. शरीरशास्त्राच्या दृष्टीकोनातून विचार करता गुणसूत्रे ही सर्वस्वी जनन शास्त्रावर आधारित व केवळ अनुवांशिक असतात आणि आपले व्यक्तिमत्व घडविण्यात सर्वस्वी ह्या गुणसूत्रांचाच हातभार असकतो. पण मुख्य म्हणजे गुणसूत्रे ही अनुवांशिक नसतात. अेकाच आईवडिलांची अगदी अेकाचवेळी जन्माला आलेली मुले ही अनेकवेळा अगदी वेगवेगळ्या चारित्र्यांची, वेगवेगळ्या वर्तनाची असलेली आपण पहातोच. अनेक आईवडिल खूप चांगले असून त्यांची मुले आपण विघडलेली पाहतो. तर जे पालक मघपी असतात त्यांची मुले मद्याचा द्वेष करत असतात.

आता आपण ही गुणसूत्रे आपल्या पेशीत कशी ठेवली जातात ते पाहू यात! ज्यावेळेस स्त्री बीज आणि पुरुषबीज यांचे मीलन होते तेव्हा त्याचे रुपांतर गर्भात होते. प्रत्येक पेशीच्या चार अवस्था असतात. १ २ ३ ४

प्रत्येक मानवी पेशीत ४६ गुणसूत्रे असतात. ह्यात दोन प्रकार असतात. ४४ अेकसारखी आणि २ लिंगभेदाची ओळख देणारी निर्णायक गुणसूत्रे असतात त्याना द आणि ध असे म्हणतात जेव्हा २द असतात तेव्हा स्त्री आणि दध म्हणजे पुरुष. स्त्री बिजांपासून २२ आणि पुरुष बीजापासून २२ अशी गुणसूत्रे मिळतात. ते जेव्हा अेकमेकांना मिळतात तेव्हा अक्षरशः सुईच्या टोकाच्या आकाराचे असतात. नंतर ते गर्भात वाढू लागतात. त्याच्यात पेशी निर्माण होवू लागतात. ह्या गुणसूत्रातच लाखो जीन्स असतात आणि त्यात करोडो डी.एन.ए. असतात. म्हणजे डेक्सीरिबो न्युकलिक ॲसीड. जणू तो प्रत्येक जीवनाचा ग्रुप क्रमांक कअसतो. हे डी.अेन.अे. तीन घटकांचे अेकत्रीकरण असते. नायट्रोजेन, फॉस्फेट आणि शुगर(साखर) त्यात नायट्रोजेन चे चार प्रकार असतात. हे जीन्स वळणदार धाग्यासारखे असतात. आणि ते अेकमेकांना घट्ट धरुन ठेवतात.

आपल्या अगदी सुरवातीच्या पालनपोषणास अत्यंत आवश्यक असलेली साखर सुरवातीपासूनच गुणसूत्रात असते. साखरेचे हे कण कार्बन, हायड्रोजन आणि ऑक्सिजन

ह्यापासून बनलेले असतात. कार्बन हे पृथ्वीच्या पोटात असते. हायड्रोजन, ऑक्सिजन पाण्यातून मिळते. म्हणजेच उत्क्रांतीची पहिली पायरी. हायड्रोजन+ऑक्सिजन

पाणी + कार्बन = कार्बोहायड्रेटस नंतर नायट्रोजन ह्यात अल्क–आम्ल ह्याद्वारे घ्या. कार्बोहायड्रेटसना येऊन मिळते.

थोडक्यात ही क्ष य ज्ञ तीन घटकांची मिळून बनली असते ओणि जेव्हा हे तीन घटक आपली स्थिती बदलतात तेव्हा पेशीच्या अंतर्गत बदल होऊन माणसाचा स्वभावही वेगळा होतो. असे असताना जीन्स अनुवंशिक असतात. ह्या निष्कर्षापर्यंत पोहचणे हे फारच धोकादायक आहे. कारण तसे म्हणणे म्हणजे कुण्याही दुष्ट, पापी आणि गुन्हेगार प्रवृत्तीच्या माणसाला आपली सुटका करुन घेता येईल. अशा प्रकारे कोणत्याही धार्मिक घोटाळ्यांचा सूत्रधार असणाऱ्या आणि धर्मग्रंथांच्या विरुध्द पापाचरण करावयास शिकवणाऱ्या काही लोकांना तर ही गोष्ट खूपच फायद्याची ठरेल. हा अशास्त्रीय निष्कर्ष कुठल्याही धार्मिक किंवा संयुक्त कायद्याला सहजतेने रद्द करावयासही कारणीभूत होवू शकेल. धर्मावर आणि नैतिकतेवर शास्त्राने खूप मोठा विजय मिळवला आहे असे कुणाही शास्त्रज्ञाला खुशाल जाहीर करु देत पण वस्तुस्थिती अगदी वेगळीच आहे. खर म्हणजे मूळ जीन्सचा पाया फॉस्फेट, नायट्रोजन आणि कार्बोहायड्रेट आहे. पेशीमधले पाणी जेव्हा वाळायला लागते तेव्हा फॉस्फेट अेकदम खदखदू लागते आणि व्यक्ती हिंसक बनते. अेखाद्या सालस माणसाला अेकदम प्राणघातक बनविण्याचे कामही कार्बोदकच करु शकते. अुजव्या बाजूने चालणारे लोक टोकाचे छळीक बनू शकतात तर वाममार्गी मवाळ बनतात. नैट्रोजन समतोल राखण्याचा प्रयत्न करते. आणि जेव्हा आतील शक्ती ह्या नैट्रोजनला जेव्हा बाहेर टाकते, पेशीच्या बाहेर टाकते. तेव्हा अेक नवाच उत्क्रांत आकार धारण केला जातो(ह्याचा विचार आपण नंतर करु)

आणखीनही दुसऱ्या अेका मार्गाने ह्या समस्येचा उलगडा करुन घेता येवू शकेल. प्रत्येक पेशीला अेक आधार असतो. आणि सूक्ष्म, सखोल विचार करायला तर ह्या सर्वांच्या मागे अेक उत्तमप्रकारे यंत्रणा असते. रिमोट कंट्रोलच्या आधारे पाठीच्या कण्यातून ती कार्यरत असते. त्याच्या ७ साखळ्या असतात. धर्म ग्रंथात ह्यालाच आत्मा (SOUL)असे संबोधिले आहे.हा आत्माच आपल्या चांगल्या वागणूकीवर व रिगसतेवर अंकुश ठेवूनअसतो. योग्यता आणि चांगुलपणा ह्याचे संरक्षणही हाच आत्मा करत असतो. आपल्याला सर्वनाशापासून वाचविणारा हा आत्माच असतो. आणि हाच आत्मा पेशीच्या आधाराद्वारे पेशींमधले वातावरण व्यवस्थित ठेवण्यात गुंतलेला असतो. जेव्हा व्यक्तीच्या चुकीच्या वर्तनाद्वारे ह्या आत्म्याला आव्हान दिले जाते तेव्हा त्याचा परिणाम पेशींच्या आधारावर होतो.आणि मग अपरिहार्यपणे ऊछ.अ.मधली पेशींची मूळ रचनाही बदलू शकते. म्हणूनच जे खूप प्रयत्नाने मिळवले असते

असेच काहीसे माणसाच्या स्वभावातले जीन्समुळे ओळखता येते. अगदी जी पायाभूत गुणसूत्रे जी शरीररचनेच्या दृष्टीने महत्वाची असतात ती देखील बदलू शकतात. ब्राईलर चिकन किंवा काबस्टीक्स् मध्ये हे लक्षात येईल. मानवी शरीरात देखील भावनिक, मानसिक व शारीरिक हालचालीने हा बदल शक्य होवू शकतो. ही जीन्स फारच थोड्या प्रमाणात अनुवांशिक असतात आणि जन्माच्या अगोदर आईवडिलांमुळे त्याच्या रचनेत बदल होवू शकतो. पण सध्याच्या आधुनिक युगात आपल्या रोजच्या जीवनात पेशीचे आंतरिक वातावरण मात्र अवश्य बिघडू शकते आणि हा अडथळा मानवी स्वभाव दर्शविणारी मूळ रचना मग भले ती जीन्समुळे, अनुवांशिक अथवा माणसाने प्रयत्नपूर्वक मिळवलेली असो. ती बदलू शकते.

जर अेखाद्या धार्मिक नेत्याला, अेखाद्या माणसाला अध्यात्मिक धर्माचा जाहीरनामा काढून त्याला शहाणा, दयाळू आणि समतोल बनविणे किती महत्वाचे आहे हे चांगले माहीत असेल तर काही वाईट गोष्टींच्यामुळेच चांगली सामान्य माणसे, आणि सखोल सत्यशोधक बनू शकतील. पण धार्मिक घोटाळ्याचे नेतृत्व करणारे हे लोक अध्यात्मिक वृत्तीचे नसून फक्त सत्तालोलुप आणि धनलोलुप असतात. ते माणसाच्या अज्ञानी मनात कोणतेही जहर ओतून त्यांना नरकाचा मार्ग दाखवू शकतात.

आपण जर संधीच्या फायदा विचारात घेतला तर उत्क्रांतीमध्ये 'माणूस' ह्या पातळीवर येण्यास फारच थोडा वेळ लागला आहे असे लक्षात येईल. ह्या उत्क्रांतीची कल्पना अनेकमजली, अनेक स्तरीय अवकाशयानाच्या कॅप्सूलशी करता येते. ज्यावेळेस हे यान सगळ्या आतल्या रचनेसह जमीनीवरुन उड्डाण करते. अत्यंत वेगाने ते उडते. थोड्या वेळाने त्यात स्फोट घडत जातात. वेगात भर पडत जाते. जळलेले भाग मागे टाकत अवकाशयान पुढे जातच रहाते. अगदी ह्याच पध्दतीने उत्क्रांतीने माणसाने ह्या पातळी पर्यंतचा प्रवास केलेला आहे. पहिली शारिरीक पातळी, नंतर मानसिक भावनिक पातळी, अध्यात्मिक पातळी माणसामध्ये जागृती आणण्यास मदत करते. हे आता लोकांच्या लक्षात आले आहे आणि अध्यात्मिक शोध सुरु झाला आहे. ह्या सर्व सुधारणा शेवटी मानवी मनाच्या आत होत असतात.

स्वतःच्या शोधाच्या ह्या ६ जाणीवा सहजयोगाद्वारे सहज मिळवता येतात. कारण तेथे आम्ही आत्म्याबद्दल खूप जागृत असतो. आम्ही स्वतःबद्दलचे हे ज्ञान कुंडलिनीच्या द्वारे मिळवतो आणि तिथून परेश्वर शोधाचा प्रवास सुरु होतो. कारण स्वतःला जाणून घेतल्याखेरीज परमेश्वराच्या अस्तित्वाचा शोध लागणे कठीणच आहे.

खरी गोष्ट अशी आहे मानवी शरीरातल्या माकडहाडापाशी व्यक्त न झालेली सुप्तावस्थेत असलेली शक्ती असते तिलाच कुंडलिनी म्हणतात.उत्क्रांतीच्या जडणघडणीची ती अेक सुप्त आंतरशक्ती आहे.अस्ताव्यस्त झालेल्या जीन्सना योग्य जागी आणणे आणि त्याचे




संगोपन करणे ही ताकद तिच्याठायी असते. मग ते मिळवलेले असो. अथवा अनुवांशिक असो. जेव्हा ती जागृत होते तेव्हा ती ह्या जीन्सची रचना बदलून टाकते. ती फक्त ही रचनाच बदलत असते. नव्हे तर ती माकडहाडापासून बाहेर पडते आणि शोधकांचा सर्वशक्तिमान अशा दैवी प्रेमाशी संबंध जोडते. तिला 'पवित्र भुताची शीतल लहर, रुथ, ऋतंभरा, किंवा परम चैतन्य ह्या नावांनीही संबोधले जाते. म्हणजे बाप्तीस्मा झाल्यावर माणसाला जसे वास्तवज्ञान झाले पाहिजे. तसे माणसाच्या ह्या दुसऱ्या जन्मानंतर तो मुक्तात्मा बनतो. साहजिकच सर्व शक्तिमान परमेश्वराचे प्रतिबिंब असणाऱ्या आत्म्याच्या दिव्य प्रकाशाचा आपल्या जाणीवीत प्रवेश होतो आणि आपले जीवन झगमगून उठते. खऱ्या अर्थाने साधकाचा पुर्नजन्म होतो त्याच्यात आमुलाग्र बदल होतो. जणू त्याने आपल्या चेहऱ्यावर अेखादा दुसरा मुखवटाच चढवावा.! खरोखर सर्वसामान्य साधक आणि मुक्तात्मा योगी ह्या दोघांमध्ये अगदी जमीन अस्मानाचा फरक आहे.

तो स्वतःच स्वतःचा गुरु बनतो. दैवी प्रेमाचा संपूर्ण अंगीकार करतो. अेखाद्या अंड्याचे सुंदर पक्षात रुपांतर व्हावे. तशीच जणू ही पुनरुध्दाराची पध्दत असते. मला अंड्याचेच उदाहरण का आठवले ते अेक प्रतीक असावे. ज्यायोगे अेखाद्याला आपल्या पुनरुध्दाराची आठवण व्हावी. जीन्स बदलतात आणि त्याची जागा दुसराच मुखवटा घेतो. संपूर्ण बदल! जी माणसे आजारी असतात किंवा अहंकारी असतात त्यांच्यात हा बदल होण्यास वेळ लागतो. आणखीन्

ज्यांच्या मनात अपराधीपणाची भावना असते किंवा जे दुसऱ्यांना क्षमा करु शकत नाहीत त्यांनाही आपल्या स्वतःच्या उध्दारात काही अडचणी निर्माण होवू शकतात. भोंदू साधूंकडून किंवा चित्रविचित्र, कर्मठ लोकांकडून जर त्यांना काही अडचणी आल्या तरीही वेळ लागू शकतो. तरीही ते सहजयोगामध्ये सहजतेने होवू शकतात. काही लोकांनी अेका रात्रीत मादक पदार्थाच्या आपल्या सवयी सोडल्या आहेत. त्यांच्यात अेकाअेकी व्यसन सोडल्यामुळे होणाऱ्या त्रासाचा मागमूसही आढळत नाही. कुंडलिनी जागृत करुन स्वमुक्ती करणे ह्याचा खूप चांगला परिणाम नेहमीच दिसून येतो. ही जागृत कुंडलिनी अेक नवीनच रचनात्मक शक्ती निर्माण करते, त्यातले काही कवी बनले, काही संगीतकार बनले आणि काही कलाकार. त्या सर्वांनी त्या त्या क्षेत्रातली उच्चतम बुद्धिमत्ताही मिळवली. लोकांचे आर्थिक प्रश्न सोडवले जातात. भावनिक आजार बरे होतात. अगदी कॅन्सरससारखे दुर्धर रोगही नाहीसे होतात. इतरही अनेक दुर्धर रोग कुठल्याही तऱ्हेचे औषधोपचार न करता बरे होतात. साधक जीवननाटयाचा साक्षीदार बनतो.अेक प्रकारची आंतरिक शांतता मिळवतो. तो सर्व धर्मांचा आदर करतो आणि विश्वातल्या सर्व धर्मांना व्यापून उरलेल्या विश्वधर्माचा तो असतो. त्याच्यात नैतिकता ही महत्वाची आणि उत्स्फूर्त भाग बनून जाते त्याच्यात असे संपूर्ण परिवर्तन झाल्यावर कोणतीही अनैतिक गोष्ट करण्यास तो नाखूष असतो. अध्यातमाच्या दिव्य प्रकाशात त्याला काय योग्य काय अयोग्य, हे अगदी बरोबर दिसते. त्याच बरोबर तो अत्यंत स्वच्छ आणि पवित्र राहण्यास समर्थ बनतो. कारण त्याने जे जे काही विनाशक, विध्वसंक असते त्याचा त्याग केलेला असतो. तो त्याच्या आदरास कारणीभूत झालेल्या जीवनमुल्यांचा, सद्‌गुणांचा आनंद घेवू शकतो आणि शेवटी तो संशयातीत असा सद्‌गुणी माणूस बनतो. म्हणजे तो प्रथम विचारहीन जागृती मिळवक्तो आणि नंतर त्याच्या ठायी संशयातीत जागृती निर्माण होते. ह्या ठिकाणी पोहचलेला सहजयोगी दुसऱ्यांना मुक्ती देवू शकतो. त्याच्यावर वयाचा परिणाम दिसून येत नाही. उलटपक्षी सहजयोगी कमीत कमी २० वर्षांनी लहान दिसू लागतो. त्यांचे अस्तित्व विश्वात्मक बनते आणि लोभ, मोह, क्रोध, मत्सर, मद, माया हे मानवाचे सर्व शत्रु दिसेनासे होतात आणि अर्थातच मग संताचा अेक असा वंश तयार होतो की ज्यांना आपली तपश्चर्या किंवा विरागी वृत्ती दाखविण्यासाठी, कशाचाच त्याग करावा लागत नाही.

ज्या गोष्टीची, म्हणजे दैवी प्रेमाची, जे खरे अंतिम सत्य आहे. आपण कल्पनाही करु शकत नाही ती गोष्ट सहजयोगी हाताच्या बोटांनी अनभवू शकतात. जणू पवित्र भुताच्या होलीघोस्ट शीतल लहरीने उठवलेले सुखद तरंग.! हाताची बोटे ही शक्तिस्थानाशी, चक्राशी संबधीत असतात. हीच चक्रे आपल्या शारीरिक, भावनिक मानसिक घडामोडींना कारणीभूत ठरत असतात. जर हे योगी स्वतःची चक्रे सुधारु शकतात. तर त्यांना दुसऱ्यांच्या चक्रामध्येही

सुधारणा करता यायला हवी,म्हणजे मग सर्वच शारीरिक, मानसिक भावनिक अडचणी दूर होवू शकतात. जे लोक शुध्द चारित्र्याचे असतात त्यांच्यांत, त्यांच्या नैतिक जीवनात आपोआपच समतोल साधलेला असतो. त्यामुळे सुषुम्ना नाडी विस्तृत होवून कुंडलिनीच्या जागृतीला हातभार लागू शकतो.

ह्या प्रकरणात आता आपण प्रत्येक मानवी शरीरात अस्तित्वात असलेल्या अेका सूक्ष्म प्रणालीचा विचार करणार आहोत. प्रत्येकाच्या शरीरात अस्तित्वात असलेल्या ह्या प्रणालीची उत्क्रांतीच्या प्रवासात चांगलीच प्रगती झालेली. अर्थात हा प्रवास मानवी उध्दाराच्या दिशेनेच होत आहे हे नक्की.! उदाहरणार्थ प्राण्यामध्ये पाप, घाण, अश्लील भाषा, कला, कविता ह्या कुठल्याच गोष्टीची जाणीव असलेली दिसत नाही. पण मानवामध्ये मात्र जेव्हा आपण मासे, प्राणी पक्षी ह्यांचे सौंदर्य न्याहळतो, त्याचा आनंद घेतो तेव्हा त्याच्यात ह्या भावनाशीलतेचे प्रदर्शन अत्यंत स्वच्छपणे होत असते. खरच, हे मानवेतर प्राणी कधी आपल्यातले सौंदर्य न्याहळत असतील? ह्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला ह्या पध्दतीने देता येईल की मानव जात ही ह्या उत्क्रांतीच्या प्रवासात, इतर सर्व प्राण्यापेक्षा खूप वरच्या टोकावर पेहोचली आहे. म्हणून आपण त्या सर्वांची खूप काळजी घेतो. आपण पक्षांवर प्रेम करतो. माशांच्या जलक्रीडा आपणास आनंद देतात. पण ह्यातली सगळ्यात महत्वाची आणि उत्तम गोष्ट म्हणजे आपण आपल्या स्वतःवर प्रेम करतो. आपल्या स्वतःचा आदर करतो. म्हणून आपण आपले शरीर स्वच्छ करतो. मन शुध्द ठेवण्याचा प्रयत्न करु शकतो आणि आपले हृदय मोकळे, पारदर्शी ठेवू इच्छितो. उत्क्रांतीच्या ह्या प्रवासत आपण सर्वोच्चस्थानी आहोत. त्यामुळे जगाच्या सर्वोच्च स्थानावर विराजमान झालेल्या ह्या मानवजातीचा स्वतःचा उध्दार करुन घेणे हा जन्मसिध्द अधिकारच आहे.

आपण आता फ्राईड, सात्र सारख्या लेखकांचे आभार मानणे थांबविले पाहिजे. कारण त्यांच्यामुळेच आपण मानवी जीवन, लैंगिकता ह्या अेकमेव बिन्दूइतके संकुचित केले आहे आणि हे जीवन तर पशूतुल्य, नव्हे तर त्याहूनही बदतर आहे. त्यामुळे अत्यंत वाईट, संसर्गजन्य रोगाला निमंत्रण देण्यासारखे होते. मला खात्री आहे की ह्या विकृत लैंगिकतेच्या पेशी कुठल्याही जनावरात आढळल्या तर ते जनावरही नक्की विकृत वागेल. हा रोग आता पाश्चिमात्य देशात इतका फैलावला आहे की ह्या शतकाच्या अखेरीस आपल्या मनात विध्वंसांची पूजा करण्याचा हा नवा मार्ग दाखविणाऱ्या ह्या नव्या साधूजनांचे पुतळे निर्माण झाले असतील. ज्या गोष्टी आपल्या आत्मउध्दाराच्या मार्गातल्या निरुपयोगी गोष्टी म्हणून आपण खरे म्हणजे सोडून द्यायला हव्यात. त्याच गोष्टी आपल्या समाजाने अत्यंत महान गोष्टी म्हणून स्वीकारल्या आहेत.

आता मी जे काही तुम्हाला सांगत आहे त्याचा तुम्ही आंधळेपणाने स्वीकार करावा, असे माझे मुळीच म्हणणे नाही. तर त्याचा तार्किकतेच्या कसोटीवर विचार करा. माझी परत परत तुम्हाला अेकच विनंती आहे की तुमचे मन तुम्ही अेखाद्या शास्त्रज्ञासारखे खुले ठेवा. जे काही मी सांगत आहे ते नंतर तुम्हाला पटले तर मात्र अत्यंत प्रामाणिकपणे मनावर घ्या. आत्मशोधाच्या संदर्भातल्या अतिशय चांगल्या विचाराचा स्वीकार तुम्हाला करावाच लागेल. कारण ही गोष्ट तुमच्या फायद्याची, तुमच्या उध्दारासाठीच आहे. तुमच्या आणि तुमच्या कुटुंबाच्या, तुमच्या समाजाच्या आणि पर्यायाने तुमच्या देशाच्या, इतकेच नव्हे तर सर्व जगाच्या फायद्याची ही गोष्ट आहे.

जे सिध्दांत सध्याच्या शास्त्रीय निष्कर्षाद्वारे किंवा मानसिक नकाशाद्वारे काढले गेले आहेत. ते कोणत्याच अर्थाने आंतरिक सत्याच्या जवळपास देखील पोचणारे नाहीत. ज्याला अंतिम सत्य जाणून घ्यायचे आहे, त्याला मनाच्या पार पलीकडे अस्तित्वात असलेल्या, तत्वज्ञानाच्या राज्यात प्रवेश करणे गरजेचे आहे आणि हे तेव्हाच शक्य आहे. जेव्हा आपण आतमउध्दाराच्या सामूहिकतेद्वारे मनाच्यावर प्रवेश करतो.

## मन हे भ्रामक आहे तर मेंदू सत्य.!




ह्या आकृतीचा विचार केला तर ही दैवी ताकद मेंदूतून वहात असते. गर्भधारणेच्या अगदी प्रथम क्षणापासून ती तिथे असतेच. माणसाचा मेंदू हा अेखाद्या टोकदार त्रिशंकू सारखा असतो. तर जनावराच्या मेंदूचा आकार मात्र काहीसा सपाट असतो. तर ही दैवी शक्ती मेंदूच्या द्विस्तरीय भागातून वक्रीभूत होत बाहेर पडते. ही आर शक्ती एकमेकांना छेदते.

# ११

# गूढरचना

आपल्या शरीरातल्या त्रिकोणी हाडामध्ये, ज्याला माकडहाड असे म्हटले जाते, अत्यंत शुध्द अशी इच्छाशक्ती सुप्त स्वरुपात स्थित असते. माकडहाडाला ग्रीक भाषेत sacrum असे म्हणतात. त्याचा अर्थ ते ह्या हाडामधले पावित्र्याबद्दल ते जाणून होते. त्याच शक्तीला संस्कृतमध्ये कुंडलिनी ह्या नावाने ओळखले जाते.

आता, मला असे अगदी नम्रपणे म्हणावेसे वाटते, की कुणीही हे ज्ञान, केवळ भारतासारख्या विकसनशील(पाश्चिमात्य लोकांच्या भाषेत) देशातून आलेले आहे. म्हणून दुर्लक्ष करु नये. बाह्याकारी शास्त्राच्या दृष्टीने विचार केला तर पाश्चिमात्य संस्कृती खूप पुढारली आहे. पाश्चिमात्य संस्कृति अेखाद्या प्रचंड वृक्षासारखी फैलावली आहे. पण प्रत्येकाला त्याच्या मुळाशी जायलाच हवे ना, जर त्याची मुळे भारतात, किंवा इतर कुठल्या देशात असली तर तसे मान्य करावयास काय बरे हरकत आहे. झाडं मुळाखेरीज वाढू शकत नाही आणि पडायला आलेल्या झाडाची नीट निगराणी केली नाही तर त्या मुळांना तरी काय अर्थ आहे.

ही शुध्द इच्छा शक्ती साडेतीन वेटोळ्यात गुंडाळली गेली असते. ह्या वेटोळ्यांना संस्कृतमध्ये कुंडल असे संबोधतात. आणि शक्ती ही स्त्रीलिंगी असल्यांने तिला कुंडलिनी असेच संबोधले गेले. ही कुंडलिनी अेखाद्या प्रिमरोज सारखी माकडहाडात बसलेली असते. ती जेव्हा जागृत होते तेव्हा ती सहा चक्रातून जाते. ही चक्रे आपल्या पाठीच्या कण्यातली शक्ती स्थाने असतात. आणि माकडहाडावर ती अेखाद्या कमानीसारखी असतात(आकृती सगळ्यात शेवटी) आपल्याला सत्य स्वीकारायलाच हवे ते अगदी स्पष्ट आहे, आणि ते आपण म्हणजे हे शरीर नाही, हे मन नाही, ह्या भावना ही बुद्धिमत्ता, हा अहंकार आपण ह्या सगळ्यांच्या पलीकडे असतो आणि तो म्हणजे आत्मा.!

मला हे सांगितले पाहिजे हे ज्ञान ही जाणीव सहजयोगाद्वारेच साध्य होते. अर्थात अजूनही कोणी कोणी मानसिक पातळीवरच आहेत. कारण ते अशा संतांनी लिहिलेली पुस्तके वाचतात. जे स्वतः मुक्त साधू नसतात. हे लोक संपूर्णपणे शब्दजाळ्यात अडकतात. ते सर्वप्रकारचे उपासतापास करतात,वैराग्य स्वीकारतात. ते सर्व समाजाचा, कुटुंबाचा त्याग करतात. आणि प्रसिध्द व्यक्ती होण्याचा प्रयत्न करतात, हे सर्व अत्यंत अनैसर्गिक आहे.

ह्या लोकांपैकी बरेचसे बरेचसे पैशाच्या मागे लागलेले असतात. त्यांच्या स्वतःच्या संस्था असतात. जिथे सर्व चुकीच्या गोष्टी शिकवल्या जातात. काहींनी तर स्वीझर्लंड मध्ये माझ्या नावे सहजयोगकेंद्र उघडून पैसे लुबाडण्यास सुरवात केली आहे. पण अेखादी गोष्ट तुम्हाला पैसा खर्च न करता मिळायला हवी, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. पहिल्यांदा तुम्हाला आत्ममुक्तीचा अनुभव येणे, किंवा त्याची सत्यता पटणे आवश्यक आहे. पवित्र आत्म्याची शीतल लहर बोटांना जाणवायला हवी. मानसिक व शारीरिक आजार पूर्ण बरे व्हायला हवेत. दुसऱ्यांना मुक्ती देण्याचे सामर्थ्य स्वतःत यायला हवे. आपल्या आणि दुसऱ्यांच्याही चक्रांमध्ये काय बिघडले आहे हे लक्षात यायला हवे व दोन्ही बाबतीत त्यांची सुधारणाही करता यायला हवी. ढोंगी बाबांकडून निर्माण झालेल्या समस्या नाहीशा होणे आवश्यक आहे. आर्थिक परीस्थितीत कमालीचा बदल घडावयास हवा. आंतरबाह्य कमालीची शांतता अनुभवायला हवी. सहजयोगात झालेली ९५ टक्के लग्न अत्यंत यशस्वी झाली असून मुले अतिशय सज्जन आहेत.

अेक आणखी सत्य आहे ते स्वीकारायलाच हवे. की सर्व जीवित सृष्टी चालवणारी अेक दैवी शक्ती अस्थीत्वात आहे. जगण्याची क्रिया मुक्तीच्या अनुभवानंतर लक्षात येते. अत्यंत उत्स्फूर्तपणे अेकाअेकी कुंडलिनी जागृत होते आणि माकडहाडाचा भाग विंधून ती बाहेर पडते. आपल्या हृदयात प्रतिबिंबित होणारा आत्मा दीप्यमान होतो आणि आपल्या जाणीवाही लखलखीत होतात. आपण पाहू शकतो की आत्म्याचा हा प्रकाश आपल्या जाणीवांच्या प्रदेशात सर्व दूर पसरलेला आहे. हे सर्व खूप अचानक, अेकाअेकी होते. अेक सुखद, शीतल लहर आपल्या बोटांच्या टोकाला जाणवते आणि तीच लहर माकडहाडापाशीही अनुभवास येते. ह्या सुखद लहरीला अनेक नावांनी संबोधण्यात येते. पण नावाचा काथ्याकुट करण्याची गरज आहे असे मला तरी वाटत नाही.

सध्याच्या आधुनिक युगात, आपल्याला आपल्या स्वतःतच पराकोटीची शांतता लाभू शकते हे लोकांना समजावून सांगणे, पटवून देणे ही कमालीची अवघड गोष्ट आहे. मानवी मन, आधुनिक युगातले मानवी मन हे कमालीचे गुंतागुतीचे बनले आहे आणि केवळ वस्तुनिष्ठतेच्या द्वारेच आधुनिक युगातील अडचणींवर मात करता येते अशी त्यांची भ्रामक

कल्पना आहे आणि हे गैरसमज त्यांना शुध्द सत्याच्या कल्पनेच्या जवळपासही पोहचू देत नाही. विशेषतः अत्यंत हुषार, बुध्दीमान शास्त्रज्ञांच्या बाबतीत ही गोष्ट सदैव घडते.

त्यातुन अेखाद्या सेमीनारमध्ये अथवा आंतरराष्ट्रीय सभेत ते असं काहीच बोलायला तयार नसतात की ज्यात काही विरोधी मते नोंदवली जातील अथवा काही चर्चा, वादसंवाद होवू शकेल.आणि जे लोक विरोधासाठीच जगत असतात, विरोध करण्याचा आनंद घेत असतात. त्यांना हे पटणे शक्यच नसते. उदाहरणार्थ, अेकदा जेव्हा मी पॅरीसला अगदी पहिल्यांदाच गेले होते आणि लोकांना आंतरिक आनंदाच्या संदर्भात भाषण देत होते. त्यातल्या प्रत्येकानी मला अशी ताकीद दिली की मी अत्यंत आनंदी आणि उल्हासित दिसत आहे आणि अश्या प्रकारचा चेहरा किंवा असा दृष्टीकोण फ्रान्समधले विद्वान कधीच स्वीकारणार नाहीत कारण ते असे अनुमान करतील मी अत्यंत अडाणी आहे. म्हणूनच मी आनंदी दिसते आणि जर मला जीवन म्हणजे काय हे कळले असले तर मी अत्यंत गंभीर व व्यक्ती म्हणून दिसावयास हवी. मला हे कळतच नाही, की फ्रेन्च माणसे दीन असतात ही नवी प्रतिमा आपल्याबाबत ह्या लोकांनी कशी निर्माण केली आहे. ह्या फ्रेन्चांना वाटते की आपण विशेष काहीतरी आहोत आणि त्याची 'बाथरुम संस्कृती' ही उच्च दर्जाची संस्कृती आहे. त्यांच्या अत्यंत भिकार जीवनशैलीमुळे त्यांनी मद्याच्या साह्याने स्वतःला आणि इतरांनाही दीन बनविले आहे.

जेव्हा मी माझे भाषण सुरु करीत असे तेव्हा प्रेक्षकांना मी लेस मिझरेबल्स (महादुःखी ) म्हणून संबोधत असे. कारण माझ्या मते फ्रेन्च लोकांना लेस मिझरेबल्स म्हणजे त्यांच्या भावनांना हात घालण्याचा खूप सोप्पा मार्ग होय असे म्हटल्यावर मी काय बोलणार आहे हे अैकायला ते तयार झाले.मी त्यांना म्हटले पॅरिसमध्ये प्रत्येक दहाव्या दिव्याच्या खांबापाशी तुम्हाला मद्यपी लोक बसलेले आढळतील. तेथे बसून ते जगाच्या शेवटाचा विचार करत असतात. तसे घडणारच आहे ह्यात शंकाच नाही. जर प्रत्येक १०व्या खांबापाशी तुमच्याकडे दारुचे गुत्ते असतील, प्रत्येक दुसऱ्या किंवा तिसऱ्या खांबापाशी वेश्या उभ्या असतील तर मग अश्या लोकांचे दुसरे काय होणार ? सूर्यास्त झाल्या झाल्या, इतकेच नव्हे तर काही जण तर सूर्योदयाबरोबरच प्यायला सुरवात कर तात आणि त्या दारुच्या धुंदीत आपण दीन आहोत असे बडबडत राहतात?

अेकदा आम्ही हॉवरक्रॉफ्टने लंडनहून पॅरीसला जात होतो. आम्ही आमचा प्रवास मोटारीने कॅले येथून सुरु कला. थोड्या वेळाने आम्ही पाहिले की सात सव्वासातच वाजले होते पण रस्त्यावरची घरे बन्द होती. आम्ही रस्ता चुकलो होतो म्हणून ज्या घरात उजेड दिसत होता तिथे आम्ही दारे ठोठावली. त्या प्रत्येक घरातून अेखादा पुरुष किंवा स्त्री

पुढल्या दाराशी आमचे ठोठावणे अैकून येत पण ते इतके प्यायलेल्या अवस्थेत असत शेवटी आम्ही विचार केला की अेखाद्या पब मध्येच जाअून विचारणा केलेली बरी. पण त्या खेड्यातला गुत्ता कुठे आहे हेही त्यांना सांगता येईना. रात्री ९ नंतर त्या भागातील लोकांशी साधे बोलणे हे देखील अत्यंत अवघड होअून बसते. आणि तो भाग म्हणजे फ्रान्समधला सगळ्यात फॅशनेबल भाग मानला जातो.

दुसरीकडे, विद्वतजन, महाजन अेका वेगळ्याच नशेत चूर असतात. ते इतके बनचुके झालेले असतात की दैवी शक्तीचे नाव देखील त्यांच्यापुढे काढता येत नाही. पाश्चिमात्य लोकांचा विचार करता, ते जुगार, पिणे, स्त्रीलंपटपणा ह्यातच आपला जास्तीत जास्त वेळ घालवत असतात, तर तिथल्या स्त्रिया अगदी वयाच्या सत्तराव्या वर्षीदेखील जास्तीत जास्त आकर्षक दिसून, पुरुषांना घायाळ करण्याच्या प्रयत्नात असतात. जणू अेखाद्या वेश्येला जगण्याचा व्यवसाय म्हणून तसे करावयास भाग पडावे.

कोणालाच कुणाबद्दलच आदर नसलेल्या अश्या ह्या समाजात दैवी शक्तीबद्दल बोलण्याची संधी मिळणे देखील कठीण गोष्ट आहे. तरी देखील आपल्याला हेही कबूल करावे लागेल की ह्या विकृत संस्कृतीचा परिणाम म्हणून लोक काहीशा गोंधळलेल्या अवस्थेत आहेत. आणि ह्या संस्कृतीविरुध्द काहीतरी करु इच्छित आहेत. तरुण पिढी विनाशाच्या मार्गाचाच अवलंब करीत आहे. अनेकांनी असा विनाश ओढवून घेतल्यावर सरतेशेवटी ते भोंदूबाबाच्या किंवा अेखाद्या अघोरी मार्गाच्या भजनी लागलेले दिसून येतात. धार्मिकतेकडून, भोंदूबाबाकडे( जे फक्त पैशासाठी हपापलेले असतात.) असा त्यांचा प्रवास असतो आणि शांतीच्या शोधात निघालेल्या ह्या लोकांचे शेवटी आर्थिक आणि मानसिक दृष्ट्याही दिवाळेच निघते.

ही तरुण मुले कायम अस्थिर, उत्तेजित अवस्थेत असतात. त्यांना सतत काहीतरी उत्तेजक असा खेळ खेळावयास आवडतो. ज्यायोगे त्यांना मानसिक धक्का बसू शकेल, त्यांचे हे वागणेही तसे विचारपूर्वकच असते. जणू त्यांचा वास्तवतेपासून दूर पळण्याचा आणि भ्रामक कृत्रिम जगात प्रवेश करण्याचाच प्रयत्न चालू असतो. त्यातून, असेही वर्णन केले जाते की सध्याचा काळ हा सगळ्यात वाईट काळ आहे, हे कलीयुग चालू आहे तेव्हा लोक भ्रमात, आणि गैरसमजात जगत आहेत.

अशा प्रकारचा हा भ्रम अत्यंत तणावपूर्ण असतो तो मुळी लोकांना तणावमुक्त जीवन जगूच देत नाही. म्हणून जरी सत्याचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु झाली असली तरीही ह्या सर्व देशांमध्ये ईश्वराचा, ब्रह्मज्ञानाचा प्रवेश होण्यास अजून बराच कालावधी जाणे आवश्यक आहे.कारण त्यांनी स्वतःच लोकांचा प्रचंड प्रमाणात छळ केलेला आहे आणि ते स्वतःच्या

भोवताली असलेल्या परिस्थितीत कधीच समाधानी नसून सतत आहे त्यापेक्षा चांगले शोधण्याची त्याची धडपड चालू असते.

हे शोधक जगात सर्वत्र आहेत. त्यांचा मानसिक शांतीचा शोध चालूच आहे. अशा लोकांसाठी अेक चांगली बातमी आहे की अेका अशा दुर्मिळ गोष्टीचा शोध लागलेला आहे की ज्यायोगे अेखादी व्यक्ति आंतरिक समाधान नक्कीच मिळवू शकेल. अर्थात त्यासाठी त्याला मनाच्याही पार पलीकडे जावे लागेल. पूर्वेला, विशेषतः भारतात ह्या गोष्टीची जाणीव खूप काळपासून आहे. त्याचप्रमाणे पश्चिमेकडील काही त्रिकाळज्ञानी पंडितांनाही, स्वमुक्ती मिळवून देणाऱ्या ह्या ज्ञानाची माहिती होती. इंग्लंडमध्ये विल्यम ब्लेक, फ्रान्समधील मोलियर, डी मोपासो, सी.अेस.ल्युईस सारखे अनेक कवी आणि अमेरिकेतील काही मोजक्या लोकांनी भविष्यात मानवी जीवनात प्रवेश करणाऱ्या ह्या ब्रह्मज्ञानाकडे अगोदरच डोकावून पाहिले होते.

अेखाद्याचा विश्वास असे, अथवा नसे पण वस्तुस्थिती अशी आहे की आपण मानवी जागृतीच्या संदर्भात अशा अेका पायरीवर येअून पोहचलो आहोत, की अंतिम सत्य म्हणजे काय हे आपणास ठाअुक नाही. ह्या अेकमेव कारणासाठी वेगवेगळ्या तत्ववेत्यांना, आदर्शवादींना आणि लोकांना वेगवेगळ्या धर्माची गरज भासते. हे धर्म आहेत असे ते समजतातआणि अेकमेकांशी भांडत बसून धर्माचे जे मूळ वेगवेगळे तत्व आहे त्याचाच सर्वनाश करतात.

आता मी जे काही सांगणार आहे, सांगत आहे ते, आंधळेपणाने लोकांनी स्वीकारण्याची मुळीच गरज नाही. अंधविश्वासापायी आपण भरपूर त्रास सहन केला आहे. परंतु जर अेखाद्याला स्वच्छ मोकळी अशी शास्त्राज्ञाची दृष्टी लाभली असेल तर माझ्या या सांगण्याकडे त्याने 'गृहीत' म्हणून पहावे. पण अेकदा का हे सिध्द झाले की त्यांनी ही गोष्ट स्वीकारायलाच हवी की उत्क्रांतीच्या ह्या प्रवासात मानवी शरीरात अेक सूक्ष्म पध्दती जरुर वास करीत आहे. मुख्य म्हणजे त्याने हे मान्य करावयास हवे की आपणास निर्माण करणारा खूप मोठा, कुशल संघटक आहे.

आपल्यामानवी देहात तीन प्रकारच्या मज्जातंतूच्या पध्दती कार्यरत असतात. अेक मुख्य मज्जासंस्था, दुसरी अनुकंपिक मज्जातंतू हिला डावी व अुजवी अशा दोन बाजू असतात आणि तिसरी अर्धअनुकंपिक मज्जासंस्था.

अनुकंपिक मज्जासंस्था ही तातडीच्या, आपत्तीच्या काळात कार्यरत होते. उदा. जर अेखाद्याने अचानक जंगलात वाघ पाहिला, तर तो अत्यंत जोरात धावू लागेल. ह्या अश्या तातडीच्या वेळी हदयाचे ठोके जलद पडू लागतात. अत्यंत जोराने पडणाऱ्या ह्या जलद

ठोक्यांचे कारण ही अनुकंपित मज्जासंस्थाच असते. पण ह्या जलद पडणाऱ्या ठोक्यांना पूर्वस्थितीवर आणण्याचे काम ह्या डाव्या व उजव्या अनुकंपित मज्जातंतूच्या मध्येच असलेली अर्धअनुकंपित मज्जासंस्था करीत असते. अर्थात वैद्यकीय शास्त्रात ह्या डव्या आणि उजव्या अनुकंपित मज्जासंस्था अेकमेकांना पूरक पण अगदी विरुध्द कार्य करीत असतात ह्या निष्कर्षापर्यंत शास्त्रज्ञ येवून पोहचले आहेत की नाही हे मला माहीत नाही. उदाहरणार्थ डावी अनुकंपित मज्जासंस्था इडा नाडी(चंद्रनाडी) नावाच्या अत्यंत सूक्ष्म वाहीनीकडून संगोपली गेली असते तर अुजवी बाजू पिंगळा नावाच्या (सूर्यनाडी) नाडीकडून.! ही इडानाडी मानवाला त्याची भावनिकता बहाल करते. माणसाच्या सुप्त मनात, ह्या इडानाडीच्या पलीकडे त्याचा भूतकाळ जतन करुन ठेवला जातो. अर्धसुप्त भूतकाळ, आजचा भूतकाळ, कालचा भूतकाळ, ह्या जीवनाचा भूतकाळ, गतजन्माचा भूतकाळ आणि सर्वात शेवटी निर्मितीच्या काळापासूनचा भूतकाळ, असा अेकत्रित भूतकाळ तेथे असतो. हे सर्व माणसाच्या मनात अेकामागून अेक आडव्या पध्दतीने रचले जाते. उभ्या पध्दतीने नव्हे आणि म्हणूनच आपल्या अेकाच प्रयत्नात हे भूतकाळ आपणास प्रचीती देत नाहीत, असे अनेक मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

दुसरी पिंगळा नाडी. शारीरिक कआणि मानसिक पातळीवर कार्य करते. म्हणजे मानवाच्या बुद्धिमत्तेवर हिचे राज्य असते. ह्या दोघींच्या मध्ये अर्ध अनुकंपित मज्जासंस्था असते. ही दोन्ही उजव्या व डाव्या मज्जासंस्थेमध्ये अडकवलेली असते. म्हणूनच जेव्हा जेव्हा अनुकंपित मज्जासंस्था आपत्काळात उत्तेजित होते. तेव्हा तेव्हा तिला पूर्वस्थितीवर आणून तिची काळजी घेण्याचे काम ही अर्ध अनुकंपित मज्जासंस्था करते आणि अेकप्रकारे अुजव्या व डाव्या अनुकंपित मज्जासंस्थेला मदत करते.

ही मध्यस्थित अर्ध अनुकंपित मज्जासंस्था,तिची काळजी सुषुम्ना नावाच्या नाडीकडून घेतली जाते. अुत्क्रांतीच्या प्रवासात आपण जे काही मिळवले आहे. जतन केले आहे. ते ह्या मज्जासंस्थेतच आहे. उदाहरणार्थ मानवजात ही जनावरांपेक्षा काही बाबतीत खूपच वरच्या दर्जाची आणि भावनाशील असते. जर अेखाद्या कुत्र्याला किंवा घोड्याला तुम्ही घाणेरड्या नाल्यातून नेलेत, तर तो नकार देणार नाही, नाराजी व्यक्त कयरणार नाही. पण माणूस मात्र बजबजपुरी, वाईट गंध ह्याबद्दलच्या जाणीव जागृत आहे तशी जागृती प्राण्यामध्ये आढळत नाही. अशा अनेक गोष्टी आहेत की ज्यात माणसांची भावनाशीलता प्राण्यापेक्षा जास्त आहे हे आपणास दाखवून देता येईल. ही भावनाशीलता मध्या मज्जासंस्थेच्या द्वारेच व्यक्त केली जाते म्हणजेच उत्क्रांतीच्या प्रवासात आपण जे जे काही मिळवले आहे. ते ह्या मध्य मज्जासंस्थेच्या द्वारेच व्यक्त होत असते.

आपल्या शरीरात माकडहाड नावाच्यात्रिकोणी हाडांमध्ये ही आणखी अेक सुप्तशक्ती वेटोळीत अवस्थेत असलेली आढळून येते. सुप्तशक्ती म्हणजे ही मूळ अवस्थेतली शक्ती असून तिचे कोणत्याही प्रकारे विभाग पाडलेले आढळून येत नाहीत. जेव्हा संपूर्ण वाढलेल्या गर्भाच्या मेंदूवर दैवीशक्तीचा प्रभाव पडतो. तेव्हा त्रिकोणी लोलकासारख्या मेंदूत तिचे तीन भाग पडतात हे केवळ वक्रीभवनामुळे घडते. जी शक्ती मेंदूच्या बाजूंवर छेदाच्या स्वरुपात पडते तिचे रुपांतर अनुकंपित मज्जासंस्थात होते. पण त्रिकोणी लोलकाच्या आकरस्वरुपात असलेल्या मेंदूच्या वरच्या टोकावर जेव्हा ही दैवीशक्ती पडते तेव्हा ही मूळशक्ती कुठल्याही प्रकारचे वक्रीभवन न घडता थेट वर्तुळाकृती प्रवास करत माकडहाडापर्यंत पोहचते तीच कुंडलिनी होय. माकडहाड हे पवित्र हाड ह्याची जाणीव बहुदा ग्रीक लोकांना असावी. म्हणूनच त्यांनी त्या हाडाला 'सॅक्रम' हे नाव दिले. ही पूर्ण मूळ साडेतीन चक्रातअसते.

अुत्क्रांतीच्या दीर्घ प्रवासात आपल्या पाठीच्या मणक्यात ७ मुख्य शक्तीकेंद्रे आपल्याला लाभलेली आहेत, अर्थात् त्यातली काही मेंदूत आहेत. जेव्हा ही चवथी वाहिनी (संस्कृतमध्ये तिला कुंडलीनी म्हणतात. अेखाद्या बीमधून सुंदर फुल निर्माण व्हावे तशी जागृत होते आणि ६ शक्तिकेंद्रांमधून जाते व शेवटी ६ व्या केंद्राला जे टाळूच्या हाडात असते(त्यालाच ब्रह्मरंध्र म्हणतात) विंधून तेथेच स्थित होते आणि मानवी जागृतीला, विश्वाला व्यापून असणाऱ्या दैवी शक्तीशी जोडण्याचे महान कार्य करते. ह्या योगात कुंडलिनी जे मिळवते ते हे! जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा ती जीन्सचा मूळ ढाचाच बदलवून टाकते आणि माणसाच्या व्यक्तिमत्वात आमूलाग्र बदल घडू शकतो. ही ६ चक्रे माणसाच्या जीन्सच्या शुध्दीकरण, संगोपन करतात आणि त्यांना लखलखीत करतात.

प्रत्येकाला आपल्या आयुष्याचे अंतिम ध्येय काय ह्याची स्पष्ट जाणीव असायला हवी. उत्क्रांतीचे शेवटचे ध्येय सर्वशक्तिमान परमेश्वराचेच जणू प्रतिबिंब असलेल्या दैवी आत्म्यात रुपांतर होणे हे आहे. अर्थात तो आपल्या ह्रदयातच वास करीत असतो हीच स्वतःची ओळख, हेच स्वतःबद्दलचे ज्ञान होय. अर्थातच व्यक्ती सर्वव्याप्ती अशा दैवी शक्तीशी अेकरुप होते. पवित्र आत्म्याच्या आणि दैवी प्रेमाच्यामुळे आपली जागृत अवस्था खूप प्रकाशमान झालेली असते आणि हीच जागृत अवस्था आपल्या शरीरस्थित केंद्रमज्जा संस्थातून प्रकटते आणि आपले अवघे अस्थीत्व दैदिप्यमान करुन सोडते. आपण स्वतःही पवित्र आत्म्याची शीतल लहर अनभवू शकतो. दैवी प्रेमाची ही सर्व व्यापी शक्ती आपल्या टाळूजवळील हाडातून बाहेर येते आणि हातांच्या बोटांपर्यंत वाहत येते.

अशावेळी शोधक विचारहीन अवस्थेत पोहचतो आणि म्हणूनच तो शांत समाधानी

बनतो. आपोआपच साधक अत्यंत पवित्र व योग्य पध्दतीने वागू लागतो. त्याच्या सर्वप्रकारच्या विनाशक वाईट सवयी नाहीशा होतात. साधकाच्या स्वभावात अेक प्रकारची निरागसता आणि दयाळूपणा भरुन राहतो. सर्वप्रकारच्या विकृत लैंगिक सवयी संथावतात. इतकेच नव्हे तर लोभ आणि झगमगीतपण ह्यापासून दूर होतात. शोधकाला आता पूर्ण जाणीव होते की अवघे पूर्ण सत्य आता आपल्या हाताच्या बोटात आहे. डोळे अेखाद्या ज्योती सारखे चकाकू लागतात. संपूर्ण व्यक्तिमत्वावर असलेली काळाची पकड ढिल्ली पडते आणि वय वाढणे ही प्रक्रियाच जणू थांबते. क्रिया अचेतन बनतात, अगदी मुक्तात्मा देखील जेव्हा क्रिया करतो तेव्हाही हीच अवस्था असते. साहजिक अहंभाव नाहीसा होतो. जन्मजात परिस्थीतीमुळे निर्माण झालेल्या अटीतटी केव्हाच मागे पडतात आणि अेकप्रकारचे स्वतंत्र नवे पवित्र व्यक्तिमत्व उदयास पावते. सहजयोगींचे सामूहिक जीवन तर अप्रतिम आनंदाचा ठेवाच बनते. सहजयोगींना खूप जणांना उध्दारित करण्याची शक्ति प्राप्त झाली असते. अशा तऱ्हेने सहजयोग सुमारे ६५ देशात पसरला आहे.

आपल्या स्वतःमध्ये जागृती निर्माण झालेल्या लोकांच्या संदर्भात काहीतरी घडत असते ह्याचाच हा सबळ पुरावा आहे. खूप खूप वाट पाहिल्यानंतरच सत्याचा शोध घेणाऱ्या साधकाच्या ठायी, उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा म्हणूनच ही जागृती निर्माण झालेली असते आणि म्हणूनच तिच्यासाठी तुम्ही पैसे घेवू शकत नाही. तिला आज्ञा करु शकत नाही आणि तिचा कुठल्याही प्रकारे अनादर करण्याचाही तुम्हाला अधिकार नाही. कारण ती तुमची आहे.

काही अशीही माणसे असतात जी साधक नसतात अतिशय उध्दट किंवा काहीसे मूर्खच असतात आणि ही माणसे स्वतःच्या मुक्तीची मागणी करतात. माझ्या असे ध्यानात आले आहे की अशा लोकांचा उध्दार होणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. अशा गुंतागुंतीच्या आणि अवघड माणसांवर अेखाद्याने कितीही दिवस काम केले तरी त्याने काहीही साध्य होत नाही.

दुसऱ्या प्रकारची अत्यंत दुष्ट माणसे असतात. अगदी हिटलर सारखी, किवा काही माणसांच्या मनात दुष्ट छळवादी कल्पनांनी घर केले असते. अशा माणसांनाही स्वतःचा उध्दार करुन घेता येत नाही. पण मला ह्याही गोष्टीचे आश्चर्य वाटते, की ह्या घोर कलीयुगात सुध्दा काही कठोर साधक जन्माला येत आहेत. ते कदाचित मानवी अपयशाचे धनी होत असतील. पण जेव्हा ही कुंडलिनी जागृत होते तेव्हा ती सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करुन अशा लोकांना जणू दुसरा जन्म बहाल करते. खरं म्हणजे ही कुंडलिनी सर्व जणांची माता आहे तिने जणू काही आपला संपूर्ण भूतकाळ ध्वनिचित्रित करुन ठेवलेला असतो.

त्याचप्रमाणे आपल्या जाणीवा, प्रेरणांही तिच्याजवळ संग्रहित असतात. ती प्रत्येकाची स्वतंत्र आई आहे. आणि आपल्या लेकरावर तिचे आत्यंतिक प्रेम असून त्याला दुसरा जन्म घ्यायला ती उत्सुक असते. ती आपल्याला समजून घेते. जेव्हा तिला दैवी सत्याची जाणीव, सुखद जाणीव होते. तेव्हा ती जागृत होते आणि आपल्या टाळूच्या हाडाला विंधून जाते. ही गोष्ट अर्थातच कोणे अेकेकाळी अत्यंत अवघड कार्य मानली जायची.

आणि मुख्य म्हणजे ह्यासाठी तुम्हाला डोक्यावर तासनूतास उभे राहण्याची गरज नाही. तुम्हाला उपासतापास करण्याची गरज नाही किंवा इथे जपजाप्यही नको. फक्त शुद्ध इच्छेने शरण येवू इच्छिणारे अत्यंत नम्र असले की झाले. दैवी शक्तीचा कृपाप्रसाद मिळणे मग अवघड नाही.

साहित्याच्या, तत्वज्ञानाच्या, राजकारण आणि अर्थकारणाच्या अनेक पाईकांनी बुध्दमत्तेच्या कारागिरीच्या जोरावर दैवी कृपाप्रसादाच्या कल्पनांना तुमच्या मनातून हद्‌पार करण्याचे काम केलेले आहे. अर्थात अशा अनेक प्रयत्नानंतर असेही काही लोक आहेत की ह्यासर्व गोष्टींद्वारे कुठलीही शांतता, सुसंगती जीवनात येत नाही ह्याची यथार्थ जाणीव त्यांना झाली आहे. मानवी पातळीवरुन जरी विचार केला तरी ह्या जगात धटींगण किंवा जुलमी लोकांमुळेच शांतता नांदू शकते असा विचारही कुणी करणे अशक्यप्राय आहे. भविष्यातही अशी सुतराम शक्यता नाही. कोणाला जग वाचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायचा असेल तर सहजयोगाचा स्वीकार करणे हा अेकमेव मार्ग आहे.

सर्वशक्तिमान परमेश्वराचे प्रतिबिंब मानला जाणारा आत्मा म्हणजे खरोखर शुध्द आनंद आणि अंतिम सत्याचा अेक खळाळता स्रोत असतो परंतु केवळ मानवी पातळीवर घडलेल्या उध्दारात हा आत्मा झळाळून उठत नाही. फक्त स्वतःच्या, आत्मशोधानंतरच आपली जागृत अवस्था, आत्म्याकडून प्रकाशमान केली जाते. म्हणूनच जर कोणाला शुध्द प्रेम, आनंद आणि शांति व अंतिम सत्य शोधून काढायचे असेल तर त्याने शुध्द आत्मा बनावयास हवे. आपण सर्वप्रथम ही गोष्ट समजूमन घेतली पाहिजे. कारण आपण म्हणजे हे शरीर नव्हे, बुध्दिमत्ता भावना, अटीतटी, अहंभाव हे मन म्हणजे तर आपण नक्कीच नव्हे. आपण म्हणतो, 'माझे शरीर,माझे मन पण खरे म्हणजे हा 'मी' कुणी वेगळाच असतो, त्याचा आपण माझे, माझा असा उल्लेख करतो.

आपण नेहमी सुंदर फुले, फळे आणि सर्व प्रकारच्या जगणाऱ्या गोष्टीचे अस्तीत्व पाहत असतो. सर्व ऋतू बदलताना आपण पहातो. पण ह्यावर आपण हे सर्व कोण घडवितो? असा विचारही करत नाही. जिला ऋतुंभरा असेही संबोधले जाते अशी अेक सर्वव्यापी दिव्य प्रेमशक्ती अस्तित्वात आहे. तिच्या योगेच सृष्टीमधील हे सर्व चमत्कार

घडत असतात. जे सर्व आपण गृहीतच धरुन चालतो आणि त्याचा विचारही करत नाही. तुम्ही प्रत्यक्ष डॉक्टरला विचारले की आपले हृदय कोण बरे चालविते तर कदाचित डॉक्टर उत्तर देतील की आपल्या शरीरातील स्वयंचलीत मज्जासंस्थ, पण त्या मागचा कर्ता करविता कोण? हे सर्व चलनवलन घडाविणारा आहे तरी कोण? पण ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र जगातला कोणताच डॉक्टर आजतागायत देवू शकलेला नाही. हे उत्तर शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न देखील ते करत नाहीत. पण खरे पाहता ह्या प्रश्नाला उत्तर आहे. तो आत्मा असतो जो आपल्या शरीरातील सर्व प्रकारच्या क्रिया प्रक्रिया घडवित असतो.

जेव्हा कुंडलिनी जागृत होते, तेव्हा मी मागेच कथन केल्याप्रमाणे ती मस्तकातल्या टाळूच्या हाडाला विंधून बाहेर पडते आणि आपला संबंध सर्वव्यापी अशा दिव्य प्रेमाशी जोडून देते हीच दिव्यशक्ती सर्वप्रकारच्या या जीवंत हालचाली घडवून आणत असते आणि आपणास त्याबद्दल यत्किंचितही खर्च करावा लागत नाही. आणि सगळ्यात गमतीची गोष्ट म्हणजे आपण त्याबद्दल मुळीच कृतज्ञ नसतो. इतकेच नव्हे तर ह्या गोष्टीचा विचारही आपण करत नाही. पण ही जीवनाला अत्यंत आवश्यक असणारी जेव्हा आपल्या शरीरातून प्रवाहित होते. तेव्हा आपल्या सर्व शारीरिक, मानसिक, भावनिक अध्यात्मिक अडचणी दूर होतात आणि आपले जीन्स सुव्यवस्थित पध्दतीत रचले जातात.

आपल्या मुख्य जीवनप्रवाहात (सुषुम्नेष) अेकूण सात अत्यंत सूक्ष्म अशी केंद्रस्थाने असतात. (त्याचे चित्रीकरण शेवटच्या पानावर आहे) त्याचबरोबर आणखीनही काही उपकेंद्रे असतात हे आकृतीवरुन तुमच्या लक्षात येईल. आपल्या उत्क्रांतीच्या प्रवासातच ही सूक्ष्म केंद्रे तयार झालेली आहेत. ह्यातील डाव्या बाजूची जी केंद्रे आहेत ती आपल्याभावनिकतेची जोपासना करतात तर उजव्या हाताची शारीरिक कआणि मानसिक बाजू संभाळतात.

कुंडलिनी नावाने ओळखली जाणारी ही शक्ती जेव्हा जागृत होवून ह्या सहा शक्ती केंद्रातून जाते. ह्या केंद्राची ती जोपासना करते आणि आपल्या मानसिक शारीरिक व भावनिक गरजा भागविल्या जातात. हीच ही शक्तीकेंद्रे आपली नवी अवस्था जीन्समध्ये परावर्तीत करु शकतात. आणि आपली शारीरिक, मानसिक, भावनिक बाजू अेकदम तंदुरुस्त होवू शकते. ही शक्ती केंद्रे झळाळून निघतात आणि सर्वात शेवटी मस्तकाशी असलेल्या टाळूच्या हाडातून ही बाहेर पडते. आपण बाल्यावस्थेत असताना हे टाळूच हाड अत्यंत मृदुल असे असते. पण हे मृदू हाड सर्वव्यापी दैवी प्रेमाचे महत्वाचे केंद्र बनते. पवित्र आत्म्याची अत्यंत सुखद, शीतल लहर आपल्या बोटांना जाणवते. ही सुखद लहर टाळूपासून येत आहे हे ही आपण अनुभवू शकतो. आत्मोध्दाराची ही पहिली पायरीच म्हणायला हवी. पहिला अनुभव म्हणा ना!

जेव्हा कुंडलिनी जागृत होते. तेव्हा हे विचार थांबतात. दोन विचारांमध्ये जी अगदी सुक्ष्म जागा असते (विलंब) ती पसरते आणि शांतता निर्माण करते आणि मग आपण फक्त वर्तमानात असतो. ते देखील कोणत्याही विचाराखेरीज कोणत्याही काळजी खेरीज. अशा तऱ्हेने आपण कोणत्याही क्रोधाखेरीज वर्तमानातल्या वास्तवाला सामोरे जावू शकतो खरे पाहता वर्तमान हीच वास्तवता असते. कारण भुतकाळ शिल्लक नसतो आणि भविष्यकाळात आपण जावू शकत नाही. जेव्हा आपण वर्तमानात आणि फक्त वर्तमानात असतो. तेव्हा अत्यंत शांत असतो अशा तऱ्हेने आंतरिक शांती निर्माण होते. जेव्हा हजारो लोक आपली कुंडलिनी जागृत करतात तेव्हा ही आंतरिक शांती सामुहिक रितीनेही निर्माण करता येते.

उदाहरणार्थ, जेव्हा आपण पाण्यात उतरतो तेव्हा आपणास पाण्यात उडणाऱ्या लाटांची भिती वाटते. पण तेच जर आपण बोटीत असलो तर आपण ह्या उंच झेपावणाऱ्या लाटांचे अवलोकन करु शकतो. म्हणजे त्या घाबरवणाऱ्या लाटांचे आपण साक्षीदार बनतो किंबहुना त्या लाटांचा आपण आनंदही घेवू शकतो. असेच काहीसे, जेव्हा आपण फक्त वर्तमानात जगायला शिकतो तेव्हा घडत असते. आपल्या भोवताल व आपल्या समस्यांचे आपण साक्षी प्रमाणे पाहू शकतो. इतकेच नव्हे तर त्या समस्यांचे निराकरणही आपणास सापडते आणि त्या समस्या आपण सहजतेने सोडवू शकतो. त्या परिस्थीतीत. आपण भुतकाळाची वा भविष्यकाळाची तमा न बाळगता फक्त दैदिप्यमान वर्तमानकाळाचा आनंद आपण लुटू शकतो. त्याक्षणी आपण अत्यंत सावध पण भाव विरहित अवस्थेत असतो. ह्या अवस्थेत असतांना आपण जे जे पाहतो ते आपल्या स्मृतीकोषात अेखाद्या फोटोप्रिंट प्रमाणे नोदविले जाते ही आंतरिक शांतावस्था आपल्या हृदयाला जणू उघडे करते. ह्या शांततेच्या लाटाविहिन महासागरात आपले सगळे अंहकार, सगळ्या अटीतटी अपोआप विरघळू लागतात. उदाहरणार्थ माझ्याजवळ माझ्या स्वत:च्या अेखादा सुंदर गालीचा आहे. तर तो संभाळणे, जतन करणे ही माझ्या समोर मोठी समस्या असेल. तो दुसऱ्याच्या मालकीचा असणे ही तर आणखीनच वाईट गोष्ट असेल म्हणजे त्याकडे पाहणे, लक्ष देणे ही माझ्यापुढे मोठी समस्याच असेल. पण तेच मी भावविकल्प समाधीत असेल तर हीच गोष्ट मी कोणत्याही तऱ्हेची काळजी न करता पाहू शकते. उलट तो गालीचा ज्याने बनविला असेल त्याच्या कारागिरीचा त्याच्या निर्मीतीचा आनंदच माझ्या मनापर्यंत पोहचते. साहजिकच माझ्यामध्ये अत्यंत संथ, मुक्त आनंदाच्या लहरींच निर्माण होवू शकतील. माझ्यापर्यंत पोहचणारे सर्व विचार, जेव्हा मी ह्या अवस्थेत असेल आनंदाने तेव्हा दैवी स्फुरित निर्माण करु शकतात, आणि ते विचार मला प्रेरणाच देतील. जर आपल्याला वाटले तर आपण विचार करु शकू जर मानात नसेल तर नाही करणार. ह्याच अवस्थेला संस्कृतमध्ये तुरिया म्हणतात. जागृतीची ही चवथी

मितीच म्हणा ना ही तुर्या अवस्था काहीवेळस स्वत:हूनच निर्माण होते. ही अवस्था काही सेकंदच टिकते आणि ती नाहीशी होते पण त्याही अवस्थेत मनुष्य आपल्या मनात संपुर्ण शांतता निर्माण करु शकते. काही काळाने ती स्थिती स्थिरावते.

म्हणजे प्रथम आपण समुद्रातून बोटीत प्रवेश करण्यासाठी प्रयत्न करणे जरुरीचे आहे. अेकदा का आपण बोटीत प्रवेश केला आणि आपणास पोहण्याचे ज्ञान असेल की आपण परत समुद्रात उडी मारु शकतो आणि बुडण्याची भिती बाळगणाऱ्या अनेकांचे प्राण वाचवू शकतो. ही आपण प्राप्त केलेली दुसरी अवस्था असेल जिला आपण नि:शंक जागृतावस्था असेही म्हणू शकतो जिथे स्वत:बद्दल कोणत्याही शंका, कुशंका उदभवू शकत नाहीत. तिथे आपण संपूर्ण आत्मविश्वासी असतो आणि अगदी सहजतेने दुसऱ्यांच्या कुंडलिनीही जागृत करु शकतो. दुसऱ्यांना बरे करु शकतो भोवतालच्या परिस्थीतीचा कोणताही परिणाम न होता. तुर्यावस्था टिकवून ठेवू शकतो ह्या अवस्थेलाच निशंक जागृती (निर्विकल्प समाधी) म्हटले जाते जिथे स्वत:बद्दल तर संशय नसतोच पण त्या दैवीशक्ती बद्दलही नसतो जी सर्वत्र कार्यरत असते.

त्याचप्रमाणे सर्व व्यापी दैवी शक्ती देखील कार्यरत होते. आणि अेकदा का त्या दैवीशक्तीशी आपण जोडले गेले की ती आपले रक्षण करते. ही दैवी शक्ती म्हणजे ज्ञानाचा अथांग महासागर असते. त्याच बरोबर दैवी चमत्कारांचा, वर दानांचा, दयाळूपणाचा, प्रेमाचा ह्या सर्वांचाही महासागर असते सर्वात महत्वाचे म्हणजे क्षमा शिलतेचाही महासागर अशी ही शक्ती असते.

म्हणूनच योग्य तऱ्हेने आपला उद्धार करुन घ्यायचा असेल तर माणसाने प्रथम त्या माणसाबद्दल कोणताही विचार न करता त्याला क्षमा करणे गरजेचे आहे म्हणूनच आपण प्रत्येकाने मनातल्या मनात कमीत कमी तिनदा तरी रोज म्हणायला हवे ''मी प्रत्येकाला क्षमा करीन ! असे तुम्ही म्हटलेत की ज्या माणसांना तुम्ही म्हटलेत की ज्या माणसांना तुम्ही क्षमा कराल त्यांचा विचार करणे सोडून द्याल. कारण त्यांच्या विचार करणे ही अेक प्रकारची डोके दुखीच ठरु शकेल. म्हणूनच सगळ्यात उत्तम म्हणजे सरसकट पणे मी सगळ्यांना क्षमा करीन असे उच्चार रोज तिनदा तरी करावा. कारण तुम्ही क्षमा केलीत तर तुम्ही काहीच करु शकणार नाही पण तुम्ही जर क्षमा केली नाहीत तर तुम्ही कदाचित चुकीच्या माणसाच्या हातातले बाहुले बनू शकाल की ज्यायोगे तुम्ही स्वत:चाच छळ कराल आणि ती माणसे ह्या गोष्टीचा आनंद उपभोगतील, आता ह्या छळवणूकीत सुटका करुन घेण्याची योग्य वेळ आली आहे म्हणूनच मी सगळ्यांना क्षमा करील. ह्या विधानाचा त्रिवार उच्चार करणे गरजेचे आहे.

दुसरीही अेक महत्त्वाची गोष्ट आहे जर तुम्हाला तुम्ही सत्याच्या शोधात आहात ही गोष्ट पक्की माहीत असेल तर कोणत्याही इतर गोष्टीबद्दल तुम्हाला अपराधी वाटण्याचे काहीच कारण नाही. सत्याच्या शोध घेण्याच्या तिव्र इच्छेने इतर सर्व तऱ्हेची अपराधी भावना आपोआपच विलयास जाते म्हणून साधकाला अपराधी वाटण्याचे किंवा कुठल्याही तऱ्हेचा कबुली जबाब देण्याचे काही कारणच नाही अेकदा का सत्याच्या शोधात तुम्ही लागलात की तुमच्या मनात कुठल्याही अपराधी भावनेला थाराच उरणार नाही. मुळातच बहुतेक अपराध भावना ही कृत्रिम असते. खरं म्हणजे अपराध भावना मनात असण्याची काही गरजच नाही पण अनेक लोक अेकप्रकारची फॅशन म्हणून ही अपराधी भावना मनात बाळगत असतात. खरं म्हणजे अपराध हा भुतकाळ असतो. आणि भुतकाळ परतुन कधीच येत नसतो. म्हणूनच त्याची काय म्हणून तमा करायची ? जेव्हा केव्हा तुमच्या हातून चुका घडल्या असतील तेव्हाच तुम्ही त्याचे परिणामही भोगलेले असतात. मग आता त्याचा काय उपयोग ? भुतकाळात जे घडले ते घडले. म्हणूनच कृपा करून स्वत:च्या मनाशी हे पण म्हणा की 'मी स्वत:ला क्षमा करतो' तुम्ही असे म्हणावयासच हवे कारण ही दैवीशक्ती म्हणजे क्षमाशिलतेचा अथांग महासागरच असतो ना ? म्हणूनच तुम्ही तुम्हाला स्वत:लाच संपूर्ण क्षमा करुन टाकावी. आणि स्वत:ला अपराधी समजण्यात आपला अमूल्यवेळ वाया घालवू नये. तर तुम्ही स्वत:ला क्षमा केली नाहीत तर डावीकडे असलेले विशुद्धीकेंद्र संकटात सापडेल. जणू ते कैद होईल-कायमचे बंद ही होवू शकेल मग कुंडलिनी जागृत होवू शकणार नाही मी असेही अनेक लोक पाहिले आहेत की आपल्या पूर्वजांनी केलेल्या असंख्य चुकीच्या गोष्टीबद्दल ते स्वत:ला अपराधी मानतात.

दुसरे म्हणजे दृष्टीच्या वर असलेले आज्ञाचक्रही गोंधळात सापडू शकते जर तुम्ही स्वत:ला आणि दुसऱ्यांना क्षमा केली. नाहीत तर नक्कीच ते अज्ञाचक्र अव्यवस्थीत होवू शकते हे केंद्र अतिशय शकुंचीत असते जर तुम्ही स्वत:ला आणि दुसऱ्यांना क्षमा केली नाहीत तर ते उघडूच शकणार नाही. आणि कुंडलिनी मस्तकाला विंधून जाण्यासाठी हे केंद्र उघडणे अत्यंत महत्त्वाचे असते. अेकदा का तुम्ही कोणत्याही प्रकारचा विचार न करता स्वत:सकट सगळ्यांना क्षमा केलीत की तुम्हाला खूप हलके हलके वाटू लागेल आणि जेव्हा कुंडलिनी ह्या आज्ञाचक्रातून जाते तेव्हाच तुम्ही भाव विकल्प समाधी ही अवस्था प्राप्त करू शकता. म्हणूनच कृपा करुन स्वत:ला आणि दुसऱ्यांना क्षमा करा कोणत्याही तऱ्हेचा विचार नकरता सकाळी तिनदा आणि संध्याकाळी झोपण्यापूर्वी ह्या गोष्टीचा प्रार्थनेप्रमाणे जप करावा.

अशा तऱ्हेने तुम्ही जेव्हा तुमच्या वर्तमानात उभे रहाल तेव्हा तुम्ही किती परम शांतता अनुभवू शकता हे पाहून तुमचे तुम्हालाच आश्चर्य वाटेल. कोणत्याही तऱ्हेचा गोंधळ,

कोलाहल तुमच्या मनात नसतो. आणि ही दैवी शांतता अेखाद्या वरदानासारखी तुम्ही उपभोगू शकता. आपल्या मनात ही शांतावस्था निर्माण होवून निर्विकल्प समाधी प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येकाने दररोज प्रयत्न करावयास हवे. निसर्गाने किंवा मानवाने निर्माण केलेल्या अनेक सुंदर गोष्टी तुमच्या मनात ही निर्विचार समाधी निर्माण करण्यासाठी मदत करु शकतील. प्रत्येक गोष्टीकडे तुम्ही निर्विकारपणे पाहयला शिकलात तरचं त्या गोष्टीच्या निर्मिती मागच्या निराकार शक्ती एकूण तुम्ही अनुभवू शकाल आणि तुमचे मन कोणत्याही तऱ्हेचा विचार न करता अनंदाने काठोकाठ भरुन जावू शकेल.

आज जगाला अशाच तऱ्हेच्या आनंदी हृदयाच्या माणसांची गरज आहे. ही सर्व माणसे एकत्र येवून एकनव्या समाजाची, नव्या वंशाची, सुसंघटीत समाजाची निर्मिती करुन ही आनंदमय समाधी उपभोगू शकतील अर्थात ह्या शांतावस्थेत आपण समाजापासून पळ काढण्याची गरज नाही किंवा आपण कोणावर कुठले दोषरोपही करणार नाही आहोत पण आता आपल्याला असे अेक नवे मातीचे पात्र बनवायला आवडेल की ते पुर्णपणे भाजले गेलेले असल्याने त्याच्यावर कोणत्याही तऱ्हेच्या खुणा नसतील. आता आपण कोणत्याही तऱ्हेच्या नकारात्मक भावनेने नष्ट होवू न शकणाऱ्या जागृतावस्थेमुळे निर्माण झालेली परीपक मणसे आहोत आताच्या आधुनिक जगात ही अवस्था प्राप्त केलेली माणसेच विश्वशांती निर्माण करु शकतील. कारण आताची ही वेळ खूपच विशेष आहे जिला मी वसंतकाळ किंवा बहारवेला म्हणू शकते. बायबलमध्ये ह्या दिवसाचे वर्णन लास्ट जजमेंट म्हणून केले आहे तर ह्यालाच पवित्र कुराणात कयामत म्हणून ओळखले जाते. अन्यथा मानवजात अशी एखादी संस्था निर्माण करुन विश्वशांती निर्माण करण्याचा प्रयत्न करु शकेल ह्या गोष्टीवर विश्वास ठेवणे कठीणच आहे. अनेक लोकांच्या उद्धाराची वेळ आली आहे आणि मला खात्री आहे की तो दिवस आता दूर नाही की ज्या दिवशी हे नव्यानेच निर्माण झालेले दैवी प्रेमाचे राज्य अस्तीत्वात आलेले असेल आणि सर्वत्र शांतता निर्माण झालेली असेल.

आत्म्याच्या दिव्य प्रकाशात मनुष्यजात सर्व तऱ्हेच्या चुकीच्या आणि कृत्रिम गोष्टीचा त्याग करु शकेल पहिल्यांदा, साधकांच्या मनातली भिती नष्ट व्हायला हवी. कल्पना करा, जेव्हा आपण भयानक रहदारीच्या रस्त्यातून जातो तेव्हा त्या रहदारीची आपणास भिती वाटते, काळजी वाटते. पण जेव्हा आपण अेखादा पर्तवाच्या शिरपटावर बसून ही रहदारी न्याहळत असतो तेव्हा त्याचा आपणास काहीच त्रास होत नाही. तत्दवतच मृत्यूची किंवा इतर कशाचीही वाटणारी भिती आपोआप नाहीशी होते आणि आपण फक्त वर्तमानातच जगायला शिकतो. जीवनातल्या प्रत्येक क्षणाचा अनुभव घेतो आणि दुसऱ्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करतो.

आणखीही अेका गोष्टीकडे लक्ष जाणे महत्वाचे आहे. पहीले केंद्रा आहे 'मुलाधार' म्हणजेच मुळांचा आधार. हे केंद्र कुंडलिनीच्या खाली आहे. हे चक्र मज्जतंतूच्या जाळ्यामध्ये कार्यरत असते. आणि हेच जाळे शरीरातील मलमूत्र विसर्जनाचे कार्य करत असते. त्याचे आणखीनही अेक कार्य आहे संभोग ज्याअर्थी हे चक्र कुंडलिनीच्या खाली आहे. त्याअर्थी उघडच आहे की ह्या चक्राचा आतमोद्धार प्रक्रियेत कोणताही महत्त्वाचा सहभाग नसतो उलटपक्षी जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा हे मुलाधार चक्र आपले कार्य थांबवून आपली सर्व ताकद योग साधनेला देते साहजिकच त्यावेळेस अपली अवस्था अेखाद्या लहान बालकासारखी निरागस असते.

कुंडलिनी जेव्हा तिसऱ्या भागात जाते तेथे नांभीचक्र असते आपण येथे अगदी सर्वार्थाने सात्विक बनतो. हा भाग १० तत्वांच्या आधिपत्याखाली येतो. त्या महान निर्मात्याने ही १० केंद्रे निर्माण केली. जी दैदिप्यमान होवून आपण पवित्र बनू शकतो. आणि मग कुणाच्या आचरणावर निर्बंध घालण्याचे काही कारणच उरत नाही आपण आपोआपच दैवी, अध्यात्मिक बनून जातो. अंड्यांतून पक्षी जन्मास यावा. तसा आपलाही दुसरा जन्म होतो. संस्कृतमध्ये योगींना हे गुरुंचे द्वीज असेच संबोधले जाते. पक्षालाही द्वीज म्हटले जाते. जो दोनदा जन्माला येतो तो द्वीज - ! अब्राह्मम मोसेस आणि आपली दशावतार ह्यांनीतर वारंवार ह्या पृथ्वीवर जन्म घेतला झरत्रुतूने ५ वेळेस ह्या पृथ्वीवर जन्म घेतला आणि ह्यांच्यातल्या अनेकांनी निरनिराळ्या देशातल्या निरनिराळ्या ठिकाणी लोकांना धार्मिक उद्धारासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी जन्म घेतला.

पण धार्मिक कार्याबद्दल विचार केला तर हे कार्य पूर्ण झालेले दिसत नाही. धार्मिक ग्रंथांचे वाचन केले की माणसे शब्दांच्या जाळ्यात अडकतो. आपण शुद्ध आणि वैश्विक धर्माचा साक्षात्कार आपल्या स्वत:मध्येच अनुभवू शकतो. जेव्हा कुंडलिनी जागृत होवून शरीराच्या 'भवसागर' ह्या नावाने ओळखल्या जाणांऱ्या ह्या मार्गात येवून पोहचते. जेव्हा हे केंद्र पूर्ण दैदिप्यमान होवून त्यात दैवी शक्ती स्थानापन्न होते तेव्हा आपोआप आपण सात्विक बनतो, आपण त्यांच्या अमूल्य दैवी विचार पद्धतींचा सत्कार करु लागतो. आपण प्रामाणिक, नितीमान, अंहिसावादी बनतो, कमालीचे दयाळू होतो. हे सर्व गुण आपल्यात कमालीच्या वेगाने निर्माण होतात आणि आपल्यात अंतर्बाह्य बदल होतो. जणू आपले व्यक्तिमत्व पूर्ण बदलते की जो एखाद्या संताप्रमाणे कमालीचे सात्विक बनते आणि मग अशा व्यक्तीला हे कर आणि ते करु नको हे सांगण्याची गरजच भासत नाही.

जेव्हा 'स्वाधीस्थान' हे दुसरे केंद्र उत्तेजीत होते. तेव्हा आपल्यामधील निर्मीतीक्षमता कमालीची वाढते. आम्हाला असे अनेक कलाकार संगीततज्ञ, चित्रकार, बिल्डर्स,

आर्कीटेक्टस आणि इतर सर्व प्रकारची निर्मीतीक्षम माणसे नाहीत आहेत की जे ऐकाऐकी प्रसिद्ध बनते आणि निर्मितीची अत्युतम मर्यादा त्यांनी गाठली आहे हे स्वाधीस्थान केंद्र शरीराच्या डाव्या बाजूस जेव्हां असते, ते आपणास दैवी कायद्याची जाणीव करून देते ते कशाप्रकारे कार्यान्वयीत होतात आणि आपण ह्या शक्तीचा कशापद्धतीने उपयोग करुन घेऊन आपल्या स्वत:चा व दुसऱ्याच्चाही कल्याणासाठी ती वापरली पाहीजे हे सर्व ज्ञान आपणास येथे मिळते. हे स्वाधीस्थान चक्र नाभीस्थानाच्या मधून येते जे जन्माच्या वेळी आपल्या शरीराच्या मधोमध असते नंतर हे स्वाधीस्थान चक्र सरोवरात उगम पावलेल्या कमळासारखे संचार करीत असते. जेव्हा शरीराच्या डाव्या भागात प्रवेश करते. तेव्हा अध्यात्माच्यावर चुकीच्या उपयोगामुळे निर्माण झालेल्या नकारात्मक शक्तीचा नाश करुन शरीराच्या डाव्या भागाचे संगोपन करते हे केंद्र शुद्ध विद्येचे मानले जाते. दैवी कायद्याच्या आधारे अेखाद्याच्या मज्जासंस्थेत निर्माण झालेल्या सर्व समस्यांचे निराकरण करुन एखाद्याला त्या समस्या किंवा दुसऱ्यांच्याही अशाच प्रकारच्या समस्या सोडविण्याइतके समर्थ बनविले जाते - म्हणजे तसा तो आपोआपच बनतो. पण हे चक्र जेव्हा शरीराच्या उजव्या बाजूस येते तेव्हा ते सरळ पिंगळा नाडीशी जोडले जाते ज्या योगे मानवी बुद्धीमत्तेचे अत्यंत प्रमाणबद्ध जागृतावस्थेमध्ये परीवर्तन होवू शकते. आपण अशी अनेकमुले पाहतो जी त्यांच्या वर्गात नीट अभ्यास करत नाहीत म्हणून त्यांच्या शिक्षकांनी त्यांनी बाहेर काढली असते. पण सत्याचे यथार्थ दर्शन झाल्यावर हीच मुले अतिशय हुषार होवून वर्गात पहिली येतात इतकेच नव्हे तर अनेकांना चांगल्या शिष्यवृत्याही मिळतात.,सहजयोगात येणारे बरेचसे विद्यार्थी वर्गात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतात. काहीवेळेस हा सहजयोग त्यांच्या मेंदूस तल्लखता देतो. त्यांना सामान्यांपेक्षा जास्त बुद्धीवान बनवितो. पण त्यांच्यात धूर्तता, कावेबाज पणा किंवा उद्धट अंहकार निर्माण होवू देत नाही. उलट ज्यांनी सहजयोग अंगीकारला आहे असे विद्यार्थी असे लोक कमालीचे कंवाळू भावनाशील बनलेले आढळतात.

कुणीही आपल्या जीवनात कमालीच्या टोकाला न जाण्याची काळजी खरे म्हणजे घ्यायलाच हवी पण पण सध्याच्या आधुनिक काळात लोक प्रतिक्रिया येईपर्यंत टोकाला जातात तुम्ही अनेकदा लोकांना दुपारच्या कडकडीत उन्हात भर एक वाजता जेवण झाल्यावर घंटोगणती बसलेले पाहीले असेल. अशा वेळेस सूर्याच्या उन्हाचा त्यांच्यावर दुष्परिणाम झाल्याखेरीज राहील का ? अगदी त्यांना कातडीचा कर्करोगही होवू शकतो पण तो पर्यंत ते आपले उन्हात बसणे सोडत नाहीत. प्रत्येक सवयीचे हे असेच. उदाहरणार्थ ग्रँड प्री नावाचा एक अत्यंत भयानक खेळ आहे की कुणी एकट्या बाबत कल्पनाही करु शकणार नाही. प्रेक्षकांना खुष करण्यासाठी एखाद्याला ह्या खेळात शब्दश: मरावे लागते. आतातर ह्या

बुल-फाईटींगसाठी स्पेनमधल्या स्त्रियाही वापरल्या जातात म्हणजे मग विकृत मनोवृत्तीचे लोक अशा प्रकारच्या आसुरी खेळात बुडून जातात. ह्या उजव्या बाजूलाच अनेक तऱ्हेचे रोग निर्माण होवू शकतात. जशा यकृताच्या समस्या बद्धकोष्टता, रक्तकर्कराग किडनीचे वगैरे अनेक रोग होऊ शकतात.

उजव्या किंवा डाव्या बाजुला कमालीच्या झुकण्यामुळे निर्माण होणाऱ्या ह्या सर्व समस्या कुंडलिनीच्या साह्याने ठिक होवू शकतात. कारण ती जेव्हा जागृत होते तेव्हा ती सर्व व्यवधाने मध्यभागी खेचून घेते आणि त्यायोगे एक अत्यंत संयमित परिपूर्ण संतुलित व्यक्तीमत्त्व निर्माण होवू शकते जे कधीच कोणत्या एका टोकाला जात नाही शिवाय सर्व अंहभावी सवयी नाहीश्या होतात एक प्रकारच्या सवयींमुळे लागलेली व्यसने नाहीशी होतात. अशा तऱ्हेने माणूस एक प्रकारचे मुक्त व्यक्तीमत्त्व प्राप्त करतो. आणि जेव्हा तो भूतकाळातल्या स्वत:ला पहातो. तेव्हा स्वत:वरच हसतो.

जागृतावस्था प्राप्त झालेली व्यक्ती जीवनातल्या सर्व कृत्रिम गोष्टी विसरुन जावू शकतो. वंशवाद, राष्ट्रवाद, साम्यवाद, अशा तऱ्हेच्या सर्व वादापासून तो दूर होतो आणि वैश्विक धर्माचा, विश्वराज्याचा एक भाग बनून जातो.

हा विश्वधर्म एकाएकी दैदिप्यमान होतो. आणि त्यातील आंतरिक भावनेच्या साह्याने मनामधल्या सर्व शंका, कुशंकावर विजय मिळवतो. आणि मग आपल्या जीवनपद्धतीत, आपल्या कुटुंबात आपल्या जगात काय चुकीच्या गोष्टी आहेत ह्याचे स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभे रहाते. ह्या जगात शांतता का नाही हेही कळून चुकते आपण सर्वच जण कुठल्या ना कुठल्या वादाचे गुलाम बनले आहोत ते चुकीचे आहे हे पण कळते. हा सर्व आत्म्याचा दिव्य प्रकाश असतो जो सर्वसाक्षी परमेश्वराचे प्रतिबिंब आपल्या हृदयात असतो - अर्थातच तो सर्वार्थाने मुक्त असतो. आणि सर्वज्ञानीही असतो. ह्या दिव्य प्रकाशातच आपल्यात काहीतरी चुकीचे आहे ही गोष्ट लक्षात येते, आपल्या कुटुंबातील आपल्या समाजातील, आपल्या देशातील कोणत्या चुकीच्या गोष्टीमुळे आपल्याला त्रास होत आहे. हेही समजून चुकते उदाहरणार्थ मला एकदा एक स्त्री भेटली. तीचे लहान मुल पलंगावरच मृत्यू पावल्याने दु:ख झालेली ती स्त्री दु:ख विसरण्यासाठी सतत दारुच्या नशेत असायची. मी तिला तिच्या मुलाचा मृत्यु कसा झाला ह्या बद्दल विचारले ती सांगू लागली माझे बाळ दोन महिन्याचे होते. ते पलिकडच्या खोलीत झोपले होते व मी आणि माझे यजमान दुसऱ्या खोलीत एके दिवशी माझ्या लक्षात आले की माझे बाळ कॉटवरच मृत्यू पावले आहे. हे पाहून मला धक्काच बसला, आणि दु:खातिशयाने मी बेशुद्ध पडले.

त्या दिवशी प्रथमच मला कळले की आईवडिल अगदी लहान मुलांपासूनही वेगळे झोपतात. जेमतेम वर्षाच्या आतली लहान मुलेही स्वतंत्र खोलीत झोपतात. लहान मुल कितीही, भुकेने तहानेने जीव गुदमरुन, अथवा इतर गैरसोयीमुळे रडले तरी पलीकडच्या खोलीतल्या अंगावर कोणतेही वस्त्र न घालता झोपलेल्या त्याच्या आईवडिलांना त्याचा पत्ताही नसतो. आपल्या आयुष्याला ते सर्वात जास्त महत्त्व देतात ते प्रणयाला शरीर क्रिडेला ती स्त्री मला सांगू लागली ''आम्ही वेगळ्या खोलीत झोपतो, मुलांना वेगळ्या गोलीत झोपवितो कारण आम्ही वस्त्रहीन अवस्थेत झोपतो ना ? मला एक कळत नाही की स्वीत्सर्लंडसारख्या कडाक्याची थंडी असलेल्या देशात जोडपे वस्त्रहीन अवस्थेत कसे झोपू शकते ? त्यातून एक दोन महिन्याच्या लहान लेकरांला आई वडिलांच्या अंगावर कपडे नसण्याने काय फारक पडतो ? त्यावर ती स्त्री म्हणाली 'आमची संस्कृतीच अशी आहे. ह्या प्रणय प्रधान संस्कृतीने आता पर्यंत किती तरी लहान मुलांचे प्राण घेतले असतील. की ज्यांना आपल्या आईवडिलाच्या ह्या संस्कृती बद्दल काहीही माहीत नसावे नाहीतर ज्या जगात आईवडिलांना मुले नकोच असतात अशा ठिकाणी त्यांनी जन्म घेतलाच नसता. ज्या पद्धतीने आईवडिल प्रणयाचा विचार करतात, लोळतात आणि फक्तवासनेतच अहोरात्र डुंबत असतात त्यावरून मला तर ते विकृतच वाटतात. कित्येकदा अतिरेकाने ते नपुंसकही बनतात आणि मग फक्त आपल्या सेक्सबद्दल बोलणाऱ्या भारतातल्या मूर्ख गुरु म्हणवणाऱ्या लोकांसारखेच होतात पण आत्मोद्धराच्या प्रक्रियेनंतर हेच आईवडिल बदलतात आपल्या मुलांकडे ते लक्ष देवू लागतात. त्याच्यावर जीवापाड प्रेम करु लागतात. आणि मग पैसा, सत्ता व प्रणायमानांच महत्त्व देणारा समाज आपल्या कुटुंबावर प्रेम करणाऱ्यांचा अतिशय सुंदर, दया, क्षमाशील, कुटुंब वत्सल असा अध्यात्माभिमुखी समाज बनतो कारण आत्म्याच्या दैवी प्रकाशात ह्या कुरुप समाजातील घनघोर अंधार त्यांच्या लक्षात येतो. त्यांच्या आयुष्यात अत्यंत सयंमित आणि नैतिक अधिष्ठान लाभलेले दांपत्यजीवन सुरु होते अर्थात अशा ठिकाणी जी मुले जन्माला येतात ती जन्मजात कल्याणकारी, अतिशय हुषार, आज्ञाधारक, शहाणी आणि सुंदरच असतात.

पाठीच्या मणक्याच्यामध्ये अगदी मध्यभागी चवथे केंद्र येते ज्याला हृदयस्थान म्हणता येईल त्याला म्हणतात 'अनाहत' ह्या केंद्राला दोन आणखी उपकेंद्रे असतात. एक डावीकडे व दुसरे उजवीकडे? हृदयाच्या केंद्राला अनाहत म्हणण्याचे कारण असे की हृदयातला 'लब डब' असा आवाज कोणत्याही तऱ्हेच्या आघातावाचून निर्माण होत असतो जरी त्याला उजवी व डावी केंद्र असली तरी मध्यकेंद्र हे अत्यंत महत्वाचे असते कारण वयाच्या १२ व्या वर्षापासून ह्याच केंद्रात मध्य मणक्यात प्रतिकार पेशी निर्माण केल्या जातात आणि त्या सर्व

शरीरभर पसरवल्या जातात. त्या प्रतिकार पेशींवर मज्जासंस्थेचाच ताबा असतो एखाद्याच्या मनात भिती किंवा तत्सम भावना निर्माण झाली तर ह्याच प्रतिकार पेशींना मज्जारज्जू धडधडायला लागून संदेश देतो. संस्कृतमध्ये ह्या पेशींना गण म्हणतात. ह्या प्रतिकारपेशी रोगांवर प्रतिहल्ला चढवितात अशा तऱ्हेने हृदय हे शरीररचनतेतील एक महत्त्वाचा बिन्दू ठरते. जेव्हा आपण कुणीही आदीमायेच्या विरुद्ध ऐखादे पापकृत्य करतो. म्हणजे, दारु, वासना, विकृत प्रणय, गर्द वगैरेच्या विळख्यात सापडतो तेव्हा हे केंद्र गोधळात सापडते आणि सर्व शरीररचना खिळखिळी होवून माणसाची रोगप्रतिकारशक्ती नाहीशी होते.

डाव्या बाजुचे केंद्र हे हृदयाकडे लक्ष पुरविते हे तेच केंद्र आहे. जिथे सर्वसाक्षी परमेश्वर आत्म्याच्या रुपाने प्रकाशित होतो. अर्थात आत्मोद्धारानंतर हे केंद्र स्वयंप्रकाशीत होत असते हे केंद्र तेव्हाच दुषीत होते जेव्हा माणसे शारीरिक आणि मानसिक स्वरुपाचा अतिरेक करतात. किंवा प्रचंड प्रमाणात मद्यपान करतात. अशावेळेस हे हृदय इतके कमजोर बनते की कोणतीही शुल्लक गोष्ट हार्ट ॲटकला करणीभूत ठरु शकते तरुण वयात दारु पिणारे, टेनीस किंवा तत्सम खेळ खूप प्रमाणात खेळणाऱ्या लोकांना येणारा हा ॲटक तर जीवघेणा होवू शकतो स्वाधीस्थान ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चक्राला (दुसऱ्या केंद्राशी) शी घ्याचा संबंध असतो अत्यंत कोरड्या मनोवृत्तीचे रोखठोक लोक, किंवा खूप संतापी माणसेही हार्ट ॲटकची शिकार बनू शकतात. अत्यंत असभ्य, धूर्त, लबाड स्वाभावाची माणसेही ह्या रोगाला बळी पडू शकतात.

डाव्या बाजुचे केंद्र हे आईशी संबंधीत असते तर उजव्या बाजुचे वडिलांशी असते हे केंद्र तेव्हाच दुषीत होवू शकते जेव्हा एखाद्या मुलाच्या किंवा मुलीच्या लहानपणीच हे त्यांचे वडिल त्यांना सोडून गेले असतात किंवा त्यांच्या वडिलांकडून लहानपणी त्यांना खूप त्रास झालेला असतो. ह्या उलट जो मुलगा / मुलगी वडिलांचा अनादर करतात. आणि जे 'परमेश्वराच्या साक्षीने' चोरी, लांडी लबाडी खून इत्यादि पापे करतात तेही ह्या केंद्राच्या त्रासात सापडतात.

हृदयस्थ स्थानाच्या वर जे केंद्र आहे त्याला विशुद्धी म्हणतात पाठीच्या मणक्याच्या दोन महत्त्वाच्या हाडांच्यामध्ये ते स्थित असते. हे विशुद्धि केंद्र संपर्काचे एकतिव्र कार्य करते. जेव्हा हे केंद्र उजव्या बाजूने कार्यान्वित असते तेव्हा माणूस कमालीचा उद्धट आणि आक्रमक बनतो. ते त्याच्या बोलण्या वागण्यातून जाणवते हा माणूस उत्तम वक्ता बनू शकतो पण त्याच्या भाषणात कोरडेपणा असतो. उजव्या बाजुच्या विशुद्धी केंद्राच्या जास्त कार्यान्वयीत झाल्यामुळे त्रासलेली माणसे गर्जणाऱ्या सिंहासारखी मोठ्यांनी बोलतात. कठीण शब्द वापरतात. अत्यंत कडक भाषेत इतरांवर आपला रोब जमवितात, आवाज घोगरा

होण्यासारखी आणखीनही काही लक्षणे दिसून येतात. विशुद्धी चक्राची डावी बाजू तेव्हाच गोंधळात सापडते. जेव्हा माणसांच्या मनात अपराधी भावना निर्माण होते. अशी माणसे लाजाळू, बनतात. हे विशुद्धीकेंद्र जेव्हा संकटात सापडते. जेव्हा एखादा माणूस संपर्क साधणे विसरुन जातो. सामुहिक रित्या आनंद घेणे त्याला जमत नाही सतत अपराधी पणाची भावना बाळगणाऱ्याच्या हृदयाला त्रास होतो. किंवा त्याला कॅन्सरही होवू शकतो. जर हे केंद्र निरुपयोगी झाले तर इतरही काही केंद्रे आहेत पण त्यायोगे अत्यंत गुंतागुतीची केस निर्माण होवू शकते.

विशुद्धीकेंद्राचे आणखी एक स्थान दोन भुवयांच्यामध्ये असते त्याला हंसचक्र म्हणतात. हे चक्र भलेबुरे जाणण्याची शक्ति देते जेव्हा ते दैदिप्यमान होते. तेव्हा त्याला दैवी देणगी प्राप्त होते ह्या केंद्राचा दुरुपयोग झाल्यास एखाद्यास सायनस किंवा डोकेदुखीचां त्रास होवू शकते हे केंद्रा दुषीत झाल्यास घशाची खुपच काळजी घ्यावी लागले.

'आशा' हे केंद्र दृष्टी ची केंद्रे मेंदूत जिथे ऐकमेकांना छेदून जातात तिथे असते. ह्या केंद्राचे दोन भाग असतात. त्यापैकी अेका भागात माणसाच अंहभाव असतो तर दुसऱ्या भागात सुपर इगो वास करतो हे इगो आणि सुपर इगोचे दोन हिस्से परस्परांच्या अगदी विरुद्ध बाजुस असतात. जिथे दृष्टीच्या दोन रेघा एकमेकांना छेतात. जेथे हे आज्ञाचक्र असते ! उजव्या हाताने काम करणाऱ्याच्या सुपरइगोचे केंद्र त्यांच्या डाव्या बाजूस असते व डावखोऱ्या लोकांचे उजव्या बाजुस असते जर एखाद्या माणसांची उजवी बाजू पक्षघाताने लुळी पडली तर आपण हे लक्षात घ्यावे. की त्याच्या मेंदुच्या डाव्या बाजूवर परिणाम झाला आहे. अर्थात वैद्यकीय जगात ही गोष्ट मान्य असेलच असे मला वाटत नाही, जेव्हा तुम्ही अतीविचार करतात तेव्हा ह्या केंद्राची उजवी बाजू दूषीत होते. जिथे माणसाच्या अहंभावाचा फुगा मोठा, अधिक मोठा होण्याच्या मार्गावर असतो आणि मेंदुचा सर्व भाग त्याने व्यापून टाकलेला असतो. सवयी, ज्या आपल्याला लहानपणापासून असता त्या जेव्हा अत्युच्य शिखर गाठतात (ज्या डाव्या बाजुस असतात) तेव्हाही अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात त्यातून जर एखाद्याने चुकीच्या धार्मिक माणसाची भेट घेतली. किंवा तथाकथित भोंदू साधूंच्या अथवा नादी जर तो लागला. (साधारण अशी माणसे सामान्य लोकांना संमोहीत करत असतात.) तर तो वेडाच बनू शकेल. खर पाहता ह्या सवयींना तसा काहीच अर्थ नसतो. पण आपण त्या स्वीकारत असतो. असे आपण वाढतो तशा ह्या सवयीही वाढतात आणि आपल्यावर आपल्या मनावर दुष्परिणाम करतात.

आता शेवटचे केंद्र जे आपल्या मस्तकात स्थित असते. आपल्या टाळूच्या हाडाच्या सर्वात वरच्या भागात ते असते. हे ब्रह्मरंध्र जे शेवटचे ठिकाण असते. सहस्त्रा पाकळ्यांचे

बनलेले हे सहसा केंद्र खरोखरच खूप महत्त्वाचे असते. अर्थात ह्या सहस्र पाकळ्या म्हणजे एक हजार नसा होय. जेव्हा हे केंद्र दैदिप्य मान होते तेव्हा ह्या सहस्त्रा जोती अत्यंत शांतपणे वेगवेगळ्या रंगाने उजळलेल्या दिसतात. कदाचित द्या जोतींच्या संख्येत खूप मोठ्या प्रमाणात मतभेद असू शकतात. सहजयोग न समजणाऱ्या अनेक डॉक्टर्सनी हा वाद निर्माण केला आहे. अर्थात हे सर्व त्यांच्या ज्ञानाच्या मर्यादेमुळेच होते. बायबलमध्ये म्हटले आहे. "मी तुझ्या पुढे अनेक ज्योतींच्या प्रकाशासारखा प्रकट होईन" भारतीय धर्मग्रंथातही त्याचे अनेक ठिकाणी वर्णन केलेले आहे जेव्हा कुंडलिनी ह्या सातव्या केंद्राला छेदते ती टाळूला बिंधून बाहेर पडते. अशावेळीस टाळू परत थोडीशी मऊ होते जशी ती आपल्या बालपणी असते आणि ही बाहेर पडलेली कुंडलिनीच सुक्ष्म सर्वव्यापी दैवी शक्तीशी आपले नाते बाहेर पडलेली कुंडलिनीच सर्वव्यापी दैवी शक्तीशी आपले नाते जोडते - आणि परिणामता पवित्र आत्म्याच्या मृदुल, शीतल लहरींचा सुखद अनुभव आपण हाताच्या बोटाशी अनुभवू शकतो. हाताशी हा अनुभव येतो. टाळूशी ही येतो. दैवी शक्तींच्या साक्षात्काराची ही पहीली अनुभुती असते.

अनेक लोकांच्या वृत्ति इकडून तिकडे डुलत असतात. ते मध्यभागी राहूच शकत नाहीत. जेव्हा कुंडलिनी सर्वव्यापी परमेश्वराशी आपला संबंध प्रस्थापित करते तेव्हाच ते जमू शकते दोन विरुद्ध ह्या टोकाशी जाण्याने आपण अनेक समस्या निर्माण करतो.

आपल्या हाताच्या बोटाच्या साह्याने आपण ही सर्व केंद्रे आपली आणि इतरांचीही अनुभवू शकतो (आकृतीच्या आधारे) आणि जर तुम्हाला आपली ही सर्व केंद्रे निरोगी कशी बनवायची हे साधले तर तुम्ही तुमच्या स्वत:च्या ज्ञानाच्या आधारे इतरांचीही ही केंद्रे निरोगी करु शकता आपोआपच आपल्या मनातली मानवी कल्याणाची भावना एक सामुहिक रुप धारण करते आता आपण चक्राची भाषा बोलू शकतो, दुसऱ्यांना ह्या चक्राच्या आधारे जाणून घेऊ शकतो खूप उजव्या बाजुला झुकणारी माणसे स्वत:च्या भविष्याचा विचार करणारी असतात. स्वत:विषयी जास्त जागरुक असतात तर डावीकडे झुकणारी अर्धसुत्रअवस्थेत असतात. जेव्हा आपण कुंडलिनी जागृत करुन टाळूला बिंधून सर्वव्यापी परमेश्वराशी जर नाते जोडलेले आहे. साहजिकच आपण योग्य जाणीवेच्या आदर्श जाणीवांच्या राज्यात आहोत ह्यात शंकाच नाही.




| | | |
|---|---|---|
| १. मूलाधार | २. स्वाधिष्ठान | ३. नाभी |
| ३अ. भवसागर | ४. अनाहत | ५. विशुद्धि |
| ६. आज्ञा | ७. सहस्रार | |

**सर्वाधिकार सुरक्षित**

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाची दुसरी आवृत्ती किंवा कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी किंवा विविध माध्यमांमध्ये रूपांतर जसे इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, झेरॉक्स, पुनर्मुद्रण हे पूर्व परवानगीशिवाय करू नये.